# आप्तवाणी

## श्रेणी-८

Marathi

दादा भगवान प्ररूपित

# आप्तवाणी

## श्रेणी - ८

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

मराठी अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : **अजीत सी. पटेल**
**दादा भगवान विज्ञान फाउन्डेशन**
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर, नवरंगपुरा,
अहमदाबाद - 380009, Gujarat, India.
**फोन** : +91 79 3500 2100, +91 9328661166/77

**कॉपीराइट** : © Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College, Usmanpura,
Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel** : +91 9328661166/77

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

**प्रथम आवृत्ति** : 1000 प्रती मार्च, 2026

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 200 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
एच.बी.कापडिया न्यू हाइस्कूलच्या समोर,
छत्राल-प्रतापपुरा रोड, छत्राल,
ता. कलोल, जि. गांधीनगर-382729, गुजरात
**फोन** : +91 79 3500 2142

**ISBN/eISBN :** 978-81-99202-28-3

**Printed in India**

# त्रिमंत्र







नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो ऊवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद



# दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात त्यांना विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवित आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे! त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! मी स्वत: भगवान नाही. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

# आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

परम पूज्य दादा भगवान (दादाश्री) यांना 1958 मध्ये आत्मज्ञान प्रकट झाले. त्यानंतर 1962 ते 1988 पर्यंत देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत.

दादाश्रींनी आपल्या हयातीतच आत्मज्ञानी पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत.

आत्मज्ञानी पूज्य दीपकभाई देसाई यांना सुद्धा दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. वर्तमानात पूज्य नीरूमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात निमित्तभावाने आत्मज्ञान प्राप्ती करवित आहेत.

या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा आतून मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञाना संबंधीत जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषायांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये विशेष लक्ष ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रूटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण लिहिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

❖❖❖❖❖

# समर्पण

अनंत काळ लोटला, झाले नाही आत्मदर्शन,
प्रकट 'ज्ञानीं'शिवाय कोण उघडतील सुदर्शन?
'ज्ञानीं'च्या दर्शनाने, जर लाभले निजदर्शन,
अहाहा! धन्य ते अनुपम अभेद विश्वदर्शन!

दृष्टी पडताच दाखविते, उलट्याला सरळ,
विझवते अंतर्दाहाची अविरत जळजळ.
थांबल्या ठेचा आता, ज्ञान प्रकाश पडताच,
संसारी दु:खे संपली, सनातन सुखाच्या सुगंधाने.

'ज्ञानीं'मध्ये प्रकटले, 'हे' जे निरावरण दर्शन,
अनंत भेद, प्रदेशातून, झळकले आत्म तत्त्व दर्शन.
निज दोष दाखवी, सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम,
'दर्शन' आहे केवळाचे, अडकले 'ज्ञान' चार अंशाने.

'या' दर्शनाने, उघडले मोक्षमार्ग दूषमकाळात,
पदोपदी पसरविले प्रकाश परम हितार्थ,
बंधने तोडूनी, दृष्टी बदलविली 'दादा' दर्शनाने!
'आप्तवाणी'च्या रूपात समर्पण जगकल्याणार्थ.

# संपादकीय

प्रस्तुत ग्रंथात प्रत्यक्ष प्रकट 'ज्ञानी पुरुषां'च्या स्वमुखातून वाहिलेले आत्मतत्त्व आणि इतर तत्त्वांसाठी वास्तविक दर्शन प्रकट होत आहे. पूर्ण ग्रंथाचे संकलनाचे विभाजन दोन भागात होत आहे. पूर्वार्धात आत्मा काय असेल? कसा असेल? त्या संबंधी अनेक प्रश्न विचारून विचारून प्रश्नकर्ता आपले समाधान करून घेत आहे. आणि उत्तरार्धात 'मी कोण आहे?' हे कशा प्रकारे जाणून घ्यावे?, स्वतःच्या स्वरूपाची ओळख, साक्षात्कार कशा प्रकारे प्राप्त करावा, याबद्दलची प्रश्नकर्त्याची उत्सुकता जास्त तीव्र झाली आहे, आणि म्हणून तो याबद्दलचे प्रश्न पुन्हा पुन्हा विचारून मार्गदर्शन प्राप्त करून घेत आहे!

आत्म्याच्या अस्तित्वाच्या शंकेपासून सुरू करत, आत्मा काय असेल? कसा असेल? काय करत असेल? जन्म-मरण म्हणजे काय? जन्म-मरण कोणाचे? कर्म काय आहे? चार गती कोणत्या? त्या कशा प्राप्त होतात याचे रहस्य, मोक्ष म्हणजे काय? सिद्धगती म्हणजे काय? प्रतिष्ठित आत्मा, मिश्रचेतन, निश्चेतन-चेतन, अहंकार, विशेष परिणाम, अशा शेकडो प्रश्नांची समाधानपूर्वक उत्तरे येथे प्रकट झाली आहेत. जीव म्हणजे काय? शिव म्हणजे काय? द्वैत, अद्वैत, ब्रह्म, परब्रह्म, एकोहम्, बहुस्याम्, आत्म्याचे सर्वव्यापकत्व, कणांकणांत भगवंत, वेद आणि विज्ञान अशा अनेक प्रकारच्या वेदांताच्या रहस्यांवरील पडदा येथे दूर झाला आहे. ज्याच्या आधारावर पूर्ण मोक्षमार्ग पार करायचा आहे त्या अध्यात्माची प्राथमिक पण मूळ यथार्थ समज येथे मिळते, ती समजण्यात थोडी सुद्धा चूक झाली तर 'ज्ञानीं'च्या 'पेरेलल' राहून रस्ता पूर्ण करण्याऐवजी एका केसाइतकाही रस्ता जरी चुकला तरी मग लाखो मैल चालल्यानंतरही एकाच द्वारी पोहोचण्याऐवजी कुठे तरी भलत्याच जागी जाऊन पोहोचू!

'आपण सर्व परमात्म्याचे अंश आहोत' अशा चुकीच्या कल्पना जिथे पसरलेल्या असतात, तिथे आपण 'स्वतःच' परमात्मा आहोत, संपूर्ण स्वतंत्र आहोत, अंश नसून पूर्ण आहोत' असे कसे समजून येणार?

आणि हे जर 'बिलीफ'मध्ये आलेच नाही, तर मग ते पद कसे प्राप्त होईल? अशा प्रचलित लोकमतांमुळे कितीतरी भ्रामक कल्पना आपण ग्रहण केलेल्या असतात. त्यामुळे यथार्थ दर्शनाऐवजी वेगळ्याच प्रकारे वर्तन आपल्याकडून केले जात असते.

तमाम शास्त्रांचे, साधकांचे, साधनांचे एकच सार आहे की स्वत:च्या आत्म्याचे भान, ज्ञान प्राप्त करून घ्यायचे आहे. 'मूळ आत्मा' तर शुद्धच आहे, पण 'स्वत:'मध्येच रॉंग 'बिलीफ' (चुकीची मान्यता) सेट झाली आहे. प्रकट 'ज्ञानी पुरुषां'ना भेटल्यावर ही चुकीची मान्यता दूर होते. जे कोटी-कोटी जन्मात होत नाही ते 'ज्ञानीं'कडून अंत:मुहूर्तात प्राप्त होऊ शकते!

विकल्पींचे किंवा जिज्ञासूंचे लाखो प्रश्न येत राहतात, तरी पण ज्ञानींची उत्तरे थेट मर्मस्थानावर आणि 'एक्झॅक्टनेस ओपन' (अचूकता उघड) करणारी अशी मिळत जातात, आणि ते ज्ञानींच्या संपूर्ण निरावरण झालेल्या दर्शनाची प्रतीती करवून देतात. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर 'मी केवळज्ञानात असे पाहून उत्तर देतो.' आणि वाणीचाही मालकीभाव नाही. 'टेपरेकॉर्ड' बोलत आहे. 'स्वत:' बोलले तर चुकीचे बाहेर पडू शकेल, पण 'टेपरेकॉर्ड'मध्ये चूक कशी असेल? 'स्वत:' तर केवळ 'टेपरेकॉर्ड'चे ज्ञाता-दृष्टा राहतात.

जिज्ञासू-मुमुक्षुंना आत्मप्राप्तीसाठी, आत्म्यासंबंधी, विश्वासंबंधी मनात उत्पन्न होणाऱ्या शेकडो प्रश्नोत्तरांचे प्रस्तुत ग्रंथात संकलन केले आहे, आणि ते सूज्ञ आत्मार्थींना स्वत:च्याच भाषेत 'वस्तू'ची स्पष्टता करविणारे आहे. परंतु 'वस्तूला' (आत्म्याला) तथारूप दृष्टीत आणण्यासाठी, अनुभव करण्यासाठी तर प्रत्यक्ष-प्रकट स्वरूपात विराजमान असलेल्या ज्ञानी श्री दादाश्रींकडूनच ते प्राप्त होईल असे आहे.

नाहीतर आत्मज्ञान, केवळज्ञान याबाबतच्या अत्यंत गूह्य गोष्टी स्वत:च्या आत्मप्रकाशाच्या एकाही किरणाला प्रकट करण्यास केवळ निष्फळ आहेत. जोपर्यंत 'ज्ञानींचा' सुयोग मिळत नाही, 'ज्ञानीं'कडून ज्ञान प्राप्त होत नाही, तोपर्यंत शब्दात्म्यातच गुंतून राहतो. आणि जेव्हा

प्रत्यक्ष ज्ञानींचा एकच शब्द अगदी सहजपणे हृदयात उतरतो, तेव्हा अनंत दोषांचे आवरण दूर होऊन समस्त ब्रह्मांड प्रकाशमान करणारे परमात्मा स्वत:मध्येच प्रकट होतात! ह्या अनुपम 'ज्ञानीं'ची अतुलनीय सिद्धी तर ज्याने जाणली, त्यानेच आनंद मिळवला आहे. नाहीतर अवर्णनीय आत्मप्रकाशाला शब्द कसे बरे प्रकाशित करू शकतील? कारुण्यमूर्ती दादांना वारंवार असे म्हणताना ऐकले आहे, ''हे जे दिसत आहेत, ते 'दादा भगवान' नाहीत, हे तर 'ए. एम. पटेल' आहेत. आत प्रकट झाले आहेत ते 'दादा भगवान' आहेत. ते 'चौदालोका'चे नाथ आहेत! तुम्हाला जे काही हवे आहे ते त्यांच्याकडून मागा. पण तुम्हाला टेंडर पण नीट भरता येत नाही. आणि हीच हकीगत आहे. त्यांना सकळ ब्रह्मांडाच्या 'ज्या' स्वामित्वाची प्राप्ती झाली आहे 'ते' मागायच्या ऐवजी हे अभागी जीव एखाद्या 'प्लॉट'चे टेंडर भरतात! त्यावेळी जर दादांचे हृदय कोणाला वाचता आले असते तर ते अपार करुणेने भरून आलेले त्याला दिसले असते.

आत्म्यासंबंधी विद्यमान भ्रामक मान्यता परम सत्पासून शेकडो मैल दूर ढकलून देतात. जरी आत्मज्ञान मिळाले नसेल, तरी ज्ञानी पुरुषांनी जो आत्मा पाहिला आहे, जाणला आहे, अनुभवला आहे आणि ज्याची यथार्थ समज ज्ञानी पुरुष देत आहेत, ती जर 'फिट' बसली तरीही त्याचे उलट दिशेने जाणे थांबेल. पूज्यश्री दादाजींनी स्वत:च्या ज्ञानात आत्म्याचे स्वरूप आणि जगाचे स्वरूप जसे आहे तसे पाहिले आहे, जाणले आहे, अनुभवले आहे, त्या संबंधात त्यांच्याच श्रीमुखातून निघालेल्या वाणीचे येथे संकलन केले आहे आणि अध्यात्म मार्गात पदार्पण करणाऱ्यांना आत्मसन्मुख होण्यास ते अत्यंत उपयोगी सिद्ध होईल.

'ज्ञानी पुरुषां'ची वाणी, निमित्त आणि संयोगाच्या आधीन सहजस्वरूपात बाहेर पडत असते. त्यात जर काही उणीवा-त्रुटी वाटल्या, तर त्या फक्त संकलनातील उणीवाच आहेत, 'ज्ञानी पुरुषां'च्या वाणीत अजिबात नाहीत. त्याबद्दल क्षमा प्रार्थना!

**डॉ. नीरूबहन अमीन**

# उपोद्घात

## खंड - 1

### आत्मा काय असेल? कसा असेल?

ब्रह्मांडातील सर्वात सूक्ष्मतम आणि गुह्यतम जी वस्तू आहे ती म्हणजे 'स्वत:चेच स्वरूप!' 'स्वत:'च 'जो' आहे, ते त्याला न समजल्यामुळे 'आत्मा असा असेल, तसा असेल, प्रकाशस्वरूप असेल, तो प्रकाश कसा असेल?' असे असंख्य प्रकारचे प्रेरक विचार विचारकांना येतच असतात, त्याचे यथार्थ कल्पनातीत दर्शन तर प्रकट 'ज्ञानी पुरुष'च करू शकतात आणि करवू शकतात. ज्यांना ह्या प्रत्यक्ष योगाची प्राप्ती झालेली नाही, अशा लोकांना प्रस्तुत ज्ञानवाणीचा ग्रंथ खरा मार्ग दाखवून त्या दिशेने घेऊन जातो.

जो स्वत:चा सेल्फ आहे, स्वत:च आहे, ते जाणणे, यालाच आत्मा म्हणतात. त्याला ओळखायचे आहे.

आत्म्याच्या स्वरूपाची, आकृतीची शंका आणि कल्पना यांच्या पलीकडील स्वरूप ज्यांनी जाणले आहे, पाहिले आहे आणि अनुभवले आहे आणि निरंतर त्या स्वरूपातच वास केला आहे, त्यांनी आत्म्याला आकृती-निराकृतीच्या पलीकडचा म्हटले आहे. स्थळ, काळ किंवा अशा कोणत्याच अवलंबानाचे जिथे अस्तित्व नाही, असे आत्म्याचे निरालंब, प्रकाश स्वरूप आहे. 'ज्ञानी' अशा आत्म्यात राहतात. स्वत: वेगळे, शरीर वेगळे, शरीराशी शेजाऱ्याप्रमाणे देह व्यवहार करतात!

जगात कोणी नास्तिक नसतोच. ज्याला अस्तित्वाची जाणीव आहे, 'मी आहे' अशी जाणीव आहे, असे सर्व जण आस्तिक आहेत! आत्मा अस्तित्व, वस्तुत्व आणि पूर्णत्वासहित असतो. प्रत्येक जीवमात्राला अस्तित्वाचे भान असते, वस्तुत्वाचे भान अतिशय विरळ व्यक्तींनाच असते आणि पूर्णत्व तर प्रसाद आहे, वस्तुत्वाला जाणण्याचा! या वस्तुत्वाचे भान तर फक्त भेदज्ञानीच करवितात.

आत्म्याच्या अस्तित्वाच्या प्रतीतीची खात्री पटवताना ‘ज्ञानी’ म्हणतात की ज्याप्रमाणे अत्तराचे अस्तित्व सुगंध उघड करतो, तसेच आत्मा अरूपी असूनसुद्धा त्याच्या सुख-स्वभावावरून आत्मा ओळखता येतो. अनंत ज्ञान, दर्शन, शक्ती, सुख असे परमात्म्याचे अनंत गुणांचे धाम असणारे स्वरूप आहे, आणि ते तो ‘स्वतः’च आहे परंतु स्वतःच्या स्वरूपाचे भान झाल्यानंतरच हे सर्व गुण निरावृत्त होतात.

चेतन आणि जड यांच्यातील भेद त्यांच्या गुणधर्मावरून समजता येतो. ज्ञान-दर्शन, पाहणे-जाणणे, हा चैतन्याचा स्वभाव आहे, जो इतर कशात नाही.

जीवाच्या अस्तित्वावर शंका घेणारे, ‘माझ्या तोंडात जीभ नाही’ असे बोलणाऱ्याप्रमाणे, स्वतःच्या, वस्तू-अस्तित्वाला स्वतःच उघड करतात! ज्याला जीवाबद्दल शंका वाटते, तो स्वतःच जीव आहे. जडाला अशी शंका असते का?

काळोखात देखील तोंडात घातलेल्या श्रीखंडाचा प्रत्येक घटक जो ओळखतो, तो जीव आहे. ज्ञानतंतु फक्त बातमी पोहोचवतात पण ज्याला समजते, तो जीव आहे. जो सदैव सुखाची इच्छा करणारा आणि सुख शोधणारा आहे तोच जीव आहे.

जिथे *लागणी* (सुख-दुःखाची अनुभूती, संवेदना) आहे, तिथे आत्मा आहे. जिथे *लागणी* नाही, तिथे आत्मा नाही. तरी पण आत्म्यात *लागणी* नसते. ज्याला *लागणी* वाटते, ते पुद्‌गल आहे. हलनचलन करते, बोलते, खाते, पिते ते चेतन नाही, पण जिथे काही ज्ञान किंवा अज्ञान आहे, दया किंवा *लागणी* आहे, तिथे चेतन आहे.

आत्म्याचे स्थान संपूर्ण देहात व्याप्त आहे. जिथे दुःखाचे संवेदन आहे, तिथे आत्मा आहे. फक्त (वाढलेली) नखे आणि केस यात आत्मा नाही. हृदयात तर स्थूल मनाचे स्थान आहे, आणि सूक्ष्म मन दोन-भुवयांच्या मध्यभागी अडीच इंच आत आहे.

आत्म्याच्या आकुंचन-प्रसरणशील स्वभावामुळे जेव्हा शरीराचा

काही भाग कापला जातो, किंवा काही भागाला जेव्हा ॲनॅस्थेशिया दिला जातो तेव्हा तेवढ्या भागातून आत्मा बाजूला सरकतो.

जीवनाच्या तिन्ही अवस्थात, अरे! अनंत जन्म-मरणाच्या अवस्थांतदेखील, जो अजन्म-अमर आहे असा आत्मा - जसाच्या तसा निज-स्वभावातच कायम असतो. पुद्‌गलाबरोबर त्याला जन्मोजन्मी सोबतच राहावे लागले. ही रॉंग बिलीफ गेली, की झाला स्वतंत्र, संपूर्ण स्वतंत्र! नाहीतर पुद्‌गल पण आत्म्याला चिकटलेले नाही आणि आत्मा पण पुद्‌गलाला चिकटलेला नाही. पुद्‌गल म्हणजे काय? परमाणू तत्त्व आणि आत्मतत्त्व यांच्या संयोगाने विशेष परिणाम उत्पन्न झाल्यामुळे प्रथम अहम्, क्रोध, मान, माया, लोभ असे व्यतिरेक गुण असलेली प्रकृती उत्पन्न झाली आणि संसार निर्माण झाला! यात 'मूळ आत्मा' पूर्णपणे अक्रीय आहे. पुद्‌गल सक्रीय असल्यामुळे आणि अज्ञानामुळे ते आत्म्यात कर्तेपणाची भ्रांती उत्पन्न करविते. या प्रकृतीच्या साखळ्यांमुळे परमात्मा झाले बंदीवान्! परंतु जेथे बंधन आहे. तिथे मोक्ष पण आहे. अज्ञानभावामुळे, भ्रांतभावामुळे बंधन आणि ज्ञानभावामुळे मुक्ती! जेव्हा कर्तेपणाची, स्वतःच्या स्वरूपाची भ्रांती तुटते, तेव्हा स्वतः कोणत्याच कर्माचा कर्ता राहत नाही. 'स्वतः परमात्माच आहे' याचे भान निरंतर राहते आणि (त्यामुळे तो) सर्व प्रकारे संपूर्ण स्वतंत्र, मुक्त बनतो.

जन्म-मरणाचे मूळ कारण अज्ञान आहे, याउलट ज्ञानामुळे मुक्ती मिळते. येणे-जाणे, जन्म-मरण, हे अहंकाराला आहे. योनी प्राप्ती 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्' वर अवलंबून आहे. यात कोणालाच स्वातंत्र्य नाही. भगवंतांनाही नाही.

आरोपित भाव आणि संसारीभाव यांच्यामुळे कारण शरीर उत्पन्न होते आणि त्यानंतर दुसरे पार्लमेंटरी मेंबरस् मिळून 'परिणाम' आणतात. ज्यातून इफेक्ट बॉडी बनते. पार्लमेंटमध्ये ठराव दाखल करून सदस्य निघून जतात पण प्रस्ताव शिल्लक राहतात. ते प्रस्ताव मग एकापाठोपाठ रूपकात येत राहतात.

स्थूल देहातून आत्मा बाहेर पडतो, तेव्हा त्याच्याबरोबर सूक्ष्म देह,

कारण देह आणि क्रोध-मान-माया-लोभ जातात. कारण देह, पुढील जन्मात कार्य-देह बनतो. जोपर्यंत कर्मांची शिल्लक असते, तोपर्यंतच तेजस् शरीर सोबतच राहते, म्हणजेच जन्मभर सोबत राहते आणि ते मोक्ष मिळेपर्यंत आत्म्यासोबतच राहते.

डिस्चार्जमध्ये तर स्वातंत्र्य नसतेच, परंतु चार्जमध्ये सुद्धा आत्म्याला स्वतंत्र शक्ती नसते. अज्ञानामुळे डिस्चार्जच्या धक्क्याने नवीन चार्ज होऊन जातो. गेल्या जन्मीच्या कर्मांचे 'चार्जिंग' योजनेच्या रूपात असते, ते या जन्मात रूपकाच्या रूपात डिस्चार्जच्या रूपात असते. योजनेच्या रूपात असते तोपर्यंतच त्यात बदल करणे शक्य असते. एकदा रूपकात आले की मग बदल करणे अशक्य आहे. या जन्मातील बदल, पुढील जन्मात फळ देते आणि जर आयोजनच थांबले तर आत्यंतिक मुक्ती मिळते!

एकेन्द्रियापासून ते मनुष्यगतीपर्यंतचे परिर्वतन 'इव्होल्यूशनच्या थिअरी' अनुसार योग्य आहे. पण मनुष्यजन्मात आल्यावर अहंकाराची मान उंचावते, कर्ता बनून 'क्रेडिट-डेबिट' करू लागतो. मनुष्य जन्मात अस्तित्वात असलेल्या पाशवी, मानवी, राक्षसी किंवा दैवी वृत्तींच्या परिणामस्वरूप चतुर्गतींची दारे खुली होतात. एकदा माणूस झाल्यानंतर फारच झाले तर आठ जन्मांपर्यंत अन्य योनीत भटकून 'बॅलेन्स' पूर्ण करून (कर्मे भोगून) तो परत माणसातच येतो. भटकणे थांबणे हे मात्र आत्मज्ञानानंतरच होऊ शकते. आत्मज्ञान झाल्यानंतरच्या योनी क्रमबद्ध पुढे जातात, असे जर झाले नाहीतर सर्व काही नियतीच्या आधीन आहे असेच म्हणावे लागेल ना! जीवांचा प्रथम वेळा मनुष्यगतीत येण्याचा काळ निश्चित असतो. पण मनुष्यजन्मात आल्यानंतर अहंकार उत्पन्न झाल्यामुळे गुंता निर्माण होतो. परिणामी चतुर्गतीत भटकावे लागते. कोणत्याही प्रकारच्या संयोगांच्या गर्दीत 'स्वत:' अहंकाराला जर मुक्तीच्या दिशेने वळवील तर मोक्ष मिळेल, पण अहंकाराला असे वळविणे सोपे नाही, म्हणून मनुष्यजन्मात आल्यानंतर मोक्षाला जाण्याचा काळ निश्चित नाही. सम्यक्दृष्टी प्राप्त झाल्यानंतरच मोक्षाला जाण्याचा काळ निश्चित होऊ शकतो. नाहीतर लोकसंज्ञेच्या अनुसार चालत राहिल्यामुळे

संसाराकडेच जात राहतो. ज्ञानी पुरुष प्राप्त झाल्यानंतर, तो ज्ञानींच्या संज्ञेने चालू लागला तर त्याला मोक्ष प्राप्त होईल.

सूर्याच्या संयोगाने सावली उत्पन्न होते, आरशाच्या संयोगाने प्रतिबिंब उत्पन्न होते, यात सूर्याचे आणि आरशाचे कर्तेपण असते का? सावलीला आणि प्रतिबिम्बाला पाहिल्यावर फक्त त्याची बिलीफच बदलते की 'मला' हे काय झाले? 'रॉंग बिलीफ' उत्पन्न झाल्यामुळे 'अहम् आणि बुद्धी' त्यामुळे प्रकृतीची प्रवर्तना (सुरुवात) झाली. वास्तवात 'मूळ प्रकाश' की ज्या प्रकाशामुळे अंहम् आणि बुद्धी प्रकाशित होऊन प्रकृतीला प्रकाशमान करू लागली. त्या 'मूळ प्रकाशा'कडची दृष्टी, त्याचे भान संपल्यामुळे 'मूळ प्रकाशा'वर भ्रांतीचा पडदा पडला! आणि प्रकृतीच्या हावभावांना 'स्वत:'चे हावभाव मानून 'स्वत:' परमात्मापद सोडून 'स्वत:च' प्रकृतीप्रमाणे वागू लागला. आरशातील चिमणी ही जणू काही दुसरी खरी चिमणी आहे असे मानून मूळ चिमणी चोची मारते तसेच आहे ना हे! बघा! कसे अडकले? संयोगांमध्ये स्वयं परमात्माच कसे अडकले आहेत!! असे असूनही परमात्मा निजस्वभावात त्रिकाल बाधितरूपातच विद्यमान् असतात.

संयोगांच्या दबावामुळे आत्म्याचा ज्ञान पर्याय विभाविक झाला आहे, मूळ आत्मा नाही. विभावदशेत जशी कल्पना केली, पुद्‌गल पण तसेच विभाविक झाले. परिणामी मन-वचन-काया, यांची निर्मिती झाली आणि ते 'व्यवस्थित'च्या नियमात अडकले. म्हणूनच या गुह्यतम विज्ञानाचे ज्ञाता, अशा ज्ञानी पुरुषांच्या संयोगामुळे स्वत:चा 'मूळ प्रकाश' एकदा दृष्टीमध्ये आल्यामुळे 'स्वत:' मुक्तीपद प्राप्त करतो. ज्याप्रकारे गजसुकुमारच्या डोक्यावर सासऱ्याने धगधगत्या शेगडीची पगडी बांधली, त्या वेळी ते स्वत: नेमिनाथ भगवंतानी दाखविलेल्या मूळ प्रकाशात राहिले आणि या संयोगाला त्यांनी ज्ञेयाच्या रूपात, ज्ञानात पाहिले आणि मोक्ष प्राप्त केला.

निजस्वरूपाच्या आणि कर्तास्वरूपाच्या रॉंग बिलीफमुळे राग-द्वेष उत्पन्न झाल्यामुळे पुढील जन्मासाठी मन-वचन-काया यांच्या तीन बॅटऱ्या

चार्ज होत राहतात आणि जुन्या तीन बॅटऱ्या स्वाभाविकपणे डिस्चार्ज होत राहतात. ज्ञानींच्या कृपेने राइट बिलीफ सेट झाली तर तो मुक्ती मिळवील.

आत्म्याच्या आदि आणि अंतांच्या विकल्पांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी ज्ञानी पुरुष आत्म्याला अनादि-अनंत म्हणून मोकळे झाले! कारण सनातन (शाश्वत) वस्तूचा आदि आणि अंत असेलच कसा? त्याचे वाढणे-घटणे कसे शक्य आहे? त्याचे जाणे-येणे कसे असू शकेल? गोलाकाराची सुरुवात कशी असू शकते?

ज्याची आदिच (झाली) नाही, त्याला बनवणार तरी कसे? कारण बनणारा आणि बनविणारा दोघेही विनाशीच असतात.

प्रत्येक वस्तू, जग स्वयं, स्वभावत:च पुढे पुढे जात राहत असल्यामुळे समसरण मार्गातून जेवढे जीव सिद्धक्षेत्रात जातात, तेवढेच जीव अव्यवहार राशीतून व्यवहार राशीत प्रवेश करतात. त्यामुळे व्यवहार राशीची रचना (व्यवहार राशीत येणाऱ्या आत्म्याची एकूण संख्या) जशीच्या तशी राहते. यातील एक जरी कमी झाला तरी निसर्गाचे सर्व नियोजन बिघडून जाईल आणि आज चंद्र तर उद्या सूर्य गैरहजर राहू लागतील.

जनसंख्या वाढण्याची किंवा घटण्याची मर्यादा निसर्गाच्या हानी-वृद्धीच्या अटल नियमांच्या बाहेर जाऊ शकत नाही.

आत्मा स्वभावानेच मोक्षगामी आहे, जर मध्ये ढवळाढवळ केली नाही तर. शुभ विचारांमुळे हलके परमाणू ग्रहण केले जातात. ज्यामुळे आत्म्याचे उर्ध्वगमन होते आणि जड परमाणू ग्रहण केल्यामुळे वनस्पतीकायपर्यंत पोहोचतो, आणि मग तिथे नारळ, आंबा किंवा रायण अशा झाडात प्रवेश करून पोहोचून नारळ, आंबा किंवा रायण स्वत: केलेल्या प्रपंचांचा (कर्मांच्या) दंड म्हणून लोकांना जन्मभर गोड-गोड फळे देऊन, ऋणमुक्त होतो. आणि शेवटी ज्ञानी पुरुषांकडून शुद्धात्म्याचे ज्ञान मिळाल्यावर स्वभावात राहून आणि पुद्‌गल प्रसंगांचा पूर्णपणे निकाल

झाल्यावर मोक्षात जाऊ शकतो. ह्या वैज्ञानिक नियमातून बाहेर जाण्याची कोणाचीच स्वतंत्र सत्ता नसते.

जगात भासणारे भिन्नत्व, भ्रांतीमुळे आहे, अवस्थांमुळे आहे, बुद्धीच्या डिग्रीच्या दृष्टीने पाहण्यामुळे आहे. मूळ तत्व होऊन सेंटरात (केंद्रात) पाहिल्याने अभिन्नताच आहे. तेच परमात्मा दर्शन आहे.

ज्ञानी 'जसे आहे तसे' पाहून बोलतात. जे 'आहे' त्याला 'नाही' म्हणत नाहीत आणि जे 'नाही' त्याला 'आहे' म्हणत नाहीत. वीतरागींनी सनातन वस्तूंचे गुण – उत्पाद, व्यय आणि ध्रौव यातील उत्पन्न होणे आणि विनाशी होणे यांना वस्तूंचे पर्याय म्हटले आहे, आणि स्थिर राहणे, याला वस्तूचे गुण असे म्हटले आहे. यांच्याच स्थूल रूपकांना लोकांनी ब्रह्मा, विष्णु आणि महेश असे मानले, आणि त्यांची (चक्क) मूर्ती स्थापित केली अरे, गीता आणि गायत्रीच्या मूर्त्या देखील ठेवल्या. गीतेत श्रीकृष्णानी सांगितलेल्या अंतराशयाची सूक्ष्मतम स्वरूपात भक्ती करण्याऐवजी स्थूल मूर्तीची भक्ती केली. गायत्री मंत्र जप करण्याऐवजी मूर्तीत समाधान मानले! गोष्टीमागील वैज्ञानिक रहस्य विसरले आणि स्थूलाला पकडून बसले.

ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांच्या मूर्तीला सत्त्व, रज आणि तम, या तीन गुणांच्या प्रतीकरूपात ठेवले गेले आहे. रूपकात, सत्याच्या वाकड्या वाटेत भटकत बसण्याऐवजी मागे येऊन स्वत:च्या घरी जाणे उत्तम! उलट दिशेने तीव्र वेगाने वाहत असलेल्या लोकांना ज्ञानी खऱ्या दिशेकडे वळवतात, आणि तेही निमित्त भावाने, कर्ता बनून नाही!

सत्याचा शोध तर निराग्रहानेच होतो. आग्रह हा अहंकार आहे. मी चंदुलाल, याचा काका, याचा मामा... हे 'रिलेटिव्ह' सत्य 'रिअल'मध्ये तर असत्यच ठरते.

ज्ञानी नेहमी वास्तविकताच उघड करतात. जर ते कोणी स्वीकारत नसेल तर स्वत:ला खरे सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समोरच्या माणसांबरोबर त्याच्या पायरीवर बसून राहत नाहीत. 'तुझ्या दृष्टीने बरोबर आहे' असे

म्हणून मोकळे होतात! स्वत:च्या परम सत्याचा पण जिथे आग्रह नाही, तिथेच संपूर्ण वीतरागीपणा प्रकट होतो.

'अज्ञान' जाणले तर समोरच्या किनाऱ्यावर असलेले ज्ञान सापडतेच. आत्म्याला जाणले की पुद्गलाची आपोआप ओळख होते आणि पुद्गलाला ओळखले तर आत्म्याला पण जाणता येईल. वेदांती पुद्गलाचा शेवट शोधू लागले आणि शेवटी 'नेति, नेति' असे म्हणून थांबले! केवळज्ञानींनी प्रथम निज आत्मस्वरूप प्राप्त केले, आणि मग जे बाकी उरले त्याला पुद्गल असे म्हणून मुक्त झाले!! खरे तर आत्मज्ञान जाणायचे नसते. स्वत:ला, स्वत:च्या स्वरूपाचे भान मिळवायचे असते. फक्त शब्द आत्मा जाणून काहीही निष्पन्न होत नाही.

अभेदतेचे निरूपण करणाऱ्या वेदांमुळे देखील भेदबुद्धीचीच प्राप्ती होते. अबुधता प्राप्त झाली तरच अभेदबुद्धी फलित (निर्माण) होते. 'ज्ञानी पुरुषां'नी वेद 'थिऑरिटिकल' आहेत आणि विज्ञान प्रॅक्टिकल आहे असे सांगितले. वेद म्हणजे बुद्धीगम्य ज्ञान-इनडायरेक्ट प्रकाश आणि ज्ञान हा डायरेक्ट प्रकाश आहे. जिथे वेद पोहोचले नाहीत, तिथे ज्ञानी पोहोचले. चार वेद, चार अनुयोग आत्मतत्व दाखवतात, प्राप्त करवू शकत नाहीत. श्रुतवाणी चित्ताला निर्मळ करते. ज्ञानासाठी उत्तम अधिकारी बनवते, परंतु मूळ वस्तूचा साक्षात्कार तर असाधारण कारणरूप ज्ञानी पुरुष त्यांच्या संज्ञेने करवून देतात. शब्दरूप वेद, नि:शब्द आत्म्याचे वर्णन कशा प्रकारे करू शकतील? वेद ज्ञान स्वरूप आहेत आणि वेत्ता विज्ञान स्वरूप आहे. विज्ञान स्वयं क्रियाकारी असते, ज्ञान नाही. वेत्ता वेदांना जाणतो, वेद वेत्त्याला नाही. सर्व दर्शने, सर्व नय (न्याय) सर्व दृष्टी एकच आहेत आणि भिन्नही आहेत. जिना एकच, पण पायऱ्या वेगवेगळ्या आहेत. श्रीकृष्णांनी वेदांना पण त्रिगुणात्मक म्हटले आहे आणि अर्जुनाला आत्मा प्राप्त करण्यासाठी वेदांपलीकडे जायला सांगितले!

वेदांत बुद्धीला वाढवणारे आहे, पण वेदांत आणि जैन दोन्हीही मार्गाने स्वतंत्रपणे समकित होऊ शकते.

आत्मा द्वैत पण नाही, अद्वैत पण नाही. आत्मा द्वैताद्वैत आहे द्वैत

आणि अद्वैत दोन्हीही विकल्प आहेत, आणि प्रत्यक्षात आत्मा निर्विकल्प आहे. द्वैत, अद्वैत हे दोन्हीही द्वंद आहेत, आत्मा द्वंद्वातीत आहे. जोपर्यंत सांसारिक परिणाम होत असतात, तोपर्यंत मी अद्वैत आहे असे मानूच शकत नाही. अद्वैत ही निराधार किंवा निरपेक्ष गोष्ट नाही, तर द्वैताच्या अपेक्षेने आहे. 'रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट'ने आत्मा द्वैत आहे आणि 'रिअल व्ह्यू पॉइंट'ने अद्वैत आहे! म्हणून 'ज्ञानीं'नी आत्म्याला द्वैताद्वैत असे म्हटले आहे. 'स्व' म्हणजे अद्वैत आणि 'पर' म्हणजे द्वैत. 'स्व' मध्येच उपयोग राखावा या हेतूने त्याला अद्वैत म्हटले आहे. जोपर्यंत देह आणि केवळज्ञान दोन्ही आहेत तोपर्यंतच द्वैताद्वैत, नंतर कसलेही विशेषण राहत नाही. अद्वैत स्वत:च विशेषण आहे.

जग मिथ्या आहे का? दाढ दुखली तर रात्रभर 'जग मिथ्या आहे' असे जप केल्याने दाढदुखी मिथ्या होते का? जगाला मिथ्या मानणारे रस्त्यात पैसे किंवा आपले प्रिय गाठोडे का फेकून देत नाही? जग पण मिथ्या नाही आणि ब्रह्म पण मिथ्या नाही. जग हे 'रिलेटिव्ह' सत्य आहे आणि ब्रह्म हे 'रिअल' सत्य आहे. मूळ वस्तूला यथार्थ रूपात समजू देत नाही ती माया आहे.

ब्रह्मज्ञान हे आत्मज्ञानाचे प्रवेशद्वार आहे, साधने स्वरूपाची एकाग्रता करवितात पण स्वरूपाची प्राप्ती करवित नाही. आत्मज्ञानानेच स्वरूपाची प्राप्ती होते. जगातील विनाशी वस्तूंवरील निष्ठा नाहीशी होऊन अविनाशी ब्रह्माची निष्ठा बसली, ब्रह्मनिष्ठ होऊन गेलात, तर त्याला ब्रह्मज्ञान म्हणतात. आणि आत्मनिष्ठ पुरुषांना तर स्वयं परमात्माच म्हणतात. आत्मनिष्ठ अबुध असतात आणि ब्रह्मनिष्ठात बुद्धी असते!

शब्दब्रह्म, नादब्रह्म म्हणजे टर्मिनस (अंतिम स्टेशन)पर्यंत पोहोचण्यापूर्वी लागणारी स्टेशनस् असतात, फार-फारतर ती एकाग्रता साधण्यास मदत करतात. एकाग्रता ही अध्यात्माची सुरुवात आहे, परंतु तरीही आत्मा तिथून असंख्य मैल दूर आहे. शब्द सनातन नाहीत, पण दोन-तीन गोष्टींचा संयोग झाल्यामुळे उत्पन्न होणारी गोष्ट आहे, अस्वाभाविक आहे. तरीही जो शब्द अनुभव करवितो तो खरा आहे,

परंतु शेवटी तर शब्दांचे अवलंबन पण सुटते आणि निरालंब दशा प्राप्त होते.

ब्रह्ममय स्थिती झाल्यावर जागृती पूर्णत्वाकडे पोहोचते आणि सर्व जीवमात्र शुद्धच दिसतात. 'अहं ब्रह्मास्मि' यात स्वत:चा अहंकार आहे. हा अहंकार म्हणजे स्वतः जिथे नाही तिथे 'मी आहे' असा आरोप करतो. ब्रह्मप्राप्तीचा परिणाम म्हणजेच निरंतर परमानंदाचे स्वसंवेदन! जनक विदेहीसारखी दशा! संसाराच्या सर्व संयोगात देखील परम असंगपणाचा अनुभव!

माणूस ब्रह्मप्राप्तीसाठी मळ-विक्षेप किंवा राग-द्वेष दूर करण्याचा निष्फळ प्रयत्न जन्मोजन्मी करत असतो! परंतु ब्रह्मप्राप्तीत अडथळा येण्याचे मूळ कारण अज्ञान आहे, आणि ते ज्ञानी पुरुषांखेरीज अन्य कोणीही दूर करू शकत नाही. आत्म्याला आवृत करणारे (झाकणारे) अज्ञान आहे, अहंकार नाही.

ज्ञानाची आंतरिक जागृत दृष्टी कशी असते? प्रथम व्हिजनमध्ये (दृष्टीत) सर्व स्त्री-पुरुष पूर्ण नेकेड-विवस्त्र दिसतात. दुसऱ्या व्हिजनमध्ये त्वचारहित शरीर दिसते आणि तिसऱ्या व्हिजनमध्ये चिरलेले शरीर, आतडी, मांस, हाड असे सगळे दिसते!! आणि शेवटी सगळ्यांच्यात सर्व ब्रह्मस्वरूप दिसते!! मग राग-द्वेष कसे होतील?

जीवमात्रात चेतन तत्त्व विद्यमान असते, आणि ते स्वभावाने एक आहे, द्रव्याने नाही. द्रव्याने तर प्रत्येक चेतन भिन्न-भिन्न आणि संपूर्ण स्वतंत्र आहे. सर्व आत्मे जर एकच असते तर मग प्रभु रामचंद्र मोक्षात गेले, तर त्यांच्याबरोबर सगळेच गेले असते ना? 'एकोहम् बहुस्याम' ब्रह्माला अशी इच्छा होऊ शकते का?

आत्मा परमात्म्यात विलीन होतच नाही. विलीनीकरणाच्या बाबतीत तर प्रत्येक आत्म्याला संपूर्ण *पोतापण* (मी आहे आणि माझे आहे असे आरोपण, माझेपण), स्वत:चे स्वातंत्र्य गमावून, अन्यमध्ये आहुती द्यावी लागेल? ज्ञानी प्रत्येक जीवमात्रात संपूर्ण सर्वांग आणि स्वतंत्र राहणाऱ्या

परमात्म्याचे दर्शन करतात! जर आत्मा एकच असता, तर प्रभु रामचंद्र मोक्षसुखाचा आनंद घेत आहेत तर आपण इथे दु:खी का आहोत? आत्मा जर परमात्म्याचा अविर्भाव असता तर मग दु:खाचे वेदन झालेच नसते ना?

आत्मा रिअल व्ह्यू पॉइंटनुसार निराकारी आणि रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंटनुसार साकार आहे. सिद्धगतीत आत्मा चरमशरीराच्या देह प्रमाणानुसार 1/3 कमी होतो व 2/3 एवढ्या आकाराचा राहतो, स्वभावाने निराकार असूनसुद्धा! सुरुवातीला निरंजन-निराकार भगवंतांची भक्ती तर मनुष्यरूपात प्रकट झाले आहेत असे ज्ञानी पुरुष की ज्यांना साकार भगवंतच म्हणतात, अशा ज्ञानींच्या भक्तीद्वारेच होते आणि मग परिणाम स्वरूप निराकार भगवंतांची ओळख होते.

आत्म्यामध्ये अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख, अनंत शक्ती आहे, अनंत गुणांना धारण करणारे, अरे, जे स्वयं परमात्माच आहेत, अशा आत्म्याला निगुर्ण कसे म्हणता येईल? निगुर्ण म्हटल्यामुळे त्यांच्या अनंत गुणांची भक्ती आणि त्या द्वारे त्यांची प्राप्ती करण्यापासून आपण सदैव वंचित राहणार, नाही का? परमात्माची प्राप्ती तर त्यांच्या गुणांची भक्ती केल्यानेच होऊ शकते ना? आत्मा प्रकृतीच्या गुणांने निगुर्ण आहे पण स्वगुणांने भरपूर आहे. प्रकृतीचा एक पण गुण आत्म्यात आलेला नाही आणि आत्म्याच्या एकही गुण प्रकृतीत आलेला नाही. प्राकृत गुणांबरोबर कधीच मिश्रित झालेला नाही, त्यामुळे आत्मा निरंतर शुद्धच आहे!

आत्मा ज्ञानवाला नाही तर ज्ञानस्वरूपच आहे, प्रकाशस्वरूप आहे. त्या प्रकाशामुळेच स्वत:ला सर्व ज्ञेये समजतात आणि दृश्ये दिसतात.

आत्मा सर्वव्यापी आहे हे कोणत्या अपेक्षेने?

आत्म्याचा प्रकाश सर्वव्यापी आहे. आत्मा स्वत:च सर्वव्यापी नाही! या बल्बचा प्रकाश संपूर्ण खोलीला प्रकाशमान करतो, संपूर्ण खोलीत व्यापतो. पण बल्ब संपूर्ण खोलीभर नसतो, तो तर आपल्या जागेवरच आहे. फक्त अंतिम जन्मात, चरम शरीरात जेव्हा आत्मा

परमात्मा बनतो आणि संपूर्ण निरावरण होऊन सिद्धपदात प्रवेश करतो, तेव्हा संपूर्ण ब्रह्मांड प्रमेय बनते, संपूर्ण ब्रह्मांडात परमात्म्याचा प्रकाश व्याप्त होतो. याचे वैशिष्ट्य हेच आहे की या प्रकाशात कुठेही तरतमता नसते! (असा प्रकाश की त्याची गहनता कितीही दूर गेल्यावरही कमी होत नाही, त्या प्रकाशामुळे सावली पडत नाही). जर परमात्मा सर्वत्र असते, कणाकणात असते, तर मग त्यांना शोधायची गरजच उरली नसती. आपल्या आत असलेला आत्मा थोडाच कुठे व्याप्त होत असतो? अर्थात आत्मा चेतनरूपाने नाही, तर स्वभावरूपाने सर्वव्यापी आहे.

भगवंत प्रत्येक जीवात प्रकाशरूपाने राहतात. परंतु जेव्हा जीव दृष्टीगोचर होतो तेव्हा दिव्यचक्षुंनी त्यांच्या आतील भगवंताचे दर्शन होते. प्रभु क्रिचरमध्ये (जीवमात्रात) असतात क्रिएशनमध्ये (निर्मित वस्तूत) नाही. पण ते आवृत (झाकलेले) असतात. जेवढा भाग निरावृत्त होतो. त्या दिशेचे ज्ञान प्रकट होते, आणि ते व्यवहारात वकील, डॉक्टर अशा रूपात प्रकट होते. एका आत्म्यात संपूर्ण ब्रह्मांड प्रकाशित करण्याची शक्ती असते, मात्र कर्मांपासून पूर्णपणे निवृत्त झाला तर!

परमात्मा सर्वांश आणि स्वत: त्याचा अंश, या भ्रामक मान्यतेला पूर्ण संपवून टाकून ज्ञानी अशी अचूक समज देतात की आत्मे अनंत आहेत, स्वतंत्र आहेत. 'रूपी'चे तुकडे करता येतात, अरूपीचे तुकडे कसे बरे होऊ शकतील? अंश झाल्यावर मग जोडून सर्वांश कशाला होईल? भगवंतांचे कधी तुकडे होऊ शकतात का? सूर्य कधीच किरण होऊ शकत नाही आणि किरण कधीच सूर्य होऊ शकत नाही. सनातन तत्त्व सदा अविभाज्यच असते. जेवढ्या अंशावरून आवरण हटते, तेवढे आंशिक ज्ञान प्रकट होते. जेव्हा सर्व प्रदेशांवरील आवरण दूर होते, तेव्हा तिथे परमात्मा सर्वांश रूपात प्रकाशमान होतात.

# खंड : 2

## मी कोण आहे? कसे जाणावे?

आत्मा-परमात्मा, ब्रह्म-परब्रह्म, जीव-शिव, ईश्वर-परमेश्वर, हे सर्व

पर्यायवाचक शब्द आहेत. पर्यायात परिवर्तन झाल्यामुळे दशेत परिवर्तन दिसते पण 'मूळ' वस्तूत परिवर्तन होत नाही. दशा परिवर्तनामुळे घरात नवरा, दुकानात शेठजी आणि कोर्टात वकील! पण तो स्वत:च असतो सर्व ठिकाणी!

जीव आणि शिव यात काय भेद आहे? स्वत:च शिव आहे पण त्याला भ्रांती झाली आणि जीव होऊन बसला! ही वेगळेपणाची भ्रांती जर दूर झाली, आणि हा भेद संपला तर मग जीव-शिव अभेद होईल!

जोपर्यंत जीव स्वत:ला संसारी मानेल तोपर्यंत त्याचे जगणे-मरणे चालूच राहील. ज्याचे जगणे-मरणे संपले तो शिव-आत्मा, जीव कर्मसहित असतो आणि आत्मा कर्मरहित. पण दोघांत आत्मा तर मात्र तोच असतो! जोपर्यंत 'तुम्ही भगवंत' आणि 'मी तुमचा भक्त' तोपर्यंत वेगळेपण! 'मी स्वत:च परमात्मा आहे' असे भान आल्यावर मग भेद राहत नाही. मग तो झाला वीतराग! निर्भय! आणि महामुक्त!!

ईश्वर आणि परमेश्वर-यात ईश्वर राग-द्वेषवाला, कर्तेपणाच्या अहंकारसहित, विनाशी वस्तूंवर मूर्च्छा असलेला आणि परमेश्वर म्हणजे वीतराग, अकर्ता, जो स्वत:च्या अविनाशी पदालाच भजतो, तो! तरी पण ईश्वरपद हे तर विभूतिस्वरूप आहे! आर्तध्यान आणि रौद्रध्यान यातून निवृत्ति, ही वीतरागीपणाची पहिली पायरी आहे.

'मी चंदुलाल आहे' असे बोलायला हरकत नाही पण तशी बिलीफ मात्र असता कामा नये!

परमात्म दशा प्राप्त करण्याच्या रस्त्यात येणाऱ्या 'माइलस्टोन'ची ओळख ही वाटसरूला रस्त्याची पूर्णपणे सिक्योरिटी (सुरक्षितता) करवीत जाते.

जोपर्यंत भौतिक सुखांची इच्छा आहे, वृत्ती भौतिक सुख शोधण्यासाठीच भटकतात तोपर्यंत बहिर्मुखी आत्मा आहे, मूढात्मा आहे. मूढात्मदशेत जीवात्म्याला केवळ अस्तित्त्वाचेच भान असते. पुद्गल वळगणा (देहादी बला) यालाच स्वत:चे स्वरूप मानले जाते, ही पहिली

निशाणी. दुसरी निशाणी म्हणजे मूढात्म्यातून अंतरात्मदशेत येतो तेव्हा ज्या वृत्ती बाहेर भटकत होत्या त्या परत निजघराकडे वळू लागतात. 'ज्ञानी पुरुष' मूढात्म्याला निमित्तभावाने जेव्हा अशी प्रतीती करवून देतात की ही 'पुद्‌गलरूपी वळगणा' तुझी नाही, तू स्वत: तर परमात्माच आहेस, तेव्हा 'मी' पणा परमात्म्यात प्रथम प्रतीतीभावाने अभेद होतो. आता केवळ अस्तित्वाचेच नाही तर वस्तुत्वाचे, म्हणजेच 'मी कोण आहे' याचे भान येते. ही अंतरात्मदशा म्हणजेच 'ईन्ट्रीम गर्व्हमेन्ट'ची स्थापना. 'ईन्ट्रीम गर्व्हमेन्ट'ला दोन प्रकारची कामे करायची असतात. व्यवहाराच्या उदयाच्या वेळी, उपयोग ठेवून व्यवहाराचा समभावाने निकाल करणे आणि फुरसतीच्या वेळी आत्म उपयोगात राहणे. या अंतरात्मदशेत आल्यामुळे आत्मा काही अंश स्वतंत्र बनतो आणि काही अंश परतंत्र राहतो. तरीही परमात्मदशेने प्रगती होत राहते, होतच राहते. 'ज्ञानी पुरुष' परमात्मदशेत असतात आणि त्यांचे ज्ञान-दर्शन प्राप्त झाल्यामुळे अंतरात्मदशा प्राप्त होते. पण अंतरात्मा परमात्म्याला पाहतो आणि त्याच रूपाचा होऊन जातो. 'स्वत: परमात्मा आहे' या प्रतीतीमधून आता ज्ञानभावाशी अभेद होतो. वस्तुत्वाच्या भक्तीमुळे पूर्णत्व सहज साध्य होते आणि जेव्हा संसाराचा पूर्णपणे निकाल होतो तेव्हा फुल गव्हर्नमेन्टची स्थापना होते, मग झाले संपूर्ण परमात्मा!

केवळी दशेत आत्मा परमात्माच असतो. जोपर्यंत शब्दरूपी अवलंब आहे तोपर्यंत अंतरात्मा आणि भ्रांतदशेत मूढात्मा! मी, बावो, मंगळदास!! तोच 'मी' तिघांत! जे संपूर्ण वीतराग झाले आहेत ते परमात्मा! वीतराग होण्याची दृष्टी ज्याने वेदली आहे, तो अंतरात्मा आणि भौतिक सुखात मग्न राहून राग-द्वेष करत राहतो, तो मूढात्मा!

या जगातून आत्यंतिक मुक्ती प्राप्त केलेले सिद्धलोकात विराजमान असलेले प्रत्येक सिद्धात्मा, आपापल्या स्वतंत्र स्वाभाविक सुखात निजस्थितीतच असतात! तिथे तर कोणी उपरीही नसतो आणि कोणी अंडरहँड' पण नसतो. सिद्धात्मा स्वभावाने एकच असतात. ज्ञान-दर्शन रूपी असतात. तिथे चारित्र्य नाही, तिथे कोणतीच मेकॅनिकल क्रिया नाही आणि तिथे कोणतेच पुद्‌गल परमाणू पण नाहीत! ब्रह्मांडाच्या

धारेवर त्यांचे स्थान आहे. तिथे कोणीही कोणावर परिणाम करत नाही आणि कोणावर कोणाचाही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्या क्षेत्रांवरही त्यांचा परिणाम होत नाही, सिद्ध भगवंत आपल्याला काहीच मदत करत नाहीत. मात्र तिथे पोहोचणे हे आपले ध्येय आहे, म्हणून आपण 'नमो सिद्धाणं' भक्ती करतो.

हा बल्बचा प्रकाश जर चेतन असता तर तो या खोलीतल्या प्रत्येक वस्तूला पाहतच राहिला असता! त्याच प्रकारे सिद्ध भगवंत ब्रह्मांडातील प्रत्येक ज्ञेयाला जाणतात!

मोक्ष म्हणजेच स्व-गुणधर्मात परिणमित होणे, स्व-स्वभावात परिणमित होणे, निरंतर स्वतःच्या स्वाभाविक सुखातच राहणे!

मोक्ष कोणाचा? जो बांधला गेला आहे, त्याचा! कोण बांधला गेला आहे? जो भोगतो तो. भोगतो कोण? अहंकार. मोक्ष प्राप्तीचा भाव पण कोणाचा आहे? जो बांधलेला आहे, त्याचा, आत्म्याचा नाही. आत्मा तर प्रत्यक्षात मुक्तच आहे, तो कर्ता नाही, तो भोक्ताही नाही. अहंकारच मोक्ष शोधत आहे. त्याला संसारात गोडी वाटेनाशी झाली आहे, म्हणून तो मोक्ष शोधत आहे!

जीवनाचे ध्येय मोक्ष हेच असले पाहिजे. जर एखाद्याचे हे ध्येय अत्यंत ठाम असेल, तर तो ते निश्चित प्राप्त करू शकेल. या ध्येयात मोह बाधक असतो. मोह ओसरला तर संसाराचा वीट येऊ लागतो आणि मग तो मोक्षमार्ग शोधू लागतो.

आत्मदशा प्राप्त होईपर्यंत विचारदशेची आणि तीसुद्धा ज्ञानांक्षेपकवंत विचारांची आवश्यकता आहे. ते आत्मदर्शनाची थोडीशी प्राप्ती करवतील त्यानंतरची दशा तर विचारांपलीकडील आहे. अज्ञानदशेत आत्मनिरीक्षण होते ते तर अहंकाराद्वारे होते आणि आत्मा तर अहंकारापलीकडे आहे!

क्रोध-मान-माया-लोभ यांच्या एकूणएक परमाणूतून शुद्धी मिळवून जेव्हा अहंकार पूर्ण शुद्धपणा प्राप्त करतो, तेव्हा तो 'शुद्धात्म्याशी' एकाकार होतो, असा तो क्रमिकमार्ग आहे. याउलट 'अक्रम मार्गात'

'ज्ञानी पुरुष' 'डायरेक्ट' शुद्धात्मापदाचीच प्राप्ती करवितात, शुद्धात्मापद हे अचलपद आहे, अस्सल आणि निर्लेप आहे.

स्वत:चे स्वरूप शुद्धात्मा आहे, देह नाही, असे 'रिअलाइज' झाले की देहाध्यास संपतो, अहंकार आणि ममता निघून जातात. देहाध्यासी व्यक्ती कोणालाही देहाध्यासातून सोडवू शकत नाहीत. जे देहाध्यासातून सुटलेले आहेत, असे 'ज्ञानी पुरुष'च सोडवू शकतात.

हा देह, मन, वाणी इत्यादी 'मी आहे' असे अनुभवपूर्वक वाटणे, म्हणजे देहाध्यास. आत्मानुभव झाल्यानंतर हा अनुभव निघून जातो आणि आत्म्याचा अनुभव जाणवत राहतो. देहाबरोबर जो तन्मयाकार होतो तो मूळ आत्मा नाही, पण मानलेला आत्मा, म्हणजेच व्यवहार आत्मा आहे.

आतून 'हे तू चूक करत आहेस' असे जो सांगतो तो आत्मा नाही पण व्यावहारिक ज्ञानातून जे जे जाणले, त्याच्या आधारावर जे रेकॉर्ड झालेले आहे, ते बोलतो. हे सर्वच, डोळे (कॅमेरा), कान (रिसीव्हर), वाणी (टेपरेकॉर्डर), मेंदू (मशीनचे हेड) आणि खाणे, पिणे, चालणे बोलणे हे सर्व मेकॅनिकल आहे.

'मी पापी आहे, मी तपस्वी आहे, मी शास्त्रज्ञानी आहे', असे जे मानतात किंवा मग देवदर्शन, धर्मध्यान, जप-तप वगैरे करतात, 'ज्ञानीं'नी त्याला पण 'मेकॅनिकल आत्मा करत आहे' असेच म्हटले आहे. जगाच्या मान्यतेत जो आत्मा आहे, तो सचर, 'मेकॅनिकल आत्मा' आहे, आणि त्याला ते स्थिर करण्याच्या मागे असतात. पण दरअसल (मूळ) आत्मा तर अचल असतो. ज्ञायक स्वभावाचा आहे. मुळात मान्यताच चुकीची आहे. सचर विभागात राहून अचल आत्म्याला शोधल्याने तर सचरात्म्याचीच प्राप्ती होईल ना! 'मेकॅनिकल आत्मा' स्वत:च चंचल आहे, क्रियाशील आहे, आणि जग त्याला स्थिर करू पाहते, हे कसे होईल? अचलाच्या प्रती असलेली दृष्टीच स्वाभाविक अचलता प्राप्त करविते. 'मेकॅनिकल आत्मा' आणि दरअसल (मूळ) आत्मा स्वभावानेच भिन्न आहेत, त्या भिन्नतेचे भान, त्याच्या प्रती दृष्टी, ज्ञानींच्या शिवाय इतर कोण समजावू शकतो, कोण करवून देऊ शकतो? दरअसल आत्मा तर केवळज्ञान

स्वरूप आहे, केवळ प्रकाशक आहे, अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतशक्ती, अनंत सुखधाम, अनंत गुणांनी भरपूर असा तो चेतन आहे.

संसारात ज्याची रममाणता आहे, तो मूळ आत्मा नाहीच. जोपर्यंत राग-द्वेषाचे परिणाम चालू असतात तोपर्यंत शुद्धात्मपदाची प्राप्ती पण होत नाही.

चेतनाच्या स्पर्शाने मायावी शक्ती उत्पन्न झाली आहे, जे भ्रांत चेतन आहे. निश्चेतन चेतन म्हणजे सर्व बाह्य लक्षणे चेतनाची भासतात, पण प्रत्यक्षात ते चेतन नसते. मूळ चेतन तर आत आहे आणि त्यावर निश्चेतन चेतनाचा पडदा आहे. निश्चेतन चेतनालाच 'मेकॅनिकल चेतन' असे म्हटले आहे.

मिश्रचेतन ज्ञानींचा हा मौलिक शब्द काय सूचित करतो? तर अवस्थेत तन्मयाकार होतो तेव्हापासून मिश्रचेतन होऊ लागते. मग ते पुढील जन्मात परिपक्व होऊन रूपकात येते. जेव्हा 'डिस्चार्ज प्रक्रिया' सुरू होते तेव्हा त्याला 'मेकॅनिकल चेतन' म्हणतात.

'रिअल आत्मा' आणि 'रिलेटिव्ह आत्मा' हे क्रमशः शाश्वत आणि विनाशी गुणांनी पारखले जाऊ शकतात. जोपर्यंत 'रिअल'चे 'रिअलायझेशन' होत नाही, तोपर्यंत 'रिलेटिव्ह आत्म्यालाच' 'रिअल आत्मा' मानतात, भ्रांतीमुळे! ही भ्रांती वैज्ञानिक कारणांनी उत्पन्न होते. भ्रांतीमुळे जाणणारा आणि करणारा, अविनाशी आणि विनाशी एकाच रूपात वर्ततात. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' भ्रांती दूर करतात आणि रिअल आणि रिलेटिव्हच्या दरम्यान 'लाइन ऑफ डिमार्केशन' (भेदरेषा) आखून देतात तेव्हा आत्मदर्शन, जे गुप्तस्वरूप आहे, ज्यापेक्षा जास्त अद्भुत दर्शन या जगात नसते, ते प्राप्त होते! मग स्वतः क्षेत्रज्ञ बननू परक्षेत्राची प्रत्येक क्रिया जाणू लागतो. स्वक्षेत्र चुकला की मग क्षेत्राकार झाला. जो 'पर्मनन्ट' असतो तोच 'टेम्पररीला' 'टेम्पररी' म्हणू शकतो. स्वतः पर्मनन्टच आहे, पण त्याचे भान होईल तर!

प्रत्येकाचे व्यक्तीत्व वेगवेगळे दिसते, कारण प्रत्येक व्यक्ती द्रव्य, क्षेत्र, काल आणि भावाच्या आधीन असते. परंतु यात जेव्हा क्षेत्र बदलते,

एकाच क्षेत्रात दुसरा कोणी येतो तेव्हा काळ बदललेले असते, म्हणून मग द्रव्य पण बदलते. बाहेरील सर्व संयोग जरी बदलत राहिले तरी आत्म्याच्या स्वरूपात मात्र काहीच बदल होत नाही. आत्मा तीनही काळात शुद्ध स्वरूपातच असतो, पण आवरणांमुळे वास्तविकता दृष्टीत येत नाही. एकदा दृष्टी शुद्ध झाली की मग ती परत अशुद्ध होतच नाही, अहंकार हे उलट दृष्टी असण्याचे कारण आहे. तरीही या सर्व परिवर्तनांमध्ये सुद्धा निश्चय आत्मा उदासीनभावाने शुद्धत्वातच राहतो, आणि त्याचे पर्याय पण शुद्धच असतात. अशुद्ध किंवा शुद्ध हे पर्याय व्यवहार आत्म्याला असतात. व्यवहार सत्याचा आग्रह धरल्यामुळे परत व्यवहार आत्मा उत्पन्न होतो. 'ज्ञानी' भेटले नाहीत तर बिघडलेला व्यवहार शुभ करायला हवा आणि 'ज्ञानी' भेटले तर व्यवहार 'शुद्ध'च करून घ्यायचा! 'स्वत:' व्यवहारात राहिला तर 'व्यवहार आत्मा' आणि स्वत: 'निश्चयात' राहिला तर 'निश्चय आत्मा'. परंतु मूळ सर्वातच 'स्वत:' आणि 'स्वत:'च असतो.

जगाचे अधिष्ठान काय आहे? ते जर कोणी 'एक्झॅक्ट' सांगितले असेल तर ते पूज्यश्री दादाजींनी. जगाचे अधिष्ठान 'प्रतिष्ठित आत्मा' आहे. मूळ आत्मा तर यात संपूर्ण अकर्ताभावातच, उदासीनभावातच असतो. पण फक्त दर्शन शक्ती आवृत झाल्यामुळे (झाकली गेल्यामुळे), विभाविक दृष्टी निर्माण झाल्यामुळे जग उत्पन्न झाले आहे.

जो मूळ निश्चय आत्मा आहे, तो शुद्धात्मा आहे आणि व्यवहारात मानला गेलेला आत्मा, तो प्रतिष्ठित आत्मा आहे. 'मी चंदुलाल आहे, याचा मामा आहे, याचा काका आहे', या प्रकारे 'रॉंग बिलीफ' द्वारा प्रतिष्ठा केल्यामुळे प्रतिष्ठित पुतळा तयार झाला आहे आणि तो फळ देतच राहतो. फळ चाखते वेळी परत अज्ञानामुळे नवी प्रतिष्ठा करतो आणि या प्रकारे हे चक्र चालू राहते.

जसे दारूच्या नशेमध्ये माणूस वास्तविकता विसरून 'मी राजा आहे' असे बोलू लागतो, तसेच अहंकाराच्या नशेत 'मी चंदुलाल आहे, हिचा पती आहे, बाप आहे...' असे तऱ्हेतऱ्हेचे बोलतो. प्रत्यक्षात तो परमात्माच आहे, चौदालोकांचा (ब्रह्मांडाचा) स्वामी आहे. परंतु 'रॉंग

बिलीफ'मुळे तो एका स्त्रीचा पती होऊन बसतो, आणि स्वत:चे पद गमावून बसतो. 'ज्ञानी पुरुष' त्याला निजपदाचे भान करवून देतात, अहंकाराचे निर्मूलन करतात, मागचे सर्व भ्रांत परिणाम मग संपून जातात तेव्हा त्याला पूर्णपद प्राप्त होते! नाहीतर जोपर्यंत अहंकार आहे, तोपर्यंत बुद्धीच्या 'व्हिजन'ने दिसते, आणि आत्म्याचे कर्ता-भोक्तापण मानले जाते. ज्ञानाने पाहिल्यावर 'आत्मा काहीच करत नाही' असे ज्ञान फिट होऊन जाते. रॉंग बिलीफ संपली तर वास्तविकता दिसू लागते. बदललेली दृष्टीच संसाराच्या उपार्जनाचे, प्रकृतीच्या उत्पत्तीचे कारण आहे. मूळ आत्मा यात सतत असंग आणि निर्लेपच राहिला आहे.

'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्'मुळे प्रकृती उत्पन्न होते. त्यात कोणाचा कर्तेपणा नसतो. प्रकृती 'इफेक्टिव' आहे आणि त्याचा परिणाम 'स्वत:वर' होतो. परंतु कधीपर्यंत? जोपर्यंत 'रॉंग बिलीफ' आहे तोपर्यंत.

'राइट बिलीफ'मुळे 'रॉंग बिलीफ'चे छेदन होते आणि 'राइट बिलीफ'चे तर आपल्याआपणच छेदन होतो. आणि तोच, ह्या घोर कलियुगात मुक्तीसाठी अक्रम विज्ञानाचा वर्तमान 'ज्ञानी पुरुष' यांचा विलक्षण शोध आहे. 'राइट बिलीफ'मध्ये असाल तर स्वसत्ताधारी आहात आणि 'रॉंग बिलीफ'मध्ये असाल तर परसत्ताधिन आहात. मिथ्यादृष्टी सर्व काही उलट दाखविते, जेव्हा 'ज्ञानी पुरुष' भेटतात आणि त्यांचा सत्संग ऐकतो, तेव्हापासून दृष्टी सम्यक् होऊ लागते. किंवा 'ज्ञानी पुरुषां'ना प्रार्थना करून त्यांच्याकडून आपली दृष्टी बदलवून घेतली पाहिजे. एकदा दृष्टीबद्दल झाल्यानंतर मग तो हळूहळू भगवंत होत जातो.

शुभाशुभ धर्मात सत्य-असत्य यांना स्थान आहे. सत्याबद्दल राग (प्रेम) आणि असत्याचा तिरस्कार, हाच प्राप्तीचा मार्ग आहे. शुद्धधर्मात, आत्मधर्मात त्याला स्थान नाही. आत्मधर्म तर राग-द्वेषाच्या पलीकडे आहे, वीतरागतेचा आहे. दृष्टी विषामुळे राग-द्वेष होतात. जी दृष्टी विनाशी वस्तूंच्या बाजूला वळलेली होती ती दृष्टी 'ज्ञानी पुरुष' अविनाशीच्या दिशेने वळवतात, बदलतात. मग 'आत्मवत् सर्व भूतेषु' असे दिसू लागते.

आत्मसाक्षात्कार आणि आत्मानुभव यात खूप फरक आहे. अनुभव ही तर अंतिम स्थिती आहे आणि ती नेहमीसाठी असते आणि साक्षात्कारात फक्त आत्म्याची प्रतीती बसते. आत्मानुभव झाल्यानंतर चारित्र्यात येतो, याला वर्तते असे म्हणतात.

अरूपी आत्म्याचा साक्षात्कार करणारा पण अरूपी आहे. म्हणजेच स्वभावाला स्वभाव मिळतो आणि वृत्ती निजघरी परतात.

आत्मा 'काय आहे' आणि 'काय नाही' अशा दोन्हीही बाजू समजल्या तर आत्मा जाणला असे म्हटले जाईल. अज्ञानदशेत 'आत्मा शुद्ध-बुद्ध आहे' असे म्हणून शकत नाहीत. फारच झाले तर देहाच्या अपेक्षेने (तुलनेने) अशुद्ध आहे आणि आत्म्याच्या अपेक्षेने शुद्ध आहे असे म्हणता येईल.

जो एक वेळ चाखल्यावर कधीही परत जाणार नाही, तो आत्म्याचा आनंद आहे. येऊन निघून जातो तो मनाचा आनंद आहे. चित्त जोपर्यंत 'कषायांमध्ये' अडकलेले आहे, तोपर्यंत आत्मानुभव असंभव आहे. निरंतर परमानंद स्थिती म्हणजेच आत्मानुभव.

चिंता, दु:खे वगैरे जे होतात ते परवस्तुमध्ये होत असतात, स्वत:मध्ये नाही, ज्ञानी हे भान जेव्हा करवून देतात, त्यानंतर मग अशी दृढ प्रतीती बसते की आत्म्याला काही होतच नाही.

'एक्झॅक्ट' रूपात आत्मा प्राप्त झाल्यावर फक्त 'डिस्चार्ज' कर्मेच शिल्लक राहतात, *संवरपूर्वक निर्जरा* (पुन्हा कर्म बीजे पडत नाहीत आणि कर्मफळ पूर्ण होते)च होत असते. मग नवीन कर्मबंध पडत नाहीत. कर्माची सत्ता केव्हापर्यंत असते? जोपर्यंत 'स्वत:' त्याला आधार देतो तोपर्यंत, तो आधार दूर झाला की कर्मे 'न्यूट्रल' होतात. आधार कशा प्रकारे दिला जातो? तर करत असते उदयकर्म पण म्हणतो की 'मी हे केले', या अज्ञानामुळे! ज्ञानी पुरुष संसाराच्या सर्व क्रिया करत असूनसुद्धा 'मी काहीच करत नाही' या ध्यानाने निरंतर आत्म्यात राहतात. या उलट अज्ञानी 'मी करत आहे' या ध्यानाच्या बाहेर एक क्षण पण नसतो.

'ज्याने आत्म्याला जाणले त्याने सर्व जाणले.' ज्यांना आत्मज्ञान आहे, त्यांना कारण सर्वज्ञ, कारण केवळज्ञानी म्हणतात! आत्मज्ञानी निराग्रही, निरहंकारी असतात.

'मी शरीर नाही, मी आत्मा आहे, मी शरीर नाही, मी आत्मा आहे' असे नुसते म्हणत राहून काही होत नाही. त्यासाठी तर आत्म्याचा अनुभव व्हायला हवा. आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी आजपर्यंत जी-जी साधने वापरली, तीच बंधनरूप झाली. 'सत्साधन' म्हणजे प्रत्यक्ष प्रकट 'ज्ञानी पुरुष' यांचे सेवन होईल (म्हणजे त्यांच्या सानिध्यात राहून त्यांच्याकडून ज्ञान समजून घेणे) तेव्हाच सुटका होईल. साधने फक्त तुम्हाला ज्ञानापर्यंत नेऊ शकतात, याउलट आत्मा तर 'विज्ञान स्वरूप' आहे. आत्मा या देहाच्या, घरांच्या, लाखो भिंतीच्याही आरपार जाऊ शकतो असा सूक्ष्मतम आहे. तो कसा काय मिळू शकेल? कितीही कठोर तपश्चर्या किंवा साधना केली तरीही आत्मसाक्षात्कार होणे कठीण आहे. अर्ध्या मैलावर स्टेशन आहे आणि स्वत: उलट दिशेने बावीस मैल चालला तर त्यात चूक कुणाची? रस्ता चुकला त्यात शरीराची काय चूक? या सर्व चुका केवळ अज्ञानामुळे आहेत.

ज्ञानी आत्म्याचे ज्ञान देतात, एवढेच नाही तर सृष्टीच्या सर्व प्रश्नांची संपूर्ण समाधान उत्तरेही देतात. ज्ञानींकडून ज्ञान प्राप्त करण्यासाठी जर अंतराय आले तर 'ज्ञानींकडून ज्ञान प्राप्त करायचेच आहे' असा निश्चय केल्याने ते दूर होतात, किंवा जर ज्ञानींना विनंती केली की 'माझे अंतराय दूर करा' तर ते तुमचे अंतराय दूर करतात. खरे तर ज्याला आत्मा प्राप्त करण्याची इच्छा आहे त्याला कसलीही प्रतिकूलता येत नाही. प्रतिकूलता ही स्वत:च्या निर्बलतेमुळे आहे. निजघरात जाण्यात प्रतिकूलता कसली?

स्वत:ला आत्म्याचा अनुभव करायचा असेल तर जेव्हा कोणी खिसा कापेल, शिव्या देईल, मारेल त्यावेळी 'ही सर्व माझीच उदयकर्मे आहेत, समोरचा तर निमित्त आहे, तो तर मला माझ्या कर्मातून मुक्त करत आहे' अशा प्रकारे तो जर निर्दोष दिसला आणि उलट त्याला

आशीर्वाद दिला, आणि असेच वागणे सतत जमू शकले तर आत्मा प्राप्त होईलच. या काळात एवढे सर्व स्वत:हून होऊ शकेल एवढी स्वत:ची शक्ती नसते, म्हणून 'ज्ञानीं'कडून एकदा आत्मा जागृत करून घ्यावा, तसे केल्यानंतर मग आत्मा स्वप्नात पण विसरला जात नाही.

आत्म्याचा उद्धार कशा प्रकारे होईल? मूळ आत्म्याचा उद्धार तर झालेलाच आहे. आता फक्त या मानलेल्या आत्म्याचा उद्धार करायचा आहे. तो कशा प्रकारे होईल? 'स्वत:ला' जेव्हा अशी समज येईल की, 'माझे स्वरूप तर केवळज्ञान स्वरूप आहे, मी केवळदर्शन स्वरूप आहे, मी केवळ चारित्र्यमय आहे' तेव्हा त्याचा उद्धार होईल. आणि ही समज 'ज्ञानी पुरुषां'शिवाय दुसरा कोणी कसा बरे 'फिट' करू शकेल?

आत्मा सूक्ष्मतम आहे, आत्माचे जे बाहेरचे प्रदेश आहेत, ते सूक्ष्मतर आहेत, पण वाणी सूक्ष्मतर नसते, म्हणून तिथले वर्णन करताना 'वाणी' थांबते. अनुभवानेच पूर्ण निराकरण होऊ शकते.

जो मानलेला आत्मा आहे, त्याने यथार्थ आत्मा कसा पाहता येईल? इंद्रियदृष्टी अतींद्रियाला कसे बरे पाहू शकेल? म्हणून मध्ये 'ज्ञानी पुरुषां'ची आवश्यकता आहे, ते दृष्टीपालट करून देतात तेव्हा दिसते. इंद्रिये अशीच अंतर्मुख होत नाहीत, इंद्रियांना वाड्यात कोंडून ठेवता येत नाही. 'ज्ञानीं' तर स्वत: जे पद प्राप्त केले आहे, तेच पद ते आपल्याला प्राप्त करवून देतात. 'ज्ञानी' भेटले तर त्यांच्याकडून मोक्ष मागून घेतला पाहिजे. संपूज्य दादाश्रींकडे जे 'अक्रम विज्ञान' प्रकट झाले आहे, ते आपल्याला भ्रांतीमार्गापासून बाजूला करून मोक्षमार्ग पूर्ण करवून देते, म्हणजेच हा पूर्णविरामाचा मार्ग आहे, अल्पविरामाचा मार्ग नाही. 'अक्रम विज्ञान' तर म्हणते की, मोक्ष प्राप्तीसाठी जर संसार बाधक असता, तर त्याने कोणालाही मोक्षाला जाऊच दिले नसते ना? अक्रम विज्ञानामुळे आज मोक्ष अत्यंत सहजपणे प्राप्त करता येईल असे झाले आहे. यासाठी अक्रम ज्ञानींकडे पोहोचून जागृतीत, 'परम विनय' आणि 'मी काहीच जाणत नाही' असा भाव, आणि कशा प्रकारे 'हे' प्राप्त करता येईल, अशी भावनाच त्याची प्राप्ती करविते. इतर कोणतीच

योग्यता या काळात पाहिली जात नाही आणि तशी कोणाची योग्यता नसतेच. अक्रम ज्ञानींजवळ पोहोचला हीच पात्रता.

'ज्ञानी पुरुष' परम पूज्य दादाश्री स्वत:ची भावना लपवू शकले नाहीत, त्यांच्या कारुण्यसभर शब्दातून ती भावना व्यक्त होते. ते म्हणत की माझी आयडिया अशी आहे की संपूर्ण जगात कोपऱ्याकोपऱ्यापर्यंत 'ही' 'विज्ञाना'ची गोष्ट पोहोचवावी आणि प्रत्येक ठिकाणी शांती व्हायलाच हवी. माझी भावना म्हणा, माझी इच्छा म्हणा, माझे सर्वकाही हेच आहे!

**डॉ. नीरू बहन अमीन**

# अनुक्रमणिका

## [ खंड : 1 ] आत्मा काय असेल? कसा असेल?


आत्मा म्हणजे काय? 1
आत्मा काय असेल? 1
'ज्ञानीं'कडून आत्मा जाणून घ्या 2
आत्म्याच्या अस्तित्वाची शंका... 3
आत्म्याचे असणे! कोणत्या... 5
...पण ही लक्षणे कोणाची? 7
आणि आत्मस्वरूपाचे कोणते... 7
सुख आवडते, पण ते फक्त... 9
जिथे लागणी असते, तिथे चेतन... 10
...पण ज्याला लागणी उत्पन्न... 10
निरंतर जाणणे हाच चैतन्याचा... 11
आत्मा, अनंत गुणधाम 12
ते आत्मगुण कधी प्रकट होतात? 12
आत्मा कसा ओळखावा? 13
'ज्ञानीं'च्या परिचयामुळे अनंत... 14
'पटेल' शेजारी आणि 'स्वत:'... 15
आत्मा : साकार की निराकार? 16
आत्मा, देहात कुठे नसतो? 18
मान्यता काय आणि वास्तविकता... 21
भाजनाप्रमाणे संकोच-विकास होतो 22
मृत्यूनंतर पुन:प्रवेश शक्य आहे... 24
मृत्यू म्हणजे काय? मृत्यूनंतर... 25
निसर्गाच्या कितीतरी... 26
जीवनाच्या सारानुसार गती 27
मोक्षाची गरज कुणाला आहे?... 30
असे आहेत निसर्गाचे नियम 30
पुनर्जन्माची 'प्रोसेस' कधीपर्यंत? 32
...तोच तोच चक्र 33
'योजना' तयार झाली, तेच मूळ... 34
आयोजन मागील जन्मात, रूपक... 35
...आणि विधेयके शिल्लक राहतात 36
आत्म्याबरोबर... 38
इथे तर एक अवताराची गॅरंटी 38
भ्रांतिमुळेच येते जन्म-मरण 39
डिस्चार्जच्या वेळी अज्ञानामुळे... 41
कारणांच्या परिणामस्वरूप परिभ्रमण 42
'ज्ञानी' जन्म-मरण चक्र तोडतात 43
पाच इंद्रिये, एका जन्मापुरतीच 44
सूक्ष्म शरीराशी संबंध कुठपर्यंत? 45
कोण कोणला चिकटले आहे? 48
आत्मा शुद्धच! 'बिलीफ्स'च 'रॉंग' 49
सनातन वस्तूचे येणे जाणे कसे... 51
जगात सर्वात प्रथम तर... 52
संयोगात 'बिलीफ'ची चूक... 54
म्हणून ज्ञानी म्हणतात... 56
सनातनची सुरुवात, कशी असू... 58
व्यवहार राशीची 'जशीच्या तशी'... 58
सृष्टीचे सर्जन आणि समापन... 61
ही रचना, म्हणजेच स्वत: विज्ञान 64
जगात रूपी तत्त्वांची रूपे दिसतात 64
जेव्हा पाहाल तेव्हा असेच्या... 65
अनादिसांतपासून सादिअनंतच्या... 66
जगाचे स्वरूप म्हणजे अवस्थांचे... 67
निसर्गाचे अगम्य प्लॅनिंग 69
शेवटी मात्र ज्ञानींच्या संज्ञेमुळेच... 74
मोक्षप्राप्ती निश्चित, कालावधी... 76
'अहंकाराला वळविणे', हीच... 77
आत्मज्ञानानंतर क्रमबद्धता 79
स्वभावानेच उर्ध्वगामी! परंतु... 80
अधोगामी तर अहंकारामुळे 80
मनुष्य जन्मानंतर वक्रगती 82
...तेव्हा मोक्षाला जाईल 85

गतीत भटकत राहण्याचा... 87
भिन्नता दिसते, भ्रांतीमुळे 88
जग कल्याणाची अद्‌भुत, अपूर्व... 91
...तेव्हा 'ज्ञान-प्रकाशा'त येईल 93
जगाची वास्तविकता फक्त... 93
जग समजत असलेला आत्मा तर... 96
आणि वीतरागींच्या दृष्टीने आत्मा... 99
'मिश्रचेतन' नंतर 'मेकॅनिकल'... 102
'इगोइजम', पण तोही... 102
वस्तुत्वतः 'मी' काय आहे? 103
आत्मज्ञान जाणायचे? की मग... 104
...त्यासाठी सोपी पद्धत कोणती? 105
संपूर्ण अज्ञान जाणून घेतले तरी... 106
यथार्थ स्वरूपात जग... 107
वेद थिअॉरिटिकल, विज्ञान... 108
ज्ञानींची अनिवार्यता 110
शब्द पण अनित्य 112
साधने पण विकल्पातच मोडतात 113
विकल्पांमुळेच अंतिम संधी... 114
अबुध झाल्यावर, अभेद होता येते 115
'स-इति' हे तर फक्त... 116
आत्मप्राप्ती, कोणाकडून शक्य... 117
शिडी एक आणि सोपान अनेक 119
द्वैत नाही, अद्वैत नाही, आत्मा... 119
द्वैत-अद्वैत, दोन्हीही द्वंद्वेच 123
अद्वैताची अनुभूती कधी? 125
द्वंद्वातीत झाल्यामुळे अद्वैत 125
'सत्' प्राप्त करविण्यासाठी... 126
एकांतिक मान्यतेमुळे आत्मज्ञान... 127
ब्रह्म सत्य आहे आणि जग पण... 129
वास्तविकता तर समजून घ्यावी... 131
'सत्' प्राप्तीनंतर, जे 'सत्य'... 133
अज्ञानाने आवृत केले ब्रह्माला 135
ब्रह्मदर्शन आणि आत्मदर्शन... 136
प्रथम ब्रह्मनिष्ठ, नंतर आत्मनिष्ठ 136
ब्रह्म तर शब्दांच्याही पलीकडे... 137
धन्य! धन्य! त्या दृष्टीला 138
ज्ञानींच्या सान्निध्यात स्व-स्वरूप... 139
दृष्टीपालट झाल्यामुळे... 140
'स्वतः' शिव आहे, परंतु... 141
जाणकारच वेगळे करू शकतात 142
जीव आणि आत्मा, भिन्न... 143
मी, बावो, मंगळदास 145
...असे भान होण्याचीच... 146
आत्मभान झाल्यावर 'स्वतः'... 148
भ्रांती तुटली तर भेद मिटतात 149
'मी-तू' या भेदामुळे, अनुभूती... 150
...पण मार्ग एकच आहे 151
कर्ता-भोक्ता, ही जीवाची... 152
विरोधाभासी व्यवहार कधी... 153
चुकीच्या मान्यता 'ज्ञानीच'... 154
भ्रांतीचा परिणाम खूपच जास्त... 156
'वस्तू' एक, दशा अनेक 157
'मुक्त पुरुषा'च्या भक्तीने मुक्त... 160
दशापालट झाल्याची लक्षणे 161
'स्वतः'च स्वतःची पूर्णाहुती... 162
परमात्म्याची प्रतीती, पूर्णत्व... 163
प्रत्येक आत्मा स्वतंत्र असतो... 164
गोष्ट वैज्ञानिक तर असली... 166
आत्म्याचे विलीनीकरण होऊ... 167
तेज जर तेजात मिसळत... 169
सतानत सुखात रमणे, म्हणजे... 169
सिद्धगतीत सुखाचा अनुभव 170
स्वभावाने एकसारखे पण... 172
वस्तू-स्वरूपाचे विभाजन होऊ... 173
रुपया कधी एक पैसा होतो का? 175
खरी समज, सर्व व्यापकाची 177
प्रमेयानुसार प्रमाता-आत्मा 179

प्रमेय ब्रह्मांड, प्रमाता परमात्मा 180
सापेक्ष दृष्टीने सर्वव्यापक 181
जगात सर्वत्र आत्माच? 182
तादृश दृष्टांताद्वारे मौलिक... 183
आत्मा निर्गुण आहे की अनंत... 186
या जगात काहीच निर्गुण नाही 186
शेवटी प्राकृतिक गुणानांच... 188
रूपके, लौकिक आणि... 189
मोक्ष म्हणजे स्व-गुणधर्मात... 196
'ज्ञानी'कडून करेक्टनेस समजून... 196
आत्म्याचे बंधन 197
मोक्षदाता मिळाल्यावर मोक्ष 199
मोक्ष प्राप्तीचा भाव कोणाचा? 200
... आणि आवागमन पण... 202
आत्मस्वरूपाला दु:ख नसतेच 203
द्वंद्वामुळे बंधने झाली 205
परंतु मोक्ष प्राप्त केला तरच हा... 206
सर्व आत्म्यांचा मोक्ष शक्य... 206
नमो सिद्धाणं, यांची भक्ती... 209
सिद्धांना प्रवृत्ती नसते, तरी पण... 209
सिद्धक्षेत्राचा किती हा... 210
अद्‌भुत सिद्धपद, तेच अंतिम... 211

## [ खंड : 2 ] 'मी कोण आहे?' हे कशा प्रकारे जाणावे?

आता, जन्म-मरणाचे फेरे कसे... 214
'टेम्पररी'ला पाहणाराच 'पर्मनन्ट' 216
स्वत:चे गुण कोणते? ते... 219
तो गुप्तस्वरूप, अगदी अद्‌भुत... 221
मूळ चूक मान्यतेचीच... 221
ही भ्रांती कोण दूर करील? 223
विनाशी आणि अविनाशी यात... 223
विनाशी धर्मात अविनाशींबद्दल... 225
परमात्मा पोहोचवतो प्रकाश... 226
स्वभावाच्या भक्तीमुळे... 227
जगाचे स्वरूप असे आहे 229
कर्तापद, हीच भ्रांती 229
आत्म्याला ऐकले नाही, श्रद्धा... 230
अध्यात्म्याचा अंधार विलय... 231
'ज्ञानी' वर्तवतात आत्मपरिणती 232
ज्ञानांक्षेपकवंत विचारधाराच... 233
जे मोक्षाचा अनुभव करवीत... 234
अनादिपासून 'स्वरूप' निर्धार... 235
सर्व साधने बंधनरूप झालीत 236
सूटत नाही 'मी' आणि 'माझे'... 238
हे समजून घेण्याचा प्रयत्न... 240
हे तर दुसऱ्याचे पत्र 'स्वत:'ने... 240
संसारात असंगपणा, कृपेने प्राप्त... 241
सर्वांगी स्पष्ट समजमुळे गुंता... 242
रिलेशनमध्ये 'स्वत:' स्वत:लाच... 243
'वस्तू' बद्दलची बिलीफ बदलली 243
मुक्तीसाठी सौद्धांतिक समज हवी 244
स्व-स्वभावात राहिल्यामुळे... 246
अशा काळात प्रयत्नांनी प्राप्ती... 246
क्रिया नाही, भान बदलायचे आहे 247
आत्मविकासात कधीही... 247
'प्रत्यक्षा'कडून फायदा करून घ्या 248
समज नसेल तर साधना कशी... 249
अध्यात्माला बाधक कारणे 249
जगात अध्यात्ममार्ग कुठे आहे? 251
पापे जळल्यामुळेच... 253
'एका'शिवाय शून्य स्थिती... 254
'आत्मा' तर निरीक्षकाच्याही... 257
अनुभूतीबद्दल चुकीची समज 257
मानलेले नाही, तर जाणलेले... 259
'ज्ञानीं'शिवाय कोटी-कोटी... 262
जगात 'चेतन' कधी जाणले... 263

| | | | |
|---|---|---|---|
| देहाध्यास सुटल्यावर आत्मानुभव | 265 | शुद्ध-अशुद्ध, कोणत्या अपेक्षेने | 296 |
| अहाहा! किती अद्‌भूत आहे हे... | 266 | 'काय आहे' जाणले, पण... | 297 |
| हे जाणणारा, किती शक्तीमान! | 268 | 'काय नाही', हे कसे जाणायचे? | 299 |
| अरूपीला अरूपीचा साक्षात्कार | 269 | 'अक्रम मार्गात' लिफ्टमधून... | 300 |
| अनुभव भिन्न! साक्षात्कार भिन्न! | 269 | ज्ञानींपाशी पोहोचला, हीच पात्रता | 302 |
| अनुभवीच आत्मानुभव करवू... | 270 | जिज्ञासू वृत्ती तर 'वस्तू' प्राप्त... | 302 |
| जो टिकत नाही, तो... | 270 | अक्रम मार्गाच्या अद्वितीय सिद्धी | 304 |
| अनुभवानंतर चारित्र्यात येते | 271 | अहो! आत्मा जाणणे म्हणजे... | 305 |
| शुद्ध स्वरूपाची प्राप्ती 'मी'लाच | 271 | ...'ज्ञानीं'च्या भेदज्ञानाने जाणता... | 306 |
| अज्ञान आहे, तोपर्यंतच अहंकार | 272 | वीतराग दृष्टीमुळे संसार विलय... | 307 |
| सर्व अनुभवाहून वेगळा... | 272 | दृष्टी बदलल्याशिवाय सर्व... | 309 |
| गोष्ट नीट - व्यवस्थित समजते... | 273 | ज्ञानींच्या कृपेने दृष्टी बदलते | 310 |
| आत्मज्ञान 'ज्ञानीं'पासूनच | 274 | इंद्रियांना अंतर्मुख करावे की... | 311 |
| वस्तू प्राप्तीची प्रतीती | 276 | ...त्या सर्व मेकॅनिकल... | 312 |
| बिलीफ मुळेच बंधन आहे | 277 | सर्व परिणामांचे कारण अहंकार... | 314 |
| शेवटी आत्मरूप झाल्यानंतरच... | 278 | शुद्धतेच्या शंकेचे निरसन कशा... | 316 |
| शरीर सुटते पण बिलीफ सुटत... | 281 | 'दर्शन' बदलले, 'आत्मा' नाही | 317 |
| बिलीफ बदलल्यामुळे कर्मे... | 282 | निराकरण करण्याची विलक्षण... | 317 |
| बिलीफने बिलीफचे छेदन | 283 | 'ज्ञान' सर्व हकीगत 'उघड' करते | 318 |
| निरालंबच्या दृष्टीने वस्तुत्वाचा... | 283 | संसारकाळात अज्ञानतेचाच... | 320 |
| ज्ञानींच्या प्रयोगामुळे... | 284 | कर्माचा कर्ता कोण? | 325 |
| ज्ञानप्राप्ती, भावनांच्या परिणाम... | 284 | अशुद्धतेची उत्पत्ती कशामध्ये? | 327 |
| ...तर मग ज्ञानांतराय तुटतील | 285 | व्यवहार आत्म्यालाच निश्चय... | 328 |
| तेव्हा आत्मवर्तना सुरू होते | 285 | 'रूपका'ची निर्जरा, पण... | 329 |
| 'शुद्धात्मा' शब्दाची समज | 287 | 'प्रत्यक्ष' ज्ञानीच, हकीगत... | 332 |
| सोहम् द्वारा शुद्धात्मा प्राप्त होऊ... | 288 | मौलिक तत्त्वाचे अनुभव... | 333 |
| शुद्ध झाल्यावर शुद्धात्मा बोलू... | 288 | 'आत्म्याने आत्म्याचे' दर्शन | 334 |
| प्रकट द्वारा प्रकट होईल, की... | 289 | सोनाराची दृष्टी तर फक्त शुद्ध... | 335 |
| स्मरण केल्याने शुद्धात्मा साध्य... | 290 | रिअल-रिलेटिव्ह, विज्ञानाचे... | 336 |
| वाडाबंदी तर विभाविकतेमुळे | 292 | 'ज्ञानी' तर सहजपणेच सिद्धांत... | 337 |
| 'रॉंग बिलीफ' मिटल्यावर... | 292 | जग-अधिष्ठान, ज्ञानींच्या ज्ञानात... | 338 |
| शुद्धता वाटावी म्हणून... | 293 | 'दर्शन' शुद्ध झाले की मग... | 339 |
| कर्ताभावात राहिल्यामुळे कर्मबंधन | 295 | 'मूळ स्वरूपा'च्या भानामुळे... | 340 |


❖❖❖❖❖

# आप्तवाणी
## श्रेणी - 8

## [ खंड : 1 ]
## आत्मा काय असेल? कसा असेल?

### आत्मा म्हणजे काय?

**प्रश्नकर्ता :** आत्मा म्हणजे काय?

**दादाश्री :** आत्मा म्हणजे चेतन.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे, चेतन म्हणजे आत्मा आणि आत्मा म्हणजे चेतन?

**दादाश्री :** नाही. आत्मा तर फक्त शब्दच आहे आणि चेतन पण फक्त शब्दच आहे. परंतु लोकांना समजावण्यासाठी असे बोलावे लागते. अन्यथा तो शब्दांपलीकडे आहे. पण अंगुलीनिर्देश तर करावाच लागेल ना? नाहीतर ओळखणार कसे? कशा प्रकारे ओळखाल? म्हणून आपले लोक म्हणतात ना, की तुझ्या आत्म्याला शोध. आत्मा म्हणजे 'सेल्फ' (स्वतः)! 'स्वतः कोण आहे?' हे जाणणे यालाच आत्मा म्हणतात. आणि याच आत्म्याला ओळखायचे आहे. 'राँग बिलीफ्स्' (चुकीच्या मान्यता) संपतील आणि 'राइट बिलीफ' (खरी मान्यता) बसेल, तेव्हा असे होईल, नाहीतर कसे होईल?

### आत्मा काय असेल?

**दादाश्री :** आत्मा वस्तू असेल की अवस्तू?

**प्रश्नकर्ता :** अवस्तू.

**दादाश्री :** हे जे दिसत आहे ती वस्तू आहे की अवस्तू?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याला पाहता येत नाही, म्हणून तो अवस्तू आहे. वस्तू तर आपण पाहू शकतो ना?

**दादाश्री :** नाही. वस्तू आणि अवस्तू (म्हणजे काय) ते मी तुम्हाला समजावतो. जी गोष्ट अविनाशी असते, तिला वस्तू म्हणतात आणि जी गोष्ट विनाशी असते, तिला अवस्तू म्हणतात. आत्मा आत्मारूपच आहे. आत्मा वस्तूच्या रूपात अनंत गुणांचे धाम आहे! आणि प्रत्येक वस्तू स्वत: द्रव्यरूपाने गुणासहित आणि अवस्थासहित असते. हे द्रव्य-गुण-पर्याय ज्यात असतात, तिला 'वस्तू' म्हणतात. वस्तू ही अविनाशी म्हटली जाते. आत्मा स्वत: पण एक वस्तू आहे, त्याचे स्वत:चे द्रव्य आहे, स्वत:चे गुण आहेत आणि स्वत:चे पर्यायही आहेत. आणि हे पर्याय उत्पात, व्यय, आणि ध्रुवासहित आहेत. आणि या डोळ्यांनी ज्या दिसतात त्या सर्व अवस्तू आहेत, विनाशी आहेत आणि आत्मा अविनाशी आहे, वस्तू आहे. अशा सहा अविनाशी वस्तू आहेत, जग या सहा अविनाशी तत्त्वांनी बनलेले आहे. ती सहा तत्त्वे, एकमेकांबरोबर परिवर्तनशील होत राहतात आणि त्यामुळे अवस्था उत्पन्न होतात. या अवस्थांमुळे हे जग दिसते. जगात फक्त अवस्थाच दिसत असतात.

## 'ज्ञानीं'कडून आत्मा जाणून घ्या

म्हणजे या जगात जाणण्यायोग्य जर काही असेल तर तो फक्त आत्मा आहे. आणि आत्म्याला जाणणारे लोक या जगात मुश्कीलीने एक-दोनच असतात. म्हणजेच प्रत्येक जण आत्मा जाणू शकत नाही. माणूस बाकी सर्व काही जाणू शकतो, पण आत्म्याला जाणू शकत नाही. आणि जो आत्म्याला जाणतो, त्याला केवळज्ञान होण्यास वेळच लागत नाही.

आता जर 'ज्ञानी पुरुषां'कडून आत्मा जाणून घेतला तर आत्मा प्राप्त होईल, नाहीतर आत्मा कधीच प्राप्त होणार नाही. 'ज्ञानी पुरुषां'नी आत्मा पाहिला आहे, जाणला आहे, अनुभवला आहे आणि ते 'स्वत:'

आत्मस्वरूपातच राहतात. म्हणून अशा 'ज्ञानी पुरुषां'कडून 'स्वत:' आत्म्याला जाणून घेईल, तेव्हा काम होईल.

जेव्हा 'ज्ञानी पुरुषां'जवळ जाऊन अशा आत्म्याला जाणण्यासाठी बसता तेव्हा 'ज्ञानी पुरुषां'च्या सामायिकमुळे सर्व पापे भस्मीभूत होतात. आणि पापे भस्मीभूत झाल्यानंतरच आत्म्याचे लक्ष बसते, नाहीतर लक्ष बसत नाही. आणि मग ते लक्ष निरंतर राहते, नाहीतर जगात दुसरी कोणतीच गोष्ट निरंतर लक्षात राहत नाही, थोडा वेळ लक्षात राहते आणि नंतर विसर पडतो. आणि इथे तर 'ज्ञानी पुरुषां'जवळ तुमची पापे धुतली जातात, म्हणून आत्म्याचे लक्ष बसते.

## आत्म्याच्या अस्तित्वाची शंका कोणाला येते?

**प्रश्नकर्ता :** आत्मा असेल की नाही, अशी शंका उत्पन्न होते.

**दादाश्री :** आत्मा आहेच.

**प्रश्नकर्ता :** या सर्व फॉरेनच्या सायंटिस्टांनी (परदेशी वैज्ञानिकांनी) याविषयी खूप शोध केला आहे. मरणाऱ्या माणसाला काचेच्या पेटीत ठेवून जीव कसा जातो, कुठून जातो, याचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला आहे, पण 'आत्मा आहे की नाही' याबद्दल काहीच कळले नाही. (शेवटी) 'जीव नसतोच' असे त्यांनी सिद्ध केले.

**दादाश्री :** नाही. पण 'हे अजीव' आहे असे ते म्हणतात? ही पेटी अजीव आहे की नाही? अजीवच आहे ना? तर मग हा माणूस आणि ही पेटी दोन्ही सारखेच म्हणायचे का?

**प्रश्नकर्ता :** नाही, असे नाही. पण 'जीव' अशी एखादी गोष्ट बाहेर पडत नाही असे ते म्हणतात.

**दादाश्री :** हे सायंटिस्ट 'माणूस' बनवतात, नवीन हृदय बनवतात, सर्व काही बनवतात ना? जर त्यांनी नवीन 'माणूस' बनवला तर तो आपल्यासारखा व्यवहार करू शकेल का?

**प्रश्नकर्ता :** करू शकणार नाही.

**दादाश्री :** तर मग 'जीव असे काही नसतेच' असे ते कोणत्या आधारावर म्हणू शकतात?

**प्रश्नकर्ता :** त्या लोकांनी काचेच्या पेटीत मरणाऱ्या माणसाला ठेवले होते, पण जीव बाहेर पडताना काहीच दिसले नाही, म्हणून जीव असे काही नसतेच, असे त्यांनी मानले.

**दादाश्री :** त्याचे काय आहे की, एकतर कोणीतरी अडाणी मानणार नाही किंवा कोणीतरी समजूतदार मानणार नाही. पण यामुळे सगळ्या लोकांना तर शंका उत्पन्न होत नाही ना! आणि जो 'जीव असे काही नसतेच' अशी शंका व्यक्त करतो ना, तोच स्वत: जीव आहे, ज्याला शंका वाटते तोच जीव आहे. नाहीतर शंका वाटणारच नाही. आणि या इतर जड वस्तू आहेत, त्यापैकी कोणालाच अशी शंका येत नाही. ज्या कोणाला शंका वाटते ती जीवालाच वाटते, बाकी कोणतीच अशी गोष्ट नाही की ज्याला शंका येते. हे समजत आहे का तुम्हाला?

मेल्यानंतर त्याला स्वत:ला शंका होते का? नाही ना? तर मग काय निघून जात असेल? हृदय बंद होत असेल? काय होत असेल?

**प्रश्नकर्ता :** हृदय बंद पडते, म्हणूनच मनुष्य मरतो.

**दादाश्री :** हो, त्यामुळे तर मनुष्य मरतोच श्वासाच्या आधारावरच तर तो जिवंत असतो. आत हा जो जीव असतो, तो श्वासाच्या आधारावरच टिकून असतो. जोपर्यंत श्वास चालू राहील, तोपर्यंत तो राहील.

**प्रश्नकर्ता :** पण जेव्हा शरीराचे महत्त्वपूर्ण अवयव काम करणे बंद करतात तेव्हा मनुष्याचा मृत्यू होतो. जर असे आहे तर मग 'जीव' अशी गोष्ट राहिलीच नाही.

**दादाश्री :** जीव अशी वस्तू आहेच. तो स्वत:च जीव आहे, तरी पण स्वत:च स्वत:वर शंका घेतो. ज्याला अशी शंका वाटते ना, तोच जीव आहे. या देहात जीव नाही अशी जो शंका घेतो, तोच जीव आहे. स्वत:च्या तोंडात जीभ नसेल आणि स्वत: म्हणेल की 'माझ्या तोंडात

जीभ नाही.' ही गोष्टच सिद्ध करते की जीभ आहे. समजले ना? म्हणजेच ही शंका आहे. हे वाक्यच विरोधाभासी आहे. लोक म्हणतात, 'जेव्हा माणसाचे निधन होते तेव्हा त्याच्यात जीव शिल्लक राहत नाही.' हे शब्दच स्वत: शंका निर्माण करतात की त्याला शंका आली आहे. ही शंकाच सिद्ध करते की तिथे जीव आहे.

मी सायंटिस्टांबरोबर बसेन तर मी त्यांना ताबडतोब हे समजावू शकेन की 'हा जीव बोलत आहे. मग तू परत नवीन-नवीन शंका का निर्माण करतोस? म्हणजेच देहधारीत जीव तर आहेच. आणि 'जीव निघून गेला' असे उदाहरण आपण सर्व देतोच ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आणि जेव्हा इथे इंजेक्शन द्यायचे असते तेव्हा ती जागा सुन्न करावी लागते? का करावी लागते?

**प्रश्नकर्ता :** वेदना आणि परिणाम होऊ नये म्हणून.

**दादाश्री :** जीवाला त्या भागातून दूर करण्यासाठी 'इंजेक्शन' द्यावे लागते, जीवाला तिथून दूर करण्यासाठी सुन्न करतात. जोपर्यंत तिथे जीव असेल, तोपर्यंत 'ऑपरेशन'ची वेदना सहन होऊ शकत नाही, समजले का तुम्हाला?

## आत्म्याचे असणे! कोणत्या लक्षणांवरून?

**दादाश्री :** चेतन आणि जड यात काही फरक असेल का? चेतनाला काहीतरी गुणधर्म असतील ना?

**प्रश्नकर्ता :** निश्चितच.

**दादाश्री :** काय काय गुणधर्म आहेत?

**प्रश्नकर्ता :** चेतन हालचाल करू शकतो. त्याला *लागणी* (सुख-दु:खाची अनुभूती, संवेदना) असतात.

**दादाश्री :** हालचाल तर ह्या मशीनरीज् पण करू शकतात. स्कूटर,

इंजिने, गाड्या वगैरे सर्व तर चालतातच ना? आणि हे काही पुतळे बनवलेले असतात ते पण हालचाल करतातच ना! केवळ हालचाल करतात त्यांना जीव म्हणत नाहीत. हालचालीवरून जर आत्मा ओळखता आला असता तर मग मशीन्स पण चालतातच ना? आणखी कोणत्या लक्षणांमुळे तुम्हाला (आत्म्याचे अस्तित्व) कळते? यात आत्मा आहे हे तुम्हाला कशावरून कळते?

**प्रश्नकर्ता :** आम्ही सर्व प्रकारच्या क्रिया करू शकतो.

**दादाश्री :** 'सर्व प्रकारच्या क्रिया' हे पण बरोबर होणार नाही. कारण 'मशीनरीज्' पण सर्व प्रकारच्या क्रिया करू शकतात.

**प्रश्नकर्ता :** 'मशीनरी' सर्व प्रकारच्या क्रिया करतात, पण दया किंवा प्रेम दाखवू शकत नाहीत ना?

**दादाश्री :** हो, हाच 'डिफरन्स' (फरक) आहे. जिथे ज्ञान आहे किंवा अज्ञान आहे, अज्ञान असेल तर अज्ञान आणि ज्ञान असेल तर ज्ञान, पण जिथे ज्ञान किंवा अज्ञान आहे, दया आहे तिथे आत्मा आहे हे निश्चित झाले. नाहीतर चालणे, हलणे, असे म्हटले तर ही सर्व 'मशीनरी' पण चालतच असते ना!

आता जर एखाद्याला दया नसेल आणि तो शिवीगाळ करत असेल तर तिथे आत्मा आहे की नाही?

**प्रश्नकर्ता :** आत्मा तर आहेच.

**दादाश्री :** म्हणजे दया नसेल तिथे पण आत्मा असतो?

**प्रश्नकर्ता :** हो, मशीन्स तर दया, क्रोध वगैरे दाखवत नाहीत.

**दादाश्री :** हो, म्हणजे जिथे हे सगळे आहे, तिथे आत्मा आहे, याची खात्री होते. हा 'टेपरेकॉर्डर' पण बोलतो, पण त्याच्यात क्रोध किंवा लोभ नसतो ना? या ज्या *लागणी* (सुख-दु:खाची अनुभूती, संवेदना) आहेत, त्या पण 'टेपरेकॉर्डर'मध्ये नसतात. म्हणजेच जिथे *लागणी* आहेत, तिथे आत्मा आहे.

## ...पण ही लक्षणे कोणाची?

आता या ज्या *लागणी* आहेत, त्या शरीराच्या आहेत की आत्म्याच्या? तो गुण देहाचा असेल की आत्म्याचा?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा.

**दादाश्री :** असे? हे क्रोध-मान-माया-लोभ, हे सर्व काय आत्म्याचे गुण असतील?

**प्रश्नकर्ता :** हो, सगळ्यांचा कर्ता आत्माच असायला हवा.

**दादाश्री :** पण लोक तर क्रोध-मान-माया-लोभ यांना हाकलू इच्छितात. परंतु हे गुण जर आत्म्याचे असतील तर मग ते गुण कधीच जाणार नाहीत. पण लोक क्रोध-मान-माया-लोभ दूर हाकलण्याचे प्रयत्न करत नाहीत का?

**प्रश्नकर्ता :** हो, हाकलण्याचे प्रयत्न तर सगळेजण करत असतात.

**दादाश्री :** पण हे गुण जर आत्म्याचे असतील तर ते कोणी हाकलूच शकणार नाहीत ना? जर यांना हाकललेत तर आत्मा पण निघून जाईल. म्हणजेच हे आत्म्याचे गुण नाहीत!!

**प्रश्नकर्ता :** मग हे शरीराचे गुण आहेत का?

**दादाश्री :** हे गुण शरीराचे पण नाहीत आणि आत्म्याचे पण नाहीत. क्रोध-मान-माया-लोभ ही तर निर्बलता आहे यांना आत्म्याचे गुण कसे म्हणायचे? आत्मा तर परमात्मा आहे! त्याच्यात निर्बलतेचा एकही गुण नाही!

## आणि आत्मस्वरूपाचे कोणते गुणधर्म?

काही लोक म्हणतात ना, 'जो बोलतो, तो आत आत्मा बोलत आहे.' पण जो बोलतो तो जीव पण नाही आणि भगवंत पण नाही, ती तर 'रेकॉर्ड' बोलत असते. हे मी जे बोलत आहे ते पण 'रेकॉर्ड'च

बोलत असते 'मी' बोलत नसतो. ही सर्व 'रेकॉर्ड' बोलत आहे, 'टेपरेकॉर्ड'! हा 'ओरिजनल टेपरेकॉर्डर' वाजतो, त्यावरून ही 'टेप' तयार होते, मग तिच्यापासून दुसरी तयार होते. म्हणजे प्रथम ही 'रेकॉर्ड' आणि तिच्यापासून जितक्या हव्या तितक्या 'रेकॉर्ड' तयार होऊ शकतात. म्हणजेच हे जे बोलले जाते, ही सर्व 'मशीन' चालते, खातो, पितो, रक्तप्रवाह चालू असतो, पण त्याला जीव म्हणत नाहीत. हे सर्व तर 'मेकॅनिकल' (यांत्रिक) आहे. जीव तर ज्ञानस्वरूप आहे, ज्ञान म्हणजेच प्रकाशस्वरूप आहे. यात जे प्रकाशस्वरूप आहे ते इतर कुठल्या स्वरूपात नसते.

रात्रीच्या अंधारात जर तुमच्या हातात श्रीखंड दिले तर ते श्रीखंड तुम्ही कुठे ठेवाल? तोंडात टाकताना ते डोळ्यात जाते का? की तोंडातच जाते? काय सांगता? बोलत का नाही? घोर अंधारात देखील श्रीखंड तुम्हाला दिले तर ते तुम्ही तोंडातच टाकता ना? आणि नंतर जर तुम्हाला कोणी विचारले, काय खाल्लेत? तर तुम्ही काय सांगता?

**प्रश्नकर्ता :** श्रीखंड.

**दादाश्री :** मग तुम्हाला कोणी विचारले की या श्रीखंडात काय काय आहे? तर तुम्ही काय सांगाल?

**प्रश्नकर्ता :** दही, साखर.

**दादाश्री :** हो, आणि दही जर चांगले नसेल, असे तसे असेल तर कळते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, नक्कीच.

**दादाश्री :** आणि चांगले असेल तरी पण कळते ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आणि साखर कमी असेल तरी कळते का?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आणि साखर खूप जास्त झाली असेल तर?

**प्रश्नकर्ता :** ते पण कळते.

**दादाश्री :** रात्रीच्या अंधारात कसे काय समजते? अंधारात समजते का? आणि खाताना जर त्यात किसमिस, चारोळी आली तरी कळते का? वेलचीचा छोटा दाणा असेल तरी कळते का?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** म्हणजे हे सगळे जो जाणतो तोच जीव आहे.

**प्रश्नकर्ता :** लोक म्हणतात की ज्ञानतंतूंमुळे कळते. ज्ञानतंतू नसतील तर कळणारच नाही.

**दादाश्री :** हो, बरोबर आहे, ज्ञानतंतू नसतील तर कळणार नाही. पण ज्याला कळते तो जीव आहे आणि मध्ये ज्ञानतंतूच्या तारेच्या दोऱ्या असतात. त्या तारेच्या दोऱ्या तयार नसतील तरी जीवाला काहीच कळणार नाही. परंतु ज्याला कळते तो जीव आहे. तुम्हाला समजले का?

चालते-फिरते, ती तर 'मशीनरी' चालते-फिरते. हे गुणधर्म चेतनाचे नाहीत. चेतनाचे गुणधर्म कोणते? त्याला अनंत ज्ञानप्रकाश आहे, अनंत दर्शनप्रकाश आहे, त्याच्या अनंत शक्ती आहेत, तो अनंत सुखांचे धाम आहे!

## सुख आवडते, पण ते फक्त जीवालाच

आता सुख कोण शोधतो? ज्याला दु:ख आवडत नाही, तो कोण आहे? दु:ख का आवडत नाही? जर हे शरीर जीवरहित असते, तर सुख आणि दु:ख एकसारखेच वाटले असते. याचे काय कारण आहे? असा कधी विचार केला आहे का? काय विचार केला आहे?

कोणत्याही जीवाला दु:ख पसंतच नसते. हे तर नक्की मान्य आहे ना? कोणाही जीवाला दु:ख आवडत असेल का? या मुंग्यांसाठी तुम्ही जर इथे साखर टाकली तर त्या खुश होऊन धावतधावत ती साखर

घेऊन जातील आणि खडे ठेवले तर? पळून जातील. त्याचे कारण काय? आवडते काय? सुख. म्हणजेच ज्याला दु:ख पसंत नाही आणि जो सुख शोधत असतो, तो जीव आहे. जो हिंडतो-फिरतो तो जीव नाही.

## जिथे लागणी असते, तिथे चेतन असते

*लागणी* असतात की नाही? मग ज्याला *लागणी* होतात तोच जीव आहे. जीव हाच आत्मा आहे आणि तोच चेतन आहे, आणि तो परमात्मा बनू शकतो! 'पूर्ण', 'परफेक्ट' होईल तेव्हा 'तो' 'परमात्मा' होईल!

तुम्हाला समजले ना? जिथे थोडीशी देखील *लागणी* असते, तिथे आत्मा असतो, चेतन असते हे निश्चित झाले. म्हणजे जिथे *लागणी* आहे तिथे चेतन आहे असे समजावे. जिथे *लागणी* नाही तिथे चेतन नाही, तिथे अनात्मा आहे. ह्या झाडा-झुडपांनासुद्धा *लागणी* असते.

**प्रश्नकर्ता :** झाडे तर 'एकेन्द्रिय' आहेत?

**दादाश्री :** एकेन्द्रिय म्हणजे त्यांना स्पर्शाच्या इंद्रियाची *लागणी* आहे, ते स्पर्शेन्द्रियांची *लागणी* व्यक्त करतात. हे प्रत्येक जीवमात्र *लागणी* वाले आहेत. ज्यांना *लागणी* उत्पन्न होते, तिथे आत्मा असतो हे निश्चित झाले. ज्याला *लागणी* उत्पन्न होतात तोच आत्मा आहे असे नाही, पण जिथे *लागणी* उत्पन्न होतात तिथे आत्मा असतो. आणि जिथे *लागणी* उत्पन्न होत नाही, तिथे आत्मा नसतो.

## ...पण ज्याला लागणी उत्पन्न होते, ते पुद्‌गल

आता आत्मा काय आहे? त्याला *लागणी* वगैरे काहीच नसते. आत्मा तर फक्त प्रकाश स्वरूप आहे. पण जिथे *लागणी* आहेत त्यावरून येथे आत्मा आहे असे आपण समजू शकतो.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ज्याच्या आधारामुळे *लागणी* उत्पन्न होते ते चेतन आहे की मग जिथे *लागणी* उत्पन्न होते तिथे चेतन आहे?

**दादाश्री :** 'ज्याच्या आधारामुळे *लागणी* उत्पन्न होते, ते चेतन

आहे' असे म्हटले तर गडबड होईल. (खरे म्हणजे) चेतनाच्या उपस्थितीमुळे *लागणी* उत्पन्न होते. म्हणजेच जिथे *लागणी* उत्पन्न होते, तिथे चेतन आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे *लागणी* उत्पन्न झाली आणि जे अभिव्यक्त झाले, तर ते चेतन व्यक्त झाले असे नाही ना?

**दादाश्री :** नाही, अभिव्यक्त पण पुद्‌गलच होत असते, पण जिथे *लागणी* उत्पन्न होते तिथे चेतन आहे आणि म्हणूनच *लागणी* उत्पन्न होते, वेदना उत्पन्न होतात. म्हणजे चेतन आणि जड असे विभाजन करायचे असेल तर या टेपरेकॉर्डरला *लागणी* निर्माण होत नाही, म्हणून यात चेतन नाही.

## निरंतर जाणणे हाच चैतन्याचा स्वभाव

**प्रश्नकर्ता :** म्हणजे चेतन आणि मॅटर (पदार्थ) यात फरक आहे का?

**दादाश्री :** पुष्कळच. चेतन तर 'अरूपी' आहे आणि मॅटर तर 'रूपी' आहे, ते सडते, पडते, विखुरले जाते, आणि खूप वेळ झाला तर सडते असे आहे, शिवाय डोळ्याला दिसेल असे रूपी आहे, जिभेने चव पाहता येईल असे आहे, कानाने ऐकता येईल असे आहे आणि चेतन तर परमात्मा आहे!

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मा आणि अनात्मा यात काय फरक आहे?

**दादाश्री :** यात गुणधर्माने फरक आहे. प्रत्येक वस्तूचे गुणधर्म असतात ना! हे सोने, सोन्याच्या गुणधर्मात असते, तांबे, तांब्याच्या गुणधर्मात असते. गुणधर्माने वस्तू ओळखता येते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, ओळखता येते?

**दादाश्री :** त्याच प्रकारे, आत्मा आणि अनात्मा यांचे स्वत:चे गुणधर्म असतात. त्यात आत्म्याचे आणि अनात्म्याचे बहुतेक गुणधर्म

जुळतात, परंतु काही बाबतीत काही गुण मात्र जुळत नाहीत. जो चैतन्य स्वभाव आहे, तो इतर कोणत्याच वस्तूत नाही. चैतन्य म्हणजे ज्ञान आणि दर्शन!

अर्थात ज्ञान आणि दर्शन हे आत्म्याचे गुण आहेत. निरंतर जाणत राहणे, हा आत्म्याचा स्वभाव आहे. जाणण्याचा स्वभाव दुसऱ्या कोणत्याही जड वस्तूमध्ये नाही. या शरीराकडे जाणण्याचा स्वभाव नाही. जाणण्याचा स्वभाव आत्म्याचा आहे आणि आत्मा हाच परमात्मा आहे!

## आत्मा, अनंत गुणधाम

**प्रश्नकर्ता :** आत्मा तर ज्ञानवालाच आहे ना?

**दादाश्री :** तो स्वत:च ज्ञान आहे. ज्ञानवाला नाही, स्वत:च ज्ञान आहे! त्याला जर ज्ञानवाला म्हटले तर 'ज्ञान' आणि 'वाला' असे दोन वेगळे होतात. म्हणजेच आत्मा स्वत:च ज्ञान आहे, तो स्वत:च प्रकाश आहे! त्या प्रकाशाच्या आधारावरच हे सगळे दिसते. त्या प्रकाशाच्या आधारावरच हे सगळे समजते पण आणि जाणता पण येते. सगळे काही जाणताही येते, आणि समजता पण येते.

म्हणजेच आत्मा तर परमात्मा आहे, अनंत गुणांचे धाम आहे. त्याचे तर खूप सारे गुण आहेत. इतके गुण आहेत की विचारूच नका! आत्मा स्वत:च्या 'स्वाभाविक' गुणांचे धाम आहे, म्हणजेच हे गुण कधीही जात नाहीत, अशा गुणांचे धाम आहे. अनंत ज्ञान आहे, अनंत दर्शन आहे, अनंत शक्ती आहे, अनंत सुखाचे धाम आहे, अव्याबाध स्वरूपी आहे, आत्म्याचे असे तऱ्हेतऱ्हेचे गुण आहेत.

## ते आत्मगुण कधी प्रकट होतात?

त्यापैकी एकही गुण एका सेकंदासाठीही तुमच्याकडे आलेला नाही, तुम्ही आता प्राकृतिक गुणांनाच वेदत आहात. 'तुमच्या' 'बिलीफ' (मान्यता)नुसार तुम्हाला गुण प्राप्त होतील. 'तुम्ही' 'चंदुलाल' राहाल तर तुम्हाला प्राकृतिक गुण प्राप्त होतील आणि 'तुम्ही' 'शुद्ध चैतन्य'

व्हाल तर मग तुमचे 'स्वाभाविक' गुण प्राप्त होतील! तुम्हाला जिथे बसायचे असेल तिथे तुम्ही बसा.

जिथे आत्म्याचे गुण नाहीत, तिथे आत्मा नसतोच. हे सोने जोपर्यंत आपल्या गुणधर्मात राहते, तोपर्यंत ते सोने असते, दुसऱ्यांच्या गुणात 'स्वत:' कधी नसतो. या जगात हे जे सर्व दिसतात ते सर्व दुसऱ्यांचे गुण आहेत. तिथे 'स्वत:' नसतोच. 'स्वत:' त्याचा ज्ञाता-द्रष्टा असतो, पण तो त्यात तन्मयाकार होत नाही. आत्मा त्यात मिसळत नाही. आत्मा भेसळवाला नाही. आत्मा निर्भेळ आहे!

## आत्मा कसा ओळखावा?

**प्रश्नकर्ता :** आत्मा पाहता येतो का? की ती फक्त कल्पनाच आहे?

**दादाश्री :** आपल्याला हवा दिसत नाही. तरी पण हवा आहे हे तुम्हाला समजते ना? नाही का समजत? अत्तराचा सुगंध येतो, पण तो दिसतो का? पण तरी आपल्याला हे 'अत्तर आहे' अशी पक्की खात्री होतेच ना? त्याच प्रकारे 'आत्मा आहे' याचीही आपल्याला पक्की खात्री होते! जसे सुगंधामुळे अत्तर ओळखता येते तसेच आत्मा त्याच्या सुखामुळे ओळखता येतो, मग हे जग 'जसे आहे तसे' दिसते. त्यामुळे पक्की खात्री होते की आत्म्याचे अनंत गुण आहेत. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत शक्ती, अनंत सुखधाम, असे तर कितीतरी गुण आहेत! आत्मा स्वत:च परमात्मा आहे, पण 'स्वत:ला' मात्र त्याचे भान झाले पाहिजे. एकदा भान झाले की मग सर्व गुण प्रकट होतील. आत्मा अनंत प्रकारे आहे, अनंत गुणांचे धाम आहे! तुम्ही अजून त्याचा एकही गुण जाणलेला नाही.

आत्मा त्रिकाळ वस्तू आहे आणि अनंत सुखांचे धाम आहे. पण लोक तर 'आंब्यात' सुख शोधत आहेत, बाजारातील आंब्यांमध्ये, 'मार्केट मटिरिअल्स्'मध्ये. डोळ्यांनी जे दिसते, कानाने जे ऐकू येते, नाकाने ज्याचा सुगंध येतो, जिभेने जे चाखता येते, ज्याचा इथे स्पर्श होतो, ते सर्व 'मार्केट मटिरिअल्स्' आहे.

## 'ज्ञानीं'च्या परिचयामुळे अनंत शक्ती व्यक्त होतात

**प्रश्नकर्ता :** आत्म्यात अनंत शक्ती असतात का?

**दादाश्री :** हो. पण त्या शक्ती ज्ञानी पुरुषांद्वारे प्रकट व्हायला हव्यात. उदाहरणार्थ तुम्ही शाळेत गेला होता, तेव्हा तुम्हाला शिकवले होते ना? तुमचे ज्ञान तर तुमच्या आत होतेच, पण ते (शिक्षक) प्रकट करून देतात. त्याच प्रकारे 'ज्ञानी पुरुषां'जवळ तुमच्या स्वतःच्या सर्व शक्ती प्रकट होऊ शकतात. अनंत शक्ती आहेत, पण त्या सर्व शक्ती अशाच दाबून पडलेल्या आहेत. त्या शक्तींना आम्ही मोकळे करतो. जबरदस्त शक्ती दाबून पडलेल्या आहेत! आणि त्या फक्त तुमच्यातच नाही तर प्रत्येक प्राणीमात्रात आहेत, पण काय करणार? त्यांच्यावर 'लेयर्स वर लेयर्स' (एका वर एक अशी अनेक आवरणे) पडली आहेत.

**प्रश्नकर्ता :** आत्म्याची शक्ती आणि शारीरिक शक्ती या दोघात काही संबंध आहे का?

**दादाश्री :** या दोघांच्या शक्ती वेगवेगळ्या आहेत.

**प्रश्नकर्ता :** त्या दोन्ही प्रकारच्या शक्ती एकमेकांवर परिणाम करतात का?

**दादाश्री :** करतातच ना! या शारीरिक शक्तींमुळे तर आत्म्याच्या शक्ती बंद होतात. शारीरिक शक्ती जास्त असली तर पाशवीपणा वाढतो.

**प्रश्नकर्ता :** आणि आत्म्याची शक्ती जास्त असेल तर?

**दादाश्री :** पाशवीपणा कमी होतो आणि माणुसकी उत्पन्न होते.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्म्याची शक्ती प्राप्त करण्यासाठी माणसाने कोणते प्रयत्न केले पाहिजेत?

**दादाश्री :** आत्म्याची शक्ती तर आत आहेच. आत्म्याची शक्ती म्हणजे परमात्मापणाची शक्ती. एरवी त्या परमात्म्यात भाजलेला पापड मोडण्याची पण शक्ती नसते पण तरीही तो अनंत शक्तींचा मालक आहे.

**प्रश्नकर्ता :** आम्हाला तर याचा मेळ बसतच नाही.

**दादाश्री :** तो मेळ बसायलाच हवा. जोपर्यंत मेळ बसत नाही, तोपर्यंत समजण्यात जरा फरक आहे. जर मेळ बसला नाही तर ते ज्ञानच नाही, अज्ञान असेल तरच मेळ बसत नाही. नाहीतर मेळ बसलाच पाहिजे. पण त्यासाठी थोडा 'वेळ' काढून परिचय करावा लागेल.

**प्रश्नकर्ता :** कशा प्रकारे?

**दादाश्री :** इथे आमच्याजवळ बसून, थोडा 'वेळ' काढून, विशेष प्रकारे बसून, 'ज्ञानी पुरुषां'शी परिचय करून घ्यावा लागेल.

आत्म्याच्या अनंत ज्ञानशक्ती आहेत. एक-दोन ज्ञानशक्ती आहेत असे नाही. अनंत ज्ञानशक्ती आहेत त्यामुळेच तर ज्योतिष ज्ञान, वकिलीचे ज्ञान, डॉक्टरी ज्ञान, हे सर्व ज्ञान अनावृत्त (खुले) झाले आहे. प्रत्येकाचे विषय वेगवगळे असतात, ते सर्व ज्ञान अनावृत्त होतील इतक्या सर्व ज्ञानशक्ती आहेत. म्हणजेच आत्मा अनंत शक्तींचा मालक आहे! अनंत ज्ञान-शक्ती आहेत आणि अनंत वीर्य शक्ती आहेत. खूपच अजब शक्तींचे मालक, असे हे परमात्मा आहेत!

## 'पटेल' शेजारी आणि 'स्वतः' 'परमात्म्या'मध्ये

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचे स्वरूप कसे दिसते? तेजस्वी दिसते की काही आकृती दिसते?

**दादाश्री :** ती आकृतीही नाही आणि निराकृतीही नाही. आकृती वगैरे सर्व माणसांच्या कल्पना आहेत, बुद्धीजन्य विषय आहे. आत्मा तर आत्माच आहे, प्रकाशस्वरूप आहे. हो, असा प्रकाश ज्याला जागेची पण गरज नाही, आधाराची पण गरज नाही, असा प्रकाशस्वरूप आहे आत्म्याचा! पर्वतांच्या पण आरपार जाऊ शकतो, असा तो आत्मा आहे. आणि अशा 'आत्म्यात' 'मी' राहतो. म्हणजेच या 'ए.एम.पटेल'ला जर कोणी शिव्या दिल्या, मारले, तरीही 'मला' काहीच होत नाही. 'मी वेगळा', 'पटेल' वेगळे. 'पटेल' शेजारी असतात आणि जे व्यवहार करतात ते 'पटेल' करतात.

## आत्मा : साकार की निराकार?

**प्रश्नकर्ता :** असे म्हणतात की भगवंत तर अत्यंत तेज:पुंज आहेत. निरंजन-निराकार आहेत.

**दादाश्री :** आणि भगवंत साकार पण आहेत.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही असे पण बोलता आणि तसे पण बोलता?

**दादाश्री :** 'बाय रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट'ने (सापेक्ष दृष्टी कोनातून) भगवंत साकार आहेत आणि 'बाय रिअल व्ह्यू पॉइंट'ने (अस्सल दृष्टीकोनातून) ते निराकार आहेत.

**प्रश्नकर्ता :** ती अलौकिक भाषा शिकायला कुठे जावे?

**दादाश्री :** इथेच शिकायची.

तुमचे नाव चंदुलाल, लहापणी पण चंदुलाल आणि लग्नानंतरही चंदुलाल आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** मग 'पती' कोणाचे झालात? कोणत्या आधारावर? पूर्वी 'पती' होता का?

**प्रश्नकर्ता :** नाही, पूर्वी नव्हतो.

**दादाश्री :** पण 'तुम्ही' तर तेच आहात ना? हेच मला सांगायचे आहे. की या प्रकारे, जेव्हा निमित्त मिळते त्या संबंधामुळे तुम्हाला 'पती' म्हणतात. ही सापेक्ष गोष्ट आहे. याच प्रकारे रिलेटिव्ह संबंधाने भगवंत साकार आहेत आणि असे संबंध नसतील तर भगवंत निराकार आहेत.

म्हणून तुम्हाला जर निराकार भगवंतांची भक्ती करायची असेल, निराकार भगवंतांना ओळखायचे असेल तर प्रथम साकारी भगवंतांकडे जा. निराकार भगवंत डोळ्यांनी दिसणार नाहीत आणि बुद्धीने समजणार नाहीत. तुम्हाला कोणत्याही प्रकारे निराकार भगवंत समजणारच नाहीत,

परंतु ज्यांच्यात निराकार (भगवंत) प्रकट झाले आहेत, अशा साकार भगवंतांकडे जा.

इथे मनुष्यरूपात मुख्य साकार भगवंत कोणाला म्हणतात? 'ज्ञानी पुरुषां'ना, ज्यांच्यात मनुष्यरूपात आतमध्ये निरंजन निराकार प्रकट झाले आहेत त्यांना! त्यांना साकार भगवंत म्हणतात!

**प्रश्नकर्ता :** पण आत्म्याची एखाद्या आकाराच्या रूपात कल्पना करायची असेल तर कशी करावी?

**दादाश्री :** त्याच्या आकाराची कल्पना करणे योग्य नाही. त्याऐवजी साकार भगवंतांजवळ बसायला हवे. साकार भगवंत, म्हणजेच आत्म्याचे स्वरूप! जे देहसहित आत्मज्ञानी आहेत, त्यांना साकारी भगवंत म्हणतात, त्याच प्रकारे कल्पना करावी, संपूर्ण देहमंदिरासहित त्यांचे दर्शन करायला हवे. खरे तर, आत्म्याला आकार नाही. त्याचे निराकार स्वरूप 'ज्ञानी पुरुषां'कडून समजून घ्यावे लागेल. आणि मग ते स्वरूप तुमच्या जाणीवेत पक्के बसेल, इतके पक्के की तुम्ही ते नंतर कधी विसरणारच नाही.

म्हणजेच आत्म्याला आकार नसतो, ती निराकार वस्तू आहे तरी पण स्वभावाने आत्मा कसा आहे? ज्या देहात तो आहे, त्या देहाचा जो आकार आहे, तशा आकाराचा तो असतो. परंतु तिथे सिद्धगतीत शेवटच्या देहाचा आकाराचा 1/3 भाग कमी होतो. म्हणजे 2/3 भागाचा आकार राहतो. म्हणून पाचव्या आऱ्यात (कालचक्राचा एक भाग) जो देह असतो आणि तिसऱ्या आऱ्यात जो देह असतो त्यात खूप मोठा फरक असतो. ती उंची वेगळी आणि ही उंची वेगळी. पण ज्या चरमदेहाने काम झाले त्या देहाप्रमाणेच तिथे, सिद्धगतीत आकार असतो, पण आत्मा निराकार आहे.

**प्रश्नकर्ता :** तिथे सावलीसारखे असते का? काय असते?

**दादाश्री :** नाही, सावलीसारखे नसते, अशी काही वस्तू तिथे नसते. सावली तर पुद्‌गल आहे.

**प्रश्नकर्ता :** जसे आपण हवेत हात फिरवितो आणि हाती काहीच

येत नाही, त्याचप्रमाणे मोक्षात जाऊन हात फिरविले तर हातावर काही आदळेल का?

**दादाश्री :** नाही, असे हात फिरवले तर हाती काहीच येणार नाही. अरे, ही अग्नी घेऊन आत्म्याच्या आत फिरवली तरी आत्मा जळणार नाही. आतमध्ये असे हात फिरवले तरी आत्मा हाताला स्पर्श करणार नाही, असा आत्मा आहे. त्या आत्म्यात आपण बर्फ फिरवला तरी तो थंड होणार नाही, त्यात तलवार फिरवली तरीही कापला जाणार नाही.

**प्रश्नकर्ता :** तरी पण आकार तर असेलच ना?

**दादाश्री :** तो निराकारी आकार आहे. निरंजन-निराकारी आकार आहे. तुमच्या कल्पनेत आहे तसा तो आकार नाही. त्याला 'स्वाभाविक' आकार आहे.

## आत्मा, देहात कुठे नसतो?

**प्रश्नकर्ता :** हा जो आत्मा आहे, त्याचा एक्स-रे मध्ये किंवा कुठल्याच मशीनमध्ये फोटो पण येत नाही.

**दादाश्री :** हो, आत्मा तर अत्यंत सूक्ष्म आहे, म्हणून तो हातात येऊ शकत नाही! कॅमेऱ्यात येऊ शकत नाही, डोळ्यांना दिसू शकत नाही, दुर्बीणीतून दिसत नाही, कशातूनच दिसत नाही. अशी सूक्ष्म वस्तू आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणूनच आश्चर्य वाटते की आत्मा कुठे असेल?

**दादाश्री :** या आत्म्यातून निखारा आरपार निघाला तरी पण तो निखारा त्याला स्पर्श करू शकणार नाही, इतका सूक्ष्म आत्मा आहे.

**प्रश्नकर्ता :** पण या शरीरात आत्म्याचे स्थान कुठे असते?

**दादाश्री :** आत्मा या शरीरात कुठे नाही? तर या (वाढलेल्या) केसात तो नाही, आणि ही जी नखे आहेत ना, तर जेवढी नखे कापली जातात त्या भागात तो नाही. (एवढे भाग वगळता) शरीराच्या इतर सर्व

जागी आत्मा आहे. म्हणून आत्मा कोणत्या जागी आहे असे विचारायची गरजच नाही, कोणत्या जागी नाही, असे विचारले पाहिजे.

या केसात, आपण जे केस कापतो त्यात आत्मा नसतो. झोपेत कोणी केस कापले, तर आपल्याला काहीच कळत नाही, म्हणून त्यात आत्मा नाही, आणि जिथे आत्मा आहे तिथे जर टाचणी टोचली तर ताबडतोब समजून येते.

**प्रश्नकर्ता :** सामान्यपणे आत्मा मेंदूतच असतो ना? आणि या ज्ञान तंतूच्यामुळेच टाचणी टोचल्यावर समजते ना?

**दादाश्री :** नाही, पूर्ण शरीरातच आत्मा आहे. मेंदूत तर मेंदू असतो. ती तर एक मशिनरी आहे, आणि ती आतील सर्व माहिती देण्याचे साधन आहे. आत्मा तर पूर्ण शरीरात उपस्थित आहे. इथे पायात जरा काटा लागला की लगेच समजते ना?

म्हणजे हा जो दिसतो तो फोटो आत्म्याचाच आहे. फक्त त्यावर खूप थर साठले आहेत, एवढेच. नाहीतर फोटो जसाच्या तसाच आहे. आत्म्याचा फोटो आहे तो तसाचा तसाच राहतो.

म्हणजेच या शरीरात जिथे जिथे टाचणी टोचाल आणि टोचलेले जाणवेल, तिथे तिथे आत्मा आहे. रात्री जरी टोचली तरी पण समजते ना? म्हणजे या शरीरात जिथे जिथे टाचणी टोचल्यावर दुःख होते, ते जो जाणतो तो आत्मा आहे. नाहीतर आत्मा निघून गेल्यावर जर आपण सतत टाचण्या टोचत राहिलो तरी पण चंदुलाल बोलणार नाहीत, अजिबात हलणार नाहीत.

**प्रश्नकर्ता :** आत्म्याला दुःख होते, असे आपण म्हणू शकतो का?

**दादाश्री :** आत्म्याला दुःख होत नाही. या बर्फावर निखारे ठेवले तर बर्फ जळेल का?

**प्रश्नकर्ता :** केस कापल्यामुळे आपल्याला वेदना होत नाही, म्हणजे तिथे आत्मा नाही का?

**दादाश्री :** नाही.

**प्रश्नकर्ता :** आणि जिथे वेदना होते, तिथे आत्मा असतो?

**दादाश्री :** हो, तिथे आत्मा असतो.

**प्रश्नकर्ता :** मग सुख-दु:खाचा परिणाम होत असेल तर आत्मा संसारी झाला?

**दादाश्री :** नाही, आत्मा संसारी बनत नाही. आत्मा मूळ स्वरूपातच आहे. तुम्ही मानलेला आत्मा संसारी झाला आहे, तुम्ही ज्याला आत्मा मानता तो संसारी झाला आहे, आणि तो 'मेकॅनिकल' आहे. म्हणून जेव्हा 'पेट्रोल' घालता तेव्हा तो चालतो, नाहीतर बंद पडतो. हे नाक दाबून धरले तर अर्ध्या तासात-एक तासात हे मशीन बंद होते. लोक तर 'मेकॅनिकल' आत्म्याला आत्मा मानतात. मूळ आत्मा पाहिलेला नाही, मूळ आत्म्याचे एक अक्षर देखील ऐकलेले नाही, आणि 'मेकॅनिकल' आत्म्यालाच स्थिर करत राहतात. पण तो 'मेकॅनिकल' आत्मा कधीच स्थिर होऊ शकत नाही.

म्हणजेच हे केस कापतात त्यात आणि वाढलेल्या नखात आत्मा नाही. नखे कापल्यावर जिथे आग होते तिथे आत्मा आहे. खरे तर, आत्मा संपूर्ण शरीरात आहे.

**प्रश्नकर्ता :** पण योगशास्त्रात तर म्हणतात की इथे ब्रह्मरंध्रात आत्मा आहे.

**दादाश्री :** ते योगशास्त्र त्यांच्यासाठी उपयोगी आहे. तुम्हाला खरे जाणून घ्यायचे आहे का? लौकिक जाणायचे आहे की अलौकिक? ज्ञान दोन प्रकारचे असते, एक लौकिकात चालते ते, आणि दुसरे वास्तविक ज्ञान! तुम्हाला वास्तविक ज्ञान जाणून घ्यायचे आहे की लौकिक?

**प्रश्नकर्ता :** दोन्ही समजून घ्यायचे आहेत.

**दादाश्री :** जर लौकिक जाणायचे असेल तर आत्म्याचे स्थान

हृदयात आहे आणि अलौकिक जाणायचे असेल तर आत्मा पूर्ण शरीरात आहे. लौकिक जाणायचे असेल तर हे जग परमेश्वराने बनवलेले आहे आणि अलौकिक जाणायचे असेल तर जग परमेश्वराने बनवलेले नाही.

**प्रश्नकर्ता :** हृदयात अंगठ्याएवढा आत्मा असतो, असे ही म्हणतात.

**दादाश्री :** नाही, असल्या गोष्टीत काहीच तथ्य नाही.

## मान्यता काय आणि वास्तविकता काय?

**प्रश्नकर्ता :** पण उपनिषदात असे वाक्य आहे, 'अंगुष्ठ मात्र प्रमाण'-तुझ्या हृदयात आत्म्याचे प्रतिबिम्ब पाहायचे असेल तर असे ध्यान कर की तुला फक्त 'अंगुष्ठमात्र प्रमाणात' (अंगठ्याएवढा) दिसेल.

**दादाश्री :** ही सायंटिफिक गोष्ट नाही. जर सायंटिफिक असती तर मी त्यात पुढे गेलो असतो. हे तर एका खास स्तरवाल्याला स्थिर करायचे साधन आहे. एकदम चूक पण म्हणता येणार नाही. चूक तरी कसे म्हणणार? जी गोष्ट एखाद्याला स्थिर करू शकते, तिला चूक कसे म्हणू शकतो? हे जे हृदय आहे, त्याच्या आत स्थूल मन आहे, तेथील ही धारणा आहे. या हृदयात जर धारणा केलीत तर मग पुढे जाणे शक्य आहे. पण कोण पुढे जाऊ देत नाही? तर बुद्धी पुढे जाऊ देत नाही आणि हृदयाची धारणा पुढे जाऊ देईल अशी असते. मोक्षाला जायचे असेल तर हृदयाची मदत चालेल. अर्थात इथे हृदयाची गरज आहे. बुद्धीची नाही.

म्हणजे हे तर, अंगठ्याएवढा असे म्हणून लोकांना घाबरवून टाकले आहे. आत्मा तर देहप्रमाण आहे. आत्मा संपूर्ण देहप्रमाण आहे आणि त्याच्यावर हे सर्व कर्मांचे वळगण (पाश) चिकटले आहेत. ते कसे? तर झाडाच्या फांदीवर लाख चिकटलेली असते ना? त्याचप्रमाणे ही सर्व कर्मे चिकटलेली आहेत. अनंत प्रदेशात अनंत कर्मे चिकटली आहेत. ज्या प्रदेशावरचे कर्म दूर होते तेथील आवरणे निघतात, तेथील ज्ञान प्रकट होते. या सर्व डॉक्टरी प्रदेशाचे ज्ञान मोकळे झाले तर तुम्हाला

डॉक्टरी ज्ञान प्रकट होते, कोणाला वकिलीचे ज्ञान प्रकट होते. ज्याचा जो प्रदेश मोकळा होतो त्याला तेथील ज्ञान प्रकट होते.

आत्मा तर पूर्णच आहे. त्यात जर एखाद्याचा पाय किंवा असे काही कापले गेले तर आत्मा तेवढा 'शोर्ट' (संकुचित) होतो. या हृदयात तर फक्त मनाचे स्थान आहे, मनाचे स्थूल स्थान आहे. मन हृदयात प्रकट होते. आणि सूक्ष्म मनाचे स्थान इथे कपाळाच्या आत अडीच इंचावर आहे. आणि स्थूल मनाचे स्थान हृदयात आहे.

## भाजनाप्रमाणे संकोच-विकास होतो

**प्रश्नकर्ता :** आत्मा कापला जाऊ शकतो का?

**दादाश्री :** आत्मा कापला जात नाही, तो छेदला जात नाही, त्याला काहीही होऊ शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** एवढा हात कापला गेला तर?

**दादाश्री :** आत्मा तेवढा संकुचित होतो. आत्म्याचा स्वभाव संकोच-विकास होण्याचा आहे, आणि तोही संसारी अवस्था असताना. सिद्ध अवस्थेत तसे नसते. संसारी अवस्थेत संकोच आणि विकास दोन्ही होऊ शकते. ही मुंगी आहे तिच्यात पण आत्मा पूर्णच असतो आणि हत्तीतदेखील एकच पूर्ण आत्मा असतो. पण तो विकसित झाला आहे. हात-पाय कापला तर त्या प्रमाणात आत्मा संकुचित होतो आणि तोही जेवढा भाग कापला गेला आहे तेवढाच, त्यानंतर तो संकुचित होत नाही.

**प्रश्नकर्ता :** ज्या प्रमाणे माणसाच्या पूर्ण शरीरात आत्मा आहे, त्याच प्रमाणे मुंगी आणि हत्तीच्या पण पूर्ण शरीरात आत्मा आहे का?

**दादाश्री :** हो, पूर्ण शरीरात आत्मा आहे. कारण आत्मा संकोच-विकास होणारे भाजन आहे. जेवढ्या प्रमाणाचे भाजन तेवढ्या प्रमाणात त्याचा विकास होतो. जर भाजन छोटे असेल तर तेवढ्या प्रमाणात तो संकुचित होतो.

**प्रश्नकर्ता :** शरीर सोडताना एक टोक इथे असते आणि दुसरे टोक पंजाबला असते असे म्हणतात, तर असे कशा प्रकारे असू शकते ते जरा समजवा ना.

**दादाश्री :** आत्मा संकोच-विकास होणारे भाजन आहे, त्यामुळे तो कितीही लांब होऊ शकतो. आणि जिथे त्याचा ऋणानुंबंध असतो तिथे जावेच लागते ना? तर काय पायाने चालत थोडेच जाईल? त्याला पाय आणि हे स्थूल शरीर नसतेच ना!

**प्रश्नकर्ता :** तर मग दोन्ही ठिकाणी राहू शकतो?

**दादाश्री :** हो, इथून जिथे जायचे असेल, तिथपर्यंत तो ताणला जातो. मग तिथे आत घुसण्याची सुरुवात झाली की मग इथून बाहेर पडू लागतो. उदाहरणार्थ साप बिळातून बाहेर पडत असतो, तेव्हा त्याचा एक भाग बाहेर असतो आणि दुसरा भाग आत असतो, तशी ही गोष्ट आहे.

**प्रश्नकर्ता :** पण शरीर कापले, छेदले तरी पण आत्मा दिसत नाही.

**दादाश्री :** आत्मा दिसेल असा नाहीच. पण शरीर कापले तर आत्मा निघून जातो ना? माणूस मरतो, तेव्हा कोण निघून जातो?

**प्रश्नकर्ता :** आत्मा निघून जातो.

**दादाश्री :** हो, निघून जातो, तरी पण तो दिसेल असा नाही. पण असतो मात्र नक्की. तो प्रकाश आहे. उजेडाच्या रूपात आहे. हा सर्व त्याचाच उजेड आहे. तो नसेल तर सर्व काही संपेल. तो निघून गेल्यानंतर तुम्ही पाहिले आहे ना? तिरडी पाहिली आहे ना? त्यात काही उजेड असतो का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** तर त्यातून आत्मा निघून गेला आहे. म्हणजेच आत्मा स्वत: ज्योतीस्वरूप आहे.

## मृत्यूनंतर पुनःप्रवेश शक्य आहे का?

**प्रश्नकर्ता :** हृदय धडधडणे थांबले तर आपण म्हणतो की मृत्यू झाला.

**दादाश्री :** हो आणि डॉक्टर पण म्हणतात, 'हे भाऊसाहेब गेले!' जोपर्यंत हृदय धडधडत असते तोपर्यंत नाडी चालते आणि नाडी चालत नसेल तर डॉक्टर आपल्याला सांगतात की, 'गेले'.

**प्रश्नकर्ता :** कित्येकदा अशा घटना वाचण्यात आल्या आहेत की एखादा मरण पावलेला माणूस परत जिवंत झाला. या प्रक्रियेला काय समजावे? शरीरात जीव परत आला? की आत्म्याने शरीरात परत प्रवेश केला?

**दादाश्री :** तुमचे म्हणणे बरोबर आहे, अपवादात्मक परिस्थितीत नाडी परत चालू होते. तेव्हा डॉक्टरांच्या मनात असे येते ह्याच्यात पुन्हा जीव आला. पण काही परिस्थितीतच असे घडते. तेव्हा तो जीव टाळूत चढून बसतो. हृदय जरी बंद पडले असेल, पण जीव इथे टाळूत चढलेला असतो. तो जीव जेव्हा टाळूतून परत खाली येतो, तेव्हा हृदय परत धडधडू लागते, असे घडत असते. तेव्हा मग डॉक्टर देखील विचारात पडतात. पण तो नवीन जीव येत नाही. या देहात परत जीव येत नाही किंवा शरीरात दुसरा आत्मा प्रवेश करत नाही. आहे तोच आत्मा अजून पूर्णपणे बाहेर गेलेला नसतो. तो हृदयापासून वरपर्यंत, इथपर्यंतच्या भागातून निघून गेलेला असतो आणि वर चढलेला असतो. इथे टाळूमध्ये ब्रह्मरंध्र आहे, त्याला दशम स्थान म्हणतात, तिथे तो चढून बसतो. म्हणजेच शरीरात जर अजून जीव शिल्लक असेल तर असे होऊ शकते. असे क्वचितच होत असते, वारंवार होत नाही, अपवादरूपाने होते. कोणाला साप चावला असेल, किंवा एकदम पाण्यात पडला असेल तर अशा वेळी त्याचा जीव ब्रह्मरंध्रात चढून जातो. तर तेव्हा तिथून खाली उतरवणे कठीण होते. या काळात तसे उतरवता येत नाही. सहजपणे आपलाआपण उतरला तर ठीक आहे. तेव्हा मग असे वाटते की प्रेतात जीव परत आला. एरवी असे होत नाही.

## मृत्यू म्हणजे काय? मृत्यूनंतर काय?

**प्रश्नकर्ता :** मृत्यू काय आहे?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की हा शर्ट शिवला, म्हणजे शर्टाचा जन्म झाला, आणि ज्याचा जन्म झाला त्याचा मृत्यू झाल्याशिवाय राहत नाही. कोणत्याही वस्तूने जन्म घेतला तर तिचा निश्चितपणे मृत्यू होतो. पण आत्मा अजन्म-अमर आहे, त्याचा मृत्यू होतच नाही. जेवढ्या वस्तूंचा जन्म होतो, त्यांचा मृत्यू अवश्य होतो. आणि मृत्यू आहे तर जन्म असणारच. म्हणजेच जन्माबरोबरच मृत्यू जोडलेला आहे. जिथे जन्म आहे, तिथे निश्चितपणे मृत्यू आहे.

**प्रश्नकर्ता :** पण वस्तुस्थितीमध्ये मृत्यू म्हणजे काय आहे?

**दादाश्री :** रात्री तुम्ही झोपता, मग तेव्हा कुठे जाता? सकाळी तुम्ही कुठून येता?

**प्रश्नकर्ता :** असे काही माहीत नाही.

**दादाश्री :** याच प्रकारे जन्म-मरण आहे. मधल्या काळात तो झोपतो, मग जन्म झाल्यानंतर पुन्हा जागा होतो. मृत्यूपासून जन्म होईपर्यंत, मधल्या काळात तो झोपतो. 'स्वत:' शाश्वत आहे. म्हणून जन्म-मरण 'स्वत:'चे तर होतच नाही! हे जन्म-मरण अवस्थांमुळे आहे. माणूस आहे तोच असतो. पण त्याच्या तीन अवस्था होतात, होतात की नाही? लहानपणाची बाल्यावस्था, मग तारुण्यावस्था आणि मग वृद्धावस्था होत नाहीत का? ह्या सर्व अवस्था आहेत, पण स्वत: तर एकच आहे ना? शिवाय या अवस्था शरीराच्या आहेत. त्याचप्रमाणे जन्म-मरण देखील शरीराचे आहे. आत्म्याला जन्म-मरण नसते. तुमचे 'स्वत:'चे, 'सेल्फ'चे जन्म-मरण नसते.

**प्रश्नकर्ता :** मग मृत्यू का येतो?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की जेव्हा जन्म होतो, तेव्हापासूनच या ज्या मन-वचन-कायेच्या तीन 'बॅटऱ्या' असतात, त्या गर्भापासून

'इफेक्ट' (परिणाम) देत असतात. तो 'इफेक्ट' जेव्हा संपतो, त्या 'बॅटऱ्यांचा' हिशोब संपतो, तोपर्यंत त्या 'बॅटऱ्या' चालू असतात. आणि मग जेव्हा त्या बॅटऱ्या संपतात, तेव्हा त्याला मृत्यू म्हणतात. पण तेव्हा परत पुढच्या जन्मासाठी नवीन बॅटऱ्या आतमध्ये चार्ज होतच असतात. आणि जुन्या बॅटऱ्या डिस्चार्ज होत राहतात. म्हणजे असे चार्ज-डिस्चार्ज होतच राहते. कारण त्याची 'रॉंग बिलीफ' आहे. म्हणून 'कॉजेस्' (कारणे) उत्पन्न होतात. जोपर्यंत 'रॉंग बिलीफ' आहेत. तोपर्यंत राग-द्वेष असतात आणि म्हणून 'कॉजेस्' उत्पन्न होतात. आणि जर ही 'रॉंग बिलीफ' बदलली आणि त्या ठिकाणी 'राईट बिलीफ' पक्की बसली तर मग राग-द्वेष आणि 'कॉजेस्' उत्पन्न होत नाहीत.

**प्रश्नकर्ता :** जेव्हा शरीराचा नाश होतो तेव्हा आत्मा कुठे जातो?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की आत्मा 'इटर्नल' (शाश्वत) आहे, 'पर्मनन्ट' आहे, कायमचा आहे. त्याला कुठेच जायचे यायचे नसते. आणि जेव्हा हे शरीर संपते, तेव्हा आत्म्याने कुठे जायचे हे त्याच्या पण अधिकारात (ताब्यात) नसते. ते सुद्धा 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्'च्या ताब्यात असते. म्हणजेच जिथे 'एव्हिडेन्सेस' घेऊन जातील तिथे त्याला जावे लागते. यात 'पर्मनन्ट' वस्तू फक्त आत्माच आहे, आणि बाकी सर्व 'टेम्परिरी' आहे. मन-बुद्धी-चित्त-अहंकार सर्व 'टेम्परिरी' आहेत. आणि आत्मा तर असा आहे की तो या शरीरापासून बिलकुल वेगळा आहे. जसे हे कपडे आणि माझा देह वेगळे आहेत ना? अगदी तसेच देह आणि आत्मा वेगळेच आहेत, एकदम वेगळे.

## निसर्गाच्या कितीतरी 'ॲडजस्टमेंटस्'

**प्रश्नकर्ता :** मृत्यूच्या वेळी जेव्हा आत्मा एक शरीर सोडतो आणि दुसऱ्या शरीरात जातो, त्या मधील काळात तो किती वेळ राहतो आणि कशा प्रकारे राहतो? दुसऱ्या शरीरात जायला प्रत्येक जीवाला किती वेळ लागतो?

**दादाश्री :** त्याला काहीच वेळ लागत नाही. या शरीरात पण

असतो आणि त्याच वेळी दुसऱ्या योनीत प्रवेश करणे सुरू होते. मरणारा इथे बडोद्याला असतो आणि योनी तिथे दिल्लीत असते, तर तेव्हा एकाच वेळी त्या योनीत पण असतो आणि ह्या शरीरात पण असतो. म्हणजे याला काहीच वेळ लागत नाही. देहाशिवाय आत्मा थोडावेळ देखील राहू शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे हा देह सोडण्यात आणि दुसरा देह ग्रहण करण्यात, या दोन गोष्टीत किती वेळ लागतो ?

**दादाश्री :** अजिबात वेळ लागत नाही. इथे या देहातून निघत असतो आणि त्याचवेळी दुसऱ्या योनीत पण हजर असतो कारण ती वेळ वीर्य आणि रज यांचा संयोग व्हायची वेळ असते. इथे शरीर सुटणार असते, तेव्हाच तिथे संयोग होणार असतो, हे सर्व जुळून येते तेव्हाच तो इथून जातो. नाहीतर तो इथून जाणारच नाही, कारण जर इथून गेला तर मग तो तिथे खाणार काय? त्या योनीत गेला पण तिथे खाणार काय? पुरुषाचे वीर्य आणि आईचे रज, हे दोन्हीही तिथे असतात, आणि तिथे जाताच भुके पोटी तो ते सारे खातो, आणि खाल्ल्यावर मग पिंड (शरीर) बनते. सांगा आता, हे सर्व 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सस्' आहेत की नाही ?

म्हणजे इथून निघायला वेळच लागत नाही. आणि तिथे असे टाइमिंग सेट झालेले नसेल तर तोपर्यंत या देहात उं..उं..उं.. करत राहतो. 'का निघत नाही ? लवकर जा ना' असे म्हटले तर म्हणेल 'नाही, अजून तिकडे तयारी झालेली नाही!' शेवटच्या घटिकांत असे उं..उं..उं.. करतात ना ? मग तिथे 'ॲडजस्टमेंट' पूर्ण झाली की मगच तो इथून निघतो. पण जेव्हा निघतो, तेव्हा तिथे सर्व काही पद्धतशीरच असते.

## जीवनाच्या सारानुसार गती

**प्रश्नकर्ता :** मरण्यापूर्वी जशी वासना असेल, त्या रूपात जन्म होतो ना ?

**दादाश्री :** हो, वासनेनुसार. लोक म्हणतात ना की मरण्यापूर्वी

अशी वासना होती, पण ती वासना ठरवून आणता येत नाही. ती सर्व तर आयुष्याचे सार असते. सर्व आयुष्यभर तुम्ही जे केले, त्यानुसार मृत्यूच्या वेळी शेवटच्या तासात त्याचे सार येते. आणि त्या सारानुसार त्याला गती मिळते.

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर सगळेच काही मनुष्य रूपात जन्म घेत नाहीत. काहींना कुत्रा किंवा गाय पण व्हावे लागते?

**दादाश्री :** हो, त्याच्या मागे 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस' आहेत, सर्व वैज्ञानिक कारणे एकत्र येतात. यात याचा कोणी कर्ता नाही. 'भगवंतांनी' पण ते केले नाही किंवा 'तुम्ही'ही केले नाही. 'तुम्ही' फक्त मानता की 'मी हे केले' आहे, म्हणून पुढील जन्म उत्पन्न होतो. जेव्हा 'मी करतो' ही 'तुमची' मान्यता संपेल, 'मी करत आहे' ही 'रॉंग बिलीफ', हे भान जेव्हा नष्ट होईल आणि 'सेल्फ'चे रिअलायझेशन' (आत्म साक्षात्कार) होईल तेव्हा तुम्ही 'कर्ता' राहणारच नाही.

**प्रश्नकर्ता :** पण ते 'रिअलायझ' करण्यासाठी हे सर्व सोडून हिमालयात जायचे का?

**दादाश्री :** नाही, हिमालयात जायची गरज नाही. आम्ही तुम्हाला एका तासात 'सेल्फ रिअलायझेशन' करून देऊ. असे साधू बनून हिमालयात जायची गरज नाही. इथेच निवांत खा-प्या, मौज-मजा करा आणि 'सेल्फ'चे 'रिअलायझेशन' पण राहील!

**प्रश्नकर्ता :** पण असे म्हणतात ना की आत्मा प्रत्येक वेळी मनुष्यदेहच धारण करतो.

**दादाश्री :** नाही, नाही, नाही. काही लोकांनी असे म्हटले आहे की माणसामधून परत माणूसच बनतो. लोकांनी असे आश्वासन दिले आहे की जसा गव्हातून गहू बनतो तसाच माणसांतून माणूस बनतो. म्हणून मग लोकांना वाटते की मग ठीक आहे, काही झाले तरी परत माणूसच बनणार आहोत. मग काही हरकत नाही! म्हणून आता खुशाल

पाहिजे तेवढी लाच घ्या, जेवढ्या चोऱ्या करायच्या असेल तेवढ्या करा. पण खरे तर असे नसते.

इथे तर असा नियमच आहे की ज्याने बिन हक्काचे घेतले असेल तो दोन पायातून चार पायात (जनावरात) जाईल. पण तेही कायमचे नाही. जास्तीत जास्त दोनशे वर्षे, फार फार तर सात-आठ जन्म पशुयोनीत जाईल आणि कमीतकमी तर पाचच मिनिटात जनावरातून परत माणसात येईल. कित्येक जीव असे आहेत की ते एका मिनिटात सतरा जन्म घेतात, म्हणजे असे पण जीव आहेत. म्हणजेच जे पशुयोनीत गेले त्या सगळ्यांनाच शंभर-दोनशे वर्षाचे आयुष्य मिळणार नाही.

**प्रश्नकर्ता :** मनुष्यगतीचे जीव हे 'कारण शरीर' आणि कषाय सोबत घेऊन जातात. पण खालच्या गतीचे जीव काय घेऊन येतात?

**दादाश्री :** त्याचे काय आहे, ते 'ओझे' उतरवण्यासाठी जातात. जे 'ओझे' गोळा केले होते, जे उधार घेतले होते, ते उधार चुकविण्यासाठी तिथे जावे लागते. किंवा कोणाकडून घ्यायचे असेल तर घ्यायला जातात. 'क्रेडिट' केले असेल तर देवगतीत जावे लागते किंवा येथे माणसात 'राजा' व्हावे लागते. आणि 'डेबिट' (उधारी) केले असेल तर बैल बनून चुकवावे लागते. म्हैस बनून चुकवावे लागते, कुत्रा बनून चुकवावे लागते. आणि जर काही लोकांची उधारी जर एका जन्मात संपली नाही, तर परत गाढवाचा जन्म मिळतो. तरी पण शिल्लक असेल तर कोल्ह्याचा जन्म मिळतो. पण असे जास्तीत जास्त आठ जन्मच मिळतात, नववा जन्म येत नाही. आठ जन्मात त्याची उधारी पूर्ण होते, आणि त्यानंतर त्याला परत मनुष्य जन्म मिळतो.

माणूस मृत्यू पावल्यावर त्याला घेऊन जाणाऱ्या लोकांमध्ये अशी चार-पाच निष्पक्षपाती माणसे असतात. त्यांचे बोलणे ऐका. पक्षपाती, म्हणजे त्याच्या घरची माणसेही पक्षपातीच असतात. आणि काही जण त्याच्या विरोधी असतात त्यांनाही पक्षपातीच म्हणतात. विरोधी लोक विरोधपूर्वकच बोलतात आणि घरचे लोक सर्व चांगलेच बोलत राहतात.

आणि जे निष्पक्षपाती लोक असतात ते म्हणतात, 'हा तर देवमाणूस होता.' असे (निष्पक्षपाती) लोक त्याची गती सांगतात. आणि काही जणांसाठी तर लोक असे म्हणतात की 'अरे, हा तर राक्षसासारखाच होता.' म्हणजे लोक जसे अभिप्राय व्यक्त करतात, तीच त्याच्या गतीची निशाणी आहे.

## मोक्षाची गरज कुणाला आहे? तर...

**प्रश्नकर्ता :** माणसाला मृत्यू पावल्यावर जर लगेच दुसरा देह मिळत असेल, तर मग मोक्ष मिळावा म्हणून लोक प्रयत्न का करतात?

**दादाश्री :** ज्याला या संसारात चिंता वाटते, आणि ती चिंता त्याला आवडत नसेल, सहन होत नसेल, त्याला मोक्षाची गरज आहे. परंतु ज्याला ही चिंता आवडते, त्याला तर मोक्षाची गरजच नाही ना! फॉरेनच्या लोकांना चिंता सहन होते, त्यांना मोक्षाची गरजच नसते. आपल्याकडील काही जणांना चिंता सहन होते, त्यांनाही मोक्षाची गरज नाही. ज्यांना चिंता सहन होत नाही, ज्यांना संसार सोडून पळून जावेसे वाटते, त्यांना मोक्षाची गरज आहे.

## असे आहेत निसर्गाचे नियम

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर प्रत्येक जीवाचा जन्म होतो का?

**दादाश्री :** कोणत्याही जीवाचा मृत्यूनंतर जन्म होतोच. मृत्यूनंतर कोणी क्वचितच जे 'ज्ञानी पुरुष' असतात, आणि ज्यांच्या प्रवृत्तीत पण निवृत्ती असते, त्यांच्यासाठी मुक्ती आहे.

**प्रश्नकर्ता :** मुक्तीनंतर जन्म असतो ना?

**दादाश्री :** नाही. मुक्तीनंतर जन्म नाही.

**प्रश्नकर्ता :** आणि मृत्यूनंतर?

**दादाश्री :** मृत्यूनंतर प्रत्येक जीवाचा निश्चितपणे जन्म होतो.

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर तोच जीव जन्माला येतो की कोणी दुसरा येतो?

**दादाश्री :** तोच जीव परत जन्माला येतो.

**प्रश्नकर्ता :** तर मग लोकसंख्या वाढत का आहे?

**दादाश्री :** ती तर वाढते, नंतर परत कमी पण होते. कमी-जास्त होणे हा तर त्याचा नियमच आहे. ही दुनिया अशी आहे की वर्धमान-ह्ीयमान, वर्धमान-ह्ीयमान (वाढणे-कमी) होणे हे चालूच असते! आता परत लोकसंख्या कमीही होईल.

**प्रश्नकर्ता :** ते जीव परत जगतील ना?

**दादाश्री :** ते जीव जगल्यानंतर परत मरणार थोडेच आहेत? ते सर्व पशुयोनीत गेले आहेत. होते तिथेच परत गेले आहेत. जिथून आले होते तिथेच परत गेले.

मृत्यूनंतर आत्मा, जर कोणी देवगतीत जाणारा असेल तर देवगतीत जातो, कोणी नरकगतीत जाणारा असेल तर नरकगतीत जातो, कोणी पशुयोनीत जातो, आणि जो मनुष्ययोनीत जाणारा असेल तो मनुष्यगतीत जातो. आणि इतर असे काही जीव की ज्यांना शरीर मिळणार नसते आणि म्हणून कोणाला दोन वर्षे, कोणाला तीन वर्षे, अशी शिक्षा मिळणार असेल, असे ज्यांचे उदयकर्म असेल तर ते प्रेतयोनीत राहतात.

म्हणजे मृत्यू तर, जसे हे कपडे बदलतो तसेच आहे. जे जे 'फिजिकल' आहे, ते सर्व संपते किंवा सर्व काही इथेच पडून राहते, आणि आत्म्याला दुसरी योनी मिळते.

**प्रश्नकर्ता :** मेल्यानंतर आत्मा दुसरीकडे गेला हे कशा प्रकारे सिद्ध करू शकतो? त्याचा काय पुरावा आहे का?

**दादाश्री :** पुनर्जन्माचा?

**प्रश्नकर्ता :** हो. आणि तोही माणसांना पटेल असा.

**दादाश्री :** हो, पुनर्जन्म मान्य होईल असा पुरावा मी तुम्हाला

देईन. पुरावा जरा लांबलचक आहे ना! आत्मा परत जन्म घेतो याचा पुरावा तर लोक मागतीलच ना!

## पुनर्जन्माची 'प्रोसेस' कधीपर्यंत?

**प्रश्नकर्ता :** पुनर्जन्म कोण घेतो? जीव घेतो की आत्मा घेतो?

**दादाश्री :** नाही. कोणाला घ्यावा लागतच नाही, तो (आपोआपच) होतो. हे सर्व जगच 'इट हॅपन्स्' (ते घडते) या प्रकारचे आहे.

**प्रश्नकर्ता :** पण तो कोणाद्वारे होतो? जीवाद्वारे की आत्म्याद्वारे?

**दादाश्री :** नाही, आत्म्याचे यात काहीही देणेघेणे नाही. सगळे काही जीवाद्वारेच आहे. ज्याला भौतिक सुख हवे आहे, त्याला योनीत प्रवेश करण्याचा 'राईट' (अधिकार) आहे. आणि ज्याला भौतिक सुख नको आहे त्याचा योनीत प्रवेश करण्याचा 'राईट' संपतो.

त्याचे असे आहे की, जर तुम्ही साखर कारखाना पाहाल, तर तिथे एका टोकाला ऊस खरेदी केला जातो आणि दुसऱ्या टोकाला साखरेची पोती बनवून स्टॉकमध्ये (गोदामात) ठेवली जातात. तर मधल्या काळात काय काय प्रक्रिया होतात, त्या तुम्हाला माहीत आहेत का? या बाजूला ऊस घेतात, मग तो कापतात, मग तो पिळला जातो, म्हणजे 'दुसऱ्या जन्मात' पिळलेले असते. नंतर परत तिथून 'तिसऱ्या जन्मात' जातो, 'चौथ्या जन्मात' जातो, असे करत करत साखर बनते. एकाच 'स्टेज'मध्ये, एकाच जन्मात साखर बनत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्ट, तिची डेव्हलपमेंट (प्रगती)होत होत, शेवटच्या स्थितीपर्यंत जाते. आत्मा तर पूर्णपणे डेव्हलपच (प्रगतच) आहे. पण हा जो बाहेरचा भाग आहे, कपड्याचा भाग आहे, तो पण डेव्हलप व्हायला हवा. फॉरेनचे लोक कमी डेव्हलप आहेत, त्यामुळे त्यांना अजून पुनर्जन्माबद्दल समजत नाही. आपल्या येथील लोक डेव्हलप आहेत, म्हणून त्यांना पुनर्जन्म समजो वा न समजो, पण त्यांची तशी मान्यता तर असतेच. लहान मुलगा देखील म्हणतो की पुढच्या जन्मी असे होईल. म्हणजे समजत असेल किंवा नसेल ही वेगळी गोष्ट आहे, पण (येथील लोक) पुनर्जन्म नक्कीच मानतात.

## ...तोच तोच चक्र

**प्रश्नकर्ता :** माणसाच्या प्रत्येक जन्माचा त्याच्या पूर्वजन्माशी संबंध आहे का?

**दादाश्री :** तसा तर प्रत्येक जन्म पूर्वजन्मच असतो. म्हणजेच प्रत्येक जन्माचा संबंध पूर्वजन्माशीच असतो.

**प्रश्नकर्ता :** परंतु पूर्वजन्माशी या जन्माचे काय देणेघेणे?

**दादाश्री :** अरे, पुढच्या जन्मासाठी हा जन्म पूर्वजन्म आहे. मागचा जन्म तो पूर्वजन्म होता, त्यातूनच हा जन्म आहे. आणि आजचा जो जन्म आहे, तो पुढच्या जन्मासाठी पूर्वजन्म म्हटला जाईल.

**प्रश्नकर्ता :** हो, ही गोष्ट खरी आहे. पण पूर्वजन्मात असे काही घडते का, की ज्याचा या जन्माशी काही संबंध असेल?

**दादाश्री :** खूपच संबंध आहे! पूर्वजन्मात 'बी' पडते आणि पुढच्या जन्मात त्यातून कणीस येते. मग 'बी' आणि कणीस यात फरक नाही का? संबंध आहे की नाही? आपण बाजरीचा दाणा पेरतो तो पूर्वजन्म, आणि कणीस येते तो हा जन्म, परत या कणीसातून बीच्या रूपात दाणा पडला तो पूर्वजन्म आणि त्यातून हे फळ आले तो हा नवीन जन्म. समजले की नाही?

**प्रश्नकर्ता :** एक माणूस रस्त्यावरून जात आहे, दुसरीही खूप माणसे त्या रस्त्यावरून जात आहेत, पण एखादा साप, विशिष्ट माणसासाठीच त्रासदायक बनतो. त्याचे कारण पुनर्जन्मच आहे ना?

**दादाश्री :** हो, आम्ही हेच सांगू इच्छितो की पुनर्जन्म आहे, म्हणूनच तो साप तुम्हाला डसतो. पुनर्जन्म नसता तर साप तुम्हाला चावला नसता. पुनर्जन्म आहे, तो तुमचे हिशोब तुमच्याकडून चुकते करून घेत असतो. हे सर्व हिशोबच चुकते होत आहेत. जसे वहीखात्यातील हिशोब चुकवले जातात ना, त्याचप्रमाणे हे सर्व हिशोब चुकते केले जातात. आणि डेव्हलपमेंटमुळे आपल्याला हे सर्व हिशोब

आहेत असे समजते सुद्धा. म्हणून आपल्याकडे काही जणांनी 'पुनर्जन्म' आहे, हे मान्यही केले आहे! पण ते पुनर्जन्म 'आहेच' असे बोलू शकत नाहीत. पुनर्जन्म 'आहेच' याचा पुरावा देऊ शकत नाहीत. पण अशी अनेक उदाहरणे बघून पुनर्जन्म आहे यावर त्यांची श्रद्धा मात्र बसली आहे.

ह्या ताई म्हणतात, ह्यांना चांगली सासू मिळाली आणि मला अशी सासू का मिळाली? म्हणजे वेगवेगळ्या प्रकाराचे संयोग मिळतात.

## 'योजना' तयार झाली, तेच मूळ कर्म

**प्रश्नकर्ता :** कर्मांचे चांगले किंवा वाईट फळ या जन्मात मिळते की पुढील जन्मात मिळते?

**दादाश्री :** जी कर्मे केली जातात, ती योजनेच्या रूपात असतात. उदा. सरकार इथे योजना बनवते, नर्मदा नदीवर धरण बांधण्याची योजना केली जाते. तर काय त्या योजनेमुळे आताच इथे पाणी थांबेल? नाही. ती योजना जेव्हा साकार होईल, धरण बांधून तयार होईल तेव्हा पाणी थांबेल. बाकी योजनेत, नकाशावर तर सर्व पूर्ण असते, धरण पण असते, पण ते फक्त नकाशावर. त्याचप्रमाणे ही सर्व कर्मे योजनेच्या रूपात असतात, त्यांना 'कॉजेस्' (कारणे) म्हणतात. आणि नंतर जेव्हा तीच 'कॉजेस्' रूपकात (प्रत्यक्षात) येतील तेव्हा त्यांना 'इफेक्ट' (परिणाम) म्हणतात. पण ते पुढच्या जन्मात रूपकात येतात. म्हणजेच मागच्या जन्माची कर्मे तुम्ही या जन्मात भोगत आहात, आणि या जन्मातील कर्मे तर तुम्ही पुढच्या जन्मात भोगाल. पण योजनेच्या रूपात केलेली कर्मे पुढच्या जन्मात भोगली जातात.

आता तुमची इच्छा नसते, तरी पण कर्मे होतात, असे घडते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, घडते.

**दादाश्री :** त्याचे कारण काय? तर ते योजनेच्या रूपात (मागील जन्मी) तयार झालेले आहे. तेच आज रूपकामध्ये आलेले आहे, म्हणजेच

ते जर आजच करत असता तर ते बदलता आले असते. पण ते बदलता येत नाही, असे होते ना? असे पाहिले आहे ना?

## आयोजन मागील जन्मात, रूपक या जन्मी

**प्रश्नकर्ता :** तर मग नशीब अशी काही गोष्ट आहे का?

**दादाश्री :** नशीब म्हणजेच प्रारब्ध, पूर्वजन्माचा आणलेला माल, त्याचाच आता उपयोग होत आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग मागील जन्मात केलेल्या पापांची फळे या जन्मात मिळतात की मागील जन्मातच मिळून गेली?

**दादाश्री :** नाही, मागील जन्मातील पापांची फळे या जन्मातच मिळतात. त्याचे काय आहे की मागील जन्मात जी पापे घडली, ती आयोजनेच्या रूपात झाली होती. उदाहरणार्थ आपल्याकडे नर्मदा नदीवर धरण बांधायचे असेल तर प्रथम काय करतात? प्रथम नकाशा तयार करतात ना? त्याच प्रकारे (कर्मे) प्रथम आयोजनेच्या रूपात तयार झालेली असतात, ती नंतर आता रूपकात येतात. या नर्मदेच्या धरणाची योजना तिथे होते, मग नकाशा बनतो. त्यावेळी जर त्या नकाशात धरण फुटले तर सर्व पाणी वाहून जाते का? नाही. म्हणजे नकाशात फेरबदल करू शकतो पण नंतर काही बदलता येत नाही. म्हणजे मागील जन्मात जेव्हा आयोजन झाले होते तेव्हा बदल करणे शक्य होते, पण आता या जन्मात त्यात बदल कसा करता येईल? म्हणजेच जर आपण या जन्मात काही बदल केले तर पुढच्या जन्मात बदल होईल. नाहीतर मग पुढच्या जन्मासाठी शिक्कामोर्तब झाले, याला विधिलिखित म्हणतात, नंतर तो बदलत नाही.

**प्रश्नकर्ता :** मागील जन्मातच जर आयोजन होऊन गेले आहे तर मग या जन्माचे आयोजन मी कधी करेन?

**दादाश्री :** प्रत्येक जन्मात आतमध्ये आयोजन होतच असते. आयोजनाशिवाय पुढे काहीच होत नाही.

**प्रश्नकर्ता :** या जन्मात सर्व गोष्टी पूर्वजन्मातील आयोजनाप्रमाणे घडत आहेत, तर पुढच्या जन्माचे आयोजन मी करू तरी कसे?

**दादाश्री :** आयोजन कशा प्रकारे होते ते मी तुम्हाला सांगतो. आणि या जन्मात काहीच आयोजन झाले नाही तर मग मोक्ष मिळेल.

आता आयोजन म्हणजे 'चार्ज' होणे. आणि हे जुने 'डिस्चार्ज' होत असतानाच आत परत नवीन 'चार्ज' होत असते. तर हे चार्ज कसे होते? आयोजन कसे होते? समजा आता कोणी म्हणाले की 'मी या या ठिकाणी वीस हजार रुपये दान केले आहेत.' त्यांना जर विचारले की 'शेठजी, तुम्ही तर कधी कोणाला वीस हजार रुपये देत नाही, तर इथे तुम्ही कसे काय दिले.' तेव्हा ते सांगतात, 'अहो, मी अमक्या भाऊंच्या दबावामुळे दिले.' म्हणजे वीस हजार रुपये तर दिले, पण आयोजन उलट झाले. आणि जर उच्च भावाने दिले असते तर आयोजनात परत तसेच्या तसे बी पडले असते आणि उत्तम फळ मिळाले असते.

आता एखाद्या व्यक्तीने हिंसा केली आणि नंतर त्याच्या मनात असे आले की हे चुकीचे होत आहे, त्याने जर पश्चात्ताप केला तर तशा प्रकारे आयोजन होते. तू खोटे बोललास आणि मनात जर हे चुकीचे आहे, असा भाव असेल तर तसे आयोजन होईल.

जन्म-मरणाचे कारण एकच आहे की 'मी कोण आहे?' याचे भान नसणे. फक्त एवढे एकच कारण आहे. जैन म्हणतात की राग-द्वेष आणि अज्ञानामुळे बंधनात आहे. आणि वेद म्हणतात की मळ, विक्षेप आणि अज्ञानामुळे बंधनात आहे. दोन्हीही अज्ञानाला स्वीकारतात. म्हणजेच अज्ञानामुळे बांधलेला आहे आणि ज्ञानामुळे सुटेल. स्वतःला स्वतःचे ज्ञान झाले, भान झाले, की सुटेल.

## ...आणि विधेयके शिल्लक राहतात

इथे जेवढे आरोपित भाव केले, ते सर्व संसारीभाव आहेत. आणि

या संसारीभावांमुळे इतर सर्व 'पार्लमेंटरी' 'मेम्बर्स' एकत्र येतात. आणि हे सर्व 'मेम्बर्स' एकत्र येऊन मग 'डिसिझन' (निर्णय) घेतात त्यातून ही कार्य-'बॉडी' बनते. मग 'इफेक्ट' आणि 'कॉजेस्', 'कॉजेस् आणि इफेक्ट', 'इफेक्ट आणि कॉजेस्', 'कॉजेस् आणि इफेक्ट' असे चालत राहते!

चंदुलाल हे नाव आहे ना, तर ते नाव 'इफेक्टिव' आहे की नाही? कोणी म्हटले की, 'अमके, सिनेमावाले चंदुलाल वाईट आहेत!' एवढेच जरी कोणी म्हटले की तुमच्यावर 'इफेक्ट' होतो. हे शरीर 'इफेक्टिव' आहे की नाही? ही वाणी पण 'इफेक्टिव' आहे. तुमच्या वाणीने कोणावर तरी 'इफेक्ट' होतो. म्हणजे ही वाणी पण 'इफेक्टिव' आहे. आणि मन पण 'इफेक्टिव' आहे. मन चंचल झाले तर झोपूही देत नाही. रात्री साडे दहा वाजता गादी घालतात, 'चंदुलाल झोपा आता', असे सगळे जण म्हणतात, मग चंदुलाल झोपतात. आणि नंतर आठवण येते की अमक्या अमक्याला मी पंचवीस हजार रुपये दिले आहेत, पण त्याच्याकडून तसा कागद लिहून घेतला नाही. ही आठवण आल्याबरोबर मन चंचल होते आणि मग ते झोपूच देत नाही. म्हणजे मन पण 'इफेक्टिव' आहे ना?

म्हणजेच हे मन-वचन-काया सर्वच 'इफेक्टिव' आहे. यातून 'कॉजेस्' उत्पन्न होतात. यात राग-द्वेष झाल्यामुळे 'कॉजेस्' निर्माण होतात. हो 'कॉजेल बॉडी' मग पुढील जन्मी 'इफेक्टिव बॉडी' बनते. ही जी कॉजेल बॉडी आहे ना, तिला कारण शरीर म्हणतात, त्यातून कार्य शरीर बनते.

म्हणजे कारण शरीर बनल्यानंतर 'पार्लमेंटरी' पद्धतीनुसार सर्व काही मिळते. आणि 'पार्लमेंटरी' पद्धती बनल्यानंतर फक्त विधेयकेच राहतात. पण 'पार्लमेंटचे' सर्व सदस्य निघून जातात. मग एक-एक विधेयक पास होत जाते, योजना केली गेलेली सर्व विधेयके पास होतात आणि ती मग प्रत्यक्षात येतात. काहीतरी समजण्यासारखे तर असेल ना? काहीतरी समजून तर घ्यावे लागेल ना?

## आत्म्याबरोबर...

**प्रश्नकर्ता :** माझा पुनर्जन्म होणार असेल तर माझा आत्मा सोबतच जाईल ना?

**दादाश्री :** सोबतच जाणार ना! इथून जेव्हा आत्मा निघतो तेव्हा कषाय या शरीरातून, जे काही असेल ते सर्व अगदी झाडून-पुसून बाहेर निघतात. कारण स्वत:ची जी 'रॉंग बिलीफ' आहे ना, की 'हा मी आहे', म्हणजे 'मी आहे', असे झाले तिथे सगळे काही 'माझे' झाले आणि माझे आहे असे झाले म्हणून मग हे क्रोध-मान-माया-लोभ उत्पन्न होतात. आत्मा निघाल्यानंतर हे क्रोध-मान-माया-लोभ सर्व झाडून-पुसून बाहेर पडतात. तेही नंतर लगेच शरीरात काहीही शिल्लक राहणार नाही अशा प्रकारे सर्व काही झाडून-पुसून बाहेर पडतात, कषाय असे असतात.

आता, आत्म्याबरोबर दुसरे काय काय जाते? 'कारण शरीर', म्हणजेच 'कॉजल बॉडी' आणि 'सूक्ष्म शरीर', त्याला 'इलेक्ट्रिकल बॉडी' म्हणतात, ती जाते. जोपर्यंत हे स्थूल शरीर आहे, जोपर्यंत संसारी आहे, तोपर्यंत प्रत्येकाच्या शरीरात 'इलेक्ट्रिकल बॉडी' असते. आणि जेव्हा मोक्षाला जातो तेव्हा 'इलेक्ट्रिकल बॉडी' सुटते आणि फक्त आत्मस्वरूपच जाते.

## इथे तर एक अवताराची गॅरंटी

**प्रश्नकर्ता :** आत्मस्वरूपाचे दर्शन झाल्यावर जीव सतत आत्मस्वरूपातच राहतो, तर अशी स्थिती प्राप्त झाल्यावर जीवाचा पुनर्जन्म होण्याची शक्यता आहे का?

**दादाश्री :** नाही. तरी पण एक जन्म शिल्लक राहतो. कारण हे 'आमच्या' आज्ञापूर्वक आहे. आज्ञा पाळल्या याला धर्मध्यान म्हणतात. त्याचे फळ भोगण्यासाठी एक जन्म परत घ्यावा लागतो. तसे तर इथूनच मोक्ष झाला आहे असे वाटू लागते. इथेच जर मोक्ष झाला नाही तर काय उपयोग? नाहीतर या कलियुगात तर सर्वच फसवतात. ओळखीच्या माणसाला भाजी आणायला पाठवले तरी तो त्यात 'कमिशन' काढतो,

कलियुगात कसला भरवसा? म्हणजेच गॅरन्टेड असले पाहिजे. आम्ही गॅरन्टेड देतो. मग आमच्या आज्ञा जेवढ्या पाळील, तेवढा त्याला लाभ होईल. तसे तर स्वत:च्या स्वरूपाचे भान तर दिवसभर असतेच, निरंतर असते! ऑफिसात काम करताना सुद्धा असते. जरा चिकट काम असेल तर मग ते काम पूर्ण होताच भान परत येते.

क्रिया जर चिकट असेल, समजा अर्ध्या इंची पाइपच्या नळाखाली हात धरला तर धरता येतो, सटकत नाही पण दीड इंची पाइपच्या नळाखाली हात धरला तर तो लगेच सटकतो. जर अशी जास्त चिकट कर्मे असतील तर ती विचलित करतात. त्यालाही काही हरकत नाही. कारण आपल्याला एका जन्मात हिशोब साफ करायचा आहे ना? हिशोब मिटवल्याखेरीज तर कोणी मोक्षात जाऊ शकत नाही ना!

**प्रश्नकर्ता :** हिशोब साफ केला नाही तर पुनर्जन्म घ्यावा लागेल का?

**दादाश्री :** हो, म्हणूनच तर पुनर्जन्म मिळतो. म्हणून हिशोब पूर्णपणे मिटला पाहिजे. तरच सुटका होईल.

## भ्रांतिमुळेच येते जन्म-मरण

**प्रश्नकर्ता :** म्हणजे दुसरा जन्म व्हायचा असेल तर जो होता तोच आत्मा तिथे जातो, असेच ना?

**दादाश्री :** हो, तोच आत्मा, दुसरा कोणताच नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्म्याचाही जन्म झाला असे म्हणू शकतो ना आपण?

**दादाश्री :** नाही. आत्म्याचा जन्म होतच नाही. जन्म घेणे हा आत्म्याचा स्वभावच नाही. जन्म पण पुद्‌गलाचा होता आणि मृत्यू पण पुद्‌गलाचा होता. पण 'हा मी आहे' अशी त्याची मान्यता आहे म्हणून त्याला सोबत फरफटत जावे लागते. नाहीतर यात फक्त पुद्‌गलाचाच जन्म आणि पुद्‌गलाचेच मरण आहे.

**प्रश्नकर्ता :** पण पुद्‌गलासोबत आत्मा असतो ना?

**दादाश्री :** भ्रांती आहे यामुळे पुद्‌गल सोबत आहे, नाहीतर एकदा ही भ्रांती दूर झाली की पुद्‌गल आणि आत्मा यांचे काहीच देणेघेणे नाही ना! भ्रांती गेल्यानंतर तर जेवढे 'चार्ज' झालेले आहे, तेवढे 'डिस्चार्ज' होऊन जाते म्हणून मग संपून जाते, मग नवीन 'चार्ज' होत नाही.

आता ही जी सर्व कर्मे होत आहेत त्या कर्मांचा 'मी मालक आहे' असे म्हटले, 'मी केले' असे म्हटले, तर नवीन हिशोब बांधला जातो, आणि 'हे व्यवस्थितने केले' आणि 'मी तर शुद्धात्मा आहे' अशी समज आली की मग त्याचे कर्मांशी काहीच देणेघेणे नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग परत जन्म होणारच नाही?

**दादाश्री :** हो, नंतर मग मुक्त होऊन जातो. पण सध्या या काळात संपूर्ण डिस्चार्ज होऊ शकत नाही. कारण धक्का इतका जोरदार आहे की एक-दोन जन्म अजून होतात. कर्ताभाव मिटला की संपले, मग कर्मबंधन होत नाही.

**प्रश्नकर्ता :** पूर्वकर्मांबद्दल आपले विचार जाणायचे आहेत. उदाहरणार्थ ह्या सूक्ष्म जंतूनी अशी काय कर्मे करावी की ती त्यांना पुढील जन्मात उपयोगी पडेल?

**दादाश्री :** माणसांशिवाय इतर सर्व जीव जे कर्म करतात त्याचे त्यांना फळ मिळत नाही. त्या योनीत तर ते कर्मे पूर्ण करून तिथून सुटतात.

**प्रश्नकर्ता :** मग जंतूना दुसरा जन्म कोणता येतो? जंतू मग जंतूच राहणार का?

**दादाश्री :** नाही. जंतूतून दुसरा जन्म होतो, तिसरा जन्म होतो. तो दुसऱ्या योनीत जातो, पण दिवसेंदिवस त्यांची कर्मे सुटत जातात. ते बांधलेली कर्मे भोगतात. नवीन कर्मे बांधू शकत नाही. फक्त ही माणसेच

नवीन कर्मे बांधू शकतात. देवी-देवता पण कर्म भोगतात. देवी-देवता 'क्रेडिट' (पुण्य) भोगतात आणि जनावरे 'डेबिट' (पाप) भोगतात आणि माणसे 'क्रेडिट' आणि 'डेबिट' दोन्ही भोगतात. पण माणसे भोगतातही आणि कर्ता पण असतात, त्यामुळे नवीन कर्मे बांधतात!

**प्रश्नकर्ता :** हे जे शरीर आहे, ते कर्मांचाच परिणाम आहे ना?

**दादाश्री :** हो, कर्मांचाच परिणाम आहे.

**प्रश्नकर्ता :** कर्मांची संपूर्ण *निर्जरा* व्हायला हवी ना?

**दादाश्री :** संपूर्ण *निर्जरा* झाली तर सिद्धक्षेत्रातच जाईल. पण जेव्हा शुद्ध चित्त होईल, तेव्हा कर्मांची *निर्जरा* झाली असे म्हटले जाईल.

## डिस्चार्जच्या वेळी अज्ञानामुळे 'चार्ज'

जसे बॅटरीत सेल असतात ना, ते 'चार्ज' झालेले असतात, त्याचप्रमाणे हे शरीर 'चार्ज' झाले आहे. शरीरात अजिबात चेतन नसते. चेतन तर आतमध्ये आहे. चेतन आत्म्यातच आहे. शरीर तर 'चार्ज' झालेले चेतन आहे!

माणसात झोपण्याचीही शक्ती नाही, जागे होण्याचीही शक्ती नाही, जाण्याचीही शक्ती नाही, येण्याचीही शक्ती नाही, माणसांमध्ये कोणत्याही प्रकारची शक्ती नाही. माणसात फक्त 'चार्ज' करण्याची शक्ती आहे आणि ती देखील स्वतंत्र शक्ती नाही, 'डिस्चार्ज'च्या धक्क्यामुळे चार्ज होत असते. जर 'चार्ज' करण्याची स्वतंत्र शक्ती असती ना, तर कधीच मोक्षाला जाऊ शकला नसता. कारण त्याला मग गुन्हेगार मानले जाते आणि गुन्हेगार झाला तर मोक्षाला जाऊच शकत नाही.

यात तर स्वत:ला असे वाटते की 'मी करत आहे.' पण हे सर्व तर 'डिस्चार्ज'च्या धक्क्यामुळे होत असते, खूप दबाव आला की मग 'चार्ज' होऊन जाते. म्हणजेच मुख्यत्वे अज्ञान हेच बाधक आहे. जर अज्ञान गेले तर मग मुक्ती केवळ हातभर दूर आहे.

## कारणांच्या परिणामस्वरूप परिभ्रमण

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर आत्म्याची स्थिती कशी असते?

**दादाश्री :** आता जशी आहे तशीच स्थिती असते. त्याच्या स्थितीत काहीही फरक पडत नाही. फक्त जेव्हा येथे मृत्यू होतो, तेव्हा तो हा स्थूल देह सोडतो, बाकी काहीही सोडत नाही. इतर संयोग सोबतच घेऊन जातो. इतर कोणते संयोग? तर जी कर्मे बांधली आहेत ती, आणि क्रोध-मान-माया-लोभ आणि सूक्ष्म शरीर, हे सर्व सोबतच जाते. फक्त हा स्थूल देह इथेच पडून राहतो. हे कपडे निरुपयोगी झाले म्हणून सोडून देतो.

**प्रश्नकर्ता :** आणि दुसरा देह धारण करतो?

**दादाश्री :** हो, फक्त दुसरे कपडे बदलतो, इतर काहीही बदल होत नाही. कारण जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत नवीन बीजे टाकतच जातो आणि बीजे टाकल्यानंतरच पुढे जातो. आणि ज्ञान मिळाल्यानंतर मग सुटका होते. 'स्वत: कोण आहे?' याचे भान झाले की मग सुटका होते.

मृत्यूनंतर जन्म आणि जन्मानंतर मृत्यू आहे. बस, एवढेच सतत चालू राहते. तर हा जन्म आणि मृत्यू का आहे? तर 'कॉजेस् ॲन्ड इफेक्ट, इफेक्ट ॲन्ड कॉजेस्', कारण आणि कार्य, कार्य आणि कारण यात जर कारणांना नष्ट करता आले तर हे सर्व 'इफेक्ट बंद होतील, त्यानंतर मात्र नवीन जन्म घ्यावा लागणार नाही.'

इथे संपूर्ण आयुष्यभर 'कॉजेस्' निर्माण केली आहेत, तर तुमची ती 'कॉजेस्' कुठे जातील? 'कॉजेस्' केली आहेत तर ती आपल्याला 'इफेक्ट' (परिणाम) तर देणारच ना! 'कॉजेस्' उत्पन्न केली आहेत हे तुम्हाला समजते ना?

प्रत्येक कार्यात 'कॉजेस्' निर्माण होतात. तुम्हाला कोणी नालायक म्हटले तर तुमच्या आत 'कॉजेस्' उत्पन्न होतात की, 'तुझा बाप नालायक

आहे.' ह्याला तुमची 'कॉजेस्' म्हणतात. तुम्हाला तो 'नालायक' म्हणाला ते तर कायद्यानुसार म्हणाला आणि तुम्ही त्याला बेकायदेशीर केले, हे तुम्हाला समजले नाही का? आता का बोलत नाही?

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे.

**दादाश्री :** म्हणजे 'कॉजेस्' या जन्मात उत्पन्न होतात, त्याचा 'इफेक्ट' पुढच्या जन्मी भोगावा लागतो.

यात तर 'इफेक्टिव' मोहाला 'कॉजेस' मोह मानले जाते. तुम्ही फक्त असे मानता की 'मी क्रोध करतो' पण जोपर्यंत ही अशी भ्रांती आहे तोपर्यंतच क्रोध आहे. नाहीतर हा क्रोधच नाही, तो फक्त 'इफेक्ट' (परिणाम) आहे. 'कॉजेस्' बंद झाली की फक्त 'इफेक्ट'च शिल्लक राहतो आणि एकदा 'कॉजेस्' बंद केली की 'ही इज नॉट रिस्पॉन्सिबल फॉर इफेक्ट' (परिणामाला तो जबाबदार नाही) आणि 'इफेक्ट' तर आपले भाव दाखविल्याखेरीज राहणारच नाही.

## 'ज्ञानी' जन्म-मरण चक्र तोडतात

खरी वस्तुस्थिती काय आहे? जो मूळ आत्मा आहे, जो यथार्थ आत्मा आहे, तो शुद्ध चेतन आहे आणि तोच परमात्मा आहे, आणि संपूर्ण जग ज्याला चेतन मानते ते तर निश्चेतन चेतन आहे. लोखंडाचा गोळा तापला की तो अग्निसारखा होतो, तसे हे निश्चेतन चेतन आहे.

निश्चेतन चेतन म्हणजे काय? मूळ चेतनाच्या हजेरीत जे चार्ज होत असते, ते नंतर डिस्चार्ज होत राहते, त्याला निश्चेतन चेतन म्हणतात. घटक चार्ज होत आहेत, या चार्ज झालेल्या घटकांना 'कारणे' म्हणतात, 'कॉजेस्' म्हणतात. आणि संपूर्ण आयुष्याचे हे सर्व 'कॉजेस्' गोळा होतात, मग जेव्हा माणूस मृत्यू पावतो तेव्हा हे जे 'कॉजेस्' आहेत, कारण शरीर आहे, ते पुढच्या जन्मात 'कार्य शरीर' 'इफेक्टिव बॉडी' बनते.

'इफेक्टिव बॉडी' म्हणजे मन-वचन-कायेच्या या तीन 'बॅटऱ्या' तयार होतात आणि त्यातून परत नवीन 'कॉजेस्' निर्माण होत राहतात.

म्हणून या जन्मात मन-वचन-काया 'डिस्चार्ज' होत राहतात आणि दुसरीकडे आत नवीन 'चार्ज' होत राहतो. मन-वचन-काया यांच्या ज्या 'बॅटऱ्या' चार्ज होत आहेत त्या पुढच्या जन्मासाठी आहेत आणि ज्या मागच्या जन्माच्या आहेत, त्या आता डिस्चार्ज होत आहेत. 'ज्ञानी पुरुष' नवीन 'चार्ज' बंद करून देतात, तेव्हा मग जुने सर्व 'डिस्चार्ज' होत राहते.

म्हणजे मृत्यूनंतर आत्मा दुसऱ्या योनीत जातो. जोपर्यंत स्वतःच्या 'सेल्फ'चे 'रिअलायझेशन' होत नाही, तोपर्यंत इतर सर्व योनीत भटकत राहतो. जोपर्यंत मनात तन्मयाकार राहतो, बुद्धीत तन्मयाकार राहतो, तोपर्यंत संसार चालूच राहतो. कारण तन्मयाकार होणे याचाच अर्थ योनीत बीज पडणे आणि श्रीकृष्ण भगवंत म्हणतात की योनीत बीज पडल्यामुळेच हा संसार चालू आहे. ज्याचे योनीत बीज पडणे बंद झाले त्याचा संसार समाप्त झाला.

## पाच इंद्रिये, एका जन्मापुरतीच

**प्रश्नकर्ता :** एक जीव दुसऱ्या शरीरात जातो, तर तेव्हा पंचेंद्रिये आणि मन सोबत घेऊन जातो का?

**दादाश्री :** नाही, नाही, काहीच नाही. सर्व इंद्रिये तर इथेच एक्झॉस्ट होऊन संपतात. इंद्रिये तर मरून गेली. म्हणजेच त्याच्यासोबत इंद्रिये वगैरे काहीच जात नाही. फक्त हे क्रोध-मान-माया-लोभच सोबत जातात. कारण शरीरात क्रोध-मान-माया-लोभ सर्व काही आले. आणि सूक्ष्म शरीर ते कसे असते? जोपर्यंत मोक्षाला जात नाही, तोपर्यंत ते सोबतच राहते. जन्म अगदी कुठेही होवो, पण ते सूक्ष्म शरीर सोबतच राहते.

सर्व इंद्रिये मरतात. आणि 'कारण शरीरातून' मग पुन्हा नवीन (इंद्रिये) निर्माण होतात. ही सर्व इंद्रिये तर एक्झॉस्ट होण्यासाठीच (संपण्यासाठीच) उत्पन्न झालेली आहेत, त्या सतत एक्झॉस्ट होत राहतात. आणि एक्झॉस्ट झाली की संपतात. मग मृत्यूच्यावेळी जर त्यांना

विचारले की 'काका, काही बोला ना, बोला ना!' तर फक्त 'ल, ल, ल...' करत राहतात. जीभ गेली, कारण ती एक्झॉस्ट झाली, संपली. डोळ्यांचे पण असेच होते. कानाचे पण असेच होते. म्हणजेच सगळे काही संपते. अर्थात ही इंद्रिये सोबत जात नाहीत. त्याला नवीन फ्रेश इंद्रिये मिळतील. फर्स्टक्लास डोळे, फर्स्टक्लास कान पण मिळतील. मग खुशाल रेडिओ कानाशी घेऊन ऐकत राहा ना!

## सूक्ष्म शरीराशी संबंध कुठपर्यंत?

शरीर सोडून आत्मा एकटा जात नाही. आत्म्याबरोबर मग सर्व कर्मे, त्याला 'कारण कर्म' - 'कारण देह' म्हणतात. आणि तिसरी 'इलेक्ट्रिकल बॉडी', हे तिन्ही सोबतच निघतात. जोपर्यंत हा संसार आहे तोपर्यंत प्रत्येक जीवात ही इलेक्ट्रिकल बॉडी असतेच. कारण शरीर बनले की इलेक्ट्रिकल शरीर सोबतच असते. प्रत्येक जीवात इलेक्ट्रिकल बॉडी ही सामान्य भावाने असतेच असते, आणि तिच्या आधारावरच आपले सर्व चालते. आपण जेवतो, ते पचविण्याचे काम ही इलेक्ट्रिकल बॉडी करते. रक्त बनते, रक्त शरीरात वर चढवणे, खाली उतरवणे ही सर्व कामे ती करते. डोळ्यांनी दिसते, ती लाईट - तो प्रकाश हे सर्व इलेक्ट्रिकल बॉडीमुळेच होते. आणि हे क्रोध-मान-माया-लोभ, ते पण 'इलेक्ट्रिकल बॉडी'मुळेच होते. आत्म्यात क्रोध-मान-माया-लोभ नसतातच. जो राग येतो, ते सुद्धा 'इलेक्ट्रिकल बॉडी'चे शॉक आहेत.

**प्रश्नकर्ता :** तर मग 'चार्ज' होण्यात पण 'इलेक्ट्रिकल बॉडी' काम करत असेल ना?

**दादाश्री :** 'इलेक्ट्रिकल बॉडी' असेल तरच 'चार्ज' होते, ही 'इलेक्ट्रिकल बॉडी' नसेल तर यातील काहीही चालू शकणार नाही. 'इलेक्ट्रिकल बॉडी' असेल आणि आत्मा नसेल तरी पण काही चालणार नाही. ही सर्व समुच्चय 'कॉजेस्' आहेत.

**प्रश्नकर्ता :** जेव्हा जीव मरतो, तेव्हा तेजस् शरीर त्याच्याबरोबर कसे जाते?

**दादाश्री :** तेजस् शरीर कुठपर्यंत असते? तर कर्मांची शिल्लक असते, तोपर्यंत. कर्मांची शिल्लक संपली की मग तेजस् शरीर सोबत येत नाही. म्हणजेच ते या पूर्ण जन्मापर्यंत, थेट शेवटपर्यंत सोबतच राहते. प्रत्येक जीवमात्रात, झाडात, सगळ्यात तेजस् शरीर असते, हे तेजस् शरीर नसेल तर त्याची गाडी कशी चालेल? तेजस् शरीराला इंग्रजीत म्हणायचे असेल तर 'इलेक्ट्रिकल बॉडी' म्हणू शकतो. आणि 'इलेक्ट्रिसिटी'शिवाय तर घरातही चालू शकत नाही आणि डोळ्यांनी दिसणारही नाही. 'इलेक्ट्रिसिटी' बंद झाली की झाले, मग सर्व काही संपेल.

त्याचे काय आहे, या पाण्याखाली जर स्टोव्ह पेटवला तर एक लिटर पाणी असेल तरी ते संपेल ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** पाणी हे स्थूल स्वरूप आहे. आणि जे उडून जाते ते सूक्ष्म स्वरूप आहे. याच प्रकारे हा देह, जो स्थूल स्वरूप आहे तो आपल्याला दिसतो आणि ते सूक्ष्म स्वरूप आपल्याला दिसत नाही. पण ते सूक्ष्म शरीर पण अगदी याच्यासारखेच असते, इतर काहीच फरक नाही. सूक्ष्म शरीर म्हणजेच 'इलेक्ट्रिकल बॉडी.'

**प्रश्नकर्ता :** पण ज्यावेळी जीव जातो, त्यावेळी कार्मण शरीर आणि तेजस् शरीर त्याच्यासोबत कसे जाते? इतर काही सोबत का जात नाही?

**दादाश्री :** जे पाणी आम्ही तापविले होते, त्या पाण्यातून 'हायड्रोजन' आणि 'ऑक्सिजन' दोन्हीही सोबतच निघतात आणि मग ते वेगळे होतात. पण जेव्हा उडतात, तेव्हा दोघेही सोबतच उडतात. पण नंतर वेगळे होतात आणि परत एकत्र होतात. हा हिशोब आहे. कर्मांच्या हिशोबानुसार इलेक्ट्रिकल बॉडी चिकटूनच राहते. त्यात इतर काही मिसळत नाही. ही 'इलेक्ट्रिकल बॉडी' संपूर्ण जन्मभर एकच राहते आणि बाहेरचे आणखी काहीही तिला स्पर्श करीत नाही. ज्याप्रमाणे

हे शरीर दुसऱ्या शरीराला घुसू देत नाही, त्याचप्रमाणे सूक्ष्म शरीराचे आहे. हे स्थूल शरीर डोळ्याला दिसते, आणि सूक्ष्म शरीर डोळ्याला दिसत नाही, असे असते, इतर काहीही फरक त्यात नाही. आकार पण अगदी तसाच असतो, फक्त हे स्थूल शरीर दिसते आणि सूक्ष्म शरीर दिसत नाही, एवढेच. म्हणजेच यात दुसरे काही मिसळू शकत नाही, हे सूक्ष्म शरीर दुसऱ्या कोणाशी मिसळत नाही. जशी यात (स्थूल शरीरात) ममता आहे, त्याचप्रमाणे सूक्ष्म शरीरात पण ममता आहे, सर्व काही आहे.

असे आहे की, जोपर्यंत संसार अवस्था आहे तोपर्यंत सूक्ष्म शरीर सोबतच असते. संसार अवस्था म्हणजे भ्रांतीची अवस्था. जोपर्यंत ती आहे तोपर्यंत सूक्ष्म शरीर राहते.

**प्रश्नकर्ता :** तर मग सूक्ष्म देहात आत्मा स्वतंत्र आहे की बंधनात आहे ?

**दादाश्री :** स्वतंत्रच आहे, बांधलेला नाही. व्यवहार आत्मा बांधलेला आहे आणि खरा (निश्चय) आत्मा बांधलेला नाही. ज्याचा तुम्ही व्यवहारात उपयोग करता तो आत्मा बांधलेला आहे.

**प्रश्नकर्ता :** जो परत जन्म घेतो, तो सूक्ष्म देह घेतो ना ?

**दादाश्री :** हो, पण त्याऐवजी असे म्हणा की अहंकार जन्म घेतो! सूक्ष्म देहाला तर तुम्ही ओळखतही नाही, तो तर तुम्ही कधी पाहिलाही नाही. 'सूक्ष्म देह' हा शब्द तुम्ही बोलता ते तर पुस्तकात वाचून. म्हणून अहंकारच जन्म घेतो असेच म्हणा ना! अहंकाराला ओळखता की नाही ओळखत ? अहंकारच पुन्हा-पुन्हा देह धारण करतो. एक व्यवहार आत्मा आहे आणि एक खरा आत्मा आहे. खरा आत्मा आत बांधलेला नाही, तो शुद्धच आहे.

म्हणजेच ही सर्व भानगड अहंकाराची आहे. अहंकार गेला तर मोक्ष होईल. बस, एवढी छोटीशी गोष्ट समजेल ना ?

ज्याला तुम्ही सूक्ष्म देह म्हणता, तोच दुसऱ्या जन्मात जातो. हा

पुरावा तर आपल्याला समजते ना? एरवी तुम्ही सूक्ष्माला कसे ओळखणार? सूक्ष्म वस्तू तर वेगळी आहे, ती तर 'ज्ञानीं'नाच समजते. बाकी सर्व लोक पुस्तकात वाचून 'सूक्ष्म देह, सूक्ष्म देह' असे बोलतात. नाहीतर जे स्थूलालाच ओळखत नाहीत ते सूक्ष्माला कसे काय ओळखतील?

## कोण कोणला चिकटले आहे?

**प्रश्नकर्ता :** आत्मा पुद्‌गलाला चिकटला आहे की पुद्‌गल आत्म्याला चिकटले आहे?

**दादाश्री :** असे आहे की, कोणीच कोणाला चिकटलेले नाही. सगळे काही नैमित्तिक आहे. तसे व्यवहारात लोक म्हणतात की 'आत्मा चिकटला आहे.' म्हणून तर लोक म्हणतात की 'या झाडाला तू पकडले आहेस, तू हे झाड सोडून दे.' पण असे सोडून ते सुटेल का? हे सर्व 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एविडेन्सेस' आहेत.

**प्रश्नकर्ता :** पण असे दिसते की आत्मा या पुद्‌गलाला चिकटलेला आहे. आत्मा पुद्‌गलात तन्मयाकार होतो, म्हणून असे झाले आहे.

**दादाश्री :** ते तर अनिवार्यपणे व्हावेच लागते.

**प्रश्नकर्ता :** आत्म्याला ही अनिवार्यता का झाली? कोणी अनिवार्य केले?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की आत्मा चैतन्य आहे आणि पुद्‌गल जड आहे. ह्या दोघांना एकत्र ठेवले की विशेषभाव निर्माण होतो. कोणीच काही करत नाही, पण फक्त दोघेही एकत्र आल्यामुळे विशेषभाव उत्पन्न होतो आणि तो उत्पन्न झाल्यामुळे संसार सुरू होतो. मग आत्मा जेव्हा मूळ भावात येतो आणि त्याला 'मी कोण आहे?' याची जाणीव होते तेव्हा तो सुटतो. आणि त्यानंतर पुद्‌गल पण सुटते.

**प्रश्नकर्ता :** दोघे एकत्र कसे येतात?

**दादाश्री :** तेच तर एविडेन्सेस आहेत ना? व्यवहारात प्रवेश

केल्यावर लगेच हे सर्व मिळते. येथील व्यवहार संपूर्णपणे संयोगाने भरलेला आहे आणि जिथे संयोग नाहीत अशा ठिकाणी, म्हणजेच सिद्धपदात जायचे आहे. त्यासाठी शास्त्र, 'ज्ञानी पुरुष' ही सर्व साधने मिळतात आणि तेव्हा मग त्याला स्वत:चे स्वरूप समजू लागते, तेव्हापासूनच तो मुक्त होऊ लागतो. मग एक जन्म, दोन जन्म किंवा पंधरा जन्मात त्याची मुक्ती होते!

म्हणजेच चेतन पुद्‌गलाच्या चक्रात अडकलेलेच नाही, हे जे असे वाटते की अडकलेले आहे, तीच भ्रांती आहे. ती भ्रांती दूर झाली की दोघे वेगवेगळेच आहेत.

## आत्मा शुद्धच! 'बिलीफ्स'च 'रॉंग'

**प्रश्नकर्ता :** आत्मा त्याच्या मूळ स्वभावात तर शुद्ध आहे, तर मग त्याला कषाय कसे चिकटले? कर्मबंधने कशी पडली?

**दादाश्री :** हे 'सायन्स' आहे! आपण इथे लोखंड ठेवले, आणि ते लोखंड जर जिवंत असेल तर म्हणेल की 'मला गंज न लागो.' पण 'सायन्स'चा नियम आहे की जर इतर संयोगांचा स्पर्श झाला तर त्याला गंज लागल्याशिवाय राहणार नाही. त्याप्रमाणे हा आत्मा मूळ स्वभावाने तर शुद्धच आहे, पण या संयोगांच्या दबावामुळे त्याला गंज लागला आहे.

**प्रश्नकर्ता :** आत्म्यावर सध्या कर्मांची आवरणे आहेत, परंतु जर आत्म्याने सर्व कर्मे संपविली तर मग त्याला गंज लागेल का?

**दादाश्री :** यात असे आहे की, जोपर्यंत स्वभानात येत नाही, तोपर्यंत गंज लागतच राहतो. स्वत:चे भान गेले, स्वत: आरोपित भावात आहे, म्हणून गंज लागतच राहतो. 'मी चंदुलाल आहे' हा आरोपित भाव आहे, म्हणून सतत गंज लागत आहे. जर हा आरोपित भाव गेला आणि 'स्वभावात' आला, म्हणजेच स्वत:च्या स्वरूपात आलात, क्षेत्रज्ञदशेत आला, तर मग त्याला गंज लागणार नाही.

**प्रश्नकर्ता :** सुरुवातीला आत्मा मूळ पदार्थाच्या रूपात कसा असतो की ज्यामुळे त्याला गंज लागतो?

**दादाश्री :** ही सर्व तत्त्वे या लोकात (ब्रह्मांडात) आहेत, आणि जोपर्यंत या लोकात आहेत तोपर्यंत दुसऱ्या तत्त्वांचा परिणाम होतच राहणार. यालाच 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस' म्हणतात. आत्मा जेव्हा या लोकातून पलीकडे जाईल, सिद्धगतीत जाईल तेव्हा मग त्याला गंज लागणार नाही.

त्याचे असे आहे की, इतर काही कर्मे लागलेलीच नाहीत, फक्त भान हरविले आहे, तीच कर्मे लागली आहेत. नाहीतर स्वतः शुद्धच आहे. आताही तुमचा आत्मा शुद्धच आहे. प्रत्येकाचा आत्मा शुद्धच आहे, परंतु हे जे बाह्यरूप उत्पन्न झाले आहे, त्या रूपात स्वत:मध्ये 'रॉंग बिलीफ' उत्पन्न झाली आहे. जन्मापासूनच स्वत:ला इथे या रूपाबद्दल अज्ञान प्रदान केले जाते. संसार आहे, यात मूल जन्माला येते तेव्हापासूनच त्याला अज्ञान दिले जाते. 'मुलगा झाला, मुलगा झाला, असे म्हणतात.' मग त्याला चंदू नाव दिले जाते. मग लोक त्याला 'चंदू, चंदू' म्हणतात. म्हणून मग तो स्वत:ला 'मी चंदू आहे' असे मानू लागतो. मग त्याला आईची ओळख करून दिली जाते, बाबांची ओळख करून दिली जाते, म्हणजे हे सर्व अज्ञानाचेच प्रदान केले जाते. 'तू चंदू आहेस, ही तुझी आई आहे, हे तुझे बाबा आहेत' अशा ओळखी करून दिल्या जातात. यामुळे त्याला ह्या ज्या 'रॉंग बिलीफ्स्' बसलेल्या आहेत त्या मग निघतच नाहीत. त्या 'रॉंग बिलीफ' जेव्हा 'ज्ञानी पुरुष' मोडून काढतात, तेव्हा मग 'राईट बिलीफ' बसते, आणि मगच पूर्ण निराकरण होते. आत्मा हा शुद्धच आहे. हा तर फक्त दृष्टीफेरच आहे (दृष्टीच बदलली आहे).

**प्रश्नकर्ता :** पण त्याची सुरुवात कशी झाली?

**दादाश्री :** सुरुवात तर, अविनाशी वस्तूंच्या एकत्र येण्यामुळे ह्या सर्व अवस्था उत्पन्न झाल्या आहेत. हा संसार म्हणजे समसरण मार्ग, आणि समसरण म्हणजे यात निरंतर परिवर्तन होतच राहते. या परिवर्तनामुळे तुम्हाला स्वत:ला असे वाटते की तुमचा आत्मा अशुद्धच

आहे, पण मला तुमचा आत्मा शुद्धच दिसतो. फक्त तुमच्यात 'रॉंग बिलीफ्स्' बसल्या आहेत, म्हणून तुम्ही अशुद्ध मानता. या 'रॉंग बिलीफ' मी फ्रॅक्चर केल्या आणि तुमच्यात 'राईट बिलीफ' बसवल्या की मग तुम्हालाही शुद्ध दिसू लागले.

हे तर केवळ मिथ्यादर्शन उत्पन्न झाले आहे, जिथे सुख नाही तिथे सुखाची मान्यता निर्माण झाली आहे. आम्ही ज्ञान दिल्यानंतर त्याला खऱ्या दिशेचा मार्ग मिळतो. आणि मार्ग मिळाल्यावर निराकरण होते. मिथ्यादर्शन बदलले आणि सम्यक्‌दर्शन करून दिले की मग त्याची सुटका होते, नाहीतर तोपर्यंत सुटका होत नाही.

आत्मा शुद्धच आहे. आत्तासुद्धा तुमचा आत्मा शुद्धच आहे. फक्त तुमच्या 'बिलीफ्स्' 'रॉंग' आहेत. ज्या डोळ्यांनी दिसतात, कानानी ऐकू येतात, जिभेने चाखता येतात, त्या सर्व, 'ऑल आर टेम्परररी ॲडस्टमेंटस्' आहेत, आणि त्या टेम्पररीत तुम्ही सुख मानले आहे. आता तुमच्यावर या 'रॉंग बिलीफ्स'चा परिणाम झाला आहे. ह्या 'रॉंग बिलीफ्स' फ्रेक्चर झाल्या की मग 'टेम्पररी'मध्ये सुख वाटणार नाही. 'पर्मनन्ट'मध्ये सुख वाटेल. 'पर्मनन्ट' सुख हे सनातन सुख आहे, ते आल्यानंतर परत जात नाही. आणि यालाच आत्मा प्राप्त केला असे म्हणतात, यालाच स्वानुभव पद म्हणतात. त्या स्वानुभव पदासहित पुढे प्रगती करत करत मग पूर्णाहुती होते.

## सनातन वस्तूचे येणे जाणे कसे शक्य आहे?

**प्रश्नकर्ता :** सर्व जीव, की जे आत्मा आहेत, ते या जगात कुठून आले असतील?

**दादाश्री :** कोणीच आलेले नाही. हे पूर्ण जग म्हणजे सहा तत्त्वांचे प्रदर्शन आहे. ही जी सहा तत्त्वे आहेत, ती सर्व मिळून हे जग निर्माण झालेले आहे, आणि ते दिसते. हे सर्व फक्त 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्' आहेत. अर्थात कोणीही हे बनवलेले नाही. कोणाला काहीही करावे लागलेले नाही. याची आदि नाही, आणि अंतही नाही.

हे 'जसे आहे तसे' सांगितले आहे की जग अनादि-अनंत आहे. फक्त एका दृष्टीफेरमुळे (दृष्टी बदलल्यामुळे) जग दिसते आणि दुसऱ्या दृष्टीफेरमुळे मोक्ष दिसतो. हा फक्त दृष्टीफेरच आहे, दुसरे काहीच नाही.

जे 'येते' ते सनातन असू शकत नाही आणि आत्मा ही तर सनातन वस्तू आहे, म्हणूनच त्याचे 'येणे, जाणे' असे काहीही नसते. जो येतो तो तर जातो. आत्मा असा नसतो.

## जगात सर्वात प्रथम तर...

**प्रश्नकर्ता :** तर मग हे सर्व जीव कुठून उत्पन्न झाले?

**दादाश्री :** हे जीव उत्पन्न झालेच नाहीत. आत्मा अविनाशी आहे. आणि अविनाशी कधी उत्पन्न होतच नाही. तो कायमच असतो. त्याचा नाशही होत नाही आणि तो उत्पन्नही होत नाही. कोणी उत्पन्न झाले नाही आणि कोणाचा नाशही झाला नाही. हे जे दिसते ती सर्व भ्रांती आहे. आणि अवस्थांचा नाश होतो. म्हातारपणाची अवस्था, तरुण्यावस्था, या सर्वांचा नाश होतो आणि तो 'स्वत:', तो जो होता तोच असतो. म्हणजेच अवस्थांचा विनाश होतो.

**प्रश्नकर्ता :** पण आपल्या ह्या पृथ्वीवर पूर्वी तर जीव नव्हतेच ना? तर मग हे सर्व जीव आले कुठून?

**दादाश्री :** जीव नव्हते, असे कोणी म्हटले होते का?

**प्रश्नकर्ता :** 'सायन्स' (विज्ञान) असे म्हणते.

**दादाश्री :** 'सायन्स' असे म्हणतच नाही. 'सायन्स' तर सगळ्या गोष्टींचा स्वीकार करते. ही भूमी जीवरहित कधीच नव्हती.

**प्रश्नकर्ता :** विज्ञान असेही म्हणते की प्रथम जीवसृष्टी निर्माण झाली आणि नंतर मनुष्यसृष्टी निर्माण झाली.

**दादाश्री :** पण हे विज्ञान तर त्यावेळी नव्हतेच ना. आणि हे जग अनादीपासून आहेच. त्याचा आरंभ झालाच नाही आणि त्याचा अंतही होणार नाही.

**प्रश्नकर्ता :** मी खूप वेळा विचार करतो की सर्वात पहिले पूर्वज कोण असतील? पण मला याचे उत्तर सापडत नाही.

**दादाश्री :** त्याचे काय आहे, सर्वात पहिला पूर्वज असता तर त्याची आदि (सुरुवात) झाली असे म्हटले असते. आणि ज्याची आदि असते त्याचा अंतही असतो, तर मग जग नष्ट झाले असते. पण हे जग नष्ट होणार नाही. आणि या जगाची आदिही झालेली नाही. म्हणजेच पहिला पूर्वज असा कोणी नव्हताच. हे जसे आहे, तसेच्या तसेच आहे, जे आहे ते तेच आहे. अनादि काळापासून असाच प्रवाह चालू आहे. हे जग अनादि काळापासून असेच्या असे आहे आणि अनंत काळापर्यंत असेच्या असेच राहील. म्हणजे हे असेच्या असेच चालणार आहे, अनादि काळापासून चालू आहे आणि अनंत काळापर्यंत चालू राहील.

**प्रश्नकर्ता :** पण बरेच वैज्ञानिक असे म्हणतात की प्रथम वानर होते.

**दादाश्री :** असा कोणी वानर नव्हता. त्याला वानर म्हणा किंवा अन्य काही म्हणा, पण मुळात तर तो आत्मा आहे ना? आणि सर्व योनीत आत्माच आहे, आणि अनात्माही आहे. पुद्गल पण आहे आणि आत्मा पण आहे. म्हणजे प्रथम वानर होता वगैरे असे काही नाही. ज्याप्रमाणे हिशोब असतो, त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या योनीत तो जातो. म्हणजेच आत्मा अनादिपासून आहे आणि अनात्मा देखील अनादिपासून आहे.

**प्रश्नकर्ता :** या संसारात माणूस स्वतःच्या पूर्वकर्मांमुळे बांधला गेलेला आहे, असे म्हटले जाते. तर मग पृथ्वीवर सर्वात प्रथम उत्पन्न होणारा माणूस स्वतः सोबत पूर्वीची कोणती कर्मबंधने घेऊन आला असेल?

**दादाश्री :** सर्वात प्रथम उत्पन्न होणारा माणूस नव्हताच. कारण हे जग उत्पन्नच झालेले नाही. ज्याची उत्पत्ती असते त्याचा विनाश निश्चितच असतो. हे जग विनाशीही नाही, आणि उत्पन्नही झालेले नाही.

जग हे तर अनादि-अनंत आहे. आणि ही माणसे, हे सर्व जीवमात्र अनादि-अनंत आहेत. झाडांतील जीव असोत किंवा लहानात लहान जीव असो, ते सर्व अनादि-अनंत आहेत! यात काही पण कमी-जास्त झालेले नाहीत, जेवढे होते तेवढेच आहेत!

एक पण जीव वाढलेला नाही आणि एक पण जीव कमी झालेला नाही, असे हे जग आहे. एक पण परमाणू वाढलेला नाही आणि एक पण परमाणू कमी झालेला नाही. जाळून टाका, काहीही करा, तरी पण अनादि काळापासून एक पण परमाणू कमी होत नाही आणि वाढतही नाही, असे हे जग आहे.

म्हणजेच आत्मा आलेलाही नाही आणि गेलेला पण नाही. 'आला-गेला' ही सर्व तर बुद्धीची भाषा आहे. जेव्हा तुम्ही ज्ञानभाषेत याल तेव्हा तुम्हाला कळेल की असे काही झालेलेच नाही. बुद्धीमुळे असा सर्व भास होतो. ही बुद्धी जर गेली, अहंकार जर गेला तर मुक्तच आहे. या बुद्धी आणि अहंकारामुळे सर्वकाही उत्पन्न झाले आहे. त्यामुळे असे दिसते.

## संयोगात 'बिलीफ'ची चूक, कोण मिटवणार?

माणूस घराबाहेर निघतो तेव्हा सावली कुठून येते? तर सर्व संयोगांमुळे. सूर्याचा संयोग मिळाला तर सावली उत्पन्न होते. आरशाचा संयोग मिळाला तर प्रतिबिंब उत्पन्न होते. म्हणजेच हे सर्व संयोगांमुळे झालेले आहे आणि म्हणून पूर्ण बिलीफ (मान्यता) बदलली आहे. 'स्वरूप' तर आहे तसेच आहे, पण बिलीफ बदलली आहे, की हे काय झाले? चिमणी आरशावर चोच मारत नाही का? मारते ना? पण माणूस असे करत नाही. कारण त्याला हे कळते की हा आपलाच फोटो आहे. पण चिमणीची बिलीफ बदलली आहे तिला वाटते की (आरशात) ही दुसरी चिमणी आली आहे म्हणून ती सारखी चोच मारत राहते. पण पुष्कळ दिवसांच्या अनुभवानंतर ती बिलीफ तुटते. याच प्रकारे ही 'बिलीफ'च बदललेली आहे. पूर्ण बिलीफच चुकीची झालेली आहे, म्हणून अहंकार उत्पन्न झाला आहे आणि म्हणून बुद्धी उत्पन्न झाली

आहे. आणि बुद्धी उत्पन्न झाली म्हणून बुद्धीच्या आधारावर, बुद्धीच्या लाइटने (प्रकाशाने) चालत आहे, आणि तो मूळ लाइट बंद झाला आहे. म्हणून गुंता निर्माण झाला आहे. पण आत्म्यात काहीही बदल झालेला नाही. आत्म्याचे काही बिघडलेही नाही आणि आत्म्यावर काही परिणामही झालेला नाही.

माणूस बाहेर पडतो, तशी सावली त्याच्या मागे-मागे फिरते ना? तर हे सगळे सावलीसारखेच आहे. एखाद्याने सावलीकडे बघत हात असे केले, एक बोट वरती केले, दोन बोटे वरती केली, इकडे तिकडे पाहिले, तर आपल्याला वाटते ना की याचे डोके फिरले आहे की काय? वाटते ना? आणि मग जेव्हा स्वत:चे भान होते, तेव्हा मग जणू काहीच झाले नाही अशा प्रकारे तो संयोगातून सुटतो. म्हणजेच हे संयोग मिळाले आहेत, एवढेच, बाकी काही नाही. आणि सावली घालवायला जर रस्त्यावर धावाधाव केली तर काय सावली जाईल? नाही. असा धावला तरी मागे दिसते, या बाजूला वळला तरी पण दिसते. तो माणूस काहीही करो, काही ना काही तर दिसतच राहते ना? म्हणजेच सावली त्याला सोडत नाही. आता त्याला जर कोणी सांगितले की 'तू घरात घुस', तर सावली नाहीशी होईल.

अर्थात ही तर फक्त रॉंग बिलीफ झाली आहे, दुसरे काहीही नाही. आत्म्याने कर्मे बांधलेलीच नाहीत, ही सर्व तर थापेबाजी चालू आहे. आत्म्याने जर कर्मे बांधली तर मग तो त्याचा कायमचा स्वभावच होऊन जाईल आणि कायमचा स्वभाव मग कधी बदलणारच नाही. ही सर्व तर चुकीची समज ठाम बसवली गेली आहे. भगवंत म्हणाले वेगळे आणि लोकांना समजले वेगळे. भगवंतांनी सांगितलेला एक शब्दही आजच्या या लोकांना अजून समजलेला नाही. काहीच सुटत नाही आणि अपार चिंता-उपाधी त्याला सतत सतावीत राहतात. 'ज्ञानी पुरुष' जाणतात की हे सर्व काय आहे! महावीर भगवंत हे सर्व जाणत होते, पण सांगणार तरी कसे? उघडपणे सांगू शकत नाही. इतक्या थोड्याच माणसांमध्ये मी उघडपणे सांगू शकतो, पण पांचशे माणसांमध्ये असे

उघडपणे सांगता येत नाही ना? बांधलेल्या माणसाला जर आपण म्हणालो की 'तू मुक्तच आहेस' तर त्या बिचाऱ्याची काय दशा होईल? त्याला तसा अनुभव येणार नाही आणि तो उलटच करील.

या चिमणीला आरशात काही करावे लागते का? आरशाचा संयोग जुळून आला की आत दुसरी चिमणी येते. डोळे, चोच, सर्व काही असते, आणि बाहेरची चिमणी जसे करते तसेच आतील चिमणीही करते. याच प्रकारे आत्मा संयोगांनी घेरलेला आहे. सूर्यनारायणाच्या संयोगाने जशी सावली बनते तशीच या संयोगामुळे 'स्वतःचे स्वरूप' उलटे दिसते. पण या अशा संयोगातून जे मुक्त झाले आहेत तेच आपल्याला मुक्त करू शकतात, दुसरे कोणीही मुक्त करवू शकत नाही. जो स्वतःच बांधलेला आहे तो आपल्याला कसे मुक्त करील?

लोक विचारतात आत्मा कुठून आला? तर मग 'रिलेटिव्ह' मध्ये मला सांगावे लागले की आत्मा समसरण मार्गात आहे. मार्गाने जाता जाता तऱ्हेतऱ्हेचे संयोग मिळत जातात, त्या संयोगांच्या दबावामुळे ज्ञान विभाविक झाले. आत्म्याने दुसरे काहीही केले नाही. हे तर ज्ञान विभाविक झाले, त्यामुळे जसा भाव निर्माण झाला, त्याप्रमाणे हा देहाची निर्मिती झाली. यात आत्म्याला तर काहीच करावे लागले नाही. मग जशी कल्पना करतो तसा तो बनतो. कल्पना करतो तसा तो बनतो, आणि त्यातच गुंतत जातो, आणि मग नियमात येतो, 'व्यवस्थित'च्या नियमात येतो. मग 'बॅटरी'मधून 'बॅटरी', 'बॅटरी'मधून 'बॅटरी' अशी सायकल (चक्र) चालत राहते. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' बॅटरी सोडवतात तेव्हा सुटका होते. ते या मन-वचन-कायेच्या तीन 'बॅटऱ्या' हटवितात त्यामुळे मग अशा 'बॅटऱ्या' चार्ज होत नाहीत आणि जुन्या 'बॅटऱ्या' डिस्चार्ज होत राहतात.

## म्हणून ज्ञानी म्हणतात, अनादि-अनंत

हे तर आत्म्याला असे संयोग मिळाले आहेत. आता आपण इथे बसलो आहोत, मग इथून बाहेर गेल्यावर जर दाट धुके असेल तर तुम्ही आणि मी जरी समोरासमोर असू तरी एकमेकांना दिसणार नाही. असे होते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, होते.

**दादाश्री :** हो, म्हणजे धुके असल्यामुळे दिसणे बंद होते. तसेच या आत्म्यावर संयोगरूपी धुके पसरलेले आहे, म्हणजे इतके सर्व संयोग उत्पन्न होतात. आणि त्या धुक्यापेक्षा तर हे अनंत प्रकारचे थर आहेत. ही इतकी भयंकर आवरणे आहेत की त्यामुळे त्याला भानच होत नाही. नाहीतर आत्मा आलेलाही नाही आणि गेलेलाही नाही. आत्मा स्वत:च परमात्मा आहे! पण तरी भान होऊच देत नाही. किती आश्चर्य आहे ना? आणि 'हे 'ज्ञानीं'नी पाहिले आहे, जे मुक्त झाले आहेत, त्यांनी पाहिले आहे.

म्हणजे हे सर्व बुद्धीचे प्रश्न आहेत. प्रश्न फक्त बुद्धीचेच आहेत आणि बुद्धी जेव्हा संपेल तेव्हाच ज्ञान होऊ शकेल. लोक तर विचारतात 'याची आदि कुठून आहे?' अरे, आदि शब्द तू कुठून शिकलास? हे सर्व विकल्प आहेत. 'ज्ञानीं'नी या सर्व विकल्पांना शांत करण्यासाठी 'अनादि-अनंत आहे' असे म्हटले आहे!

**प्रश्नकर्ता :** 'अनादि-अनंत'चा अर्थ समजला नाही.

**दादाश्री :** अनादि-अनंत म्हणजे काय? तर एखादी वस्तू गोल असेल तर त्याची सुरुवात कुठे हेही कळत नाही आणि शेवट कुठे तेही कळत नाही. या माळेचा अंत कुठे आहे ते कळते का? सुरुवात पण कळत नाही ना? म्हणून त्याला अनादि-अनंत म्हटलेले आहे. लोकांना त्यांच्याच भाषेत समजून सांगावे लागते ना?

नाहीतर असे काही होतच नसते. आतासुद्धा स्वत: परमात्मपदातच आहे, पण त्याला त्याचे भान नाही. या संयोगांच्या दबावामुळे भान गेले आहे. आता जर एखादा 'कलेक्टर' असेल पण त्याचे भान गेले असेल आणि त्याला आपण विचारले, 'तुम्ही कोण आहात?' पण त्याला त्याचे भानच नसेल तर तो उत्तर कसे देईल? असे इथे जिवंत माणसाचे पण भान जाते ना? त्याचप्रमाणे त्याला अजिबात भान नाही. लोक जसे जसे सांगत गेले तसातसा त्याच्यावर परिणाम होत गेला, होत गेला, आणि त्याचप्रकारे सर्व काही मानून घेतले आहे.

## सनातनची सुरुवात, कशी असू शकते?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याला कोणी बनवले?

**दादाश्री :** त्याला कोणी बनवले नाही. बनविलेले असते तर त्याचा नाश झाला असता. आत्मा निरंतर असणारी वस्तू आहे, ते सनातन तत्त्व आहे. त्याची 'बिगिनिंग' (सुरुवात) झालेली नाही. त्याला बनविणारा कोणीच नाही. जर बनविणारा असता तर बनविणाऱ्याचा नाश झाला असता आणि बनलेल्याचा पण नाश झाला असता.

**प्रश्नकर्ता :** आत्म्यासारखी वस्तू का उत्पन्न झाली आहे?

**दादाश्री :** उत्पन्न असे काही झालेच नाही. या जगात सहा तत्त्वे आहेत आणि ती तत्त्वे सतत परिवर्तित होत असतात आणि त्या परिवर्तनामुळे या साऱ्या अवस्था दिसतात. अवस्थांना लोक 'हे माझे स्वरूप आहे' असे मानतात. या अवस्था विनाशी आहेत आणि तत्त्व अविनाशी आहे. म्हणजेच आत्मा उत्पन्न होणे असे काही नसतेच.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे फक्त आत्म्यालाच मोक्षाला जायचे आहे. इतर कशालाच हे लागू होत नाही का?

**दादाश्री :** आत्मा मोक्ष स्वरूपच आहे. पण त्याचावर या दुसऱ्या तत्त्वांचा दबाव आला आहे. या तत्त्वांतून सुटेल तर मोक्ष होईल. तो स्वतः मोक्षस्वरूपच आहे, पण अज्ञानामुळे 'हा मी आहे, हा मी आहे', असे मानतो आणि यामुळे सतत रॉंग बिलीफमध्ये (चुकीच्या मान्यतेमध्ये) अडकत राहतो, आणि ज्ञानामुळे सुटू शकतो.

## व्यवहार राशीची 'जशीच्या तशी' व्यवस्था

**प्रश्नकर्ता :** नवीन नवीन आत्मे जगात येत असतात की जेवढे आहेत तेवढेच आत्मे या जगात आहेत?

**दादाश्री :** तुम्हाला ही माणसे वाढताना दिसतात ती कुठून येतात असे विचारायचे आहे का?

**प्रश्नकर्ता :** नाही, असे नाही. पहिला *आरा* (कालचक्राचा एक भाग) येतो, दुसरा *आरा* येतो, असे सगळे आरे येतात, तर मग त्या वेळी जेवढे आत्मे होते, ते सर्व आत्मे आजही आहेत की त्यात कमी जास्त होते?

**दादाश्री :** एकही आत्मा वाढत नाही आणि कमीही होत नाही. जेवढे आत्मे येथून मोक्षाला जातात, तेवढे आत्मे दुसऱ्या ठिकाणाहून येथे येतात, या संसार व्यवहारात येतात. व्यवहार म्हणजे ज्या जीवांना नामरूप पडले आहे, ते व्यवहारात आलेले आहेत. आता हे गुलाबाचे रोपटे आहे ते व्यवहारात आलेले आहे. आणि ज्यांना अजून काही नामरूप पडलेलेच नाही ते अजून व्यवहारात आलेलेच नाहीत. असे अनंत जीव आहेत की जे अजून व्यवहारात आलेलेच नाहीत, म्हणून त्यांना तर हिशोबात घेऊच नका. जेवढे येथून मोक्षाला जातात तेवढे तिथून येथे येतात. म्हणजेच या व्यवहारात जेवढे जीव आहेत ते तेवढेचे तेवढेच राहतात. त्यात काहीच कमी-जास्त होत नाही. यालाच संसार म्हणतात. एक पण वाढत नाही आणि एक पण घटत नाही. तुम्हाला समजले का?

ज्यांचे अजून नावही पडलेले नाही, असे अनंत जीव आहेत, त्यातून ते येथे येतात. इथून जेवढे जीव मोक्षाला गेले की लगेच तिथून (अव्यवहार राशीतून) जीव येथे येतात. हे सर्व नियमपूर्वक आहे. म्हणजे येथे तर जेवढे आहेत, तेवढेच राहतात. जेव्हा मोजाल तेव्हा तेवढ्याचे तेवढेच राहतात.

व्यवहार म्हणजे कुठलेही नाव पडले, गुलाब नाव पडले, बटाटा नाव पडले, वायूकाय नाव पडले, ते सर्व व्यवहारात आले. पण ज्यांना अजून नाव मिळालेले नाही, ते व्यवहारात आलेले नाहीत.

**प्रश्नकर्ता :** ते जीव कुठे आहेत?

**दादाश्री :** ते दुसऱ्या जागी आहेत. ती खूप समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. खूप गहन गोष्ट आहे. पण आपण इतक्या खोल जाणार

नाही, नाहीतर आत्मा गमावून बसू. हे सर्व ज्ञानी पुरुषांचे काम आहे. तुम्ही फक्त हकीगत काय आहे एवढेच समजून घ्या. जर या सूक्ष्म गोष्टींची आठवण ठेवत बसाल तर मुळात जे करायचे आहे ते राहून जाईल. तुम्ही स्वत:च सगळे समजून घ्या आणि तुम्हाला स्वत:लाच हे सर्व दिसेल. आम्ही दाखवत आहोत त्या रस्त्याने चालत राहिलात तर तुम्ही पण त्या स्टेशनवर येऊन पोहोचाल. कॅन्टीन दिसेल, सर्व काही दिसेल. म्हणून आत्तापासूनच इतक्या चौकशा करू नका. इथे अजून भरूच स्टेशन आले असेल आणि तुम्ही विचारता 'दादा, मुंबईत मरीनड्राइव कसे वाटते?' तर मी म्हणेन, 'बाबा रे, मुंबई तर येऊ दे, मग तिथे जाऊनच पाहा ना!' त्याचे काय आहे की सूरतला घारी (एक प्रकारची मिठाई) मिळाली आहे, तर तिच्यात लक्ष नाही आणि मरीनड्राइवची आठवण येते. म्हणूनच आम्ही म्हणतो ना की आरामात खात-पीत जा, मुंबईला पोहोचाल तेव्हा तुम्हाला मरीनड्राइव दिसेल. आता एवढ्यात दिसत नसेल तर त्याचे ओझे बाळगण्यासारखे नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्म्याच्या संख्येत कमी-जास्त होत नाही, असा याचा अर्थ झाला?

**दादाश्री :** हो, कमी-जास्त होतच नाहीत. जेवढे आहेत तेवढेच असतात! ते कमीही होत नाहीत आणि वाढतही नाहीत. या जगात फक्त आत्म्याचेच नाही तर अनात्म्याचेही एकही परमाणू कमी-जास्त होत नाहीत. एवढ्या साऱ्या लढाया होतात, भांडणे होतात, कितीतरी लोक मरतात तरी पण एकही परमाणू कमी होत नाही किंवा वाढत नाही. आत्म्याच्या संख्येत कमी-जास्त होत नाही. हे जग जसे आहे तसेच आहे, त्यात बदल होणे शक्यच नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग हा सर्व कारभार जी शक्ती चालविते त्या शक्तीला कोणत्या स्वरूपात ओळखावे?

**दादाश्री :** हे सर्व चालविते त्या शक्तीबद्दल सांगायचे, तर समजा आपल्याला पाच जण त्रास देत असतील तर आपण कोण त्रास देत आहे असे म्हणू? कोणाचे नाव घेऊ?

**प्रश्नकर्ता :** सर्व पाच जणांचे?

**दादाश्री :** हो. त्याचप्रकारे इथे कुणा एकाचे नाव घेता येणार नाही, तसे तर हे सर्व मिळून करत आहेत. हे सर्व तर 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस' आहेत. म्हणजेच सर्व मिळून करतात, यात कोणाचे नाव देणार? कोणा एकाचे नाव घेऊ शकतो का? आणि हे सर्वकाही अनिवार्य आहे. हा संसारमार्ग आहे आणि आत्मा संसारमार्गाने चाललेला आहे, त्याचा हा परिणाम आहे, दुसरे काही नाही, फक्त इफेक्ट (परिणाम)च आहे.

म्हणजेच आत्मे वाढतही नाहीत आणि कमीही होत नाहीत. पुद्‌गल पण वाढत नाही आणि कमी पण होत नाही. हे जड परमाणू आहेत ना, ते सुद्धा कमी होत नाहीत आणि जास्त होत नाहीत. जरी आपण इथे कितीही जाळले, कापले तरी पण एकही परमाणू कमी-जास्त होत नाही. होते तेवढयाच्या तेवढेच राहतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग नवे उत्पन्न कसे होतात? माणसांची लोकसंख्या वाढली आहे ना?

**दादाश्री :** जनावरातून जे कमी झाले ते सर्व माणसात आले आहेत. पण ते सर्व रिटर्न तिकीट घेऊन आले आहेत. जिथून आलेत तिथलेच रिटर्न तिकीट ते घेऊन आलेत, पण येथे येऊन काय काम कराल? तर म्हणतात, 'आम्ही लोकांकडचे सगळे उपभोगू, बिनहक्काचे उपभोगू आणि घरे बांधून देऊ, रस्ते बांधून देऊ, पूल बांधून देऊ आणि कष्ट करून मरून जाऊ.' म्हणजे ते जिथे होते तिथेच परत जाणार आहेत. हे जे भेसळ करतात ते सर्व तिकडे जाण्यासाठी मार्क्स गोळा करत आहेत, तेवढे मार्क्स मिळाले की ते परत तिथे जातील.

## सृष्टीचे सर्जन आणि समापन याचा प्रश्न

**प्रश्नकर्ता :** भगवंत या जीवरूपी जगाचा शेवट कधी करतील? आणि त्या वेळी स्थिती कशी असेल?

**दादाश्री :** भगवंतांजवळ हे जग समाप्त करण्याची शक्तीच नाही. उलट भगवंतच या जगात अडकून पडलेले आहेत, तेच मुक्त व्हायचा प्रयत्न करीत आहेत. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' मार्ग दाखवितात तेव्हा बाहेर पडता येते. हे जग समाप्त करण्याची शक्ती कोणाकडेच नाही.

हे जग भगवंतांनी बनवलेले नाही. या जगात फक्त भगवंत (आत्मा तत्त्व) अशी एकच वस्तू नाही (दुसरे पाच अविनाशी तत्त्वेसुद्धा आहेत). हे तर 'ऑन्ली सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्स' आहे. आणि 'दि वर्ल्ड इज द पजल इटसेल्फ.' हे जग 'इटसेल्फ पजल' होऊन बसले आहे. हे पजल कशा प्रकारे झाले आहे, ते आम्ही पाहून सांगत आहोत. ही तत्त्वे जेव्हा एकत्र येतात, तेव्हा यातील दोन तत्त्वांच्या कारणामुळे हे 'जे' उत्पन्न झाले आहे, ते सर्व ज्ञानाने नाश पावते. अज्ञानामुळे उत्पन्न झाले आहे, अज्ञान म्हणजे विशेषभाव, म्हणजे विशेषभावामुळे उत्पन्न झाले आहे. ज्ञानामुळे ते संपते.

हे जग कोणीही बनविलेले नाही. बनविणारा कोणी नाहीच. इथे ही घरे वगैरे कोण बनवते? ते काय 'पाटील' बनवतात का? नाही. पाटील फार तर पैसे देऊ शकतात. मग सुतार, गवंडी, लोहार हे सर्व मिळून घर बनवतात. भगवंत म्हणजे काय सुतार, गवंडी, असे आहेत का? नाही, ते तर भगवंत आहेत. त्यांच्या उपस्थितीनेच सर्व चालू राहते. ज्या प्रमाणे पाटीलांच्या उपस्थितीने घर बनत राहते, त्याचप्रमाणे भगवंतांच्या उपस्थितीने हे जग चालत राहते आणि काहीही करावे लागत नाही.

या परमाणूंमध्ये खूप सारे गुण आहेत, आणि या पुद्गलात, म्हणजे या जड वस्तूत, अनात्म विभागात पण खूप सारे गुण आहेत, हे डोळे वगैरे सर्व आपोआपच बनतात. कोणाला काही करावे लागत नाही. या गायींचे, म्हशींचे, शेळ्यांचे डोळे कसे तजेलदार असतात? माकडाचे डोळे कसे असतात? हे सर्व आपोआपच होत असते. प्रकृती आपोआपच बनते.

ते विज्ञान काय आहे, ते आम्ही, 'ज्ञानी पुरषां'नी स्वत: पाहिले आहे. आम्ही स्वत: ते जाणतो, पण त्याचे वर्णन करू शकत नाही.

शब्दांनी त्याचे वर्णन होऊ शकत नाही आणि शास्त्रांत पण त्याचे पूर्ण स्पष्टीकरण नाही. नाहीतर त्याचे मूळ स्पष्टीकरण तर वेगळेच आहे.

म्हणजेच हे जग कायम असेच्या असेच राहणार. हे 'सायंटिफिक' (वैज्ञानिक) पद्धतीने समजून घ्यायचे असेल तर माझ्याकडे या. नाहीतर तुमच्या बुद्धीने मोजता येऊ शकेल असे ते नाहीच. कारण या जगातून काही जीव मोक्षालाही जातात, पण तरी हे जग असेच्या असेच राहील. या अजब गोष्टी जर पूर्णपणे समजून घ्यायच्या असतील तर माझ्याकडे या. या जगाला संपवणारा कोणीही नाही.

हे जग ईश्वराने बनवलेले नाही. हे फॉरेनचे सायंटिस्ट मला म्हणतात की 'गॉड इज क्रियेटर' (ईश्वर निर्माता आहे). आमच्या क्राइस्टने असे म्हटले आहे, तर तुम्ही ते का नाकारता?' तेव्हा मी म्हणातो, 'गॉड इज क्रियेटर इज करेक्ट बाय ख्रिश्चन व्ह्यू पॉइंट, बाय इन्डियन व्ह्यू पॉइंट, बाय मुस्लीम व्ह्यू पॉइंट, नॉट बाय फॅक्ट.' (ख्रिश्चन दृष्टीकोनातून, भारतीय दृष्टीकोनातून किंवा मुस्लीम दृष्टीकोनातून हे बरोबर आहे. पण ती वस्तुस्थिती नाही.)

ईश्वराने हे जग बनवलेलेच नाही. हे जग 'इटसेल्फ' (आपोआपच) बनले आहे आणि 'स्वत:च' कोडे बनले आहे आणि हे कोडे विज्ञानामुळे झाले आहे. एकूण सहा तत्त्वे आहेत. त्यातील दोन तत्त्वे एकत्र आल्यामुळे त्यांच्यात विशेषभाव उत्पन्न होतो. दोन तत्त्वे एकत्र राहत असल्यामुळे 'स्वत:' स्वत:चे गुणधर्म सोडत नाही आणि विशेष गुणधर्म उत्पन्न होतात. यांना लोक व्यतिरेक गुण असे म्हणतात. क्रोध-मान-माया लोभ हे आत्म्याचे पण गुण नाहीत आणि अनात्म्याचे पण गुण नाहीत. ते व्यतिरेक गुण आहेत. म्हणजेच हे विशेष गुण उत्पन्न झाले आहेत, आणि त्यातून हे जग निर्माण झाले आहे, बस एवढेच, इतर कोणीही हे जग बनविणारा नाही.

काही लोक तर असेही म्हणतात की भगवंताला या जगाची रचना करण्याची इच्छा झाली पण ज्याला इच्छा होते ना, त्याला भिकारी म्हणतात. भगवंताला कसलीच इच्छा नसते. जिथे पूर्ण तृप्ती आहे,

परमानंद आहे, तिथे इच्छा कशी काय असेल? म्हणजेच भगवंताला इच्छा उत्पन्न होतच नाही. हे तर लोकांनी खोटेच ठसविले आहे की भगवंताला इच्छा झाली आणि त्याने जग बनवले, असे काहीही नाही. हे तर पूर्ण विज्ञान आहे आणि विज्ञानानेच उत्पन्न झाले आहे. हे सर्व जग म्हणजे विज्ञान आहे.

## ही रचना, म्हणजेच स्वतः विज्ञान

**प्रश्नकर्ता :** या जगाची उत्पती क्रियाशक्तीने नाही, तर इच्छाशक्तीमुळे आहे ना?

**दादाश्री :** नाही, इच्छाशक्तीने पण नाही. इच्छा असणाऱ्याला भिकारी म्हणतात. भगवंतांना जर इच्छा असती तर त्यांना भिकारी म्हटले असते.

**प्रश्नकर्ता :** जो कोणी पूर्णब्रह्म आहे, तो फक्त त्याच्या इच्छाशक्तीमुळेच. त्याने स्वतः काहीच केले नाही का?

**दादाश्री :** नाही, इच्छाशक्ती पण नाही. इच्छाशक्ती असती तर भिकारी झाला असता. भगवंत तर पूर्ण निरिच्छ असतात. हे फक्त विज्ञानानेच उत्पन्न झाले आहे.

**प्रश्नकर्ता :** त्या विशेषभावालाच इच्छाशक्ती म्हटले आहे का?

**दादाश्री :** नाही, विशेषभाव आणि इच्छाशक्ती यात खूप फरक आहे. विशेषभाव दोन वस्तू सोबत आल्यामुळे होतो. उदा. सूर्य आणि समुद्र समोरासमोर आले की त्यातील पाण्याची वाफ होते. तर यात सूर्याची पण तशी इच्छा नाही आणि समुद्राचीही इच्छा नाही. म्हणजेच या प्रकारे व्यतिरेक गुण उत्पन्न होऊन त्यातून क्रोध-मान-माया-लोभ असे व्यतिरेक गुण उत्पन्न झाले आहेत. यांना विशेषगुण म्हणतात आणि त्यापासून जग उत्पन्न होते.

## जगात रूपी तत्त्वांची रूपे दिसतात

या पर्मनन्ट वस्तू आहेत. ही जी पाच तत्त्वे आहेत - पृथ्वी, तेज,

वायू, पाणी, आकाश. त्यातील फक्त आकाश हे तत्त्वच पर्मनन्ट (अविनाशी) तत्त्व आहे. बाकीची चार तत्त्वे विनाशी आहेत. पृथ्वी, तेज, वायू आणि पाणी, या सर्व विनाशी गोष्टी आहेत, त्या बदलतात. आकाश विनाशी नाही.

**प्रश्नकर्ता :** या सर्वांची उत्पती आकाशातूनच झाली आहे का?

**दादाश्री :** नाही, नाही. आकाशापासून कोणतीही उत्पत्ती झालेली नाही, या जगात. यात जे परमाणू तत्त्व (जड तत्त्व) आहे, ज्यांना अणू म्हणतात, त्यांच्यापासून, त्या परमाणूंपासून हे सर्व उत्पन्न झाले आहे. फक्त परमाणू (जड) हेच रूपी तत्त्व आहे. या रूपीतूनच हे सर्व उत्पन्न झाले आहे.

म्हणजेच परमाणू निरंतर या जगात असतातच. आणि एखाद्या जागी जास्त गोळा झाले तर त्यांना अणू म्हणतात. या परमाणूंना कोणत्याही प्रकारे पाहता येत नाही! फक्त केवळज्ञानीच पाहू शकतात, इतर कोणीच पाहू शकत नाही.

त्याचे असे आहे की परमाणू रूपी आहेत आणि आकाश अरूपी आहे. आणि ही जी चार तत्त्वे आहेत, पृथ्वी-तेज-वायू-जल ही सर्व रूपी आहेत. (जड तत्त्वांच्या अवस्था आहेत) म्हणजेच रूपीतून रूपे उत्पन्न झाली आहेत.

## जेव्हा पाहाल तेव्हा असेच्या असेच असते...

**प्रश्नकर्ता :** निराकारमधून साकार जग बनू शकते का?

**दादाश्री :** निराकारमधून साकार जगत बनलेलेच नाही.साकार वस्तू ही निराळीच आहे. तुम्ही ज्या अर्थाने साकार शब्द वापरता तसा साकारचा अर्थ नाही. हे तर सर्व पर्याय आहेत. आणि सर्व पर्याय विनाशी असतात, उत्पन्न होतात आणि त्यांचा विनाश होतो. परत उत्पन्न होतात आणि परत विनाश होतो. आणि शाश्वत वस्तू शाश्वतच राहतात. शाश्वत वस्तू उत्पन्नही होत नाही आणि तिचा विनाशही होत नाही. म्हणजेच

शाश्वत वस्तू शाश्वतच राहतात आणि त्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या पर्यायांचा विनाश होत राहतो. पर्याय उत्पन्न होत राहतात आणि विनाश होत राहतो. ज्याचा जन्म होतो, त्याचा मृत्यू होतो. त्यात आत्म्याचे काही देणेघेणे नाही. या प्रकारे हे जग वेगळ्या प्रकारे चालत असते, म्हणून एक दिवस हे जग संपून जाईल असे घाबरायचे काहीच कारण नाही. असे काहीच कारण नाही. हे सर्व एक्झॅक्ट असेच्या असेच राहील. सूर्य, चंद्र, तारे जेव्हा बघाल, जेव्हा जेव्हा जन्म घ्याल तेव्हा तेव्हा असेच्या असेच दिसतील!

**प्रश्नकर्ता :** काही जण 'भगवंतांची अशी इच्छा होती' असे अर्थघटन करतात. पण खरे तर असे आहे की ते स्वत: अद्वैतभावात होते म्हणून त्यांना एकांतिक वाटत होते, म्हणून संकल्प करून द्वैतभावात आले आणि त्यामुळे सृष्टीची निर्मिती झाली.

**दादाश्री :** जर तो संकल्प करील तर तो भगवंतच नाही.

**प्रश्नकर्ता :** नाही, संकल्प नाही. पण तिथे पूर्ण द्वैतभाव प्रकट झाला आहे.

**दादाश्री :** नाही, भगवंतांमध्ये द्वैतभाव नसतो आणि अद्वैतभाव पण नसतो. द्वैत आणि अद्वैत हे तर द्वंद्व आहे आणि भगवंत द्वंद्वातीत असतात.

**प्रश्नकर्ता :** पण हे द्वंद्व आहे, म्हणूनच सृष्टीची निर्मिती झाली आहे ना?

**दादाश्री :** हो, हे द्वंद्वच सृष्टी आहे. सृष्टी म्हणजेच द्वंद्व, आणि द्वंद्वातीत झाला की काम पूर्णच झाले.

## अनादिसांतपासून सादिअनंतच्या दिशेने

त्याचे असे आहे की 'या जगाची आदि' अशी काही गोष्ट नाही, आणि अंत अशी पण गोष्ट नाही. लोक बुद्धीने 'याची आदि कधी?' असे विचारत राहतात. कारण स्वत:ची आदि झाली आहे असे ते मानतात आणि म्हणून या जगाची पण आदि झाली असावी, असे विचारतात.

'या जगाची आदि' असा शब्द नाही, आणि अंत असाही शब्द नाही. हा संसारप्रवाह अनादिपासून आहे, पण अंतवाला आहे. मग कोणी विचारेल, 'कशा प्रकारे अंतवाला आहे?' तर आम्ही सांगतो 'या संसारप्रवाहात जीव भ्रांतीमध्ये वाहत असतात, परंतु जर त्यांना 'ज्ञानी पुरुष' भेटले तर मग त्या भ्रांतीचा तिथे अंत होतो.' म्हणजेच अनादिपासून जी भ्रांती चालत आली आहे तिचा अंत होतो, आणि सम्यक्त्वाचा उदय होतो. स–आदि याचा अर्थ सादि असा होतो, हे सम्यक्त्व कधीपर्यंत राहील? तर जोपर्यंत केवळज्ञान प्राप्त होत नाही तोपर्यंत ह्याचा अंत होत नाही. याला सादि सांत असे म्हणतात, स–आदि आणि स–अंत! आणि तिथे मोक्षात मग स–आदि झाली आणि तिथे अनंतकाळापर्यंत राहतील. म्हणून त्याला सादि–अनंत असे म्हटले आहे. म्हणजे प्रथम अनादि–सांतवाला भाग मग सादि–सांत भाग आणि मग सादि–अनंतवाला भाग.

म्हणजेच या जगात आदि अशी कोणतीच गोष्ट नाही आणि अंत अशी पण कोणतीच गोष्ट नाही. त्यामुळे त्याची कल्पना करण्याचा शेवट येणारच नाही, असे आहे!

## जगाचे स्वरूप म्हणजे अवस्थांचे रूपांतर

**प्रश्नकर्ता :** तरी पण जगाची उत्पती, स्थिती आणि लय यात नैमित्तिक कारण काय असेल?

**दादाश्री :** पण तुम्ही उत्पत्ती कशाला म्हणता?

**प्रश्नकर्ता :** तसे तर आपण सर्व जाणतो की हे 'पुद्‌गला'चे रूपांतर आहे, आणि त्यामुळेच हे जग आहे. पण हे जग जेव्हा उत्पन्न झाले होते, ती जी उत्पत्ती आहे, नंतर जी स्थिती राहते आणि नंतर त्याचा लय होतो, त्यात नैमित्तिक कारण काय आहे?

**दादाश्री :** पण तुम्ही हे जग उत्पन्न होत असताना पाहिले आहे का?

**प्रश्नकर्ता :** पाहिलेले नाही, तरी पण रूपांतर तर होतच राहते ना?

**दादाश्री :** रूपांतरचा अर्थच आहे की उत्पन्न होणे, स्थिर होणे आणि लय होणे, याचेच नाव रूपांतर! म्हणजेच हे जग वस्तूच्या स्वरूपात उत्पन्नही होत नाही आणि लय पण होत नाही, असे काहीच होत नाही. हे तर केवळ वस्तूंच्या (सहा तत्त्वांच्या) अवस्थांचे रूपांतर होत आहे.

**प्रश्नकर्ता :** त्यात आत्म्याची शक्ती हे नैमित्तिक कारण आहे की नाही?

**दादाश्री :** काहीही देणेघेणे नाही. त्यात आत्म्याचा काय संबंध! हे औषधे विक्रेते असे लिहितात ना की 'हे औषध 1977 साली सील केले आहे तरी पण 1979 नंतर फेकून द्या.' असे का म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** त्यातील तत्त्वे संपून जातात म्हणून.

**दादाश्री :** त्यात आत्म्याची काही गरज पडली का? तर असे आहे हे सर्व. हा जो काळ आहे तो प्रत्येक वस्तूला खाऊन टाकतो. काळ प्रत्येक वस्तूला जुने करतो आणि परत प्रत्येक वस्तूला नवीन पण करतो.

रूपांतरात सर्व काही येते. रूपांतर म्हणजे काय? तर उत्पन्न होणे, थोडा वेळ टिकणे आणि नष्ट होणे.

**प्रश्नकर्ता :** एक गोष्ट अजून समजली नाही. जगाची निर्मिती अनादिपासून आहे असे म्हणतात, पण उत्पतीचे काही तरी कारण तर असायला हवे ना?

**दादाश्री :** त्याचे मूळ कारण हे पजल (कोडे) आहे.

**प्रश्नकर्ता :** हे 'पजल' 'सॉल्व' करण्यासाठी (कोडे सोडवण्यासाठी) काही शक्ती असेल ना?

**दादाश्री :** नाही, यासाठी कोणत्या शक्तीची गरज नाही. जर विज्ञान समजून घेतले तर हे 'पजल' 'सॉल्व' होईल.

हे जग सहा तत्त्वांनी बनलेले आहे. तत्त्व म्हणजे अविनाशी आणि

ही सर्व तत्त्वे स्वत:च्या स्वभावातच असतात. पण तत्त्वे समोरासमोर समसरण होतात, म्हणून अशा वेगवेगळ्या प्रकारचे देखावे दिसतात.

**प्रश्नकर्ता :** ही सहा तत्त्वे कोणती?

**दादाश्री :** एक चेतन तत्त्व आहे. दुसरे जड आणि रूपी तत्त्व आहे. चेतन अरूपी आहे. तिसरे या जड आणि चेतन तत्त्वांना गती देणारे तत्त्व आहे. त्याला गतिसहायक तत्त्व म्हणतात. आणि जर फक्त गतिसहायक तत्त्वच असते तर सगळे कायम फिरत राहिले असते. म्हणून जड आणि चेतन स्थिर करण्यासाठी स्थितीसहायक तत्त्वही आहे. ही चार तत्त्वे झाली आणि पाचवे तत्त्व आकाशतत्त्व आणि सहावे काळतत्त्व. या सहा तत्त्वांनी जग उत्पन्न झाले आहे. ही सर्व तत्त्वे शाश्वत आहेत.

## निसर्गाचे अगम्य प्लॅनिंग

हे जग स्वभावाने चाललेले आहे. प्रत्येक गोष्ट आपापल्या स्वभावातच आहे. आणि कोणीही स्वभावाच्या बाहेर गेलेले नाही. फक्त हा जो व्यवहार आहे, तो पूर्णपणे समसरण मार्ग आहे आणि या समसरण मार्गात हे जीव आले आहेत. याचे तीन भाग केले आहेत. एक अव्यवहार राशी, दुसरा व्यवहार राशी आणि तिसरा सिद्धक्षेत्र!

अव्यवहार राशीचे जीव अनंत आहेत, आणि जे जीव व्यवहारात आले आहेत ते जीव पण अनंत आहेत. पण या व्यवहारात माणसांना मोजायचे असेल तर ते मोजता येते. आणि जे व्यवहारातून मुक्त झाले आहेत, सिद्धगतीवाले आहेत, तेही अनंत जीव आहेत!

अव्यवहार राशीचे जीव येथे व्यवहारात येतात. समजा (व्यवहार राशीतील) पन्नास हजार जीवांना मोक्ष प्राप्ती झाली, तर दुसरे पन्नास हजार जीव अव्यवहार राशीतून व्यवहार राशीत प्रवेश करतात, त्यामुळे हा व्यवहार जसाच्या तसा राहतो.

व्यवहार कोणाला म्हणतात? तर जे जीव समसरण मार्गात पुढे

जात जात आले आहेत आणि ज्यांना काही नावे पडली आहेत, म्हणजे ज्यांना नामरूप उत्पन्न झाले, तेव्हापासून ते व्यवहारात आले असे म्हटले जाईल. उदाहरणार्थ. 'हा कांदा आहे, हा तर गुलाब आहे, हा तांदळाचा दाणा आहे, हे शेवाळ आहे.' थेट मोक्षाला जाईपर्यंत अवस्था निरंतर बदलतच राहतात आणि 'डेव्हलपमेंट' होतच राहते. एकेन्द्रियापासून सुरू होऊन हळूहळू पुढे 'डेव्हलपमेंट' होत होत थेट पंचेन्द्रियांपर्यंत 'डेव्हलपमेंट' होत राहते. पंचेन्द्रियात आल्यावर मग फॉरेनमध्ये मनुष्य जन्म घेतो. आणि मग या मनुष्यात 'डेव्हलपमेंट' होत होत तो मग हिंदुस्तानात येतो. हिंदुस्तानात जन्माला आलेले सर्व जीव अध्यात्मामध्ये फार उच्चप्रकारे 'डेव्हलप' झालेले असतात. आणि तेच सर्व मोक्षाचे अधिकारी आहेत. फॉरेनवाले मोक्षाचे अधिकारी नाहीत, ते लोक अजून 'डेव्हलप' होत आहेत. जो पूर्ण 'डेव्हलप' होतो, तो मग इथून मोक्षाला जातो!

व्यवहारातून जेवढे जीव तिथे मोक्षाला जातात, सिद्धक्षेत्रात जातात, तेवढे जीव अव्यवहारातून व्यवहारात येतात. म्हणजे व्यवहार कशाला म्हणतात तर व्यवहारात जेवढे जीव आहेत त्यात कधी एकही जीव कमी होत नाही किंवा वाढत नाही, याचे नाव व्यवहार! व्यवहारात एक पण जीव कमी-जास्त झाला तर ही सर्व व्यवस्था कोलमडेल!

**प्रश्नकर्ता :** एखादा जीव कमी झाला किंवा एखादा जीव वाढला, तर काय होईल?

**दादाश्री :** निसर्गाचे पूर्ण प्लानिंग (नियोजन)च नष्ट होईल. आज सूर्य गैरहजर राहील, तर उद्या चंद्र गैरहजर राहील, किंवा मग कित्येक तारेही नसतील, किंवा कधी अमुक ग्रह नसेल. कारण काय? तर म्हणतील 'ते तर मोक्षाला गेले', मग इथे घोरअंधार पडेल! म्हणजेच एकही जीव कमी-जास्त झाला तरी पूर्ण प्लानिंगच कोलमडेल. पण ही तर पूर्ण डिझाइन, सर्व काही अगदी एक्झॅक्ट राहणार.

सूर्य-चंद्र-तारे अजून अब्जो वर्षांनंतरही असेच दिसतील. तोच शनि ग्रह, आणि तोच शुक्र ग्रह. जसाच्या तसाच दिसेल, पण आतील

जीव मात्र बदलत राहतील. फक्त पॅकिंग जसेच्या तसे राहते, बिंब तेच राहते, फक्त आतील जीव च्यवित होऊन (आपली जागा सोडून) दुसऱ्या जागी जातो. सूर्यनारायणाचे पण च्यवन होते, आणि दुसऱ्या जीवांचे पण च्यवन होते. पण च्यवन होते त्याच वेळी दुसरे जीव त्याच्या जागी येतात. याचेच नाव 'व्यवस्थित'! ही किती सुंदर व्यवस्था आहे! तीन वाजून तीन मिनिटांनी तो जीव इथे येऊन पोहोचतो आणि त्याच वेळी ह्या जीवाला इथून निघायचे असते. हो, नाहीतर आपल्याला असे समजले असते की मध्येच असा 'काळोख' का पडला? पण असे काही होतच नाही. अर्थात एक पण जीव कमी-जास्त होत नाही. सर्वच जीव सर्व्हिसमध्ये (सेवेत)च राहतात.

जेवढे जीव येथून मोक्षाला जातात तेवढेच जीव अव्यवहार राशीतून व्यवहार राशीत येतात. त्यामुळे व्यवहारात घट अथवा वाढ होत नाही. व्यवहार जसाच्या तसाच राहतो. म्हणून या प्रकारची फळे संपतील तर काय करणार? अशी चिंता कोणी करू नये. काही प्रकारची फळे संपली तर दुसऱ्या प्रकारची फळे उत्पन्न होतात. पण हा व्यवहार तर कायमच राहील.

**प्रश्नकर्ता :** असे म्हणतात की आत्मे 'निगोद' मधून येतात. आधी सर्व आत्मे निगोदमध्ये असतात. तर निगोद म्हणजे काय?

**दादाश्री :** निगोद म्हणजे एकाच शरीरात किती तरी जीव असतात. एका बटाट्यात पण कितीतरी जीव असतात ना? त्याचप्रमाणे निगोदमध्ये खूप अधिक जीव असतात. त्या जीवांना नाव दिलेले नसते. या बटाट्याला तर नाव दिलेले आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग सुरुवात नाव देतात तेव्हापासून होते का?

**दादाश्री :** नाही. सुरुवात तर या पूर्वीच झालेली असते. जे जीव अजून व्यवहारात आलेले नाहीत, त्यांना अव्यवहार राशी म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** निगोदवाले जे आत्मे आहेत, त्यांचा प्रदेश कुठे असतो?

**दादाश्री :** हीच सर्व भूमिका! आकाशात सगळीकडे हेच आहे. संपूर्ण लोकाकाश निगोदनेच भरलेले आहे.

**प्रश्नकर्ता :** अव्यवहार राशीतही जीवांची उत्पत्ती तर होतच असते ना?

**दादाश्री :** नाही. तिथे उत्पत्ती होत नाही. तिथे तर अनंत जीव आहेत. म्हणजेच अनंतातून कितीही कमी करा, तरी पण त्याचा अनंतपणा जात नाही. ही बुद्धीने मोजण्यासारखी गोष्ट नाही, तिथे बुद्धी पोहोचूच शकत नाही. अनंतातून कमी होतच नाही. अनंतातून कितीही काढा तरी अनंतच राहतात, त्यालाच अनंत म्हणतात. म्हणजेच तिथे पण कमी होतील असे शक्य नाही. आणि तिथे सिद्धगतीमध्ये पण अनंत आहेत, तिथे पण कितीही वाढले तरी अनंतचे अनंत राहतात.

ब्रह्मांडात फक्त मनुष्येच संख्यात आहेत. बाकी सर्व जीव असंख्यात आहे. संख्यात म्हणजे कमी-जास्त होणारी, घटतात, वाढतात. आणि या घटण्या-वाढण्याचेही नियम आहेत. ही जी घट होते किंवा वाढ होते ती पण 'नॉर्मालिटी'त असते. कित्येक वेळा वाढते, तेव्हा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत लोकसंख्या वाढते आणि परत जेव्हा कमी होते तेव्हा विशिष्ट मर्यादेपर्यंत लोकसंख्या कमी होते, अशी 'नॉर्मालिटी' आहे.

आता जेव्हा कमी होण्याची सुरुवात होईल, तेव्हा प्रथम अनंत भाग कमी होईल मग असंख्यात भाग कमी होईल, मग संख्यात कमी होईल, नंतर संख्यात गुण कमी होतील आणि मग असंख्यात गुण कमी होतील, नंतर परत वर्धमान (वाढ) होईल. म्हणजेच कमी झाल्यानंतर परत वर्धमान होतील आणि वर्धमान झाल्यानंतर परत हीयमान (कमी) होतील.

**प्रश्नकर्ता :** संख्यात आणि असंख्यात याचा अर्थ काय?

**दादाश्री :** संख्यात म्हणजेच जे मोजता येते, असे. माणसांची लोकसंख्या संख्यात आहे आणि तिर्यंच (जनावर) यांची संख्या असंख्यात आहे. असंख्यात म्हणजे मोजता येणार नाही अशी, संख्या पूर्ण पडणार

नाहीत अशी. अब्जांपुढील पण ज्या संख्या आहेत, त्या सर्व जरी म्हटल्या तरी पण पूर्ण होऊ शकणार नाहीत, त्याला असंख्यात म्हणतात. संख्या संपतील तरी पण गणती पूर्ण होणार नाही, याला असंख्यात म्हणतात. फक्त माणसे संख्यात आहेत, चार अब्ज किंवा पाच अब्ज असे मोजून आपण म्हणू शकतो. तिर्यंच असंख्यात आहेत, देव-देवी असंख्यात आहेत, नरकगतीतील जीव पण असंख्यात आहेत आणि माणूस सोडून व्यवहारातील इतर सर्व जीव असंख्यात आहेत. अव्यवहार राशीचे जीव अनंत आहेत. आणि सिद्धगतीत पण अनंत सिद्ध आहेत. अनंत म्हणजे असंख्यातपेक्षाही जास्त – शेवटच येत नाही, अंतच येत नाही, म्हणून ते मोजण्याचा प्रयत्नच करू नका. संख्यातला मोजण्याचा प्रयत्न करू शकतो, आणि असंख्यातची तर संख्याच नाही, मग काय करणार? करोड, दहा करोड, अब्ज असे पुढे कितीही बोलत राहिलो तरी पण हा हिशोब पूर्ण होणार नाही. म्हणून त्याला असंख्यातात ठेवले आहे, कारण हे संख्येत समावत नाही.

हे 'वर्ल्ड' 'इटसेल्फ' 'पजल' झाले आहे (जग स्वत:च एक कोडे झाले आहे). त्याचे कारण काय आहे की हे जीव सतत प्रवाहात वाहत आले आहेत, अनादि प्रवाहाच्या रूपात हे जीव वाहतच राहिले आहेत. जशी नर्मदाजी नदी सतत वाहत असते, त्याच प्रकारे हे जीव निरंतर वाहतच असतात. निरंतर द्रव्य-क्षेत्र-काळ-भाव बदलतच राहतात! क्षेत्रसुद्धा बदलत राहते! म्हणजे गेल्या जन्मी जर दहाव्या मैलावर असू तर आता या जन्मात अकराव्या मैलावर येऊ. आणि दहाव्या मैलावर चांगले चांगले लोक, चांगल्या चांगल्या बागा, हे सर्व पाहिलेले असते आणि नंतर अकराव्या मैलावर तर वाळवंट येते, मग मनात असे येते की अशा ठिकाणी कधी राहतात का? दहाव्या मैलावर पाहिले होते ते सर्व दिसते. म्हणून मग या दोन्ही गोष्टीत मतभेद होत राहतो. 'हे वाईट आहे, हे वाईट आहे' असे वाटत राहते. आजचे हे ज्ञान त्याला त्रास देते. याचमुळे तर हा सारा कलह उत्पन्न झाला आहे ना! जोपर्यंत 'आत्मज्ञान' होत नाही तोपर्यंत हा कलह निरंतर चालतच राहणार.

म्हणजेच हे जग तर असेच्या असेच राहणार, कायम असेच राहणार. आणि यातून नियमानुसार (जीव) मोक्षात जात राहतील.

## शेवटी मात्र ज्ञानींच्या संज्ञेमुळेच निराकरण

**प्रश्नकर्ता :** म्हणजे जो व्यवहार राशीत येतो तो मग मोक्षातच जाणार का? तर मग अमुक जन्मानंतर तो मोक्षाला जाईल अशी वेळ पण निश्चितच असेल ना? मोक्षाला जाण्याची कालमर्यादाही निश्चितच असते का?

**दादाश्री :** जीव जेव्हा व्यवहार राशीत आला तेव्हापासूनच मोक्षाला जाण्याची तयारी सुरू झाली.

**प्रश्नकर्ता :** पण त्याची वेळ पण निश्चित असेल ना?

**दादाश्री :** वेळ तर निश्चित आहे, पण माणसाचा जन्म मिळाल्यावर जर अहंकार केला नाही तर वेळ निश्चित आहे. पण अहंकारात उलटा चालला तर काही सांगता येत नाही, असे झाले तर मग कितीतरी जन्म भटकत राहतो. जर अहंकार केला नाही तर मात्र वेळ निश्चित आहे. या जनावरांप्रमाणे राहिला, जनावरे जशी राहतात तसे सगळ्यांबरोबर राहिला, मान-तान, अहंकार, अशी काही भानगड नसेल, लोभाची भानगड नसेल तर सरळ मोक्षात जाईल. पण लोक जनावरांप्रमाणे राहत नाहीत ना?

**प्रश्नकर्ता :** एकदा माणूस झाल्यावर जनावरांसारखे कसे राहता येईल?

**दादाश्री :** मला असे म्हणायचे आहे की ही जनावरे ज्या प्रकारे जगतात त्या प्रकारे जीव जगेल तर मोक्षाला जाईल. पण दुसऱ्या लोकांचे पाहून तोही तसेच वागू लागतो. 'याने असे केले आणि मी असा आहे' असे करत करत मग सर्व बिघडत जाते. नंतर जर त्याला चांगला सत्संग मिळाला आणि 'ज्ञानी पुरुष' मिळाले तर सुटका होते, नाहीतर सुटका होत नाही.

**प्रश्नकर्ता :** 'ज्ञानी पुरुष' एखाद्या निश्चित वेळीच भेटतील असे ठरलेले असते का?

**दादाश्री :** नाही. हे ठरलेले नसते. यात तर ज्याला जसा संयोग मिळेल तसे! कोणाला असा धक्का लागला आणि तो अहंकारी बनला! अहंकारी बनला म्हणजे तो निराश्रित झाला. ही माणसे सोडली तर इतर जीव भगवंताचे आश्रित आहेत. फक्त माणसेच तेवढी निराश्रित आहेत.

म्हणजे त्याला असा अहंकार आहे की 'मी हे करीन आणि मी ते करीन' आणि मग तऱ्हेतऱ्हेच्या इच्छांचे ढिगारे आहेत की 'हे करायचे आहे ना'! आता ही माणसे निराश्रित आहेत आणि त्यातच 'मी करीन' असे म्हणत राहतात. मग भगवंत म्हणतात 'ठीक आहे, तूच कर!' म्हणून मग भगवंत वेगळे झाले!!

डॉक्टरसाहेब, तुम्ही काय म्हणता? तुम्ही म्हणता की 'मी हा इलाज करत आहे, मी ह्याला बरे केले, असे केले, तसे केले.' मग भगवंत वेगळेच होतील ना?

म्हणजे ही सगळी लोकसंज्ञेचीच भानगड आहे. लोकांनी जसे पाहिले तसे ते शिकले. आणि लोक जे शिकले ते आपण शिकलो. या लोकसंज्ञेमुळे कधीच मोक्षाला जाता येत नाही, लोकसंज्ञा म्हणजे तुम्हाला समजले का? लोकांनी ज्यात सुख मानले आहे, त्या लोकांच्या संज्ञेने जे वागतील ते कधी मोक्षाला जाऊ शकणार नाहीत. 'ज्ञानीं'च्या संज्ञेने चाललात तरच सुटका होईल.

**प्रश्नकर्ता :** पण जन्म झाल्यापासून लोकसंज्ञेखेरीज इतर काही मिळतच नाही.

**दादाश्री :** हो, मग दुसरे काय होणार? लोकातच वावरतो तर असेच होणार ना?

एरवी जर साहजिक राहिला तर सरळ सरळ मोक्षाला जाईल. पाहा, ही सर्व जनावरे साहजिक आहेत. त्यांना क्रोध-मान-माया-लोभ असे काहीच नाही. त्याने तुम्हाला धक्का मारला तरी त्याला क्रोध नाही, तो साहजिक आहे. आणि तो खाण्यासाठी उतावीळ झाला तरी त्याला लोभ नाही, पण साहजिकता आहे.

## मोक्षप्राप्ती निश्चित, कालावधी अनिश्चित

**प्रश्नकर्ता :** तर मग आम्ही काय समजावे? प्रत्येक आत्म्याची मोक्षाला जाण्याची वेळ निश्चितच असते की एखाद्या आत्म्याची वेळ निश्चित नसते?

**दादाश्री :** प्रत्येक आत्मा मोक्षाला जाणार हे नक्कीच आहे, पण त्याची मोक्षाला जाण्याची वेळ निश्चित नसते. मनुष्य जन्मात तो काय करतो, यावर ते अवलंबून आहे. मनुष्य जन्मात तो गुंते निर्माण करतो, की गुंते सोडवतो यावर अवलंबून आहे.

**प्रश्नकर्ता :** प्रत्येक आत्म्याला मनुष्य जन्म एक सारख्या वेळेवरच मिळतो का? ठराविक वेळीच मिळतो का?

**दादाश्री :** मनुष्य जन्म तर सर्वांना मिळायलाच हवा.

**प्रश्नकर्ता :** पण तो ठराविक वेळीच मिळतो का?

**दादाश्री :** हो, ठराविक वेळीच मिळतो. सुरुवातीचा मनुष्य जन्म तो ठराविक वेळीच मिळतो आणि एकदा मनुष्य जन्म मिळाला याचा अर्थ तो भटकायला स्वतंत्र झाला! कारण मग गुंता निर्माण करणे त्याच्या हातात आले. म्हणून मग त्यानंतरचे काहीच निश्चित नाही. परंतु तोपर्यंतचा रस्ता तर आहेच, आणि तो 'क्लीयर कट' (सुस्पष्ट) आहे. म्हणजे प्रत्येक जीवाचे मनुष्यरूपात प्रथम जन्माला येणे हे एकदम 'रेग्युलर' (नियमित) आहे, ते एकदम वेळेवरच होते. पण नंतर तो गुंत्यात गुंतत जातो, इतका गुंतत जातो की काही विचारूच नका, मग त्यात किती तरी काळ निघून जातात! कारण या मनुष्यजन्मात त्याला कर्तापण उत्पन्न होते आणि कर्तेपणात सर्वच प्रकारची मोकळीक असते, अगदी कोणत्याही गतीत जाऊ शकतो. नरकगतीत जाण्यायोग्य कार्य करू शकतो, जनावरगतीत जाण्यायोग्य कार्य करू शकतो, मनुष्यगतीत सज्जनतेची आणि 'सुपरह्युमन'ची कार्ये पण करू शकतो, मनुष्यगतीत परत येण्यायोग्य कार्य करू शकतो आणि देवगतीत जाण्यायोग्य कार्यही करू शकतो! आणि जर कधी त्याला 'ज्ञानी पुरुष' किंवा वीतराग पुरुष भेटले तर

मग संसारकार्य न करता वीतराग मार्गावर चालला, आत्मकार्यांकडे वळला तर मुक्ती मिळवू शकतो. म्हणजे मुक्ती पण या मनुष्यजन्मातच मिळू शकते. इतर कोणत्याही गतीतून, देवगतीतून देखील मुक्तीत जाऊ शकत नाही. इतर कोणत्याही गतीत जीव कर्ता नाही, फक्त मनुष्यगतीत तो कर्ता आहे.

## 'अहंकाराला वळविणे', हीच वीतरागींची रीत

**प्रश्नकर्ता :** म्हणजे जेव्हा पहिल्यांदा मनुष्य जन्मात येतो तेव्हा खूप 'अलर्ट' (सावध) राहायला हवे.

**दादाश्री :** पण 'अलर्ट' राहण्याची सत्ता त्याच्या हातात नाहीच ना! त्याला जसे संयोग मिळत जातात त्यानुसार तो त्या संयोगात गुंतत जातो! आणि हे 'गुंतणे' सगळ्यांनाच लागू आहे. परंतु जर स्वत:चा 'अहंकार' 'स्वत:ला' समजत असेल, आणि तरी देखील त्याने तो कमी केला नाही, तर समजावे की तो स्वत: जाणूनबुजून गुंतत आहे.

**प्रश्नकर्ता :** मला मनात विचार येत होते की प्रत्येक 'आत्म्याला' एकसमान स्कोप (संधी) मिळत नाही, त्यामुळे एक आत्मा लवकर मोक्षात जातो आणि दुसऱ्याला वेळ लागतो. म्हणजे हे लकमुळे (नशीबामुळे) झाले असे म्हणायचे का?

**दादाश्री :** नाही. ते लकमुळे नाही. तो जेव्हा मनुष्यजन्मात येतो तेव्हा जन्म तर संयोगानुसार मिळतो. येथे पहिल्यांदा जेव्हा मनुष्य जन्म मिळतो तेव्हा तो जन्म असा असतो की त्याला मोक्षाला जायला नुकसानकर्ता नसतो. पण तो आपला अहंकार कुठल्या बाजूला वळवतो, यावर सर्व अवलंबून आहे.

चोराच्या घरी जन्म मिळाला, परंतु जर स्वत: अहंकाराला वळवले नाही तर काही नाही. कारण मनुष्यपणा आहे, त्यामुळे तो अधिकारी झाला ना! तो अहंकाराचा कर्ता झाला आहे. त्यात जर 'स्वत:च' 'अहंकाराला' वळविले नाही, तर काही होणार नाही. जन्म तर कुठेही होऊ शकतो, कसेही संयोग मिळू शकतात पण अहंकाराला कुठे

वळवायचे ते ठरवता आले पाहिजे. म्हणजे जसे जहाजावर होकायंत्र असते तसे इथेही होकायंत्र बसवले पाहिजे. अहंकार असा राखला पाहिजे की हे आता मला चालवायचे आहे, म्हणून मला लक्ष ठेवून 'याच' दिशेने चालवायचे आहे. मनुष्य जन्म मिळाला तेव्हापासून 'स्वत:' 'अहंकारा'ला वळवायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** आणि ते सोपे तर नाही.

**दादाश्री :** ते सोपे असते तर सर्वांनीच केले असते. तेच कठीण आहे, सोपे नाही. खूपच कठीण आहे. कठीण आहे म्हणून तर हे इतके समजण्यासाठी एवढी सारी शास्त्रे लिहिली गेली आहेत! पण तेच फार कठीण आहे.

कधी स्वत:ला आवडते अशी गोष्ट येते आणि कधी नावडती गोष्टही येते, 'त्याला' आवडते संयोग पण मिळतात आणि नावडते संयोग पण मिळतात. आता जेव्हा आवडते संयोग असतात तेव्हा वीतराग म्हणतात, यात कोणतीच वस्तू आवडती करण्यासारखी नाही आणि नावड करण्यासारखीही नाही. यात 'तू' वेगळा रहा. कारण आवडण्यासारखी कोणतीही वस्तू नसतेच. पण ही वस्तू चांगली आहे असे म्हणून 'तू' स्वत:च स्वत:ला बंधनात टाकत आहेस. आणि याला 'चांगले' म्हणालास की आपोआपच दुसऱ्याला 'वाईट' म्हणशील. एकाला चांगले म्हटले की दुसऱ्याला वाईट म्हणणारच. म्हणून वीतराग काय म्हणतात? हे सर्व संयोगच आहेत. पण आपणच या संयोगांचे विभाजन करतो की हा संयोग खूप चांगला आहे आणि हा संयोग वाईट आहे. वीतरागींनी सर्व संयोगांसाठी असेच म्हटले आहे की हे सर्व संयोगच आहेत आणि ते वियोगी स्वभावाचे आहेत, म्हणून कोणत्याही संयोगाला 'आवडता' करू नकोस, जेणे करून मग तुला नावडत्या संयोगाला धक्का मारावा लागणार नाही. आणि जर तू धक्का मारायला जाशील तर तुझा मोक्ष जाईल. जर एखादा नावडता संयोग तुझ्या वाट्याला आला आणि त्याला तू धक्का मारलास तर परत तू अडकशील. म्हणून त्या संयोगाला धक्का मारण्याऐवजी तू त्याला समभावाने पूर्ण कर. आणि तो वियोगी

स्वभावाचाच आहे. म्हणून त्याचा आपोआपच वियोग होईल. तुला कसली भानगडच नाही. आणि जरी नावडत्या संयोगाला तू अडवण्याचे उपाय केले तरी काळ तुला सोडणार नाहीच, तेवढा वेळ तुला त्रास सोसावाच लागेल. म्हणून हा संयोग वियोगी स्वभावाचा आहे, हे लक्षात ठेवून तू जरा धीर धर आणि चालत रहा.

गजसुकुमारला त्याच्या सासऱ्याने मातीची पगडी बांधली होती ना? आणि त्यात निखारे ठेवले होते. त्यावेळी गजसुकुमार समजून गेले की मला हा संयोग मिळाला आहे आणि यात सासऱ्यानी मोक्षाची पगडी डोक्याला बांधली आहे, असा संयोग मला मिळाला आहे. आता असे त्याने मान्य केले, 'बिलीफ'मध्ये मान्य केले की मोक्षाची पगडी बांधलेली आहे आणि त्यात निखारे ठेवले आहेत. नेमिनाथ भगवंतांनी गजसुकुमारला सांगितले होते की 'तुझे' स्वरूप 'हे' आहे आणि 'हे' संयोग हे 'तुझे' स्वरूप नाही. संयोगांचा तू 'ज्ञाता' आहेस आणि सर्व संयोग हे ज्ञेय आहेत. म्हणून ते 'स्वतः' त्या संयोगात पण 'ज्ञाता' राहिले आणि ज्ञाता राहिले म्हणून मुक्त झाले आणि त्यांचा मोक्ष पण झाला. नाहीतर कल्पांत करूनही माणूस शेवटी मरतोच. मरण्याची वेळ आली आणि कल्पांत करून मेला, तर कल्पांत करण्याचे फळ मिळेल.

## आत्मज्ञानानंतर क्रमबद्धता

**प्रश्नकर्ता :** मुलाच्या शिक्षणाची सुरुवात पहिलीपासून होते, आणि मग तो क्रमाक्रमाने पुढे जातो, तर असेच धर्माच्या बाबतीतही म्हणता येणार नाही का?

**दादाश्री :** धर्माच्या बाबतीत पण असेच आहे. पण एकदा मनुष्यगतीत आल्यानंतर मात्र सर्व बदलते, सर्व वेडे-वाकडे होते, इथून, मनुष्यगतीतून तो अधोगतीत जातो किंवा ऊर्ध्वगतीत जातो.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे इथे मनुष्यगतीत आल्यानंतर क्रम असे काही राहत नाही का?

**दादाश्री :** नाही. पण आत्मज्ञान झाल्यानंतर मात्र परत क्रम सुरू

होतो. म्हणजेच आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर क्रमबद्धता येते. जोपर्यंत मनुष्य जन्म आहे आणि आत्मज्ञान होत नाही, तोपर्यंत भटकत राहतो. मग तिथे क्रम–ब्रम वगैरे काही राहत नाही. जर मनुष्य जन्मात असे काही होत नसेल तर भगवंतानी असेच लिहिले असते की सगळे काही नियतीच्या आधीन आहे.

## स्वभावानेच उर्ध्वगामी! परंतु केव्हा?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा मूळ स्वभाव उर्ध्वगामी आहे. हा जो मनुष्य देह आपल्याला मिळाला आहे, तो उर्ध्वगामी स्वभावामुळे मिळाला आहे असे म्हणतात. आता या मनुष्यजन्मात तो जी कर्मे करतो त्या कर्मांचे फळ मिळाल्यावर तिर्यंचगतीत (पशुयोनीत) जावे लागते. मग तिर्यंचगती भोगल्यानंतर परत मनुष्य देहात येतो, तर तिथे त्याला कोणता नियम लागू पडतो?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की इथे कर्मबंधने बांधतो त्यामुळे *पौद्गलिक* भार (ओझे) वाढतो, आणि *पौद्गलिक* भार वाढला तर खालच्या गतीत जातो. मग त्या खालच्या गतीत त्या *पुद्गलाला* भोगल्यानंतर *पौद्गलिक* भार कमी होतो, आणि मग परत मनुष्यजन्मात येतो! आणि मनुष्यजन्मात येऊन जर मनुष्यधर्माचा भाव तुटला आणि देवाधर्माचा भाव उत्पन्न झाला तर (*पौद्गलिक*) भार कमी होतो, आणि त्यामुळे मग देवगतीत जातो. जसाजसा भार वाढतो तसातसा खाली जातो. खाली सात पाताळ आहेत, सात लोक आहेत, तिथपर्यंत जातो! आणि भार कमी झाला की वर सहा लोक आहेत तिथपर्यंत जातो. तर अशी ही 'चौदालोका'ची दुनिया आहे.

*पुद्गल* म्हणजे अंधकार, आणि आत्मा म्हणजे प्रकाश. अंधकारात ओढला गेला तर खाली जातो, प्रकाशात ओढला गेला तर वरती जातो.

## अधोगामी तर अहंकारामुळे

**प्रश्नकर्ता :** पण आत्म्याचा तर सहज स्वभाव आहे ना? तर मग श्रेयाची साधना का करावी लागते?

**दादाश्री :** आत्म्यासाठी तर श्रेयही नाही आणि प्रेयही नाही. आत्म्याचा स्वभाव उर्ध्वगामी आहे, निरंतर उर्ध्वगामी स्वभावात आत्मा आहे. आत्मा उर्ध्वगामी स्वभावाचा आहे, याउलट *पुद्‌गलाचा* स्वभाव अधोगामी आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग उर्ध्वगामीची व्याख्या सांगा.

**दादाश्री :** उर्ध्वगामी म्हणजे स्वभावानेच मोक्षाला जाईल असा आहे. 'तुम्ही' जर ढवळाढवळ केली नाही तर स्वभावानेच मोक्षाला जाईल असा आत्मा आहे. त्यात 'तुम्हाला' काही करावे लागेल असे काही नाही. आणि *पुद्‌गल* स्वभावानेच अधोगतीत घेऊन जाणारे आहे. *पुद्‌गलाचा* जोर जेवढा वाढतो तेवढा तो खाली दाबला जातो, *पुद्‌गलाचा* जोर जेवढा कमी होतो तेवढा वरती चढतो आणि तो जेव्हा *पुद्‌गलरहित* होतो, तेव्हा मोक्षाला जातो.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा तर उर्ध्वगामी स्वभावाचाच आहे, तर मग परत तो अधोगतीत का जातो?

**दादाश्री :** जेवढे नुकसानदायक विचार असतील, माणसाचे किंवा कोणत्याही जीवाचे नुकसान करण्याचे विचार केले, किंवा कोणत्याही जीवाला दु:ख द्यावे असा विचार देखील केला की वजनदार परमाणू चिकटतात. त्यामुळे तो वजनदार होतो, ते मग त्याला खाली घेऊन जातात. आणि जगाचे चांगले करण्याचे विचार आले तर हलके परमाणू चिकटतात, ते त्याला वर घेऊन जातात.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा निरंतर मोक्षाकडे चालला आहे असे म्हटले जाते?

**दादाश्री :** हो, निश्चितच. तो पुढेच जात असतो, पण वजनदार परमाणू गोळा करतो, म्हणून खाली जातो. आत्म्याचा स्वभाव उर्ध्वगामीच आहे आणि हे *पुद्‌गल* त्याला खाली ओढते. त्यामुळे ही ओढाताण चालू राहते. म्हणूनच आम्ही सांगतो की कर्मांपासून मुक्ती मिळवा. शुद्धात्मा प्राप्त झाला की मग पुद्‌गलाचे ओढणे कमी होते. नाही तर तोपर्यंत

काळ, कर्म, माया सर्व काही बाधक होत राहतात. म्हणून जेव्हा तो *पुद्गलाच्या* या क्रमाचा पूर्णपणे निकाल लावील, तेव्हाच 'तो' स्वतःच्या स्वभावात राहून मोक्षाला जाईल.

म्हणजे *पुद्गलाचा* स्वभाव हा अधोगामी आहे. पण *पुद्गलाचा* स्वभाव कशा प्रकारे अधोगामी होतो? शरीर जाड आहे यावर नाही किंवा वजन जास्त आहे यावर नाही, तर अहंकार किती मोठा आहे, अहंकार किती लांब-रुंद आहे त्यावर अवलंबून आहे. तसा तर तो शरीराने सडपातळ असतो पण अहंकार मात्र पूर्ण जगाएवढा असतो. आणि एखाद्याचे वजन खूप जास्त असते, अगदी अडीचशे किलो असते, पण त्याला अहंकार नसेल तर तो बुडणार नाही! अहंकार म्हणजे वजन! अहंकाराचा अर्थच वजन!

म्हणजेच हे जग अपार आहे, पण तरी नियमबद्ध आहे. कारण आत्म्याचा स्वभावच उर्ध्वगमन करणारा, सिद्धगतीकडे गमन करणारा (जाणारा) आहे.

## मनुष्य जन्मानंतर वक्रगती

**प्रश्नकर्ता :** भौतिक विज्ञानाचा उत्क्रांतीवाद, थिअरी ऑफ इव्होल्यूशन आणि जगाचे अनादिपण, याचा मेळ कसा बसतो? हे समजावण्याची कृपा करा.

**दादाश्री :** जग अनादि अनंत आहे. यात हे जीव उत्क्रांती प्राप्त करतच राहतात. जीवांचे तीन भाग केले गेले आहेत. यापैकी एका विभागात अजिबात उत्क्रांती होत नाही. ते जीव म्हणजे स्टॉकमध्ये पडून राहिलेल्या मालाप्रमाणे आहेत. त्यांना अव्यवहार राशी म्हणतात. आणि स्टॉकमधून मग आत येतात, व्यवहारराशीत येतात आणि व्यवहारजीवांची उत्क्रांती होतच राहते. उत्क्रांती झाल्यावर शेवटी जीव मोक्षात जातात. उत्क्रांती होत होत, सर्व अनुभव घेत घेत, मग पुढे जाऊन ते मोक्षाला जातात.

चार इंद्रिये होती आणि कान सर्वात शेवटी येतात. सर्वात शेवटचे

इंद्रिय कान. शेवटचे डेव्हलपमेंट कानाचे आहे. त्यापूर्वीच्या डेव्हलपमेंटमध्ये कानाच्या जागी छिद्र असते, नाहीतर चारच इंद्रिये असतात.

चौथे इंद्रिय डोळे असतात, तेव्हा कीटक बनतो. डोळे उघडले की त्याला उजेडाचा मोह उत्पन्न होतो. म्हणून उजेडाच्या मागे लागूनच तो मरून जातो. हे कान उघडले की ऐकण्या मागे लागून मरून जातो. संपूर्ण दिवसभर कुठून ऐकू, कुठून ऐकू असे वाटते. मग तो रेडियो ऐकतो, गाणी ऐकत बसतो! ज्याचे नवीन इंद्रिय विकसित झालेली असते, त्याला असे सर्व होत असते.

या मुंग्याना तिसरे इंद्रिय मिळाले की सतत धावत-पळत, धावत-पळत असतात. इथे काही लटकवलेले असेल किंवा पातेले सीलिंगपासून तीन फूट खाली असेल, तरी त्यांना जमिनीवर त्याचा पत्ता लागतो. नाकाच्या इंद्रियामुळे इथे तूप आहे याचा पत्ता लागतो. मग तिथे कसे पोहोचता येईल हे पण त्यांना समजते. त्या भिंतीवर चढून वर जातात आणि मग खाली उतरतात आणि मग तूप चाटतात. कारण हे नवीन नाकाचे इंद्रिय मिळाले आहे, म्हणून मग सर्व दिवस त्याच्याच मागे धावत-पळत असतात.

म्हणजे हे लोक चौऱ्यांशी लाख योनी म्हणतात ना, तर त्यात हे सर्व मिळून चौऱ्यांशी लाख योनी जीव जातीची आहेत. नाहीतर जर असे चौऱ्यांशीमध्ये फिरायला गेला तर मग पुन्हा दिसणारच नाही ना, कसा दिसणार? पण असे नसते. हे तर इथेच भटकत राहायचे असते. माणसातून जो जनावरात जातो, तो आठ जन्म त्या बाजूला जातो, आणि मग परत इथेच येतो.

**प्रश्नकर्ता :** पण उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे मनुष्यगतीतून परत खालच्या गतीत जाऊ शकत नाही ना?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, मनुष्यगती ही एकच गती अशी आहे की जिथे 'चार्ज' आणि 'डिस्चार्ज' दोन्ही क्रिया होत असतात. देवगती फक्त 'डिस्चार्ज' स्वरूपात आहे, तिर्यंचगती डिस्चार्ज स्वरूपात

आहे, नरकगती डिस्चार्ज स्वरूपात आहे. म्हणजेच मनुष्यगतीतून जे जनावरगतीत किंवा नरकगतीत किंवा देवगतीत गतीत गेलेले आहेत ते सर्व मनुष्यामधूनच गेलेले आहेत. डार्विनची थिअरी एकदम चुकीची नाही, त्याची थिअरी 10-15 टक्के बरोबर आहे. पण प्रत्यक्षात तर 360 डिग्री असतात! आणि त्याला त्या सर्व डिग्रीचे संपूर्ण ज्ञान नव्हते. त्याला बुद्धीने जे मिळाले ते बरोबर आहे, करेक्ट आहे. पण त्यानंतर पूर्ण मार्ग वळण घेतो त्याबद्दल त्याला माहीत नव्हते की मनुष्यजन्मात आल्यानंतर तो परत गाय-म्हैस पण होत असतो. गायी-म्हशी, ही 'डेव्हलपमेंट'ची गती नाही, त्या तर मनुष्यामधूनच तिथे जात असतात.

म्हणजेच उत्क्रांतीचा नियम 10 टक्केच खरा आहे. बाकीच्या 90 टक्क्याबद्दल त्याला माहिती नाही. दहा टक्क्यात त्याने मनुष्यगतीपर्यंतचा शोध लावला आहे ना! मनुष्य जन्मानंतर जी वक्रगती होते, ते त्याला समजले नाही. माणसातून हत्ती कसा बनला? रेडा कसा बनला? गेंडा कसा बनला? मासा कसा बनला? व्हेलमासा कसा बनला? ते त्याला समजले नाही. म्हणजे हा जो त्याचा उत्क्रांतीचा नियम आहे, डार्विनची थिअरी आहे, ती बरोबर आहे, पण ती फक्त 10 टक्के बरोबर आहे. त्याच्यापुढे तर खूप काही आहे. हा व्हेल मासा कसा बनत असेल? तिथे कुठे उत्क्रांतीचा नियम आला? ती तर वक्रगती आहे, माणसातून परत आला आहे. हा गेंडा कसा बनला? तो देखील माणसातून परत आला. हे वाघ-सिंह कुठून परत आले आहेत? माणसातून परत आले आहेत. वाघ-सिंह यांची पिल्ले असतात, तर ते पिल्ले असल्यापासूनच मांसाहार करतात की नाही? आणि आपल्या गायी, म्हशीची पिल्ले? मोठी झाली तरी मांसाहार करत नाहीत. त्याचे काय कारण? तर हे 'वेजिटेरियन' (शाकाहारी) आहेत आणि ते 'नोन वेजिटेरियन' (मांसाहारी) आहेत. म्हणजे यातही असे ओळखता येते की जी माणसे इथे 'वेजिटेरियन' होती, ती आता गाय-म्हैश या रूपात आली आहेत. आणि जी माणसे 'नोन वेजिटेरियन' होती, ती वाघ-सिंह म्हणून जन्माला आली आहेत. म्हणजे हे सर्व ओळखता येते.

**प्रश्नकर्ता :** तर मग मनुष्यजन्मानंतर परत पृथ्वीकाय, तेउकाय यात जातात, की नाही जात?

**दादाश्री :** पृथ्वीकाय आणि तेउकाय यात जात नाहीत. फारच झाले तर स्थावरकायमध्ये जातात, झाड-पानाच्या योनीत जाऊ शकतात. माणसामधून फार तर आठ जन्म तिर्यंच योनीत जाऊ शकतात.

म्हणजे संपूर्ण देवगती, संपूर्ण नरकगती आणि तिर्यंचगतीचा अमुकच भाग, हे सर्व माणसातून (तिथे) गेलेले आहेत. माणूस 'चार्ज' आणि 'डिस्चार्ज' दोन्हीही करत असतो आणि 'चार्ज' आणि 'डिस्चार्ज' यापासून दूरही राहू शकतो. म्हणजे माणसात एवढी शक्ती आहे की तो मोक्षाला जाऊ शकतो.

ज्याचे सज्जनपण जात नाही, त्याचे माणूसपण जात नाही. जर त्याला पाशवतेचे विचार येत असतील तर ते विचार त्याला तिर्यंच योनीत घेऊन जातात. भोगण्याची सीमा असते. तुझ्या मालकीचे आहे तेच तू उपभोग आणि जे तुझ्या मालकीचे नाही त्याचा विचारही करू नकोस. हे जे बिनहक्काचे उपभोगतो, तेच त्याला पशुयोनीत घेऊन जाते, म्हणजेच आपले विचारच आपल्याला या सर्व गतीत घेऊन जातात.

काही स्थावर, फळ देणारी झाडे असतात, ज्या माणसाने छळ-कपट वगैरे सर्व केले असेल, तो नारळ, आंबा, रायण अशा झाडात जातो, आणि मग संपूर्ण आयुष्यभर स्वतःची फळे देत राहतो, तेव्हा कुठे तो लोकांच्या ऋणातून मुक्त होतो. आंबे इतके मधुर असतात तरी (झाड) स्वतः ते आंबे खात नाही ना? असे मधुर आंबे लोकांना देऊन मग कर्म मुक्त होतो. म्हणजेच हे सर्व 'सायंटिफिक' (विज्ञानाला धरून) आहे. यात कोणाचे काही चालेल असे नाही.

## ...तेव्हा मोक्षाला जाईल

**प्रश्नकर्ता :** 'थिअरी ऑफ इव्होल्यूशन'च्या गोष्टीत, म्हणजेच उत्क्रांतीवादाप्रमाणे जीव एकेंद्रिय, दोन इंद्रिय, अशा प्रकारे 'डेव्हलप' होत होत मग मनुष्ययोनीत येतो. आणि मनुष्यातून परत पशुयोनीत जातो. तर या इव्होल्यूशनच्या थिअरीत थोडा विरोधाभास वाटतो. तो जरा स्पष्ट करा.

**दादाश्री :** नाही. यात विरोधाभास असे काही नाही. 'इव्होल्यूशन'ची 'थिअरी' बरोबरच आहे. पण फक्त मनुष्य जन्मापर्यंत पोहोचण्यापर्यंतच ही थिअरी बरोबर आहे, मग त्याच्या पुढचे या लोकांना माहीतच नाही.

**प्रश्नकर्ता :** माणसातून परत पशुयोनीत जातो का? असा प्रश्न आहे?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की प्रथम डार्विनच्या थिअरीप्रमाणे डेव्हलप होत होत मनुष्यजन्मापर्यंत पोहोचतो. आणि मनुष्यात आल्यानंतर इगोइजम (अहंकार) सोबत असल्यामुळे कर्ता बनतो. कर्माचा कर्ता बनतो, म्हणून मग कर्मानुसार त्याला भोगण्यासाठी जावे लागते. जर 'डेबिट' (पापे) केले तर पशुयोनीत किंवा नरकयोनीत जावे लागते आणि 'क्रेडिट' (पुण्य) केले तर देवगतीत जावे लागते किंवा मनुष्ययोनीत चांगले राजसी जीवन मिळते. म्हणजेच मनुष्यजन्म मिळाल्यानंतर पुढचे सर्व क्रेडीट आणि डेबिट वर अवलंबून आहे.

इथे 'क्रेडिट'-'डेबिट' करणारे लोक आहेत की नाहीत? सध्या लोक 'डेबिट' जास्त करतात ना? त्यांना माहीतच नाही की नंतर कोणत्या गावी जावे लागेल, तरी 'डेबिट' करतातच ना? म्हणून मग दोन पायांऐवजी चार पाय आणि शेपूट मिळते! पण मग नंतर परत येथे मनुष्य जन्म घेतो. मग आणखी खाली जात नाही. एकदा मनुष्ययोनीत आल्यावर 100-200 वर्षे (इतर योनीत) भोगून परत इथे मनुष्यजन्मातच येतो. आणि मग मात्र हे स्थान, मनुष्यपण सोडत नाही. इथून मग मोक्षाला जाईपर्यंत त्याचे माणूसपण जात नाही. 'डेबिट' असेल तर 100-200 वर्षे जनावरगतीत जाऊन येतो, किंवा लाखो वर्षे नरकयोनीत जाऊन येतो आणि 'क्रेडिट' असेल तर लाखो वर्षे देवगतीत जाऊन येतो. पण एकदा ते भोगून झाले की मग मात्र इथल्या इथेच येतो. इथून मग जेव्हा मोक्षाची तयारी करील तेव्हा मोक्षाला जाईल, तोपर्यंत मात्र इथेच भटकत राहायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** जेव्हा मनुष्ययोनीत येतो तेव्हा त्याचे मन पण डेव्हलप

झालेले असते, तर मग परत पशुयोनीत गेल्यावर तो मनाचे 'डेव्हलपमेंट' गमावतो का?

**दादाश्री :** नाही. पण त्या मनावर आवरण येते. जनावरगतीत त्याला मन असते पण ते 'लिमिटेड' (मर्यादित) असते. आणि परत तिथे त्याचे जेवण पण त्याच प्रकारे असते, रक्त वगैरे पण जनावराचेच असते. पण भोगण्यासाठी त्या योनीत जावे लागते. असे जर नसते ना तर लोक नोकरी करायला गेलेच नसते आणि चोऱ्या करूनच खात राहिले असते! पण याचे फळ लगेच दुसऱ्या जन्मात मिळते.

आता इथे बिनहक्काचे खातात, भेसळ करून विकतात, बिनहक्काचे उपभोगतात, हे सर्व पाशवी विचार आहेत. ही जनावरात जाण्याची तयारी होत आहे. तर आपण समजून जावे की हे असे विचार त्याला जनावरात घेऊन जातील आणि इथे सज्जनपणाचे विचार त्याला परत माणसात आणतील. आणि स्वतःच्या हक्काची वस्तू देखील जो दुसऱ्याला देईल असे 'सुपरह्यूमन' विचार ज्याचे असतील, तो देवगतीत जाईल.

**प्रश्नकर्ता :** पशुयोनीत त्याला चांगले-वाईट विचार येतात का?

**दादाश्री :** नाही, तिथे असे काही विचार येत नाहीत. पशुयोनी म्हणजे तर फक्त भोगण्याची योनी. देवगती पण भोगण्याची योनी आणि नरकगती पण भोगण्याची योनी. फक्त मनुष्यजन्मात कर्म बांधणे आणि कर्म भोगणे या दोन्ही गोष्टी एकत्र होतात.

**प्रश्नकर्ता :** 'क्रेडिट' आणि 'डेबिट' दोन्ही बंद झाले तर?

**दादाश्री :** 'क्रेडिट' आणि 'डेबिट', पुण्य आणि पाप दोन्हीही बंद झाले तर मोक्षाला जाईल!

## गतीत भटकत राहण्याचा निसर्गाचा नियम

**प्रश्नकर्ता :** पण असे म्हणतात ना, की चौऱ्यांशी लाख योनीत भटकल्यानंतर मानव जन्म मिळाला आहे, आणि परत एवढेच भटकावे लागते आणि मग माणसाचा जन्म मिळतो ना?

**दादाश्री :** नाही, असे काही नाही. एकदा मनुष्यजन्म मिळाला की परत पूर्ण चौर्यांशीमध्ये फिरावे लागत नाही. जर त्याला पाशवी विचार आले तर आठ जन्म पशुयोनीत जावे लागते. तेही शंभर-दोनशे वर्षांसाठी. मग परत इथल्या इथेच, मनुष्यजन्मात येतो. एकदा मनुष्य झाल्यावर मग फार भटकावे लागत नाही.

**प्रश्नकर्ता :** एकच आत्मा चौऱ्यांशी लाख फेरे फिरतो ना?

**दादाश्री :** हो, एकच आत्मा.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा तर पवित्र आहे ना?

**दादाश्री :** आत्मा तर आत्ताही पवित्रच आहे. चौऱ्यांशी लाख योनीतून फिरून देखील पवित्रच राहिला आहे, पवित्रच होता आणि पवित्रच राहील.

**प्रश्नकर्ता :** तर मग त्याला फिरण्याचे काय कारण?

**दादाश्री :** आत्म्याला काहीच कारण नाही, तो तर आनंदातच आहे. ज्याला दुःख आहे त्याला ते दुःख दूर करण्याची इच्छा होते. नाहीतर आत्मा तर आनंदातच आहे.

## भिन्नता दिसते, भ्रांतीमुळे

**प्रश्नकर्ता :** जगात भिन्नता का उत्पन्न झाली आहे? भिन्नता नसती तर आत्म्याची एकता जगात सर्वत्र पसरली असती. जगात सुख आणि दुःख, ही पण भिन्नता आहे, श्रीमंत आणि गरीब, ही पण भिन्नता आहे. तर ही भिन्नता कशामुळे उत्पन्न झाली?

**दादाश्री :** या जगात असे काही उत्पन्नही झालेले नाही आणि काही विनाशही झालेले नाही. उत्पत्ती आणि विनाश या सर्व फक्त अवस्थाच दिसतात. मूळ तत्त्वाला काहीच होत नाही. अवस्थांमध्ये भिन्नता भ्रांती असलेल्यांना दिसतात. मूळ तत्त्वात कधीच फरक होत नाही.

ही विपरीत बुद्धी असे सर्व दाखविते. बुद्धीचा जन्म झाला आहे.

तिचा 'एन्ड' (शेवट) होईपर्यंत बुद्धी यात फसवतच राहील. जर बुद्धी 'रिटायर्ड' झाली तर तुमचे काम होईल. पण ती 'रिटायर्ड' होतच नाही ना, ऐंशी वर्षे झाली तरी 'रिटायर्ड' होत नाही.

**प्रश्नकर्ता :** पाणी आणि ताडी, या दोघांत भिन्नता आहे.

**दादाश्री :** अशी भिन्नता असतेच ना! स्वाभाविकपणेच भिन्नता असते. ताडी पांढरी दिसते पण प्यायली तर (नशा) चढते पण पाण्याची नशा चढत नाही. कोणतीही गोष्ट आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहतच नाही!

**प्रश्नकर्ता :** प्रत्येक प्रकारच्या जीवाच्या आणि मनुष्याच्या आहारात भिन्नता ठेवली आहे ना?

**दादाश्री :** भिन्नता आहेच. प्रत्येक वस्तूत भिन्नता असते. राईच्या दोन दाण्यात देखील भिन्नता असते.

**प्रश्नकर्ता :** पण ही भिन्नता का उत्पन्न झाली? ती नसती तर सुखच वाटले असते.

**दादाश्री :** हो, पण या तर साऱ्या कल्पनाच आहेत ना! ही बुद्धी आहे ना, ती अशी कल्पना करविते की 'असे नसते तर असे झाले असते, असे असते तर असे झाले असते.' पण हे शब्दच 'डिक्शनरी'तून (शब्दकोशातून) काढून टाकले पाहिजेत. 'असे असते तर असे झाले असते' हे शब्दच असता कामा नयेत, 'डिक्शनरी'मध्येही कधी ठेवू नका.

**प्रश्नकर्ता :** तर मग ही भिन्नता आत्मा-परमात्मा यांनी उत्पन्न केली आहे का? जाणूनबुजून केली की आपोआप झाली?

**दादाश्री :** नाही, भिन्नता नाहीच. त्याला असे दिसते ती तर त्याची 'राँग बिलीफ'च आहे. समजा इथे एखाद्या माणसाने दिवसा एक पुस्तक वाचले आणि त्यात भुताची गोष्ट वाचली, आणि मग तो एकटाच रात्री खोलीत झोपला असेल आणि शेजारच्या खोलीत उंदराने भांड्यांची खुडबुड केली की तो लगेच घाबरतो. म्हणजे एकदा जर त्याच्या मनात

भूत घुसले की मग जोपर्यंत ते निघत नाही तोपर्यंत त्याच्यावर भुताचा परिणाम होतच राहतो, तसेच हे परिणाम आहेत.

**प्रश्नकर्ता :** सृष्टीत पण जीवमात्रात भेद (फरक) केले आहेत ना?

**दादाश्री :** जीवमात्रात भेद नाहीच मूळी. सगळे जीव एकाच स्वभावाचे आहेत. फक्त त्याच्या दृष्टीभेदामुळे त्याला हे सर्व भेद दिसतात. आणि भेद हे तर निसर्गाचे संचालन आहे. आणि तोही बाह्यभेद आहे, 'कपड्यां'चा भेद आहे. मूळ भेद नसतोच.

**प्रश्नकर्ता :** आचरणात भेद आहे. उदा. गाय, म्हैस, बकरी हे शाकाहारी आहेत आणि वाघ, सिंह हे मांसाहारी आहेत. हा भेद कोणी उत्पन्न केला? हा भेद का आहे? हा जीवाचा भेद आहे, शरीराचा भेद आहे की भौतिक भेद आहे? जीवांमध्ये हा भेद आहे म्हणून त्या लोकांच्या जीवनात फरक आहे?

**दादाश्री :** नाही. असे नाही. हे मी तुम्हाला सांगतो, ऐका. कित्येक जमातीचे लोक आहेत, ते सर्व मांसाहार करत नाहीत ना? आता त्यांना जर जनावरगतीत जावे लागले तर ते कुठे जातील? तर जिथे मांसाहारी जाती नसेल तिथे ते जातात. म्हणजेच गायी-म्हशी, ज्या मांसाहार करत नाहीत, तिथे ते लोक जातात. आणि मांसाहारी राजा वगैरे सर्व जेव्हा पशुयोनीत जातात, तेव्हा ते कुठे जातात? ते काही गायी-म्हशीत जात नाहीत, ते तर वाघ-सिंह अशा योनीत जातात. म्हणजेच ही सर्व व्यवस्था एकदम नियमबद्ध आहे. प्रत्येक देशात 'वॉरियर्स' (सैनिक) नियमांनेच उत्पन्न होतात.

त्याचे असे आहे की, या जगात सगळ्या लोकांचे विचार एकसारखे असतात का? प्रत्येक माणसाचे विचार वेगवेगळेच असतात. त्याचे कारण काय? हे जे गोलाकार असते, सर्कल वर्तुळ, तुम्ही पाहिले आहे का? त्याच्या 360 डिग्री असतात. तर या जगातील माणसे वेगवेगळ्या 360 डिग्रीवर-अंशावर उभी आहेत. म्हणजे तो ज्या अंशावर उभा असेल आणि तिथून त्याला जसे दिसते तसाच तो बोलतो. त्यात त्याचा दोष

नाही. म्हणजेच अंशावर हे सगळे मतभेद आहेत. कारण (प्रत्येकाचे) अंश वेगवेगळे आहेत. आणि जेव्हा मध्ये-केंद्रावर येतात, तेव्हा त्यांना समजते की परमात्मा म्हणजे काय? जग म्हणजे काय? जग कशा प्रकारे चालते?

## जग कल्याणाची अद्‌भुत, अपूर्व भावना

**प्रश्नकर्ता :** आत्मा आहे असे तर जैनांनी, वेदांतींनी आणि सर्वांनीच म्हटले आहे. पण आताची जी वैज्ञानिक दृष्टी आहे ती 'युनिव्हर्सली' (सार्वत्रिकपणे) सर्व का स्वीकारत नाहीत?

**दादाश्री :** नाही स्वीकारणार. कारण त्यांना हे समजत नाही ना! आत्म्याचे अस्तित्व तर आपल्या हिंदुस्तानात सर्वच दर्शन स्वीकारतात. पण फॉरेनच्या लोकांना आत्म्याच्या अस्तित्वाचे दर्शन नसते. कारण त्या लोकांना अजून पुनर्जन्मच समजलेला नाही. ज्या लोकांना पुनर्जन्म समजतो, त्याच लोकांना आत्म्याचे अस्तित्वाचे दर्शन असते.

**प्रश्नकर्ता :** परंतु जर एखादी गोष्ट 'युनिव्हर्सली' सत्य असेल तर मग ती गोष्ट सर्वांना 'युनिव्हर्सली' सर्वांना का समजत नाही?

**दादाश्री :** त्याचे काय आहे, ही जी सारी सत्ये आहेत, जरी ती 'युनिव्हर्सली' असली तरी पण ती सापेक्ष सत्ये आहेत. मी तुमच्याबरोबर बोलत असेन, पण माझे बोलणे या शेजारच्या भाईंना समजणार नाही की मी काय सांगू इच्छितो, पण तुम्हाला लगेच समजते. म्हणजेच प्रत्येकाचे 'व्ह्यू पॉइंट' (दृष्टीकोन) वेगवेगळे असतात आणि हिंदुस्तानाखेरीज बाहेरील कोणीही माणूस आत्म्यासंबंधी काहीही समजू शकणार नाही. जर माझ्याजवळ फॉरेनचे सायंटिस्ट येतील तर तेव्हा मी त्यांना सर्व मुद्देसूदपणे तपशीलवार समजावून सांगेन. आणि फक्त या सायंटिस्ट लोकांनाच हे समजेल, पण तेही काही मर्यादेपर्यंत. हे सर्व जेवढे तुम्हाला समजते तेवढे तर त्यांनाही समजणार नाही. कारण ते लोक अजून 'डेव्हलप्ड' झालेलेच नाही ना! अध्यात्माच्या बाबतीत फॉरेनचे सर्व लोक 'अंडर डेव्हलप्ड' आहेत.

**प्रश्नकर्ता :** हिंदुस्तानात कोणी असा पुरुषार्थ का करू शकत नाही की ज्यामुळे ही गोष्ट सर्वांपर्यंत 'यूनिव्हर्सली' पोहोचेल?

**दादाश्री :** ही गोष्ट पोहोचू शकेल, परंतु सध्या वीतरागींचा जो प्रकाश आहे, त्यांच्या गोष्टींवर आवरण आले आहे. सध्या मी एकटाच 'ज्ञानी पुरुष' आहे. मी साऱ्या जगातील प्रश्नांचे खुलासे द्यायला तयार आहे. चार अब्ज लोकांना संपूर्ण खुलासे द्यायला तयार आहे, पण त्या लोकांनी मला भेटायला हवे. नाहीतर मी काय करू शकणार? मी कुठे कुठे पोहोचणार? तुम्ही मला भेटलात हा 'सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एव्हिडन्स' आहे आणि मला भेटलात म्हणून तुमचे काम होईल. नाहीतर जो मला भेटू शकत नाही त्याचे काम होऊ शकत नाही. भेटला तर त्याला सर्व खुलासे मिळतील, नाहीतर मिळणार नाहीत.

बाकी तर, एक दिवस सर्व 'सायंटिस्ट' लोकांना एकत्र करण्याचा माझा विचार आहे आणि तेव्हा मी साऱ्या जगातील सर्व 'सायंटिस्टांना' संपूर्ण तथ्य अगदी उघडपणे सांगेन की 'हे शरीर कशाचे बनले आहे? मन काय आहे? मनाचा जन्म कसा होतो? मनाचा विलय कसा होऊ शकतो? बुद्धी म्हणजे काय? आत्मा म्हणजे काय? जग कशा प्रकारे चालू आहे?' म्हणजेच हे सर्व तर पूर्ण विज्ञान आहे, आणि ते लोकांपर्यंत पोहोचले तर लाभ होईल असे आहे.

**प्रश्नकर्ता :** माझे म्हणणे हेच होते की तुमच्याजवळ तर 'मी आत्मा आहे, मी असंग आहे' हे सर्व 'एक अधिक एक बरोबर दोन' इतके स्पष्ट होऊन जाते. 'माझ्यात काहीही करायची शक्तीच नाही.' असे स्पष्टपणे वर्तत असते. तर असे साऱ्या जगाला झाले तर खूप लाभ होईल ना! खूप उपकार होईल ना?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की सर्व जगाला एकसारखे 'दर्शन' नसते. कारण प्रत्येकाचे व्ह्यू पॉइंट वेगवेगळे आहेत, म्हणजेच प्रत्येकाला याची गरजच नाही. आम्ही तर त्याला एवढे सांगतो की 'तुला आत्म्याबद्दल सर्व समजावून सांगू, तरी पण दुसऱ्या दिवशी त्याला काहीही लक्षात राहणार नाही. हे दर्शन पोहोचणार नाही आणि सर्व मेहनत वाया जाईल.

आपल्या हिंदुस्तानातील लोकांसाठीच अशी मेहनत करणे फलदायी होऊ शकते. आणि फॉरेनच्या लोकांसाठी ते किती फलदायी होईल? आम्ही त्यांच्या 'सायंटिस्ट'ना समजावून सांगू शकू आणि मार्गदर्शन करू शकू आणि ते 'सायंटिस्ट' त्यांच्या भाषेत लोकांना समजावून सांगतील तरच ते घरोघरी पोहोचेल. माझी आयडिया अशी आहे की संपूर्ण जगात कोपऱ्याकोपऱ्यापर्यंत 'ही' 'विज्ञाना'ची गोष्ट पोहोचवावी आणि प्रत्येक ठिकाणी शांती व्हायलाच हवी. माझी भावना म्हणा, माझी इच्छा म्हणा, माझे सर्वकाही हेच आहे!

## ...तेव्हा 'ज्ञान-प्रकाशा'त येईल

जगात जे 'रिअल' ज्ञान आहे, 'यूनिव्हर्सल ट्रुथ' आहे, तिथपर्यंत बुद्धी पोहोचू शकत नाही. ते बुद्धीच्याही पलीकडे आहे. बुद्धी तिथपर्यंत येऊन थांबते. बुद्धीच्या त्या शेवटच्या स्तराला जर ओलांडू शकला तर 'ज्ञान-प्रकाशात' येईल, 'युनिव्हर्सल ट्रुथ'मध्ये येईल. म्हणजे मनाचे सर्व स्तर पूर्ण होतात, त्यानंतर बुद्धीचे स्तर सुरू होतात आणि ते बुद्धीचे सर्व स्तर पूर्ण झाल्यानंतर 'ज्ञान-प्रकाशात' येते. परंतु तिथपर्यंत कोणी पोहोचू शकत नाही. अहो, लोक तर बुद्धीच्या स्तरावरही पोहोचू शकले नाहीत, म्हणून मग मनाच्या स्तरावरच राहतात.

## जगाची वास्तविकता फक्त 'ज्ञानी'च प्रकाशमान करतात

'ज्ञानी पुरुष' तर सर्व जगातील गोष्ट सांगू शकतात. जे वेदांमध्ये नाही, कोणत्याच शास्त्रात नाही, असे सर्वच 'ज्ञानी पुरुष' सांगू शकतात, कारण 'ज्ञानी पुरुष' ते आपले माध्यम आहेत. या माध्यमाद्वारेच आपल्याला सगळे काही समजू शकते. नाहीतर हे वास्तव पुस्तकात लिहिता येईल असे नाही, ते अवक्तव्य आणि अवर्णनीय असे आहे, तर त्यात वेदांचा काय दोष? हो, हे मी तुम्हाला 'संज्ञेद्वारे' समजावू शकतो, पण वेद संज्ञा कशी करू शकतील? एरवी वेद याचे उत्तर देऊ शकत नाहीत. वेदांनी दिले नाही, हे तर 'ज्ञानी पुरुषां'चेच काम आहे.

लोक ज्याला चेतन मानतात ते सर्व भौतिकच आहे, त्यात

आध्यात्मिक काहीच नाही. आत्मा ही मूळ वस्तू आहे आणि 'तुम्ही' ज्याला आत्मा मानता, ते सर्व पण भौतिकच आहे. त्यात किंचितमात्र, एका केसाएवढाही 'आत्मा' नाही. फक्त चुकून 'तुम्ही' तसे 'मानता', एवढेच. कारण जो 'मूळ आत्मा' आहे तो 'मेकॅनिकल' नाही, आणि तुम्ही 'मेकॅनिकल' आत्म्याला मूळ आत्मा मानता, पण 'मेकॅनिकल आत्मा' हा तर भौतिक आत्मा आहे.

**दादाश्री :** हे सर्व लोक चेतनावाले आहेत की चेतन नसलेले आहेत?

**प्रश्नकर्ता :** चेतनावाले.

**दादाश्री :** चेतनावाले आहेत हे कसे समजते? त्याची लक्षणे कोणती?

**प्रश्नकर्ता :** ही सर्व चालण्या-फिरण्याची 'मुवमेंट' होत असते ना! शरीरात जाऊन शरीराची फक्त हालचाल करवितो.

**दादाश्री :** हालचाल करवितो? शरीराची? आत्मा असे काहीच करत नाही. जो शरीराची हालचाल करवितो तो 'मेकॅनिकल आत्मा' आहे. आता तुम्ही ज्याला आत्मा समजत आहात, तो फक्त 'मेकॅनिकल आत्मा' आहे. खऱ्या आत्म्याला 'ज्ञानी' सोडून इतर कोणीही जाणू शकत नाही. या 'मेकॅनिकल'च्या पलीकडे खरा आत्मा आहे आणि तो या शरीरातच आहे. आणि खरा आत्मा तर हालचालीच्या स्थितीतच नसतो, तो क्रिया करूच शकत नाही.

आता जेव्हा पालीचे शेपूट कापले जाते, तरी पण ते हालचाल करत असते. त्या शेपटीत जीव असतो का? तरी पण ते शेपूट का उड्या मारत राहते? कोणत्या आधारावर उड्या मारत राहते?

**प्रश्नकर्ता :** ते प्रकृतीचे स्वतंत्र गुणधर्म आहेत, म्हणून?

**दादाश्री :** म्हणजेच जे चालते-फिरते ते चेतन नाही. तर मग चेतनाचे लक्षण काय? तर 'तिथे ज्ञान-दर्शन असायला हवे, तरच मग

तिथे चेतन आहे असे निश्चित होते. सध्या जगात हे जे सर्व ज्ञान-दर्शन दिसते, ते चेतन नाही, ते ज्ञान-दर्शन तर बुद्धीची लक्षणे आहेत. म्हणजेच प्रत्यक्षात ते पण चेतन नाही. पण तिथे चेतन हजर आहे हे मात्र नक्की.

या 'टेपरेकॉर्ड'मध्ये ज्ञान पण नाही आणि *लागणी* पण नाही, म्हणून यात चेतन नाही. तो बोलतो तर खरा, पण त्यात चेतन नाही. आता तुमच्याबरोबर कोण बोलत आहे? कोणी तरी बोलत आहे, हे तर निश्चितच आहे ना? तर 'हे कोण बोलत आहे', त्याला ओळखावे तर लागेलच ना? कोण बोलत आहे तुमच्याबरोबर?

**प्रश्नकर्ता :** पुद्‍गल बोलत आहे.

**दादाश्री :** हो, पुद्‍गल बोलत आहे आणि म्हणतो 'मी बोलत आहे.' चेतनात बोलण्याचा गुणधर्मच नाही. जर बोलण्याचा गुणधर्म आत्म्याचा असता तर कधीकधी एखाद्याची वाचा जाते, असे होते की नाही? म्हणजेच तो आत्म्याचा गुणधर्म नाही.

त्याचे तर सर्व परमात्म गुण आहेत. जर असे बोलला, हालचाल केली तर तो थकून जाईल. थकणार नाही का? आत्म्यात एक पण गुण असा नाही की ज्याचा 'एन्ड' (शेवट) येईल आणि हालचाल करण्याचा गुण जर आत्म्याचा असता तर संध्याकाळपर्यंत तो थकून गेला असता आणि म्हणून झोपावे लागले असते. म्हणजेच हालचाल करण्याचा गुण आत्म्याचा नाही.

आत्म्याचे सर्व गुण हे पर्मनन्ट आहेत. तुम्ही हे जे सांगत आहात ते सर्व 'टेम्परररी' गुण आहेत आणि ते 'रिलेटिव्ह' गुण आहेत. आणि 'रिलेटिव्ह आत्म्या'चे आहेत. हे जे तुम्ही आता स्वत:ला आत्मा समजत आहात तो 'रिलेटिव्ह आत्मा' आहे, त्याच्या आत 'रिअल आत्मा' आहे. त्या रिअल आत्म्याचे जेव्हा 'रिअलायझेशन' होईल तेव्हा तुमचे काम होईल. लोक म्हणतात की 'सेल्फ'ला 'रिअलाइज' करायचे आहे? हे शब्द ऐकले आहेत ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** त्या 'सेल्फ'चे 'रिअलायझेशन' केव्हा होईल? तर जेव्हा 'रिअल आत्म्या'चे 'रिअलाझेशन' होईल तेव्हा.

## जग समजत असलेला आत्मा तर...

या जगात तुम्ही कधी चेतन पाहिले आहे का?

**प्रश्नकर्ता :** हे जे सर्व पाहतो, ते चेतन आहे.

**दादाश्री :** नाही. चेतन डोळ्यांना दिसत नाही, कानाने ऐकू येत नाही, जिभेने चेतनाची चव घेता येत नाही. पाच इंद्रियांनी चेतनाचा अनुभव कधीच घेता येत नाही. चेतन तर जगाने पाहिलेलेच नाही कधी ऐकलेलेही नाही, श्रद्धेत देखील नाही. हे सर्व लोक ज्याला चेतन म्हणतात, ते 'मेकॅनिकल चेतन' आहे, त्या 'मेकॅनिकल'लाच ते चेतन समजतात. 'मेकॅनिकल चेतन' म्हणजे जे खाते, पिते श्वास घेते ते. नाक दाबले, श्वास बंद केले तर ते चेतन किती दिवस चालेल?

**प्रश्नकर्ता :** पंधरा मिनिटे.

**दादाश्री :** म्हणजे ते चेतन नाही. ती तर चेतनाची मायावी शक्ती उत्पन्न झाली आहे. आतमध्ये 'आत्म्या'मुळे 'चेतना'चा स्पर्श झाला आहे, म्हणून ते आपल्याला चेतनाच्या स्वरूपात दिसते, पण वस्तुतः ते चेतन नाही. ते भ्रांतीचे चेतन आहे.

जग ज्याला चेतन म्हणते, ते त्यांच्या दृष्टीचे चेतन आहे, एक्झॅक्ट चेतन ते नाही. त्या चेतनाला 'निश्चेतन चेतन' म्हणतात. म्हणजेच ती 'डिस्चार्ज' होत असलेली गोष्ट आहे. जेव्हा 'डिस्चार्ज' होते तेव्हा ते निश्चेतन चेतन असते. ही सर्व माणसे चालतात, फिरतात, सर्व काही करतात, ते सर्व निश्चेतन चेतन आहे. फक्त आत्म्याच्या उपस्थितीमुळेच हे सर्व मशीन चालत आहे. जर आत्मा हजर नसेल तर हे मशीन चालणारच नाही, बंद पडेल.

तोंड बंद केले आणि नाक दाबून ठेवले तर काय होईल? 'आतमध्ये असलेले' पूर्ण घर रिकामे करून निघून जातील. याला चेतन

कसे म्हणणार? ते 'मेकॅनिकल चेतन' आहे. जर दरअसल (मूळ, अस्सल) चेतनाला जर जगाने जाणले असते तर आज कल्याण झाले असते. पण ते जाणता येईल अशा स्थितीतही नाही. या 'मेकॅनिकल चेतना'ला सचर (सचल) चेतन म्हटले आहे आणि अस्सल - मूळ चेतनाला अचर (अचल) चेतन म्हटले आहे, म्हणजेच जग सचराचर आहे.

या शरीराच्या आत चेतन तर आहे पण ते 'इफेक्टिव चेतन' आहे. कसे चेतन आहे? तर 'चार्ज' केलेले चेतन आहे. चार्ज केलेल्या चेतनाला तर मूळ चेतन म्हणता येणार नाही ना? काही तरी चुकत आहे की नाही? आतापर्यंत चुकीचेच चालले आहे, हे समजले का तुम्हाला? मान्यता पूर्णपणे चुकीचीच होती. काहीतरी 'एक्झॅक्टनेस' तर असायला हवी ना?

**प्रश्नकर्ता :** तर पूर्ण शरीरात जे आहे ते 'मेकॅनिकल चेतन' आहे ना?

**दादाश्री :** हो, 'मेकॅनिकल' चेतन.

**प्रश्नकर्ता :** तर मग खरे चेतन कुठे आहे?

**दादाश्री :** खरे चेतनच तर पूर्ण शरीरात आहे ना! आणि 'मेकॅनिकल' चेतन, तो तर वरचा थर आहे फक्त.

वास्तवात लोकांनी ज्याला आत्मा म्हटले आहे तो 'मेकॅनिकल' आत्मा आहे. मी 'मेकॅनिकल' आत्मा देत नाही. मी तर तुम्हाला अचल आत्मा देतो.

क्रमिकमार्गात 'मेकॅनिकल आत्म्याला'च आत्मा मानले गेले आहे. 'मेकॅनिकल चेतन'लाच आत्मा मानले जाते. जेव्हा अहंकार शुद्ध होतो, म्हणजेच ज्या अहंकारात क्रोध-मान-माया-लोभ समाविष्ट होत नाहीत, अहंकार जेव्हा असा शुद्ध होतो, संपूर्ण शुद्ध होतो, तेव्हा 'शुद्धात्मा' आणि 'शुद्ध अहंकार' एकाकार होतात. म्हणजे असे सर्व क्रमिक मार्गात आहे, पण हे तर 'अक्रम विज्ञान' आहे, म्हणून इथे तर 'ज्ञानी पुरुष'

तुमच्या हातात शुद्धात्माच देतात. अचल आत्माच देतात. किंचितसुद्धा 'मेकॅनिकल' नाही असा निर्लेप आत्मा देतात.

**प्रश्नकर्ता :** आपल्या आत जी सभान अवस्था आहे, जी चांगले-वाईट दाखवते, तिला चेतन म्हणतात का?

**दादाश्री :** नाही. ते सर्व तर निश्चेतन चेतन आहे. ते चेतनच नाही. म्हणूनच तर मी म्हणतो की चेतन जाणायचे असेल तर तो एक अति अति कठीण विषय आहे. हे जे जाणले आहे ते तर 'निश्चेतन चेतन' आहे. 'निश्चेतन चेतन'याला इंग्रजीत बोलायचे असेल तर मेकॅनिकल चेतन म्हणू शकतो. ज्यात क्रोध-मान-माया-लोभ, राग-द्वेष, मन-बुद्धी-चित्त-अहंकार असतात ते सर्व 'मेकॅनिकल चेतन' आहे.

क्रोध-मान-माया-लोभ हे सर्व जर आत्मा करत असेल तर मग त्याची ही सवय कधी जाणारच नाही. लोक जो समजतात तो 'मेकॅनिकल' आत्मा आहे. 'मेकॅनिकल' आत्मा तर चालतो-बोलतो सगळे करतो, पण तो भ्रांत आत्मा आहे. खरा आत्मा तोच परमात्मा आहे! त्याची ओळख झाली तर आपले (मोक्षाचे) काम होईल. नाहीतर तोपर्यंत काम होणार नाही.

आता 'मेकॅनिकल आत्म्यालाच' जर स्वत:चा आत्मा समजू लागलात तर मग कसे होईल? म्हणूनच मी म्हणतो की आत्मा काय आहे ते जगाने जाणलेलेच नाही. आणि जो आत्मा नाही त्याच्यावरच आरोपण केले आहे की जो विचार करतो, चालतो-फिरतो, बोलतो, करतो, उड्या मारतो, हसतो, गातो, खातो, पितो, व्यापार करतो, भांडतो, झोपतो, तो आत्मा आहे. जो सामायिक करतो, जप करतो, तप करतो, धर्मध्यान करतो, देवदर्शन करतो तो आत्मा आहे, असे हे लोक म्हणतात. तर माझे म्हणणे असे आहे की अशा ठिकाणी आत्मा अजिबात नाहीच. आता हिशोब लिहितानाच जर अशा मोठ्या मोठ्या चुका होत असतील तर मग त्यातून 'बॅलेन्स शीट' (ताळेबंद) काढता येईल का?

म्हणजे व्यापार करतो, मुलीचे लग्न करतो, मुलाचे लग्न करतो,

अशा सर्व गोष्टी मेकॅनिकल आत्माच करतो आणि अचल आत्मा हे सर्व पाहत राहतो. दोघांचा धर्म वेगळा आहे. हा मेकॅनिकल आत्मा जिवंत आहे असे तर वाटते, मनात असेच वाटते की हेच चेतन आहे, पण प्रत्यक्षात ते चेतन नाही.

## आणि वीतरागींच्या दृष्टीने आत्मा म्हणजे...

ही जी सगळी दिसते, ती सर्व 'मशिनरी' आहे, तो आत्मा नाही. ज्याला हे सर्व लोक आत्मा म्हणतात, त्याला आम्ही आत्मा म्हणत नाही. आणि वीतरागी पण त्याला आत्मा म्हणत नाहीत. वीतरागी आत्म्यालाच 'आत्मा' म्हणतात. आणि हे सर्व लोक 'अनात्म्या'लाच आत्मा म्हणतात. आता या सर्व लोकांना जर मी विचारले की साहेब, तुम्हाला आत्मज्ञान होणे अजून बाकी आहे ना? तेव्हा ते म्हणतात, 'आत्मज्ञान तर जाणावेच लागेल ना! मग जर आम्ही त्यांना विचारले की 'तुम्ही तर आत्मा म्हणता ना, मग तो आत्मा नाही का? तर ते म्हणतात, 'तो पण आत्मा आहे, पण आत्मज्ञान तर अजून जाणावेच लागेल ना? म्हणजे याचा अर्थ काय झाला? 'वीतरागींनी' जो आत्मा पाहिला आहे तो आत्मा या लोकांच्या कधी लक्षातच आलेला नाही. अरे, विचारात देखील आला नाही! तो आत्मा 'अचल' आत्मा आहे, आणि हे लोक ज्याला आत्मा म्हणतात तो मेकॅनिकल आत्मा आहे, तो खरा आत्मा नाही, तो डिस्चार्ज स्वरूप आहे. त्याला 'डिस्चार्ज चेतन' म्हणतात. एक चार्ज चेतन आणि दुसरा डिस्चार्ज चेतन. म्हणजे तो आत्मा तर आहे, पण तो चार्ज आणि डिस्चार्ज होत असतो! हे सर्व तुम्हाला थोडेफार तरी समजत आहे का?

म्हणजेच जग जसे मानते तशी आत्मा ही वस्तू नाही. जो आत्म्याला जाणतो, त्याला मग या जगात जाणण्यासाठी काहीच शिल्लक राहत नाही. म्हणजेच ज्यांना या जगात जाणायला काहीच शिल्लक उरलेले नाही, फक्त तेच आत्मा जाणतात.

आपण याला 'प्रतिष्ठित आत्मा' असे म्हटले आहे. लोक याला आत्मा मानून बसले आहेत, आणि यालाच स्थिर करत असतात. स्थिर करण्याचे प्रयत्न करतात ना? पण हा मूळातच चंचल स्वभावाचा आहे.

स्वभावानेच चंचल आहे, 'मेकॅनिकल' आहे. त्याला तुम्ही स्थिर करायचा प्रयत्न करता, हा 'वेस्ट ऑफ टाइम आणि एनर्जी' (शक्तीचा आणि वेळेचा अपव्यय) आहे. सर्व जग यालाच आत्मा मानते आणि याला स्थिर करू तरच काम पूर्ण होईल असे मानते. पण हा आत्मा 'सचल' आहे आणि खरा आत्मा तर 'अचल' स्वभावाचा आहे.

**प्रश्नकर्ता :** या 'मेकॅनिकल' आत्म्याचा 'स्वीच' (बटण) दाबलेलाच आहे ना?

**दादाश्री :** तो 'मेकॅनिकल' होऊनच गेला आहे, म्हणून त्यात तुम्हाला जास्त डोकेफोड करायची गरजच नाही. त्याच्या गरजेएवढे पेट्रोल वगैरे सर्व भरलेलेच आहे, तो चालत राहील, तुम्हाला पेट्रोल भरायची गरज पडणारच नाही, काहीच करावे लागणार नाही. तुम्ही फक्त या 'मेकॅनिकल'ला पाहत राहायचे आहे. पाहणे आणि जाणणे हा आत्म्याचा स्वभाव आहे.

**प्रश्नकर्ता :** काहीच करायचे नाही?

**दादाश्री :** काहीच करायचे नाही. काही करायचे जर असेल तर तिथे 'मेकॅनिकल' आत्मा आहे.

म्हणजेच हे लोक 'मेकॅनिकल' आत्म्याच्याच मागे लागले आहेत. ते म्हणतात 'हाच आत्मा आहे! आत्म्याशिवाय हे सर्व कोण करू शकणार?' असे ते समजतात. हे सर्व तर फक्त आत्म्याच्या उपस्थितीमुळे होत आहे आणि त्याचे स्वत:चे अस्सल गुण स्वत:च्या स्वभावातच आहेत. परंतु रॉंग बिलीफमुळे व्यतिरेक गुण असलेली प्रकृती उत्पन्न झाली आहे आणि मग त्या प्रकृतीमुळे सर्व काही चालत आहे. पण रॉंग बिलीफ मात्र अशीच्या अशीच राहते की, 'मी हा आहे आणि तो मी आहे.' खऱ्या वस्तूचा पत्ताच 'त्याला' लागत नाही. कारण त्याला जन्मापासूनच असे संस्कार दिले जातात. प्रथम बाळ म्हणतात, मग त्याला नाव देतात, नाव दिल्यानंतर मग त्या नावाला पुतण्या, काका, मामा असे म्हणतात, आणि या प्रकारे प्रचंड अज्ञानवाले संस्कार दिले जातात.

संसार म्हणजे अज्ञानातच ढकलत राहणे. म्हणून मागील जन्मात जो ज्ञानी असेल त्यालाही या जन्मात परत अज्ञानाची प्रतिस्पंदने येतात. पण मग उदय आल्यावर तो पुन्हा जागृतीत येतो. पण या संसाराचा क्रमच असा आहे की लोक त्याच्यात रॉँग बिलीफ फीट करतात.

जोपर्यंत लग्न झालेले नाही तोपर्यंत जर विचारले 'तुम्ही कोणाचे पती आहात का?' तर म्हणेल नाही, 'माझे लग्न झालेले नाही.' आणि मग लग्न झाल्यावर तो पती होतो. नंतर पत्नीचे निधन झाले तर विधुरही बनतो. तर असे आहे हे जग! या संसारातील सर्व अवस्था 'टेम्पररी' आहेत आणि स्वतः 'पर्मनन्ट' आहे, पण त्याला त्याचे भान नाही.

तो जो मानतो की 'मी पापी आहे' तो पण 'मेकॅनिकल आत्मा' आहे, चंचल विभागाचा. जो संसार चालवतो, संसारातच गुंतलेला असतो असा आत्मा तो 'मेकॅनिकल आत्मा' आहे. त्याला चालवायची नसेल तरी पण 'मशीनरी' चालूच राहते. आणि जो मूळ अस्सल आत्मा आहे तो अचल आहे, तो अजिबात चंचल नाही. त्या आत्म्याला जाणतच नाही, म्हणून तर म्हटले आहे की बाबांनो, आत्मज्ञान जाणा. मोठे मोठे संतपुरुष पण म्हणतात, 'आत्मज्ञान जाणा.' 'तुम्ही संतपुरुष झालात तरी पण तुम्ही जाणत नाहीत?' तर म्हणतात, 'नाही. हे आत्मज्ञानच जाणण्यायोग्य आहे!' म्हणजेच आत्मज्ञान जाणणे हे तर 'ज्ञानी पुरुषां'चेच काम, इतर कोणालाही ते जमण्यासारखे नाही. आत्मज्ञान कोणीही कधीच जाणले नाही. सर्व जण आत्म्याबद्दल बोलतात, त्यांना फक्त 'मेकॅनिकल आत्मा'च समजलेला आहे. आत्मा जाणल्यानंतर तर त्याची दशा काही वेगळीच असते!

सर्व जग आत्म्याचा एक अंश पण चाखू शकत नाही, असा आत्मा आहे, अचल आत्मा आहे आणि तोच स्वतः परमात्मा आहे.

इथे तर 'आत्मा' शब्द लोक धरून बसले आहेत, म्हणतात 'मी आत्मा आहे, शुद्धात्मा आहे.' अरे, तू शुद्धात्मा नाहीस. तुम्हाला दुसऱ्यांच्यात शुद्धात्मा दिसतो का? मग दुसऱ्या कोणी नुकसान केले तर का रागावता? म्हणजेच हा सर्व 'मेकॅनिकल आत्मा' आहे. साऱ्या जगाने

जो शोधून काढला आहे ना, तोच मेकॅनिकल आत्मा आहे. किंवा ज्याचा शोध घेत आहेत तो आत्मा जेव्हा मिळेल तेव्हा तो 'मेकॅनिकल आत्मा'च असेल.

म्हणजेच मूळ शुद्धात्म्याखेरीज इतर सर्व भाग सचल आहे, 'मेकॅनिकल' आहे. आणि शुद्धात्मा तो अचल भाग आहे. शुद्धात्मा ज्ञायक स्वभावाचा आहे, आणि सचल याचा अर्थ आहे मेकॅनिकल होणे, क्रियाकारी होणे. म्हणजेच या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारे चालतात, वेगळेपणाचा अनुभव येऊ शकतो असे शक्य आहे. पण त्याचे भान नाही, ते भान आणण्यासाठी आम्ही 'ज्ञान' देतो.

## 'मिश्रचेतन' नंतर 'मेकॅनिकल' झाले

**प्रश्नकर्ता :** एका ठिकाणी आपण 'मिश्रचेतन' शब्दाचा वापर केला आहे, तर 'मिश्रचेतन' आणि हे 'मेकॅनिकल चेतन', या दोघांत काय फरक आहे?

**दादाश्री :** सर्व एकच आहे. पण मिश्रचेतन तर सुरुवातीला म्हटले जाते, तेव्हा ते 'मेकॅनिकल' नसते. परंतु जेव्हा 'डिस्चार्ज' होते तेव्हा 'मेकॅनिकल' होते. जेव्हा ते चांगल्या प्रकारे मजबूत होते तेव्हा ते 'डिस्चार्ज' स्वरूप बनते, आणि तेव्हा ते 'मेकॅनिकल' होते. प्रथम ते 'मेकॅनिकल' नसते.

इथे उलट विचार करू लागतो तेव्हापासूनच ते मिश्रचेतन तयार होऊ लागते. मग ते मजबूत होते, आणि नंतर जेव्हा पुढच्या जन्मात ते फळ देते तेव्हा त्याला 'मेकॅनिकल' म्हणतात. आता त्याला 'मेकॅनिकल' म्हणत नाहीत. मिश्रचेतनाला काही काळानंतर 'मेकॅनिकल' म्हणतात. प्रथम 'मेकॅनिकल' म्हणत नाहीत. जेव्हा ते डिस्चार्ज होऊ लागते, तेव्हा त्याला 'मेकॅनिकल' म्हणतात, ते डिस्चार्ज होणारे चेतन आहे.

## 'इगोइजम', पण तोही साधनाच्या रूपात

**प्रश्नकर्ता :** ज्याला तुम्ही 'निश्चेतन चेतन' असे म्हणता, ज्याची

अभिव्यक्ती जगात सगळीकडे दिसते, त्या 'निश्चेतन चेतना'ला असे वाटते की आपण 'चेतन' समजू शकू, पकडू शकू, बुद्धीच्या क्षेत्रात आणू शकू. त्यांचा हा दावा किती प्रमाणात खरा सिद्ध होऊ शकतो?

**दादाश्री :** त्यांच्याजवळ या शिवाय इतर साधन तरी कोणते आहे? त्याच्यात 'निश्चेतन चेतन' जरी असले तरी पण आत 'इगोइजम' (अहंकार) आहे. आणि तो 'इगोइजम' काम करत आहे. आणि 'इगोइजम' आहे म्हणून तो निश्चित प्राप्त करेल, अन्यथा फक्त 'निश्चेतन चेतना'द्वारे 'चेतन' प्राप्त करता येत नाही.

## वस्तुत्वतः 'मी' काय आहे?

जगातील प्रत्येक जीवमात्राला अस्तित्वाचे भान आहे की 'मी आहे.' पण वस्तुत्वाचे भान नाही, की 'मी काय आहे?' यामुळे या जगात भ्रांती चालू आहे. जेव्हा 'मी काय आहे?' याचे भान येईल तेव्हा वस्तुत्वाचे भान झाले, असे म्हणता येईल. आणि वस्तुत्वाचे भान झाले की मग पूर्णत्व आपोआपच होत राहते. वस्तुत्वाचे ज्ञान भेदविज्ञानामुळे होते. 'जड' आणि 'चेतन' यात भेद करण्यात येतो तेव्हा स्वत:ला वस्तुत्वाचे भान होते.

आणि या जगात कोणालाच नास्तिक म्हणता येत नाही. नास्तिक कसे म्हणू शकतो? 'नास्तिक' कोणाला म्हणतात? या जगात कोणीही नास्तिक जन्माला आलेलाच नाही, आणि जो स्वत:ला 'मी नास्तिक आहे' असे म्हणतो तो त्याचा विकल्प आहे. नाहीतर कोणी नास्तिक जन्माला आलेलाच नाही, नास्तिकचा अर्थ काय? तर ज्याचे अस्तित्व नाही त्याला नास्तिक म्हणतात. पण तू तर अस्तित्वाचा पुरावा आहेसच ना! 'मी नास्तिक आहे' असे बोलतो, तो इटसेल्फच अस्तित्वाचा पुरावा आहे. हा जो बोलतो, त्यालाच अस्तित्व म्हटले जाते. आणि नास्तिक शब्द तर विकल्प आहे. विकल्प म्हणजे एक प्रकारचा अहंकार आहे की 'मी नास्तिक आहे आणि हा आस्तिक आहे.'

**प्रश्नकर्ता :** सध्या काय आहे की जोपर्यंत तो स्वतः अस्तित्वाची

स्थापना करू शकत नाही, स्वतः आहे असा एक्सिस्टन्स (अस्तित्व) अनुभवूही शकत नाही, तोपर्यंत 'स्वतःचे अस्तित्व आहे' पण त्याला त्याची प्रतीती येत नाही ना?

**दादाश्री :** नाही. ज्याला 'मी आहे' असे वाटत नाही असा कोणी माणूस नसतोच ना! 'मी आहे' हे सगळ्यांनाच जाणवते. 'मी आहे' हे शब्दच स्वतःचे अस्तित्व जाहीर करतात.

त्याचे काय आहे की प्रत्येक जीवाला स्वतःचे अस्तित्व आहे आणि त्या अस्तित्वाचे त्याला भान आहे. म्हणजे 'मी आहे' असे भान त्याला असते आणि ते कधीही जात नाही. रात्री झोपेतही 'मीच आहे' याचे भान असतेच. पण 'मी कोण आहे?' या वस्तुत्वाचे त्याला भान होत नसते. ते ज्ञान जर 'ज्ञानी पुरुषां'नी करवून दिले आणि ते जर प्रकट झाले की मग तो 'ॲडवान्स' (प्रगत) होतो.

प्रत्येक जीवाला अस्तिवाचे भान असते पण वस्तुत्वाचे भान नसते, असे आम्ही म्हणतो. जर वस्तुत्वाचे भान झाले की 'मी कोण आहे?' तर मग पूर्णत्व होत राहते. आणि पूर्णत्व ही निरालंब दशा आहे. ते आपोआप सहज स्वभावाने होत राहील. द्वितीया नंतर तृतीया, मग चतुर्थी आपोआपच होत असते ना! जर आपण आडमुठेपणा केला नाही तर मग काही त्रास होणार नाही. त्या रोपाला जर असे उपटून टाकले तर मात्र त्रास होईल. आणि समजा कधी उपटलेच तर परत लावता आले पाहिजे.

सर्व तऱ्हेची स्पष्टीकरणे मिळाली तर मग आत्मा तसाच राहील. जेवढ्या प्रकारची माणसे आहेत किंवा जेवढ्या प्रकारचे जीव आहेत, तेवढ्याच प्रकारचे आत्मे आहेत. पण अस्सल आत्मा यातील एकही नाही. हे सर्व 'मेकॅनिकल आत्मे' आहेत. ही गोष्ट तुम्हाला समजत आहे ना?

## आत्मज्ञान जाणायचे? की मग...

**प्रश्नकर्ता :** जो आत्मज्ञान जाणतो, तो पौद्‌गलिक ज्ञान पण जाणतो, असे आपण म्हणू शकतो ना?

**दादाश्री :** खरे म्हणजे आत्मज्ञान हे जाणायचे नाही, तर स्वत:ला स्वत:च्या स्वरूपाच्या भानात यायचे आहे. स्वत:चा जो बेभानपणा आहे, स्वत:च्या स्वरूपाचे जे भान नाही, त्याचे भान करायचे आहे. शब्दाने आपण म्हणतो की जाणायचे आहे पण खरे म्हणजे स्वत: स्वत:च्या भानात यायचे आहे. 'आत्मज्ञान' तर आपले सर्व शास्त्रज्ञानी जाणतात, पण त्यांना त्याचे भान होत नाही. त्यांना सर्व माहीत असते, सगळी शास्त्रे पाठ असतात. 'आत्मा' असा आहे, आत्मा तसा आहे' असे सर्व ते जाणत असतात. पण स्वत:ला स्वत:चे भान होत नाही.

## ...त्यासाठी सोपी पद्धत कोणती?

यात दोनच गोष्टी आहेत, आत्मा आणि *पुद्गल.* ज्याने आत्म्याला जाणला आहे, त्याला *पुद्गल* पण समजते आणि जो *पुद्गलाला* जाणतो त्याला आत्मा पण समजतो. पण *पुद्गल* समजेल असे होऊ शकत नाही, ती इतकी सोपी गोष्ट नाही. 'ज्ञानी पुरुषां'च्या आधारानेच आत्मा जाणता येतो.

वेदांती लोकांनी *पुद्गलाला* जाणण्याचा प्रयत्न केला आहे. *पुद्गलाला* जाणण्यासाठी चार वेद लिहिले आहेत. कारण *पुद्गलाला* जाणल्यानंतर आत्म्याला जाणता येतो. पण असे करता करता ते थकले. म्हणूनच मग चारी वेदांनी म्हटले की 'दिस इज नोट दॅट, दिस इज नोट दॅट.' म्हणजे वेदांती लोक *पुद्गलाच्या* रस्त्याने आत्मा शोधत होते. याउलट केवळज्ञानी त्या बाजूने शोधत आले की खरोखर आपण कोण आहोत' हे शोधून काढा, आणि मग बाकी उरलेले सर्वच *पुद्गल.*

म्हणजेच फक्त हे *पुद्गलच* कोणाला समजेल असे नाही. तो तर खूप गहन विषय आहे 'ज्ञानी पुरुष' सोडून अन्य कोणालाच तो समजत नाही. त्याचा अर्थ खूप खोल आहे, आणि या *पुद्गलाच्या* करामती तर वेगळ्याच प्रकारच्या आहेत, ती गोष्टच वेगळी आहे. सारे जगच गोंधळून गेले आहे. पाहा ना, 'एका *पुद्गलाने*' साऱ्या जगाला गोंधळवून टाकले आहे. भांडणे आवडत नाहीत तरी पण करावी लागतात.

जो संपूर्ण *पुद्‌गलाला* जाणतो तो चेतनाला जाणतो किंवा जो चेतनाला जाणतो तो *पुद्‌गलाला* जाणतो. जर गहू ओळखता आले तर खडे पण समजतात आणि खडे समजले तर गहू पण ओळखता येतात, तसेच हे आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे दोन्हीपैकी कोणत्याही एका रस्त्याने पोहोचता येते?

**दादाश्री :** हो. कोणत्याही रस्त्याने पोहोचू शकतो. कोणताही रस्ता निवडला, तरी काम पूर्ण होईल. म्हणून तर मी या लोकांना सांगत असतो ना, कारण काही लोक येतात आणि म्हणतात 'साहेब, मी अज्ञानातच आहे.' मी त्यांना सांगतो 'अरे, अज्ञानात तरी कुठे आहेस?' जर संपूर्ण अज्ञान झाले असेल तरी ज्ञान ओळखता येईल. पण इथे तर संपूर्ण अज्ञान पण झालेले नाही, हे तर अर्धदग्ध आहेत. म्हणजे काय? लाकूडाचा अर्धा भाग जळून त्याचा कोळसा झाला आहे आणि दुसरा भाग लाकूडच आहे. याला आपले लोक काय म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** अर्धदग्ध (अर्धवट जळलेले).

**दादाश्री :** हो. ते लाकूड जर लाकडाच्या व्यापाऱ्याला घे म्हटले तर तो म्हणेल, नाही, आम्हाला तो उपयोगाचा नाही आणि कोळशाच्या व्यापाऱ्याला दिले तर तो म्हणेल या लाकडाचा मला काय उपयोग? म्हणजेच ते कोणी घेत नाही, याचा कोणी गिऱ्हाईकच होत नाही. लाकूडवाला पण घेत नाही आणि कोळसावाला पण घेत नाही. असे हे जग अर्धदग्ध प्रकाराने चालले आहे.

## संपूर्ण अज्ञान जाणून घेतले तरी पण आत्मा मिळेल

माणूस संपूर्ण दिवस चिंतेतच घालवतो. आणि 'ज्ञान' तर राहिले फडताळात. अरे, अज्ञान असते तरी चांगले म्हटले असते. या हिंदुस्तानातील एक तरी असा माणूस मला शोधून दाखवा की ज्याला अज्ञान झाले आहे. अज्ञान झालेले असते तरी मी त्याला म्हणालो असतो, 'बाबा, तुला हा किनारा समजला आहे म्हणून आता तुला तो किनाराही

समजेल. पण तो किनाराही त्याला समजला नाही. ज्या किनाऱ्यावर तो उभा आहे तो पण त्याला समजलेला नाही. म्हणजेच धड अज्ञानी पण झालेला नाही. म्हणून एक तर गहू तरी ओळख किंवा खडे तरी ओळख, (एक ओळखलेस) तर दोन्ही ओळखशील.

चारी वेदांनी म्हटले की दिस इज नॉट दॅट, दिस इज नॉट दॅट, न इति, न इति. (ते हे नाही, ते हे नाही.) पण ते अज्ञानही पूर्णपणे केले नाही. ते जर पूर्णपणे केले असते तर 'न इति' म्हणण्याची वेळ आली नसती. मग तर ज्ञानच समोर येऊन उभे राहिले असते. पण तिथे मग परत 'न इति, न इति' म्हणून थकून गेलेत. वेद तर ज्ञान आणि अज्ञान यांचे विवरण करतात. परंतु अज्ञान जर पूर्ण होऊ दिले असते तर मात्र तिथे आत्मा हजर झाला असता, पण ते पूर्ण होऊ दिले नाही.

## यथार्थ स्वरूपात जग...

सर्व प्रकारचा वार्तालाप करा, अगदी मोकळ्या मनाने, इथे तुम्हाला 'जसे आहे तसे' सांगितले जाईल. 'नाही' त्याला 'नाही' असे म्हणू आणि 'आहे' त्याला आहे असे म्हणू. जे नाही त्याला आम्ही 'आहे' असे म्हणू शकत नाही आणि जे 'आहे' त्याला 'नाही' असे म्हणू शकत नाही. एकाएका शब्दासाठी आम्ही जबाबदार आहोत. आणि आमच्याकडे शेवटपर्यंतची सर्व माहिती आहे. कारण एका सेकंदाकरिता पण मी या देहाचा मालक झालेलो नाही, या मनाचा मालक झालेलो नाही. ही वाणी, हा 'ओरिजिनल टेपरेकॉर्डर' बोलत आहे, मी बोलत नाही. हा 'ओरिजिनल टेपरेकॉर्डर' वक्ता आहे, तुम्ही श्रोते आहात, मी ज्ञाता-द्रष्टा आहे, म्हणजेच हा व्यवहारच वेगळ्या प्रकारचा आहे. म्हणून तर संपूर्ण निराकरण होत असते. आणि जेव्हा एकही निराकरण बाकी राहिलेले नसेल तेव्हा समजावे की ज्ञान प्रकट झाले. समाधानच वाटते, निरंतर समाधान वाटते, त्यालाच म्हणतात ज्ञान. कोणत्याही स्थितीत, कोणत्याही संयोगात, कोणत्याही वेळी जे समाधानात ठेवते, तेच ज्ञान. बाकी सर्व अज्ञान म्हटले जाते. म्हणजेच तुम्हाला जे जे काही विचारायचे असेल ते विचारा. 'ज्ञानी पुरुषां'ना तर चारही वेदांचे *उपरी* (वरिष्ठ) म्हटले जाते.

आणि कोणत्याही प्रकारचा प्रश्न विचारू शकता, कारण हे आम्ही (ज्ञानात) 'पाहून' बोलत असतो. पुस्तक वाचून एकही शब्द बोलत नाही. मी 'पाहून' बोलतो म्हणूनच लोकांना उपयोगी होते. शिवाय मी बोलणाराही नाही, 'टेपरेकॉर्डर' बोलत आहे, मी तर ज्ञाता-द्रष्टा आहे.

## वेद थिऑरिटिकल, विज्ञान प्रॅक्टिकल

आम्ही चारही वेदांचे *उपरी* आहोत. चारी वेद वाचल्यानंतर वेद काय म्हणतात 'दिस इज नॉट दॅट'.

**प्रश्नकर्ता :** वेद आणि ज्ञान, हे दोन्ही शब्द वेगवेगळे का आहेत?

**दादाश्री :** वेद बुद्धिजन्य आहेत, क्रियेसहित आहेत, त्रिगुणात्मक आहेत, याउलट ज्ञान त्रिगुणात्मक नसते, बुद्धिजन्य नसते आणि स्वभावाने चेतन भावच असते. ज्ञान नेहमीच चेतन असते.

**प्रश्नकर्ता :** पण वेद वांङ्गमय तर सर्व ज्ञान भरलेलेच आहे ना?

**दादाश्री :** ते ज्ञान मोक्षासाठी उपयोगी नाही.

ते साधनज्ञान आहे. त्यात साध्यज्ञान नाही. त्यात साधनज्ञान आहे. म्हणून ते बुद्धीजन्य आहे. वेद स्वतःच म्हणतात, 'दिस इज नॉट दॅट.' तू जो आत्मा शोधत आहेस तो इथे असू शकत नाही. तो अवर्णनीय आहे, अवक्तव्य आहे, तो शब्दात असू शकत नाही वेद तर शब्दरूप आहेत, म्हणून 'गो टु ज्ञानी' (ज्ञानींकडे जा), तिथे तुला आत्मा मिळू शकेल. 'दिस इज दॅट' (हाच तो आहे) असे ते म्हणतील.

वेद हे बुद्धीजन्य ज्ञान आहे आणि हे चेतनज्ञान आहे. बुद्धीजन्य ज्ञान म्हणजे, बुद्धी आणि ज्ञानात काय फरक आहे? 'डायरेक्ट नॉलेज' म्हणजे ज्ञान. 'इनडायरेक्ट नॉलेज' म्हणजे बुद्धी. वेद हे शब्दरूपी ज्ञान आहे म्हणून बुद्धीगम्य ज्ञान आहे. वेद 'थिऑरिटिकल' आहेत आणि ज्ञान 'प्रॅक्टिकल' आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे अनुभवगम्य?

**दादाश्री :** हो. अनुभवगम्य हेच खरे ज्ञान आहे. बाकी सारे तर थिऑरिटिकल आहे. ते 'थिऑरिटिकल' शब्दरूपात असते आणि चेतनज्ञान तर शब्दांपलीकडे, खूप पुढे आहे. ते अवक्तव्य, अवर्णनीय असते. आत्म्याचे वर्णन होऊच शकत नाही, वेद करूच शकत नाहीत.

तरी पण वेदांचे मार्गदर्शन तर एक साधन आहे. ती साध्यवस्तू नाही. जोपर्यंत 'ज्ञानी पुरुष' भेटत नाहीत तोपर्यंत काम होऊच शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** ज्ञान आणि वेद, या दोघांत जो फरक आहे, तो फक्त शाब्दिक आहे का? त्यात काही बौद्धिक कसरत आहे?

**दादाश्री :** हो, बौद्धिकच आहे.

वेद बौद्धिकच आहेत, त्रिगुणात्मक आहेत आणि खरे ज्ञान ते त्रिगुणात्मक नसते, तेच विज्ञान आहे. विज्ञान हे तर अस्सल ज्ञान आहे आणि हे ज्ञान तिथपर्यंत पोहोचण्याचे एक साधन आहे.

**प्रश्नकर्ता :** ते बरोबर आहे, पण विज्ञान आणि ज्ञान या दोन्ही शब्दांचा वापर वेदांतात एकाच ठिकाणी केला आहे.

**दादाश्री :** यात विज्ञानाचा उपयोग होऊच शकत नाही. वेद फक्त विज्ञानासाठी मार्गदर्शन करतात, इशारा करतात. आणि विज्ञान तर स्वत:च अवर्णनीय आहे अवक्तव्य आहे. ते काही असे पुस्तकात नसते.

**प्रश्नकर्ता :** 'सत्यम् ज्ञानम्' असे म्हटले आहे ना! 'अनंत ब्रह्म' असेही म्हटले आहे.

**दादाश्री :** शब्द जे काही आहेत, ते तर बरोबरच आहेत ना! बाकी, वेद त्रिगुणात्मक आहेत, त्यांना याच्या पलीकडे काही देणेघेणे नाही.

**प्रश्नकर्ता :** पण ज्ञान त्रिगुणात्मकच आहे ना?

**दादाश्री :** जे त्रिगुणात्मक ज्ञान आहे, त्याला बुद्धी म्हणतात. वेद फक्त एकच काम करतात, संसाराची 'डेव्हलपमेंट' करतात. हळूहळू

बुद्धीजन्य 'डेव्हलपमेंट' करतात आणि त्याबरोबरच जर कोणी 'ज्ञानी पुरुष' भेटले तर त्याचे काम होते. बस, फक्त 'निमित्त' मिळायला हवे. निमित्त जर मिळाले नाही तर काम होत नाही.

हे वेद काय म्हणतात की यात सर्व बुद्धीजन्य ज्ञान समाविष्ट आहे, त्याला वेदांत म्हणतात. आणि ज्ञानजन्य ज्ञान म्हणजेच विज्ञान, यात तुला पदार्पण करायचे आहे.

## ज्ञानींची अनिवार्यता

**प्रश्नकर्ता :** मनुष्यानंदातून ब्रह्मानंदात जाण्यासाठी वेदात बारा पायऱ्या सांगितल्या आहेत. ती एकेक पायरी चढण्यासाठी वेदांमध्ये पूर्ण वर्णन आहे.

**दादाश्री :** अंतिम पायरीवर, म्हणजे बाराव्या पायरीवर पोहोचल्यावर एवढेच कळते की 'साखर गोड आहे.' पण गोड म्हणजे काय ते कळत नाही.

जेव्हा तो बाराव्या पायरीवर पोहोचतो तेव्हा त्याला कळते की 'ही वस्तू पूर्णपणे गोड आहे आणि याशिवाय इतर कशाचीच गरज नाही', अशी त्याला खात्री वाटते. पण गोड म्हणजे नक्की काय? हे तो शोधू लागतो. मग त्याची 'ज्ञानी पुरुषां'शी भेट होते, ते निमित्त मिळाले तर ते त्याच्या तोंडात ठेवतात की 'दिस इज दॅट' (हीच ती).

**प्रश्नकर्ता :** तर आता आपण हे सांगा की ज्ञान अंतर्गत वस्तू आहे की वेद अंतर्गत ज्ञान आहे? म्हणजे वेदात ज्ञान आहे की ज्ञानात वेद आहे?

**दादाश्री :** ज्ञान वेदात आहे, वेद ज्ञानात आहे, पण 'विज्ञान' वेदाच्या बाहेर आहे.

**प्रश्नकर्ता :** ज्ञान आणि विज्ञान दोन्हीही वेदात सांगितलेले आहे.

**दादाश्री :** ते सर्व शब्द दिले आहेत. मूळ वस्तू नाही. 'गोड

आहे' असे लिहिले आहे, अनुभव लिहिलेला नाही! 'थिऑरिटिकल'मध्ये अनुभव नसतो.

**प्रश्नकर्ता :** ऋषीमुनींनी अनुभव घेतला आहे ना?

**दादाश्री :** हो, पण हा अनुभव असाच घेता येत नाही. तो अनुभव, अनुभवी पुरुषांच्या माध्यमाद्वारे, निमित्ताद्वारेच होतो, नाहीतर होत नाही. प्रत्येकाला तो घेता येत नाही, मध्ये निमित्तरूपाने 'ज्ञानी पुरुष' असतात.

**प्रश्नकर्ता :** वेदांमध्ये पण गुरुशिवाय चालणारच नाही असे सांगितले आहे.

**दादाश्री :** गुरुशिवाय ज्या ज्या गोष्टी केल्या जातात त्या सर्व वेड्यासारख्या गोष्टी आहेत.

**प्रश्नकर्ता :** ही जी सिद्ध झालेली हकीगत आहे, ती सिद्ध झालेली हकीगत जाणणारे ऋषीमुनी आता आपल्यात नाहीत.

**दादाश्री :** ती सिद्ध केली गेलेली वस्तू सहज आहे, सोपी आहे, सुगम आहे, पण तिची प्राप्ती मात्र दुर्लभ आहे. कारण प्राप्त पुरुष मिळायला हवेत, तरच तिची प्राप्ती होईल. प्राप्त पुरुष कसे असतात? तर ते स्वत: मुक्त असतात, स्वतंत्र पुरुष असतात, त्यांना संसाराचा एकसुद्धा विचार येत नाही, स्त्रीसंबंधी विचार येत नाहीत, स्वत:च्या अस्तित्वासंबंधी विचार येत नाहीत. त्यांच्यात *पोतापण* (मीपणा, मी आहे आणि माझे आहे असे आरोपण) नसते. जिथे *पोतापण* नसते, तिथे काम होऊ शकते.

तुमच्यासारखे लोक येऊन मला म्हणतात 'साखर गोड आहे, असे आम्हाला चाखवा.' तेव्हा मग ती मी त्याच्या तोंडात ठेवतो आणि म्हणतो, 'दिस इज दॅट'. त्यानंतर मग तो सतत आत्मामय होऊन जातो. मग एक क्षणभरही तो इकडे-तिकडे होत नाही. निरंतर आत्मामय, अगदी चोवीस तास, संपूर्ण जागृती! बाकी हे सर्व जग तर उघड्या डोळ्यांनी झोपलेले आहे. तत्त्व विचारक सोडून इतर सर्व जग उघड्या डोळ्यांनी झोपलेले आहे.

## शब्द पण अनित्य

**प्रश्नकर्ता :** आता, काही जण म्हणतात की शब्द नित्य आहेत आणि काही जण म्हणतात शब्द अनित्य आहेत, तर यात खरे कोणते?

**दादाश्री :** शब्द अनित्य आहेत.

**प्रश्नकर्ता :** काही जण असे म्हणतात की शब्द नित्य आहेत.

**दादाश्री :** कितीही जण तसे म्हणून देत, पण मी तुम्हाला कायमस्वरूपी एवढे सत्य सांगत आहे. मग जरी ते तसे म्हणत असतील तरी आमची हरकत नाही, आमचा कोणत्याही प्रकारे दुराग्रह नाही.

या जगात जे सत्य आहे ना, ते देखील सत्य नाही, तेही असत्य आहे. सत् कायम अविनाशी असते आणि स्वाभाविक असते. आणि शब्द हे स्वाभाविक नाहीत. शब्द तर जेव्हा वस्तू आदळतात तेव्हाच निर्माण होतात. म्हणजे शब्द हे तर संयोग आहेत, दोन-तीन वस्तूंचा संयोग होऊन शब्द बनतात, म्हणून शब्द ही स्वाभाविक वस्तू नाही.

**प्रश्नकर्ता :** शब्द अनित्य आहेत ही गोष्ट तर बरोबर आहे. तर वेद हे शब्दांनीच बनले आहेत, तरी पण वेद नित्य मानले गेले आहेत.

**दादाश्री :** मानलेल्या गोष्टींना काही अर्थ नाही. नित्य कशाला म्हणतात? तर जे अविनाशी असते, कायमस्वरूपी असते, आणि ते स्वतः वस्तू स्वरूप असते. ज्यात काहीही बदल होत नाही, एकाच स्वभावाचे असते, स्वभाव बदलत नाही. आत्मा अविनाशी आहे. हे आकाशतत्त्व अविनाशी आहे. पुद्गल, हे जे परमाणू तत्त्व आहे, जे अणुचे लहानात लहान भाग, अविभाज्य भाग परमाणू आहेत, ते अविनाशी तत्त्व आहे. गती सहायक तत्त्व या सगळयांना गती देते, ते अविनाशी तत्त्व आहे. आणि स्थिती करविते, ते स्थिती सहायक तत्त्व, ते अविनाशी तत्त्व आहे. आणि काळ पण अविनाशी तत्त्व आहे. म्हणजेच निर्विकल्पी सत्य तर या सहा गोष्टी आहेत या जगात. या सहा गोष्टीच फक्त निर्विकल्पी सत्य आहेत, आणि त्यात काहीच बदल होत नाहीत, त्या स्वाभाविक आहेत.

## साधने पण विकल्पातच मोडतात

**प्रश्नकर्ता :** ही जी वेदांची 'टेक्नॉलॉजी' आहे, ती 'अप्रोच' दाखविते, हे तर सत्य आहे ना?

**दादाश्री :** ते आपल्याला हेल्पिंग (मदतरूप) आहेत. उलट चालले होते म्हणून जागेवर आणण्यासाठी ते मदतरूप आहेत. जर उलट चालले नसते तर ती मदतरूप नसती.

हे जे वेद आहेत, त्यांना लोकांनी जरी कुठलेही नाव दिले असेल तरी पण मुळात ते ऋषभदेव भगवंताच्या मुखातूनच प्रकट झाले होते.

**प्रश्नकर्ता :** हे बरोबर आहे. मग हा जो ॐकार आहे, त्याच्या आत कोणते सत्य लपले आहे?

**दादाश्री :** ॐकारात खूप सत्य लपले आहे, पण ते कोणते सत्य आहे? तर ते विकल्पी सत्य आहे. पण तरीही हे विकल्पी सत्य, निर्विकल्पकडे नेणारे आहे. तो रस्ता आहे, रोड-वे आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे साध्य पूर्ण आहे. ब्रह्म पूर्ण आहे. साधने ही विकल्पी आहेत, ती पण देशकालानुरूप पूर्णभाव धारण करतात की नाही?

**दादाश्री :** दुसरे संयोग एकत्र आले तर होऊ शकते. पण तरीही शेवटी त्यातील एक संयोग निर्विकल्पी गुरुंचा असायला हवा, पण ते 'ज्ञानी पुरुष' असायला हवेत, की ज्यांना जगातील कुठलीही गोष्ट जाणण्याची शिल्लक नसते. या जगात त्यांच्यासाठी एकही गोष्ट अशी नसते की जी त्यांना जाणण्याची शिल्लक राहिलेली असेल.

**प्रश्नकर्ता :** निर्विकल्प पुरुष कसे असतात?

**दादाश्री :** निर्विकल्पी पुरुषात बुद्धी नावालाही नसते. किंचितदेखील बुद्धी नसते. म्हणूनच त्यांचे नाव निर्विकल्प पुरुष.

**प्रश्नकर्ता :** गीतेत क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष, असे दोन पुरुषांचे वर्णन आहे, तर अक्षर पुरुष म्हणजेच निर्विकल्प पुरुष का?

**दादाश्री :** क्षर तर हा देहच आहे आणि अक्षर विकल्पी आहे. क्षर आणि अक्षर यांच्या पलीकडे असते ते निर्विकल्प.

## विकल्पांमुळेच अंतिम संधी हातातून निसटते

नाहीतर, मी तर आत्म्याला जाणतो. तुम्ही म्हणालात की 'मला आत्मा द्या', तर मी आत्मा देतो.

**प्रश्नकर्ता :** पण मला तर व्यवहारात राहायचे आहे.

**दादाश्री :** तर व्यवहारात राहूनही, पण व्यवहार मात्र आदर्श व्यवहार असला पाहिजे. आत्मा प्राप्त झाला असे केव्हा म्हणता येईल? स्वतःच्या घरातील व्यवहार जर पूर्ण आदर्श असेल, तरच आत्मा प्राप्त होईल. नाहीतर जे लोक आत्मा प्राप्तीबद्दल बोलत असतात ना, ती काही अशी गुहेसारखी वस्तू नाही. आत्मा ही गुहा नाही. गुहा तर 'ऑन ट्रायल' गोष्ट आहे. बाकी यात तर स्वतःचा व्यवहार सुंदर असतो, आदर्श असतो, क्रोध-मान-माया-लोभ नसतात, शेजाऱ्यांबरोबर चांगले संबंध असतात, घरात पत्नीबरोबर चांगले संबंध असतात.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा तर शोधावा लागत नाही ना? त्याचे तर आपोआप दर्शन होते ना?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की या लोकांनी जिथून रस्ता तुटला होता, तिथून 'ऑर्नामेन्टल' (स्वतःच्या बुद्धीने स्वतःला सोयीस्कर असे) रस्ते बनवले. जेव्हा बारा-बारा वेळा दुष्काळ पडला होता तेव्हा हा रस्ता पूर्णपणे तुटला होता आणि तेव्हा हे 'ऑर्नामेन्टल' रस्ते बनवले. तिथे असे म्हटले गेले की, 'सत्याचा शोध आपोआप होऊ शकतो!' बघा ना, इतर सर्व शिकायला कॉलेजमध्ये जावे लागते आणि या सत्याचा शोध तर घरीच करू शकतो.

खरे म्हणजे विकल्पी कधीच निर्विकल्पी होऊ शकत नाही.

विकल्पी बीज कधीही निर्विकल्पी होऊ शकत नाही. व्यर्थ प्रयत्न करत राहतो. निमित्ताची गरज आहे. विकल्पीपणा आणि निर्विकल्पीपणा, दोन्हीही दृष्टीफेर (दृष्टीत बदल) आहे. उलट जर निर्विकल्पीची दृष्टी मिळाली, कोणी करून दिली, तर मग तो निर्विकल्प होतो. 'दृष्टी'च बदलण्याची गरज आहे. आणि हे अभ्यासाने होत नाही. जर अभ्यासाने झाले असते तर मग त्याचा अभ्यास केला असता. पण संपूर्ण दृष्टीच बदलली आहे.

म्हणजेच जेव्हा स्वत:चे स्वरूप जाणतो तेव्हा निर्विकल्प होतो. निर्विकल्प होतो तेव्हा अहंकार आणि ममता निघून जातात, बस. अहंकार आणि ममता गेले म्हणजे सर्वच व्यतिरेक गुण निघून गेले. ममता म्हणजे लोभ आणि कपट, आणि अहंकार म्हणजे क्रोध आणि मान. हे चार गुण याप्रकारे उत्पन्न झाले होते. 'ज्ञानी पुरुष' ह्या दोन्ही गोष्टी वेगळ्या करून देतात. डीव्हिजन (अलग) करून देतात. आत्मा आणि अनात्मा यात 'लाइन ऑफ डिमार्केशन' (भेदरेषा) आखून देतात. तेव्हा दोन्ही गोष्टी वेगळ्या होतात. तसे तर आहेतच वेगळ्या, वेगळ्याच आहेत.

## अबुध झाल्यावर, अभेद होता येते

**प्रश्नकर्ता :** पण वेद तर अभेदाचे निरूपण करतात ना?

**दादाश्री :** हो, पण अभेदाचे निरूपण तर प्रत्येकानेच केले आहे ना! पण अभेद प्राप्त होणे कठीण आहे. जोपर्यंत वेदांना घोळून घोळून पीत नाही तोपर्यंत अभेद होऊ शकत नाही. कारण जोपर्यंत बुद्धी जात नाही तोपर्यंत अभेद होता येत नाही. बुद्धी भेद करविते. भेद कोण निर्माण करते? जे बुद्धीवाले आहेत तेच भेद निर्माण करतात.

आता या संपूर्ण गावाला जर अबुध बनवायचे असेल तर किती वेळ लागेल? बुद्धीच नाही असा माणूस बनवायचा असेल तर किती वेळ लागेल? ताबडतोब होईल का?

**प्रश्नकर्ता :** होणार नाही.

**दादाश्री :** तर मग तोपर्यंत अभेद होणार नाही. जेव्हा बुद्धी जाईल तेव्हाच अभेद होईल. बुद्धी भेद निर्माण करते. 'हे माझे आणि हे तुमचे' बुद्धी याप्रकारे माणसाला 'इमोशनल' (भावनाशील) बनविते.

**प्रश्नकर्ता :** बुद्धी 'इमोशनल' करते की हृदय 'इमोशनल' करते?

**दादाश्री :** नाही, बुद्धीच. हृदय तर अबुध माणसालाही असते.

**प्रश्नकर्ता :** शास्त्रकारांनी बुद्धीला 'निश्चयात्मिका', निश्चय करणारी असे म्हटले आहे ना?

**दादाश्री :** हो. बुद्धी निर्णय घेणारी आहे, तरी पण ती 'इमोशनल' बनवते.

## 'स-इति' हे तर फक्त भेदविज्ञानामुळेच

आत्मा ही वेदात सामावली जाईल अशी गोष्टच नाही. वेदांमध्ये जे शब्द आहेत ते स्थूल भाषेतील आहेत आणि आत्मा हा सूक्ष्मतम आहे. दोघांचा मेळ कसा होऊ शकेल? एक स्थूल आणि एक सूक्ष्मतम, वेद यांचे वर्णन कसे करू शकतील? आत्मा अवक्तव्य आहे, अवर्णनीय आहे, नि:शब्द आहे, म्हणून तो वेदात उतरूच शकत नाही. असे म्हणतात की वेदच या जगातील सर्व वस्तू जाणतात ना? तर मग या वेदांपलीकडचे कोण जाणू शकणार? तर 'वेदांच्या खाली असणारे कोणीच जाणू शकत नाही. वेद पण जाणत नाहीत. पण जे वेदांच्याही वरती असतात, असे ज्ञानी पुरुषच फक्त आत्मा काय आहे हे जाणू शकतात.' 'ज्ञानी पुरुष' असेही म्हणतात की 'दिस इस दॅट, दिस इस दॅट' (हाच तो आहे, हाच तो आहे).

**प्रश्नकर्ता :** 'दिस इज नॉट दॅट' कडून 'दिस इज दॅट' कडे कसे जाता येईल?

**दादाश्री :** 'दिस इज नॉट दॅट' कडून 'दिस इज दॅट' कडे जाण्यासाठी भेदविज्ञानाची गरज पडते की आत्मा हा नाही तर हा आहे, हा नाही तर हा आहे. आणि हे भेद विज्ञान 'ज्ञानी पुरुषां'खेरीज कोणाकडेही नसते.

जेव्हा जेव्हा 'ज्ञानी पुरुष' जन्म घेतात तेव्हा काही लोकांना (त्यांच्याबरोबर) घेऊन जातात. परंतु हे 'अक्रम विज्ञान' आहे. 'विज्ञान' म्हणजेच हे चेतन आहे. म्हणून तुम्हाला काहीही करावे लागत नाही. हे ज्ञानच तुम्हाला सावध करते. हे ज्ञान 'इटसेल्फ' (स्वत:च) काम करत राहते. हे 'अक्रम विज्ञान' आहे.

वेद हे ज्ञानस्वरूप आहेत आणि वेत्ता (जाणणारा) विज्ञान स्वरूप आहे. ज्ञान क्रियाकारी नसते पण विज्ञान क्रियाकारी असते.

**प्रश्नकर्ता :** जे 'विज्ञान स्वरूप' आहे, त्याचे वर्णन करत करत वेद पण थकले!

**दादाश्री :** हो, थकले. कारण वेद वेत्त्याला कसे समजू शकतील? वेत्ता वेद समजू शकेल पण वेद वेत्त्याला समजू शकतील हे कसे काय शक्य होईल? वेत्ता म्हणजे काय? जाणणारा! तो ज्ञाता-द्रष्टा आहे. वेत्ता हा शब्द दिसायला खूप छोटा दिसतो ना?

## आत्मप्राप्ती, कोणाकडून शक्य आहे?

इथे तुम्ही सर्व काही विचारू शकता. चारही वेदांबद्दल आणि चारही अनुयोगांबद्दल तुम्ही विचारू शकता. जैनांच्या, वेदांताच्या आणि कुराणाच्या सर्व गोष्टी पण तुम्ही विचारू शकता. कारण जे वेदांच्या पण वर पोहोचले आहेत, त्यांना वेदांची माहिती विचारू शकता.

**प्रश्नकर्ता :** वेदांच्या वर कशा प्रकारे जाता येते?

**दादाश्री :** जेव्हा ज्ञान प्रकाश होतो तेव्हा वेदांच्या वर जाता येते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ही बुद्धीगम्य गोष्ट नाही का?

**दादाश्री :** नाही. ही बुद्धीगम्य नाही. जेवढ्या बुद्धीगम्य गोष्टी होत्या त्या सर्व वेदांतामध्ये आहेत. आणि बुद्धीगम्यच्या पलीकडे जाण्यासाठी 'गो टु ज्ञानी' (ज्ञानी पुरुषांकडे जा), कारण त्यांच्याकडे बुद्धी अजिबातच नाही. ज्यांना अबुध म्हटले जाते अशा 'ज्ञानी पुरुषां'कडे

जा, तर तुला आत्मा प्राप्त होईल, नाहीतर आत्मा प्राप्त होणार नाही. बुद्धीवाल्या व्यक्तीकडे आत्मा नसतो. आत्मा आहे तर बुद्धी नाही, आणि बुद्धी आहे तर आत्मा असूच शकत नाही ना!

**प्रश्नकर्ता :** जैन धर्माच्या अध्ययनामुळे आत्मज्ञान होते असे म्हणायचे आहे का आपल्याला?

**दादाश्री :** नाही. आणि वेदांतात जे चार वेद आहेत त्यांच्या अध्ययनामुळेही आत्मज्ञान होत नाही. चार वेद आहेत ते पण पूर्ण होतात तेव्हा म्हणतात, 'दिस इज नॉट दॅट. नेति, नेति, तू ज्या आत्म्याच्या शोधात आहेस तो यात नाही. म्हणून ज्ञानींकडे जा.' आत्मा पुस्तकात उतरवता येईल असा नाही. आत्मा अवर्णनीय आहे, अवक्तव्य आहे, म्हणूनच पुस्तकात उतरवता येईल असे नाहीच. म्हणजेच हे 'ज्ञानी पुरुषां'चे काम आहे. ज्यांचा आत्मा प्रकट झाला आहे, तेच आत्मा दाखवू शकतात. जगात इतर कोणाचेच हे काम नाही.

**प्रश्नकर्ता :** दाखवू शकत नाहीत, पण अभ्यास करवून घेऊ शकतात ना?

**दादाश्री :** फक्त दिशा दाखवू शकतात. अंगुलीनिर्देश करू शकतात. म्हणजे आभास होऊ शकतो, पण मूळ वस्तूचा साक्षात्कार करवू शकत नाहीत.

**प्रश्नकर्ता :** पण स्वत:च्या आत्म्याचा स्वत: साक्षात्कार करू शकतो ना?

**दादाश्री :** नाही, असे नाही. 'ज्ञानी पुरुषां'शिवाय साक्षात्कार होऊ शकत नाही, कोणालाच झालेला नाही. जे मुक्त झालेले आहेत तेच सोडवू शकतात. तोच जर जंजाळात अडकलेला असेल तर मग आपल्याला कसा सोडवील? म्हणून तरणतारण पुरुषांची आवश्यकता आहे. जे स्वत: तरून गेले आहेत आणि अनेकांना तारून घेऊन जाण्यास समर्थ आहेत तिथेच आपले काम होऊ शकते.

**प्रश्नकर्ता :** तर मग श्रुतवाणीच्या अभ्यासाने आत्मज्ञान होते का?

**दादाश्री :** श्रुतवाणी वगैरे सर्व मदत करणाऱ्या गोष्टी आहेत. श्रुतवाणीने चित्ताला बळकटपणा येतो, दिवसेंदिवस चित्त निर्मळ होत जाते. आणि जर चित्त निर्मळ असेल आणि 'ज्ञानी पुरुष' भेटले, तर तो ज्ञानाला त्वरित, खूप चांगल्या प्रकारे ग्रहण करू शकेल.

**प्रश्नकर्ता :** ज्ञान गुरुंकडून मिळते, पण ज्या गुरुंना स्वत: आत्मसाक्षात्कार झाला आहे, त्यांच्याकडूनच ज्ञान मिळू शकेल ना?

**दादाश्री :** ते 'ज्ञानी पुरुष' असायला हवेत आणि फक्त आत्मसाक्षात्कार करवून काही होणार नाही. 'ज्ञानी पुरुष' तर 'हे जग कसे चालते? स्वत: कोण आहे? हा कोण आहे?' असे सर्व स्पष्टीकरणे देतात. तेव्हा कुठे काम पूर्ण होईल, असे आहे.

नाहीतर लोक सतत पुस्तकांच्या मागे लागून राहतात, पण पुस्तके ही हेल्पर (मदत करणारे) आहेत, ते मुख्य नाहीत. ते एक साधारण कारण आहे, असाधारण कारण नाही. असाधारण कारण कोणते? तर 'ज्ञानी पुरुष'!

## शिडी एक आणि सोपान अनेक

**प्रश्नकर्ता :** जैनदर्शन, वेदांत, अद्वैतवाद, सोहम्, अहम् ब्रह्मास्मि, एकोहम् बहुस्याम, सर्व इदम् ब्रह्म, हे सगळे एकच आहे का?

**दादाश्री :** शिडी आणि सोपान (पायऱ्या) एकच आहेत, तसेच ह्या सर्व गोष्टी एकच आहेत. पण पायऱ्याच्या रूपात वेगवेगळे मानले जातात.

## द्वैत नाही, अद्वैत नाही, आत्मा द्वैताद्वैत

**प्रश्नकर्ता :** अद्वैत आणि द्वैत म्हणजे काय? ते जाणून घ्यायचे आहे. तुम्ही कृपया समजावून सांगा.

**दादाश्री :** अद्वैतचा अर्थ तुम्ही काय मानून बसला आहात ते मला सांगा.

**प्रश्नकर्ता :** 'मीच एक सत्य आहे, माझ्याशिवाय दुसरे काही सत्य नाही. मी जो आहे तोच सत्य आहे, अन्य जे जे काही यात भासत आहे ते सत्य नाही', याला मी अद्वैत म्हणतो.

**दादाश्री :** तर मग आता सत्य शोधायची गरजच काय आहे? जर 'मीच सत्य आहे' तर मग सत्य शोधण्याची गरजच नाही. तर मग पुस्तके कशाला वाचता? तुमचा सिद्धांत तर हेच म्हणत आहे ना की 'मीच सत्य आहे?'

**प्रश्नकर्ता :** सिद्धांताच्या निष्ठेसाठी, सिद्धांत दृढ व्हावा यासाठी पुस्तके वाचावी लागतात ना?

**दादाश्री :** पण या सिद्धांताला बरोबर म्हणता येणार नाही. तुमचे नाव काय आहे?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाई.

**दादाश्री :** तर मग तुम्ही चंदुभाई आहात, हे सत्य आहे का?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाई हे तर नाव आहे, आणि नाव म्हणजे सत्य नाही.

**दादाश्री :** तर मग सत्य काय आहे? तुम्ही सत्य व्हा आणि मग सांगा.

**प्रश्नकर्ता :** सत्य तर शब्दात येतच नाही ना?

**दादाश्री :** तर मग तुम्ही कोण आहात? 'चंदुभाई बेअक्कल आहे' असे कोणी म्हटले तर तुम्हाला वाईट वाटते. तुमच्यावर त्याचा परिणाम होतो, म्हणून तुम्ही चंदुभाईच आहात.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे जोपर्यंत परिणाम होतो तोपर्यंत 'मी चंदुभाई आहे', असे आहे का?

**दादाश्री :** हो. आणि शिव्या दिल्या तरीही काही परिणाम होत नसेल, मारले तरी पण परिणाम होत नसेल, खिसा कापला गेला तरी

त्याचा परिणाम होत नसेल, तेव्हा मी समजेन की तुम्ही आता अद्वैताच्या कोपऱ्यापाशी आला आहात. अजून तर तुम्हाला अद्वैत म्हणजे काय हे समजतच नाही.

आता मी तुम्हाला द्वैत आणि अद्वैत काय ते समजावून सांगतो. तुम्हाला समजून घ्यायची इच्छा तर आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो, एकदम पूर्णपणे.

**दादाश्री :** अद्वैत हे आधारी आहे की निराधारी आहे?

**प्रश्नकर्ता :** निराधारी.

**दादाश्री :** आणि द्वैत?

**प्रश्नकर्ता :** अद्वैतात आल्यावर मग द्वैत आहेच कुठे?

**दादाश्री :** असे चुकीचे शिकवतात की 'द्वैत आहेच कुठे?' आणि सांसारिक गोष्ट आली, जर कोणी खिसा कापला, त्या वेळी मात्र आरडाओरडा करतात. अरे, मग आता हे द्वैत आले कुठून? परत असेही म्हणेल 'पोलिसांना बोलवा, हा चोर आहे, यानेच माझा खिसा कापला.' अरे, आता तर तू म्हणत होतास, 'द्वैत आहेच कुठे?' तर मग हे द्वैत आले कुठून? तुमच्यातही निव्वळ द्वैतच आहे. मी तुमची निंदा करत नाही, परंतु जर खरी गोष्ट समजून घ्यायची असेल तर अद्वैत असे नसते. आणि तोपर्यंत खरे सुख, जे तुमच्या स्वतःच्या आत्म्याचे सुख आहे, ते एक क्षणभरही तुम्हाला कसे मिळेल? तुम्हाला कळत आहे ना?

अद्वैत ही निराधारी गोष्ट नाही. द्वैताच्या आधारावर अद्वैत आहे. कशाच्या आधारावर आहे, हे तुम्हाला समजत आहे का?

**प्रश्नकर्ता :** द्वैताच्या अपेक्षेने अद्वैत आहे.

**दादाश्री :** हो. द्वैताच्या आधारावर हे अद्वैत आहे. आणि ज्या गोष्टी दुसऱ्यावर अवलंबून आहेत. त्या सर्व सापेक्ष आहेत. आणि सापेक्ष

कधीही निरपेक्ष बनू शकत नाही. या अद्वैताचा अर्थ लोकांनी निरपेक्ष असा केला आहे. ही गोष्ट समजून घेतली तर उकल होईल.

**प्रश्नकर्ता :** पण आम्ही तर निरपेक्षच मानतो.

**दादाश्री :** निरपेक्षच मानले पाहिजे. पण निरपेक्ष म्हणजे काय ते तरी समजले पाहिजे ना?

**प्रश्नकर्ता :** आम्ही तर अद्वैत म्हणजे निरपेक्ष, असा अर्थ करतो.

**दादाश्री :** हो, हे सर्व तुम्ही तुमच्या परीने केलेत, म्हणजे याचा अर्थ हा की हे सगळे तुमच्या बुद्धीवर आधारित आहे. पण हे नियमानुसार तर स्वीकारता येणार नाही ना! बुद्धीनुसार निरपेक्ष हा अर्थ काढायचा असेल तर काढू शकतो. पण नियमानुसार त्याला खरे मानता येणार नाही ना? नियमपूर्वक जर मी विचारले की अद्वैत हे आधारी आहे की निराधारी? तर म्हणतात 'आधारी आहे.' मग कशाच्या आधारावर आहे? तर 'द्वैताच्या आधारावर.' द्वैताच्या अपेक्षेने अद्वैत आहे आणि अद्वैत ते सापेक्ष आहे. त्याला हे लोक निरपेक्ष म्हणतात. तुम्हाला, तुमच्या आत्म्याला ही गोष्ट कबूल आहे का? मी जे बोलतो ती गोष्ट तुमच्या आत्म्याला कबूल झालीच पाहिजे. कारण हे मी अगदी 'करेक्ट' बोलत आहे. मी पक्षपाताच्या बाहेर पडलेला माणूस आहे. पक्षपाती माणूस आणि त्याचे बोलणे कधीच सत्य असू शकत नाही. पक्षपातातून बाहेर पडलेले असायला हवेत, त्यांचे म्हणणेच ऐकावे.

अद्वैत हे सापेक्ष आहे, हे आता कळले का तुम्हाला?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** तुम्ही जे अद्वैताला निरपेक्ष मानत होतात, ते तर सापेक्ष निघाले. म्हणजे या बाबतीत आतापर्यंत तुमची काय चूक झाली आहे, हे तुमच्या लक्षात आले आहे का?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** मला अद्वैतवाले विचरतात की 'तर मग आत्मा कसा

आहे?' तेव्हा मी त्यांना सांगितले की आत्मा अद्वैतस्वरूप नाहीच, आणि आत्मा द्वैतही नाही. आत्मा द्वैताद्वैत आहे.

द्वैताद्वैतचा अर्थ काय आहे? तर 'बाय रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट'ने आत्मा द्वैत आहे. जोपर्यंत हे शरीर आहे तोपर्यंत 'रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट' असतोच. संडासला जावे लागते ना? जेवायला लागते ना? हे सगळे 'रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट'ने आहे, म्हणून आत्मा द्वैत आहे. आणि रिअल व्ह्यू पॉइंटने आत्मा अद्वैत आहे. आणि जेव्हा तो इथून मोक्षात जातो तेव्हा तर तिथे विशेषण नसतेच. जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत विशेषण आहे. शरीराच्या आधारावरच द्वैत आणि अद्वैत ही सर्व विशेषणे आहेत. मोक्षाला पोहोचल्यावर मग विशेषणच उरत नाही. 'बाय रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट'ने 'मी' द्वैत आहे आणि 'बाय रिअल व्ह्यू पॉइंट'ने 'मी' अद्वैत आहे. म्हणजेच 'मी' द्वैताद्वैत आहे. जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत फक्त अद्वैत असूच शकत नाही.

हे अद्वैत म्हणण्याचा भावार्थ अशा आहे की 'फॉरेन डिपार्टमेंट'मध्ये उपयोग ठेवू नका. असे सांगण्यासाठी हे आहे. प्रत्यक्षात याच्या उलट पडते, 'फॉरेन'मध्ये उपयोग ठेवू नका आणि 'होम' मध्येच राहा. 'होम' म्हणजे 'अद्वैत' आहे आणि 'फॉरेन' म्हणजे द्वैत आहे. सध्या 'तुम्ही' 'फॉरेन'लाच 'होम' मानता. 'मीच चंदुभाई आहे' असे म्हणता. अजूनपर्यंत 'होम' काय ते तर तुम्ही पाहिलेलेच नाही. 'होम' जर पाहिलेत तर चिंता-काळजी वाटणारच नाही, व्याकूळपणा उरणारच नाही. उपाधीत देखील समाधी राहील.

## द्वैत-अद्वैत, दोन्हीही द्वंद्वेच

एक भाऊसाहेब आले होते, ते मला म्हणाले 'मी अद्वैत झालो आहे.' मी विचारले 'हा शब्द तुम्ही आणला तरी कुठून? अद्वैत तुम्ही कशाला म्हणत आहात?' तेव्हा ते म्हणाले, 'मी द्वैतात राहत नसतो.' मग मी विचारले 'मग तुम्ही कशात राहता?' तेव्हा ते म्हणाले, 'आत्म्यातच राहतो.' अरे, असे कसे झालात? फक्त अद्वैत राहूच शकत नाही. अद्वैत तर आधारी आहे. त्याला कशाचा आधार आहे? तर ते

द्वैताच्या आधारावर उभे आहे. द्वैताचा आधार आहे, नाहीतर अद्वैत पडून जाईल. म्हणजेच अद्वैत द्वैताच्या आधारावर टिकून आहे. तुम्ही जे म्हणता की मी अद्वैत झालो आहे म्हणजेच तुम्ही द्वैताचा द्वेष करत आहात. त्यामुळे काय होईल? तुम्ही दोघे भांडत राहाल. तेव्हा ते म्हणाले 'हो, बरोबर आहे. पण आम्ही तर अद्वैतला निरपेक्ष मानत होतो.' अहो, अशा आधारित वस्तूला निरपेक्ष कसे काय म्हणू शकतो? अद्वैत तर सापेक्ष आहे.

कित्येक शब्द असे आहेत की जे द्वंद्वातीत आहेत. 'करुणा' असे जे काही शब्द आहेत ते द्वंद्वापलीकडे आहेत. याउलट अद्वैत शब्द तर द्वैत आहे म्हणून अद्वैत आहे, म्हणूनच याला द्वंद्व म्हणतात. उदा. नफा आणि तोटा असे समोरासमोर जे दोन शब्द असतात त्यांना द्वंद म्हणतात. म्हणजेच द्वैत आहे तर अद्वैत आहे. म्हणजेच अजून तो द्वंद्वातीत झालेला नाही, तो अजूनही द्वंद्वातच आहे. अद्वैत हे सुद्धा द्वंद्व आहे, हे तुमच्या लक्षात आले का? जसे फायदा–नुकसान याला द्वंद्व म्हणतात, चांगले–वाईट, सुख–दुःख याला द्वंद्व म्हणतात, तसेच द्वैत–अद्वैत या जोडीला पण द्वंद्व म्हटले जाते. उदाहरणार्थ जिथे दया असते तिथे निर्दयता अवश्य असते. म्हणून जर एखादी दयाळू व्यक्ती असेल तर तुम्ही समजून घ्या की अहोहो! ह्याच्यात निर्दयपणा पण आहे. तसेच द्वैत–अद्वैत हे द्वंद्वात आहेत. ती द्वंद्वातीत दशा नाही. म्हणजे जे 'मी अद्वैतात आहे' असे म्हणतात ते अजून द्वंद्वातच अडकलेले आहेत. या अशा द्वंद्वात तर किती त्रास असतो? अद्वैतवाला तर रात्रंदिवस 'हे द्वैत, हे द्वैत, हे द्वैत' अशी कल्पनाच करत राहतो. जणू काही हे द्वैत त्याला खाऊन टाकणार आहे! म्हणजेच द्वैत–अद्वैत हे द्वंद्व आहे. याच्याही पलीकडे जायचे आहे.

'मी आणि कर्म, दोन्ही आहोत' असे म्हणणे, याला द्वैत म्हणतात. याउलट अद्वैतवाले फक्त 'मीच आहे, कर्म असे काही नसतेच' असे म्हणतात. म्हणजेच तिथे फक्त द्वैत किंवा फक्त अद्वैत राहूच शकत नाही. कारण आत्मा द्वैताद्वैत आहे. आत्मा फक्त अद्वैत असू शकत नाही, आणि आत्मा फक्त द्वैतही असू शकत नाही. संसारी अवस्थेमध्ये तो व्यवहाराच्या 'कनेक्शन'मध्ये येतो तेव्हा द्वैत आहे आणि 'स्वतः' जेव्हा

'मूळ स्वरूपात' असेल तेव्हा अद्वैत आहे. म्हणून जेव्हा 'आम्ही' आमच्या 'स्वत:'मध्ये (मूळ स्वरूपात) असतो तेव्हा अद्वैत असतो.

## अद्वैताची अनुभूती कधी?

**प्रश्नकर्ता :** अद्वैताची अनुभूती येते का? कोणाला येते?

**दादाश्री :** अद्वैताची अनुभूती येऊ शकते. द्वैताची अनुभूती आल्यावर मग अद्वैताची अनुभूती येते. हा जो संसार आहे, तो द्वैत स्वभावाचा आहे. त्याची अनुभूती झाल्यावर अद्वैताची अनुभूती येते. पत्नीशी वाद-भांडण होत नाही, वडिलांशी वाद-भांडण होत नाही, कोणाबरोबरही वाद होत नाहीत, संघर्ष होत नाहीत, जेव्हा अशी अनुभूती येते, त्यानंतर अद्वैताची अनुभूती येते. आणि द्वैताची अनुभूती ज्याला आली असेल त्यालाच अद्वैताची अनुभूती येते.

अद्वैत म्हणजे काय? हे समजून घ्यायला हवे. हे सर्व आत्मा जाणून घेण्यासाठी आहे. आत्मा जाणला नाही म्हणून भरकटून गेले आणि ज्यांना द्वंद्व आहे ते सर्व पण भरकटून गेले. ज्याला द्वंद्व आहे, त्याला अद्वैत म्हणत नाहीत. द्वंद्व म्हणजे काय? तर चांगले-वाईट, शुभ-अशुभ, नफा-तोटा ज्याला असे द्वंद्व राहत असते, त्याला अद्वैत म्हणता येत नाही.

## द्वंद्वातीत झाल्यामुळे अद्वैत

जो द्वंद्वातीत झाला आहे, त्याला अद्वैत म्हणतात. अद्वैत म्हणजे काही थोतांड नाही. द्वैताच्या आधारामुळे अद्वैत टिकून आहे. कोणाच्या आधारावर टिकून आहे?

**प्रश्नकर्ता :** द्वैताच्या आधारावर.

**दादाश्री :** हो, म्हणजे ती 'रिलेटिव्ह' गोष्ट आहे आणि 'रिलेटिव्ह' गोष्ट कधीच 'रिअल' होऊ शकत नाही. द्वैताच्या आधारामुळे अद्वैत टिकून आहे. ही 'रिलेटिव्ह' गोष्ट आहे आणि 'रिलेटिव्ह' कधी 'रिअल' होऊ शकत नाही. आणि आत्मा हा 'रिअल' आहे. म्हणून हे जे सर्व अद्वैत, अद्वैत अशा मोठ्यामोठ्या गोष्टी बोलतात त्यांच्या बोलण्याला फार

काही अर्थ नसतो. जर ते अद्वैत असतील तर त्यांनी ते सिद्ध करून दाखवावे. 'भाऊ तुम्ही द्वंद्वातीत आहात की नाहीत ते आम्हाला सांगा, असे आपण त्यांना म्हणावे. जर ते म्हणाले की 'आम्ही द्वंद्वातीत आहोत' तर आपण त्याला 'करेक्ट' असे मानले पाहिजे. द्वंद्वातीत तर झालाच पाहिजे. नफा-तोटा, सुखःदुख या सगळ्याच्या पलीकडे गेले पाहिजे, त्याचा परिणाम होताच कामा नये.

म्हणजेच अद्वैत कोणाला म्हणतात? तर जो द्वंद्वातीत झाला असेल त्याला. त्याला मग नफा-तोटा असे काहीच स्पर्श करत नाहीत. मग कोणी त्याचा खिसा कापो किंवा फुलांचा हार घालो तरी तो तसाच राहतो. (काहीच परिणाम होत नाही). शिव्या दिल्या तरी तसाच, थोबाडीत मारले तरी पण तसाच, तर त्याला अद्वैत म्हणता येईल.

## 'सत्' प्राप्त करविण्यासाठी कशी ही करुणा!

म्हणजे तुम्हाला अद्वैत समजून घ्यायचे आहे ना? 'एक्झॅक्ट' समजून घ्यायचे असेल तर पद्धतशीरपणे समजा, आणि तुमची जी स्थिरता आहे ती हरवू नका. पद्धतशीर म्हणजे आम्ही जे सांगत आहे ते त्रिकाल सत्य आहे. म्हणून यात काही बदल होऊ शकत नाही. आम्ही अंतिम गोष्ट सांगत आहोत, जेणेकरून लोकांना खरी हकीगत समजेल.

या अद्वैताचे फार प्रस्थ पसरले आहे! त्यामुळे हे तर सांगावेच लागेल की 'अद्वैत म्हणजे नक्की काय हे जर कोणाला समजून घ्यायचे असेल तर इथे या 'दादां'कडे या.' चुकीच्या कल्पना पकडून का बसला आहात?' आणि जर कोणी विरोध करू लागला तरी माझी हरकत नाही. तो शिव्या देऊ लागला तरी माझी हरकत नाही. त्याला आम्ही जेवण देऊ, शांत करू आणि मग समजावून सांगू. त्याने शिव्या दिल्या तरी मला झोप येईल पण मी शिव्या दिल्या तर त्याला झोप येणार नाही. म्हणून मी कोणाला दुःखी करू शकत नाही आणि मला तर झोप येईल, म्हणजे सर्व सरळ तर करावे लागेल ना? हे असेच किती दिवस चालणार? यात मला काही करायचे नाही. मी तर फक्त निमित्त आहे आणि मला असा आदेश मिळाला आहे.

**प्रश्नकर्ता :** कोणाचा आदेश मिळाला आहे?

**दादाश्री :** देशकाळाचा आदेश मिळाला आहे.

**प्रश्नकर्ता :** हे तुमचे बोलणे 'सायंटिफिक' आहे?

**दादाश्री :** हो, 'सायंटिफिक' आहे. कोणीही माझा *उपरी* (वरिष्ठ) नाही जो मला आदेश देईल. पण देशकाळाचा आदेश मिळाला आहे. आदेश मिळाला आहे असे म्हटल्याबरोबर कोणाला असेच वाटेल की मला कोणी *उपरी* आहे. नाही, मला कोणी *उपरी* नाही. जो कोणी आहे, तो मीच आहे. व्यवहारात मी 'लघुतम' आहे आणि 'रिअली' 'स्पीकिंग' ('रिअल'मध्ये) मी 'गुरुतम' आहे. म्हणून काही भानगडच नाही ना? मला व्यवहारात गुरुतम बनायचे नाही. कारण जे व्यवहारात गुरुतम झाले होते ते सर्व दोन पायातून चार पायाचे झाले आहेत. नियमच असा आहे की जे व्यवहारात गुरुतम होतात ते चार पायांचेच होतात. आणि व्यवहारात जर लघुतम भावाने राहत असतील तरच निराकरण होईल.

## एकांतिक मान्यतेमुळे आत्मज्ञान थांबले आहे

काही जण म्हणतात 'आत्मा कर्ता नाही' आणि काही जण म्हणतात 'आत्मा कर्ता आहे', ते दोघेही पक्षपाती आहेत. ते अद्वैताच्या पक्षात अडकले आहेत, आणि हे द्वैताच्या पक्षात अडकले आहेत. आत्मा तसा नाही. आत्मा द्वैताद्वैत आहे. या शरीराच्या अपेक्षेने आत्मा द्वैत पण आहे आणि स्वतःच्या अपेक्षेने आत्मा अद्वैत पण आहे. म्हणजे जर कोणी अद्वैताचा पक्ष घेतला तर आत्मा सिद्ध होऊ शकत नाही. अद्वैतवाल्याला द्वैताचे विकल्प येत राहतात. आणि द्वैतवाल्याला अद्वैताचे विकल्प येत राहतात. मात्र विकल्पांच्या पलीकडे जाता येत नाही. आत्म्याला द्वैताद्वैत म्हटले तर विकल्पांच्या पलीकडे गेला असे म्हणता येईल, निर्विकल्पी म्हणता येईल.

म्हणजेच 'ज्ञानी पुरुष' 'जसे आहे तसे' सांगतात की आत्मा द्वैताद्वैत आहे, द्वैत पण आहे आणि अद्वैत पण आहे. द्वैताद्वैत विशेषण कधीपर्यंत लागू राहील? जोपर्यंत सांसारिक कामात आहे तोपर्यंत द्वैत

आहे, आणि जेव्हा स्वत:च्या स्व-ध्यानात आहे तेव्हा अद्वैत आहे. जोपर्यंत हे शरीर आहे आणि केवळज्ञान पण आहे तोपर्यंत द्वैताद्वैत म्हणतात. लोकांना माणूस पण दिसतो आणि केवळज्ञानी पण दिसतो. ज्याची जशी दृष्टी, त्याप्रमाणे त्याला दिसते. म्हणजेच आत्मा अद्वैत कधीच बनत नाही. जर शरीर सुटले आणि मोक्ष प्राप्त झाला तर सिद्धगतीत गेल्यावर हे विशेषण त्याला लागू पडत नाही. जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंतच विशेषण आहे, आणि दोनही कार्ये करतो. म्हणून आपल्याला विशेषण स्वीकारावे लागेल. इथे तर जे अद्वैताच्या खड्ड्यात पडले आहेत त्यांना एकांतिक म्हटले गेले आणि द्वैताच्या खड्ड्यात पडले त्यांनाही एकांतिक म्हटले गेले. आणि जर कुठलाही एकांतिक मार्ग ग्रहण केला तर मोक्ष हाती लागणार नाही. एकांतिक झाला, आग्रही झाला, तर सत्य वस्तू प्राप्त होत नाही. सत्य प्राप्त करण्यासाठी निराग्रही व्हायला हवे. आग्रह म्हणजेच अहंकार.

प्रत्येकात सत्य सामावलेले आहेच, पण ते त्याच्या दृष्टीकोनाप्रमाणे आहे. आपापल्या दृष्टीकोनातून प्रत्येक गोष्ट सत्यच असते आणि हे जे व्यावहारिक सत्य आहे ना, ते तर भगवंतांच्या भाषेत असत्यच आहे. 'मी चंदुभाई आहे, याचा मामा आहे' असे जे तुम्ही बोलता ते सर्व भगवंतांच्या भाषेत असत्य आहे. हे सर्व सापेक्ष आहे, निरपेक्ष नाही.

एखाद्या पक्षात राहणे हे तर चुकीचेच आहे. पक्ष याचा अर्थ स्टँडर्ड (कक्षा, वर्ग, श्रेणी) असा आहे. आणि स्टँडर्डमध्ये राहणे याला एकांतिकच म्हटले जाईल. तरी पण लोकांनी तर जे नियम आहेत त्यानुसारच वागले पाहिजे. आणि आत्यंतिकमध्ये तर नियम नसतात. ते तर अनेकांत असते. त्यात कोणत्याही प्रकारचा आग्रह नसतो आणि ते 'एक्झॅक्टनेस'मध्ये चालत असते. त्यामुळे आत्यंतिक कल्याण होईल. नाहीतर हे सर्व पक्ष तर स्टँडर्ड आहेत. निष्पक्षपाती झालात तर तुमचे काम होईल. भगवंत निष्पक्षपाती असतात. जेव्हा निष्पक्षपाती व्हाल, तेव्हा 'आउट ऑफ स्टँडर्ड' व्हाल.

मी तर फक्त जे 'करेक्ट' आहे तेच सांगायला आलो आहे. तुम्ही

जर म्हणाल की 'नाही, माझेच खरे आहे.' तर मग मी तुमच्याबरोबर बसून राहणार नाही. माझ्याजवळ तेवढा मोकळा वेळ नाही. मी तुमच्याबरोबर वाद-विवाद करणार नाही. तुमच्या व्ह्यू पॉइंटने-दृष्टीकोनातून तुम्ही बरोबर आहात असे म्हणून मी सोडून देईन. तुम्हाला जर खरे काय ते समजून घ्यायचे असेल तर आम्ही समजावून देऊ. अन्यथा वेळ वाया जाईल, वेस्ट ऑफ टाइम एन्ड एनर्जी (वेळेचा आणि शक्तीचा अपव्यय) होईल. असे चुकीचे ज्ञान अनेक लोकांच्या दृष्टीत 'फिट' झाले आहे, मी कुठे त्या सगळ्यांना बदलायला जाऊ? तुम्हाला जर माझी मदत हवी असेल तर तुम्ही मला विचारू शकता.

म्हणजेच द्वैत आणि अद्वैत हे समजून घ्यायला हवे. या काळात आपण अद्वैत असे कसे बोलू शकतो? अद्वैत तर पूर्वीही नव्हते, आणि अद्वैत तर मीही बोलू शकत नाही.

कोणतीही गोष्ट कसोटीशिवाय जर स्वीकारली तर त्याला काही अर्थ नाही. कसोटी लावता आली नाही तर 'हे असेच आहे' असे आपण म्हणू शकत नाही. फॉरेनचे सायंटिस्ट सद्या 'हे असेच आहे' असे म्हणत नाहीत. 'आम्हाला असे वाटते' असे ते म्हणतात.

## ब्रह्म सत्य आहे आणि जग पण सत्य आहे, परंतु...

असे सर्व बोलणे हे मुळातच चुकीचे आहे. निव्वळ भ्रांतीच आहे. पण तरी एकदम चूक आहे असे पण नाही, झोपेत तोंड उघडे राहिले आणि त्यात मिरची टाकली तर? तर काय मिथ्या वाटेल का? ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे, असे म्हणतात, तर काय तेव्हा मिथ्या वाटते? हे जग 'रिलेटिव्ह करेक्ट' आहे. आणि ब्रह्म हे 'रिअल करेक्ट' आहे. बस, एवढाच फरक आहे. आता जर दाढ दुखत असेल तेव्हा 'मिथ्या आहे, मिथ्या आहे' असे म्हणा ना! तुमची दाढ कधी दुखली होती का? त्यावेळी तुम्ही असे म्हणता का की हे मिथ्या आहे? असे बोलता का? म्हणजेच ब्रह्म पण सत्य आहे आणि जग पण सत्य आहे. दाढेवर उपचार करावे लागतात. उपचार केले नाहीत तर फारच त्रास सोसावा लागेल.

**प्रश्नकर्ता :** तर हे जग सत्य आहे की मिथ्या आहे?

**दादाश्री :** तुम्हाला सत्य वाटते की मिथ्या वाटते? काय वाटते? तुमचा अनुभव काय आहे?

**प्रश्नकर्ता :** मिथ्या.

**दादाश्री :** तुम्हाला मिथ्या वाटते? तुम्हाला जर कोणी शिव्या दिल्या तर त्याचा परिणाम होत नाही का? आता थोबाडीत मारले तर परिणाम होणार नाही का?

**प्रश्नकर्ता :** परिणाम होईल.

**दादाश्री :** तर मग जग मिथ्या आहे असे कसे म्हणू शकतो? ज्याचा परिणाम होतो त्याला मिथ्या कसे काय म्हणू शकतो? हे जग परिणाम करते म्हणून हे जग मिथ्या नाही.

जर जावई मेला, तर सासू रडते की रडत नाही? की मग तुमच्या लोकात असा रिवाज नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, रडते ना!

**दादाश्री :** हो, तर मग त्याला मिथ्या कसे म्हणणार? म्हणजेच हे जग सत्य आहे, पण ते विनाशी सत्य आहे.

जग मिथ्या नाहीच मुळी. जग मिथ्या, असे काही नाहीच. जग जर मिथ्या असते ना, तर हे लोक केव्हाच सोडून निघून गेले असते! हे जग सत्य आहे. जग जर मिथ्या असते तर माणूस रात्री झोपलेला असेल आणि त्याचे तोंड जरा उघडे राहिले असेल आणि असे लांबून त्याच्या तोंडात मिर्ची टाकली तर तो आरडाओरडा करील की नाही? त्याला झोपेतून उठवायला आपल्याला जावे लागेल का? का? आपण न उठवताच त्याच्यावर परिणाम होतो? त्याला कसे समजते? अर्थात जर जग मिथ्या असते तर असे काही झालेच नसते. पाहा, जगही सत्य आहे ना? पण जग रिलेटिव्ह सत्य आहे आणि ब्रह्म रिअल सत्य आहे.

**प्रश्नकर्ता :** ब्रह्माच्या प्रकाशाने प्रकाशित आहे, म्हणून हे 'रिलेटिव्ह' सत्य आहे का?

**दादाश्री :** हो, त्याच्या प्रकाशाने प्रकाशित आहे, म्हणून हे 'रिलेटिव्ह' सत्य आहे. आणि 'रिलेटिव्ह' सत्य आहे म्हणजे सत्य तर आहेच, पण ते विनाशी सत्य आहे आणि ब्रह्म हे रिअल अविनाशी सत्य आहे.

जर जग मिथ्या असते तर मग लोकांनी यातून आत्माच निवडला असता. पण हे जग देखील सत्य आहे. म्हणून तर लोक जग सोडतच नाहीत. बाहेरचे कोणी जग सोडण्याचे बोलताना पाहिले आहे का? ते तर म्हणतील 'चला, तिकडे बाजारात जाऊया.' आम्ही जर म्हटले 'या, मी तुम्हाला मोक्ष देतो.' तेव्हा म्हणतील 'राहू द्या ना बाबा, आम्हाला आमचे काम करू द्या.' म्हणजेच जग सत्य आहे. 'माझी बायको, माझी मुले' असे बोलतात ना? आणि स्त्रीच्या मागे वेडा होतो. मरतो, आत्महत्यासुद्धा करतो! जर जग मिथ्या असते तर असे कोणी करील का? हे ढेकूण मारण्याचे औषध पण मिथ्या नाही. ते जर प्यायला ना, तर कळेल की मिथ्या आहे की नाही? ते जर प्यायला असेल तर आरडाओरडा करतो ना? म्हणजेच ब्रह्म पण सत्य आहे आणि जग पण सत्य आहे. जग 'रिलेटिव्ह' सत्य आहे आणि ब्रह्म 'रिअल' सत्य आहे.

## वास्तविकता तर समजून घ्यावी लागेल ना!

**प्रश्नकर्ता :** तर मग 'जग मिथ्या आहे' असा जो अर्थ सांगितला ते चुकलेच ना?

**दादाश्री :** ज्या काळात त्या अर्थाची गरज असेल, त्या काळात तसा अर्थ लावला असेल. पण 'एक्झॅक्टली' हे जग कधीही मिथ्या नव्हतेच.

**प्रश्नकर्ता :** तर मग मायेमुळे मिथ्या वाटत असेल?

**दादाश्री :** ही माया नाही! माया म्हणजे काय की जर कोणी

जादू केली आणि हातात रुपये दाखविले तरीही तुमच्यावर काहीच परिणाम झाला नाही, तिला माया म्हणतात. लोक जिला माया समजतात अशी माया हे जग नाही.

माया म्हणजे 'वस्तू'ला यथार्थ रूपाने न समजणे, त्याला माया म्हणतात. या मायेमुळेच 'जसे आहे तसे' यथार्थ रूप समजून येत नाही, याला माया म्हणतात. लोक मायेला काय समजतात? ते म्हणतात 'हे सगळे असेच असते, ही सर्व मायाच आहे.' पण असे नाही. माया 'वस्तू'ला यथार्थ रूपाने समजू देत नाही, तीच माया आहे.

हे ब्रह्म सत्य आणि जग मिथ्या, असे तर ते त्यागी बनवण्यासाठी बोलले होते. अरे बाबा, हे सर्व मिथ्या आहे. यातून तुला काय मिळणार आहे? आता त्यागी हो, त्याग करून थोडा पुढे जा. या हेतूने लोकांनी असे सांगितले होते. पण वास्तवात तर हे जग 'जसे आहे तसेच' त्याला सांगायला हवे, तरच त्या रस्त्याने जाणे जमेल ना! नाहीतर सगळेजण त्याला मिथ्या मानत नाहीत ना! काही लोकच मिथ्या मानतात. तसे बोलण्यापुरते तर बोलतात पण कोणी मिथ्या मानत नाही. या मुलाच्या हातात पतंग दिला, तर काय तो पतंग फेकून देईल? आपण जर त्याला सांगितले की, 'मिथ्या आहे, फेकून दे.' तर तो फेकेल का? नाही फेकणार! म्हणून जग 'रिलेटिव्ह' सत्य आहे. हो, त्याला कोणी असे म्हणत नाही की हे 'रिअल' सत्य आहे. कारण पतंग तर लगेच फाटतो ना! आणि तो फाटल्यावर (पतंगावरचे) प्रेम पण ओसरतेच ना! याउलट जिथे अविनाशी गोष्ट आहे तिथे तर फाटण्याची शक्यताच नाही!

म्हणजेच हे जग मिथ्याही नाही. जग 'रिलेटिव्ह करेक्ट' आहे आणि आत्मा 'रिअल करेक्ट' आहे. 'रिलेटिव्ह करेक्ट' म्हणजे विनाशी करेक्ट. ते विशिष्ट काळापुरते असते. एखादे शंभर वर्षे चालते, एखादे हजार वर्षे, एखादे पाच हजार वर्षे चालते, तर एखादे पाच वर्षे चालते आणि एखादे एक वर्ष चालते. म्हणजे जे विशिष्ट काळापर्यंत टिकते ते सर्व 'रिलेटिव्ह करेक्ट' आणि जे त्रिकालवर्ती असते ते 'रिअल करेक्ट!'

अहो, काही लोक तर माझ्याजवळ येऊन म्हणतात, 'नाही, पण

जग तर मिथ्याच आहे ना!' तेव्हा मी म्हटले जर जग मिथ्या असेल तर मग कोणी पैसे रस्त्यावर फेकून देतो का? जर रस्त्यावर फिरायला गेलो तर वाटेत पैसे सापडतात का? लोकांचे पैसे हरवत नाहीत का? पैसे तर हरवतात, पण ते परत सापडत नाहीत. म्हणजे जर जग मिथ्या असते तर कोणी ते पैसे उचललेच नसते! अर्थात जग मिथ्या नाही, जग सत्यच आहे. पण 'रिलेटिव्ह' सत्य आहे, विनाशी सत्य आहे.

ब्रह्म 'रिअल करेक्ट' आहे आणि हे इतर सर्व जे डोळ्यांना दिसते, पंचेंद्रियांनी अनुभवाला येते, ते सर्व 'रिलेटिव्ह करेक्ट' आहे. या जगात चुकीचे काही नसतेच, परंतु जोपर्यंत भौतिक सुखांची गरज आहे, विनाशी सुखे हवी आहेत, तोपर्यंत या 'रिलेटिव्ह' सत्यात पडून राहा आणि तोपर्यंत या 'रिलेटिव्ह'मध्ये भटकत राहा. आणि या भौतिक सुखांच्या मागे लागून तर कितीतरी चिंता, उपाधी, नुसता त्रास सोसावा लागतो. माणूस जेव्हा ही सारी तडफड अनुभवतो तेव्हा आपल्याला समजते की हे तो सर्व कसे सहन करतो. जर अविनाशी सुख हवे असेल तर जिथे त्रिकालवर्ती असेल तिथे जा. हे 'रिलेटिव्ह' तर 'फॉरेन डिपार्टमेंट' आहे आणि 'रिअल' ते 'होम डिपार्टमेंट' आहे. म्हणून जर 'घरी' जायचे असेल तर 'घरी' जा आणि 'फॉरेन'मध्येच राहायचे असेल तर 'फॉरेन'मध्ये राहा. जर 'फॉरेन'लाच 'होम' मानले तर त्यामुळे तुमचे दिवस बदलणार नाहीत.

## 'सत्' प्राप्तीनंतर, जे 'सत्य' शिल्लक राहिले ते...

सत्य आणि मिथ्या, या दोन वस्तू तर आहेतच ना? की एकच वस्तू आहे? आता सत्याचा अर्थ काय आहे ते मी तुम्हाला समजावतो. तुमचे नाव काय आहे?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाई.

**दादाश्री :** तर खरोखर तुम्ही चंदुभाई आहात का?

**प्रश्नकर्ता :** होय.

**दादाश्री :** हो. म्हणजे हे सत्य आहे. लोक पण म्हणतात, की

हे खरोखरच चंदुभाई आहेत. तुमचे वडील पण म्हणतात की 'खरोखर हा चंदुभाई आहे.' म्हणजेच हे सत्य आहे. पण हे विनाशी सत्य आहे. या जगात जे सत्य आहे, त्याला ही कोर्टे स्वीकारतील, पण भगवंत मात्र स्वीकारणार नाहीत.

आता, खरोखर तुम्ही चंदुभाई नाहीत. चंदुभाई हे तर तुमचे नाव आहे ना? तर 'तुमचे नाव चंदुभाई आहे' आणि 'तुम्ही स्वतः चंदुभाई आहात', या दोन वाक्यात तुम्हाला विरोधाभास वाटत नाही की विरोधाभास वाटतो?

**प्रश्नकर्ता :** हो, वाटतो.

**दादाश्री :** म्हणजेच या जगात जे सत्य आहे, ते भगवंतांकडे विनाशी सत्य आहे. हे नाव, रूप, सर्व काही ज्याला तुम्ही सत्य मानता ते सर्व भगवंतांकडे विनाशी आहे. आणि भगवंतांचे जे सत् आहे, सच्चिदानंद-त्यात जे सत् आहे, ते सत् अविनाशी आहे. तर आम्ही तुम्हाला अविनाशी सत्‌चीच प्राप्ती करवून देतो, नंतर मग हे विनाशी सत्य तर संपूनच जाईल.

सत् म्हणजे काय? तर 'पर्मनन्ट'. आणि चित्त म्हणजे ज्ञान आणि दर्शन. आणि 'पर्मनन्ट' ज्ञान आणि दर्शन असेल तर कायम आनंदच राहील.

तर आता, सत्य आणि मिथ्या, हे दोन्ही तुम्हाला समजले ना? की नाही समजले? म्हणजे यात सत्य पण आहे आणि मिथ्या पण आहे, दोन्हीही आहेत. तुम्ही ज्याला सत्य मानत होता, ते सत्य मिथ्या आहे हे सिद्ध झाले. पण हे मिथ्या आणि खरे सत्, दोन्हीही वेगळेच आहेत ना? हे चंदुभाई, हे जे सत्य होते ते आता मिथ्या झाले ना!

आता खरे सत्य काय असायला हवे? चंदुभाई, हे 'रिलेटिव्ह करेक्ट' आहे. आणि 'रिअल करेक्ट' कोण आहेत हे शोधून काढायचे आहे. ते मी तुम्हाला सांगतो, तेच खरे सत् आहे; आणि ते शाश्वत सत् आहे. तुम्हाला सत् संयोग करायचा आहे की नाही? की मग नंतर

केव्हातरी झाला तर हरकत नाही. सध्या तर केस काळे आहेत, घाई करायची नसेल तर नका करू. पांढरे केस झालेल्यांना काळजी वाटते! तुम्हालाही (मोक्षाचे) काम करून घ्यायचे आहे? असे होय?

## अज्ञानाने आवृत केले ब्रह्माला

ही सर्व शास्त्रे ब्रह्म जाणण्यासाठी लिहिली गेली आहेत. ब्रह्म प्राप्ती करण्यासाठीच ही सर्व शास्त्रे लिहिली गेली आहेत. पण ब्रह्म प्राप्ती झाली नाही म्हणून तर अनंत जन्मांपासून भटकत राहिला आहे. जोपर्यंत स्वत:च्या स्वरूपाबद्दलचे अज्ञान जाणार नाही, तोपर्यंत निराकरण होणार नाही. इतर सर्व गोष्टी तर कल्पना आहेत. लोकांनी ज्या सर्व कल्पना केल्या, त्या कल्पनांना तर अंतच नाही.

**प्रश्नकर्ता :** मग ब्रह्मप्राप्तीला बाधक काय आहे?

**दादाश्री :** अज्ञान बाधक आहे. मळ, विक्षेप आणि अज्ञान, या तीन गोष्टी बाधक आहेत. म्हणून लोक काय करतात की सतत मळ आणि विक्षेप काढायचा प्रयत्न करतात. पण अज्ञान काढायचे प्रयत्न मात्र कुठेच होत नाहीत. अज्ञान काढण्याचे प्रयत्न होत नाहीत, त्याचे कारण काय? कारण तसे 'ज्ञानी पुरुष' नसतातच. क्वचितच कधी, हजारो वर्षांनी 'ज्ञानी पुरुषां'चा अवतार होतो. सामान्यपणे 'ज्ञानी पुरुष' नसतातच. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' असतात तेव्हा अज्ञान जाते आणि अज्ञान गेले की सगळेच गेले. म्हणजेच सर्वात मोठे बाधक कारण जर काही असेल तर ते अज्ञान आहे. आणि ते अज्ञान निघून गेले की 'मी कोण आहे?' याचे स्वत:ला भान होते. ते भान झाल्यावर मग त्याचे लक्ष जात नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ब्रह्मप्राप्तीमध्ये अहंकारच आवरण आहे, असे म्हणू शकतो ना?

**दादाश्री :** हो, अहंकार आवरण आहे हे खरे आहे पण आवरणाला अहंकार म्हटलेले नाही. इतरही बऱ्याच गोष्टींचे आवरण आहे. फक्त अहंकारच आवरण आहे असे नाही. स्वत:च्या स्वरूपाचे अज्ञान, हेच

मुख्य आवरण आहे. एकदाच आमच्याकडून 'स्वत: कोण आहात' असे जाणून घ्या, मग अज्ञान निघून जाईल. मग कसलीच अडचण नाही.

**प्रश्नकर्ता :** ब्रह्मप्राप्तीचे फळ काय आहे?

**दादाश्री :** ब्रह्मप्राप्तीचे फळ निरंतर परमानंद स्थिती! देह असला तरी पण जनक विदेहीसारखी स्थिती असते, ब्रह्ममय स्थिती! मग त्याला संसार शिवत नाही, स्पर्श करत नाही. कोणी फुले वाहिली तर तेही स्पर्श करत नाही आणि दगड मारले तर तेही स्पर्श करत नाही.

## ब्रह्मदर्शन आणि आत्मदर्शन यातील फरक

**प्रश्नकर्ता :** ब्रह्मदर्शन आणि आत्मदर्शन यात काय फरक आहे?

**दादाश्री :** आत्मदर्शन आणि ब्रह्मदर्शन यात खूप फरक आहे. ब्रह्मदर्शनाच्याही पुढे जावे लागेल. जिथे त्रिकाळभाव होतो, त्याला ब्रह्मदर्शन म्हणतात. त्रिकाळभाव! आणि आत्मा तर परमात्मा आहेच. जर कधी मूळ स्वरूपात आला तर परमात्माच आहे, आणि ब्रह्म पण परब्रह्म होत असते, कारण त्रिकाळभावात आला आहे ना! तीनही काळात अस्तित्त्व आहे.

## प्रथम ब्रह्मनिष्ठ, नंतर आत्मनिष्ठ

ब्रह्मज्ञानात आणि आत्मज्ञानात पण फरक आहे. ब्रह्मज्ञान तर आत्मज्ञानाचे द्वार आहे. तो जेव्हा ब्रह्मज्ञानात प्रवेश करतो, त्यानंतर आत्मज्ञान होते.

**प्रश्नकर्ता :** या दोघात फरक काय आहे?

**दादाश्री :** ब्रह्मज्ञान होते, म्हणजे साधनांच्या परिणाम स्वरूप स्वत:च्या स्वरूपावर एकाग्रता होते. पण स्वरूपाचे काय? त्याचे भान होत नाही. स्वरूपाचे भान तर आत्मज्ञान झाल्यावरच होते. अब्रह्माला जाणले की तेव्हापासून ब्रह्मज्ञान झाले असे म्हटले जाते. अब्रह्माला जाणल्यानंतर कोणते ज्ञान जाणणे शिल्लक उरले? तर ब्रह्मज्ञान! आणि हे ब्रह्मज्ञान तर जेव्हा संसारावरील निष्ठा संपते त्यानंतर ब्रह्मनिष्ठा बसते.

लोकांची निष्ठा सध्या कशावर आहे? सांसारिक सुखांवर निष्ठा आहे, पंचेद्रियांच्या सुखांवर निष्ठा आहे. ज्याची ही निष्ठा बदलते, ही सुखे खोटी आहेत, भौतिक आणि निरुपयोगी आहेत, आत्म्यातच सुख आहे, भगवंतातच सुख आहे, असे जेव्हा निश्चित होते तेव्हा ब्रह्मनिष्ठा बसते. ब्रह्मनिष्ठा बसली की तेव्हापासूनच त्याला ब्रह्मज्ञान म्हणतात, ब्रह्मस्वरूप म्हणतात. आणि नंतर आत्मज्ञान झाले की त्याला आत्मनिष्ठ पुरुष म्हणतात, भगवंत म्हणतात. त्याला सकल परमात्मा म्हणतात.

आत्मनिष्ठेत बुद्धीच नसते. बुद्धी गेल्यानंतरच हा प्रकाश होतो. ब्रह्मनिष्ठेत बुद्धी असते, म्हणून त्याला हा प्रकाश झालेला नसतो.

## ब्रह्म तर शब्दांच्याही पलीकडे आहे

**प्रश्नकर्ता :** 'शब्दब्रह्म' पण आहे ना?

**दादाश्री :** पण शब्दब्रह्म म्हणजे ते कानाने ऐकू येते. तर त्यात तुम्हाला कसला स्वाद मिळेल? म्हणजेच यथार्थ ब्रह्माची आवश्यकता आहे. तशी तर खूप ब्रह्मे आहेत. शब्दब्रह्म, नादब्रह्म! पण यथार्थ आत्म्याची आवश्यकता आहे, की जो अगम्य आहे, शास्त्रात उतरवता येईल असा नाही, अवर्णनीय आहे, अवक्तव्य आहे! जिथे शब्द पोहोचू शकत नाही, दृष्टी पण पोहोचू शकत नाही, तिथे आत्मा आहे आणि तो निर्लेपभावाने, असंगभावाने आहे. शब्दनाद वगैरे फक्त स्टेशन्स् आहेत. ही काही फार मोठी गोष्ट नाही. याला आत्मप्राप्ती झाली असे म्हणता येत नाही. आत्मा तर एकदा प्राप्त झाल्यानंतर परत कधी जात नाही, त्यालाच आत्मा म्हणतात. आत्मा क्षणभरदेखील विचलीत होत नाही.

**प्रश्नकर्ता :** नादब्रह्म कधी ऐकू येते?

**दादाश्री :** दुसरे सर्व ऐकणे बंद केले तर नादब्रह्म ऐकू येईल. कानांनी दुसरे काहीही ऐकले नाही तर नादब्रह्म ऐकता येईल. पण तऱ्हेतऱ्हेचे ऐकायची इच्छा तर खूपच आहे. हे जाणायचे आहे, ते जाणायचे आहे, हे ऐकायचे आहे, ते ऐकायचे आहे. कोणी असेच, बिनकामाचे बोलत असेल तर लगेच विचारतील 'काय झाले? का

झाले?' आणि नादब्रह्म तर, अशा सर्व इच्छा जेव्हा जर बंद होतील तेव्हा नादब्रह्म अगदी सहज ऐकू येईल. तो तर सहजस्वभाव आहे. तरी पण नादब्रह्म म्हणजे आत्मा नाही. तो म्हणजे एक प्रकारचा बाजा वाजतो, असे आहे. एकाग्रता करायचे साधन आहे. आत्मा तर त्याहूनही खूप पुढे, खूप दूर आहे.

**प्रश्नकर्ता :** या नादब्रह्माच्या कक्षेशी आध्यात्मिक विकासाचा काही संबंध आहे का?

**दादाश्री :** हो, आहे ना? आध्यात्मिक विकासासाठी एकाग्रतेची गरज आहे आणि यातून एकाग्रता उत्पन्न होते. नादब्रह्माने खूप चांगली एकाग्रता उत्पन्न होते. एकाग्रता उत्पन्न झाली तर अध्यात्म सुरू होते. अन्यथा अध्यात्माची सुरुवातच होणार नाही ना! पण आत्मा तर याहूनही खूपच दूर आहे.

**प्रश्नकर्ता :** जे शब्दब्रह्म आहे, त्या शब्दातच सर्व वेगवेगळ्या प्रकारे बोलत असतात, पण शब्दाचा स्फोट व्हायला हवा.

**दादाश्री :** स्फोट झालेलाच आहे. शब्दाचा स्फोट तर त्यांना झालेलाच असतो. जर खरे असतील, जर अनुभव करविणारे असतील तर शब्दांचा स्फोट तर झालेलाच असतो. अन्यथा जे शब्द अनुभव करवून देत नाहीत ते सर्व शब्द खोटे आहेत. आणि जिथे शब्द पण नसतात, ती अंतिम गोष्ट आहे, निरालंब. निरालंब, तिथे शब्द पण नसतो. पण शब्द स्वरूप प्राप्त झाल्यानंतरच माणूस निरालंब होतो.

## धन्य! धन्य! त्या दृष्टीला

**प्रश्नकर्ता :** ब्रह्ममय स्थिती होते तेव्हा सर्व एकच दिसते. स्त्री, स्त्री दिसत नाही, पुरुष, पुरुष दिसत नाही. सर्व ब्रह्मस्वरूपच दिसतात.

**दादाश्री :** सगळे शुद्धच दिसते. आम्हाला कसे दिसते, ते तुम्हाला सांगतो. आमची जागृती कशी असते? संपूर्ण जागृती! या लोकांची जागृती कशी असते? ते तर अभानतेत असे सर्व करत असतात उदा.

'मी या स्त्रीचा पती आहे, मी याचा सासरा आहे, मी याचा मामा आहे, या शेठचा नोकर आहे.' असे बोलतात ना? ही सगळी भ्रमित असल्याची लक्षणे आहे. स्वत:च्या सत्तेचे आणि स्वत:चे भान नाही.

आम्हाला तर सर्व काही ब्रह्ममय दिसते आमची जागृती कशी आहे? आम्हाला पहिल्या व्हिजनमध्ये (दृष्टीत) हे सगळे स्त्री-पुरुष कसे दिसतात? कपडे घातलेले दिसत नाहीत, सर्व नग्न दिसतात. दुसऱ्या व्हिजनमध्ये त्यांची चामडी काढून टाकली असेल असे दिसते आणि तिसऱ्या व्हिजनमध्ये कसे दिसते? आतली आतडी, वगैरे सर्व दिसते एक्झॅक्ट, म्हणजे एक्स-रे सारखे दिसते. म्हणून मग आम्हाला त्यात राग-द्वेष वगैरे काहीच होत नाही आणि शेवटी सगळ्यांमध्ये ब्रह्मस्वरूप दिसत राहते.

**प्रश्नकर्ता :** अहंकार आणि अहम् ब्रह्मास्मि या दोघात काय फरक आहे?

**दादाश्री :** अहम् ब्रह्मास्मि म्हणजे ते स्वत:च स्वत:चा अहम् करतात आणि अहंकार म्हणजे जिथे स्वत: नाही तिथे त्याचे आरोपण करतात.

## ज्ञानींच्या सान्निध्यात स्व-स्वरूप साधता येते

**प्रश्नकर्ता :** स्व-स्वरूपात अंतरवृत्ती व्हावी, असे काहीतरी हवे आहे.

**दादाश्री :** तुम्ही स्वरूपाला जाणता, स्वरूप कशाला म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** साक्षीभावाला.

**दादाश्री :** साक्षीभाव, पण तो कसा असतो?

**प्रश्नकर्ता :** त्याच्या प्रकाशात सर्व काही होत राहते.

**दादाश्री :** पण त्याला ओळखावे लागेल. आत्मज्ञान झाल्यावरच ब्रह्म ओळखता येते. नाहीतर ब्रह्म कसे ओळखता येईल? आत्मज्ञान झाले आहे का?

**प्रश्नकर्ता :** ती माझ्या बुद्धीपलीकडील गोष्ट आहे.

**दादाश्री :** म्हणजे तुम्ही साक्षीभावाबद्दल बोलत आहात पण 'ज्ञानी पुरुषां'कडे आल्यामुळे इथे तुम्हाला स्व-स्वरूप प्राप्त होईल.

## दृष्टीपालट झाल्यामुळे दशापालट होते

**प्रश्नकर्ता :** हे आत्मा-परमात्मा, ब्रह्म-परब्रह्म, हे सर्व एकच शब्द आहेत की पर्यायवाचक शब्द आहेत?

**दादाश्री :** हे सर्व पर्यायवाचक शब्द आहेत. पर्याय म्हणजे अवस्था. काही खास अवस्थेमध्ये आत्म्याला आत्मा मानले जाते आणि काही अन्य विशेष अवस्थेत त्याच आत्म्याला परमात्मा मानले जाते आणि तोच आत्मा काही अवस्थेत मूढात्मा म्हणूनही ओळखला जातो. मूढात्मा म्हणजे बहिर्मुखी आत्मा, तो पण जो आहे तोच आत्मा. अंतरात्मा म्हणतात, तो पण तोच आत्मा आणि परमात्मा म्हणतात तो पण तोच आत्मा. म्हणजेच फक्त आत्म्याच्या दशेत फरक आहे.

समजा इथे एक वकील आहे, पूर्वी तो पैसे कमावत नसेल त्याची दशा वाईट असेल तेव्हा लोक म्हणतात 'हा वकील काही कमावत नाही, त्याच्याकडे एकदम कडकी आहे.' आणि एखादा चांगला योग आला आणि तोच वकील पैसे मिळवू लागला की लोक म्हणतात 'हा फार बुद्धीशाली वकील आहे, चांगला श्रीमंत आहे.' मग काही दिवसांनी त्याचे पैसे संपले तर लोक म्हणतात 'हा एकदम कंगाल आहे.' पण वस्तुस्थितीत तर 'स्वत:' जो आहे तोच आहे.

त्याचप्रमाणे या आत्म्याच्या दशा आहेत. जोपर्यंत 'त्याला' संसारी सुखांची अपेक्षा आहे तोपर्यंत 'त्याला' मूढात्मा म्हणतात, बहिर्मुखी आत्मा म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** आणि जेव्हा आवरणे दूर होतात तेव्हा तोच आत्मा परमात्मा होतो?

**दादाश्री :** पण आवरणे अशीच जात नाहीत ना? प्रथम त्याची

दृष्टी बदलते. सध्या तुमची दृष्टी कशी आहे? तर या बाजूला आहे म्हणून तुम्हाला या बाजूचेच दिसते. तुमची दृष्टी 'मी चंदुभाई आहे' अशीच आहे ना, का मी कोणी वेगळा आहे अशी आहे?

**प्रश्नकर्ता :** मी आत्मा पण आहे ना!

**दादाश्री :** नाही, पण सध्या तर 'चंदुभाई'च्या नावाचे पत्र 'तुम्ही'च घेता ना? आता जर तुम्हाला कोणी शिव्या दिल्या तर तुमच्यावर परिणाम होईल का?

**प्रश्नकर्ता :** होईल.

**दादाश्री :** जर तुम्ही आत्मा असाल तर तुमच्यावर परिणाम होणारच नाही. (तो होतो,) म्हणून 'तुम्ही' 'चंदुभाई' आहात. तरी 'मी चंदुभाई आहे' असे बोलायला हरकत नाही. 'मी पण ए.एम्.पटेल आहे' असे कबूल करतो. पण 'मी ए.एम्.पटेल आहे' अशी माझी 'बिलीफ' नाही. पण तुमची 'मी चंदुभाई आहे' अशी 'बिलीफ' आहे.

मला एक भाऊसाहेब म्हणत होते की 'जीव आणि ब्रह्म एकच आहेत', असे फक्त वेदांतातच म्हटले आहे. बाकी कोणाला हे ठाऊकच नाही.' मी म्हटले 'जीव आणि ब्रह्म एकच आहे हे तर सर्वांनाच माहित आहे.' ही म्हातारी माणसे म्हणतात ना की 'मी मरून जाईन, मरून जाईल, डॉक्टर साहेब, मला वाचवा.' ज्याला मरणाचे भय वाटते ते सर्व जीव आहेत. आणि मरणाची भीती बंद झाली तर मग तोच जीव ब्रह्म बनतो.

## 'स्वतः' शिव आहे, परंतु भ्रांतिमुळे जीव आहे

**प्रश्नकर्ता :** ब्रह्माला जीव का व्हावे लागले?

**दादाश्री :** तुम्ही तर शिवच आहात. पण तुम्हाला 'मी शिव नाही' अशी खात्री झाली आहे, अशी भ्रांती झाली आहे तुम्हाला. 'मी चंदुभाई आहे' असे तुम्ही मानता. लोकांनी नाव ठेवले म्हणून काय आपण तसे मानून घ्यावे? तुम्ही शिवच आहात, परंतु जर तुम्हाला जीव आणि शिव यातील भेद समजला तर.

**प्रश्नकर्ता :** मग तर अद्वैत झाले ना?

**दादाश्री :** जीव आणि शिव यात जर भेद राहिला नाही तर मग अद्वैत होतो. जेव्हा जीव आणि शिव एकच भासतात, तेव्हा ते अद्वैत आहे. 'जीव वेगळा आणि शिव वेगळा' ही तर भ्रांती आहे.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मा तर शिव होता, तो जीव कसा काय झाला?

**दादाश्री :** या चुकीच्या मान्यतांमुळे, राँग बिलीफस्मुळे जीव झाला आहे. 'ज्ञानी पुरुष' ह्या राँग बिलीफस् फ्रॅक्चर करतात (तोडतात) आणि मग 'राइट बिलीफ' बसवतात. तेव्हा मग 'स्वत:' 'आत्मा'च बनतो, शिवस्वरूप होतो.

जीवाला शिव व्हायला वेळ लागत नाही. स्वत: शिवच आहे पण त्याला ही भ्रांती उत्पन्न झाली आहे. म्हणजेच सर्व राँग बिलीफस् बसल्या आहेत. त्या बिलीफस् बदलल्या आणि 'राइट बिलीफ' बसली तर कोडे सुटते.

## जाणकारच वेगळे करू शकतात

**प्रश्नकर्ता :** पण भौतिक जगत्, जीव आणि आत्मा या तिघांच्या व्याख्येत काय फरक आहे? हा जो भेद आहे तो कशासाठी?

**दादाश्री :** जीव म्हणजेच भौतिक जगत् आहे. यात भौतिक जगत् जाणण्याची गरजच नाही. यात फरक का केला? तुम्हीच सांगा.

**प्रश्नकर्ता :** जीव आणि अजीव या प्रकारे.

**दादाश्री :** पण जीव, तोच भौतिक आहे. त्याला जीवात्मा का म्हणतात? तर 'त्याची दृष्टी भौतिककडे आहे आणि त्याचा मुक्काम पण भौतिकातच आहे, म्हणून त्याला जीवात्मा म्हटले आहे.' जो भौतिक सुखातच रमलेला आहे, रममाण आहे, त्याला जीवात्मा म्हणतात. आणि त्यालाच भौतिक जगत् म्हणतात. कारण जोपर्यंत भौतिक आहे तोपर्यंत भौतिक रममाणताच असते. समजले का तुम्हाला? तुम्हाला जर वेगळेपण

हवे असेल, वेगळे करायचे असेल, तर मी तुम्हाला वेगळे करून देईन. नाहीतर हे भौतिक जग आहे, तोच जीवात्मा आहे. ज्यामधून ही 'टेम्पररी' सुखे शोधतो, 'रिलेटिव्ह' सुखे शोधतो, ते सर्व भौतिक जग आहे. जिथून शोधतो ते सर्वच भौतिक जग आहे आणि शोधणारा पण भौतिक जगच आहे. हे जर समजले तर काम होईल.

**प्रश्नकर्ता :** शरीरात जीव पण आला, शरीरात आत्मा पण आला आणि शरीरात भौतिक जग पण आले, तिघांचे मिश्रण आले.

**दादाश्री :** सर्व काही आले. या शरीराच्या आत तर पूर्ण ब्रह्मांड आले, काहीच शिल्लक उरले नाही.

**प्रश्नकर्ता :** तर आता आपण याला वेगळे कसे समजायचे? याला वेगळे करून कसे समजायचे?

**दादाश्री :** वेगळे करण्यासाठी 'सायंटिस्ट' बनावे लागेल. या अंगठीत सोने, तांबे आणि अजून दोन-तीन धातू एकत्र झालेले असतील आणि या मिश्रणातून हे सर्व धातू वेगळे करायचे असतील, तर कसे वेगळे करता येतील? कोणीही वेगळे करू शकेल का? जो याचा जाणकार आहे तोच हे करू शकेल ना? त्याचप्रमाणे यात सुद्धा जो जाणकार असेल तोच वेगळे करू शकेल. इतर कोणीही असे वेगळे करू शकणार नाही ना! जर स्वतःच यात डोकेफोड करत बसला तर अनंत जन्मांची डोकेफोड वाया जाईल, आणि उलट चोपडायचे औषध प्यायला तर मरून जाईल. चोपडण्याचे औषध प्यायला, तर यात भगवंतांचा काय दोष?

## जीव आणि आत्मा, भिन्न नाहीत की अभिन्नही नाहीत

**प्रश्नकर्ता :** हे सांगा की जीव आणि आत्मा यात काय फरक आहे?

**दादाश्री :** जोपर्यंत संसारदशेत आहे, तोपर्यंत जगत आहे आणि मरत आहे, तोपर्यंत त्याला जीव म्हटले जाते. संसारदशा म्हणजे 'मी

संसारी आहे' असे मानतो आणि जोपर्यंत संसारदशेला स्वत:ची दशा मानून जगतो आणि मरतो, तोपर्यंत त्याला जीव म्हणतात. आणि जगणे-मरणे बंद झाले तर तेव्हापासून त्याला शिव म्हणतात, त्याला शुद्धात्मा म्हणतात. जीव नेहमीच संसारी असतो, कर्मसहित असतो आणि आत्मा कर्मरहित असतो.

**प्रश्नकर्ता :** तर मग जीव आणि आत्मा, हे दोन्ही वेगळेच झाले ना?

**दादाश्री :** जीव आणि आत्मा? नाही. जो असतो तोच आत्मा जर कर्मसहित असेल तर त्याला जीव म्हणतात आणि कर्मरहित असेल तर त्याला आत्मा म्हणतात. जेव्हा कर्मसहित असतो तेव्हा जगतो आणि मरतो, तो जीव आहे.

**प्रश्नकर्ता :** आणि आत्मा तर अमरच आहे?

**दादाश्री :** हो, तो तर अमरच आहे.

**प्रश्नकर्ता :** आणि जीव त्याला चिकटलेला आहे.

**दादाश्री :** नाही, चिकटलेला नाही. असे आहे की जीवात्मा, आत्मा आणि परमात्मा, यात जो जीवात्मा आहे ती कर्मसहित अवस्था आहे, आणि अहंकारासहित आहे. जो देहाध्यासरूपी आहे त्याला जीवात्मा म्हणतात आणि ज्याला अहंकार नसतो, ज्याला जगणे-मरणे नसते, तो आत्मा आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग परमात्मा स्टेज कोणती?

**दादाश्री :** ज्याला स्वत:च्या स्वरूपाचे भान होते तो आत्मरूप होतो आणि मग परमात्मापण प्रकट होतच राहते. जेव्हा परमात्मापण पूर्णपणे प्रकट होते तेव्हा पूर्ण परमात्मा बनतो. म्हणजेच जेव्हा तेरावे गुणस्थानक पूर्ण होते, केवळज्ञान होते तेव्हा तर तो पूर्ण परमात्माच होतो.

म्हणजे जीव ही पण आत्म्याचीच अवस्था आहे, पण भ्रांत अवस्था आहे आणि त्याला जीव का म्हणतात? तर जो जगतो आणि मरतो त्या

अवस्थेला जीव म्हणतात. आणि आत्मा शुद्ध चेतनस्वरूप आहे, तो स्वत:च परमात्मा आहे. पण तसे भान झाले पाहिजे. जोपर्यंत तसे भान होत नाही तोपर्यंत 'मी आत्मा आहे' हेही माहिती नसते. 'मी तर जीव आहे' असेच भान असते. आत्म्याच्या भ्रांत अवस्थेतच 'मी आहे' म्हणजेच 'मी जगत आहे, मी मरेन' असे मानतो.

तुम्हाला समजले ना? जीव आणि आत्मा हे दोघे एकही नाहीत, आणि अलग पण नाहीत. 'अलग' म्हटले तर अलग विभाग होईल, पण असे नाही. आणि जर 'एक आहे' असे म्हटले तर आत्म्यात अशुद्धी उत्पन्न झाली, आत्म्यात भ्रांती उत्पन्न झाली असे म्हणावे लागेल. पण असेही झालेले नाही. कारण स्वत: आत्मा झालेलाच नाही. ही तर आत्म्याची भ्रांत अवस्था उत्पन्न झाली आहे आणि तोच जीव आहे.

म्हणजेच जीव आणि आत्मा एकच आहे. स्वयंपाक करताना तिला स्वयंपाकीण म्हटले जाते आणि बाहेर नाच करत असताना तिला नर्तकी म्हटले जाते. पण स्त्री आहे तीच आहे.

## मी, बावो, मंगळदास

आपल्या इथे पूर्वी असे म्हणत असे ना, आपण विचारले की 'कोण आले?' तेव्हा तो सांगे 'मी आलो आहे.' मग परत विचारले 'मी, पण कोण? ते सांग ना!' तेव्हा तो सांगेल 'मी बावो' (साधु, बुवा) मग परत विचारले 'कोण बावो?' तेव्हा तो सांगतो 'मी बावो, मंगळदास.' तेव्हा मग विचारणाऱ्याला ओळख पटते. नुसते 'मी' म्हटल्यावर कोणी ओळखू शकत नाही. 'मी' बावो म्हटले तरीही तो म्हणेल, 'हा बावा आला की तो बावा आला?' म्हणजेच मी, बावो आणि मंगळदास, असे तिन्ही शब्द बोलल्यावर ओळख पटते की 'हो, मंगळदास बावो.' मग त्याच्या डोळ्यासमोर चेहरा पण येईल आणि मग तो दरवाजा उघडेल. आणि जर मंगळदास पण दोन-तीन असतील तर मग 'मी, बावो, मंगळदास, महादेवजीवाला.' असे बोलावे लागेल, तरच ओळख पटेल. म्हणजे मी, बावो, मंगळदास. तर सांगा आता, किती

माणसे असतील? यात मी कोण? बावो कोण? आणि मंगळदास कोण? असे तुम्ही ऐकलेले नाही का? पण तुम्हाला ते उपयोगी पडले नाही, पण मला तर हे ऐकल्यावर लगेच उपयोगी पडले मी एक एक वाक्य ऐकतो आणि मला त्याचा लगेच उपयोग होतो. रस्त्याने जात असताना मला ऐकू आले तरी त्याचा उपयोग होतो.

म्हणजे 'मी' कोण आहे, त्याला ओळखायला तर हवे ना? आणि ते त्याच्या स्वत:च्या समजेत 'फिट' करावे लागेल ना, की 'मी' म्हणजे कोण? याच प्रकारे यात 'मी', म्हणजे आत्मा आहे, आणि या 'मी' ला ओळखता आले तर उकल होईल.

## ...असे भान होण्याचीच आवश्यकता...

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्म्यातूनच परमात्मा होतो, असे आहे का?

**दादाश्री :** आत्मा स्वत:च परमात्मा आहे. फक्त त्याला त्याचे भान व्हायला हवे. तुम्हाला जर भान झाले, अगदी एका मिनिटासाठी जरी भान झाले की 'मी परमात्मा आहे' तेव्हापासून तुम्ही परमात्मा होऊ लागाल!

**प्रश्नकर्ता :** तर मग 'मी परमात्मा आहे' असे आम्ही बोलू शकतो का?

**दादाश्री :** तुम्ही असे बोललात की 'मी परमात्मा आहे' तर लोक तुमच्यावर ओरडतील, तुम्हाला शिव्या देतील, तुमची टिंगल करतील. जेव्हा तुम्हाला कोणी शिव्या देणार नाही, तुमची टिंगल करणार नाही, तेव्हा 'मी परमात्मा आहे' असे तुम्ही म्हणू शकता. आपण जर नकली आंबे घेऊन गेलो तर त्यातून रस निघेल का? नाही निघणार ना? हे तर तुम्हाला समजते ना? म्हणजेच तुम्ही परमात्माच आहात, पण अजून तुम्ही परमात्मा झालेला नाहीत. त्या स्वरूपाचे अजून तुम्हाला भान झालेले नाही. सध्या तुम्हाला 'मी चंदुभाई आहे' असे भान आहे. 'मी परमात्मा आहे' असे भान व्हायला हवे. तर मग आता 'मी परमात्मा आहे' असे तुम्ही म्हणू शकता का?

**प्रश्नकर्ता :** नाही म्हणू शकत.

**दादाश्री :** हो, नाहीतर लोक तुमची टिंगल उडवतील. हे लोक तर यथार्थ गोष्ट असली, बरोबर असेल तरी त्याची चेष्टा करतात. हे तर जग आहे. त्याचा अंतच नाही.

तर आता 'तुम्ही आत्मा आहात' याची खात्री झाली आहे का? 'तुम्ही आत्मा आहात' याचा तुम्हाला कशा प्रकारे अनुभव आला आहे? कशा प्रकारे खात्री पटली?

**प्रश्नकर्ता :** एवढी खात्री तर आहे की आत आत्मा आहे.

**दादाश्री :** पण ही खात्री कशामुळे झाली? त्यासाठी असा काही थर्मामीटर नसतो की तो असा ठेवला तर लगेच आत आत्मा आहे असे आपल्याला कळेल? असा थर्मामीटर असतो का?

**प्रश्नकर्ता :** माणूस मेल्यानंतर त्याचा हात पण कामाचा राहत नाही, त्याचे काहीच कामाचे राहत नाही.

**दादाश्री :** तो तर जो जीवात्मा आहे, तो मेला. पण तुम्ही तुमचा आत्मा जाणून घेतला आहे का? 'मी आत्मा आहे' असा अनुभव तुम्हाला आला आहे का?

**प्रश्नकर्ता :** मी म्हणतो की मला आत्म्याचा अनुभव आहे, आणि तुम्ही म्हणता की मला अनुभव नाही. तर मग मला कसला अनुभव आहे हे तुम्ही सांगा.

**दादाश्री :** असे आहे की, सध्या तुम्हाला जीवात्म्याचा अनुभव आहे. पण तो मूळ आत्मा नाही. मूळ आत्मा चेतन आहे आणि जीवात्मा हे निश्चेतन-चेतन आहे. सर्व जग निश्चेतन-चेतनालाच चेतन मानून बसले आहे, म्हणून फसले आहे. निश्चेतन-चेतन म्हणजे चेतनासारखी सगळी लक्षणे दिसतात, हालचाल करताना पण दिसतो, पण ते चेतन नाही.

## आत्मभान झाल्यावर 'स्वत:' अमर

**प्रश्नकर्ता :** अमक्या माणसातून जीव निघून गेला म्हणून तो मेला असे म्हटले जाते. तर यात जीव आणि आत्मा हे दोघे एकच आहेत की वेगळे? जर दोघे एक असतील तर कोणत्या स्थितीला जीव म्हणतात? कोणत्या स्थितीला आत्मा म्हणतात?

**दादाश्री :** जो जगतो-मरतो, त्याला जीव म्हणतात आणि जो जगत पण नाही आणि मरतही नाही, त्याला आत्मा म्हणतात. जीव ही तर 'टेम्परररी ॲडजस्टमेंट' आहे, ती फक्त अवस्था आहे.

**प्रश्नकर्ता :** जीव आणि आत्मा, एका शरीरातून निघून दुसऱ्या शरीरात जातात, जोपर्यंत मोक्ष होत नाही तोपर्यंत, असेच ना?

**दादाश्री :** फक्त जीवात्मा एकटाच नाही, तर इतर सर्व पण सोबत जाते. कर्म-बिर्म सर्व जातात. जोपर्यंत मुक्ती होत नाही, कर्मरहित होत नाही तोपर्यंत सर्व काही सोबतच फिरत राहते. केलेली सर्व कर्मे देखील सोबतच राहतात.

फक्त 'मी कोण आहे?' एवढेच जाणायचे आहे. जर 'तू' जीव आहेस आणि जगत आहेस तर मरशील आणि जर 'तू' आत्मा आहेस तर अमर होशील. जगणे ही एक अवस्था आहे आणि जो जगतो-मरतो त्याला जीव म्हणतात. संसारी अवस्थेमध्ये जीव म्हणतात. त्यात पाप-पुण्य सर्व काही सोबतच असते, पौद्गलिक वस्तू सोबत असते, कर्मसहित असतो, त्याला जीव म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग मन कशाला म्हणतात?

**दादाश्री :** ज्याच्यात विचार येतात, त्याला मन म्हणतात. मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार, ह्या तर अंत:करणाच्या वस्तू आहेत. आणि जीव तर या सर्वांचा *उपरी* आहे. तो स्वत:च जीव आहे, आणि आत्मा ही वेगळी वस्तू आहे. जीव आणि आत्मा वेगवेगळे आहेत. जो जगतो-मरतो, तो जीव आहे. आत्मा मरत नाही. 'आत्मा' तर अमर आहे आणि तेच 'आपले' स्वरूप आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग जीवालाच पुद्‌गल म्हणतात ना?

**दादाश्री :** हो, जीवालाच पुद्‌गल म्हणतात. पण आपल्याला ते जिवंत दिसते, चालते, बोलते, फिरते सर्वकाही करते. पण आहे तर ते पुद्‌गलच. जीव म्हणजे फक्त पुतळा उभा राहिला आहे.

## भ्रांती तुटली तर भेद मिटतात

**प्रश्नकर्ता :** जीवाला परमेश्वर कसे काय म्हणू शकतो? जीव तर एक आभास आहे.

**दादाश्री :** भेदबुद्धीने जीव म्हटले जाते. जोपर्यंत मी वेगळा आहे आणि 'भगवंत वेगळे आहेत' अशी भेदबुद्धी आहे तोपर्यंत जीव म्हटले जाते. आणि 'मीच भगवंत आहे' अशी अभेदबुद्धी झाली तर शिवबुद्धी होऊन जाते.

**प्रश्नकर्ता :** 'मी आत्मा आहे' या दृष्टीने आत्म्यात भेद नसतोच ना?

**दादाश्री :** 'मी आत्मा आहे' असे जर भान झाले ना, तर जिवा-शिवाचा भेद संपतो.

**प्रश्नकर्ता :** हे बरोबर आहे. पण जीव आणि परमेश्वर यात काय फरक आहे?

**दादाश्री :** जो जीव असतो त्याला विनाशी वस्तू उपभोगण्याची इच्छा असते आणि विनाशी वस्तूंवर त्याची श्रद्धा असते. आणि परमेश्वराची फक्त अविनाशीवरच श्रद्धा असते आणि परमेश्वर फक्त स्वत:च्या अविनाशी पदालाच मानतात. विनाशी वस्तूंना त्यांच्या लेखी काहीच किंमत नसते. एवढाच फक्त फरक आहे. 'जीव' म्हणजे तर तो 'स्वत:' भ्रांतीत आहे, आणि ती भ्रांती गेल्यावर या विनाशी वस्तूंवर असलेली त्याची मूर्च्छा नाहीशी होते आणि तेव्हा तो 'स्वत:'च 'परमेश्वर' बनून जातो.

वीतराग होण्यासाठी सर्वात प्रथम आर्तध्यान आणि रौद्रध्यान बंद

व्हायला हवे. आर्तध्यान आणि रौद्रध्यान बंद झाले की मग चिंता वाटतच नाही. संसारात राहूनदेखील चिंता होत नाही. चिंता असेल तर त्याला अर्थच काय? महावीर भगवंतांचा हा सिद्धांत इतका सरळ आहे, पण 'ज्ञानी' भेटले तरच! आणि जर 'ज्ञानी' भेटले नाहीत तर कोट्यावधी उपाय करून देखील भगवंतांच्या सिद्धांताचा एक अंश पण प्राप्त होणार नाही!

## 'मी-तू' या भेदामुळे, अनुभूती होत नाही

म्हणजे भगवंतांची भक्ती करणे हे चांगलेच आहे. त्यामुळे आपल्याला भौतिक सुखे मिळतात, पुढचा रस्ता मिळतो. अध्यात्म्याच्या रस्त्यावर तो पुढे जात राहतो, चांगली संगती लाभते, सत्संग पण मिळत जातो. पण तिथे अनुभूती होत नाही. अनुभूती तर, जेव्हा जीव आणि शिव यातील भेदबुद्धी संपते, तेव्हा तिला अनुभूती म्हटली जाते.

जीव आणि शिव यांच्या भेदबुद्धीचे एक तरी वाक्य तुम्हाला आवडले का? तरच अनुभूती तिला म्हणता येईल ना? नाहीतर मानलेली अनुभूती तर खोटीच आहे ना? अशी खोटी अनुभूती पुष्कळ जणांनी बाळगली आहे आणि ती सुद्धा त्यांनी ती बाजारातून आणलेली असते. दुसऱ्यांनी फेकलेली, विकलेली अशी गोष्ट हे विकत घेऊन येतात! म्हणजेच जीव आणि शिव यामधील भेदबुद्धी नष्ट व्हायला हवी. म्हणून अखाने हेच म्हटलेच आहे ना की,

*'जो तू जीव तो कर्ता हरि, जो तू शिव तो वस्तू खरी.'*

बरोबर म्हणत आहेत ना अखा? म्हणजे जीवा-शिवाची भेदबुद्धी मिटली की मग तू शुद्धात्मा आहेस, तूच परमात्मा आहेस! याउलट हा तर म्हणणार, 'भगवंत वेगळे आणि मी वेगळा.' पण जेव्हा जीव-शिव यातील भेदबुद्धी समजली, म्हणजेच यात काहीच भेद नाही, हे समजले की मग तो मुक्त होईल!

एक ना एक दिवस हे सर्व समजावे तर लागेलच ना? शेवटी आत्मा तर जाणावाच लागेल ना? आत्म्याला जाणले तर जीव-शिव

यांची भेदबुद्धी मिटून जाईल आणि जीव–शिव यांची भेदबुद्धी मिटल्यावर भीती निघून जाते, आणि मग वीतरागता राहते.

भगवंत वेगळे आणि मी वेगळा, असे म्हणत राहिले तर याचा अंत कधी होईल? हे तर अनंत जन्म चालूच आहे ना! मी आणि तू दोन आहेतच ना! 'तूं ही, तूं ही' असे गाणे तर कितीतरी जन्मांपासून गात राहिला आहे.

तुम्हीच तर या जगाचे मालक आहात! पण इथे तर पूर्ण मालकीपणाच उडून गेला आहे. काय चालले आहे हे? 'मीच शिव आहे' असे भान व्हायला हवे, त्यालाच अनुभूती म्हणतात. 'मी शुद्धात्मा आहे' असे भान होणे, हीच अनुभूती आहे. 'मी जीव आहे' असे भान तर प्रत्येक जीवाला आहेच.

## ...पण मार्ग एकच आहे

**प्रश्नकर्ता :** जीव आणि शिव यातील भेद मनुष्य देहा व्यतिरिक्त इतर कुठल्याही देहात तोडता येतो का?

**दादाश्री :** नाही. इतर कोणत्याच देहात हा भेद तोडता येत नाही.

**प्रश्नकर्ता :** तपस्वी सूक्ष्मदेहाने हे करू शकतो का?

**दादाश्री :** तपस्वी? हे जाणण्यासाठी? नाही. हे भेद तोडणे हे तपस्व्याचे कामच नाही.

**प्रश्नकर्ता :** हा भेद तोडण्यासाठी सूक्ष्म क्रिया असतात का? हे सूक्ष्म देहाने जाणता येते का?

**दादाश्री :** त्याचे असे आहे, फक्त 'ज्ञानी पुरुष'च जास्त पुढचे जाणण्यासाठी सर्व काही करू शकतात. 'ज्ञानी पुरुषां'मध्ये जीव आणि शिव यातील फरक संपलेलाच असतो. तरी पण त्याच्यापुढील जाणायचे असेल तर इतर सूक्ष्म रित्या पुढील सर्व जाणू शकतात. तपस्वी मात्र काहीही जाणू शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** पण सूक्ष्मदेहाने तरी जीव आणि शिव यांच्यातील भेद टाळू शकतात ना?

**दादाश्री :** नाही. टाळू शकतात, पण तो तर त्यांच्या मान्यतेनुसार टाळलेला असतो. सायकॉलॉजिकल, पण असे चालणार नाही ना? तो तर ज्ञानाने पद्धतशीर व्हायला हवा, त्याच्या पद्धतीने व्हायला हवा. वेदांत म्हणा, किंवा जैन म्हणा, किंवा इतर काहीही म्हणा, पण मार्ग एकच आहे. त्याचे ज्ञान एकाच प्रकारचे आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मनुष्य देहातच हा जीव आणि शिव यातील भेद तुटू शकतो, असे आहे का?

**दादाश्री :** मनुष्य देहाखेरीज इतर कोणत्याही देहात हे होऊ शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** देवगतीत?

**दादाश्री :** नाही. तिथेही होऊ शकत नाही. देवगतीत होऊ शकत नाही. देवगतीवाले एवढे मात्र करू शकतात की तिथे देवगतीत राहत असतील आणि त्यांना दर्शन घ्यायचे असेल तर ते येथे येऊ शकतात. म्हणजेच देवगतीवाले इथे दर्शन घेण्यासाठी येऊ शकतात.

**प्रश्नकर्ता :** विदेही स्थितीवाला जीव आणि शिव यातील भेद मिटवू शकतो का?

**दादाश्री :** विदेही? विदेही तर स्वतःच शिव झालेला असतो, ज्याच्यात जीवा-शिवाचा भेद संपलेला आहे आणि जो स्वतः शिवस्वरूप झाला आहे, त्याला विदेही म्हणतात. आपल्याकडे असे जनक राजा होऊन गेले आहेत.

## कर्ता-भोक्ता, ही जीवाची अवस्था आहे

जीवाची ही अज्ञान मान्यता आहे की मी मरणार आहे. त्यामुळे जीव तर, जोपर्यंत आहे तोपर्यंत जगतो नाहीतर मरतो. जगतो-मरतो या

अवस्थेला जीव म्हणतात. आणि अजन्म-अमर, त्याला आत्मा म्हणतात, शिव म्हणतात. शुद्धात्मा हा शिव आहे. 'स्वत: शिव आहे' हे समजले की कल्याण झाले.

'हे मी करत आहे, मी भोगत आहे' असे भान आहे तोपर्यंत जीव आहे. जीव हा कर्ता-भोक्ता आहे. आणि जेव्हापासून 'अकर्ता-अभोक्ता झाला', अशी त्याची ठाम श्रद्धा बसली, तेव्हापासून तो आत्मा झाला. प्रतीतीत बसले तेव्हापासून आत्मा झाला. मग आत्ताच तसे प्रत्यक्ष रूपकात येईल न येईल ती गोष्ट वेगळी. कारण रूपकात यायला जरा वेळ लागतो.

**प्रश्नकर्ता :** कोणत्या अवस्थेला जीवाची अवस्था म्हटले आहे, ते समजले नाही.

**दादाश्री :** कर्ता-भोक्ता ही जीवाची अवस्था आहे. 'हे मी करत आहे, हे मी भोगत आहे', ही जीवाची अवस्था आहे. 'हे मी करत आहे, हे मी भोगत आहे', याला विनाशी अवस्था म्हटले आहे. 'मी मरून जाईन' असे कोणी बोलतो की नाही बोलत? आणि 'मी अजून पंधरा वर्षे जगणार आहे' असे पण बोलतो ना?

**प्रश्नकर्ता :** हो, बोलतो.

**दादाश्री :** (असे बोलतो) तोच जीव आहे.

**प्रश्नकर्ता :** जीव स्वत:च कर्ता आहे का?

**दादाश्री :** 'मी कर्ता आहे, मी भोक्ता आहे' असे त्याला भान असते. जो जगण्याची इच्छा करतो आणि मरण्याची इच्छा करत नाही तो जीव आहे. आत्मा तर अकर्ता आणि अभोक्ता आहे.

तुम्हाला जीव आणि शिव यातील भेद समजला का?

## विरोधाभासी व्यवहार कधी संपणार?

म्हणून म्हटले आहे की, 'जो तू जीव तो कर्ता हरि.' आणि 'जो

तू शिव तो वस्तू खरी.' जर तू स्वतःच शिवस्वरूप बनलास तर मग काहीच नाही, कोणी बाप पण *उपरी* नाही. जोपर्यंत जीव आहेस, तोपर्यंत ही सर्व भौतिक सुखे आणि हे सर्व नातेवाईक चांगले वाटतात. 'हे माझे व्याही आले', व्याही आले म्हणत तो त्यांच्यातच हरवून जातो. ज्याच्यात हरवून जातो त्या स्वरूपाचा तो होतो. व्याही आले तर व्याह्यातच हरवून जातात असे आपले लोक आहेत.

मग काही म्हणतात, 'कर्ता मिटे तो छूटे कर्म, ए छे महाभजननो मर्म.' महाभजनाचे मर्म कोणते? जर कर्मे सुटली नाहीत तर कर्मांच्या आधीन कर्ता आणि कर्त्याच्या आधीन कर्म, कर्माच्या आधीन कर्ता आणि कर्त्याच्या आधीन कर्म. असे चक्र आहे ते चालूच. 'कॉजेस् अॅन्ड इफेक्टस्, इफेक्टस् अॅन्ड कॉजेस्, कॉजेस् अॅन्ड इफेक्टस्, इफेक्टस् अॅन्ड कॉजेस्.' आणि त्यात परत हे सर्व लोक कर्तापण शिकवतात, कर्ता बनवतात. 'हे सोडा, आणि चांगले करा.' म्हणजे एकीकडे कर्मे सोडायची आहेत आणि दुसरीकडे हे करायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** विरोधाभास.

**दादाश्री :** हो, म्हणून ही गाडी काशीपर्यंत पोहोचतच नाही. कितीतरी जन्मांपासून लोकांच्या गाड्या काशीपर्यंत पोहोचतच नाहीत. अरे... कोण जाणे कोणत्या गावात निवांतपणे पडून असते, काशीपर्यंत तर कोणाची गाडी पोहोचलीच नाही. म्हणून मी तुम्हाला काशीचा पासपोर्ट बनवून देतो आणि तो पासपोर्टच तुम्हाला काशीपर्यंत पोहोचवील. गाडीची चाके पोहोचविणार नाहीत पण हा पासपोर्टच पोहोचवील. कारण 'कर्तापण' सुटून जाते. आणि एकदा ते सुटले की मग जगात राहिलेच काय?

## चुकीच्या मान्यता 'ज्ञानीच' सोडवतात

**प्रश्नकर्ता :** हे सगळे जो करवितो, तो जीवच करवितो अशी माझी मान्यता आहे.

**दादाश्री :** पण करणारा कोण आहे? जीव करवीत असेल तर मग करणारा कोण आहे? प्रत्यक्षात हे जीव करवीतच नाही.

**प्रश्नकर्ता :** नाही, जीवच करवीतो.

**दादाश्री :** हे तर तुम्हाला तसे वाटते की हे जीव करवीत आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणून असे वाटते की प्रथम जीवावर ताबा मिळवावा, तरच पुढे जाता येईल ना?

**दादाश्री :** अरे बाबा, जीव बिचारा काहीच करवीत नाही. जीवामध्ये तर संडासला जाण्याची पण शक्ती नाही. जेव्हा संडासला होत नाही तेव्हा लक्षात येते की ही शक्ती माझी नाही. मग जेव्हा डॉक्टर औषध देतो तेव्हा संडासला होते.

**प्रश्नकर्ता :** पण आपल्याला आतून सांगितले जाते ना की संडासला जायचे आहे, तेव्हाच आपण संडासला जातो ना?

**दादाश्री :** हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. प्रेरणा तर आतूनच होते. पण संडासला जाण्याची सत्ता जीवाची स्वत:ची नाही. जीव दुसऱ्या सत्तेने चालतो. यात आत्म्याची पण सत्ता नाही. आतून सांगितले जाते हे बरोबर आहे. पण याचा अर्थ ते काय सांगू इच्छितात? आतून प्रेरणा होते, ती प्रेरणा जेव्हा होते, तेव्हा मन ताबडतोब इंद्रियांना कळवते की असे असे करायचे आहे. तेव्हा मग सर्व इंद्रिये तयार होतात. म्हणजे आतील प्रेरणाशक्तीमुळे सर्वकाही होत असते.

**प्रश्नकर्ता :** पण जीवावर ताबा मिळवला तरच पुढे जाता येईल ना?

**दादाश्री :** या जीवाला ताब्यात घेऊन तरी पाहा ना! त्याच्यात संडासला जाण्याची पण शक्ती नाही आणि जगण्याची पण शक्ती नाही आणि मरण्याची पण शक्ती नाही. जर मरण्याची शक्ती असती तर मग तो कधी मेलाच नसता. पण अशी कोणतीच शक्ती नाही.

**प्रश्नकर्ता :** ती शक्ती कोणाजवळ आहे?

**दादाश्री :** त्याच शक्तीबद्दल मी तुम्हाला सांगत आहे. त्याच शक्तीमुळे हे सर्व जग चालू आहे.

**प्रश्नकर्ता :** त्या शक्तीला आम्ही भगवंत म्हणतो.

**दादाश्री :** हो, त्या शक्तीला सारे जग भगवंत म्हणते. पण ती शक्ती तर जड शक्ती आहे. आणि जड शक्ती आहे म्हणून आम्ही त्या शक्तीला भगवंत म्हणत नाही. जगातील लोकांना समज नाही ना? म्हणून तिला लोक भगवंत म्हणतात, भगवंताशिवाय दुसरे करणार तरी कोण? पण ती शक्ती दुसरी आहे. मी तुम्हाला ती दाखवीन.

**प्रश्नकर्ता :** याशिवाय मी असेही समजत होतो की जो आवरणवाला आहे त्याला जीव म्हणतात आणि आवरणे जशी जशी तुटत जातात, तसतसा जीवात्म्यामधून आत्मा होतो.

**दादाश्री :** असे आहे की कित्येक लोकांची मान्यता अशी असते की आवरणवाल्याला जीव म्हणावे आणि निरावरणवाल्याला आत्मा म्हणावे. पण मी असे सांगू इच्छितो की आवरणे असली तरीही आत्मा प्राप्त होऊ शकतो, तर मग ही नवीनच गोष्ट असेल ना?

**प्रश्नकर्ता :** हो, याला नवीनच म्हणावे लागेल. नाहीतर आम्हाला असे समजावण्यात आले आहे की समुद्रात पाणी आहे, वाऱ्यामुळे त्याला लाटा येतात, तर त्या लाटा म्हणजे आत्मा आणि समुद्र म्हणजे परमात्मा.

**दादाश्री :** हे तर सर्व विकल्प आहेत, वेड्यासारखे विकल्प! हो, आवरणवाल्याला जीव म्हणावे आणि निरावरणवाल्याला आत्मा म्हणावे, हा विकल्प आपण चालवू शकतो. नाहीतर इतर असे विकल्प काहीच उपयुक्त नाहीत. आत्मा जाणता येईल अशी वस्तूच नाही. जगात क्वचितच कधी, हजारो वर्षांत कोणी एखादाच आत्मज्ञानी असतो. दुसरा कोणी असूच शकत नाही, अशी ही बेजोड बाब आहे. बेजोड म्हणजे अद्वितीय.

## भ्रांतीचा परिणाम खूपच जास्त असतो

**प्रश्नकर्ता :** जीव हाच शिव आहे आणि आत्मा हाच परमात्मा आहे, तर मग इथे एकामेकांना मारून टाकतात, एकमेकांचे खून करतात, दुःख होईल असे करतात, असे का करत असतील?

**दादाश्री :** ही सर्व तर प्रकृतीची लढाई आहे, आत्म्याची लढाई नाही. प्रकृती लढते. हे पुतळे लढतात ना, तसे आहे हे. म्हणून जोपर्यंत ही भ्रांती आहे तोपर्यंत 'हा माझ्या मुलाचा मुलगा मेला!' (असे वाटते). पण अहाहा! आत्मा तर जसाच्या तसाच राहिला आहे. फक्त पॅकिंग मरते आणि मग रडारड करतात की, 'हा माझ्या मुलाचा एकुलता एक मुलगा होता.' जणू काही तो स्वतः कधी मरणारच नाही, असे तो रडतो.

## 'वस्तू' एक, दशा अनेक

अनंत आत्मे आहेत आणि त्या सर्वांमध्ये भगवंत बनण्याची क्षमता आहे पण आज मूढात्मा दशेत आहेत, बहिर्मुखी आत्मा आहेत.

बहिर्मुखी आत्मा म्हणजेच मूढात्मा. बहिर्मुखी म्हणजे 'टेम्पररी' गोष्टीत सुख शोधणारा. त्याला असे वाटते की, 'हे माझे आहे, यामधून मला सुख मिळेल, असे सुख मिळेल.' आणि या प्रकारे तो अनंत जन्म भटकत आहे, पण कशातूनच सुख मिळत नाही. म्हणून मग त्याला वीट येतो. तरी पण परत या गोष्टीतून सुख मिळेल असे तर तो म्हणतोच. पण जगात अशा कितीतरी वस्तू आहेत, अनंत वस्तू आहेत, त्यातली एक तो बाजूला सारतो, आणि दुसरी घेतो, ही बाजूला सारतो आणि परत ती घेतो. असे करत करत काळ व्यतीत होत आहे पण कोणत्याच जागी सुख मिळत नाही.

सर्व भौतिक सुखे विनाशी असतात आणि ती काल्पनिक सुखे असतात, खरी सुखे नसतात. काल्पनिक म्हणजे उदा. तुम्हाला खीर आवडते पण काहींना ती आवडत नाही, असे असते की नाही?

**प्रश्नकर्ता :** असते.

**दादाश्री :** याउलट खरे सुख असेल तर सर्वांनाच आवडेल. जर ते शाश्वत सुख असेल, खरे सुख असेल तर ते सर्वांनाच आवडेल. पण हे तर काल्पनिक सुख आहे. आणि ते प्रत्येकाचे वेगवेगळे असते. काही जातीत फक्त 'व्हेजिटेरियन' (शाकाहारी)च खाल्ले जाते आणि काही इतर जातीत त्या दुसऱ्या प्रकारचेच खाणे आवडते. म्हणजेच (सुखाबद्दल)

प्रत्येकाच्या वेगळ्या वेगळ्या कल्पना आहेत. म्हणून जोपर्यंत काल्पनिक सुखे भोगण्याची इच्छा असते, जोपर्यंत त्याची तशी आवड असते तोपर्यंत तो जीवात्म्याप्रमाणे राहतो, आणि तोपर्यंत त्याला जीवात्मा म्हणतात. नंतर जेव्हा 'ज्ञानी पुरुषां'ची भेट होते तेव्हा तो अंतरात्मा बनतो. इथे जरी संतपुरुष असतील तरी अंतरात्मा बनणे, त्यांच्याकडून शक्य होण्यासारखे नाही. संतपुरुष तर त्याला थोडे पुढे घेऊन जातील. मग एकदा अंतरात्मा झाला की त्याची भौतिक सुखे भोगण्याची इच्छा संपते आणि स्वतःच्या आत्म्याचे सुख, शाश्वत सुख प्राप्त करण्याची इच्छा होते. आणि 'ज्ञानी पुरुष' त्या शाश्वत सुखाची थोडीसी चव त्याला चाखवून देतात, त्यानंतर मात्र त्याला तीच भौतिक सुखे चांगली वाटेनाशी होतात. जसे तुम्ही सकाळी चहा पिता, पण समजा चहा पीत असताना जर कोणी जिलेबी आणून ठेवली तर मग तुम्ही काय विवेक कराल? प्रथम काय कराल? जिलेबी खाल की चहा प्याल?

**प्रश्नकर्ता :** चहा पिऊ.

**दादाश्री :** प्रथम चहा प्याल. का? कारण जिलेबी खाल तर चहा अगोड लागेल. आणि मग बायकोला नावे ठेवाल की चहा अगोड का केलास? खरे तर चहा अगोड लागत आहे तो जिलेबीमुळे. याच प्रकारे जेव्हा आत्म्याचे सुख चाखले जाते, त्यानंतर ही भौतिक सुखे अगोड लागतात. म्हणून मग त्यात रुची वाटत नाही, ती आवडत नाहीत, पण तरी तो भोगतो. पण जेव्हा ती सुखे आवडेनाशी होतात तेव्हा अंतरात्मदशा होते.

म्हणजे जोपर्यंत त्याला भौतिक सुखांची गरज आहे, तोपर्यंत तो बहिर्मुखी आत्मा आहे. आणि जेव्हा तो स्वतःच्या स्वरूपाला जाणतो की अरे, 'हा मी नाही, मी तर शुद्धात्मा आहे, मी तर कायम स्वरूपी आहे' आणि मला या जगातील कोणतीच वस्तू नको आहे.' तेव्हा अंतरात्मदशा येते. अंतरात्मदशा दोन प्रकारे काम करते. एक तर भौतिक गोष्टींसाठी, व्यवहारासाठी जेव्हा काम करावे लागते तेव्हा 'त्याचा' त्या बाजूने उपयोग असतो आणि जेव्हा 'स्वतः'चे काम करायचे असते तेव्हा

'या' बाजूने उपयोग ठेवतो. अशा दोन प्रकारे उपयोग ठेवतो. उपयोग तर एकच असतो, पण जेव्हा कधी सवड मिळाली, तसे संयोग जुळले तेव्हा या बाजूने उपयोग राखतो आणि तसे (व्यवहाराचे) संयोग जुळले तर त्या बाजूने उपयोग ठेवतो. अंतरात्मा म्हणजे 'इंटरिम गवर्नमेन्ट' (अंतरिम सरकार) अशी स्थिती. मग हळूहळू बाहेरचा, संसाराचा निकाल करत जातो. आणि तसतसे अंतरात्म्यामधून हळूहळू 'फुल गवर्नमेन्ट' (पूर्ण सरकार) बनत जाते.

आता तुम्हाला आणखी काय विचारायचे आहे?

**प्रश्नकर्ता :** जीवात्मा, अंतरात्मा आणि परमात्मा ही तीनही एकाच वस्तूची तीन वेगवेगळी नावे आहेत का? अशी मला खात्री करून घ्यायची आहे.

**दादाश्री :** एकाच वस्तूची तीन विशेषणे आहेत. घरी मुलांचा 'वडील' असतो आणि आपल्या दुकानात गेल्यावर शेठ म्हटला जातो आणि कोर्टात वकील म्हटला जातो. 'अरे, एकाच माणसाला तोच वडील, तोच शेठ आणि तोच वकील असे का म्हणता?' तर 'कामाप्रमाणे विशेषण आहे.' जसे संयोग जुळतील तसे विशेषण. दुकानात असेल तर शेठ म्हणतात, कोर्टात वकिली करायला गेला तर वकील म्हणतात, याच प्रकारे हे सर्वही आहे.

म्हणजेच लोक जीवात्मा म्हणतात, आत्मा म्हणतात, या सर्व एकच गोष्टी आहेत. तसे तुम्हाला सर्व लोक प्रोफेसर म्हणतात पण घरी मुले काय म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** पप्पा म्हणतात.

**दादाश्री :** हो. आणि कॉलेजात प्रोफेसर. तर याच प्रकारे आपण कोणकोणते काम करतो, त्याप्रमाणे विशेषणे दिली जातात. ज्याप्रमाणे 'तुम्ही' एकच आहात, तरी पण एका जागी पप्पा आहात आणि एका जागी प्रोफेसर आहात. तसेच यात सुद्धा कामाप्रमाणे विशेषणे आहेत.

जोपर्यंत पुदगलातच, विनाशी वस्तूतच सुख आहे असे मानतो, तोपर्यंत तो जीवात्मा आहे. आणि ही मान्यता संपली सनातनमध्ये सुख आहे अशी मान्यता सुरू झाली की तो अंतरात्मा झाला. आणि परमात्मा म्हणजे काय? तर जे वीतराग झाले आहेत, कोणाबद्दलच राग-द्वेष नाही त्यांना परमात्मा म्हणतात. तर मग अंतरात्मा कोण? तर ज्याची दृष्टी वीतराग होण्याची आहे, तो अंतरात्मा. आणि ज्याला या भौतिक सुखातच मजा वाटते आणि राग-द्वेषच करत राहतो, तो जीवात्मा आहे. हे तुम्हाला समजले का?

**प्रश्नकर्ता :** मायेची इतकी सारी आवरणे असतात...

**दादाश्री :** ही सर्व मायेचीच तर आवरणे आहेत.

**प्रश्नकर्ता :** या मायेच्या आवरणांमुळेच तो अंतरात्मदशेत जाऊ शकत नाही, किंवा अंतरात्मदशेच्या पुढे त्याची प्रगती होत नाही.

**दादाश्री :** नाही. तो अंतरात्मा झाला म्हणून प्रगती तर होतच राहणार. परंतु जर 'प्रगती' होतच नसेल तर मात्र अंतरात्मा झालेलाच नाही. अंतरात्मा, तो 'परतंत्र-स्वतंत्र' होतो. काही अंशांपर्यंत स्वतंत्र असतो, तर मग तो पुढे प्रगती का करू शकणार नाही? सर्वकाही करू शकतो. म्हणजेच अजूनपर्यंत अंतरात्मा झालेलाच नाही! अजून तर जीवात्माच आहे. अजूनपर्यंत 'जीव आणि शिव यात काय भेद आहे' ते जाणलेलेच नाही.

ही एकच वस्तू आहे, जोपर्यंत भौतिक सुखांची इच्छा आहे, तोपर्यंत जीव आहे आणि स्वत:च्या सुखाची जाणीव झाली आणि त्या बाजूला वळला की शिव आहे. तोच 'जीवही' आहे आणि तोच 'शिवही' आहे. जोपर्यंत कर्मे बांधतो तोपर्यंत जीव आहे आणि कर्मे बांधणे थांबले की तो 'शिव' झाला.

## 'मुक्त पुरुषा'च्या भक्तीने मुक्त होता येते

**प्रश्नकर्ता :** आत्मा सच्चिदानंद स्वरूप आहे आणि जीव मात्र पंचक्लेशवाला आहे, तर मग हा जीव सच्चिदानंद स्वरूप कसा होईल?

**दादाश्री :** ज्याची भक्ती करील तसा तो होतो. सच्चिदानंदाची भक्ती केली तर सच्चिदानंद बनतो, आणि दरोडेखोराची भक्ती केली तर दरोडेखोर बनतो. जीवाचा स्वभावच असा असतो की ज्याची भक्ती करतो तसा बनतो. मुक्त पुरुषांची भक्ती केली तर मुक्त होतो आणि बंधनात असलेल्याची भक्ती केली तर बंधनवाला होतो. म्हणजेच जे सच्चिदानंद स्वरूप झाले आहेत त्यांची भक्ती केलीत तर तुम्ही पण त्यांच्यासारखे व्हाल.

## दशापालट झाल्याची लक्षणे

**प्रश्नकर्ता :** जीवात्मा दशेतून जेव्हा अंतरात्मदशेकडे जातो तेव्हा त्याच्यात कोणकोणते लक्षणीय बदल होतात?

**दादाश्री :** जीवात्म्यातून अंतरात्मा बनतो तेव्हा त्याच्यात कोणते लक्षणीय बदल होतात, असे?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** त्याच्या वृत्ती बाहेर जाण्याचे थांबतात, 'असे करू, तसे करू, हे करू, ते करू' अशा प्रकारे ज्या वृत्ती बाहेर जात असतात त्या आता परत फिरतात. उदाहरणार्थ या गायी सकाळी चरायला जातात आणि संध्याकाळी परत येतात ना? त्याचप्रमाणे या वृत्ती परत येऊ लागतात. तेव्हा आपण समजावे की हे भाऊसाहेब आता 'शुद्धात्मा' होऊ लागले आहेत. ज्या वृत्ती बाहेर भटकत असत, त्या आता भटकायच्या बंद झाल्या आणि स्वतःच्या घरी परतू लागल्या. तुम्ही जर तुमच्या वृत्तींचे निरीक्षण केलेत तर तुम्हाला त्या भटकताना आढळतील. एक या बाजूला भटकते आणि दुसरी त्या बाजूला भटकते, मोठमोठे नाश्ता हाऊस (हॉटेल) असतात ना, तिथेही भटकून येते. अशा तऱ्हेने त्या भटकतात की नाही? चांगले मोठे नाश्ता हाऊस असेल आणि तिथे जाऊन एकदा चव घेऊन आला असेल तर मग वृत्ती तिकडे भटकते. म्हणजेच वृत्ती सतत भटकतच असतात आणि अंतरात्मा झाला की मग वृत्ती परत फिरतात.

**प्रश्नकर्ता :** अंतरात्म्यातून परमात्मादशेकडे प्रगती होत असते तेव्हा कोणकोणते विशेष लक्षणीय बदल होतात?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, अस्तित्व, वस्तुत्व आणि पूर्णत्व असा तीन 'ग्रेडेशन' (श्रेणी) आहेत. अस्तित्व म्हणजे 'मी आहे' हे तर प्रत्येक जीवमात्राला माहीत असते. 'मी आहे.' हे माहीत असते की नाही? फक्त माणसांनाच नाही तर जनावरांनासुद्धा 'मी आहे' असे भान असते. अगदी या झाडालासुद्धा 'मी आहे' असे भान असते. म्हणजेच अस्तित्वाचे भान तर जीवमात्राला असतेच. आणि जेव्हा तो अंतरात्मा बनतो तेव्हा वस्तुत्वाचे भान, म्हणजेच 'मी कोण आहे?' याचे भान होते. तेव्हा मग पूर्णत्व तर आपोआप सहजच होत राहते. अस्तित्वापासून वस्तुत्वापर्यंतचाच पुरुषार्थ आहे. त्यानंतर तो हळूहळू पुढे प्रगती करतच राहतो. तर अशा प्रकारे हा दृष्टीफेर (दृष्टीपालट) आहे.

या बाजूला जायचे आहे, त्याऐवजी दुसऱ्या बाजूला जातो आणि याच मार्गाने माझी परिपूर्णता होईल असे तो मानतो. जेव्हा त्याला कोणी 'ज्ञानी पुरुष' भेटतात तेव्हा ते त्याला परत फिरवतात आणि त्याची दृष्टी या बाजूला वळवतात, त्यामुळे मग त्याची जीवात्मदशा संपते आणि तो जेव्हा आपल्या मूळस्थानावर येतो तेव्हा त्याची अंतरात्मदशा होते. मग सर्व वृत्ती परत फिरतात. तो परत फिरल्यावर वृत्ती देखील परत फिरतात. आणि मग आपोआप तो सहज होत जातो. अंतरात्मा होईपर्यंत 'इंटरिम गव्हर्नमेन्ट' होईपर्यंत 'ज्ञानी पुरुषा'चा आसरा घ्यावा लागतो. आणि एकदा 'इंटरिम गव्हर्नमेन्ट'ची स्थापना झाली की मग 'फुल गव्हर्नमेन्ट' होत जाते.

## 'स्वतः'च स्वतःची पूर्णाहुती, ज्ञानींच्या निमित्तामुळे

**प्रश्नकर्ता :** तुम्ही तर परम आत्मा आहात आणि आम्ही जीव आहोत. एवढा 'डिफरन्स' (फरक) आहे, तुमच्यात आणि आमच्यात!

**दादाश्री :** हा 'डिफरन्स' आहे. पण येथे दर्शन केल्यानंतर, येथे ज्ञान घेतल्यानंतर 'तुम्ही' 'अंतरात्मा' व्हाल. अंतरात्मा, 'परमात्म्याला'

पाहू शकतो. आणि पाहिल्याने 'तेच' रूप 'स्वतःचे' होत जाते. मग याहून जास्त तुम्हाला काय हवे?

सध्या तर किती तरी रॉंग बिलीफस् (चुकीच्या मान्यता) ठाण मांडून बसल्या आहेत! या 'रॉंग बिलीफस्' आम्हाला फ्रेक्चर करायच्या आहेत आणि त्या जागी 'राईट बिलीफ' बसवायची आहे, म्हणजे मग तुम्ही अंतरात्मा व्हाल. त्यानंतर पूर्णाहुती आपोआप होत जाईल.

आणि ही काही थापेबाजी नाही. मी एका तासात मोक्ष देतो, तर ते काही थापेबाजीने होत नाही. असे पूर्वी कधी झालेच नाही. मी तर फक्त निमित्त आहे. हा तर अपवादमार्ग आहे. जिथे नियम असतात, तिथे अपवाद पण असतातच. हा असाच अपवाद मार्ग आहे, आणि त्याचे निमित्त मी बनलो आहे.

## परमात्म्याची प्रतीती, पूर्णत्व प्राप्त करविते

जेव्हा मूढ दशेत येतो तेव्हा त्याला मूढात्मा म्हणतात. 'मी चंदुलाल आहे, मी कलेक्टर आहे' याला काय म्हणणार? ती मूढात्म्याची मूढ दशा आहे. त्या दशेत त्याला नाशवंत गोष्टीत सुख वाटते. स्वतः अविनाशी आहे आणि नाशवंत गोष्टीत सुख मानतो. स्वतः अविनाशी आणि नाशवंत विनाशी, या दोघांचा गुणाकार कधीच होऊ शकत नाही. तरी पण भ्रांतीने भौतिक गोष्टीत सुख मानतो म्हणून त्याला मूढात्मा म्हणतात.

नंतर जेव्हा 'ज्ञानी पुरुष' त्याला परमात्म्याची प्रतीती करवून देतात की 'हे सर्व जग तुझे नाही, तू स्वतःच परमात्मा आहे', तेव्हा 'मीपणा' परमात्म्याबरोबर अभेद होऊन जातो. सुरुवातीला संपूर्ण अभेद होऊ शकत नाही, प्रतीतीभावाने अभेद होतो. सर्वात प्रथम प्रतीतीभावाने आणि मग ज्ञानभावाने अभेद होतो. म्हणजेच प्रथम 'मी परमात्मा आहे' ही प्रतीती बसली पाहिजे. सध्या तर 'मी चंदुभाई' आहे अशी 'रॉंग बिलीफ' आहे. 'मी कलेक्टर आहे' ही 'रॉंग बिलीफ' आहे. अशा सर्व 'रॉंग बिलीफ्स्' 'ज्ञानी पुरुष' फ्रॅक्चर करतात आणि 'राइट बिलीफ' बसवतात. तो 'स्वतः' या राइट बिलीफला स्वीकारतो, त्याचे मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार

सर्वच ते स्वीकारतात, स्वत: नि:शंक होतो, संशयरहित होतो, तेव्हाच काम होते. जे अनंत जन्मांचे संशय भरलेले आहेत, ते सर्व संशय 'ज्ञानी पुरुष' फ्रॅक्चर करतात तेव्हा 'स्वत:' संशयरहित होतो आणि तेव्हाच परमात्म्याची प्रतीती बसते. ही जी श्रद्धा बसते, ती 'राइट बिलीफ' आहे.

## प्रत्येक आत्मा स्वतंत्र असतो, सिद्ध क्षेत्रात सुद्धा

**प्रश्नकर्ता :** सर्व आत्मे वेगवेगळे असतात की सर्व एकाच परमात्म्याची स्वरूपे आहेत?

**दादाश्री :** व्यवहाराने सर्व वेगळे आहेत. नाव, रूप पाहू जाल तर व्यवहाराने सर्व वेगळे आहेत. 'रिअली' एकच आहेत. रिलेटिव्हली वेगवेगळे आहेत, आणि 'रिअली' एकच आहेत, तर तुम्हाला काय जाणून घ्यायचे आहे?

**प्रश्नकर्ता :** हे ब्रह्म आहेत, यांना एकातून अनेक होण्याची इच्छा का झाली असेल? 'एकोहम् बहुस्याम्' अशी इच्छा त्यांना का उत्पन्न झाली असेल?

**दादाश्री :** हे तर असे आहे की तो स्वत: एकच आहे. अनेक कधी झालाच नाही, एकच आहे. पण भ्रांतीमुळे अनेक झाला आहे असे दिसते. तो एकाच स्वभावाचा आहे. या सोन्याच्या कितीही कांबी, (बिस्कीटे) असतील पण त्या सर्वांना एकत्र केले तर सर्व एकच आहे ना? आता यात जर पितळ मिसळले तर नुकसान आहे. सर्व भगवंतच आहेत, भगवंत स्वरूपच आहेत, पण वेगवेगळे दिसत आहेत, याचे कारण भ्रांती आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे सर्वांमध्ये जे चेतन तत्त्व आहे, ते एकच आहे का?

**दादाश्री :** हो, ते एकच आहे. पण एक याचा अर्थ स्वभावाने एक आहे.

**प्रश्नकर्ता :** मग जेव्हा देहोत्सर्ग होतो, तेव्हा जे चेतन निघून

जाते, त्याचे मग एकीकरण होणार नाही का? त्याचे अस्तित्व वेगळे कसे काय राहू शकेल?

**दादाश्री :** या जगात सर्व भिन्न आहे. इथे जशी भिन्नता वाटते ना, तशीच भिन्नता तिथेही आहे. तिथे भिन्न म्हणजे स्वभावाने सर्व एकच वाटतात, पण अस्तित्वाने तर भिन्नच आहेत. स्वतःचे सुख अनुभवण्यासाठी स्वतः भिन्नच आहे.

स्वभावाने एकच आहोत, पण भेदबुद्धीमुळे वेगळेपणा वाटतो. जोपर्यंत आपली बुद्धी आहे, तोपर्यंतच ही भानगड आहे. बुद्धी संपली की मग अभेदता वाटते. बुद्धी काय करते? तर भेद निर्माण करते. म्हणूनच बुद्धी गेल्यानंतर ही गोष्ट त्याला समजते.

तुम्ही म्हणता तसे 'वर' जर एकीकरणच होणार असते तर कोणी मोक्षाला जाणारच नाही ना! जर असेच होणार असते, एकच दिवा होणार असता तर मग तिथे आपल्याला काय फायदा? त्याऐवजी इथे बायको जरी रागावेल, पण भजी तर बनवून देईल. मग त्यात काय वाईट आहे? म्हणजेच तिथे एक व्हायचे नसते. तिथे कोणत्याही प्रकारचे दुःख नाही. तिथे निरंतर परमानंदात राहायचे आहे, शिवाय प्रत्येक आत्मा स्वतंत्रही आहे. एकाच स्वभावाचे आहेत, पण आहेत मात्र सर्व वेगळे. तिथे जर एकच होत असेल तर मग येथील आत्म्याचे काय होईल?

**प्रश्नकर्ता :** परंतु जर चेतन एका प्रकारचे आहे, तर त्याचे अस्तित्व वेगवेगळ्या प्रकारे कसे राहू शकते?

**दादाश्री :** वेगळेच राहते, म्हणूनच ते एका प्रकारचे कसे होऊ शकेल? एक होऊच शकत नाही ना! या सोन्याची सर्व बिस्कीटे वेगवेगळी असतात, पण त्या सर्वांना आपण सोनेच म्हणतो, याच प्रकारे आत्मा एक आहे असे म्हटले जाते, पण या सोन्याच्या बिस्कीटाप्रमाणे सर्व (आत्मे) वेगवेगळे आहेत. त्या सर्वांत इतर काहीच फरक नाही. हे तर आपल्याला बुद्धीमुळे फासे उलटे दिसतात. सिद्ध स्थितीत सर्व आपापल्या सुखातच राहत असतात.

भेदबुद्धी असणाऱ्यांना ही गोष्ट समजण्यात फार द्विधा वाटते. अनेक असूनसुद्धा एक आहे हे नीट समजण्यासारखे आहे आणि ती खूप सूक्ष्म गोष्ट आहे. तिथे जर सर्व एकच होणार असतील तर त्यात आपल्याला काय मिळेल? तसे मी पण लहानपणी ऐकले होते की दिव्यात दिवा मिसळून जातो. पण मग त्यात मला काय मिळाले? आपल्याला मोक्षाचे सुख हवे आहे आणि जर आपल्याला दुसऱ्या कुणात मिसळून जायचे असेल तर ते सुख आपल्याला कसे मिळेल? भगवंताबरोबर अभेद झालो तर आपले काय राहिले? आणि सर्व भगवंतच आहेत ना! श्रीरामचंद्रजी मोक्षाला गेले आहेत, आणि मोक्षाचे सुख आत्ताही ते स्वतः भोगत आहेत. आणि आपण तर येथे आहोत, त्यामुळे आपल्याला येथील त्रास भोगावे लागतात.

आणि संसारातही, ब्रह्माडांतही आत्मा एक नसतो, अनंत जीव आहेत, पण ते सर्व एकाच स्वभावाचे आहेत. त्यांचे जे गुणधर्म आहेत, त्यात कधीच फरक पडत नाही.

## गोष्ट वैज्ञानिक तर असली पाहिजे ना?

**प्रश्नकर्ता :** पण मी असे मानतो की परमात्मा तत्त्वाखेरीज अन्य काहीच नाही, आणि आपण ज्याला आत्मा म्हणतो, तो इतर काही नाही पण परमात्म्याचा आविर्भाव आहे.

**दादाश्री :** असे माना, पण त्याचबरोबर दुःखाचे वेदन आहे की नाही? जर आत्मा परमात्म्याचा आविर्भाव असेल तर मग तुम्हाला दुःखाचा अनुभव येतो की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, दुःखाचा अनुभव येतो.

**दादाश्री :** जर दुःखाचा अनुभव येत असेल तर मग एकपासून शंभरापर्यंतचे सर्वच आकडे मान्य करावे लागतील. आणि जर दुःखाचा अनुभव येत नसेल तर मग नाही मानलेत तरी चालेल. नाहीतर एक ते शंभर सर्व आकडे मान्य करावेच लागतील. पंचेचाळीसनंतर सेहेचाळीस यायला हवा आणि सेहेचाळीसनंतर सत्तेचाळीस यायला हवा. सर्व काही

पद्धतशीर असले पाहिजे. नुसते थापा मारून चालणार नाही. इतर सगळीकडे चालेल, पण विज्ञानात अजिबात थाप चालणार नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग याचा अर्थ आत्मा हे परमात्म्यापासून विभक्त झालेले, एक निराळे तत्त्व आहे का?

**दादाश्री :** विभक्त नाही, आत्माच परमात्मा आहे आणि जीवात्माच परमात्मा आहे. फक्त समजेमध्ये फरक आहे. माणूस जेव्हा घरी असेल तेव्हा लोक म्हणतात 'हा तर या स्त्रीचा पती आहे. आणि तोच दुकानात गेला तेव्हा म्हणतात की 'हा शेठ आहे.' कोर्टात जातो तेव्हा म्हणतात 'हा वकील आहे.' पण माणूस तर आहे तोच आहे. म्हणजेच तोच जीवात्मा, तोच अंतरात्मा आणि तोच परमात्मा आहे. फक्त तो जे कार्य करत असतो त्या कार्याच्या आधारे त्याचे विशेषणे आहेत.

## आत्म्याचे विलीनीकरण होऊ शकत नाही

**प्रश्नकर्ता :** ही गोष्ट तर खरी आहे ना की आत्मा परमात्म्यात विलीन तर होतोच, पण ते एका जन्मात नाही तर दुसऱ्या जन्मात किंवा तिसऱ्या जन्मात?

**दादाश्री :** नाही, नाही. तिथे विलीनीकरण नसतेच मुळी. आत्मा स्वतःच परमात्मा आहे. तुम्हाला सध्या 'मी चंदुभाई आहे' असे भान आहे. जेव्हा तुम्हाला 'मी आत्मा आहे' असे भान होईल तेव्हा तुम्हाला परमात्म्याचे भान होईल. हा आत्माच परमात्मा आहे. तुमचा आत्मा पण परमात्मा आहे, यांचा आत्मा पण परमात्मा आहे. आणि विलीनीकरण असे सर्व तर या लोकांनीच लिहिले आहे ना, त्यामुळे लोकांचे मेंदू खराब करून टाकले आहेत. आत्म्यांची विलीनीकरणे होतात का कधी? हा जो आहे तोच आत्मा, पण त्याचे भान झाले नाही. सध्या आत्म्याचे भानच नाही, बेभान अवस्था आहे. सध्या तुम्हाला 'मी चंदुभाई आहे' असेच भान आहे, 'मी देसाई आहे' असेच भान आहे, पण 'मी आत्मा आहे' असे भान नाही ना?

हे सर्व (महात्मे) आपल्या आत असलेल्या आत्म्याला पाहत

आहेत, आणि तोच परमात्मा आहे. जर विलीनीकरण करायचे असते तर हे परमात्मा दिसलेच नसते ना! यांना तर बकरीत पण परमात्मा दिसतो. बकरीत पूर्ण परमात्मा बसलेले आहेत. गाढवात पण परमात्मा बसलेले आहेत. म्हणजेच विलीनीकरण असे काही नाहीच. तुम्ही जे काही वाचून आलेले आहात ना, ते एका बाजूला ठेवून द्या.

जे घुसळून त्यातून थोडे पण लोणी येत नसेल, त्या वस्तूचे काय करायला हवे? फेकून द्यावे, सांडून टाकावे. आणि हे तर उलट केलेली सर्व मेहनत व्यर्थ झाली आणि 'मी सर्वकाही जाणतो' अशी घमेंड चढली. अरे, तू काय जाणतोस? ठोकरा खाता खाता तर दम निघून गेला! ठोकरा खाल्यावर दम निघून जातो की नाही? आणि मनात माहीत नाही काय मानून बसतो!

**प्रश्नकर्ता :** पण असे म्हटले आहे ना की प्रत्येक आत्मा हे एकाच आत्म्याचा आविर्भाव आहे, ब्रह्माचा आविर्भाव आहे आणि मग त्यातच जाऊन मिळतो.

**दादाश्री :** कोणी सांगितले आहे तुम्हाला असे?

**प्रश्नकर्ता :** असे वाचले आहे की प्रत्येक आत्मा ब्रह्मात विलीन होऊन जातो. तो जेव्हा पूर्णत्व प्राप्त करतो, तेव्हा तो ब्रह्मात विलीन होऊन जातो.

**दादाश्री :** तर मग आपल्या वाट्याला काय आले?

**प्रश्नकर्ता :** आपण ब्रह्ममय होऊन जातो ना?

**दादाश्री :** पण मग आपल्यासाठी काय उरले?

**प्रश्नकर्ता :** आपल्याला 'आपलेपणा' संपवायचा आहे आणि ईश्वरपणा प्राप्त करायचा आहे.

**दादाश्री :** हो, पण यात तर आपल्याला ईश्वरातच समाविष्ट व्हायचे आहे, तर त्यात आपला काय फायदा? त्यापेक्षा तर हे आपले स्वतंत्र अस्तित्व तरी आहे, आपल्याला आता लाडू, भजी सगळेकाही

मिळत आहे. फार तर दोन शिव्या पण मिळतात एवढाच त्रास आहे ना? आणखी काय त्रास आहे? आणि सर्व लोक पण काय म्हणतात की 'जर इथल्या ऐवजी तिथे जास्त सुख असेल तरच आम्ही मोक्षाला जाऊ आणि तिथे जाऊन एकाकार व्हायचे असेल तर आम्हाला तिथे जायचेच नाही.'

## तेज जर तेजात मिसळत असेल, तर स्वत:चे काय राहिले?

**प्रश्नकर्ता :** पण 'अहं ब्रह्मास्मि' म्हणणारे तेजात मिसळून जाण्याबद्दल बोलतात. ते म्हणतात की मोक्ष म्हणजे तेजात मिसळून जाणे. तर मोक्ष आणि तेजात मिसळून जाणे, या दोन्ही गोष्टी एकच मानल्या जातात का?

**दादाश्री :** मोक्ष म्हणजे तेजात मिसळून जाणे असे ते लोक म्हणतात, पण तो मोक्ष वास्तविक नाही. वीतरागींनी मोक्षाबद्दल असे सांगितले आहे की तिथे सिद्धगतीत प्रत्येकाचा स्वत:चा वेगळा अनुभव असतो, ही 'करेक्ट' वस्तू आहे. जर आपल्याला वेगळा अनुभव होणार नसेल आणि तिथे मोक्षात सगळ्यांच्यातच मिसळून जायचे असेल तर मग मोक्षाला जाण्यात काही अर्थच नाही, 'मीनिंगलेस' (निरर्थक) गोष्ट आहे. म्हणजेच या सर्व गोष्टी विचार न करता सांगितलेल्या गोष्टी आहेत.

## सतानत सुखात रमणे, म्हणजे मोक्ष

**प्रश्नकर्ता :** तर मग तुमच्या म्हणण्याप्रमाणे 'मोक्ष' कशाला म्हणता येईल?

**दादाश्री :** मोक्ष म्हणजे 'नो बॉस', 'नो अंडरहँड' आणि 'पर्मनन्ट' स्वत:च्या स्वाभाविक सुखातच राहणे! आणि तिथे सर्व स्वतंत्रपणे, आपापल्या प्रकारे सुख भोगतात. प्रत्येक सिद्ध आपापल्या स्थितीत असतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग तिथे एवढे सारे सिद्धात्मा वेगवेगळ्या प्रकारे वागतात?

**दादाश्री :** वेगवेगळ्या प्रकाराने नाही. सर्व एकाच स्वभावाचे आणि एकाच प्रकारचे असतात. त्यांना ज्ञान, दर्शन आणि सुख असते, त्यांना चारित्र्य नसते. इथे जे तीर्थंकर भगवंत असतात, ते ज्ञान, दर्शन आणि चारित्र्य सहित असतात. आणि देहासहित असतात. तिथे सिद्धांसाठी चारित्र्य असे म्हटले जात नाही. तिथे तर ते निरंतर स्वतःच्या स्वाभाविक सुखातच असतात.

म्हणजेच तिथे एकाकार व्हायचे नसते. तिथे तुम्ही तुमचे सुख स्वतंत्रप्रकारे भोगू शकता. सिद्धगतीत सगळे सिद्ध स्वतंत्र रूपातच असतात, आणि स्वतःच्या सुखाचाच अनुभव घेत असतात, निरंतर परमानंदाचा अनुभव घेत असतात. त्यांचे एक मिनिटाचे सुख जर या जगावर पडले, जर कधी टपकले, तर सर्व जग हजारो वर्षे आनंदात राहील, इतके सुख ते भोगत आहेत. आणि अशा सुखासाठी हे लोक अधीर झाले आहेत, आणि तुमचे स्वतःचे सुख पण असेच आहे. या देहाचा अंतराय असून सुद्धा मला जे सुख आहे त्यावरून समजते की या देहाचा अंतराय नसेल तर किती सुख असेल! आमच्याजवळ बसला आहात तर तुम्हा सर्वांना पण सुख मिळत आहे ना! यात आमचे जे सुख उचंबळत आहे ना, ते तुम्हाला स्वाद देत असते.

**प्रश्नकर्ता :** देहरहित सुखाचा अनुभव कशा प्रकारे मिळू शकेल?

**दादाश्री :** देहरहित सुखाचा अनुभव जर स्वतः चिंतवन केले तर त्यातही शरीर तर सोबत असतेच, त्यामुळे हे सुख त्या सुखासारखे नसणार. पण यावरून आपल्याला हिशोब लावायचा आहे की जर इथे (देहासह) एवढे सुख आहे तर तिथे किती असेल!

## सिद्धगतीत सुखाचा अनुभव

**प्रश्नकर्ता :** जे सिद्धगतीत आहेत, मोक्षात गेले आहेत, ते देहरहित सुखाचा अनुभव घेत आहेत, तर मग ते सुख कोण अनुभवत आहे?

**दादाश्री :** स्वतःच. स्वतःच स्वतःचा अनुभव करत आहेत. स्वतः स्वतःचा स्वानुभव सुख सतत भोगतच आहेत. आणि ते निरंतर गतिमान

आहेत (परिणमन होत राहते). त्यांचे कार्य काय? तर ज्ञानक्रिया आणि दर्शनक्रिया, ती निरंतर चालूच असते!

**प्रश्नकर्ता :** तिथे त्यांना ज्ञानक्रियेची आणि दर्शनक्रियेची गरजच काय?

**दादाश्री :** तो तर त्यांचा स्वभाव आहे. हा प्रकाश आहे, हा आपल्याला सतत पाहत असेल ना? तो प्रकाश जर चेतन असता तर तो सतत आपल्याला पाहतच राहणार ना? तसेच ते चेतन पाहत राहते.

आता, तिथे राहून ते काय पाहत असतील? त्यांच्याजवळ ज्ञान-दर्शन तर आहे, त्यांच्या याच अनंतज्ञान आणि अनंतदर्शन याचा उपयोग होत असतो, आणि त्याच्या परिणामस्वरूप आनंद असतो. म्हणजे अगोदर आनंद, असे नाही. आनंद अगोदर आणि मग ज्ञान आणि दर्शन, असे नसते. त्यांच्या ज्ञान आणि दर्शनाचा उपयोग होतो त्यामुळे आनंद असतोच! त्यांच्याकडे ज्ञान आणि दर्शन याशिवाय अन्य काहीच नसते. ते स्वरूपच पूर्ण ज्ञान स्वरूप आणि दर्शन स्वरूप आहे. म्हणजे हे आपण इथे हात वर केला, ते त्यांना दिसले.

तर त्यांनाही परत काय होत असते की जे पाहायचे असते त्यात हानी-वृद्धी (कमी जास्त) होत राहते. रात्र झाली तर या भागात हानी होते आणि दुसऱ्या भागात वृद्धी होते. या प्रकारे हानी-वृद्धी होत राहते. आपल्या इथे पहाटे पाच वाजले की तेव्हापासूनच येथील लोक त्यांना दिसू लागतात. पण प्रत्यक्षात वृद्धी केव्हा दिसते? तर दहा-अकरा-बारा वाजता पुष्कळ काही दिसते, सर्व लोक फिरत आहेत, असे फिरत आहेत, तसे फिरत आहेत, हे सर्व त्यांना दिसते. त्यांना फक्त पाहायचे असते आणि जाणायचे असते, ह्या दोनच गोष्टी. याच्या खोलवर जायचे नसते की हा चोरी करायला निघाला आहे की काय? कोणी खिसा कापतानाही दिसतो, पण त्यानंतर पाहायचे आणि जाणायचे असते. त्यांना विषय नसतात, विषय अर्थात 'सब्जेक्टस्' नसतात. हा कोणता विषय आहे? तर खिसा कापायचा. हा विषय येथील लोकांनी जाणायचे असते, त्यांना तर असे काहीच नसते.

मी हात वर केला तर तो सर्व सिद्धांना ज्ञानात दिसतो. ते सिद्ध फक्त ज्ञेयांना जाणतच राहतात. या जगात 'ज्ञेय' आणि 'दृश्य' अशा दोनच गोष्टी आहेत. ज्ञेयांना जाणत राहतात आणि 'दृश्यांना' पाहत राहतात. त्याचा परिणाम काय? तर असीम सुख, सुखाला शेवटच नाही, ते स्वाभाविक सुख असते.

## स्वभावाने एकसारखे पण अस्तित्त्वाने वेगवेगळे

आता यात लोकांना काय अडचण आहे? की तिथे एक का नाही? अरे, एकच आहे, पण ते कोणत्या प्रकारे आहे? समजा इथे पाच लाख सोन्याची बिस्कीटे असतील. ढीगभर आणली असतील तर आपल्याला असेच म्हणावे लागते की हे सर्व सोने आहे? असे नाही का म्हणत? म्हणतोच ना?

**प्रश्नकर्ता :** सोने पण म्हणू शकतो किंवा सोन्याची बिस्कीटे पण म्हणू शकतो.

**दादाश्री :** नाही. पण हे सर्व सोनेच आहे असे म्हणू शकतो की नाही म्हणू शकत? जरी बिस्कीटांच्या स्वरूपात असेल, पण सर्व सोनेच आहे ना? त्याचप्रमाणे हे परमात्मे सर्व एकच आहेत. आत्मे एकच आहेत, पण ते सोन्याच्या रूपात एकच आहेत आणि बिस्कीटांच्या स्वरूपात वेगवेगळे आहेत. त्यांच्यातील प्रत्येक आपापला व्यक्तित्व भाव सोडत नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे याचा अर्थ असा होतो की पूर्ण एकच आत्मा आहे, असे आपण म्हणू शकतो ना?

**दादाश्री :** सोन्याच्या रूपात प्रत्येक आत्मा सोनेच आहे, पण बिस्कीटाच्या स्वरूपात प्रत्येक आत्मा स्वत:चा व्यक्तित्वाला सोडत नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा आत्मा शेवटी एकच आहे?

**दादाश्री :** एक म्हणजे स्वभावाने एक आहे. आत्मा-आत्म्यात

काहीच फरक नाही. ज्या प्रकारे बिस्कीटांमध्ये काहीच फरक नाही, शेवटी तर ते सर्व सोनेच आहे, त्याच प्रमाणे प्रत्येक आत्म्यात फरक नाही.

**प्रश्नकर्ता :** जर सर्व आत्म्याचे गुणधर्म एक आहेत तर मग सर्व व्यक्तित्व वेगवेगळे का झाले?

**दादाश्री :** त्याचा काळ आणि क्षेत्र बदलल्यामुळे त्यांचे सर्वांचे व्यक्तित्व वेगवेगळे झाले. प्रत्येकाचा काळ आणि क्षेत्र वेगवेगळेच असतात. तुम्ही ज्या क्षेत्रात बसला आहात, तर यांचा हा क्षेत्र नसणार ना? आता जर ते इथून उठल्यावर तुम्ही त्या जागी बसलात तर तुम्हाला तेच क्षेत्र प्राप्त होते, पण तेव्हा काळ तर बदललेला असतो ना?

म्हणजेच हे जग सतत प्रवाहाच्या रूपात आहे. हे जग स्थिर नाही, पण प्रवाहाच्या रूपात आहे, संसाराच्या रूपात आहे. संसार म्हणजे समसरण, निरंतर परिवर्तित होणारा, क्षणासाठीही स्थिर राहत नाही. उदाहरणार्थ समजा दोन लाख लोकांचे सैन्य इथून जात आहे, पाच, दहा किंवा पंधराच्या जोडीने, पण ते सर्व एका लाइनमध्येच असतात ना? ते असे प्रवाहासारखे वाहत असेल तर ते तुम्हाला दिसते ना? त्याच प्रकारे ज्ञानींना हे जग वाहत आहे असेच दिसते. जेव्हा ज्ञानचक्षू उघडतात तेव्हा हे जग वाहत आहे असे दिसत राहते. आणि वाहत आहे म्हणून तुम्ही जिथे आहात, तिथे त्या क्षेत्रावर दुसरा कोणी नाही, आणि जेव्हा तुमच्या क्षेत्रात दुसरा कोणी येतो तोपर्यंत काळ बदलतो. हे तुम्हाला समजत आहे ना? म्हणजेच (सगळ्यांचे) देह, आकार, पुण्य आणि पाप सगळे काही वेगवेगळे असतात. पण आत्मस्वरूपाने सर्व एकच असततात.

## वस्तू-स्वरूपाचे विभाजन होऊ शकत नाही

**प्रश्नकर्ता :** तर मग सर्व आत्मे एकाच आत्म्याचे अंश आहेत, असे म्हणू शकतो का?

**दादाश्री :** नाही, नाही. सर्व आत्मे एकाच आत्म्याचे अंश असू शकत नाहीत. त्याचे असे आहे की नेहमीच, जी वस्तू असते ना, त्यात

रूपी वस्तूंचे अंश असतात, पण 'अरूपीचे' अंश नसतात. अरूपी एकाच वस्तूच्या रूपात असते. त्याचे अंश झाले, तुकडे झाले, विभाजन झाले तर मग ते परत एक होणार नाही. म्हणजेच स्वत: सर्वांश स्वरूपातच आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मी स्वत:मध्ये पूर्ण शुद्धात्मा आहे?

**दादाश्री :** तुम्ही पूर्णच आहात, सर्वांशच आहात ना?

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्म्याचे विभाजन होऊ शकत नाही?

**दादाश्री :** आत्मा स्वत:च परमात्मा आहे आणि तो वस्तूच्या रूपात आहे. म्हणजेच त्याचा एक पण तुकडा वेगळा होऊ शकत नाही, अशी ती पूर्ण वस्तू आहे. जर विभाजन झाले तर तुकडे होतील, आणि मग ती वस्तू संपून जाईल, पण असे नसते. आत्म्याचे विभाजन होऊ शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** अमीबा नावाचा जीव आहे. त्याच्या वंशाची वाढ विभाजन पद्धतीने होते. एकाचे दोन होतात, दोनाचे चार होतात म्हणजे प्रश्न असा निर्माण होतो की इथे आत्म्याचे विभाजन होत नाही का?

**दादाश्री :** ते बरोबर आहे. पण यात आत्म्याचे विभाजन होत नाही. या शरीराचे विभाजन होते. या शरीरात अनंत जीव असतात, त्या जीवांचे वेगळे-वेगळे विभाजन होते. हा जो एक बटाटा आहे, त्यात खूप सारे जीव आहेत. जेव्हा त्याचे तुकडे करतो आणि त्यातील एक छोटासा तुकडा जरी लावला तरी तो उगवतो. आणि इतर कित्येक वस्तूचे तुकडे करून लावले तर ते उगवणार नाहीत. ज्याचे तुकडे करून लावतो आणि ते उगवतात, त्यात खूप जीव असतात. ही जी दूधवाली रोपटी आहेत ना, निवडुंग (कॅक्टस्) वगैरे, त्यांचा थोडासा तुकडा लावला तरी उगवतो. त्यांच्यात खूप जीव असतात, त्यामुळे वंशवृद्धी होतच राहते.

**प्रश्नकर्ता :** तर मग सूक्ष्मआत्मा आणि स्थूलआत्मा असे जे म्हटले जाते त्यात काय फरक आहे?

**दादाश्री :** असे आहे की आत्म्याचे स्थूलआत्मा आणि सूक्ष्मआत्मा असे विभाग नसतातच. पण तरी हे लोक स्थूलआत्मा आणि सूक्ष्मआत्मा असे सर्व बोलतात. तो विनाशीआत्मा आहे. आणि जो मूळ–अस्सल आत्मा आहे, तो तर अविनाशी आहे. त्याचा सूक्ष्म भाग पण नसतो आणि स्थूल भाग पण नसतो.

मी ज्याला आत्मा म्हणतो, तो सूक्ष्म विभाग नसलेला, स्थूल विभाग नसलेला, अविनाशी–अविभाज्य असा परमात्मा आहे. आणि तुम्ही ज्याचे विभाजन होऊ शकते अशा स्थूल आणि सूक्ष्म आत्म्याबद्दल बोलत आहात. स्थूल आणि सूक्ष्म हे सर्व विनाशी आहे. तो 'मेकॅनिकल आत्मा' आहे. आणि जर हवा (श्वास) चालू ठेवली तरच तो 'मेकॅनिकल आत्मा' चालेल, आणि जर हवा बंद केली तर तो मरेल. याउलट मूळ आत्मा तर मरतच नाही.

म्हणजेच आत्मा जर परमात्म्याचा अंश असता तर तो कधी सर्वांश बनू शकला नसता. आणि जो सर्वांश होऊ शकत नाही तो आत्माच नाही. 'तुम्ही' सर्वांश आहात पण तुम्हाला त्याचे भान नाही. तुम्हाला अंश भान आहे. तुम्ही तर पूर्ण परमात्मा आहात, पण तुम्हाला त्याचे कमी भान आहे. अंश परमात्मा कधीच नसतो. परमात्म्याचे तुकडे होत नाहीत.

## रुपया कधी एक पैसा होतो का?

भगवंत सर्वांश रूपानेच असतात हे आता तुम्हाला समजले ना? भगवंत अंशस्वरूपात आहेत असेच तुम्ही समजत होता ना? तर मग या लोकांनी भगवंत अंशस्वरूपात आहेत असे जे सांगितले ती थाप तर नसेल ना? ती काय थाप आहे? नाही, थाप नाही. पण अंगाला लावायचे औषध जर लोक प्यायले तर काय होईल? अंशस्वरूप म्हणजे काय? तर 'तुमच्यात' 'भगवंत' तर सर्वांशानेच आहेत, परंतु (तुमची) जेवढी आवरणे तुटली आहेत तेवढे आंशिक ज्ञान 'तुम्हाला' प्राप्त झाले आहे. पण आतमध्ये भगवंत तर सर्वांशच आहेत. आणि या जन्मात 'तुमच्यात'

सर्वांश ज्ञान प्रकट होऊ शकते. मात्र तो हिंदुस्तानातील मनुष्य असायला हवा. कारण येथील हिंदुस्तानातील माणूस 'फुल्ली डेव्हलप' झालेला आहे. फॉरेनवाल्यांसाठी हे ज्ञान उपयोगी नाही. कारण ज्यांना पुनर्जन्म समजत नाही त्यांच्यासाठी हे ज्ञान उपयोगी नाही. ज्यांना पुनर्जन्म समजतो, त्यांनाच भगवंतांचे सर्वांश रूप समजू शकते.

म्हणजेच असे विज्ञान जर ऐकण्यात आले तर हिंदुस्तानातील लोकांच्या सर्व शक्ती जागृत होतील. नाहीतर हे लोक मनात काय मानतात की 'आम्ही काय करणार? आम्ही तर फक्त भगवंताचे अंश आहोत.' लोकांनी असेच शिकवले आहे की 'आम्ही तर भगवंतांचे अंश आहोत', असे म्हणत जा! म्हणजे लोकांना जे ज्ञान दिले जाते, जी समज दिली जाते, आणि ज्या ज्ञानाच्या आधारावर लोक जगतात ते ज्ञानच, ते आधार-ज्ञानच जर 'मी भगवंतांचा अंश आहे' असे शिकवत असेल तर मग तू सर्वांश कधी होशील? म्हणजेच याचा शेवट कधी होणारच नाही. तू भगवंतांचा अंश नाहीस. तू संपूर्ण, सर्वांश भगवंतच आहेस. अंश कधीच सर्वांश होऊ शकत नाही. जो अंश असतो, त्याच्यात सर्वांश होण्याची शक्तीच नसते. अंश हा कायम अंशच राहतो, आणि सर्वांश कधी अंश होऊ शकत नाही. सर्वांश तर कायम सर्वांशच राहतो. तर मग असे अज्ञान का बरे पसरले असेल? भगवंतांचे असे स्वरूप का मानतात? तेव्हा 'ज्ञानी पुरुष' समजावून सांगतात की भगवंत तर सर्वांशच आहेत, पण त्यांचे आवरण अंशत: दूर झाले आहे, म्हणून तेवढ्या प्रमाणात त्यांना लाभ मिळतो. नाहीतर 'स्वत:' तर सर्वांशच आहे.

तुम्हाला समजले ना? या प्रकारे 'मी अंश स्वरूप' आहे असे जर म्हणत राहिले तर पत्ताच लागणार नाही. मला जेव्हा असे अंश स्वरूप म्हणणारे भेटले तेव्हा मला वाटले की, 'हा काय प्रकार आहे?' मी जेव्हा लहान होतो तेव्हा 'आपण सर्व तर अंशस्वरूप आहोत' असे म्हणणारे मला भेटले होते. तेव्हा मला खूप राग येत असे की तू असशील अंश स्वरूप, मी कसा काय अंश स्वरूप? अंश स्वरूप, तो आणि एक पैसा कधीही पूर्ण रुपया होऊ शकत नाही आणि रुपया कधी एक पैसा

होऊ शकत नाही. एक पैसा लाख वर्षे पडून राहिला, तरी त्याचा रुपया होईल का? म्हणजेच हकीगत नीट समजून घ्यायची आवश्यकता आहे.

## खरी समज, सर्व व्यापकाची

**प्रश्नकर्ता :** आत्मा सर्वांश आहे, त्याचप्रमाणे आत्मा सर्वव्यापी पण आहे ना?

**दादाश्री :** नाही. आत्मा सर्वव्यापी आहे ही सापेक्ष गोष्ट आहे, तो कायम स्वरूपी सर्व व्यापी नाही. तुम्ही ज्याला सर्वव्यापी म्हणता ते 'निरपेक्षा'बद्दल बोलत आहात की 'सापेक्ष'बद्दल बोलत आहात?

**प्रश्नकर्ता :** निरपेक्षाबद्दल.

**दादाश्री :** ह्या ट्युब लाइटचा जो प्रकाश आहे तो संपूर्ण खोलीत व्यापत आहे की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, व्यापत आहे.

**दादाश्री :** या लाइटवर जर आपण कागद किंवा असे काहीतरी गुंडाळले तर?

**प्रश्नकर्ता :** तर मग काळोख वाटेल.

**दादाश्री :** तर मग इथे त्याचा प्रकाश दिसणार नाही ना?

**प्रश्नकर्ता :** दिसणार नाही.

**दादाश्री :** तर मग त्या वेळी तो सर्वव्यापी आहे का?

**प्रश्नकर्ता :** त्या वेळी आपल्याला भ्रांती होते, पण तरी लाइट तर सर्वव्यापीच आहे ना?

**दादाश्री :** नाही, असे नाही. या सर्वव्यापी शब्दाचा अर्थ लोकांनी न समजताच चुकीचा लावला आहे. 'आत्मा सर्वव्यापी' आहे असे तुम्ही म्हणता, पण तो तुमचा गैरसमज आहे. सर्वव्यापीचा अर्थ मी तुम्हाला समजावून सांगतो.

जेव्हा अंतिम अवतार असतो, चरम देह असतो, तेव्हा आत्मा संपूर्ण निरावरण होतो. त्या वेळी आत्मा साऱ्या ब्रह्मांडात सर्वव्यापी होतो. पण असे सर्व आत्म्यांच्या बाबतीत होत नाही, पण जो आत्मा मोक्षाला जाणार असेल, संपूर्ण निरावरण झालेला असेल, फक्त तोच आत्मा सर्वव्यापी होत असतो. बाकी, इतर हे जे सर्व आत्मे आहेत, ते तसे होत नाहीत, समजले का तुम्हाला?

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्मा स्वत: चेतनाच्या रूपात सर्वव्यापी आहे?

**दादाश्री :** नाही. चेतनाच्या रूपात सर्वव्यापी नाही, त्याचा स्वभाव सर्वव्यापी आहे. अंतिम अवतारात चरम शरीर असते तेव्हा त्याचा प्रकाश संपूर्ण ब्रह्मांडात पसरतो. अर्थात ती सापेक्ष गोष्ट आहे. प्रत्येकाच्या बाबतीत असे होत नाही. तसे तर हे सर्व लोक मरतातच ना! रोज रोज स्मशानात जातातच ना!

म्हणजे आत्मा सर्वव्यापक आहे असे म्हटले जाते, पण तो त्याच्या लाइटने सर्वव्यापक आहे, त्याच्या प्रकाशाने सर्वव्यापक आहे, पण त्या सर्व ठिकाणी तो 'स्वत:' नसतो.

म्हणजेच आत्म्याचा प्रकाश सर्वव्यापक आहे. त्या प्रकाशामुळे इतर वस्तू दिसतात. या जगात ज्ञेय आणि ज्ञाता असे दोघेही आहेत की नाहीत? का फक्त ज्ञाताच आहे?

**प्रश्नकर्ता :** ज्ञाता आणि ज्ञेय दोन्हीही आहेत.

**दादाश्री :** तर मग तुम्ही स्वीकार केला ना? त्याच प्रकारे दृश्य आणि द्रष्टा दोन आहेत ना? सर्वत्र फक्त आत्माच आहे असे नसते ना? ज्ञेय आणि ज्ञाता, दृश्य आणि द्रष्टा अशी दोन्ही असतात. आत्मा सोडून बाकी सर्व दृश्य आणि ज्ञेय आहे. आत्म्याचा प्रकाश असा आहे की जिथे ज्ञेये आहेत आणि दृश्ये आहेत, तिथपर्यंत प्रकाश जातो.

समजा, एका मडक्यात एक प्रकाशाचा बल्ब ठेवला आणि त्याला झाकण लावले, तर त्याचा प्रकाश बाहेर पडणार नाही, फक्त त्या

मडक्यालाच प्रकाश मिळेल. परंतु जर ते मडके फोडून टाकले तर तो प्रकाश कुठपर्यंत जाईल? जेवढ्या भाजनात ठेवलेला असेल, जेवढ्या खोलीत ठेवलेला असेल, तिथपर्यंत प्रकाश पसरेल.

त्याचप्रमाणे आत्मा जर निरावरण झाला, तर तो संपूर्ण लोक-अलोकमध्ये पसरेल असा आहे. पण आत्मा फक्त ह्या लोकापुरताच प्रकाश देतो. अलोकमध्ये ज्ञेये नसतात, म्हणून आत्म्याचा प्रकाश, ज्ञाताचा प्रकाश तिथे जातच नाही. लोक आहे म्हणून दुसऱ्या भागाला अलोक म्हणतात. अलोकमध्ये अजिबात ज्ञेये नाहीत, फक्त आकाशच आहे. आणि ज्ञेये नाहीत म्हणून आत्मा तिथे प्रकाश करू शकत नाही. अर्थात आत्मा असा आहे की पूर्ण लोकाला प्रकाशमान करू शकेल, आणि तोही प्रत्येक आत्मा, पण आवरणे तुटली तर.

ज्या प्रकारे मडक्यात लाइटचा बल्ब ठेवला असेल आणि मग त्या मडक्याला जर काही भोके पाडली, तर तेवढ्या भोकातून थोडा थोडा प्रकाश बाहेर पडतो. त्याच प्रकारे (शरीराच्या) या पाच इंद्रियातून हा प्रकाश बाहेर पडतो. आणि संपूर्ण दशेत जर कधी हा देह सुटला तर हा प्रकाश संपूर्ण जगात व्याप्त होईल, असा त्याचा स्वभाव आहे.

सध्या तर तो शरीरात आहे. म्हणून प्रथम स्वरूपाचे ज्ञान जाणणे, त्याला ज्ञानावरण तुटणे असे म्हणतात. त्यानंतर तर आपोआपच जशी जशी कर्मे कमी होत जातात, तसेतसे निराकरण होत जाते. आत्म्याच्या अनंत प्रदेशांवर कर्मांची आवरणे आहेत. जसाजसा कर्मांचा निकाल होत जातो, तशीतशी आवरणे तुटत जातात.

## प्रमेयानुसार प्रमाता-आत्मा

सर्वव्यापकचा अर्थ वेगळा आहे. ह्या लोकांना वाटतो तसा तो नाही. सर्वव्यापकचा अर्थ असा आहे की हा जो लाइटचा बल्ब आहे, तो एकच बल्ब आहे, या खोलीत सगळीकडे बल्ब नाहीत. खोलीत तर त्याचा प्रकाशच आहे. त्याच प्रकारे फक्त एकाच आत्म्यात संपूर्ण ब्रह्मांड प्रकाशमान करू शकेल अशी शक्ती आहे. शुद्धात्मा झाल्यानंतर, इतर

शिल्लक राहिलेली कर्मे जेव्हा संपूर्णपणे 'डिस्चार्ज' होतात आणि जेव्हा पूर्णपणे कर्मरहित होतो, तेव्हा संपूर्ण ब्रह्मांड प्रकाशमान करू शकेल एवढी शक्ती आत्म्यात असते.

पण ह्या लोकांनी ह्याचा अर्थ असा काढला की या सर्वात आत्मा आहे, यात आत्मा आहे, त्यात आत्मा आहे, असे चुकीचे समजले. चोपडायचे औषध जर पिऊन टाकले तर काय होईल? असे झाले आहे हे सगळे. त्यामुळे बाहेरचा रोगही मिटला नाही आणि आतला रोगही मिटला नही!

म्हणजे आपण जेव्हा म्हणतो की 'हा प्रकाश सगळीकडे आहे' त्याचा अर्थ बल्ब तर तिथल्या तिथेच आहे, पण त्याचा प्रकाश संपूर्ण खोलीत पसरला आहे असा समजायचा आहे. आपण इथे एका मडक्यात बल्ब ठेवू आणि ते मडके झाकण लावून बंद केले तर त्याचा प्रकाश सगळीकडे दिसेल का?

**प्रश्नकर्ता :** नाही दिसणार.

**दादाश्री :** म्हणजेच ज्याप्रमाणे 'प्रमेय' असेल, त्यानुसार प्रमाता असेल. हे प्रमेय एवढेच आहे, मडक्या एवढाच प्रकाश पसरेल. मग बाहेर कुठेही त्याचा प्रकाश नसणार.

## प्रमेय ब्रह्मांड, प्रमाता परमात्मा

**प्रश्नकर्ता :** एका जागी असे वाचले आहे की 'ज्ञानी पुरुषां जवळ दीर्घकाळापर्यंत सत्संग करून प्रमेय, प्रमाता आणि प्रमाण यांचे स्वरूप समजून घेतले पाहिजे.' तर कृपया तुम्ही ते समजावावे.

**दादाश्री :** हो, प्रमेय अर्थात हे शरीर याला प्रमेय म्हणतात आणि या ब्रह्मांडाला पण प्रमेय म्हणतात. आत्मा स्वत: प्रमाता आहे. आता आत्मा या शरीरात आहे तर या आत्म्याचा प्रकाश किती असेल? त्याचे प्रमाण किती असेल? तर या शरीरा एवढेच. आणि जर संपूर्ण ज्ञान असेल आणि शरीर सुटले तर त्या प्रकाशाचे प्रमाण केवढे होईल? संपूर्ण

प्रमेयात, संपूर्ण ब्रह्मांडात तो प्रकाश पसरेल. प्रमेयाप्रमाणे प्रमाता होतो. जेवढे भाजन असेल, त्याप्रमाणे प्रकाश पसरेल. म्हणजेच केवळज्ञान झाल्यानंतर जर शरीर सुटले तर मग जो प्रमाता आहे, तो पूर्ण प्रमेयात पसरेल, स्वत:चा प्रकाश पूर्ण ब्रह्मांडात पसरेल. आणि सध्या प्रमाण किती आहे? तर 'या शरीरा एवढेच आहे.'

मडक्यात बल्ब ठेवला असेल तेव्हा त्याचा प्रकाश तीव्र असतो परंतु जेव्हा ते मडके फुटते तेव्हा त्याचा प्रकाश संपूर्ण खोलीत पसरतो. पण तेव्हा तो प्रकाश सौम्य होतो. म्हणजेच हा प्रकाश जेवढा अधिक पसरतो तेवढा तो अधिकाधिक सौम्य होत जातो. कारण हा पौद्गलिक प्रकाश आहे. आणि आत्म्याचा प्रकाश सौम्य होत नाही, तो प्रकाश कितीही पसरो, अगदी पूर्ण ब्रह्मांडात पसरो, तरी पण तो जसाच्या तसा राहतो.

## सापेक्ष दृष्टीने सर्वव्यापक

म्हणजेच 'आत्मा सर्वव्यापक आहे' ही सर्व सापेक्ष वाक्ये आहेत, त्यांना लोक निरपेक्ष मानतात आणि त्याचा चुकीचा अर्थ लावतात आणि अंगाला चोपडायचे औषध ते पिऊन टाकतात. सापेक्ष आहे, म्हणजे काय? तर सर्व माणसे मरतात तेव्हा आत्मा सर्वव्यापक होत नाही. जेव्हा केवळी (केवळज्ञान प्राप्त झालेली व्यक्ती) किंवा तीर्थंकर यांचे निर्वाण होते, तेव्हा त्यांचा जो आत्मा बाहेर पडतो, तो संपूर्ण ब्रह्मांडात प्रकाशमान होतो, या दृष्टीने, म्हणजे सापेक्ष दृष्टीने आत्मा सर्वव्यापक आहे. कायमसाठी सर्वव्यापक नाही. परंतु लोक तर त्याला सर्वव्यापक, सर्वव्यापक, सर्वव्यापक असेच गात राहतात. नाहीतर, जोपर्यंत मनुष्यात अज्ञान आहे तोपर्यंत त्याचा प्रकाश बाहेर पडत नाही. तो तर जेव्हा 'पूर्ण' ज्ञान होईल, तेव्हाच संपूर्ण ब्रह्मांडात प्रकाशमान होईल. आणि तुमच्यात पण अगदी तसाच आत्मा आहे, पण तो पूर्णपणे आवृत्त आहे.

आत्मा जेव्हा मोक्षात जातो, तेव्हा पूर्ण प्रकाश संपूर्ण ब्रह्मांडात सगळीकडे पसरतो. सर्वव्यापक प्रकाश ब्रह्मांडात सगळीकडे पसरतो. त्या दृष्टीने सर्वव्यापक आहे. आणि असे जे भगवंत दिसतात ते तर

दिव्यचक्षूंनी दिसतात. आणि तेसुद्धा समोर जर क्रीचर (जीव) असेल तर दिसतो, जर क्रियेशन (मानवनिर्मित वस्तू) असेल तर मात्र दिसत नाही. कारण 'गॉड इज इन एव्हरी क्रीचर व्हेदर विजिबल ऑर इनविजिबल, नॉट इन क्रिएशन' या मशीनमध्ये भगवंत नाहीत. पण तरी आपल्या लोकांनी भगवंत सर्वत्र आहेत असे ठाम बसवले आहे.

## जगात सर्वत्र आत्माच?

संपूर्ण ब्रह्मांड क्रीचर्सनी ओतप्रोत भरलेले आहे आणि त्या जीवांच्या आत चेतन विराजमान आहे. हो, म्हणजेच सर्व जीवांमध्ये जड आणि चेतन असे दोन भाग आहेत. आणि चेतन आहे, ते शुद्ध चेतन आहे, तोच आत्मा आहे आणि तोच परमात्मा आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजेच सगळीकडे आत्म्याशिवाय आणखी काहीच नाही?

**दादाश्री :** नाही. फक्त आत्माच आहे असे नाही. प्रत्येक जीवात अनात्मा पण आहे आणि आत्मा पण आहे. आणि सर्वव्यापीचा अर्थ तर वेगळा आहे, पण हे लोक न समजताच सर्व चुकीचे घेऊन बसले आहेत. असा जर तो सर्वव्यापी असता तर संडासाला कुठे गेलो असतो? घरात स्वयंपाकघर आणि संडास दोन्ही वेगळेच ठेवतात ना? सगळीकडे जर भगवंत असतील तर मग आम्ही लाकूड कुठे जाळावे आणि कुठे जाळू नये? म्हणजेच जरा सद्विवेक तर समजून घ्यावाच लागेल ना? श्रीकृष्ण भगवंतांनी जड आणि चेतन, आत्मा आणि अनात्मा, अशा दोन गोष्टी सांगितल्या आहेत.

जड आणि चेतन या दोनही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. ज्या जड आहेत, त्याचा तुम्ही उपयोग करू शकता. पण चेतनाला जर तुम्ही माराल तर तुम्हाला पाप लागेल. झाड आहे, त्यात चेतन आहे. त्याला जर कापाल, जाळाल तर पाप लागेल आणि इथे जर कसलेही लाकूड पडले असेल, ते जर तुम्ही जाळले तर हरकत नाही. कारण त्यात चेतन नाही.

## तादृश दृष्टांताद्वारे मौलिक स्पष्टीकरण

म्हणूनच श्रीकृष्णांनी स्पष्ट केले की आत्मा आणि अनात्मा अशा दोन गोष्टी आहेत. या जडालाच जर आत्मा म्हटले तर आत्म्याची काय दशा होईल? जर सगळे गहूच असतील तर मग निवडायला काय राहील? गहू आणि खडे मिसळलेले असतील आणि जर कोणी असे म्हटले की हे सर्व गहूच आहेत, तर मग निवडायला राहिलेच काय?

बाजारात जेव्हा तुम्ही गहू आणायला जाता, तेव्हा तुम्ही व्यापाऱ्याला काय सांगता? खडे द्या असे म्हणता की गहू द्या असे म्हणता? काय म्हणता?

**प्रश्नकर्ता :** गहू द्या असेच म्हणावे लागते.

**दादाश्री :** कुठले गहू असे सांगावे लागत नाही का?

**प्रश्नकर्ता :** हो, ग्वालियरचे गहू.

**दादाश्री :** हो, मग तुम्ही म्हणता की मला गहू कसे आहेत ते जरा दाखवा. मग तो ताबडतोब (पोत्यात) एक सुरी भोसकून त्यातून थोडे गहू काढतो आणि म्हणतो, 'सर्व पोत्यात असेच गहू आहेत.' व्यापारी त्या पोत्याला गव्हाचे पोते असे म्हणतो. लोक पण त्या पोत्याला गव्हाचे पोते असेच म्हणतात. मग ते पोते घरी आणल्यावर बायको म्हणते की 'हे निवडावे लागतील.' तर तुम्ही म्हणता 'अरे, मी तर गहूच आणले आहेत, मग याला निवडायची काय गरज? मी गहूच तर आणले आहेत.' तुम्ही असे म्हटल्यावर बायको म्हणेल 'तुम्हाला काडीचीही अक्कल नाही. गहू आणि खडे एकत्रच असतात, त्यालाच गहू म्हणतात.' मग तुम्ही म्हणाल, 'पण बाजारात तर सर्व जण याला गहूच म्हणत होते ना!' म्हणजेच व्यवहारात असेच बोलले जाते. व्यवहारात त्याला गहूच म्हणतात पण ते खड्यांसहित असतात. म्हणून घरी आल्यावर ते निवडावे लागतात. व्यवहार हा असा असतो. व्यवहार म्हणतो की हे गव्हाचे पोते आहे. आपण जर विचारले 'पण यात तर खडे पण आहेत ना!' तेव्हा

तो म्हणतो 'नाही, असे बोलू नये, हे पोते गव्हाचेच आहे.' यालाच व्यवहार म्हणतात. म्हणूनच आपण व्यवहार समजून घ्यावा लागेल ना?

मी तुमच्याकडे आलो आणि जर सकाळी दात घासायचे असेल तर मी म्हणेन 'दातवण आणा.' तर मग तुम्ही माझ्यापुढे काय काय आणून ठेवाल?

**प्रश्नकर्ता :** ब्रश, टूथपेस्ट सगळे काही ठेवावे लागेल.

**दादाश्री :** हो, पाण्याचा तांब्या, पाट असे सर्व काही आणाल ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** पण मी तर फक्त दातवण आणायला सांगितले होते मग तुम्ही ह्या सर्व वस्तू का आणल्या? हो, म्हणजे व्यवहार असा आहे. बोलतो फक्त एवढेच, पण तुम्हाला इतर सर्व समजले पाहिजे, व्यवहार समजला पाहिजे. आपण फक्त ब्रश आणून सांगितले, 'हा घ्या ब्रश.' तर तो काय म्हणेल? 'टूथपेस्ट आणा, पाणी आणा, अमके आणा.' मग सगळी गडबड होईल. त्याऐवजी आपण सर्व व्यवहार समजून घ्यायला हवा.

म्हणजे व्यवहारात गहू म्हणतात हे बरोबर आहे, पण त्यात खडे पण असतात. त्याचप्रमाणे या व्यवहारात 'सर्वत्र आत्मा आहे' असे जे म्हटले आहे ना, ते याचप्रकारे म्हटले गेले आहे. गहू आहेत आणि सोबत खडे पण आहेत. त्याचप्रमाणे आत्मा पण आहे आणि सोबत अनात्मा पण आहे. सगळीकडे आत्मा आहे, पण वास्तवात असे नाही. पण हे सर्व समजून घ्यावे लागेल, तेव्हा सर्व मार्गी लागेल.

इथे तर लोकांनी याचा चुकीचा अर्थ केला की, सगळीकडे आत्मा आहे, म्हणजे खांबात पण आत्मा आहे, भिंतीत पण आत्मा आहे. असे सगळे चुकीचे समजले आहेत. म्हणून गहू आणि खडे यात निवडायला काहीच शिल्लक राहिले नाही. सगळे 'गहूच आहेत' असे म्हणतात त्याला आपण मनाई करत नाही. कारण व्यापाऱ्यांसाठी ते गहूच आहेत.

पण खाणाऱ्यांसाठी तर गहू आणि खडे, दोन्हीही एकत्रच आहेत ना? व्यापाऱ्यांसाठी काय आहेत?

**प्रश्नकर्ता :** गहूच आहेत.

**दादाश्री :** हो, तर जितके व्यापारी आहेत, त्यांच्यासाठी असे आहे, पण खाणाऱ्यांनी तर समजून घ्यावे लागेलच ना! अन्यथा सगळीकडेच जर भगवंत असतील तर खरे भगवंत कधी मिळतील?

लोक असेच समजू लागले की सगळ्यात आत्मा आहे. पण याला काही अर्थच नाही ना? 'सगळे गहू आहेत' असे तर व्यापारी बोलतात. व्यापारी काय असे म्हणतील की 'गहू आणि खडे दोन्ही आहेत?' जर असे म्हणाले तर आपण म्हणू 'खडे कमी करून टाका.' पण व्यापारी असेच म्हणतात 'सर्व गहूच आहेत.' पण ज्यांना खायचे आहेत त्यांच्यासाठी गहू आणि खडे, दोन्हीही आहेत.

म्हणजेच गहू तरी ओळख किंवा खडे तरी ओळख, दोघांपैकी एक ओळखता आले तरी चालेल. जर गहू आणि खडे निवडायचे असतील तर त्यातील फक्त खडे ओळखता आले तरी चालेल की नाही?

**प्रश्नकर्ता :** खडे ओळखता आले तर बाकी उरतात ते सर्व गहू.

**दादाश्री :** म्हणजेच 'एकाला ओळखले की दोघांना ओळखाल' असे म्हणतात. म्हणून आम्ही तुम्हाला 'शुद्धात्म्या'ची ओळख करून देतो. मग तुम्ही उरलेले सर्व पण ओळखाल.

हे लोक काय म्हणतात? 'अग ताई, गहू निवडलेस का?' खरे म्हणजे ती निवडत असते खडे. म्हणजे आपली ही भाषा तरी पाहा. तिथे जाऊन आपण म्हणालो 'तुम्ही तर म्हणत होता की मी गहू निवडत आहे, पण तुम्ही तर खडे निवडत आहात!' तर त्या म्हणतील 'नाही, गहूच तर निवडत आहे ना? पण खरे तर ती खडे वेचून बाजूला टाकत आहे. मग लोक असे का म्हणत असतील?

**प्रश्नकर्ता :** खरी समज नाही ना?

**दादाश्री :** हा संसार भ्रांती स्वरूपच आहे ना, म्हणून सर्व बोलणे पण उलटच बोलले जाते.

## आत्मा निर्गुण आहे की अनंत गुणांचे धाम

श्रीकृष्णांनी जे समजावून सांगितले आहे तेवढीच गोष्ट जरी समजून घेतली तरी पण तो खरा भक्त होईल. श्रीकृष्णांनी तर पूर्ण सायन्स उघड केले आहे, आणि सांगितले आहे की चारही वेद त्रिगुणात्मक आहेत. हे चार वेद लोकांसाठी आहेत. पण ज्यांना मोक्षाला जायचे असेल त्यांनी या चार वेदांच्या पुढे यावे, गीतेत यावे.

**प्रश्नकर्ता :** आपण त्रिगुणात्मकबद्दल सांगितले, पण 'आत्मा तर निर्गुण आहे असे म्हटले जाते ना?

**दादाश्री :** ही जी मान्यता आहे की आत्मा निर्गुण आहे ती चुकीची मान्यता आहे. या जगात साधा दगडदेखील गुणरहित नसतो. तो दगड पण कामी येतो ना?

आत्मा तर परमात्मा आहे. त्याच्यात अनंत गुण आहेत. या निर्गुणाबद्दल मी तुम्हाला समजावतो. शास्त्रकारांनी निर्गुण म्हटले आहे, पण लोक ते स्वत:च्या भाषेत समजले. स्वत:च्या भाषेत समजतील तर फळ मिळेल का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** ते काय सांगू इच्छितात? तर प्रकृतीच्या गुणांनी आत्मा निर्गुण आहे. प्रकृतीचा एक पण गुण आत्म्यात नाही आणि आत्म्याचे जे स्वाभाविक गुण आहेत, त्यांनी तो पुरेपूर भरलेला आहे. तुम्हाला हे समजले का? प्रकृतीचा एक पण गुण आत्म्यामध्ये नाही. म्हणून त्याला निर्गुण म्हटले आहे.

## या जगात काहीच निर्गुण नाही

**प्रश्नकर्ता :** पण असे म्हणतात की निराकार, निर्गुण ब्रह्माची

तुम्ही ज्या प्रकारे भक्ती कराल, त्याच प्रकारे ते तुमच्या समोर साक्षात् हजर होईल. अर्थात साकार स्वरूपाने तसेच दर्शन प्राप्त केले जाऊ शकते.

**दादाश्री :** त्याचे काय आहे की या लोकांना जे ब्रह्म दिले होते ते भ्रमवाले ब्रह्म होते. ब्रह्म निर्गुण नसतेच. हे तर भ्रमवाले ब्रह्म आहे, परंतु हे न समजल्यामुळे लोक स्वतःच्या भाषेत काहीही बोलत राहतात.

**प्रश्नकर्ता :** पण मग ब्रह्म आहे तरी काय? ते सांगा ना!

**दादाश्री :** ती मूळ वस्तू आहे. ती अविनाशी आहे. तिचे कितीतरी, अपार गुण आहेत. आणि त्यालाच निर्गुण, निर्गुण असे सगळ्यांचा मनात ठसवले आहे. म्हणून मग लोकही तसेच म्हणतात. म्हणून तर मला बोलावे लागते, अगदी कठोर भाषेत बोलावे लागते की अरे, दगडात पण गुण असतात! दगडसुद्धा चटणी वाटायला उपयोगी पडतो की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, पडतो.

**दादाश्री :** अरे, मग काय फक्त आत्माच निर्गुण आहे का? म्हणून कठोर शब्दात जरा समजावावे लागते की असे तुम्ही किती दिवस मानणार? आणि असे मानलेत तर आत्मा कधी प्राप्त होईल?

म्हणजेच वास्तवात अगदी दगडात पण गुण आहेत. पण हे लोक आत्म्याला निर्गुण म्हणतात, आणि म्हणून सगळ्यांनीही तसेच मानले आणि त्यामुळे सगळी चुकीची समज निर्माण झाली. म्हणूनच तर मला सांगावे लागते की आत्मा निर्गुण आहे ही गोष्ट बरोबर आहे, पण ते तुम्ही तुमच्या भाषेत समजू लागलात. पण याचा अर्थ प्रकृतीच्या गुणांनी आत्मा निर्गुण आहे. प्रकृतीचा एकही गुण आत्म्यात नाही, आणि स्वतःच्या गुणांनी मात्र तो ओतप्रोत भरलेला आहे.

आता तर इथपर्यंत आले आहे की लोक आत्म्याला निर्गुण आत्मा म्हणतात. अहो, या जगात दगड पण निर्गुण नाही आणि तुम्ही आत्म्याला निर्गुण म्हणता? लाखो जन्मानंतरदेखील मूळ वस्तूकडे तुम्ही कसे वळू

शकाल? दगड पण निगुर्ण नाही. म्हशीचे शेण पण निर्गुण नाही, त्याचाही उपयोग होतो ना? सारवण्यासाठी उपयोगी होतोच ना? म्हणजेच प्रत्येक गोष्ट गुणवाली आहे. त्या गुणांचा उपयोग होतोच ना? धुळीचा पण उपयोग होतो ना?

अनादि काळापासून या प्रकारच्या चुका चालत आल्या आहेत आणि त्यामुळेच लोकांना त्रास होत आहे ना! धर्मात चूक चालणारच नाही. धर्मात चूक होताच कामा नये. आणि चूक झाली तर काय होणार? आणि हे तर विज्ञान आहे. यात थोडीशी जरी चूक झाली तर संपलेच सगळे! प्रमाणच बदलून जाईल! (अनेक धर्मांद्वारे वस्तूचा अनेक रूपाने निश्चय केला जातो, त्याला प्रमाण म्हणतात) आता तुम्हाला निर्गुण म्हणजे काय ते समजले ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** हो, म्हणजे मूळ आत्मा हा सगुणच आहे, अनंत गुणांचे धाम आहे. त्याचे जे स्वाभाविक गुण आहेत ते अपार आहेत. पण प्रकृतीचे जे गुण आहेत, त्यातील एकही गुण आत्म्यात नाही, म्हणून तो निर्गुण आहे. या लोकांनी हे गुण आत्म्यात नाहीत हे स्वीकारले आहे, म्हणून आत्मा निर्गुण आहे. पण याउलट लोक काय समजले की आत्मा निर्गुणच आहे. अहो, जगात दगड पण निर्गुण नाही. कोणतीच वस्तू गुणरहित नाही. चांगले किंवा वाईट, पण गुणरहित कोणतीच वस्तू नसते. प्रत्येक वस्तूत गुण तर असतातत, मग आत्मा निर्गुण कसा असू शकेल?

## शेवटी प्राकृतिक गुणानांच पोषण मिळाले

**प्रश्नकर्ता :** हे जे सत्त्व, रजस् आणि तमस्, असे तीन गुण आहेत, त्यांचा तत्त्वाशी काय संबंध आहे?

**दादाश्री :** ह्या सत्त्व, रज आणि तम, या गुणांचे काय करायचे आहे? हे तर विनाशी गुण आहेत. प्रकृतीचे गुण आहेत आणि तत्त्व, अविनाशी वस्तू आहे.

हे जे सत्त्व, रज आणि तम गुण आहेत, त्या गुणांचे अधिष्ठाता देव आहेत. ज्यांना त्या गुणांची आवश्यकता असेल त्यांनी ब्रह्मा, विष्णु किंवा महेश यांची आराधना करावी. त्यासाठीच ते आहेत. आणखी काही नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे त्यांची गणती देवतांमध्ये होईल?

**दादाश्री :** हो, पण त्यांच्यात जे गुण आहेत त्या गुणांचे ते अधिष्ठाता देव आहेत. शिव तमोगुणवाले आहेत, विष्णु रजोगुणवाले आहेत, आणि ब्रह्मा सात्त्विक गुणवाले आहेत. त्या त्या देवतांची पूजा केली तर चांगलेच आहे, ते गुण वाढतील. पण शेवटी तर आत्म्याला जाणावेच लागेल.

**प्रश्नकर्ता :** पण शास्त्रात ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांचे जे वर्णन केले आहे, ते सर्व काय आहे?

**दादाश्री :** ते तर प्रकृती मजबूत करण्यासाठी या सर्व मूर्ती ठेवल्या आहेत. विष्णु रजोगुण आहेत, महेश तमोगुण आहेत आणि ब्रह्मा सत्त्वगुण आहेत. हे तीन गुण बळकट करण्यासाठी लोकांनी त्यांच्या मूर्तींची स्थापना केली आहे. म्हणजेच यांची पूजा केल्याने ते गुण बळकट होतील. पण मग त्या गुणांचा पण हळूहळू नाश होईल.

**प्रश्नकर्ता :** तर मग ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांची आराधना करण्यात काही अर्थच नाही ना?

**दादाश्री :** अर्थ आहे ना! माणसाने प्रकृती बळकट करायलाच हवी ना! प्रकृती बळकट असेल तरच तो पुढे प्रगती करू शकेल.

## रूपके, लौकिक आणि अलौकिक दृष्टीने

**प्रश्नकर्ता :** शिवालयात अष्टांगयोगाचे, यम-नियम-आसन-प्राणायम-प्रत्याहार-ध्यान-धारणा आणि समाधी, या आठही अंगांची प्रतीके ठेवलेली असतात. कासव हे प्रत्याहाराचे प्रतीक आहे, नंदीश्वर याला आसन म्हणतात, पार्वतीजी धारणा आहे आणि शंकर महादेव ते समाधीचे..

**दादाश्री :** ही सर्व रूपके आहेत. यात जितके खोल घुसले असाल ना, तर आता घुसल्यानंतर शक्य तितक्या लवकर तिथून बाहेर पडून आपल्या घराकडे जायचे आहे. ही सर्व रूपके तर समोरच्याच्या फायद्यासाठी ठेवलेली आहेत. पण फायदा झाला तर झाला, नाहीतर ही रूपके आहेत तशी रूपकेच राहतील. पण लोक तर या रूपकांनाच सत्य मानू लागले आहेत. ब्रह्मा, विष्णु आणि महेश असे कोणी नसतेच. ही तर सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांसाठी रूपके दिली आहेत.

**प्रश्नकर्ता :** क्रिएटर, प्रिजर्व्हर आणि डिस्ट्रोयर (निर्माता, रक्षणकर्ता आणि विनाशकर्ता).

**दादाश्री :** हो, आणि तीर्थंकरांच्या भाषेत हे काय आहे, ते तुम्हाला माहीत आहे का?

उत्पाद, व्यय आणि ध्रौव, ही तीर्थंकरांची भाषा आहे. हे तिन्ही शब्द आहेत, आणि त्या रूपकांमुळे तर गुंता निर्माण झाला आहे. आणि त्या काळातील लोकांना या रूपकांबद्दल समज होती, पण काळ बदलला तेव्हा या सगळ्यांचा गुंता झाला. जे युग असते, त्या युगातील लोकांना ते समजते, पण युग बदलते तेव्हा सगळे गुंतागुंतीचे होते.

या लोकांनी सगळे काही गुंतागुंतीचे केले. आता ब्रह्माला शोधायला गेलो तर ते कुठे सापडतील? जगात कुठल्याही जागी सापडतील का? आणि विष्णुला शोधायला गेलो तर विष्णु सापडतील का? आणि महेश्वर सापडतील का??

आपण विचारले की 'यांचा धंदा काय? व्यापार काय?' तेव्हा म्हणतात, 'ब्रह्मा सर्जन करतात, विष्णु या सगळ्यांना सांभाळतात, पोषण करतात. आणि महेश्वर, ते मारतात, संहार करतात.' अरे, संहार करणाऱ्यांच्या पाया पडायचे असते का?

असे आहे की, या जगाबद्दल तथ्य जाणायचे असेल, तर या जगात सहा तत्त्वे निरंतर समसरण करतच असतात आणि सहाही तत्त्वे ही 'इटर्नल' (शाश्वत) आहेत. 'इटर्नल' आहेत म्हणजेच यांना बनविणारा

कोणी असेल का? बनविणाऱ्याची गरज पडेल का? 'इटर्नल' वस्तूला तर कोणी बनविल्याशिवाय बनणारच नाही, असे जर म्हटले तर ते चुकीचे होईल ना? म्हणजेच याला बनविणारा कोणी नाहीच.

तरी पण लोक विचारतात, 'कोणी तरी बनविणारा असेलच ना?' अरे, तू हा 'इटर्नल' शब्द नीट समजून घे ना! या सहा 'इटर्नल' वस्तू आहेत. त्यांचा स्वभाव काय आहे? तर त्या आपापल्या गुणधर्मासहित आहेत. कारण इटर्नल वस्तू तिलाच म्हणतात की जी गुणधर्मासहित असते. स्वतःचे गुण पण असतात आणि धर्म पण असतात. धर्म म्हणजेच अवस्था, पर्याय! या सहाही वस्तू स्वतःचे गुण आणि पर्यायासहित असतात. आणि त्या सर्व पद्धतशीरपणे परिवर्तित होत असतात, एक दुसऱ्यांसमोर. ज्या प्रकारे चंद्र, पृथ्वी आणि सूर्याच्या परिवर्तनाने ग्रहणे लागतात, त्याच प्रकारे ही तत्त्वे एकमेकांसमोर परिवर्तित झाल्यामुळे सर्व अवस्था उत्पन्न होतात.

आता जे गुण असतात, ते निरंतर सोबतच राहतात. म्हणून त्यांच्यात काहीही वाढ-घट होत नाही. आणि पर्याय, अवस्था सतत बदलत राहतात. याला काय म्हटले आहे? की पर्याय उत्पन्न होतात, आणि मग त्यांचा विनाश होतो. उत्पन्न-विनाश होतच राहतो. पण (तत्त्व) ध्रुवता सोडत नाहीत. उत्पन्न-विनाश आहे ते अवस्थांमुळे आहे, आणि ध्रौवता स्वभावानेच आहे.

म्हणजेच या इटर्नल (शाश्वत) वस्तू स्वतःचे गुण आणि स्वतःच्या पर्यायासहित असतात, ते पर्याय कसे असतात? तर 'उत्पन्न होणे आणि विनाश होणे, उत्पन्न होणे आणि विनाश होणे.' आणि वस्तू परर्मनन्ट राहते. 'स्वतः' जीवित राहतो, कायम राहतो. आणि अवस्था उत्पन्न होतात आणि नाश पावतात. म्हणून उत्पाद, ध्रौव आणि व्यय असे म्हटले आहे. आणि या तीन गोष्टींना या लोकांनी ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर असे म्हटले आहे. ते पण लोकांच्या फायद्यासाठी, पण लोक उलटच समजले आणि जे चोपडायचे औषध होते ते पिऊन टाकले. चोपडण्याचे औषध जर प्यायलेत तर काय फायदा होईल?

तर आता, ब्रह्मा, विष्णु आणि महेश म्हणजे काय, हे तुम्हाला समजले का?

**प्रश्नकर्ता :** तीन तत्त्वे आहेत.

**दादाश्री :** नाही, वस्तुस्थितीत ही तीन तत्त्वे पण नाहीत.

म्हणजे 'उत्पाद'ला या लोकांनी ब्रह्मा म्हटले आहे. 'व्यय'ला संहारक म्हटले आहे, महेश म्हटले आहे आणि 'ध्रौवता'ला विष्णु म्हटले आहे. त्यांची या लोकांनी रूपके स्थापित केली. याला एक शोधच माना ना! चांगले करायला गेले पण पुष्कळ काळ लोटला की मग उलटेच होते की नाही होत? म्हणून मग लोकांनी ब्रह्माच्या मूर्त्या स्थापित केल्या.

आणि या लोकांनी तर गीतेची पण मूर्ती बनविली, गायत्री मातेची पण मूर्ती बनविली. काहीच शिल्लक ठेवले नाही! अरे, पण गायत्री मातेची मूर्ती बनवू नका. तो तर एक मंत्र आहे. उत्तम मंत्र आहे. आणि त्या मंत्राला मंत्रासारखेच बोलायचे आहे, त्याची मूर्तीप्रमाणे पूजा करायची नसते. गीता आहे, ती वाचायची आहे, शिकायची आहे, समजायची आहे, त्याऐवजी गीतेची पण मूर्ती बनविली. आणि तिच्या पण पाया पडू लागले! आणि मूर्तीला पाया पडू लागले म्हणून मग कृष्णाला विसरून गेले. कृष्ण भगवंत एका बाजूला राहिले आणि ही मूर्ती आली! अशा प्रकारे लोकांनी सगळे चुकीचे केले.

म्हणजेच याच्या मागे जे रहस्य होते, ते सारे रहस्य मारले गेले, लोकांनी चांगल्या मार्गांनी जावे म्हणून सांगितले होते, पण जेव्हा त्याहून उलटच होत असेल तर ते सर्व खणून काढायला नको का? नवीन फाउन्डेशन (पाया) घालायला नको का?

ही अशी रूपके करायला गेले त्यामुळे सगळे लोक फसले, त्या ऐवजी सायंटिफिक पद्धतीने 'जसे आहे तसे' ठेवले असते तर काय वाईट झाले असते? त्यात काय चुकीचे होते? मध्ये ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांना आणायची काय गरज होती?

**प्रश्नकर्ता :** पण दादा, ती कल्पना पण अशी बनवून ठेवली आहे की कितीतरी वर्षांपासून ही कल्पना चालत आली आहे.

**दादाश्री :** आणि त्यामुळे मूळ वस्तू सापडत नाही. म्हणूनच मी त्या मूळ वस्तूला शोधून परत लोकांपुढे ठेवायला सुरुवात केली आहे.

म्हणजेच या तत्त्वांच्या ज्या अवस्था आहेत, त्याची ही रूपके ठेवली आहेत. लोकांनी विसरू नये म्हणूनच रूपके ठेवली. पण लोक असे समजले की हेच सर्व चालविणारे आहेत. विष्णु चालवतात, अमुक चालवितात, तर मग आपले किती *उपरी* (वरिष्ठ) झाले?

**प्रश्नकर्ता :** तीन.

**दादाश्री :** नाही, नाही, तीन नाही, कितीतरी आहेत. मग यमराज पण *उपरी* झाले! ठीकठिकाणी *उपरी*! मग तर माणूस बिचारा घाबरणारच ना? माणूस घाबरलेलाच दिसणार नाही का?

म्हणून मी म्हणालो की वरती कोणीही *उपरी* नाहीच. तेव्हा आता ही सर्व उपाधी सोडा. तुमच्या चुका आणि तुमचे ब्लंडर्सच तुमचे *उपरी* आहेत. तुम्हाला समजले नाही, यात ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर काय करणार?

म्हणजे वस्तूचा स्वभाव आहे - उत्पाद, व्यय आणि ध्रौव! तिथे सिद्धक्षेत्रात सिद्ध भगवंतांना हे संपूर्ण जग उत्पाद, व्यय आणि ध्रौवने दिसत राहते. मूळ गुणांनी दिसत नसते तर उत्पाद, व्यय, ध्रौवने दिसते.

म्हणजे या अवस्था उत्पन्न होतात. म्हणून उत्पाद, व्यय आणि ध्रौव असे लिहिले आहे. आणि त्याला परत दुसऱ्या शब्दांतही लिहिले आहे, उत्पन्नेवा, विघ्नेवा, ध्रुवेवा.

अर्थात या जगात ब्रह्मा, विष्णु आणि महेश ही सर्व रूपके आहेत. काही काळ या रूपकांमुळे खूप फायदा झाला. पण तीच रूपके आज नुकसानकारक झाली आहेत. म्हणून आम्हाला आता ही रूपके काढून टाकायची आहेत, बाबा रे, ब्रह्मा, विष्णु आणि महेश असे कोणीच नाही.

तू आहेस आणि भगवंत आहेत, दोनच आहेत. आणखी कोणीच नाही. आणि यमराज असे पण कोणी नाही. या सर्व निरर्थक गोष्टी तू तुझ्या मनातून काढून टाक. हे मी 'जसे आहे तसे' सांगू इच्छित आहे. कारण आता रूपकांची काय गरज आहे? रूपकांची गरज केव्हा होती? जेव्हा लोक गाय पाळत आणि दूध पिऊन परत ध्यानाला बसत! पण तेव्हा त्यांची बुद्धी 'कल्चर्ड' (विकसित) नव्हती. तो काळ चांगला होता त्यामुळे हवी ती वस्तू आपोआप घरी मिळत असे. तर मग अशा वेळी लोकांची बुद्धी 'कल्चर्ड' होईल का? आणि आता तर साखर मिळत नाही, चांगले तूप मिळत नाही, हे मिळत नाही, ते मिळत नाही, त्यामुळे आता बुद्धी 'कल्चर्ड' झाली आहे. कोणत्याच काळात अशी 'कल्चर्ड' बुद्धी नव्हती. पण ही विपरीत बुद्धी आहे. तिला 'सम्यक्' करणारे हवेत. त्याच विपरीत बुद्धीला ज्ञानी सम्यक् करतात. प्रकाश आहे पण त्याचा उपयोग चुकीच्या मार्गासाठी केला जात आहे. त्याचा योग्य मार्गावर उपयोग करतील, असे करून देणारे हवेत. आता तर लोक खूप विचार करणारे झाले आहेत. पूर्वी असे विचार करणारे लोक नसत. आणि सत्ययुगात तर विचार करण्याची वेळच आली नाही. सत्ययुगात प्रत्येक गोष्ट घरी बसल्याबसल्या मिळत होती, मग तेव्हा कसला विचार करायचा? आता कलियुगातच खरोखर विचार करावा लागतो.

ही सगळी बनावट आहे. या जगात असा कोणीही जन्माला आला नाही की ज्याला संडासला जाण्याची ही स्वतंत्र शक्ती असेल. ही तर सर्व रूपके निर्माण केली आहेत. म्हणजेच या सर्व लिहिलेल्या गोष्टी पूर्णपणे खोट्या आहेत. जे बुद्धीला समजत नाही तर ते चुकीचे आहे असे समजावे. लोकांच्या बुद्धीला हे का पटते? याचे कारण 'आता आपल्या लोकांची बुद्धी विपरीत झाली आहे.' फॉरेनच्या सायंटिस्ट्सनां विचारा ना, त्यांची बुद्धी चोख असते. आणि आपल्या लोकांची बुद्धी कशी असते? तर रूढिवादी. फॉरेनचे लोक म्हणतात की या प्रमाणे हे असे होऊच शकत नाही. माझी बुद्धी पण सुरुवातीपासून रूढिवादी नव्हती, म्हणून लगेच माझ्या लक्षात येत असे की हा सगळा चुकीचा गोंधळ निर्माण केलेला आहे. मी तर जर एखादी गोष्ट बरोबर असेल

तर तिला लगेच बरोबर म्हणतो. आणि आता मी ज्या पदावर बसलो आहे, त्या पदावर बसून मी काय सांगितले पाहिजे? तर जे 'आहे' त्याला 'हो' म्हटले पाहिजे आणि जे 'नाही' त्याला 'नाही' असे म्हटले पाहिजे. जर मी 'नाही' असे म्हटले नाही तर लोक चुकीच्या मार्गाने जातील. कोणी विचारलेच नाही तर हरकत नाही. परंतु जर कोणी विचारले तर मात्र मला सांगावे लागेल की हे बरोबर आहे की नाही.

पाहा ना, यमराजाबद्दल मनावर ठसवलेच आहे ना? असे कोणी नाहीच, यमराज नावाचा कोणी नव्हताच. ते तर नियमराज होते. असे सगळे चुकीचे ठसवले गेले आहे.

जे जे राजमहाल आपण बनविले होते ते सर्व आता जुने झाले आहेत, म्हणून ते चुकीचे फळ देत आहेत. म्हणून त्यांचा आता 'डिमॉलिशन' करा (पाडून टाका). कारण ते चांगले फळ कुठपर्यंत देतात? तर नवे नवे असतात तोपर्यंत. त्यानंतर मग मध्यम प्रकारचे, मग त्याच्या अर्ध मध्यम प्रकारचे आणि शेवटी वाईट फळ देतात. तर सध्या ते वाईट फळ देत आहेत. म्हणून ते पाडून टाका.

उदाहरणार्थ नवीन घर असेल तोपर्यंत थोडा काळ ते मदतरूप असते, पण ते जसेजसे जुने होते तेव्हा डोक्यावर पडायला लागते की नाही? त्याचे खांब पडतात, कौले पडतात, जमिनीवरच्या फरशा उखडतात. तर सध्या अशी परिस्थिती झाली आहे. म्हणजे मदत मिळायची गोष्ट तर सोडूनच द्या, कित्येक वर्षे यापासून मदत तर मिळेनाशी झाली आहे. उलट लोकांना गोंधळून टाकले आहेत. आता याला काही अर्थ नाही.

आता जर आम्ही विचारले की ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर कोण आहेत? तर ते म्हणतील 'अहो, हे तर देवच आहेत ना?' त्यांना हे समजणारच नाही. 'ज्ञानी पुरुषां'शिवाय हे कोणी स्पष्ट करू शकत नाही. म्हणजे जर बुद्धीजन्य ज्ञानापासून मुक्त असेल तरच गोष्टी स्पष्ट होतील. नाहीतर बुद्धीजन्य ज्ञानाने याचे स्पष्टीकरण होणारच नाही, आणि जग तर बुद्धीजन्य ज्ञानातच अडकून पडले आहे.

म्हणजेच या अशा सर्व गोष्टी न समजल्यामुळे भ्रम घुसला आहे.

**प्रश्नकर्ता :** माझा भ्रम दूर झाला.

**दादाश्री :** हो, बरोबर आहे. आणखी काही विचारायचे असेल तर विचारा. इथे तुम्ही काहीही विचारू शकता.

## मोक्ष म्हणजे स्व-गुणधर्मात प्रवृत्त होणे

**प्रश्नकर्ता :** ज्याला मोक्ष म्हणतात तो नेमका काय आहे ते समजावून सांगा.

**दादाश्री :** मोक्ष म्हणजे स्वतः स्वतःच्या गुणधर्मात येणे, स्वतःच्या स्वभावात येणे. आणि स्व-स्वरूपात राहून निरंतर सनातन सुखात राहणे, यालाच मोक्ष म्हणतात!

## 'ज्ञानी'कडून करेक्टनेस समजून घ्या

**प्रश्नकर्ता :** काही मतावलंबी लोक असे पण म्हणतात की तुम्हाला तिथे मोक्षात कशाला जायचे आहे? तिथे स्वतंत्र सुख नसते. असे टोमणे मारतात.

**दादाश्री :** ते तर चरम स्थितीवर धूळ उडवत आहेत. त्यांचे स्वतःचे दुकान चालू ठेवण्यासाठी ते अशी धूळ उडवत आहेत. 'करेक्टनेस' (खरे) काय आहे त्याचा शोध मी केला आहे. मी शोध करत करत आलो आहे, आणि संपूर्ण शोध करून आलो आहे.

म्हणजेच असे बोलणारे जर इथे आले ना, तर तेच म्हणतील, 'साहेब, मला मोक्ष द्या.' कारण त्यांचे मत बदलण्यास वेळच लागणार नाही! मत तर सैद्धांतिक असायला हवे.

**प्रश्नकर्ता :** तो तर तुमचा प्रताप आहे ना!

**दादाश्री :** नाही, असे नाही. पण यात चूक असेल तर चालणार नाही. खरे असेल तर सर्वांना कबूल करावेच लागेल. जे खरे असेल, त्याला कोणी अडवू शकणार नाही. त्यांचे चुकीचे आहे म्हणून त्यांना ते सोडून द्यावे लागेल ना!

तरी पण हे तर जग आहे, म्हणून ते लोक जे काही बोलतात, ती त्यांची डेव्हलपमेंट आहे. परंतु जर त्यांची इथपर्यंत प्रगती झाली नसेल तर हे क्रियाकांड वगैरे सर्व होणार नाही, आणि बुद्धी वाढणार नाही. बुद्धी वाढल्यानंतर जळजळ (आग, संताप) वाढत जाते. आणि जळजळ वाढल्यावरच मोक्षाची गरज वाटते.

जेवढी माणसाची बुद्धी वाढते, तेवढ्या प्रमाणात त्याच्या 'काउंटरवेट'मुळे जळजळ वाढत जाते. हो, वेदांत वगैरे सर्व बुद्धी वाढविण्याची साधने आहेत. ते सर्व बुद्धीला डेव्हलप करत राहतात. आणि जेव्हा बुद्धी वाढते तेव्हा मग जळजळ उत्पन्न होते. तेव्हा त्याला वाटते 'आता कुठे जावे?' तर 'वीतरागींकडे जा.' पण भगवंतानी दोघानांही स्वीकारले आहे. वेदांतमार्गाने किंवा जैनमार्गाने दोन्ही मार्गांनी समकित प्राप्त होऊ शकते. दोन्ही मार्गांनी, स्वत:च्या स्वतंत्र मार्गात राहून समकित प्राप्त होऊ शकते.

## आत्म्याचे बंधन

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मा स्वत:च स्वतंत्र आणि मुक्त आहे, सच्चिदानंद आहे का?

**दादाश्री :** आत्मा स्वतंत्र नाही. तुम्हाला असे कोणी सांगितले की आत्मा स्वतंत्र आहे?

**प्रश्नकर्ता :** शास्त्रे असे सांगतात की आत्मा स्वतंत्र आहे.

**दादाश्री :** नाही. सच्चिदानंद स्वरूप आहे, पण स्वतंत्र नाही. म्हणून तर अशी दशा झाली आहे. जर स्वतंत्र असता तर आताच मुक्ती झाली असती ना? वेळच लागणार नाही. सध्या तर तो बांधला गेला आहे, जर लोखंडाच्या साखळीने बांधला गेला असता तर गॅस कटिंग करून ती साखळी तोडून टाकली असती. पण तो तर अशा साखळीने बांधला गेला आहे की जी तुटूच शकत नाही. आणि ती साखळी पण कशी आहे? कवीने काय लिहिले आहे? 'अधातु साखळीने परमात्मा

बंदीवान' अधातु साखळीने म्हणेज या प्रकृतीच्या साखळीने परमात्मा बांधला गेला आहे.

आत्मा 'स्वतंत्र' आहे हे कशातून वाचून म्हणत आहात? तुम्ही जी पुस्तके वाचता ती 'सर्टिफाइड' आहेत की दुसरी 'अनसर्टिफाइड' पुस्तके वाचता?

**प्रश्नकर्ता :** पण शास्त्रे तर असेच म्हणतात की आत्मा स्वतंत्र आहे आणि मुक्त आहे.

**दादाश्री :** कोणी असे म्हणत नाही. स्वतंत्र असता तर मोक्षाचा, मुक्तीचा मार्गच कसा काय राहिला असता? त्या शास्त्रांना म्हणावे 'तुम्ही ही अशी पुस्तके कशासाठी बनलात?' तुमची येथे गरजच काय? आत्मा स्वतंत्र नाही, म्हणून बंधनातून सोडविण्यासाठी तुम्हा सर्वांचा जन्म झाला आहे. आत्मा जर स्वतंत्र असता तर मग शास्त्रांची गरजच पडली असती का?

जे असे म्हणतात की 'आत्म्याला बंधन नसते', त्यांच्यासाठी 'मोक्ष पण नाही' असे आपण म्हणू शकतो, आणि जे असे म्हणतात की आत्मा बंधनात आहे, त्यांच्यासाठी मोक्ष पण आहे असे म्हणावे लागेल. यात काहीही विरोधाभास नाही. तुम्हाला समजले ना? जे असे मानतात की आत्म्याला बंधन नसते, तर मग त्यांना मोक्षाची गरजच नाही. कारण आत्मा मोक्षातच आहे. पण मोक्ष स्वरूप काय आहे ते नीट समजले पाहिजे.

काही जण असे म्हणतात की 'आत्म्याला बंधनच नाही.' ही गोष्ट तर खरी आहे परंतु जर आत्म्याला बंधन नाही तर मग तुम्ही देवळात का जाता? शास्त्र का वाचता? चिंता कोणाला होते? हा सर्व तर विरोधाभासच आहे ना? 'आत्म्याला बंधन नाही' ही गोष्ट तर शंभर टक्के खरी आहे, पण कोणत्या अपेक्षेने हे बोलायचे आहे? ही तर निरपेक्ष गोष्ट आहे. आत्म्याला ज्ञानभावाने बंधन नसते, अज्ञान भावाने बंधन असते. जर तुम्हाला 'मी शुद्धात्मा आहे' अशा ज्ञानभाव झाला तर

'तुम्हाला' बंधन नाही. आणि जोपर्यंत 'मी चंदुभाई आहे' असा भाव आहे तोपर्यंत बंधनच आहे.

तुम्हाला जे जे दु:खदायी वाटते त्याला बंधनच म्हणतात. नाहीतर जगातील लोकांना तर 'मी बंधनात आहे' असे बंधनाचे ही भान नाही.

कोणत्याही जीवाला बंधन पसंत नसते. तुम्हाला बंधन पसंत आहे का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** तरी पण कशात राहावे लागते?

**प्रश्नकर्ता :** बंधनात.

**दादाश्री :** संपूर्ण दिवस बंधनातच राहावे लागते. जीवमात्र बंधनातच अडकलेले आहेत. आमच्यासारखे 'ज्ञानी पुरुष' मुक्त असतात, पण जगात ते क्वचितच कधी एखादेच असतात. नाहीतर जगात 'ज्ञानी' नसतातच ना! 'ज्ञानी पुरुष' मुक्त असतात, म्हणजेच ते स्वत: कोणत्याच प्रकारच्या बंधनात नसतात. म्हणून त्यांना बोजा वाटत नाही, भीती वाटत नाही, कोणत्याही गोष्टींचा त्यांना स्पर्श होत नाही. आणि 'स्वत:ला'ही असेच बनण्याची गरज आहे. पण ते तर जेव्हा 'ज्ञानी पुरुष' असतील तेव्हा त्यांच्याद्वारेच असे होणे शक्य आहे. 'ज्ञानी पुरुष' तर हजारो वर्षांपर्यंत नसतातच. क्वचितच कधी 'ज्ञानी पुरुष' असतात, तेव्हा मुक्त होता येते.

## मोक्षदाता मिळाल्यावर मोक्ष

**प्रश्नकर्ता :** मोक्ष ही आशेची निष्पत्ती आहे, असे म्हणू शकतो का?

**दादाश्री :** नाही, मोक्ष तर स्वत:चा स्वभावच आहे.

**प्रश्नकर्ता :** पण मग बहुतेक सर्व लोकांनी वारंवार मोक्षप्राप्तीचेच मार्ग का दाखविले आहेत?

**दादाश्री :** खरे तर यात असे आहे की ते त्यांच्या भाषेतील मोक्षाबद्दल बोलत आहेत. नाहीतर मोक्षाची कोणाला पर्वाच नाही सगळ्यांना 'हमकु क्या? हम कौन?' असेच हवे आहे. आणि जर कोणी खरा पुरुष निघालाच तर त्याला हा मोक्षाचा मार्ग सापडल्याशिवाय राहणारच नाही. ह्यांच्या दानतमध्येच काही ना काही खोट आहे, आणि हे सगळे मान-पानात आणि 'हम'मध्ये (अहंकारात) गुंतले आहेत, म्हणून तर कसलीच प्राप्ती केलेली नाही.

'हम' म्हणजे अहंकार, जर हा अहंकार संपला ना, तर भगवंत होऊन जाईल.

**प्रश्नकर्ता :** मोक्ष मागितल्याने मोक्ष मिळतो का?

**दादाश्री :** मागितल्याने सर्व काही मिळते, पण मोक्षदाता असेल तरच. मोक्षदाते असायला हवेत, आणि ते स्वतः मोक्षात राहत असतील तरच, नाहीतर बाहेर इतर कोणाबरोबर मोक्षाबद्दल बोलताच कामा नये. तिथे धर्माबद्दल बोलावे, ते तुम्हाला चांगल्या धर्माकडे घेऊन जातील.

**प्रश्नकर्ता :** मोक्षदात्यांना कुठे शोधावे?

**दादाश्री :** इथे 'हे' एकटेच आहेत. तुम्हाला जेव्हा यायचे असेल तेव्हा या. नाहीतर तुमच्या मित्राला मोक्ष मिळाल्यानंतर या. त्याला 'स्वाद' (अनुभव) आल्यावर त्याला विचारून या.

## मोक्ष प्राप्तीचा भाव कोणाचा?

**प्रश्नकर्ता :** मोक्ष तर जीवाचा करायचा असतो ना?

**दादाश्री :** जो बांधलेला आहे, त्याचा मोक्ष करायचा आहे.

**प्रश्नकर्ता :** बांधलेला आहे तो कोण आहे?

**दादाश्री :** जो भोगतो तो, जो बंधनावस्था भोगतो तो बांधलेला आहे.

**प्रश्नकर्ता :** 'पर्टिक्युलरली' (विशेषकरून) त्याचे नाव काय आहे?

**दादाश्री :** बंधन अवस्था कोण भोगतो?

**प्रश्नकर्ता :** जीवच भोगतो ना?

**दादाश्री :** तुम्ही भोगत नाही का?

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हणजे कोण?

**दादाश्री :** तर मग कोण भोगतो? जीव? आणि तुम्ही पाहत राहता का? तोंडाने तर असेच बोलता ना की 'मी भोगत आहे.'

**प्रश्नकर्ता :** मी म्हणजे कोण? हा प्रश्न आहे.

**दादाश्री :** तोच, अहंकार.

**प्रश्नकर्ता :** अहंकार, तो तर जीवाचेच स्वरूप आहे ना?

**दादाश्री :** जीवाला एका बाजूला ठेवा. जीवाला काय देणेघेणे? जीव तर वस्तू नाही ना! जीवात्मा हे तर आत्म्याचे विशेषण आहे, म्हणजे बाबा रे, असा अहंकार असेल तोपर्यंत तू जीवात्मा आहेस. अहंकार संपला की आत्मा मुक्तच आहे. पण अहंकार कमी झाला आणि स्वत:च्या स्वरूपाचे भान झाले तर अंतरात्मा झाला आणि अंतरात्मा झाल्यानंतर मग परमात्मा होतो.

**प्रश्नकर्ता :** तर मग मोक्ष प्राप्त करण्याचा भाव, हा कोणाचा भाव आहे?

**दादाश्री :** मोक्ष प्राप्त करण्याचा भाव तर जो बांधला गेला आहे त्याचा आहे. जो बांधला गेला आहे, त्यालाच मुक्त होण्याची इच्छा आहे. म्हणजेच हा अहंकाराचा भाव आहे. आत्म्याचा तसा भाव नाही. आत्मा तर मुक्तच आहे ना!

**प्रश्नकर्ता :** आत्मा भोक्ता नाही, तर मग तो कशापासून सुटकेची इच्छा करत असतो?

**दादाश्री :** सुटकेचा भाव आत्म्याचा नाही. तो मुक्तच आहे. हा जो बांधला गेलेला आहे त्याला सुटायचे आहे. जो बांधला गेलेला आहे, तो भोक्ता आहे आणि तो कर्ताही आहे. जो कर्ता आहे, तो भोक्ता आहे, आणि तोच मुक्तीची इच्छा करीत आहे.

त्याचे असे आहे की हे बंधन पण अहंकारानेच निर्माण केले आहे आणि मुक्ती पण अहंकारच शोधत आहे. कारण अहंकाराला आता सहन होत नाही. 'त्याला' असे वाटले होते की यातून काहीतरी स्वाद (सुख) येईल पण तसा काहीच स्वाद आला नाही. म्हणून परत तो आता मुक्ती शोधत आहे. नाहीतर आत्मा तर मुक्तच आहे, स्वभावानेच मुक्त आहे. 'आत्मा स्वभावानेच मुक्त आहे.' एवढेच जरी 'त्याला' समजले की बस, त्याचे काम झालेच म्हणून समजा.

## ... आणि आवागमन पण अहंकाराचेच

**प्रश्नकर्ता :** आणि आत्मा तर अजन्मच आहे ना?

**दादाश्री :** हो, 'आत्मा' स्वभावानेच अजन्म आहे आणि 'स्वत:' पण अजन्मच आहे. परंतु जेव्हा 'स्वत:' 'आत्मरूप' होईल तेव्हा 'स्वत:' अजन्म होईल. पण 'स्वत:' तर चंदुलाल झाला म्हणून ही 'टेम्पररी ॲडजेस्टमेन्ट' मिळाली आहे. शरीराचा मालक बनला आणि मानले की 'मी चंदुलाल आहे' आणि हे शरीर पण 'मीच आहे', असे मानले त्यामुळे जेव्हा 'हे' शरीर मरते तेव्हा 'आपल्यालाही' त्याच्याबरोबर मरावे लागते.

**प्रश्नकर्ता :** आत्मा अजन्म-अमर आहे, तर हे आवागमन (येणे-जाणे) कोणाचे?

**दादाश्री :** आत्मा अजन्म-अमर आहे आणि शुद्धच आहे. फक्त त्याच्यावर या पाच तत्त्वांचा परिणाम झाला आहे आणि त्या परिणामातून जर तो मुक्त झाला तर तो मुक्तच आहे. तो अजन्म-अमरच आहे. जेव्हा तो स्वत:चे स्वरूप ओळखील तेव्हा आवागमनाचे फेरे बंद होतील.

**प्रश्नकर्ता :** पण हे आवागमनाचे फेरे कोणाला आहेत?

**दादाश्री :** जो अहंकार आहे ना, त्याला हे आवागमन आहे. आत्मा तर जसा होता तशाच दशेत आहे. आणि मग जेव्हा अहंकार बंद होतो तेव्हा त्याचे हे फेरे पण बंद होतात.

म्हणजेच हे जन्म-मरण आत्म्याचे नाहीत. आत्मा तर 'पर्मनन्ट' वस्तू आहे. हे जन्म-मरण अहंकाराचे आहे. 'अहंकार', तो स्वतःच जन्म घेत असतो. आणि परत डॉक्टर साहेबांना म्हणतो 'साहेब, मला वाचवा, मला वाचवा.' अरे, तू 'पर्मनन्ट' नाहीस का? तेव्हा म्हणतो की, 'नाही, मी तर टेम्परी आहे.' म्हणजे हा सगळा 'अहंकारा'चाच धुमाकूळ आहे. हा 'अहंकार' फक्त 'ज्ञानी पुरुष'च दूर करू शकतात. 'अहंकार' हा अज्ञानाचा परिणाम आहे आणि त्यातून हा संसार उत्पन्न झाला आहे. आमच्यातील 'अहंकार' संपूर्णपणे संपला आहे.

**प्रश्नकर्ता :** अहंकार आणि आत्मा हे सर्व एकत्र कसे आले, ते अजूनही समजत नाही.

**दादाश्री :** हा फक्त विशेष परिणामच आहे.

## आत्मस्वरूपाला दुःख नसतेच

**प्रश्नकर्ता :** माणूस स्वर्गात जावो वा नरकात जावो, पण तिथेही आत्मा सुख आणि दुःख यापासून वेगळाच राहणार ना?

**दादाश्री :** आत्मा तर वेगळाच राहतो पण त्यापासून आपल्याला काय फायदा? जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत तो सुख आणि दुःख भोगत असतो, आणि दुःख त्याला आवडत नाही.

**प्रश्नकर्ता :** पण आत्म्याला तर काही होत नाही ना, असे मला विचारायचे होते.

**दादाश्री :** असे आहे की समजा तुमच्याजवळ सोन्याचे नाणे आहे, मग ते तुम्ही कुठेही ठेवा त्याला कधीच गंज लागणार नाही. परंतु जर ते नाणे हरवले तर त्या नाण्याला दुःख होत नाही, पण तुम्हाला दुःख होते की नाही? त्याच प्रमाणे आत्म्याला काहीच दुःख नसते. हा

जो अहंकार आहे त्याला दु:ख होते. हा अहंकार निघून गेला की तो आत्मा झाला, आणि अहंकार आहे, तोपर्यंत तो आत्मा नाही.

**प्रश्नकर्ता :** वरच्या उदाहरणात सोन्याचे नाणे आणि मी, दोघेही वेगवेगळे आहोत ना, पण काय यातही असे वेगवेगळेच असतील का?

**दादाश्री :** हेही वेगवेगळेच आहेत. पण ते तुम्हाला दिसत नाही. ज्याप्रमाणे तुम्हाला नाणे वेगळे दिसते त्याप्रमाणेच आम्हालाही 'आत्मा' वेगळाच दिसतो.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्मा देहात असतानाही तो मोक्षात आहे, असे आपण म्हणू शकतो का?

**दादाश्री :** हो, तो मुक्तच असतो. पण आम्ही जेव्हा हे 'ज्ञान' देतो, तेव्हा त्या ज्ञानामुळे स्वत:च्या मुक्ततेचे भान होते. नाहीतर आत आत्मा स्वत: मुक्त आहेच, त्याला काहीच दु:ख नसते. पण हे दु:ख कोणाला आहे? तर अहंकाराला. तो गेला की दु:ख पण गेले. अहंकारानेच हे सर्व उत्पन्न केले आहे, भगवंतांपासून वेगळा झाला आहे, भेद निर्माण केला आहे. हा अहंकार गेला तर मग दु:ख राहणारच नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्म्याचे स्थान कुठे असते?

**दादाश्री :** आत्मा स्वत:च मोक्षस्वरूप आहे. त्याचे स्थान इतर कुठे नाही. त्याचा स्वत:चा स्वभावच मोक्ष आहे. विभाव दशेमुळे हे सर्व उत्पन्न झाले आहे.

उदाहरणार्थ हे सोने, याचा स्वभावच असा आहे की लाखो वर्षे ते ठेवले तरी त्याच्या स्वभावात फरक पडत नाही. याउलट सोने आणि तांबे दोघे एकत्र आले, त्यांचे मिश्रण झाले तर त्याच्यात बदल होतो.

**प्रश्नकर्ता :** 'मोक्ष प्राप्त केला' म्हणजे नक्की काय? आत्म्याचे कार्य इथे पूर्ण झाले का?

**दादाश्री :** आत्म्याचे कार्य तर पूर्णच आहे. जो बांधला गेलेला

होता, तो मुक्त झाला. जो बंधनात होता, ज्याला दुःख वाटत असे, त्याचे दुःख गेले, तो स्वतः मुक्त झाला.

जो अहंकार आत्म्यापासून वेगळा झाला होता, तो अहंकार स्वतःच्या स्वरूपात विलीन झाला. म्हणजे काम झाले. वेगळा झाला होता म्हणून दुःख भोगत होता. समज नसल्यामुळे वेगळेपणा करून ठेवला होता, भेद निर्माण झाला होता. लोकांनी त्याला नाव दिले चंदु, तर त्या नावात 'स्वतः' तन्मयाकार झाला होता. म्हणून 'त्याचे' काम संपले. 'आत्मा' तर अविनाशी आहे. त्याचे काम तर झालेलेच आहे. पण तो येथून कधी मुक्त होईल? तर जेव्हा ही भेदबुद्धी समाप्त होईल, तेव्हा तो मुक्त होईल.

**प्रश्नकर्ता :** मुक्त झाल्यानंतर तो काय करतो?

**दादाश्री :** मग त्याला सिद्धगती प्राप्त झाली. तिथे तो निरंतर परमानंदात राहील. हा देह असेपर्यंत त्याला ओझे वाटत राहते. या देहाचे पण ओझे आहेच. ज्या देहाने सुखे भोगायची नसतात, तो देह ज्ञानींसाठी ओझ्यासारखा असतो. पण गत्यंतरच नाही ना! जोपर्यंत त्याची 'डिस्चार्ज लिमिट' असते, तोपर्यंत सुटका होऊच शकत नाही ना!

## द्वंद्वामुळे बंधने झाली

**प्रश्नकर्ता :** आत्मा मोक्षाला जातो, त्यानंतर तो देह धारण करत नाही, पण प्रत्येक आत्मा तर मोक्षातच आहे ना?

**दादाश्री :** नाही, असे नाही. अनंत आत्मे या प्रकारे संयोगात अडकलेले आहेत. ते मोक्षात जाण्यासाठी, स्वतःच्या स्वभावात येण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पण हा जो अनात्मा आहे, तो त्याला स्वभावात येऊ देत नाही. आणि अनात्मा पण पहिल्यापासून असाच्या असाच आहे. म्हणजेच हे सर्व आत्मे काही मोक्षात पोहोचलेले नाहीत.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्म्याने अजून कधी मोक्ष पाहिलेलाच नाही का?

**दादाश्री :** हो, पाहिलेलाच नाही. नाहीतर 'स्वत:चा' स्वभावच मोक्ष आहे. पण हे संयोग कसे आहेत? तर द्वंद्वरूप आहेत. हा जो जड विभाग आहे, अनात्म विभाग आहे, तो द्वंद्वरूपात आहे. द्वंद्वे म्हणजेच फायदा-नुकसान, सुख-दु:ख, राग-द्वेष, तर या सर्व द्वंद्वांच्या स्वभावाचे आरोपण तो स्वत:च स्वत:वर करत असतो, म्हणून त्याला बंधन राहते. या संयोगांचा दबाव कमी झाला की त्याला 'ज्ञानी पुरुष' भेटतात, निमित्ते भेटतात. तेव्हा त्याला मोक्ष मिळतो. नाहीतर असाच मोक्ष होत नाही. तरीही सर्वच आत्मे मोक्षाच्या दिशेनेच जात आहेत. पण नंतर जशी निमित्ते मिळतील, त्याप्रमाणे तो फेरे घालतो. येथे माणसातच त्याला पुन्हा-पुन्हा फेरे घालावे लागतात. किंवा मग जिथे फेरे घालावे लागतील तिथे. त्याला जर वाकडे निमित्त भेटले तर ते त्याला नरकगतीतही घेऊन जाते किंवा पशुयोनीतही घेऊन जाते.

## परंतु मोक्ष प्राप्त केला तरच हा मनुष्यदेह कामाचा

**प्रश्नकर्ता :** मोक्ष प्राप्त करण्यासाठी या देहरूपी साधनाची गरज आहे का?

**दादाश्री :** मनुष्य देहच मोक्षप्राप्तीचे सर्वात मोठे साधन आहे. मोक्ष तर देवगतीतही होऊ शकत नाही, जनावरगतीतही होऊ शकत नाही. इतर कुठल्याही योनीत होऊ शकत नाही. फक्त मनुष्यजन्मच असा आहे की ज्यातून पाचही गतीत जाणे शक्य आहेत.

## सर्व आत्म्यांचा मोक्ष शक्य आहे का?

**प्रश्नकर्ता :** सर्व आत्मे पूर्ण श्रेणीत कधी पोहोचतील?

**दादाश्री :** सर्व आत्मे जर मोक्षात पोहोचले तर मग येथे संसार राहणारच नाही. तर काय तुमची इच्छा संसाराचा नाश करण्याची आहे का? तुमची इच्छा काय आहे?

**प्रश्नकर्ता :** आत्म्यात तर ज्ञान आहे, तर मग हळूहळू ते मोक्षाला जाऊ शकतील अशा श्रेणीत येतात ना?

**दादाश्री :** हो, श्रेणीत येतात. त्या श्रेणीत ते येतातच, आणि मोक्षातही जात आहेत. परंतु जर तुम्ही असे म्हणालात की जर सर्व जगातील सर्व आत्मे मोक्षात गेले, तर ही तर तुम्ही या संसाराच्या नाशाची भावना केली की हा संसार न राहो. पण हा संसार तर आत्म्याची डेव्हलपमेंट करणारा आहे. मूळ आत्मा तर डेव्हलप झालेलाच आहे, 'आत्मा' स्वतः तर पूर्णच आहे, पण सध्या अशी श्रेणी उत्पन्न झाली आहे की ते सर्व आपापल्या पौद्‌गलिक मान्यतेत स्थिरावले आहेत. त्या मान्यता दूर होत, होत, होत, होत, त्यांच्यात जेव्हा मूळ चैतन्य स्वरूपाची भावना उत्पन्न होईल, तेव्हा त्यांची पूर्णाहुती होईल.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे कोणी आत्मा मोक्षात पोहोचूच शकत नाही?

**दादाश्री :** अरे, मोक्षात तर खूप जण पोहोचू शकतात. मी आत्ताही मोक्षातच आहे ना!

**प्रश्नकर्ता :** असे होऊ शकते का की सर्व आत्मे एकदम मोक्षात जातील, असे शक्य आहे का?

**दादाश्री :** आई आणि मुलगा कधी एका वयाचे होऊ शकतील का? ज्या दिवशी आई आणि मुलगा एका वयाचे होतील त्या दिवशी पूर्ण जग मोक्षाला जाईल.

असे आहे की 'संपूर्ण जग मोक्षात जावो' अशी भावना करण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण ते रूपकात कधीच येणार नाही. ते रूपकात कधी येईल? तर जेव्हा आई आणि मुलगा एकाच वयाचे होऊ शकतील तेव्हाच.

एक व्यक्ती मला म्हणाली की 'पूर्ण जगालाच मोक्षात घेऊन जा ना?' मी त्याला म्हटले जर या जगातील सर्व लोक 'वॉरिअर्स' (सैनिक) बनले तर ते कोणावर हल्ला करतील? जगातील सर्व जीव जर डॉक्टर्स झाले तर ते कोणावर उपचार करतील? जगातील सर्व जीव जर न्हावी झाले तर ते कोणाचे केस कापतील? आणि सगळेच सुतार झाले तर

कोणाचे काम करतील? तेव्हा तो म्हणाला 'समजले, समजले, पुन्हा कधी असे बोलणार नाही.'

निसर्गाचे व्यवस्थापन आहे, म्हणून आम्ही असे म्हणत नाही की पुष्कळ लोकांनी येथे यावे. हे तर त्याचे व्यवस्थापनच आहे की 'व्यवस्थित' रूपाने सर्व येतात. नाहीतर आम्ही सर्वांना पत्रे पाठवली नसती का? पण नाही, हे सर्व हिशोब आपापल्या जागी सेट झालेलेच आहेत. म्हणून आम्हाला ही सर्व उपाधी करायची नसते. आम्ही तर फक्त येथे येतो आणि जातो.

तुम्हाला हे समजले का? हा संसार एका प्रवाहाच्या रूपात आहे, आणि अनादि काळापासून तो वाहतच राहिला आहे. यातील सर्व जीवांचा मोक्ष तर होणारच आहे, लवकर किंवा उशीरा, तो त्याचा क्रमच आहे. क्रम म्हणजे एका समयात एकशे आठ जीव मोक्षात जातच राहिले आहेत, प्रवाहाच्या रूपात!

**प्रश्नकर्ता :** एका समयात एकशे आठ जीव मोक्षाला जातात, तर ते कुठून जातात?

**दादाश्री :** सर्व पंधरा क्षेत्रातून मिळून एकशे आठ जीव मोक्षाला जातात.

उदाहरणार्थ आपल्याकडे पोलिसांची पार्टी जाते. ते चार चारच्या गटाने एकापाठोपाठ एक असे जातच असतात, जणू काही एक प्रवाहच चालला आहे, त्याचप्रमाणे एकशे आठ जीवांचा प्रवाह व्यवहारातून मोक्षात जातो, सिद्धक्षेत्रात जातो. त्याचवेळी तेवढेच दुसरे जीव अव्यवहार राशीतून व्यवहार राशीत येतात. म्हणजेच व्यवहार राशीत एक पण जीव कमी-जास्त होत नाही, एक पण जीव वाढत नाही किंवा कमी होत नाही. व्यवहारवाले जीव कोणाला म्हणतात? तर ज्यांना नाव पडले आहे, असे सर्व जीव व्यवहार जीव आहेत, आणि ज्यांना नाव दिले गेलेले नाही, ते जीव व्यवहारमध्ये आलेले नाहीत. आणि ज्यांचे नाव गेले, ते सर्व सिद्धक्षेत्रात गेले.

## नमो सिद्धाणं, यांची भक्ती ध्येय स्वरूप म्हणून

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हणता ना की वर कोणी बाप नसतो, पण वर सिद्धलोक तर आहे ना?

**दादाश्री :** तो तर सिद्धलोक आहे, सिद्धक्षेत्र आहे आणि जे मोक्षात गेले ओहत ते तर मुक्त झालेले आहेत, ते आपले ऐकतही नाहीत आणि कोणाबद्दल कोणाला सांगत पण नाहीत, कोणाबद्दल *लागणी* ही नाही, काहीच नाही. ते तर आपल्या सुखात मस्त असतात! त्यांचा आपल्याला काहीही उपयोग होत नाही. ते आपल्यासाठी ध्येयरूप आहेत. 'नमो सिद्धाणं' असे आपण म्हणतो ते फक्त ध्येयाच्या रूपाने आहे की 'बाबा रे, आम्हाला अशी दशा हवी आहे.'

**प्रश्नकर्ता :** आपण 'नमो सिद्धाणं' म्हणतो, तर तो नमस्कार त्यांना पोहोचतो का?

**दादाश्री :** त्यांना पोहोचला नाही तरी आपल्या आत जे सिद्ध बसलेले आहेत त्यांना तर पोहोचला. आत जे बसले आहेत ना, तो आत्मा तर सिद्धच आहे ना! आपला मतलब तर कामाशी आहे. आपण तिथे नमस्कार पोहोचवले पाहिजे. आणि आपली जबाबदारी पत्र पोहोचविण्याची आहे की साहेब आम्ही पत्र लिहिले आहे.

## सिद्धांना प्रवृत्ती नसते, तरी पण 'क्रिया' असतात

**प्रश्नकर्ता :** जे सिद्ध झाले आहेत, त्यांना ईश्वर इथे काम करण्यासाठी पाठवितो का?

**दादाश्री :** कोणी पाठवीत नाही. पाठविणार कोणीच नाही. इथे कोणतीही गोष्ट पाठवायची गरजच नाही. कोणाचीही गरज पडत नाही, असे हे जग आहे. तुमचा कोणीच *उपरी* नाही. या जगात कोणत्याही जीवाला कोणीच *उपरी* नसतो. स्वतःच्या चुका आणि ब्लंडर्स याच आपल्या *उपरी* असतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग सिद्धक्षेत्रात त्या सिद्ध भगवंतांची प्रवृत्ती काय असते?

**दादाश्री :** ज्यांची प्रवृत्ती असते त्यांना 'मेकॅनिकल' म्हणतात. आणि ते 'मॅकेनिकल' नाहीत.

**प्रश्नकर्ता :** पण मोक्षाला गेल्यावर तिथे प्रवृत्ती आहे की निवृत्ती?

**दादाश्री :** तिथे निवृत्ती पण नसते आणि प्रवृत्ती पण नसते तरी पण 'ज्ञानक्रिया' आणि 'दर्शनक्रिया' तर असतात. निवृत्ती पण आहे आणि या क्रिया पण आहेत. प्रवृत्ती म्हणता येणार नाही, पण क्रिया तर आहे.

## सिद्धक्षेत्राचा किती हा अद्‌भुतपणा!

**प्रश्नकर्ता :** तर सिद्धक्षेत्रात जे सर्व आत्मे आहेत, ते सर्व स्वत:मध्येच असतात का?

**दादाश्री :** हो, त्यांना इतरांशी काहीच देणेघेणे नसते. त्याचे असे आहे की, या जगात कोणाचेच कोणाशी काही देणेघेणे नसते. आणि जे काही असते ते फक्त निमित्त मात्र असते. मी सुद्धा निमित्तच आहे.

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्रात जेव्हा आम्ही जाऊ तेव्हा तिथे फक्त एकटेच बसूनच राहायचे? आणि पाहतच राहायचे?

**दादाश्री :** बसून राहायचे म्हणजे ते तुमच्या भाषेत आहे तसे नाही. तिथे बसायचे पण नाही, उभे पण राहायचे नाही आणि आडवे पण व्हायचे नाही. तिथे तर अगदी नवीनच प्रकारचे आहे.

**प्रश्नकर्ता :** फक्त पाहतच राहायचे आहे का?

**दादाश्री :** हो, पण ही कल्पना करण्याची गोष्ट नाही. तुम्ही कल्पनेत पाहू इच्छिता अशी ती गोष्ट नाही.

**प्रश्नकर्ता :** ती सिद्धशिला कशी असते?

**दादाश्री :** सिद्धशिला तर अशी जागा आहे की तिथे कर्माला येऊन चिकटावेसे वाटले तरी ते चिकटू शकत नाही आणि इथे मात्र

आपली इच्छा नसली तरी कर्मे येऊन चिकटतात. हे कर्माचे परमाणू निरंतर सर्व ठिकाणी असतात. इथे तर परमाणू तयारच असतात आणि तिथे त्यांच्यावर काहीच परिणाम होत नाही. भगवंत, कायमसाठी तेच पद!

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्रात परमाणू नसतात का?

**दादाश्री :** नाही, तिथे काहीच नसते. सिद्ध भगवंत स्वतः येथील सर्व ज्ञेयांना पाहू शकतात. पण तिथे त्यांच्या क्षेत्रात ज्ञेय नसतात. ते सिद्धक्षेत्र म्हणजे एक प्रकारे सर्व सिद्धांचे राहण्याचे स्थळ आहे, त्याला सिद्धक्षेत्र म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्र ब्रह्मांडात आहे की ब्रह्मांडाबाहेर?

**दादाश्री :** ब्रह्मांडाच्या सीमारेषेवर आहे, शेवटच्या सीमेवर आहे. तुम्ही तुमच्या भाषेत समजता, प्रत्येक जण आपापल्या भाषेत समजतो. पण सिद्धक्षेत्र ब्रह्मांडाबाहेर पण नाही, पण अंतिम सीमारेषेवर आहे.

## अद्‌भुत सिद्धपद, तेच अंतिम लक्ष्य

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्रात जे सिद्धात्मा सिद्ध झाले आहेत, त्यांना प्रत्येकाला 'इन्डिव्हिज्यूअल आयडेन्टिफाय' (प्रत्येकाची स्वतंत्र ओळख) करता येते का?

**दादाश्री :** नाही, असे 'इन्डिव्हिज्युअल' नसते. त्यांना तर स्वतःच्या अस्तित्वाचे, वस्तुत्वाचे आणि पूर्णत्वाचे भान असते की 'मी आहे', बस एवढेच. तिथे 'ते आहेत' असे काहीच नसते. 'मी आहे' एवढेच भान प्रत्येकाला असते, स्वतंत्र भानात, इतर कोणाची गोष्टच नसते, इतर भानगडच नाही. तिथे व्यक्तीभेद नसतो, तिथे परस्परसंबंध नसतात. इथे तर सर्व परस्परसंबंध आहेत, 'रिलेटिव्ह' आहे. आणि तिथे तर 'रिअल' आहे, 'ॲब्सोल्यूट' आहे, तिथे परस्पर असे काहीच नाही. तिथे फक्त स्वतःच्या अस्तित्वाचे भान असते, स्वतःच्या वस्तुत्वाचे भान असते, आणि स्वतःच्या पूर्णत्वाचे भान असते.

**प्रश्नकर्ता :** तिथे सर्वांना सुखच असते ना?

**दादाश्री :** होय, सर्वांना एक समानच सुख असते. वस्तुत्वाचे भानात तर अत्यंत परमानंद असतो.

**प्रश्नकर्ता :** सिनेमा थिएटर जसे हाऊसफुल होऊन जाते तसे सिद्धक्षेत्र पण हाऊसफुल होऊ शकते का?

**दादाश्री :** ही आपली कल्पना आहे. ते एवढे विशाल आहे की तिथे अनंत सिद्ध असूनसुद्धा अजूनही तिथे अनंत सिद्ध जातच राहतील. तिथे तर सर्वच अनंत आहे.

**प्रश्नकर्ता :** या जगात जड तत्त्व असेल तरच आत्मा राहू शकतो, नाहीतर आत्मा एकटा राहू शकत नाही ना?

**दादाश्री :** हे बरोबर बोललात. या जगात आत्मा एकटा राहूच शकत नाही. केवळ सिद्धगतीतच सर्व आत्मा एकटेच असतात.

**प्रश्नकर्ता :** सिद्धगती सोडून इतर जी परिस्थिती असते, तिथे आत्मा एकटा राहू शकत नाही ना?

**दादाश्री :** हो, हे बरोबर आहे.

**प्रश्नकर्ता :** नाहीतर मग असेही होईल की मोक्षात गेल्यानंतर परत हे सगळे मिळेल. असे होऊ शकते का?

**दादाश्री :** नाही, असे काहीही होत नाही. त्याचे कारण काय आहे की इथे जे काही असे घडते याचे कारण येथील सर्व संयोग आहेत. या लोकात असे संयोग आहेत, म्हणून असे होते. पण तिथे असले कोणतेच संयोग नाहीत. म्हणून असे होणारच नाही, पुन्हा असे काही मिळणारच नाही.

दोन वस्तू जेव्हा एकत्र असतात तेव्हा आपापल्या गुणधर्मांचा त्याग केल्याशिवाय विशेष गुणधर्म तिथे उत्पन्न होतात. ते विशेष गुणधर्म, तोच हा संसार आहे. आता जर सिद्धक्षेत्रात देखील पुद्‌गल असते ना, तर मग तिथेही असा विशेष भाव निर्माण झाला असता. पण तिथे पुद्‌गल नसतेच.

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्रात आत्म्याला अवगाहना पडली आहे (जितक्या जागी आत्मा विस्तृत झाला आहे), त्याच्या बाहेर पण पुद्‌गल परमाणू असतात ना?

**दादाश्री :** पण ते सिद्धक्षेत्राच्या बाहेर आहेत, म्हणजे फक्त खालच्या भागात आहेत. आणि सिद्धांवर त्याचा परिणाम होऊ शकणार नाही, अशा स्थितीत ते आहेत. ते सिद्धक्षेत्र लोक-अलोक यांच्यामध्ये आहे.

**प्रश्नकर्ता :** सिद्धक्षेत्रात जी परिस्थिती आहे. त्याचा परिणाम इतर 'लोकावर' पडतो का?

**दादाश्री :** अजिबात नाही. परिणाम कसे होतील? काही देणेघेणेच नाही आणि सिद्धांवर कोणत्याच प्रकारचा कोणताही परिणाम होत नाही.

**प्रश्नकर्ता :** त्यांच्यावर परिणाम होत नाही, पण त्यांचा परिणाम बाहेर येत नाही का?

**दादाश्री :** नाही, त्यांचा परिणाम इथे अजिबात होत नाही. तरी पण काय आहे की आपल्याला तिथे जायचे आहे, म्हणून ते आपले लक्ष्यस्थान आहे.

❖❖❖❖❖

# [ खंड : 2 ]
# 'मी कोण आहे?' हे कशा प्रकारे जाणावे?

## आता, जन्म-मरणाचे फेरे कसे टळतील?

**प्रश्नकर्ता :** आता जरा असे विचारायचे होते की जन्म-मरणाचे फेरे टाळण्यासाठी काय करावे लागेल?

**दादाश्री :** हे तुम्ही आता पाचव्या आऱ्यात विचारता? चौथ्या आऱ्यात फेरे टळतील असा काळ होता, तेव्हा त्यावेळी तर काही केले नाही, तेव्हा चटणी खात बसून राहिलात. फक्त चटणीच, फक्त चटणीचाच शौक, म्हणून पडून राहिलात. तेव्हा त्या काळात अगदी आरामात जन्म-मृत्यूचे फेरे टाळता आले असते. पण तेव्हा तर काहीच केले नाही. आणि आता येथे आला आहात पण आता तर काही उपायच राहिला नाही. तुम्हाला ती चटणी तर मिळाली, पण उपाय उरला नाही. आता चटणीपासून सुटका होईल असे वाटते का?

**प्रश्नकर्ता :** कदाचित सुटका होईलही.

**दादाश्री :** हो, जन्म-मरणाचे फेरे टाळण्यासाठी 'स्वतः कोण आहे' याचे ज्ञान प्राप्त व्हायला हवे. समकित प्राप्त झाले पाहिजे.

**प्रश्नकर्ता :** जोयर्पंत या जीवनाचा हेतू समजत नाही तोपर्यंत सर्व बोलणे व्यर्थ आहे. हा हेतूच समजून घ्यायचा आहे. मूळ प्रश्नच हा आहे.

**दादाश्री :** हो. हा मूळ प्रश्न आहे हे बरोबर आहे. असे समजा

की एक शेठ आहेत, खूप सुखी माणूस आहेत, गिरणीचे मालक आहेत. ते जेव्हा बोलतात तेव्हा गिरणीचे दोन हजार लोक पण खुश होतात, इतके समंजस शेठ आहेत. त्यांचा विनय पण खूप सुंदर आहे. पण संध्याकाळी जेव्हा ते थकलेले असतात आणि एक बाटली प्यायली की मग कसे होतात? मग ब्रँडीची नशा चढत जाते, आणि मग स्वत:ची अवस्था विसरून जातात. स्वत:ची जागृती डिम (मंद) होत जाते आणि आंधळेपणा उत्पन्न होतो.

**प्रश्नकर्ता :** दारूच्या नशेत सर्व भान विसरतात, तर अध्यात्मात लोक कशा प्रकारे भान विसरतात?

**दादाश्री :** अध्यात्मात ही जी मोहाची नशा चढलेली आहे, ती उतरतच नाही. त्याच नशेत लोक बोलत असतात. तुम्ही सर्व जण ज्या गप्पा-गोष्टी करत आहात, त्या मोहाची दारू पिऊन बोलत आहात. या सर्व 'महात्म्यांची' नशा तर मी उतरवून टाकली आहे. पण तुमची नशा काही उतरलेली नाही, म्हणून तुम्ही त्या नशेतच बोलत आहात. म्हणजेच जेव्हा ही नशा उतरेल तेव्हा 'ह्या जीवनाचा हेतू काय आहे' हे सर्व समजेल, ताबडतोब समजेल. शेठचा नशा उतरला की परत शेठ जसे होते तसेच होतात ना! नंतर परत ते किती सुंदर बोलू लागतात! म्हणजेच शेठच्या बाबतीत ब्रँडीची नशा चढलेली आहे, आणि जगाला मोहाची नशा चढली आहे. ब्रँडी प्यायलेल्यावर तर दोन-तीन मडके गार पाण्याचे ओतले तर त्याची नशा उतरते. पण या जगाची मोहरूपी नशा तर उतरतच नाही ना. मग जरी हिमालयात जा किंवा आणखी कुठे जा, जिकडे जाल तिकडे (मोहरूपी) दारू प्यायलेले लोकच असतात. घर, बायको-मुले सर्व काही सोडून देतो पण 'हम' मात्र सुटत नाही. तो 'हम, हम, हम' यातच राहतो. तो 'हम' जेव्हा सुटतो तेव्हा तो परमात्मा होतो. 'तुम्ही' स्वत:च 'परमात्मा' आहात, पण त्याचे 'तुम्हाला' भान नाही, जागृतीच नाही ना!

**प्रश्नकर्ता :** परत आपण जगात माणसाने कशासाठी जगावे? या मूळ प्रश्नाकडे येऊ या.

**दादाश्री :** मोक्षासाठी जगायला पाहिजे. पण तरी समज नसल्यामुळे हे सर्व लोक 'स्त्री'साठी जगतात, पैशासाठी जगतात किंवा इतर कशासाठी तरी जगतात. पण हे सर्व समज नसल्यामुळे होत आहे. हेतू ओळखत नाहीत, आणि कशालाही हेतू बनवितात. जर हेतू समजला तर हा मनुष्यजन्म, हिन्दुस्तानातील मनुष्यजन्म हा मोक्षासाठीच आहे. पण हा मोक्षमार्ग माहीत नसल्यामुळे कशालाही हेतू बनवितात, हेतूच बदलतो.

संपूर्ण जगातील लोक जे जे करतात, तो सर्व संसारच आहे. मग ते काही का करत असोत, पण तो संसारच आहे. एकदाही या संसाराच्या बाहेर जात नाहीत. याला पररमणता असे म्हणतात. म्हणजे हेतूच पाहिला जातो. हेतूचेच महत्त्व आहे की कोणत्या हेतूने करत आहेत! जरी आत्महेतूसाठी कुठलीही क्रिया केली जात असेल, तरीही त्यात हेतूच जमा होतो, क्रिया पाहिली जात नाही.

तुमचा हेतू फक्त मोक्ष प्राप्त करणे हाच आहे, आणि तो हेतू जर मजबूत असेल तर निश्चितच तुम्ही मोक्षमार्ग प्राप्त कराल. नाहीतर इतर लोकांचे तर तऱ्हेतऱ्हेचे हेतू असतात. तोंडाने बोलतात की मोक्ष हाच हेतू आहे पण आतमध्ये तर सर्व हेतू संसाराचेच असतात.

एवढे सर्व आरे गेले, हा पाचवा *आरा* आला तरी पण तुम्हाला वीट का येत नाही? योग्य जीव तर एव्हाना विटून जातो. परंतु जर कोणी मोही जीव असेल तर त्याला यात खूप मजा वाटते, टेस्ट येते. ज्याला वीट येतो तो तर मोक्षाचा मार्ग लवकर शोधून काढतो. आणि ज्याला वीट येत नाही, तो बाजारात फिरतच राहतो, आपोआप. अजून तो किती जन्म भटकेल याला काहीच सुमार नाही ना! हा तर संसार आहे.

## 'टेम्पररी'ला पाहणाराच 'पर्मनन्ट'

हे जग कशा प्रकारे चालले आहे? कोण चालवीत आहे? कशासाठी चालवीत आहे? मी कोण आहे? जोपर्यंत हे सर्व ज्ञान होत

नाही तोपर्यंत माणसाचे हे पझल सोल्व होत नाही (कोडे सुटत नाही). पाहा ना, किती तरी पझल निर्माण होतात.

**प्रश्नकर्ता :** मानले तर 'पझल' आहे, नाही मानले तर काहीच नाही.

**दादाश्री :** मानले तर, हे शब्दच असे रूढीग्रस्त आहेत. हे काही एक्झॅक्ट (बरोबर) शब्द नाहीत. कारण आपण जरी मानले की हे पझल नाही तरी प्रत्यक्षात अनुभवात आले तर ते पझल होते. मानलेले जास्त दिवस तर टिकू शकत नाही ना! समजा आपण मानले की बँकेत माझे दोन लाख रुपये शिल्लक आहेत आणि त्या हिशोबाने चेक लिहिला तर तो परतच येईल ना! मानलेली गोष्ट 'करेक्ट' नसते. मानलेले फार थोडा वेळ टिकते. त्याला काही अर्थ नाही. आणि काही काही बाबतीतच मानलेले राहू शकते.

**प्रश्नकर्ता :** एक आत्मा सोडून बाकी सर्व थोडाच वेळ टिकते ना?

**दादाश्री :** हो, म्हणजेच हे सगळे मानलेलेच आहे ना! या सर्व 'राँग बिलीफ्स्' आहेत आणि सर्व 'टेम्पररी ॲडजस्टमेन्ट्स' आहेत. या सर्व चुकीच्या मान्यता आहेत आणि टेम्पररी ॲडजस्टमेन्टच आहेत. फक्त आत्माच अविनाशी आहे. ऑल दीज रिलेटिव्ह आर टेम्पररी ॲडजस्टमेन्ट्स आणि फक्त आत्माच पर्मनन्ट आहे.

ज्या सर्वच गोष्टी टेम्पररी आहेत, त्यांनाच लोकांनी पर्मनन्ट मानून त्यांच्याशीच व्यापार केला. या सर्व गोष्टी टेम्पररी आहेत असा थोडा फार अनुभव तुम्हाला आला आहे का?

**प्रश्नकर्ता :** सगळे जगच टेम्पररी आहे ना!

**दादाश्री :** हो, तेच तर मी सांगत आहे. 'ऑल दीज रिलेटिव्हस् आर टेम्पररी ॲडजस्टमेन्ट्स', आणि तुम्ही स्वतः पर्मनन्ट आहात. आता तुम्ही स्वतः पर्मनन्ट आणि या सर्व 'ॲडजस्टमेन्ट्स टेम्पररी', तर मग यांचा मेळ कसा बसणार? तुम्ही पण 'पर्मनन्ट' नाहीत का?

**प्रश्नकर्ता :** ते मी कसे सांगू शकेन?

**दादाश्री :** तुमचा पुनर्जन्म झाला असेल की नसेल? तुमचा मागचा जन्म असेल की नसेल? याचीही खात्री वाटत नाही ना? तरी पण पुनर्जन्म मानतो, म्हणजेच तो पर्मनन्ट झाला.

कोणतीच 'टेम्पररी' गोष्ट दुसऱ्या 'टेम्पररी' गोष्टीला 'टेम्पररी' समजू शकत नाही, फक्त 'पर्मनन्ट' गोष्टच 'टेम्पररी' गोष्टीला 'टेम्पररी' समजू शकते. तुम्हाला समजते ना की ही काच आहे ती तुटू शकते? हा चष्मा तुटू शकतो? म्हणून तुम्ही 'पर्मनन्ट' आहात आणि हा चष्मा 'टेम्पररी' आहे. 'पर्मनन्ट' गोष्टच 'टेम्पररी'ला टेम्पररी असे समजू शकते. नाहीतर एक 'टेम्पररी' गोष्ट दुसऱ्या 'टेम्पररी' गोष्टीला तसे समजू शकत नाही. 'टेम्पररी' 'टेम्पररी'ला कशा प्रकारे ओळखणार? म्हणजेच जर ती 'पर्मनन्ट' असेल तरच 'टेम्पररी'ला 'टेम्पररी' असे ओळखील. जगात जर 'पर्मनन्ट' गोष्टीच नसत्या तर मग 'टेम्पररी'ला 'टेम्पररी' म्हणण्याला काही अर्थच राहिला नसता. त्यांना 'टेम्पररी' म्हणावे का लागते? कारण काही गोष्टी 'पर्मनन्ट' आहेत म्हणून (इतरांना) आपण 'टेम्पररी' म्हणतो. सगळेच 'टेम्पररी' असते तर? तुमच्या बुद्धीला ही गोष्ट पटत आहे का?

**प्रश्नकर्ता :** हो, 'पर्मनन्ट' गोष्टी असतात म्हणूनच 'टेम्पररी' पण गोष्टी असतात.

**दादाश्री :** हो, येथे 'पर्मनन्ट' वस्तू आहे, याच्या आधारावर या इतर सर्व गोष्टी 'टेम्पररी' म्हटल्या जातात. त्याला कळते की हे टेम्पररी आहे, ते टेम्पररी आहे, काचेचा ग्लास टेम्पररी आहे.' असे सगळे समजते ना? हा तांब्याचा लोटा आहे, जर तो तुमच्या हातून सुटून जमिनीवर पडला तर तुम्हाला खूप भीती वाटत नाही, परंतु जर काचेचा ग्लास पडला तर काय होईल?

**प्रश्नकर्ता :** तर मग ग्लास फुटेल अशी भीती वाटेल.

**दादाश्री :** तो काचेचा ग्लास पूर्ण फुटून जाईल याउलट तांब्याच्या

लोट्याला फार तर थोडासा पोचा येईल. पण नंतर त्याला सरळ केल्यावर तो परत जसा होता तसा होईल, पण त्या सर्व गोष्टी 'टेम्परिरी' आहेत. एखादी पंधरा वर्षे चालेल आणि एखादी वीस वर्षे चालेल. हे शरीर आहे, ते पंचाहत्तर वर्षे चालेल म्हणजेच या सर्व 'टेम्परिरी' गोष्टी आहेत. तुम्ही स्वतः 'पर्मनन्ट' आहात. पण 'स्वतः'ला 'टेम्परिरी' मानून चालला आहात. 'मी चंदुभाई आहे, मी शरीर आहे, मी यांचा मुलगा आहे' या सर्व चुका मला काढून टाकायच्या आहेत. तुम्हाला चुका काढायच्या आहेत ना?

हे लोक सर्वांना 'टेम्परिरी' म्हणतात म्हणजेच दुसऱ्यांना टेम्परिरी म्हणणारा 'स्वतः' 'पर्मनन्ट' आहे. नाहीतर 'टेम्परिरी' शब्दच आला नसता. म्हणजेच हे विधान स्वतःच सिद्ध करते की दुसऱ्यांना 'टेम्परिरी' म्हणणारा 'स्वतः' 'पर्मनन्ट' आहे. पण त्याला 'स्वतःचे' भान नाही. तरीही लोक 'टेम्परिरी' म्हणतात ना! म्हणून आपल्याला हे समजायला हवे की जरी त्याला हे भान नसेल तरी पण तो 'टेम्परिरी' म्हणतो, म्हणून तो 'स्वतः' 'पर्मनन्ट' आहे. पण त्याची चूक होत आहे, ही गोष्ट वेगळी आहे.

## स्वतःचे गुण कोणते? ते समजण्यात पण चूक

हे ज्ञान हरवलेले नाही. पण असे प्लस-मायनस (अधिक-उणे) केले तर संपूर्ण ज्ञान परत मिळेल, पण 'ज्ञानी पुरुष' रस्ता दाखवतील तेव्हाच. नाहीतर स्वतःच्या कल्पनेत ते येणार नाही, स्वतःची बुद्धी तिकडे वळणारच नाही. मी कशा प्रकारे कमावू, कशा प्रकारे हे करू, म्हणजे विषयांत आणि पैशात, यातच सर्व बुद्धी गुंतली आहे. स्वतः 'पर्मनन्ट' आहे, पण त्याचे त्याला 'स्वतःलाच' भान नाही. स्वतः जो आहे त्याचे भान तर व्हायला हवे की नको?

**प्रश्नकर्ता :** स्वतःचे गुण कोणते आहेत याची तर त्याला माहिती असतेच ना?

**दादाश्री :** नाही, अशी माहिती कोणालाच नसते. असा एकही

माणूस नाही की ज्याला आपल्या स्वतःच्या गुणांची माहिती असते. ज्याला तो स्वतःचे गुण म्हणतो ते तर कोणा परक्याचे गुण आहेत. सध्या तुम्हाला तुमचे जे काही गुण दिसतात, ते सर्व तुमचे गुण नाहीत, ते आरोपित गुण आहेत, तरी पण तुम्ही म्हणता की हे सर्व माझे गुण आहेत.

**प्रश्नकर्ता :** माझे काही चांगले गुणही आहेत आणि काही वाईट गुणही आहेत.

**दादाश्री :** नाही. हे दोन्ही प्रकारचे गुण आरोपित आहेत. आणि चांगले गुण, वाईट गुण या दोन्ही चुकीच्या गोष्टी आहेत. दोन्ही 'कल्चर्ड' गुण आहेत, आणि ही 'कल्चर्ड' गोष्ट आहे. हे चांगले-वाईट, हे तुमचे गुण नाहीत. तुमचे गुण तर वेगळ्याच प्रकारचे आहेत. त्यातील एकही गुण तुम्ही पाहिलेला नाही, जाणलेला नाही. लोकांनीही स्वतःचे गुण जाणलेले नाहीत. स्वतःचे गुण जाणण्यासाठी सगळे लोक 'इथे' येतात. कारण त्यांना 'एंडलेस' (न संपणारे) सुख हवे आहे. हे टेम्पररी सुख नको आहे.

सध्या जे गुण आहेत, ते 'चंदुभाईचे' गुण आहेत. ते 'तुमचे' गुण नाहीत. 'चंदुभाई आणि तुम्ही' दोन्ही वेगळे आहात. या शरीरातही 'तुम्ही' वेगळे आहात आणि 'चंदुभाई' पण वेगळे आहेत. आम्हाला दोन्ही वेगळे दिसतात, 'चंदुभाई' पण दिसतात आणि 'तुम्ही' पण दिसता. ''म्हणजेच 'रिअली स्पीकिंग' (प्रत्यक्षात) तुम्ही कोण आहात?'' याचा निर्णय घ्यायला हवा. या शरीरात तुमचे क्षेत्र वेगळे आहे. तुम्ही तुमच्या क्षेत्रात राहिलात तर तुम्ही 'क्षेत्रज्ञ' आहात. आणि जर क्षेत्रात राहिला नाहीत तर क्षेत्राकार होऊन जाता. क्षेत्रज्ञ होऊन या क्षेत्रात काय होत आहे ते सर्व जाणायचे आहे. क्षेत्रज्ञचा अर्थ काय? तर क्षेत्राला जाणणारा. म्हणजेच तुम्हाला निरंतर जाणतच राहायचे आहे की 'काय होत आहे, कोण बोलत आहे', हे सर्व तुम्हाला तुमच्या क्षेत्रात राहून फक्त जाणायचेच आहे.

'मी शुद्धात्मा आहे' असा निर्णय होणे, हाच आत्म्याचा अनुभव आहे. आणि असा आत्मानुभव होणे ही काही साधीसुधी गोष्ट थोडीच आहे?

## तो गुप्तस्वरूप, अगदी अद्‌भुत, अद्‌भुत!

या जगात जाणण्यायोग्य काय आहे? तुम्हाला काय वाटते?

**प्रश्नकर्ता :** स्व-स्वरूप.

**दादाश्री :** बस! याशिवाय जगात जाणण्यायोग्य दुसरे काहीच नाही. फक्त स्व-स्वरूप एवढेच जाणण्यायोग्य आहे.

**प्रश्नकर्ता :** हो, पण ते अद्‌भुत दर्शन कसे असेल?

**दादाश्री :** अद्‌भुत, ते तर गुप्तस्वरूप आहे. जे जगापासून पूर्णपणे गुप्त आहे, गुप्तस्वरूप आहे. पूर्ण जगच ज्याला जाणत नाही असे ते गुप्तस्वरूप, ते तर अद्‌भुतच आहे. त्याहून अधिक अद्‌भुत या जगात दुसरे काहीच नाही. इतर सर्व वस्तू मिळू शकतात परंतु जे गुप्तस्वरूप आहे ना, फक्त तेच अद्‌भुत आहे ह्या जगात! म्हणून शास्त्रकारांनी याला अद्‌भुत, अद्‌भुत, अद्‌भुत असे लाखो वेळा अद्‌भुत म्हटले आहे.

## मूळ चूक मान्यतेचीच...

**प्रश्नकर्ता :** पण आम्हाला भ्रांती तर आहे ना?

**दादाश्री :** कशाची भ्रांती आहे?

**प्रश्नकर्ता :** स्व-स्वरूपाची भ्रांतीच आहे ना?

**दादाश्री :** पण भ्रांतीवाले स्वरूप कोणते आहे आणि 'तुमचे' भ्रांतिरहित स्वरूप कोणते आहे? किती भाग भ्रांतिरहित आहे आणि किती भाग भ्रांतिवाला आहे याची माहितीच नाही. अशी विभागणी तुम्ही केलेलीच नाही. अशी 'डिव्हिजन' केलीच नाही ना?

**प्रश्नकर्ता :** तुम्ही भ्रांतीची काय व्याख्या सांगता? कशाला भ्रांतिरहित म्हणायचे?

**दादाश्री :** स्वतः अविनाशी, स्वतःच्या मालकीच्या गोष्टी पण अविनाशी आणि तरीही विनाशी वस्तूंना आपले मानणे, हीच भ्रांती.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे हे एक प्रकारचे अज्ञानच झाले ना?

**दादाश्री :** हो, खूप मोठे अज्ञान! फॉरेन डिपार्टमेन्ट'ला 'होम डिपार्टमेन्ट' मानणे एवढी मोठी अज्ञानता आहे. एक 'फॉरेन डिपार्टमेन्ट' आहे, आणि त्यालाच जर 'होम डिपार्टमेन्ट' मानले तर मग खऱ्या 'होम'ला कसे ओळखणार? 'होम' काय तेच माहीत नाही. 'फॉरेन डिपार्टमेन्ट'ला जर 'होम डिपार्टमेन्ट' मानले तर काही फायदा होईल का?

**प्रश्नकर्ता :** काहीच फायदा होणार नाही.

**दादाश्री :** तर मग नुकसान काय होईल?

**प्रश्नकर्ता :** आपले खरे स्वरूप ओळखले नाही तर सर्व नुकसानच आहे.

**दादाश्री :** नुकसानच आहे ना! स्वत:चे स्वरूप तेच 'होम डिपार्टमेन्ट' आहे आणि 'फॉरेन डिपार्टमेन्ट'मध्ये 'मी चंदुभाई आहे, मी प्रोफेसर आहे, मी या स्त्रीचा पती आहे, याचा काका आहे, मी जाडा आहे, मी सडपातळ आहे.' असे जे बोलता तीच भ्रांती आहे. तसे बोलायला हरकत नाही. पण तुम्ही हे जे बोलता, त्यावरच तुमची श्रद्धा आहे. तुम्ही तर व्यवहार आणि निश्चय, 'फॉरेन' आणि 'होम' दोघांना एकत्र करून बोलता की 'मी चंदुभाईच आहे.' अहाहा! मोठे आले चंदुभाई! असे अगदी चुकीचेच मानून बसले आहेत. असे कसे चालणार? तुम्हाला काय वाटते?

**प्रश्नकर्ता :** नाही, असे तर चालणार नाही.

**दादाश्री :** तर मग याचा अंत येईल असे ज्ञान हवे. या संसारसागरात कुठेही किनारा दिसत नाही. घटकेत म्हणेल 'उत्तरेकडे चला.' उत्तरेकडे गेल्यावर एक दुसरा माणूस भेटेल आणि सांगेल, 'नाही, तिकडे वळा.' अरे, तिकडूनच तर आलो. तरी तो म्हणेल, परत तिकडेच वळा. म्हणजेच सतत असे भटकतच राहतात. पण याचा अंत किंवा किनारा, काहीच दिसत नाही.

## ...ही भ्रांती कोण दूर करील?

काही वेळानंतर जी संपते, तिला भ्रांती म्हणतात. पण ह्याच भ्रांतीला आपण रोज-रोज मजबूत करतो. 'मी चंदुभाई आहे, मी चंदुभाई आहे' असे म्हणत राहतो, रोजच नवी भ्रांती निर्माण करत राहतो आणि जुनी भ्रांती मिटत जाते. आपण जर नवीन भ्रांती उत्पन्न केली नाही तर जुनी भ्रांती मिटेल. सर्व काही वियोगी स्वभावाचे आहे. भ्रांती पण वियोगी स्वभावाची आहे.

तुमचा जो 'आत्मा' आहे, तो 'तुम्ही' स्वतःच आहात पण सध्या 'तुम्हाला' भ्रांती झाली आहे. म्हणून जिथे 'तुम्ही' नसता तिथे 'तुम्ही' आरोप करता की 'मी चंदुभाई आहे.'

## विनाशी आणि अविनाशी यात काय भेद आहे?

माणूस जेव्हा मरतो, तेव्हा विनाशी गोष्टी अलग होतात आणि अविनाशी गोष्टी अलग होतात. यात जी अविनाशी वस्तू आहे ती 'रिअल' म्हणजेच सनातन (शाश्वत) वस्तू आहे. आणि रिलेटिव्ह सर्व विनाशी आहे.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हटलेत की सर्व 'रिलेटिव्ह' विनाशी आहे, नाशवंत आहे. आता वैज्ञानिक आणि भारतीय दर्शने पण असे म्हणतात की या जगात कुठलेच तत्त्व विनाशी नाही. तर मग या नाशवंतांबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे?

**दादाश्री :** मी एवढेच म्हणत आहे की या जगात कोणतेच तत्त्व विनाशी नाही. आणि तत्त्वदृष्टीने ते तत्त्व आहे. ते तत्त्व तुम्ही पाहिलेलेच नाही. तुमच्या अनुभवात सर्व अविनाशी गोष्टी येतात की विनाशी गोष्टी येतात?

**प्रश्नकर्ता :** अविनाशी पण येत नाहीत आणि विनाशी पण येत नाहीत.

**दादाश्री :** पण या कप-बशा फुटल्या तर या कप-बशांना तुम्ही विनाशी म्हणता की अविनाशी?

**प्रश्नकर्ता :** याबद्दल मी काहीच म्हणत नाही. त्या एकसारख्याच गोष्टी आहेत.

**दादाश्री :** एकसारख्याच? पण इतर सर्व जणांना तर एकसारख्या वाटत नाहीत. हे सर्व लोक तर कप-बशा फुटल्या तर त्यांना विनाशीच म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** पण विनाशीबद्दल तुमचा काय अभिप्राय आहे?

**दादाश्री :** विनाशी म्हणजे या कप-बशा फुटतात तेव्हा आपल्याला आतमध्ये दुःख होते, हे कपडे जळले तर आतमध्ये दुःख होते. म्हणून या सर्व गोष्टी विनाशी आहेत. हे शरीर विनाशी आहे की अविनाशी?

**प्रश्नकर्ता :** शरीर पण विनाशी नाही.

**दादाश्री :** विनाशी नाही? पण तुमच्यासारखे ज्ञान या सर्वांना नाही. या सर्वांचे ज्ञान वेगळ्या प्रकारचे आहे. हे सर्वजण तर शरीर विनाशी आहे असे म्हणतात आणि तुम्ही तर शरीर विनाशी नाही असे म्हणता. तुमच्या घरी कप-बशा फुटल्या तर तुम्हाला काहीच वाटत नाही का?

**प्रश्नकर्ता :** विनाशीच्या अर्थासाठी मी वैज्ञानिक दृष्टीने विचारत आहे.

**दादाश्री :** नाही. इथे वैज्ञानिक दृष्टीची गरजच नाही. आपल्याला व्यवहाराच्या दृष्टीची गरज आहे. इथे व्यवहारात व्यावहारिक दृष्टी हवी.

वैज्ञानिक दृष्टीने काय आहे, ते मी तुम्हाला सांगतो. वैज्ञानिक दृष्टी तर काय सांगते की 'या जगात एक पण परमाणू कमी होत नाही. अगदी कितीही गोष्टींचा नाश होवो, तरी पण एकही परमाणू कमी होत नाही, त्याचप्रमाणे एकही परमाणू वाढत नाही.' तरी पण लोकांकडे घरात कप-बशी फुटली तर भांडण होते की नाही? कपडे जळले तर भांडण होते की नाही? घर जळले तर दुःख होते की नाही? म्हणून यांना विनाशी म्हटले आहे. यात आत्मा तर जळतच नाही.

**प्रश्नकर्ता :** विनाशी म्हणजे 'वेदर इट इज ओन्ली चेंज ऑफ स्टेट?' (विनाशी म्हणजे फक्त स्थितीत बदल का?)

**दादाश्री :** विनाशी म्हणजे अवस्थांचा विनाश होतो. वस्तू विनाशी नाही, तत्त्वे विनाशी नाहीत. पण या ज्या अवस्था उत्पन्न होतात, त्या अवस्थांचा नाश होतो. जगातील सर्व लोक या अवस्थात अडकलेले असतात, म्हणून त्यांना विनाशीच म्हणावे लागेल.

हे लोक जर डॉक्टरकडे गेले आणि डॉक्टरांना म्हणाले, 'डॉक्टर साहेब, मला ताप आला आहे.' तेव्हा जर डॉक्टर म्हणाले, 'अविनाशी आहे.' तर संपलेच सगळे, तो बिचारा तर घाबरून जाईल. म्हणून आम्ही म्हणतो, 'ताप विनाशी आहे, निघून जाईल!' तुम्हाला कळले ना की मी काय म्हणत आहे?

**प्रश्नकर्ता :** हो, आता समजले.

**दादाश्री :** सर्व अवस्था या विनाशी असतात. पूर्ण जग या अवस्थेत एकाकार (तन्मयाकार) असते. या अवस्थेत असल्यामुळे अस्वस्थ होत असतो. अवस्थेत 'स्वतःचा' मुक्काम केल्यामुळे अस्वस्थ होत असतो. आणि स्वतःच्या स्वरूपात, 'पर्मनन्ट'मध्ये राहिल्यामुळे स्वस्थ होतो.

म्हणजेच वस्तूच्या अवस्था विनाशी आहेत आणि मूळ वस्तू अविनाशी आहे. आणि फक्त 'ज्ञानी पुरुष'च तर मूळ तत्त्वांबद्दल जाणतात. पण लोक तर अवस्थांतच पडून राहतात.

## विनाशी धर्मात अविनाशींबद्दल भ्रांती

जोपर्यंत माणसाला भ्रांती असते तोपर्यंत विनाशी आणि अविनाशी एकाच रूपात असतात. एकाच रूपात असतात. तेव्हा काय करतात? 'हे मी जाणतो आणि हे मी करतो' असे बोलतात. म्हणजेच दोन्ही धर्माबद्दल एकदम बोलतात. विनाशीच्या धर्माबद्दल आणि अविनाशींच्या धर्माबद्दल एकदमच बोलतात. आणि असे एकदमच बोलणे याचेच नाव

भ्रांती. मग 'मीच चंदुभाई आहे' असे बोलतो. 'स्वत:' अविनाशी असूनसुद्धा 'स्वत:' 'मीच चंदुभाई आहे' असे बेभानपणे बोलतो. त्याचे कारण काय? तर अविनाशी आणि विनाशी दोन्हीही एकत्र झाले आहेत, एकाकार झाले आहेत. आणि एकाकार झाल्यामुळे ही भ्रांती उत्पन्न झाली आहे.

**प्रश्नकर्ता :** पण ही भ्रांती तर अविनाशीनेच बनविली आहे ना?

**दादाश्री :** कोणीच बनवलेली नाही. अविनाशी याला बनवत नाही. वैज्ञानिक कारणांमुळे ही भ्रांती निर्माण झाली आहे. नाहीतर भ्रांती कोणी बनवीत नाही.

**प्रश्नकर्ता :** व्यक्तीमध्ये विनाशी आणि अविनाशी दोन्हीही सोबतच असतात, तर ते जे वर्तन करतात ते तर अविनाशीचेच असते ना? कारण साम्राज्य तर अविनाशीचेच आहे ना?

**दादाश्री :** अविनाशीचे साम्राज्य नाहीच, अजिबात नाही! वर्तन पण अविनाशीचे नसते. हे पूर्ण साम्राज्य विनाशीचेच असते. म्हणून आम्ही विनाशी आणि अविनाशी, असे दोन भाग वेगळे करून देतो. जेव्हा आम्ही पापे भस्मीभूत करतो तेव्हा हे दोन्ही भाग वेगळे पडतात, आणि मग दोघे वेगळे होतात. मग आत्मा ज्ञाता-द्रष्टा राहतो. म्हणजेच अविनाशी आपल्या मूळ स्वभावात येतो आणि जो विनाशी असतो तो ह्या क्रियेत राहतो. जाणणे हा विनाशीचा स्वभाव नाही, *लागणी* किंवा असा कोणताच स्वभाव या विनाशीत नाही. मग जो विनाशी आहे तो या सर्व क्रियात राहतो आणि अविनाशी ज्ञाता-द्रष्टा राहतो. दोघेही आपापल्या स्वभावात राहतात. आणि या भ्रांतीत काय करतात? 'मी जाणतो आणि मी करतो', त्यामुळे मग हे क्रोध-मान-माया-लोभ वगैरे सर्व निर्बलता उत्पन्न झाल्या आहेत.

## परमात्मा पोहोचवतो प्रकाश आणि परमानंद

**प्रश्नकर्ता :** तर मग विनाशी बरोबर राहून अविनाशी कोणती कामे करतो?

**दादाश्री :** अविनाशी फक्त प्रकाश देतो, आणखी काहीच करत नाही. त्याच्या स्वत:जवळ असीम प्रकाश आहे, तो प्रकाश देतो आणि आनंद देतो, पण तो आनंद आपल्यापर्यंत पोहोचत नाही, त्याचा तिरोभाव होतो. आणि त्या आनंदाचा आपण काय उपयोग करतो? तो आनंद 'स्वत:' मधूनच येत आहे असे मानत नाही, म्हणून आपण म्हणतो की ह्या जिलबीमधून आनंद आला. असे तिरोभाव करतो म्हणून आपल्याला असे वाटते की हा आनंद जिलबीमधून आला आहे. पण जिलबीमधून आनंद येत नाही, 'स्वत:' मधून आनंदाचे आरोपण होत असते.

म्हणजेच कोणत्याच गोष्टीत आनंद नसतो. सोन्यात किंवा कशातही आनंद नसतो. सोन्यात जर आनंद असता तर सोन्याची गादी करून त्यावर झोपलो तर झोप चांगली येईल ना?

**प्रश्नकर्ता :** येणार नाही.

**दादाश्री :** म्हणजेच सोन्यामध्ये आनंद नाही. आपण कल्पनेने हा आनंद उत्पन्न करतो की यात आनंद आहे आणि यात मजा आहे, म्हणून मग तसा भास होतो. त्यामुळे मूळ खरा आनंद मारला जातो. मला तो 'डायरेक्ट' (थेट) आनंद मिळत असतो. मी निरंतर खऱ्या आनंदात राहत असतो, आणि तो स्वाभाविक आनंद असतो, नॅचरल, जो स्वत:चा आहे. आणि हा सारा आनंद तर कल्पित आहे, हे सुख पण कल्पित आहे आणि दु:ख पण कल्पित आहे.

## स्वभावाच्या भक्तीमुळे स्वाभाविक सुख

म्हणजे आम्ही 'आत्म्याला' वेगळे करून देतो, ते अशासाठी की त्यामुळे 'तुम्ही' स्वाभाविक सुखात यावे. नंतर मग तुम्हाला चिंता, उपाधी होणार नाही. कारण चिंता कशामुळे होते? तर 'मीच चंदुभाई आहे' आणि 'मीच करतो' असे म्हणता त्यामुळे चिंता होते. माणूस काही करू शकतो का? तो हे करत आहे की 'इट हॅपन्स्' (घडत आहे) असे आहे?

**प्रश्नकर्ता :** 'इट हॅपन्स्' म्हणजे स्वत:कडून काही होत नाही असे?

**दादाश्री :** हो बस, तो स्वतःच करायला जातो, त्यामुळे ही भ्रांती उत्पन्न होत असते, आणि कर्ता बनला की चिंता उत्पन्न होते. तुम्हाला समजत आहे ना? स्वतः अकर्ता आहे पण कर्तापद धारण केले आहे, आणि कर्तापद धारण केले, त्यामुळे भोक्तापद उत्पन्न झाले. करायला गेला म्हणून भोक्ता झाला. आणि म्हणून तर दिवसभर, चिंता, उपाधी आणि कलह! मग कोणी अपमान केला तरी दुःख होते.

म्हणजेच 'स्वतःने' 'स्वतःच्या स्वभावात' यावे यासाठी 'हे' ज्ञान द्यायचे असते. त्यानंतर आत्मा आत्म्यात राहतो आणि अनात्मा अनात्म्यात राहतो. प्रत्येक जीवाच्या आत चेतन आहे, ते प्रकाशच देते, दुसरे काहीच करत नाही.

हे जे विनाशी आहे, ते सर्व 'रिलेटिव्ह' आहे आणि 'ऑल दीज रिलेटिव्हस् आर टेम्पररी ॲडजस्टमेन्टस् आणि यू आर रिअल ॲन्ड पर्मनन्ट.' (या सर्व रिलेटिव्हस् या तात्पुरत्या तडजोडी आहेत आणि तुम्ही मात्र रिअल आणि शाश्वत आहात) म्हणजेच एक 'टेम्पररी' आणि एक 'पर्मनन्ट' दोन्ही एकत्र आले आहेत. त्याचे आम्ही विभाजन करतो. 'लाइन ऑफ डिमार्केशन' (भेदरेषा) आखून देतो की 'दिस इज दॅट आणि दिस इज नॉट दॅट' (हे ते आहे आणि हे ते नाही).

**प्रश्नकर्ता :** या विनाशीपासून अविनाशी वेगळा झाला की मग त्याचे काय होते?

**दादाश्री :** मग त्याला ही दुःखे राहत नाहीत ना! 'हे असे झाले आणि हे तसे झाले' अशी जी सांसारिक दुःखे असतात ती संपतात. नंतर मृत्यू आला तरी पण भीती वाटत नाही, खिसा कापला गेला तरी दुःख होत नाही, बायकोने शिव्या दिल्या तरी दुःख होत नाही, कुठलेही दुःख उत्पन्न होत नाही ना! म्हणजेच विनाशीपासून अविनाशी वेगळा झाला की मग दोघेही आपापल्या स्वभावात राहतील. दुसरे काय होणार?

**प्रश्नकर्ता :** या प्रकारे ज्यांच्यात हे वेगळे झालेत, त्यांचा मृत्यू झाल्यावर काय होते?

**दादाश्री :** मृत्यूनंतर त्याचा एक जन्म बाकी राहतो. कारण आम्ही ज्या पाच आज्ञा दिल्या आहेत, त्या तो पाळतो म्हणून एक जन्म बाकी राहतो.

## जगाचे स्वरूप असे आहे

**प्रश्नकर्ता :** या सृष्टीच्या क्रमाच्या बाबतीत काही गोष्टी कळत नाहीत की काही लोक तुमच्याजवळ आले आणि त्यांना तुमच्याकडून आत्मज्ञान प्राप्त झाले, पण इतर लोकांना ते का (प्राप्त)होत नाही?

**दादाश्री :** हे सर्व लोकांसाठी नसते.

त्याचे काय आहे की, ही सर्व सृष्टी आहे ती प्रवाहाच्या रूपात आहे. म्हणजे जेवढे समुद्राला येऊन मिळाले, तिथे तेवढ्या पाण्याची मुक्ती झाली आणि दुसरे (पाणी) तिथे जसे जसे येईल, तशी तशी त्याची मुक्ती होत जाईल. म्हणजेच हे सर्व जग प्रवाहाच्या रूपात आहे आणि म्हणूनच सर्वांना एकदम ज्ञान होत नाही.

**प्रश्नकर्ता :** काही कण समुद्रापर्यंत पोहोचतात, पण काही मात्र मध्येच राहून जातात, त्याचे कारण काय?

**दादाश्री :** ते सर्व 'सायंटिफिक सरकस्टॅन्शियल एविडेन्सेस्' वर आधारित आहे. म्हणजेच जोपर्यंत भ्रांती आहे, तोपर्यंत त्याची मुक्ती होत नाही.

## कर्तापद, हीच भ्रांती

**प्रश्नकर्ता :** या सर्वांना भ्रांती झाली आहे ती टाळायचा उपाय काय आहे? ते सांगा.

**दादाश्री :** भ्रांती कशाची झाली आहे? ते तुम्हाला समजले आहे ना?

**प्रश्नकर्ता :** स्वत:ने स्वत:ला जाणलेले नाही.

**दादाश्री :** बस, एवढीच भ्रांती झाली आहे. स्वत: स्वत:पासूनच

अनोळखी झाला आहे, एवढीच भ्रांती त्याला झाली आहे, आणखी कोणतीच भ्रांती नाही.

**प्रश्नकर्ता :** जी भ्रांती झाली आहे, ती भ्रांती कोणत्या साधनांनी जाईल? कृपा करून आम्हाला समजावून सांगा.

**दादाश्री :** कर्माचा कर्ता आहे, म्हणून भोक्ता आहे. हे काय आहे? तर कर्माला स्वतः आधार देतो की 'हे मी केले.' या जगात कोणताच जीव काहीच करू शकत नाही, 'करत आहे' असे जे म्हणतात, तीच भ्रांती आहे आणि तोच अहंकार आहे. तो अहंकार स्वतःचा देखावा करतो. नाहीतर हे सर्व तर 'इट हॅपन्स्' आहे. सगळे काही होतच राहिले आहे. जे होत आहे त्याला म्हणतो 'मी केले, मी करत आहे.' पण हे तर होत आहे. त्याने जरी काही केले नाही तरी त्याला सकाळी उठल्या-उठल्या लगेच चहा-पाणी सर्व मिळतच असते.

ही भ्रांती कोणत्या साधनानी जाईल? 'तो स्वतः कोण आहे' असे जर एखाद्या 'ज्ञानी पुरुषा'ने त्याला सांगितले तर ती भ्रांती दूर होईल. बस, म्हणजेच जर 'ज्ञानी पुरुष' भेटले तरच भ्रांती नाहीशी होईल.

या जगात 'मी करतो' आणि 'मी जाणतो' हे दोन्ही भाव एकत्र करणे, यालाच भ्रांती म्हणतात. 'आम्हाला' 'मी करतो' असे भानच नसते. जेव्हापासून 'आम्हाला' 'आत्म्या'चे भान प्रकट झाले आहे, तेव्हापासून 'मी करतो' हे भानच उत्पन्न झाले नाही. अरे, या शरीराचा 'मी' मालकच राहिलो नाही ना! 'आम्हाला' गेली पंचवीस वर्षे या मन-वचन-कायेचा मालकीपणा राहिलेलाच नाही.

## आत्म्याला ऐकले नाही, श्रद्धा ठेवली नाही, जाणले नाही, तर..

आत्मा, ही वेगळी गोष्ट आहे. आत्म्याला जाणणे हे तर परमात्म्याला जाणण्यासारखे आहे आणि ज्याने परमात्म्याला जाणले त्याचा तर मोक्षच झाला.

आत्म्याला जाणण्यासाठीच हे सर्व आहे. आणि जर आत्मा जाणता

आला नाही तर मग आत्म्यावर श्रद्धा ठेवण्यासाठी आहे. 'आत्म्या'वर 'तुमची' श्रद्धा बसली पाहिजे, 'मी आत्मा आहे' अशी प्रतीती बसली पाहिजे. एवढे पण मिळाले नाही तर आत्म्याबद्दल ऐकावे. रोज आत्म्याबद्दल ऐकत राहावे.

म्हणून शास्त्रकारांनी काय लिहिले आहे की ज्याने आत्म्याबद्दल ऐकलेले नाही, आत्म्यावर श्रद्धा ठेवली नाही किंवा आत्म्याला जाणले नाही, ते मुक्ती मार्गाचे अधिकारीच नाहीत. म्हणून ही गोष्ट जर समजून घेतली तरच निराकरण होईल नाहीतर होणार नाही.

## अध्यात्म्याचा अंधार विलय करतात ज्ञानी

पंचवीसशे वर्षे या देशात अंधार चालू आहे. या दरम्यान एक-दोन ज्ञानी झाले, पण तो 'प्रकाश' सगळीकडे पोहोचू शकला नाही. आणि हा 'प्रकाश' तर मनाचे सर्व थर ओलांडले, बुद्धीचे सर्व थर ओलांडले तरच आणि तेव्हाच पोहोचू शकतो. अजूनपर्यंत फॉरेनचे लोक मनाच्या थरापर्यंतही आलेले नाहीत. ते लोक तर फक्त निश्चेतन मनाच्या क्रियेत आहेत. चेतन-मन तर त्यांनी पाहिलेलेच नाही आणि ऐकलेलेही नाही आणि फॉरेनच्या लोकांना त्याची गरजही नाही. फॉरेनच्या लोकांना जर आज आम्ही सांगितले की आत आत्मा आहे, तर हे त्यांना थोडेफार समजेल की असे काही तरी तत्त्व आहे. पण ते आत्म्याला मानत नाहीत, पण इतर काही तरी आहे असे ते मानू शकतात. त्यांना आपण म्हटले की पुनर्जन्म आहे तर ते मान्य करणार नाहीत.

म्हणून फक्त आत्म्यालाच जाणायचे आहे. आपल्या हिंदुस्तानातील सर्व धर्म आत्म्याला जाणा हेच सांगतात. फॉरेनमध्ये आत्म्याबद्दल माहितीच नाही. फॉरेनमध्ये तर 'मीच विलीयम आहे आणि मीच मायसेल्फ आहे' असे म्हणतील. आणि जोपर्यंत ते पुनर्जन्म मानत नाहीत, तोपर्यंत आत्म्याचे भान होऊ शकत नाही. जे लोक पुनर्जन्म मानतात, त्यांना आत्म्याबद्दल माहिती असते की, 'मी वेगळा आहे आणि माझा आत्मा वेगळा आहे.' हे त्यांना समजते.

आत्मा ही गोष्ट अशी आहे की तो फक्त 'केवळ ज्ञानीं'नाच मिळाला, इतर कोणालाच नाही, असे म्हटले तरी चालेल. इतर जे काही 'केवळी' झाले ते फक्त 'केवळज्ञानीं'चे दर्शन केल्यामुळेच झाले आहेत. पण प्रत्यक्षात जर कोणी शोध केला असेल तर तो फक्त केवळज्ञानींनी आणि तीर्थंकरांनी!

आत्मा हातात येईल अशी वस्तू नाही. या शरीरात आत्मा कसा सापडेल? आत्मा असा आहे की घरातून आरपार जाऊ शकतो. इथे लाख भिंती असतील तरी त्या सर्वांतूनही आत्मा आरपार जाऊ शकतो, असा आहे. तर आता ह्या देहात तो आत्मा 'त्याला' कसा काय सापडेल?

## 'ज्ञानी' वर्तवतात आत्मपरिणती

**प्रश्नकर्ता :** म्हणजे सांसारिक माणसांना आत्मा मिळतच नाही का?

**दादाश्री :** असे काही नाही. 'तुम्ही' आत्माच आहात. पण 'तुम्हाला' स्वत:ला 'मी' कशा प्रकारे 'आत्मा' आहे याचे भानच नाही. नाहीतर वास्तवात 'तुम्ही' स्वत:च 'आत्मा' आहात.

'ज्ञानी पुरुष' जे आत्मज्ञान देतात, ते कशा प्रकारे देतात? हे भ्रांतज्ञान आणि हे आत्मज्ञान, हे जडज्ञान आणि हे चेतनज्ञान, या दोघांमध्ये 'लाइन ऑफ डिमार्केशन' (भेदरेषा) आखून देतात. म्हणून मग परत चूक होण्याची शक्यता उरत नाही. आणि आत्मा निरंतर लक्षात राहतो, एक क्षणभरही आत्म्याची जागृती जात नाही.

आता तुमच्यातही आत्मा आणि अनात्मा या दोघांचे धर्म वेगळेच आहेत. पण तुमच्यात दोघांचेही परिणाम एकत्र निघतात म्हणून तुम्हाला ते बेचव लागते. दोघांच्या धर्माच्या परिणामांचे मिश्रण केल्यामुळे ते बेचव होऊन जाते. याउलट 'ज्ञानी पुरुषां'त चेतन परिणाम वेगळे राहतात आणि अनात्म परिणाम वेगळे राहतात, दोन्ही धारा वेगवेगळ्या वाहतात, म्हणून ते निरंतर परमानंदात राहतात.

असे आहे की खाणे, पिणे, अंघोळ करणे, उठणे, झोपणे, जागणे हे सगळे देहाचे धर्म आहेत. आणि सर्व लोक सतत या देहाच्या धर्मातच

गुंतलेले असतात. 'स्वत:' 'आत्मधर्मात' एकदाही, एक क्षण पण आलेला नाही. एक क्षणभर जरी आत्मधर्मात आला असता तरी मग 'भगवंतांपासून' दूर झालाच नसता.

## ज्ञानांक्षेपकवंत विचारधाराच उपयोगी

**प्रश्नकर्ता :** जीवाला विचार करायला हवा ना?

**दादाश्री :** कसला विचार?

**प्रश्नकर्ता :** तुमच्याकडून जे ऐकले आहे किंवा जे वाचले आहे, त्याच्याबद्दल विचार करायला हवा ना?

**दादाश्री :** हो. विचार करून त्याचे सार काढावे लागेल ना?

**प्रश्नकर्ता :** म्हणजे विचार करणे गरजेचे आहे का?

**दादाश्री :** हो, पण एका मर्यादेपर्यंतच.

त्याचे असे आहे की, हे जे विचारमंथन करायचे आहे ते फक्त आत्मा प्राप्त करेपर्यंतच करायचे आहे आणि त्यानंतर विचार करायचे नाहीत. कारण विचार करणे हा तर मनाचा धर्म आहे. आणि आत्मधर्म प्राप्त झाल्यानंतर मनोधर्माची गरज नाही. नंतर मग, देहधर्म, मनोधर्म, बुद्धीचे धर्म, अंत:करणाचे धर्म, अशा कोणत्याच धर्माची गरज नाही. कारण स्वत:चा स्वधर्म प्राप्त झाला!

**प्रश्नकर्ता :** तर मग स्वधर्मात आल्यानंतर काय काय करायची गरज आहे?

**दादाश्री :** स्वधर्मात आल्यानंतर इतर काहीच करायची गरज नाही. हे सर्व महात्मा स्वधर्मात आले आहेत. म्हणून 'यांना' विचार करण्याची गरज नाही. परंतु जोपर्यंत स्वधर्मात येत नाहीत, तोपर्यंत विचारांची पण गरज आहे.

**प्रश्नकर्ता :** कारण कृपाळूदेवांनी म्हटले आहे की ' कर विचार तो पाम!' (विचार करशील तर प्राप्त होईल)

**दादाश्री :** हो, 'कर विचार तो पाम' म्हटले आहे. पण ते सर्व विचार आवरणेच आहेत. तरीही कृपाळूदेवांनी जे म्हटले आहे ते योग्यच आहे. ते विचार फार उच्च प्रतीचे असतात, या जगातील लोक जे विचार करतात ना, तसे विचार नसतात.

**प्रश्नकर्ता :** नाही, नाही, ते नाही, फक्त आत्म्याचेच विचार.

**दादाश्री :** बस, फक्त आत्म्यासंबंधीच विचार, आणि ते पण कसे? की 'लिंक' तुटणार नाही अशा प्रकारचे. म्हणजेच या विचारधारेत खंड पडणार नाही असे विचार. तसे विचार असतील तर आत्म्याबद्दल थोडे फार समजू शकते. अन्यथा आत्म्याला समजणे खूप कठीण आहे. आणि 'ज्ञानी पुरुष' भेटले तर आत्मा सहजपणे प्राप्त होऊ शकतो.

हे सर्व 'महात्मे' आत्मा प्राप्त करून बसलेले आहेत. आणि तुमचा आत्मा या सर्वांना दिसत आहे, दिव्यचक्षूंनी हे सगळे तुमचा आत्मा पाहू शकतात.

स्वधर्म प्राप्त झाला की मग मनोधर्माची गरज नाही, कोणत्याच धर्माची गरज नाही, कारण मग 'देहाध्यास' राहतच नाही ना! देहाध्यासच सुटला ना!

**प्रश्नकर्ता :** अजूनही आमचा देहाध्यास सुटतच नाही.

**दादाश्री :** देहाध्यास, तो देहाध्यासीकडून कसा सुटेल? तुम्हाला देहाध्यास सोडायचा आहे, आणि तुम्ही देहाध्यासातच आहात, तर असे कसे काय शक्य होईल? देहाध्यासीकडून देहाध्यास जाणार नाही. कृपाळूदेवांनी म्हटले आहे जे 'तरणतारण' झालेले आहे अशा 'ज्ञानी पुरुषां'जवळ जा, तर तुझे काम होईल.

## जे मोक्षाचा अनुभव करवीत नाहीत, ते मोक्षदातेच नाहीत

**प्रश्नकर्ता :** त्या आत्म्याला जाणण्याच्या काही किल्ल्या तर असतीलच ना?

**दादाश्री :** त्याच्या किल्ल्या असे काही नसते. (त्यासाठी तर)

'ज्ञानीं'जवळ जाऊन त्यांना सांगा की, 'साहेब, मी बिल्कुल बेअक्कल मूर्ख माणूस आहे. अनंत जन्म मी भटकलो आहे पण आत्म्याचा एक अंशही, एका केसाइतकेही जाणू शकलो नाही. म्हणून माझ्यावर एवढी कृपा करा.' तर मग पुरे, तुमचे काम झाले. कारण 'ज्ञानी पुरुष' ते तर मोक्ष देण्यासाठीच आले आहेत.

आणि नंतर परत लोक आरडाओरडा करतात की 'मग आता आमच्या संसाराचे काय होणार?' आत्म्याचे ज्ञान जाणल्यानंतर जे काही बाकी उरते त्याला व्यवहार म्हणतात आणि त्या व्यवहारासाठी पण 'ज्ञानी पुरुष' पाच आज्ञा देतात की 'भाऊ, माझ्या या पाच आज्ञा पाळ. जा मग तुझा व्यवहार पण शुद्ध, आणि निश्चय पण शुद्ध, आणि जोखीम सर्व आमची!'

आणि मोक्ष तर इथेच अनुभवास आला पाहिजे. इथेच जर मोक्ष अनुभवास आला नाही तर तो मोक्षच नाही. इथे 'मला' भेटल्यावर पण तुम्हाला मोक्ष अनुभवास आला नाही तर मग हे 'ज्ञानी' खरे नाहीत आणि हा 'मोक्ष' पण खरा नाही. इथेच, या पाचव्या आऱ्यातच मोक्ष अनुभवास आला पाहिजे. इथेच या कोट-टोपीसह मोक्ष अनुभवास आला नाहीतर तिथे अनुभवाला येईल याचा काय भरवसा? म्हणून 'ज्ञानी पुरुषां'कडून अशी खात्री करवून घ्यायला हवी की 'स्वत:' कशा प्रकारे 'आत्मा' आहे.

## अनादिपासून 'स्वरूप' निर्धार करण्यातच चूक

**प्रश्नकर्ता :** मला तर असे वाटते की आत्मस्वरूपाचा निर्णय घेण्यात घाई कशाला करायला हवी?

**दादाश्री :** हो बरोबर, घाईगडबड करण्याची गरज नाही. इथे तर तुम्ही पाहिजे तितके प्रश्न विचारा. खुलासा करण्यासाठी आम्ही तयार आहोत. जो काही निर्णय करायचा असेल तो इथे होऊ शकतो. पण प्रथम निर्णय घ्यायला हवा, निर्णय घेताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. आणि एकदा निर्णय घेतल्यावर मग सावधगिरी बाळगण्याची गरज

राहत नाही. म्हणून घाई-घाईत निर्णय घेण्याची गरज नाही. कारण इथे तर अनंत जन्मांची चूक मिटवायची आहे. अनंत जन्मात जी चूक मिटली नाही, ती चूक मिटवायची आहे. आणि अनंतजन्मात कोणती चूक झाली आहे? अनादिकाळापासून आत्मस्वरूपाचा निर्णय होण्यात चूक होत आली आहे, ती आता मिटवायची आहे. म्हणून या बाबतीत घाईगडबड करायची नसतेच ना!

हे आत्मस्वरूप असे आहे की ते तुमच्या दृष्टीत येऊ शकणार नाही. तुमचे स्वत:चे ज्ञान अमुक मर्यादेपर्यंतच जाणू शकते, परंतु आत्मस्वरूप तर त्याहून खूपच पुढे आहे. म्हणजे तुमचे स्वत:चे ज्ञान पण तिथे पोहोचू शकणार नाही. जिथे तुमची दृष्टी पोहोचू शकत नाही, जिथे तुमचे ज्ञान पोहोचू शकत नाही, असे 'स्वत:'चे स्वरूप आहे, ते 'आत्मस्वरूप' आहे!

म्हणजेच 'मी कोण आहे' हे जाणणे हेच स्वत:चे स्वरूप आहे. आणि ते फक्त 'ज्ञानी पुरुष'च 'रिअलाइज' करून देऊ शकतात. त्यानंतर जन्म-मरण तर राहतच नाही! मग मरायचे असेल तर देह मरेल, 'स्वत:'ला मरायचे नाही. आणि एक-दोन जन्मात मोक्ष होऊन जाईल.

## सर्व साधने बंधनरूप झालीत

**प्रश्नकर्ता :** आत्मज्ञान होईल असे साधन तुम्ही सांगू शकता का?

**दादाश्री :** साधने तर पुष्कळ माहित आहेत, पण जीव त्या साधनांतच अडकून बसला आहे. जी साधने आहेत, त्या साधनांचाच मग लोकांना अभिनिवेष - (आपले मतच बरोबर असा आग्रह धरणे) होतो. कोणत्याच प्रकारचा रोग घुसणार नाही, असा जो जागृत असेल, अलर्ट असेल तर मग थोडे पुढे जाणे शक्य होईल. नाहीतर साधनांतच गुंतून पडून अभिनिवेष होतो. म्हणूनच ज्यांची सुटका झाली आहे असे 'ज्ञानी पुरुष' भेटले तर ते तुमचीही सुटका करू शकतात. नाहीतर तोपर्यंत संत पुरुषांजवळ बसू शकलात तर त्यासारखे मोठे पुण्य आणखी दुसरे

कोणतेच नाही. नाही तर, संसाराच्या त्रिविध तापातून बाहेर कसा निघणार? तरी पण ते संत पाणी शिंपडत राहतात, त्यामुळे थोडा थंडावा वाटतो.

**प्रश्नकर्ता :** तरी पण कोणत्याच साधनाच्या मदतीशिवाय पुढे कसे काय जाता येईल? काहीतरी साधन तर हवेच ना?

**दादाश्री :** सर्व साधनेच बंधनरूप झाली आहेत. तुम्हाला कोणी बांधले आहे? साधनांनीच तर तुम्हाला बांधले आहे. या लोकांनी जेवढीही साधने बनविली आहेत ना, त्या साधनांनीच तर त्यांना बांधले आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग काय विचार करून पुढे जावे? या गुंत्यातून बाहेर कसे पडावे?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की कोणी तुम्हाला म्हणाले की, 'हे आकाश पुष्प तुम्ही पाहिले होते का?' तर मग तुम्ही काय म्हणाल?

**प्रश्नकर्ता :** 'तो तर भ्रम आहे' असे म्हणू.

**दादाश्री :** मग हा तर आत्मा आहे, तो कसा मिळेल? आत्मा काही काल्पनिक वस्तू नाही.

म्हणजेच आत्मा कसा जाणाल? आत्मा तर स्वत:च विज्ञान आहे आणि तुम्ही सर्व जी साधने करता, ज्ञानाची जी सर्व साधने करता, ते ज्ञान देखील शुष्कज्ञान आहे. म्हणजे त्यात तुम्हाला सर्व करावे लागते. याउलट हे विज्ञान तर 'स्वत:च' कार्यकारी असते, स्वत:च काम करत राहते, तुम्हाला काहीच करायचे नसते. आणि विज्ञानानेच आत्मा जाणला जाऊ शकतो. आत्मा जाणण्यासाठी दुसरे कोणतेच साधन नाही. हे साधन मी तुम्हाला सांगितले आहे. तर हे विज्ञान, हे तुम्ही करू शकाल का?

**प्रश्नकर्ता :** कळले नाही, कोणते विज्ञान?

**दादाश्री :** आत्मविज्ञान. आत्मविज्ञान म्हणजे आत्मा प्राप्त करण्याचे

जे विज्ञान आहे, ते विज्ञान असेल तरच आत्मा प्राप्त होऊ शकेल. नाहीतर आत्मा प्राप्त करविणाऱ्या शास्त्रांमध्ये तर ज्ञान आहे, त्या ज्ञानाने आत्मा प्राप्त होईल असे नाही. कारण आत्मा काही शब्दरूप नाही की तो शास्त्रांत उतरू शकेल. तो नि:शब्द आहे, अवक्तव्य आहे, अवर्णनीय आहे. लोकांनी जशी कल्पना केली आहे तसा आत्मा नाहीच. हे तर मनात एक मानून बसले आहेत आणि त्यातच रात्रं-दिवस घालवीत आहेत आणि अंदाजपंचे चालत आहेत, आणि अनंत जन्म भटकतच आहेत पण अजून एक पण जन्म कमी झालेला नाही!

## सूटत नाही 'मी' आणि 'माझे', स्वतःहून

**दादाश्री :** तुमचे नाव काय?

**प्रश्नकर्ता :** चंदुभाई.

**दादाश्री :** खरोखरच तुम्ही चंदुभाई आहात, अशी खात्री आहे का?

**प्रश्नकर्ता :** लोकांनी माझे नाव ठेवले आहे.

**दादाश्री :** तर मग खरोखर तुम्ही कोण आहात? 'माय नेम इज चंदुभाई' असे म्हणता ना? तर मग 'माय' म्हणणारा हा कोण आहे?

**प्रश्नकर्ता :** तेच तर मी शोधत आहे. 'मी कोण आहे' हेच तर शोधायचे आहे.

**दादाश्री :** कधीपासून हे शोधत आहात?

**प्रश्नकर्ता :** दोन वर्षांपासून.

**दादाश्री :** पूर्वी शोध केला नव्हता का? का?

**प्रश्नकर्ता :** गरज नव्हती आणि तशी समज पण नव्हती.

**दादाश्री :** ओहो! हे ज्ञान समजून घ्यायचे आहे अशी तुम्हाला समजच नव्हती, ठीक आहे. म्हणजेच 'मी कोण आहे' हे ज्ञान जाणण्याची

गरज आहे. हे जाणले तर सर्व उलगडा होईल. आता यात 'चंदुभाई' तर 'तुमचे' नाव आहे, पण 'तुम्ही' कोण आहात?

**प्रश्नकर्ता :** तसा तर 'मी' एक 'माणूस' आहे.

**दादाश्री :** हे शरीर माणसासारखे दिसते, फोटो तसा दिसतो, त्यामुळे त्याला माणूसच म्हणणार. शरीराचा आकार तर माणसाचाच आहे. पण 'तुम्हाला' 'माणूस' पण म्हणता येणार नाही. हे शरीर 'तुमचे' आहे का?

**प्रश्नकर्ता :** हे शरीर माझे नाही.

**दादाश्री :** या शरीराचा काही परिणाम होत नाही? थंडी वाजते का? उकाडा वाटतो का?

**प्रश्नकर्ता :** शरीराला वाटतो.

**दादाश्री :** शरीराला वाटतो पण तुम्हाला वाटत नाही ना? या शरीराचा परिणाम होतो ना? परिणाम कशाचा होतो? जे स्वतःचे असते, त्याचा परिणाम होतो. परक्या वस्तूचा परिणाम होत नाही. तुम्हाला समजत आहे ना? म्हणजे आपल्यावर परिणाम कशाचा होईल? तर ज्याला स्वतःचे मानले आहे त्याचाच परिणाम होईल. 'हे शरीर माझे आहे' असे म्हणतो, म्हणून त्याचा परिणाम होतो. झोपेतही तसे भान असतेच. झोपेतही तुम्ही म्हणता की 'हे शरीर माझे आहे, हे नावही माझे आहे.' तर जे तुमचे आहे, त्याला कसे सोडता येणार?

म्हणजेच हा 'मी' सुटेल असा नाही. 'मी' हेच तर सर्वात मोठे भूत आहे. काही लोक म्हणतात, 'हे शरीर माझे नाही, हा मुलगा माझा नाही, ही बायको माझी नाही, कोणीच माझे नाही.' या प्रकारे डोकेफोड करत राहतात. पण मग अखेरीस तू तर आहेसच ना? तर आता कोठे जाशील? आणि या मन-वचन-कायेला कुठे टाकशील? या पुद्गलाला कुठे टाकशील? इतर सर्व पुद्गल टाकू शकतोस, पण याला कुठे टाकशील? यासाठी तर तो जेव्हा 'ज्ञानी पुरुषा'कडे जाईल तेव्हा ते त्याला मुक्त करतील. तुम्हाला समजले ना?

## हे समजून घेण्याचा प्रयत्न फलदायी होईल का?

**प्रश्नकर्ता :** तसा तर मी पण आत्मा समजून घेण्याचाच प्रयत्न करत आहे.

**दादाश्री :** समजून घेण्याचा प्रयत्न कधी होईल? 'तुम्ही' 'चंदुभाई' असाल तर समजण्याचा प्रयत्न कसा कराल? आणि खरोखर तर 'तुम्ही' चंदुभाई नाहीच. चंदुभाई तर तुमचे नाव आहे. 'तुम्ही' या मुलाचे वडील आहात, तो पण व्यवहार आहे, आणि हे सर्व तर आम्हाला मान्यच आहे ना! यात नवीन काय आहे? हे तर ओळखण्याचे एक साधन आहे. 'तुम्ही' कोण आहात', त्याबद्दल 'ज्ञानी पुरुषां'ना भेटून माहिती काढायला हवी, ते 'रिअलाइज' करायला हवे.

## हे तर दुसऱ्याचे पत्र 'स्वत:'ने घेतले

**दादाश्री :** तुम्ही 'चंदुभाई आहात' याची खात्री तर तुम्हाला आहेच ना?

**प्रश्नकर्ता :** नाही, हे नाव तर लोकभाषेत आहे. नाहीतर 'मी एक आत्मा आहे' बस, आणखी काही नाही.

**दादाश्री :** हो, आत्मा आहात, पण कोणी चंदुभाईला शिवी दिली तर त्याचे पत्र तर तुम्ही घेत नाही ना? जर घेत असाल तर तुम्ही चंदुभाई आहात. मग लोकभाषा म्हणता येणार नाही. चंदुभाईला शिवी दिली तर ते पत्र तुम्ही का घेता? म्हणजे तुम्ही चंदुभाई बनला आहात.

**प्रश्नकर्ता :** व्यवहारात राहण्यासाठी तर असे सर्व करावे लागते ना?

**दादाश्री :** नाही. व्यवहारात राहायचे आहे पण चंदुभाईचे पत्र तुम्ही घेता कामा नये. तुम्ही असे म्हणू शकता 'हे पत्र चंदुभाईचे आहे, माझी काहीच हरकत नाही. तुम्हाला जेवढ्या शिव्या द्यायच्या असतील तेवढ्या द्या.' पण तुम्ही तर चंदुभाई बनून जाता. 'चंदुभाईची बक्षीसे'

तुम्हाला खायची आहेत आणि तरी म्हणता, 'मी आत्मा आहे.' असे म्हटल्याने काय कोणी आत्मा बनेल का?

## संसारात असंगपणा, कृपेने प्राप्त होतो

**दादाश्री :** 'मी आत्मा आहे' अशी खात्री तुम्हाला कशा प्रकारे वाटली?

**प्रश्नकर्ता :** त्यासाठी आम्ही तुमच्यासारख्या गुरूंकडे जात असतो आणि तिथे शरीर आणि आत्मा कसे वेगळे आहेत, असा उपदेश ऐकलेला आहे. नाहीतर आमच्यात आणि तुमच्यात खूप फरक आहे ना? आम्ही म्हणजे संसारी, मोह-मायेत असलेले लोक...

**दादाश्री :** आणि मी काय संसारी नाही? मी पण संसारीच आहे या जगात जे संडासला जातात ते सर्वच संसारी आहेत. ज्याला संडासला जाण्याची गरज पडते आणि जे संडास शोधतात, त्या सर्वांना संसारी म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** पण आमच्यासारख्या लोकांना संसारात राहून आत्मज्ञान मिळेल, मोक्ष मिळेल, हे कसे शक्य आहे?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, संसार दोन प्रकारचा आहे, त्यागी पण संसारी आहे आणि गृहस्थ पण संसारी आहे. दोन्ही प्रकारचे संसार आहेत. त्यागवाल्यांना 'मी हे सोडले, ते सोडले' असे ज्ञान वर्तत असते आणि गृहस्थांना 'हे मी घेत आहे, हे मी देत आहे, हे ग्रहण करायचे आहे' असे ज्ञान वर्तत असते. परंतु जर आत्मा जाणला तर मग मोक्ष मिळू शकेल.

**प्रश्नकर्ता :** पण काय संसारात राहून, संसाराची कर्तव्ये पूर्ण करत-करत त्यापासून अलिप्त राहता येते का?

**दादाश्री :** 'ज्ञानी पुरुषां'कडे तेच तर असते ना! 'ज्ञानी पुरुषां'कडे जे 'विज्ञान' असते, तेच ते देतात आणि मग त्यामुळे संसार व्यवहाराचे पण सर्व होऊ शकते आणि आत्म्याचे पण होऊ शकते. 'ज्ञानी पुरुषां'जवळ असे विज्ञान असते.

मी तुमच्याबरोबर वार्तालाप करू शकतो. म्हणजेच संसारातही राहू शकतो आणि मी 'स्वत:'मध्येही राहू शकतो. दोन्ही करू शकतो. या संसाराच्या ज्या सर्व क्रिया कराव्या लागतात, त्या पण करतो. संसारात पण राहू शकतो आणि आत्म्यात पण राहू शकतो. 'ज्ञानी पुरुषां'जवळ संपूर्ण 'विज्ञान' असते, ते शास्त्रांमध्ये नसते. शास्त्रांनुसार तर हे सर्व सोडले तरच मुक्ती होऊ शकते.

अशा लोकांबरोबर राहायचे आणि दिवस घालवायचे आणि तरीही कर्मबंधन होणार नाही याप्रकारे राहायचे, तर असे कशा प्रकारे राहता येईल? ती सर्व विद्या मी तुम्हाला शिकवीन. लेपायमान न होता राहता येईल, अशी विद्या मी शिकवीन नाहीतर हे जग तर लेपायमानच आहे. कमळ पाण्यात राहूनही जसे निर्लेप राहते, त्या प्रकारची निर्लेपता मी तुम्हाला दाखवेन.

म्हणून आत्मा कोणाकडून जाणता येईल? तर 'ज्ञानी पुरुषां'कडून. शास्त्रे जाणणाऱ्यांकडे आत्मा नसतो. जर त्यांना आत्मा प्राप्त झाला असता तर त्यांना समकित प्राप्त झाले असते. आणि समकित म्हणजेच संसारात राहूनही संसाराचा स्पर्श न होणे, आणि असे तर 'ज्ञानी पुरुषां'च्या कृपेनेच प्राप्त होऊ शकते.

## सर्वांगी स्पष्ट समजमुळे गुंता सुटेल

कित्येक जण तर उपदेशात फक्त आत्माच आहे असे म्हणतात. कानात अशी फुंकर मारून सांगतात की म्हण, 'मी आत्मा आहे.' अरे, पण आत्मा म्हणजे काय? आणि जर 'मी आत्मा आहे' तर हे इतर सर्व काय आहे? असा प्रश्नही उत्पन्न होणारच ना? आपण तर इथे काय सांगतो की 'बाय रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंटने 'हे' आणि बाय रिअल व्ह्यू पॉइंटने 'हे', अशा प्रकारे दोन्ही गोष्टी बोलल्या पाहिजेत.' त्या लोकात 'पॉइंट' असे काही नसते. दोन्ही बाजूंनी गुदमरायला होते. पण मग कानात फुंकर मारल्यामुळे थोडेफार तसे राहते. पण नंतर परत गोंधळतो. रेल्वे लाइनस् 'पॅरॅलल' (समांतर) असायला नकोत का? वेड्यावाकड्या चालतील का? तुला वाकड्या चालवायच्या असतील तर

वाकड्या चालव, गोल चालवायच्या असतील तर गोल चालव, पण 'रिअल' आणि 'रिलेटिव्ह' दोन्ही रेषा समांतरच ठेव.

## रिलेशनमध्ये 'स्वत:' स्वत:लाच विसरला

चंदुभाई हे तर फक्त व्यवहार चालविण्यासाठी नाव आहे. खरे तर 'स्वत:' 'रिअल' होता, पण 'रिलेटिव्ह' बनला. पुष्कळ प्रकारची 'रिलेशन' झाल्यामुळे स्वत:बद्दल भ्रांती उत्पन्न झाली आणि मग म्हणू लागला की 'मी चंदुभाई आहे', यालाच 'अहंकार' म्हणतात.

## 'वस्तू' बद्दलची बिलीफ बदलली

**प्रश्नकर्ता :** 'रिअल' आणि 'रिलेटिव्ह' काय आहे? त्या दोघांत काय संबंध आहे?

**दादाश्री :** सापेक्ष हे सर्व विनाशी असते. सापेक्षला इंग्रजीत 'रिलेटिव्ह' म्हणतात आणि 'ऑल दीज रिलेटिव्हस् आर टेम्परर ॲडजस्टमेन्टस् ॲन्ड रिअल इज दी पर्मनन्ट.' निरपेक्षला रिअल म्हणतात, पर्मनन्ट म्हणतात. सापेक्ष म्हणजे दुसऱ्यांवर आधारित असते, दुसऱ्यांच्या आधाराने जगत असते.

हा काळोख आहे, तर हा उजेड आहे. नाहीतर उजेडाला उजेड कोण म्हणेल? कायमच उजेड असेल तर त्याला उजेड कोण म्हणेल? म्हणजेच काळोखाच्या अपेक्षेने (तुलनेत) उजेड आहे. आणि काळोख कोणत्या आधारावर आहे? तर उजेडाच्या अपेक्षेने काळोख आहे, याला 'सापेक्ष' म्हणतात. जे कुठल्याही अपेक्षेने (तुलनेने) आहे ते सापेक्ष आहे. आणि ते सापेक्ष 'टेम्परर' असते, बदलतच राहते. आणि जी 'रिअल' आहे, ती 'पर्मनन्ट' वस्तू आहे.

या जगात सहा वस्तू 'पर्मनन्ट' आहेत. त्या सहा वस्तूत शुद्ध चेतन 'पर्मनन्ट' आहे आणि इतर ज्या वस्तू आहेत त्यांच्यात चेतनभाव नाही. तरी पण या पाचही वस्तू पर्मनन्ट आहेत आणि त्यांच्यात अनंत प्रकारचे गुणधर्म आहेत. या सर्व गुणधर्मांमुळेच हा 'रिलेटिव्ह' भाव

उत्पन्न झाला आहे. आत्मा तर निरंतर आत्माच असतो, निरंतर चेतन स्वरूपातच असतो. तो बदललेला नाही, क्षणभरही बदललेला नाही. फक्त 'बिलीफ' (मान्यता)च चुकीची होते.

जे तुम्ही आहात त्याची 'बिलीफ' नाही आणि जे तुम्ही नाहीत त्याची 'बिलीफ' तुम्हाला आहे. या सर्व चुकीच्या 'बिलीफ्स्' आहेत. आणि या सर्व 'बिलीफ्स्' 'रिलेटिव्ह' आहेत, 'रिअल' नाहीत.

**प्रश्नकर्ता :** 'रिअल'च्या स्थितीत जाण्यासाठी काय करायला हवे?

**दादाश्री :** त्यासाठी तर 'रिअल'ला 'रिअलाइज' करायला हवे. आम्ही येथे 'ज्ञान' देतो त्यानंतर 'रिअल'चे 'रिअलाजेशन' होते.

## मुक्तीसाठी सौद्धांतिक समज हवी

**प्रश्नकर्ता :** पण पुस्तकात असे लिहिले आहे की मनाला आत्म्यातच गुंतवा, तर उद्धार होईल

**दादाश्री :** हो, पण तसे तर आत्मा जाणल्यानंतरच करता येऊ शकते, असेच कसे ते करता येईल? जोपर्यंत 'रिअलाइज' होत नाही, तोपर्यंत आत्मा कशाला म्हणाल? आत्मा जाळून जळत नाही, पाण्याने भिजत नाही, असे सगळे लिहिले आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** मग अशी तर घड्याळे पण आली आहेत, 'वॉटरप्रूफ' आणि 'फायरप्रूफ'! म्हणजे मला म्हणायचे आहे की अशी घड्याळे पण आली आहेत ना? परंतु आत्मा असा नाही. आत्मा तर अनंत गुणांचे धाम आहे आणि तो तर परमात्माच आहे. जेव्हा केवळीदशेत येतो तेव्हा त्याला परमात्मा म्हणतात आणि जोपर्यंत तो शब्दरूप असतो केवळीदशेत नसतो तोपर्यंत त्याला अंतरात्मा म्हटले जाते. जोपर्यंत शब्दांचे अवलंबन आहे, तोपर्यंत अंतरात्मा म्हटले जाते. तरी पण अंतरात्मा आणि परमात्मा यात जास्त फरक नाही. जे अंतरात्मे झाले आहेत ते परमात्मा होत आहेत आणि केवळी मात्र परमात्मा झाले आहेत, एवढाच फरक आहे.

**प्रश्नकर्ता :** खूप स्तोत्रांतून, स्तुतीतून असे म्हटले आहे की या स्तुतींचे नित्य पठण केल्याने संसाराची सर्व सुखे भोगूनही परमात्मा प्राप्त केला जाऊ शकतो. जर असे होत असेल तर मग आत्मज्ञानासाठी मेहनत का करावी?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, ते तर मार्ग सांगतात की पुण्य बांधलेले असेल तर पुढे जाऊ शकाल, आणि मग कधी ना कधी तरी आत्मज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग सापडेल. परंतु जर पापच बांधलेले असेल, तर त्याला आत्मज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग मिळणारच नाही ना? म्हणून लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी असे म्हटले आहे. नाहीतर वास्तवात हे 'एक्झॅक्ट' कारण नाही.

धर्म नेहमीच सैद्धांतिक असला पाहिजे. सैद्धांतिक म्हणजेच तो कधीही असैद्धांतिक होणार नाही आणि फलदायी असेल. ताबडतोब फळ देत असेल तर तो सिद्धांत आहे आणि ताबडतोब फळ देत नसेल तर त्याला सिद्धांत कसे म्हणता येईल? कोणतीही गोष्ट सिद्ध झाल्यावर त्याचा शेवट होतो, नंतर परत तो सिद्ध करावा लागत नाही. तो कायमस्वरूपी त्रिकाल सिद्ध होऊन जातो, त्यालाच सिद्धांत म्हणतात.

आत्मा तर 'सेल्फ' (स्वत:) वस्तू आहे. 'सेल्फ'चे 'रिअलायझेशन' झाले की सर्व जगाचे 'रिअलायझेशन' झाले. आत्मा जाणला तर अहंकार आणि ममता दोन्ही एकदम जातात. 'ॲट ए टाइम' निघून जातात.

उदाहरणार्थ तुमचे स्वत:चे एक घर आहे, जे तुम्हाला खूप आवडते, पण खूप उधारी झाल्यामुळे तुम्हाला ते विकावे लागले, ते विकून पैसे घेतल्यानंतर मग दुसऱ्या दिवशी आपली (त्या घराबद्दलची) ममता संपते ना?

**प्रश्नकर्ता :** हो, संपते.

**दादाश्री :** का? चाळीस वर्षे घर तुमचे होते आणि विकल्यानंतर दुसऱ्या दिवशी ते जळून खाक झाले तर दु:ख होईल का?

**प्रश्नकर्ता :** होणार नाही.

**दादाश्री :** कारण सर्व ममता संपली. त्याचप्रमाणे आत्मज्ञान झाले की ताबडतोब अहंकार, ममता सर्व सुटून जाते.

## स्व-स्वभावात राहिल्यामुळे समाधी

स्वतः परमात्मा आहे, पण याचे भानच नाही, तर मग काय होणार? तोपर्यंत त्याला जे भान असते त्यात त्याला वाटत असते की 'मी चंदुभाई आहे', हीच बिलीफ सतत वर्तत असते. 'मी चंदुलाल आहे, या स्त्रीचा पती आहे' अशा सर्व रॉंग बिलीफ्स्'मध्येच तो राहत असतो.

**प्रश्नकर्ता :** या संसारात जीव एकमेकांना याचप्रकारे ओळखणार ना? त्याप्रमाणे मला पण सर्व 'चंदुलाल'च म्हणतात.

**दादाश्री :** 'चंदुलाल' तर व्यवहारात ओळखण्याचे एक साधन आहे, त्याला हरकत नाही. ते तर मी पण म्हणतो. मला जर कोणी विचारले 'तुमचे नाव काय?' तर मी पण सांगतो 'अंबालाल.' पण 'मी' स्वतःला 'अंबालाल आहे' असे स्वप्नात पण मानत नाही. आणि तुम्ही तर स्वप्नातच काय पण जागृत अवस्थेत देखील असेच मानता की 'मी चंदुलाल आहे!' म्हणजे 'मी चंदुलाल आहे' ही 'रॉंग बिलीफ'च तुम्हाला त्रास देते. आणि मी आपल्या स्वभानात असतो, स्व-स्वरूपात असतो, म्हणून मला सतत समाधी राहते. स्व-स्वरूपात आल्यावर परमात्मापण प्रकट होत राहते, परमात्म्याची शक्ती व्यक्त होते. सध्या तर चंदुलालच्या शक्ती व्यक्त झाल्या आहेत. माणसात आला आहात म्हणून चंदुलालच्या शक्ती व्यक्त झाल्या आहेत, पण मनुष्यपणाच्या जास्त शक्ती व्यक्त झालेल्या नाहीत. म्हणून तुम्हाला सामान्य माणूसच मानले जाते.

## अशा काळात प्रयत्नांनी प्राप्ती शक्य आहे का?

**प्रश्नकर्ता :** त्यासाठी काही प्रयत्न करावा लागेल का?

**दादाश्री :** तुमच्याकडून प्रयत्न केला जाणार नाही. कारण तुम्ही स्वतः व्यग्र झाला आहात. म्हणून प्रयत्न होऊ शकणार नाही. जर कोणी

एखादा संपूर्ण एकाग्र असेल तर मी सांगू शकेन. पण या काळात मनुष्य तसा एकाग्र राहू शकत नाही आणि या काळात, एवढ्या गर्दीत, अशा भीषण काळात माणूस एकाग्र होणार तरी कशा प्रकारे? म्हणून मी प्रथम तुमची पापे धुवून टाकतो. आणि मग तुमच्यात 'राइट बिलीफ' बसवून देतो.

**प्रश्नकर्ता :** प्रगती करण्यासाठी एकाग्रतेची गरज आहे का?

**दादाश्री :** असे आहे की, एकाग्रतेवाली औषधे आहेत, ती मदत करतात. या जगात कोणतीच गोष्ट चुकीची नसते. या सर्व गोष्टी मदत करतात, पण स्वतःला फक्त हीच तीव्र इच्छा असली पाहिजे की मला स्वतंत्र व्हायचे आहे. 'साखर गोड आहे' यातील गोडचा अर्थ काय आहे तेच जाणून घ्यायचे असेल, तर मग त्याला शेवटच्या गोष्टीसाठी इथे यायला हवे. नाहीतर हे इतर सर्व उपाय आहेत आणि त्या फक्त 'स्टेपिंग' (पायऱ्या) आहेत.

## क्रिया नाही, भान बदलायचे आहे

**प्रश्नकर्ता :** संसारी जबाबदाऱ्यांनी बांधलेल्या माणसांना आत्मा कसा प्राप्त होईल?

**दादाश्री :** 'चंदुलाल' आणि 'आत्मा', दोन्ही एकदम वेगळेच आहेत आणि ते आपले आपले गुणधर्म दाखवतात. ते जर 'ज्ञानी पुरुषां'कडून समजून घेतले तर संसाराच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडता येतात आणि 'हे' पण होऊ शकते. ज्ञानी पण खातात, पितात, अंघोळ करतात, सर्व काही करतात. तुमच्यासारख्याच क्रिया करतात, पण 'हे मी करत नाही' असे भान त्यांना असते. आणि अज्ञानी दशेत 'मी करत आहे' असे भान असते. म्हणजेच फक्त भानातच फरक आहे.

## आत्मविकासात कधीही प्रतिकूल स्थिती नसते

**प्रश्नकर्ता :** पण मनातून इच्छा असेल तरी पण आत्मविकासाच्या कामात जास्त प्रतिकूल स्थिती का जाणवते?

**दादाश्री :** आत्मविकासाच्या कार्यात प्रतिकूल परिस्थिती कधीच होत नाही. पण त्याची मनापासून इच्छाच नसते. जर मनापासून इच्छा असेल तर आत्मविकासाच्या कामात प्रतिकूलता येतच नाहीत. खरे तर 'त्याला' या जगाबद्दल जास्त ओढ आहे आणि आसक्ती आहे, म्हणून आत्म्याच्या कार्यात प्रतिकूलता जाणवते. नाहीतर आत्मा प्राप्त करणे एकदम सहज आहे, सरळ आहे आणि सुगम आहे. आणि आत्म्याला स्वत:च्याच गावी जायला उशीर लागेलच कसा?

मी एका शेतकऱ्याला विचारलेले की 'या बैलाला शेतात घेऊन जाता तेव्हा बैलाचा स्वभाव कसा असतो?' तेव्हा शेतकरी म्हणाला, 'शेतात घेऊन जाताना तो हळूहळू चालतो.' आणि परत घरी येताना? तेव्हा म्हणतो 'घरी जाताना? त्याला तर कळते की आता घरी जात आहोत, तेव्हा वेगाने जातो!' त्याच प्रकारे जेव्हा आत्मा असे जाणतो की मोक्षाला जायचे आहे, तेव्हा तो वेगाने चालू लागतो. स्वत:च्या घरी जायचे आहे ना? आणि इतर सर्व ठिकाणी तो जबरदस्तीने हळूहळू चालतो.

## 'प्रत्यक्षा'कडून फायदा करून घ्या

**प्रश्नकर्ता :** देहातीत स्थिती प्राप्त करण्यात पुरुषार्थाचा भाग किती आणि ईश्वरकृपेचा भाग किती?

**दादाश्री :** ईश्वराच्या कृपेमुळेच तर सर्व संयोग जुळून येतात. जेव्हा ईश्वरकृपा असेल, तेव्हा देहातीत दशा प्राप्त करण्यासाठी देहातीत पुरुषाची भेट होते आणि ते देहातीत दशा प्राप्त करून देतात. तरी पण जे देहातीत आहेत ते सर्वच देहातीत दशेची प्राप्ती करवू शकत नाहीत. हे तर क्वचितच कधी ज्ञानी पुरुषांचे अवतरण होते, तेव्हा ते आपल्याला देहातीत बनवू शकतात नाहीतर देहातीत होणे ही सोपी गोष्ट नाही.

**प्रश्नकर्ता :** देहातीत होण्यासाठी ईश्वरकृपा प्राप्त व्हावी यासाठी कोणता पुरुषार्थ करायला हवा आणि तो किती करायला हवा?

**दादाश्री :** तुम्ही तो पुरुषार्थ केला होता म्हणून तर तुम्ही मला

भेटलात. तुम्ही जो काही पुरुषार्थ केला असेल तो चांगलाच असेल म्हणून तर भेट झाली. आता भेट झाल्यानंतर तुम्हाला लाभ घेता यायला हवा. लोक आपापल्या भाषेत शोधतात, त्यांना जसे समजते तसे शोधतात. तुम्ही जी देहातीत दशा प्राप्त करण्याबद्दल बोलत आहात ती देहातीत दशा तुम्हाला येथे प्राप्त होऊ शकते. देहातीत अशी काही स्थिती असते हे लोकांना माहीतच नाही ना! देहातीत दशा शोधणारी माणसे असतात का? अशी माणसे नसतातच.

## समज नसेल तर साधना कशी करणार?

**प्रश्नकर्ता :** पण आत्मसाक्षात्कार तर खूप मोठी तपश्चर्या केल्यानंतर, साधना केल्यानंतर होतो ना?

**दादाश्री :** नाही, एवढी सारी तपस्या आणि साधना केल्यानंतरही गाढवाचा जन्म मिळतो! कारण दादर स्टेशन फक्त अर्धा मैल दूर होते मग तू बावीस मैल का भटकत राहिलास? तू रोड बिघडवलास, तेव्हा जा आता गाढव बन. अर्धाच मैल दूर होते, पण तू बावीस मैल फिरलास आणि तरी दादर स्टेशन आले नाही, काही भलतेच गाव आले. तेव्हा तो म्हणतो ठीक आहे, 'बावीस मैल भटकलो त्यातील साडे एकवीस मैलांचा तर फायदा मिळाला ना.' तर 'नाही, तू भटकलास आणि विनाकारण आमचा रोड झिजवलात, त्याचे पैसे काढ.' त्याचा दंड द्यावा लागतो, म्हणजे हे सर्व असे आहे. आत्मा प्राप्त होईल असा नाही. आणि आत्मा कोणाला मिळालेलाच नाही. सर्व जण म्हणतात, 'आम्ही ब्रह्मस्वरूप आहोत, आम्ही ब्रह्मस्वरूप आहोत.' त्यांना जर कोणी शिव्या दिल्या ना, तर ते ताबडतोब फणा काढतील, तेव्हा कळेल.

## अध्यात्माला बाधक कारणे

**प्रश्नकर्ता :** आत्मसाक्षात्कारासाठी जाती, पंथ, अशा गोष्टी बाधक असतात का?

**दादाश्री :** त्यासाठी काहीही बाधक नाही. आत्मसाक्षात्कार तर कोणाही माणसाला होऊ शकतो.

**प्रश्नकर्ता :** नाही, पण या पंथ आणि जाती वगैरे गोष्टी तर यात बाधक असतीलच ना?

**दादाश्री :** त्या कशा प्रकारे बाधक असतात तर जोपर्यंत जातीचा अहंकार असतो, तोपर्यंत त्या बाधक असतात, पंथाचा, जातीचा अहंकार बाधक असतो. आणि या बाधक गोष्टीतून बाहेर पडून जो कोणी 'ज्ञानी पुरुषां'चा शोध घेतो, तेव्हा त्याचे काम होते. नाहीतर हे मत आणि पंथवाले तर अजून खूप भटकतील. कारण भगवंतांकडे मत, जात, कशाचीच गरज नसते. तिथे पंथ आणि पोशाख यांची गरज नसते.

**प्रश्नकर्ता :** आवरणांपासून, कपड्यांपासून ते संसार आणि मुलेबाळे, ही सर्व अध्यात्म्याला बाधक आहेत का?

**दादाश्री :** खरे तर हे कोणीच बाधक नसतात. पण या सर्वांचा दबाव खूप असतो, त्यामुळे काही प्रमाणात हे बाधक आहेत आणि एका मर्यादेनंतर ते बाधक नाहीत, अशी काही मर्यादा असते. माझ्यासाठी कोणतीही गोष्ट बाधक नाही. हे जे सर्व कपडे मी घालतो, माझ्याजवळ ज्या काही गोष्टी आहेत, त्यातील कोणतीही गोष्ट बाधक नाही. तरी पण जर कोणी माझे कपडे काढून घेतले, ओढून घेतले तरी माझी हरकत नाही, आणि परत घातले तरी पण हरकत नाही. त्यात माझी कोणतीच हरकत नाही. ज्या प्रकारे (कर्मांचा) उदय असेल त्याप्रमाणे हा देह चालतो आणि मी त्याचा ज्ञाता-द्रष्टा आहे. हा देह माझा शेजारी आहे, अगदी शेजारी.

**प्रश्नकर्ता :** म्हणजेच अहंकार आणि ममता, या दोन्ही गोष्टी असतील तोपर्यंतच त्या अध्यात्म्याला बाधक आहेत?

**दादाश्री :** बाधक फक्त अहंकारच आहे. अहंकार आहे तोपर्यंतच ममता आहे. अहंकार नसेल तर मग ममता नसतेच. आणि 'मी पणा' हा अहंकार नाही. 'मी तर आहेच', स्वत:चे अस्तित्व तर आहेच. पण मी कोण आहे? याचे भान नसल्यामुळे अहंकार आहे.

## जगात अध्यात्ममार्ग कुठे आहे?

म्हणजेच जर कोणी असे महात्मा किंवा संतपुरुष असतील, ज्यांचे क्रोध-मान-माया-लोभ कमी झाले असतील, तर मग आम्ही त्यांना चालवून घेऊ शकतो. तिथे थोडेसे तरी अध्यात्म असते. थोडे म्हणजे एकदम प्राथमिक स्वरूपाचे. नाहीतर खरे अध्यात्म या जगात नाहीच. हे सर्व जण अध्यात्म असे बोलतात एवढेच. नाहीतर अध्यात्म या जगात नाहीच, अध्यात्म म्हणजे काय?

अध्यात्म हा असा रोड आहे की त्या रोडवर गेल्यानंतर इतर आधिभौतिक रोड दिसतच नाहीत. तो रोडच वेगळा आहे. म्हणजेच अध्यात्म सुरू केव्हा होते, तर जेव्हा दुसरे काही दिसणे बंद होते. तरी पण ते मनात राहते. त्याचे जे पर्याय आहेत, त्याच्या ज्या अवस्था आहेत, त्या सर्व मनात चिकटून राहतात, पण तो रोड दिसणे बंद होते. म्हणजेच जिथे मनात राहते, पण डोळ्यांनी दिसत नाही, अशी अवस्था म्हणजे अध्यात्म.

त्याचे काय आहे? की अध्यात्ममध्ये तर प्रथम चांगले आणि हितकारी काय आणि अहितकारी काय, याचा विवेक ठेवावा लागतो. हितकारी आपण ग्रहण करायला हवे आणि अहितकारीपासून दूर राहायला हवे, त्यासाठी प्रथम विवेक ठेवावा लागेल.

'चंदुभाई' हे तर व्यवहारात राहाण्यासाठी नाव आहे, तुम्ही फक्त चंदुभाईच नाही, तर या स्त्रीचे पती पण आहात, या मुलाचे पिता आहात, याचे मामा आहात, यांचे काका आहात, अशी खूप लफडी आहेत. ही लफडी आणि अध्यात्म, यात खूप अंतर आहे. या लफडी नसतील, तरच अध्यात्म जमू शकेल. आता ही लफडी अशी सोडून सुटतील अशी नसतात. आपण सोडल्या तरी पण त्या सुटतील का? इथे आलात तरी त्या परत तुम्हाला बोलवायला येतीलच, त्या सोडतील का?

म्हणजेच 'मी चंदुभाई आहे' हे व्यवहाराने ठीक आहे पण वास्तवात तसे नाही. तर मग 'वास्तवात आपण कोण आहोत' हे

जाणून घ्यायला हवे ना? योग्य पद्धत आपल्यासोबत येईल आणि व्यवहार तर इथेच राहील. नाम तर इथेच राहील ना? तुम्ही तर अनामी आहात.

जेव्हा सम्यक्दर्शन होईल तेव्हाच अध्यात्मात आला असे म्हणता येईल, नाहीतर तोपर्यंत तो अध्यात्मात आलेलाच नाही. मग जरी त्याने कितीही पुस्तके वाचली, तरी पण तो अध्यात्मात येऊ शकणार नाही. सम्यक्दर्शन झाले, 'जसे आहे तसे' दर्शन झाले की मगच माणूस अध्यात्मात येतो. म्हणजेच या सर्व 'रॉंग बिलीफ्स्' फॅक्चर होतात तेव्हाच 'राइट बिलीफ' बसते.

**प्रश्नकर्ता :** 'राइट बिलीफ'साठी मी काय करायला हवे? त्यासाठी 'मी शरीर नाही, मी शरीर नाही' असे बोलायला हवे का?

**दादाश्री :** नाही, त्याने काहीही होणार नाही. तसे कराल तर वेडे व्हाल आणि लोक पण तुम्हाला विचारतील की शरीर नाहीस तर तू कोण आहेस? म्हणून असे करायचे नाही. कित्येक जण असे करतात, ते वेडे होतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग 'मी एक आत्मा आहे' असे बोलायला हवे का?

**दादाश्री :** नाही, असे पण बोलू शकत नाही. एखादा मनुष्य झोपेत आपल्याला म्हणाला की 'तुम्ही जरा थांबा, मी पण सिनेमा पाहायला येत आहे.' तर तुम्ही किती वेळ थांबाल? अर्धा तास, एक तास आपण बसलो, तरीही तो उठला नाही, तर आपल्याला समजेलच ना की तो झोपेत बोलत आहे. त्याचप्रमाणे 'मी आत्मा आहे, मी आत्मा आहे' असे झोपेत बोलले तर त्याचा काय उपयोग?

**प्रश्नकर्ता :** 'आत्मा आहे' याचा अनुभव व्हायला हवा ना?

**दादाश्री :** हो, अनुभव होतो ना! पण 'ज्ञानी पुरुष' अनुभव करून देतात तेव्हा होतो.

**प्रश्नकर्ता :** पण स्वत: मला जर आत्म्याचा अनुभव घ्यायचा असेल तर कशा प्रकारे होऊ शकेल?

**दादाश्री :** मी ती पद्धत सांगितली ना, तर ती आहे तर सोपी, पण तुम्हाला ते जमणार नाही. सध्या लोकांचे मनोबळ पूर्ण संपले आहे.

तरी पण मी तुम्हाला एक मार्ग सांगतो की समजा तुमचा खिसा कापला गेला, आणि पाच हजार रुपये गेले, तर मग भगवंतांचा न्याय तुम्हाला काय सांगतो? की बाबा, हे तुझ्या कर्मांचे फळ आहे. म्हणून तुझ्या वाट्याला हा खिसेकापू आला. हे सर्व तुमच्याच कर्मांचे फळ आहे, तो खिसेकापू तर फक्त निमित्त आहे. पण हे लोक काय करतात? निमित्ताला चावा घेतात (दोषी ठरवतात). पण असे करू नये. उलट त्याला तर आशीर्वाद द्यावे की तू मला कर्मातून मुक्त केलेस. अशा प्रकारे राहायला जमेल का तुम्हाला? एवढी समज आली तरी खूप झाले! तुम्हाला खिसे कापणाऱ्याचे उपकार मानायला हवेत की त्याने तुम्हाला कर्मातून सोडवले. आणि जर कोणी तुम्हाला शिव्या दिल्या तर तेव्हा तुम्हाला 'हा माझा कर्माचा उदय आहे आणि ही व्यक्ती तर निमित्त आहे' हे (ज्ञान) हजर व्हायला हवे. जर कोणी मारले, हात कापला तरी पण 'हा माझ्या कर्मांचा उदय आहे, आणि हा निमित्त आहे' हे ज्ञान हजर राहिले तर तुम्हाला आत्मा प्राप्त होईल. पण या दूषमकाळामुळे तसे ज्ञान हजर राहत नाही. आणि माणसाचे मन इतके मजबूत पण राहू शकत नाही. या काळात ते तसे राहू शकत नाही ना! मन तर पूर्ण फ्रॅक्चर झाले आहे. आम्ही एकदा तुम्हाला जागृती दिली की मग ती जागृती जात नाही.

## पापे जळल्यामुळेच, लक्ष-जागृती राहते

जागृती केव्हा येते? पापे भस्मीभूत झाली तर जागृती येते. कृष्ण भगवंतांनी काय सांगितले आहे की 'ज्ञानी पुरुष' पापे भस्मीभूत करून टाकतात आणि पापे भस्मीभूत झाल्यावर निरंतर जागृती राहते आणि निरंतर जागृती राहणे हीच अंतिम दशा आहे. म्हणूनच मुळात जागृतीचीच आवश्यकता आहे. तुमची जागृती कमी आहे का?

**प्रश्नकर्ता :** हो दादा. सतत आत्म्याचा अनुभव होत राहायला हवा.

**दादाश्री :** हो. सतत म्हणजे निरंतर, रात्री पण विसर पडता कामा नये. तरच ओळखावे की आपण काहीतरी प्राप्त केले आहे. नाहीतर इतर काहीच उपयोगी नाही! नाहीतरी अनंत जन्मांपासून भेसळयुक्त आत्मा प्राप्त केला आहे. भेळ पण बारा रुपये किलो आणि हा भेसळयुक्त आत्मा पण बारा रुपये किलो, हे जे सगळे लोक आत्म्याबद्दल आरडाओरडा करत असतात ते सर्व बारा रुपये किलोच्या आत्म्याबद्दलच बोलत असतात. कोणी असे म्हणत नाही की घ्या, मी तुम्हाला खरा आत्मा देतो, घेऊन जा.

किंवा मग ते तुम्हाला स्मरण (नामस्मरण) देतील की हे स्मरण करत राहा. अरे, पण स्मरण देखील त्याच्यावर राग (मोह, आसक्ती) निर्माण होईल तरच केले जाईल आणि जिथे राग आहे, तिथे तर पूर्ण संसारच संसार आहे, आणि संसार आहे तिथे स्मरण आहे. स्मरण तर होताच कामा नये. दुसरा कोणताच मार्ग नसेल तर स्मरण हा उपाय आहे. तो तुम्हाला एकाग्र ठेवतो, पण दुसरा कोणताच मार्ग नसेल तर! नाहीतर आपोआप निरंतर लक्षात राहील, तोच खरा आत्मा. इतर सर्व भेसळवाले आत्मे आहेत.

## 'एका'शिवाय शून्य स्थिती निरुपयोगी

**प्रश्नकर्ता :** आत्मज्ञान म्हणजे स्वत:ला जाणणे, असेच ना?

**दादाश्री :** हो, स्वत:ला जाणणे, बस आणखी काही नाही.

**प्रश्नकर्ता :** जर एखाद्या वस्तूला नीट जाणून घ्यायचे असेल तर तिच्यात खोल उतरायला हवे. याच प्रकारे आत्म्याला जाणायचे असेल तर स्वत:च्या आत खोल उतरायला हवे ना?

**दादाश्री :** आपापल्या परीने सगळे जण उतरतातच ना! याच प्रकारे ज्यानी वेदांत बनवला, ते सर्व उतरले. शेवटी त्यांनी चार वेद

बनविले, आणि मग म्हणाले की 'दिज इज नॉट दॅट, दिस इज नॉट दॅट' (हे ते नाही, हे ते नाही). वेदांद्वारे आत्मा जाणता येईल असे नाही.

**प्रश्नकर्ता :** आत्मा जाणता येईल असा नाही, तर मग तो कसा आहे?

**दादाश्री :** जाणता येईल असा पण नाही आणि बोलता येईल असा पण नाही. बोलण्यात पण जोखीम आहे. म्हणून चारी वेदांनी पण मनाई केली आहे. वाणीने वर्णन करता येईल असा तो नाही. व्यक्त होईल असा आत्मा नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मानुभव कशा प्रकारे होईल?

**दादाश्री :** सध्या तुम्हाला कसला अनुभव आहे?

**प्रश्नकर्ता :** सध्या 'शून्यावस्था' करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**दादाश्री :** शून्य म्हणजे?

**प्रश्नकर्ता :** संक्लप-विकल्प न येणे, म्हणजेच शून्य.

**दादाश्री :** समोरासमोरून दोन इंजिने सोडली, एक या दिशेने आणि दुसरे या दिशेने समोरून आले आणि दोन्ही पूर्ण वेगात आली तर काय स्थिती होईल?

**प्रश्नकर्ता :** जोरात अपघात होईल.

**दादाश्री :** अशी टक्कर होईल की इंजिने पण अशी उभी होऊन जातील! आपले लोक जे आत्म्याचे ध्यान, शून्य अवस्था असे सर्व करतात ते त्यासारखेच आहे. शून्य म्हणजे काय ते न समजताच लोक शून्यावस्थेत जाण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. एक संख्या जर आधाराला नसेल तर सर्व शून्ये बेकार आहेत. एक असेल तरच शून्य कामाचे आहे. मग तुम्ही शून्य अवस्था कशी काय करता?

**प्रश्नकर्ता :** आम्ही शांत बसतो आणि मग जे संकल्प-विकल्प येतात त्यांना बंद करण्याचा प्रयत्न करतो.

**दादाश्री :** तरी पण संकल्प-विकल्प येतच राहतात ना? हो, आपली इच्छा नसते, तरी पण हे असे कोण करते? आतमध्ये कोणी घोटाळा करणारा घुसला आहे का?

**प्रश्नकर्ता :** ती तर प्रकृती आहे.

**दादाश्री :** तुम्ही प्रकृतीत आहात की पुरुषात आहात, सांगा बरे.

**प्रश्नकर्ता :** पुरुषात.

**दादाश्री :** तुम्हाला 'पुरुष' कोणी बनवले?

**प्रश्नकर्ता :** त्याचे ज्ञान मला नाही.

**दादाश्री :** तुम्हाला कोणी म्हटले की 'या चंदुभाईने सर्व बिघडविले आहे' तर तुमच्यावर काही परिणाम होतो का?

**प्रश्नकर्ता :** जर आम्ही बिघडविले असेल तर मग आम्हाला कबूल करावे लागेल.

**दादाश्री :** समजा, तुम्ही बिघडविले नसेल तरी कोणी तुम्हाला म्हटले की चंदुभाईने बिघडविले तर तुमच्यावर काही परिणाम होतो का?

**प्रश्नकर्ता :** लोक तर असे बोलतच असतात.

**दादाश्री :** असे होय? चंदुभाईच्या नावाचा तुमच्यावर काहीच परिणाम होणार नाही?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** आणि खिशातून पाच हजार रुपये असलेले पाकीट कोणी पळवून नेले तरी परिणाम होणार नाही?

**प्रश्नकर्ता :** होईल. ते तर आपले जीवन निर्वाहाचे साधन आहे.

**दादाश्री :** मग तेव्हा शून्य कुठे गेले? तरी पण या प्रकारे शांती ठेवता हे चांगलेच आहे, चूक नाही. पण हा सर्व शून्याचा मार्ग नाही.

त्यासाठी तर प्रथम आत्मा प्राप्त करायला हवा. आत्मा जाणायला हवा. आत्मा जाणल्यानंतरच शून्य स्थिती येते.

## 'आत्मा' तर निरीक्षकाच्याही पलीकडे

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मसाक्षात्कारांसाठी कोणते साधन सर्वश्रेष्ठ आहे?

**दादाश्री :** त्याशिवाय दुसरे कोणते साधन आहे तुमच्याकडे? तुम्हाला साध्य बनायचे आहे, पण तुम्हाला आणखी दुसरे कोणते साधन वाटते?

**प्रश्नकर्ता :** अर्धा तास आत्मनिरीक्षण करायचे.

**दादाश्री :** आत्म्याला ओळखून निरीक्षण करता की ओळल्याशिवाय करता?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याला ओळखले तर मग आणखी शिल्लक उरलेच काय?

**दादाश्री :** तर मग आत्मनिरीक्षण कुणाचे करता?

**प्रश्नकर्ता :** जे विचार येतात, त्यांचे.

**दादाश्री :** ओहोहो! विचारांचे? विचार तर मनातून येतात आणि मन हे स्वतः जड आहे. 'कम्प्लीट फिजिकल' आहे. म्हणजेच मनाच्या विचारांचा तुम्ही स्टडी (अभ्यास) करता. जो स्टडी करतो ना, तो अहंकार आहे. आणि आत्मा अहंकाराच्या पलीकडे आहे.

## अनुभूतीबद्दल चुकीची समज

**प्रश्नकर्ता :** मला आत्म्याचा जो अनुभव येतो तो मी सांगतो. जणू पाण्याचे फवारे उडतात तसा आत आनंद-आनंद वाटतो.

**दादाश्री :** हो, आत्म्याची आठवण झाल्यावर कोणाला पाण्याचे फवारे उडल्यासारखे वाटते, कोणाला प्रकाश दिसतो, असे सर्व होते.

**प्रश्नकर्ता :** फवारे उडणे हे ठीक आहे पण आतमध्ये आनंद–आनंद वाटत राहतो.

**दादाश्री :** हो, पण आतमध्ये अशा सर्व कल्पना होत राहतात. म्हणजे त्या दिशेने नुसता विचार केला तरी एवढा आनंद वाटतो, तर मग प्रत्यक्ष जर तिथे पोहोचलात तर किती आनंद होईल?

एक भाऊ एका स्वच्छ, सरळ हृदयाच्या संतांकडे गेले होते. नंतर येऊन मला सांगू लागले की 'मला तर अनुभव झाला आहे.' मी विचारले 'कशाचा अनुभव झाला आहे?' तेव्हा म्हणाले 'आत्म्याचा अनुभव झाला आहे.' मी म्हटले आत्म्याची सावली पण अजून कोणी पाहिलेली नाही. जरी आत्म्यापर्यंत पोहोचला नसेल पण आत्म्याची सावली, जशी माणसाच्या मागे माणसाची सावली पडते आणि त्या सावलीवर आपण पाय ठेवतो, त्याचप्रकारे आत्म्याच्या सावलीपर्यंत पोहोचला तरी समकित प्राप्त होईल. म्हणजेच हे तर आत्म्याच्या सावलीपर्यंत पण पोहोचलेले नाहीत.

आपल्या हिंदुस्तानात बरेच लोक असे म्हणतात की अनुभूती झाली आहे. आता जर अनुभूती झाली असेल तर मग तुम्ही भगवंतच झालात, त्यांना कृष्ण भगवंतच म्हणावे लागेल. पण या प्रकारे जे लोक अनुभव आला असे म्हणतात, ती थापेबाजी आहे, खरे तर काहीच पदरी पडलेले नाही.

मी त्यांना विचारले, 'तुम्ही अनुभूती कशाला म्हणता?' तेव्हा ते म्हणाले 'मला ते माहीत नाही. पण मला असे वाटते की त्यावेळी जो आनंद वाटतो, तो आत्म्याचाच आनंद आहे.' तेव्हा मी सांगितले 'तो आत्म्याचा आनंद नाही, अजून तर आत्मा प्राप्त केलेला नाही. आत्म्याबद्दल काही ऐकलेलेच नाही. अरे! आत्म्याची सावली देखील पाहिली नाही. हा सगळा तर मनाचा आनंद आहे. संयोग मिळाले की तेव्हा मनाचा आनंद उत्पन्न होतो.' तेव्हा ते म्हणाले 'जेव्हा आनंद होतो, तेव्हा आम्ही तर समजतो की हा आत्म्याचाच आनंद उत्पन्न झाला आहे.' 'अरे, हा

आत्म्याचा आनंद नव्हे, हा तर मनाचा आनंद आहे. आत्म्याचा आनंद तर एकदा मिळाल्यावर तो परत कधी जातच नाही.' त्यावर ते म्हणाले, 'आता मला तुमचे म्हणणे बरोबर वाटते. पण आमचे सर्व गुरू तर आम्हाला असेच सांगत होते की हा आत्म्याचाच आनंद आहे. हीच अनुभूती आहे.' मी म्हटले, 'नाही, ही अनुभूती नाही. यामुळे तर तुम्ही दोन पायातून चार पायात जाल.' या लोकांनी बिचाऱ्यांना असे उलटच शिकवले आहे. मानसिक अज्ञानाचा आनंद भोगणे हेच अधोगतीचे कारण आहे. खरे तर ज्ञानाचा आनंदच भोगण्यायोग्य आहे.

अज्ञानाने मानसिक आनंद भोगणे हेच अधोगतीचे कारण आहे. जगातील लोक सतत या मानसिक आनंदातच राहतात. थोडी उपाधी होते पण परत मानसिक आनंदाचा रस्ता शोधून काढला की परत गाडी चालू लागते...

## मानलेले नाही, तर जाणलेले ज्ञान हवे

संसार रोग कमी झाला आहे की नाही एवढेच पाहायचे आहे. जर कधी डॉक्टरांकडे जाऊन रोग कमी झाला नाही, तर मग आपलीच चूक होत आहे.

**प्रश्नकर्ता :** कमी झाला आहे,

**दादाश्री :** काय कमी झाला आहे?

**प्रश्नकर्ता :** मनाने कमी झाला म्हणजे सर्व काही कमी झाले. मनाने प्रत्येक गोष्टीचा त्याग झाला म्हणजे सर्व काही झाले.

**दादाश्री :** हो, पण ग्रहण काय केले? त्याग झाला म्हणजे तुम्ही रिकामे झालात. तुमच्याजवळ काहीच उरले नाही ना? त्यामुळे तुम्ही गरीब झालात म्हणून मग गरीबी येते.

**प्रश्नकर्ता :** संसाराबद्दल विचारत आहात ना? संसारासाठी तर त्यागाचीच गरज आहे. ज्या गोष्टी ग्रहण करायच्या असतात त्या तर आम्ही ग्रहण करतोच.

**दादाश्री :** ग्रहण करणे हेच कठीण आहे. नाहीतर त्याग तर सर्व प्रकारे होऊ शकतो.

**प्रश्नकर्ता :** त्याग पण होऊ शकत नाही. त्याग कसा होऊ शकेल? बाह्य त्याग वेगळा, आतील त्याग वेगळा. त्याग तर आतून व्हायला हवा ना?

**दादाश्री :** आतील त्याग हवा, तर तो होऊ शकेल. असे त्याग करणारे तर खूप आहेत. ग्रहण काय केले ते पाहायचे आहे. त्याग केला तर त्या जागी व्हॅक्यूम (पोकळी) निर्माण होते. मग तिथे काय ठेवणार?

**प्रश्नकर्ता :** तिथे तर एकच 'सर्व खल्विदम् ब्रह्म'आणखी काय असणार?

**दादाश्री :** पण ब्रह्म म्हणजे काय?

**प्रश्नकर्ता :** ब्रह्म म्हणजे आत्मा.

**दादाश्री :** ब्रह्म कसे काय असू शकेल? ब्रह्म तर प्रकट होतच नाही ना! ब्रह्म कधी प्रकट होईल? तर क्रोध-मान-माया-लोभ आणि ममता जाईल तेव्हा ब्रह्म प्रकट होईल, नाहीतर तोपर्यंत ब्रह्म प्रकट होणारच नाही ना! तोपर्यंत देहाध्यास सुटणारच नाही ना!

**प्रश्नकर्ता :** आता माझ्यात काय उणीवा आहेत, हे तुम्ही पाहू शकता, मी कसे काय सांगू शकणार?

**दादाश्री :** नाही, आम्ही उणीवा का पाहू? उणीवा तर तुमच्या तुम्हालाच दिसायला हव्यात की अजून माझ्यात किती लोभ आहे, किंवा माझ्यात क्रोध आहे, असे सगळे तुम्हाला स्वत:लाच दिसले पाहिजे. तुमच्यात क्रोध-मान-माया-लोभ असे काही नाही ना? आता जर कोणी तुम्हाला डिवचले तर?

त्याचे काय आहे की जर कोणी 'उधना' स्टेशनवर बसून राहिला असेल आणि तो जर मला म्हणाला की मला वेस्टर्न रेल्वेच्या ज्या

शेवटच्या स्टेशनला जायचे होते तिथे मी पोहोचलो आहे. तर मी त्याला सांगेन की 'बाबा रे, इथे बसून राहू नकोस, तुला अजून खूप पुढे जायचे आहे.' आणि मी सांगेन की 'चूपचाप गाडीत बस.' म्हणजे माझे काम काय आहे? तर जे इकडे-तिकडे बसले आहेत त्यांना तिथून उठवून गाडीत बसवून देणे. मनात सर्व मानून घेतल्याने काही होणार नाही.

**प्रश्नकर्ता :** मला आता निवृत्तीत जाण्याचा विचार आहे तर त्या मार्गावर मला स्थिर करा. या खेरीज मला काहीच नको.

**दादाश्री :** बरोबर आहे. ते तर मी करीन, तुमचे म्हणणे खरे आहे. संसार रोग गेला तरच काम होईल ना! पण असे आहे की, हा संसार रोग जाईल असा नाही. संसार रोग असा नाही की तो निघून जाईल. या बाजूचा रोग गेला तर दुसऱ्या बाजूचा रोग लागू होतो.

**प्रश्नकर्ता :** आयुष्यात असे सर्व तर होतच राहणार.

**दादाश्री :** हो, होतच राहणार, तेच तर मी म्हणतो आहे ना! म्हणजे हे नाव सुटत नाही, ममता सुटत नाही. तिथे काहीतरी ठेवले असेल तर त्याची आठवण येत राहते. आठवण येते याचे कारण काय? तिथे काय तार जोडली आहे? तार जोडली आहे का? नाही. तार जोडलेली नाही, तरी आठवण येते, लक्षातच राहते. या ठिकाणी हे ठेवले आहे, त्या ठिकाणी हे ठेवले आहे.

**प्रश्नकर्ता :** पण ठेवले तर आठवण येईल ना? जर ठेवलेच नाही तर मग तो कसली आठवण काढील?

**दादाश्री :** नाही, हे मी तुमच्याबद्दल बोलत नाही. हे सर्व तर मी सर्व साधारणपणे बोलत आहे. आम्ही कोणा एका व्यक्तीला असे सांगू शकत नाही. पण तुम्हाला या सर्व गोष्टींचा शोध घ्यावा लागेल. कारण जर उधना स्टेशनवर तुम्ही बसून राहिलात आणि हेच वेस्टर्न रेल्वेचे अंतिम स्टेशन आहे, म्हणून माझे काम पूर्ण झाले असे मानून घेतल्याने काही निष्पन्न होईल का?

**प्रश्नकर्ता :** पण कुठे जायचे आहे ते तर ठरलेले असावे ना?

**दादाश्री :** तसे तर सगळेच जाणतात की आपल्याला मुक्ती हवी आहे, आपल्याला मोक्ष हवा आहे. हे शब्दाने जाणतात. आपल्याला आत्मा बनायचे आहे, हे लोक जाणतात. पण ते कुठे बसले आहेत, हे मात्र त्यांना ठाऊक नसते ना! हे माहीत असायला हवे की नाही? कुठे बसले आहेत हे तर माहीतच नसते ना? म्हणूनच मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे ना! जोपर्यंत मी स्पष्टपणे सांगत नाही, तोपर्यंत तो आपला माल-सामान फेकून देणार नाही.

म्हणून याचे निराकरण केले पाहिजे. माणूस स्वत: 'मी कोणत्या स्टेशनवर बसलो आहे' हे समजू शकत नाही. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' त्याला सांगतील 'बाबा रे, अजून तर पुष्कळ स्टेशन्स् बाकी आहेत. उगाच असाच बसून राहू नकोस. चल, कुठल्या तरी गाडीत बस.'

**प्रश्नकर्ता :** पण दादा, इथे तर असे होते की खूप जण सांगतात की या गाडीत बस. म्हणून तो त्या गाडीत बसतो आणि नंतर परत उतरतो. हीच अडचण आहे.

**दादाश्री :** हाच धंदा चालू आहे, बसतो आणि उतरतो, बसतो आणि उतरतो!

## 'ज्ञानीं'शिवाय कोटी-कोटी उपाय पण व्यर्थ

संसार रोग मिटवण्यासाठी लोक काय करतात की झाडाची पाने खुडून टाकतात किंवा फांदी कापतात. आणि मग मनात असे मानतात की आता झाड वाळून जाईल. पण ते झाड दोन महिन्यानंतर परत उगवते, तेव्हा पश्चात्ताप होतो. म्हणजेच जे लोक झाडाची पाने कापतात, मोठ्या-मोठ्या फांद्या कापतात, ते पण फसतात, काहीच उपयोग होत नाही. परत फांद्या फुटतात. काही जण मोठ्या-मोठ्या जाड फांद्या कापतात तरी पण फसतात आणि काही जण मुख्य खोडच कापतात, तरीही झाड परत उगवते. म्हणजे या संसार रोगाचा उपाय करून करून पुष्कळ लोक

पार थकून गेले आहेत. म्हणून भगवंतानी म्हटले आहे 'साऱ्या जगात क्वचितच कधी एखादे असे ज्ञानी प्रकट होतात, रोज नाही. शंभर शंभर वर्षात पण नाही, क्वचितच कधी एखादे अवतरित होतात, तेव्हाच आपले (मोक्षाचे) काम होऊ शकते.' नाहीतर इथे तर सर्वच दुकानदार असेच म्हणतात की आमचे दुकान चांगले आहे. सगळयात चांगला माल, उत्तम माल फक्त आमच्याच दुकानात आहे. आणि लोक तर बिचारे भोळे असतात ना, भोळे, आणि हव्यासी असतात, म्हणनू मग ते फसतात. परंतु जर आत हव्यास नसेल तर ते खरी गोष्ट शोधून काढतील. ज्यांना मान-पान अशा कोणत्याही प्रकारचा हव्यास नसेल, फक्त आत्मा जाणण्याचाच हव्यास असेल, त्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही हव्यास नसेल तर ते शोधून काढतातच.

एकच दिवस जरी हे लोक मन-वचन-काया यापासून शांत राहतील, स्वतः अहंकार करून क्रोध-मान-माया-लोभ करणार नाहीत, तरी पण त्यांचे ज्ञान खूप वाढेल. कारण त्यांना कषायरहित असलेल्या एका दिवसाचा अनुभव होते. या सर्व लोकांना तर असा अनुभव एक तासभर पण झालेला नाही. अनुभव का होत नाही? कारण त्यांचे चित्त तर कायम क्रोध-मान-माया-लोभ यातच अडकलेले असते. मग अनुभव कसा येईल? अनुभव होण्यासाठी प्रथम 'चेतन'ला जाणून घ्यायला हवे.

## जगात 'चेतन' कधी जाणले जाऊ शकते?

**प्रश्नकर्ता :** 'चेतन'चा तुम्ही काय अर्थ करता?

**दादाश्री :** भगवंत. आणि भगवंत म्हणजेच चेतन. त्याचा अर्थ एकच असेल ना! दोन अर्थ कधीच नसतात. तरी पण जर कोणी दुसरा कोणता चुकीचा अर्थ समजत असेल तर ती गोष्ट वेगळी. नाहीतर खरा अर्थ तर फक्त एकच आहे ना! मग पितळेला सोने मानून चालले तर ते चालणारच नाही. बाजारात विकायला जाल, तेव्हा समजेल.

**प्रश्नकर्ता :** चेतनाला कशा प्रकारे पाहावे? चेतनाला पाहायचे काय साधन आहे?

**दादाश्री :** तशा दृष्टीची, तशा ज्ञानाची गरज आहे.

**प्रश्नकर्ता :** ते कुठे मिळेल?

**दादाश्री :** ती तर, जे मोक्षाचे दान देण्यासाठी आले असतील, असे 'ज्ञानी पुरुष' असतील, तर त्यांच्याकडून ती दृष्टी मिळेल, ते ज्ञान मिळेल. आणि असे 'ज्ञानी पुरुष' क्वचितच कधी, हजारो वर्षात कधीतरीच येतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग इतर सर्वांना जी अनुभूती होते, ती खरी असते की खोटी.

**दादाश्री :** अनुभूती? ती अनुभूती तर पितळाला सोने मानण्यासारखी आहे. त्याने दिवस बदलणार नाहीत. लाख जन्म गेले तरी पण काही होणार नाही ना?

**प्रश्नकर्ता :** जगात सध्या असा अनुभव घेतलेली कोणीच व्यक्ती नसेल का?

**दादाश्री :** अशी व्यक्ती नसतेच. ज्याला अनुभव आला तो परमात्मा होऊन गेला. तसे परमात्मा आहेत का इथे?

**प्रश्नकर्ता :** कदाचित असतीलही, पण आम्ही त्यांना ओळखू शकलो नाही तर?

**दादाश्री :** नाही, ताबडतोब समजेल. जर कधी दोन शब्द बोलले तरी समजेल आणि पाच शिष्यांना त्यांनी शांती दिली असेल आणि त्यांचे मतभेद पूर्ण संपले असतील.

असे आहे की, आत्मा लवकर जाणता येईल असा नाही. 'चेतन'ला जाणण्यासाठी माणसाजवळ असे कोणतेच साधन नाही की ज्यामुळे त्याला जाणता येईल.

**प्रश्नकर्ता :** तर मग ते जाणण्यासाठी प्रयत्नच करायचा नाही का?

**दादाश्री :** जे प्रयत्न करतात, त्यांच्या हातात कोणतीच सत्ता नसते. तुम्हाला असे वाटते की हे सर्व मीच चालवतो, आणि मीच झोपतो, मीच उठतो, मी प्रयत्न केले. असे जे वाटते ती तर सर्व परसत्ता आहे आणि तिलाच तुम्ही स्व-सत्ता मानता.

'चेतन' तर दिव्यचक्षुशिवाय जाणताच येत नाही आणि दिव्यचक्षु फक्त 'ज्ञानी पुरुषां'च्या कृपेनेच प्राप्त होतात.

सध्या तुमची मिथ्यादृष्टी आहे. मिथ्यादर्शन म्हणजे जे फक्त नाशवंत गोष्टीच दाखवते, अविनाशी दाखवतच नाही. म्हणून मग तुम्ही चेतनाला पाहूच शकत नाही ना! हे सर्व तुम्हाला समजले का?

**प्रश्नकर्ता :** आत्मानुभव म्हणजेच सम्यक्दर्शन असेच ना?

**दादाश्री :** कषाय उपशम होतात. कषाय अजिबात राहत नाहीत आणि अठ्ठेचाळीस मिनिटे आनंदच वाटत राहिला तर त्याला सम्यक्दर्शन म्हणतात. कषाय उपशम होतात ते पण अठ्ठेचाळीस मिनिटेच, एकोणपन्नास नाही.

**प्रश्नकर्ता :** कषायांचा उपशम होणे, हे कशावर आधारित आहे?

**दादाश्री :** आसपासच्या संयोगावर आधारित आहे. आणि त्याचे एकच कारण आहे, असे नाही. कोणत्याही कारणामुळे, काही पाहिल्यामुळेही त्याचे कषाय उपशम होऊ शकतात.

## देहाध्यास सुटल्यावर आत्मानुभव

**प्रश्नकर्ता :** आत्मदर्शन झाले हे कसे कळेल?

**दादाश्री :** हा देहाध्यास आहे असे तुम्हाला कळते की नाही? 'मी चंदुभाई आहे' हे समजते ना? 'या स्त्रीचा पती आहे' असे कळते की नाही? तुमच्या मुलाला पाहून लगेच ज्ञान हजर होते ना की 'मी याचा बाप आहे' की तुम्ही विसरता?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** देहाध्यास आहे म्हणून हे सगळे हजर होते. तर मग आत्मदर्शन झाले तर इतर सर्व हजर होते. अज्ञानात हे असे सर्व हजर होते आणि ज्ञानात तसे सर्व हजर होते.

ज्यांचा देहाध्यास सुटला आहे, त्यांना आत्म्याचा अनुभव होतो. हिंदुस्तानात दिवा घेऊन शोधाल तरी ज्याचा देहाध्यास सुटला आहे असा माणूस मिळणार नाही. दिवा घेऊन शोधत राहिलात, गुहात शोधले तरी पण मिळणार नाही. गुहात तर असे कोणी नसतातच. गुहात तर तप करत राहतात. गुहांमध्ये ज्ञान नसतेच.

म्हणजेच जेव्हा एखाद्याचा देहाध्यास सुटलेला असतो, तेव्हा आपण समजायला हवे की ही अनुभूती आहे, नाहीतर त्याला अनुभूती म्हणता येणार नाही. आणि ज्याचा देहाध्यास गेला आहे, त्याचे आणखी काय काय गेलेले असते? तर अहंकार आणि ममता दोन्हीही गेलेले असतात. ते देखील काही अंशच जातात, संपूर्णपणे जात नाहीत. कदाचित अहंकार कमी झाला आहे अशी व्यक्ती मिळेलही, पण ममता कोणाचीच कमी झालेली नसते.

आणि जेव्हा जेवण येते, तेव्हा तुम्ही पहाल की देहाध्यासवाली व्यक्ती, ते महाराज असोत किंवा इतर कोणी असोत, ते स्वत:ची थाळीच जपून ठेवतात. 'इतरांना द्यावे' असे काहीच नाही, तर मग त्यांचा देहाध्यास सुटला आहे असे कसे म्हणणार? आता या देहाध्यासातून तो कसा सुटेल?

## अहाहा! किती अद्भूत आहे हे आत्मज्ञान

**प्रश्नकर्ता :** जेव्हा आत्मज्ञान होते, तेव्हा शरीरात काय बदल होतात की ज्यामुळे आपल्याला समजते की आत्मज्ञान झाले आहे?

**दादाश्री :** आत्मज्ञान झाल्यानंतर जर कोणी आपल्याला शिव्या दिल्या तरी त्या आतपर्यंत पोहोचत नाहीत आणि मनात असे वाटते की हा तर बिचारा निमित्त आहे, यात त्याचा काय दोष आहे? शिव्या देणारा पण निमित्त वाटतो, खिसे कापणारा पण निमित्त वाटतो.

उलट बोलणे, याला अज्ञान म्हणतात आणि सरळ बोलणे त्याला ज्ञान म्हणतात. आत्मज्ञानी सर्व सरळ बोलतात. याउलट अज्ञानी तर सर्व उलटच बोलतात. खिसे कापणाऱ्यालाच पकडतात आणि निमित्तालाच चावायला धावतात.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे निरभिमानी बनणे आणि कोणाला दोष न देणे, असे असेल तर याला आत्मज्ञान आहे असे समजावे का?

**दादाश्री :** हो, निरभिमानी झाला आणि कोणाला दोष देईनासा झाला आणि सर्वांचे दु:ख स्वत:कडे घेऊ लागला, तर समजून जा की सुटका झाली. आत्मज्ञानीला संसाराची दु:खे स्पर्श करीत नाहीत.

आत्मा प्राप्त झाल्यानंतर पाच डिग्री ताप आला तरी आत्मा वेगळा राहतो. ताप आला तरी पण आत्मा वेगळा राहतो. अशा व्यक्तीला सतत आत्म्याचा अनुभव होत असतो.

एका माणसाला पक्षाघात झाला होता, तेव्हा तो म्हणाला 'लोक मला पाहायला आले आहेत पण मी स्वत:च ज्याला पक्षाघात झाला आहे त्याला पाहत आहे ना! या पायाला असे झाले आहे, या हाताला असे झाले आहे असे सर्व मी पण पाहत आहे!' म्हणजेच स्वत: पण पाहणारा आणि पाहायला आलेले पण पाहणारे! असा या ज्ञानाचा प्रभाव आहे. पक्षाघात झाला तरी असा प्रभाव आहे. आणि ज्ञान नसेल तर मात्र 'मला पक्षाघात झाला, मला ताप आला', ही सगळी मरण्याची लक्षणे आहेत.

'मला झाले' असे म्हटल्यावर 'रिपेअर' (दुरुस्त) कोण करणार? आणि 'मी' यातून मुक्त झाला तर मग आपोआप 'रिपेअर' होईलच. निसर्गाचा नियमच असा आहे की ताबडतोब 'रिपेअर' होऊनच जाते.

म्हणजे आत्मा प्राप्त झाला असे कधी म्हटले जाऊ शकते? त्याची मी तुम्हाला लक्षणे सांगतो की आत्मा प्राप्त झाल्यानंतर शरीर दुखत असेल, डोके दुखत असेल तरी आतमध्ये समाधी असते. बाहेर कोणी शिव्या देत असेल तरी पण समाधी असते, दु:खातही समाधी असते,

ही आत्मज्ञानाची चिन्हे आहेत. या काळात असे नसतेच, तरी पण इथे झाले आहे.

आत्मा प्राप्त झाल्यानंतर आता जे अनुभव आहेत ते सर्व संपून जातील. 'हा माझा मुलगा आहे आणि हे माझे मामा आहेत' असे सर्व अनुभव संपतील. 'हे मी केले आणि हे त्याने केले' असे सर्व अनुभव संपतील. सध्या तुम्हाला जे जे अनुभव येत आहेत ते सर्व संपतील.

स्वतःला परमात्मापणाचा अनुभव येतो की 'मी परमात्मा आहे.' तेव्हा मग चिंता आणि दुःख होत नाहीत. तुम्हाला आता जे अनुभव होत आहेत, त्यातील एक पण अनुभव नंतर तिथे होत नाही. चिंता होत नाही, उपाधी होत नाही, व्याधी होत नाही, आधी होत नाही, काहीच होत नाही. तुम्हाला आता समजले ना? काय काय होत नाही? आता जे आहे, ते सर्व तिथे असूनही पीडा-त्रास, उपाधी होत नाहीत.

## हे जाणणारा, किती शक्तीमान!

**दादाश्री :** अजूनही तुम्हाला देहाध्यास आहे ना?

**प्रश्नकर्ता :** सध्या तर देहाबरोबर एकात्मता झाली आहे.

**दादाश्री :** हो, त्यालाच देहाध्यास म्हणतात आणि देहाध्यास संपला की मग सुटका झाली.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही यांना विचारले की देहाध्यास आहे का? तेव्हा हे म्हणाले की देहाबरोबर एकात्मता झाली आहे. तर अशी एकात्मता आहेच, हे कसे समजले?

**दादाश्री :** 'मूळ आत्मा' तर वेगळाच आहे ना, म्हणून त्याला समजते. मूळ आत्मा याहून वेगळा आहे. 'तुम्ही' मानलेला आत्मा तो 'मेकॅनिकल आत्मा' आहे. त्यालाच काही जणांनी 'व्यवहार आत्मा' म्हटले आहे. आणि आम्ही त्याला 'प्रतिष्ठित आत्मा' म्हटले आहे. पण या आत्म्याला तुम्ही असे मानता की 'हा मी आहे.' खातो, पितो, झोपतो, त्याला 'तुम्ही' असे समजता की 'मी झोपलो.' आणि त्यालाच आत्मा

म्हटले जात आहे, पण तो 'व्यवहार आत्मा' आहे. 'खरा आत्मा' हा अशा सांसारिक बाबतीत पडतच नाही. 'खरा आत्मा' या सर्वांना सतत 'जाणत'च राहतो. आणि तो 'जाणत' असतो म्हणून 'तुम्हाला' आतमध्ये कळते की 'मला देहाध्यासच आहे, तन्मयाकार परिणामच आहेत.' म्हणजेच हे सर्व जाणले कुणी? तर जाणणाऱ्याने जाणले. तन्मयाकार परिणाम भोगणाऱ्याने भोगले. तर मग हा जाणणारा किती शक्तीमान असेल? त्या जाणणाऱ्याला जर एकदा ओळखले की मग झाले! एकदाच ओळख झाली तरी पुरे, कामच झाले, असे समजावे.

## अरूपीला अरूपीचा साक्षात्कार

**प्रश्नकर्ता :** आत्मा अरूपी आहे तर त्याचा साक्षात्कार कशा प्रकारे होतो?

**दादाश्री :** त्याचे असे आहे की, साक्षात्कार करणारा 'स्वतः'ही अरूपी आहे. साक्षात्कार करणारा रूपी नाही. म्हणजेच स्वभावाला स्वभाव मिळतो.

**प्रश्नकर्ता :** जेव्हा साक्षात्कार होतो, तेव्हा काय होते?

**दादाश्री :** जागृती एकदम वाढते. कृपाळूदेवांनी काय म्हटले आहे,

*'वर्ते निज स्वभावनुं, अनुभव-लक्ष-प्रतीत,*
*वृत्ती वहे निजभावमां, परमार्थे समकित.'*

म्हणजे जेव्हा साक्षात्कार होतो, तेव्हा वृत्ती परत फिरतात. आणि निज-स्वभावात राहतात. वृत्ती जरी बाहेर गेल्या तरी त्या ताबडतोब परत येतात. नाहीतर वृत्तींना परत बोलावले तरी त्या येत नाहीत आणि काही वृत्ती तर घराच्या बाहेरच पडलेली असतात.

## अनुभव भिन्न! साक्षात्कार भिन्न!

**प्रश्नकर्ता :** आत्मानुभव आणि आत्मसाक्षात्कार, हे दोन शब्द वेगवेगळे आहेत, तर त्यात काय 'डिफरन्स' (फरक) आहे?

**दादाश्री :** साक्षात्कार तर वेगळी गोष्ट आहे आणि अनुभव तर जेव्हा पुढे पुढे जाल, तेव्हा त्याला अनुभव म्हणता येईल.

**प्रश्नकर्ता :** तर मग लोक साक्षात्कार कशाला म्हणतात?

**दादाश्री :** 'हे' जे ज्ञान देतो ना, त्याला साक्षात्कार म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** मग हा साक्षात्कार तर प्रतीतीपेक्षा पण कनिष्ठ झाला?

**दादाश्री :** जेव्हा साक्षात्कार होतो, तेव्हा 'त्याला' प्रतीती बसते (फिट होते). नाहीतर 'मी चंदुभाई आहे' ही 'त्याची' प्रतीती जातच नाही ना!

## अनुभवीच आत्मानुभव करवू शकतात

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा अनुभव कोणत्या गुणस्थानकावर पोहोचले तर होतो?

**दादाश्री :** आत्म्याचा अनुभव चौथ्या गुणस्थानकावर पण होऊ शकतो, पाचव्यात किंवा सहाव्यात पण होऊ शकतो.

**प्रश्नकर्ता :** या काळात आत्म्याचा अनुभव होऊ शकतो की नाही?

**दादाश्री :** या काळात आत्म्याचा अनुभव होऊ शकतो आणि सुमारे दहा-बारा हजार लोकांना तो झालाही आहे! 'हे सर्व' जे 'इथे' बसले आहेत ना, त्या सर्वांना आत्म्याचा अनुभव झालेला आहे. 'अनुभवी पुरुष' भेटायला हवेत तरच आत्म्याचा अनुभव मिळू शकतो, नाहीतर तो होऊ शकत नाही. लाखो जन्मातही होऊ शकत नाही. म्हणजेच जोपर्यंत अनुभवी पुरुष भेटत नाहीत तोपर्यंत काम होऊ शकत नाही.

## जो टिकत नाही, तो आत्मानुभव नाही

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा तो अनुभव किती वेळ टिकतो?

**दादाश्री :** कायम टिकतो. एका मिनिटासाठी, दोन मिनिटांसाठी

नाही. एक-दोन मिनिट टिकणाऱ्या गोष्टी तर या जगात सर्वच आहेत ना. या खायच्या-प्यायच्या सर्व गोष्टी जिभेवर असतील, तितका वेळच त्यांचा अनुभव टिकतो, मग नाहीसा होतो. मग अनुभव टिकतो का? आपण मिठाई खातो त्याचा अनुभव किती वेळ टिकतो? आणि अत्तराचा फाया लावला तर? तो दहा-बारा तास टिकतो आणि आत्मा तर, त्याचा एकच वेळ अनुभव आला की तो कायमच टिकतो. अनुभव कायम टिकायला हवा. नाहीतर त्याला काही अर्थच नाही ना! मग ती एक 'मिनिंगलेस' (निरर्थक) गोष्ट आहे.

## अनुभवानंतर चारित्र्यात येते

**प्रश्नकर्ता :** आत्मा वर्तणे (आत्मस्वरूपात राहणे) आणि आत्म्याचा अनुभव होणे, या दोघात काय फरक आहे?

**दादाश्री :** चारित्र्यात आला, याला आत्मा वर्तनात आला असे म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** आणि अनुभव?

**दादाश्री :** अनुभव तर त्याला अगोदरच झालेला असतो ना?

**प्रश्नकर्ता :** अनुभवानंतर मग वर्तनात येतो, असेच ना?

**दादाश्री :** हो, अनुभव प्रथम झालेले असतात, नंतर त्याला वर्तते (वर्तनात येते).

## शुद्ध स्वरूपाची प्राप्ती 'मी'लाच

**प्रश्नकर्ता :** शुद्ध स्वरूप प्राप्त करायचा निर्णय कोण करतो? आत्मा करतो का?

**दादाश्री :** आत्मा स्वतः शुद्धच आहे. ज्याला खाज सुटते तो खाजवतो, नाहीतर कोण खाजवणार? ज्याला खाज येते, तो खाजवतो. म्हणजे हे सगळे तर अहंकार करत असतो. 'मी' करत असतो. शुद्ध स्वरूप करायचे आहे, असा सर्व विचार कोण करतो? तर अहंकार करतो.

या भौतिकच्या बाजूने सर्व व्यापार करून आता थकले. म्हणून आता या बाजूचा व्यापार करू इच्छितात आणि असे करत करत शेवटी स्वत:चे रिलेटिव्ह अस्तित्व पण हरवतील. स्वत: मूळ स्वरूपी होऊन उभा राहील.

## अज्ञान आहे, तोपर्यंतच अहंकार

**प्रश्नकर्ता :** आत्म्याच्या बाजूचा विचार आला नाही तर आत्म्याकडे नेणाऱ्या प्रवृत्ती पण होणार नाहीत ना?

**दादाश्री :** हो, होणारच नाहीत.

**प्रश्नकर्ता :** तर मग सुरुवातीस, विचारात थोडाफार अहंकार पण असणारच ना की आता 'असे करूया, तसे करूया.'

**दादाश्री :** हो, अहंकार तर शेवटपर्यंत राहणारच. जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत अहंकार राहणारच.

## सर्व अनुभवाहून वेगळा आत्मानुभव

**प्रश्नकर्ता :** आपण एकीकडे असे म्हणतो की आत्म्याशिवाय दुसरे काही नसतेच आणि दुसरीकडे आपण आत्मानुभव असा शब्द वापरतो, यामुळे द्विधा होते. जर आत्म्याशिवाय दुसरे काही नसतेच तर मग अनुभव नावाची गोष्ट म्हणजे फक्त विचारांचे प्रक्षेपण आहे, मनाचे प्रक्षेपण आहे की फक्त ढवळाढवळ आहे? असे आहे का?

**दादाश्री :** नाही, असे काही नाही.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मानुभव शब्दाचा उपयोग तर करावा लागतो ना, म्हणून विचारले.

**दादाश्री :** या शब्दाचा उपयोग अशासाठी करावा लागतो की जोपर्यंत 'आत्मा' प्राप्त झाला नाही, तोपर्यंत शिडीची गरज असते. 'तुम्ही' आज ज्या जागी उभे आहात, तिथून तुम्हाला समजावण्यासाठी मधल्या पायऱ्या सांगण्याची गरज आहे. आणि आत्मानुभव म्हणजे आम्हाला काय

सांगायचे आहे ? तर सध्या 'तुम्हाला' देहाध्यास आहे, मग तुम्हाला कसा अनुभव असतो ? 'हा देह तो मी आहे, नाव पण मी आहे, हे मन पण मी आहे' असा सगळा अनुभव वर्तत असतो. आणि आत्मानुभव म्हणजे आम्हाला काय सांगायचे आहे की त्या देहाध्यासाच्या तुलनेत, हा अनुभव एकदम वेगळाच असतो. म्हणजेच असा वेगळा अनुभव झाल्यावरच आत्मा प्राप्त झाला असे म्हटले जाते. नाहीतर जर अनुभवच आला नाही तर आत्मा कसा काय प्राप्त होईल ? म्हणूनच अनुभव शब्द मध्ये ठेवावा लागतो, 'त्याला' स्वत:ला समजावण्यासाठी. कारण सरळ आत्मा म्हणू शकत नाही. आता जो अनुभव आहे तो देहाध्यासाचा आहे, त्याऐवजी काही नव्याच प्रकारचे अनुभव जेव्हा येतात, तेव्हा मनात असे येते की त्या अनुभवाच्या तुलनेत हा वेगळाच अनुभव आहे आणि हा आत्मानुभव आहे. अशी 'तुम्हाला' खात्री झाली की प्रतीती ठाम बसते, नाहीतर अशी प्रतीती पण बसणार नाही.

**प्रश्नकर्ता :** आम्हाला विचार आणि *लागणी* (सुख-दु:खाची अनुभूती, संवेदना) यांचा अनुभव येतो पण आत्मानुभव ही या सर्व अनुभवांच्या एकदम पलीकडची स्थिती असेल ना ?

**दादाश्री :** या सर्व अनुभवांच्या पलीकडचीच स्थिती आहे. हा अनुभव जसा या बाजूचा आहे तसाच तो अनुभव त्या पलीकडच्या बाजूचा आहे. म्हणजेच आत्म्याचा एक अंश पण त्यात नसतो आणि त्याचा एक पण अंश यात (आत्म्यात) नसतो. आत्म्याचा अनुभव एकदम वेगळाच असतो. अगदीच वेगळा, त्यात तर काही फरक नाही. तरी पण 'प्रथम अनुभव व्हायला हवा.' असे यासाठी म्हटले जाते की त्याला प्रतीती ठाम बसण्यासाठी काही तरी कारण मिळावा आणि त्याला अशी प्रतीती बसली की आत्मा आहे, आणि तो इतर अनुभवांच्या तुलनेत पार वेगळा आहे. नाहीतर तोपर्यंत आत्म्याचे अस्तित्वच मान्य होत नाही. म्हणजेच अनुभव यायला हवा.

## गोष्ट नीट - व्यवस्थित समजते तेव्हा...

मी जे सांगू इच्छितो त्याची *गेड* बसली (नीट व्यवस्थित समजली),

तर मग मला काय सांगायचे आहे ते पूर्ण समजू शकेल. आणि 'टू दि पॉइंट' पोहोचली (नेमकी समजली) तर त्याला मी *गेड* पडली असे म्हणतो. लोक म्हणतात ना की, 'अजून *गेड* बसली नाही?'

म्हणजे 'मी' जे समजावू इच्छितो तीच 'वस्तू' त्याला त्याच स्वरूपात समजली, तर त्याला *गेड* बसली असे म्हणतात. आता माझा 'व्ह्यू पॉइंट' वेगळा, त्याचा 'व्ह्यू पॉइंट' वेगळा म्हणून *गेड* बसायला जरा वेळ लागतो. पण *गेड* बसली पाहिजे तरच काम होईल!

**प्रश्नकर्ता :** म्हणजे तुम्ही ज्या शब्दांचा उपयोग करता, त्याचा अर्थ नीट कळायला हवा.

**दादाश्री :** हो, गोष्ट नीट कळायला हवी. म्हणून आपण म्हणतो ना की ही गोष्ट त्यांना नीट समजतच नाही. आता जर त्याची 'लेव्हल' थोडी वर आली आणि 'माझी' 'लेव्हल' थोडी खाली आली तर 'त्याला' ती गोष्ट 'फिट' बसेल. नाहीतर 'मी' उंचावरून बोलत राहीन तरी पण फायदा होणार नाही, म्हणूनच गोष्ट 'फिट' करण्यासाठी 'लेव्हल'नुसार वार्तालाप करावा लागतो.

म्हणजेच *गेड* बसल्याखेरीज तर काहीच काम होत नाही. आणि यात सगळ्यांनाच *गेड* बसते ना! *गेड* बसली की काम सुरू.

## आत्मज्ञान 'ज्ञानीं'पासूनच

**प्रश्नकर्ता :** आत्मज्ञान कशा प्रकारे मिळते?

**दादाश्री :** आत्मज्ञानींकडून ज्ञान मिळते. 'प्रत्यक्ष' ज्ञानी भेटले तरच आत्मज्ञानाची प्राप्ती होते.

**प्रश्नकर्ता :** हो, पण प्रत्यक्ष ज्ञानींना कसे ओळखावे?

**दादाश्री :** त्यांना जर आपण डिवचले तरी पण त्यांचा अहंकार जागृत झाला नाही, त्यांची ममता जागृत झाली नाही, तर ते खरे ज्ञानी.

किंवा मग 'ज्ञानी पुरुषां'ना विचारावे की तुमचा मोक्ष झाला आहे

का? असे विचारले तर तुम्हाला ते लगेच समजेल. भाजी आणायला जाता तेव्हा ती दोन-तीन दिवसाची शिळी आहे की ताजी आहे हे जर तुम्हाला समजत नसेल तर तुम्ही भाजीवाल्याला विचारता, 'बाबा, ही ताजी आहे की शिळी? ते सांग.' त्याचप्रमाणे तुम्ही 'ज्ञानी पुरुषां'ना विचारा की 'तुम्हाला मोक्ष मिळाला असेल तर मग आम्ही तुमच्याजवळ बसू, नाहीतर मग आम्ही दुसऱ्या दुकानात जाऊ. एका दुकानात बसून राहून सगळे आयुष्य वाया जाईल, त्याऐवजी आम्ही अगोदरच दुकान बदलू.' विचारायला काय हरकत आहे?

खरे तर सरळ मार्ग हाच आहे की 'ज्ञानी पुरुषां'च्या, सत्संगात जाणे. किंवा मग एकदा त्यांचा अपमान केल्यावर लगेच कळेल की हा रुपया खरा आहे की खोटा आहे. रुपया असा वाजवून पाहतो ना? रुपयाचा अपमान करतो ना? तर लगेच कळते ना की हा फेकून देण्याच्या लायकीचा नाही, म्हणून कपाटात ठेवा. आणि जर फेकून देण्याच्या लायकीचा असेल तर तो फेकून द्या.

**प्रश्नकर्ता :** अशी कसोटी करायला गेलो तर मग कर्मबंधन होईल?

**दादाश्री :** नाही. अशी कसोटी करणाऱ्याला आम्ही संरक्षण देतो. नाहीतर मग कसोटी कशी करणार? आमच्याकडे येऊन जर आमची कसोटी घेतलीत तर आम्ही तुम्हाला संरक्षण देऊ. तुम्हाला पडू देणार नाही आणि तुमच्या कसोटीत तुम्ही पास व्हाल.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही संरक्षण देता. पण इतर कोणाची अशी कसोटी करायला गेलो तर?

**दादाश्री :** इतर कुठे असे करूच नका आणि केलेतच, तर मग जवळ शंभर रुपये तयार ठेवा. त्यांचे पाय चेपा आणि म्हणा, 'साहेब, चुकलो, माझे डोके जरा फिरले आहे.' असे काहीतरी करून परत शब्द बदला. आणि शंभर रुपयांची वस्तू दिली तर साहेब खूश होतील आणि पायही चेपा. कारण अहंकारी माणसाला खूश करायला काहीच वेळ लागत नाही. गोड गोड बोललो की लगेच तो खुश होतो.

**प्रश्नकर्ता :** सामान्य लोकांना अशी कसोटी न करता इतर कशा प्रकारे ओळखता येईल?

**दादाश्री :** त्यांची वाणी 'स्याद्वाद' असते, कोणत्याच धर्माचे किंचितही अहित न होवो अशी असते, त्यांची वाणी कोणालाही दुःखदायी नसते. आणि त्यांची वाणी, वर्तन आणि विनय मनोहर असतात, आपल्या मनाला प्रसन्न करणारे असतात.

'दिस इज दि कॅश बँक ऑफ डिवाइन सोल्यूशन.' कधीच उधार नाही, एकदम रोखच आहे. जे पाहिजे ते इथे रोख मिळेल!

जे रोख आत्मज्ञान देतात, तेच 'प्रत्यक्ष' 'ज्ञानी'! जिथे उधारी असेल तिथे 'प्रत्यक्ष' 'ज्ञानी' नसतातच. (ज्ञानी) रोख देतात, 'कॅश' देतात. म्हणून मग आपल्याला परीक्षा घेण्याची गरज राहतच नाही! जी बँक 'कॅश पेमेंट' करते, तिची परीक्षा घेण्याची काय गरज आहे? जी बँक असे म्हणते की सहा महिन्यानंतर पैसे दिले जातील, तर मग तुम्हाला तिथे परीक्षा घ्यावी लागते, आसपासच्या लोकांजवळ चौकशी करावी लागते. परंतु जिथे कॅश दिली जाते तिथे परीक्षा कशाला करावी?

**प्रश्नकर्ता :** जीवाला हे कसे समजेल की हे रोख आहे की नाही?

**दादाश्री :** ते तर ताबडतोबच समजून येईल. रोख समजत नसेल तर मग आतमध्ये आत्मा नाहीच. जर शरीरात आत्मा असेल तर समजेलच. नाहीतर, स्वतःला वाकडे चालायचेच असेल तर चाला. त्याला ती सूट असतेच ना! किंवा 'ज्ञानीं'कडून ज्ञान घेऊनही ते सांडून टाकायचे असेल तर तीही सूट आहेच. त्याला कोणीच अडवलेले नाही. ज्याला रोख समजेल तो कधीच सांडणार नाही ना!

## वस्तू प्राप्तीची प्रतीती

**प्रश्नकर्ता :** 'मला' वस्तू मिळाली आहे की नाही याची प्रतीती कशी होईल?

**दादाश्री :** 'आत्म्याची' प्रतीती 'तुम्हाला' होईलच ना! तुम्ही 'जे' आहात 'तीच' प्रतीती 'तुम्हाला' होईल ना! आता जी भ्रांती आहे, ते तुमचे अस्तित्त्वच निघून जाईल. 'मी चंदुभाई आहे' ही तर भ्रांती आहे, 'प्रत्यक्षात तुम्ही जो 'आत्मा' आहात, 'तो आत्माच' 'तुम्ही' बनून जाता, त्यामुळे मग भ्रांती उरतच नाही. आणि मग विचारायला काही शिल्लकच राहत नाही ना! 'चंदुभाई' तर निघून जातील, 'चंदुभाई' आपल्या घरी जातील. हे 'चंदुभाई' शंकेखोर आहेत आणि ते स्वत:च निघून जातील. 'मी चंदुभाई आहे' ही रॉंग बिलीफ (चुकीची मान्याता) आहे.

## बिलीफ मुळेच बंधन आहे

जरी कोटी कोटी जन्म झाले तरी पण 'राइट बिलीफ' फिट होत नाही. जिथे एकही 'रॉंग बिलीफ' जात नाही, तिथे एक पण 'राइट बिलीफ' फिट होणारच कशी? म्हणजेच एकही 'रॉंग बिलीफ' जात नाही आणि एक पण 'राइट बिलीफ' फिट होत नाही! संपूर्ण जगात एकाही माणसाची एकसुद्धा रॉंग बिलीफ दूर होत नाही. इतके जन्म महावीरांची शास्त्रे वाचत आले आहेत, तरी पण एकही 'रॉंग बिलीफ' दूर होत नाही आणि दिवस बदलत नाहीत. शास्त्रे वाचून थोडासा थंडावा वाटतो, पण 'बिलीफ' बदलत नाही. 'ज्ञानी पुरुष' की जे मोक्षदाता पुरुष असतात तेच फक्त 'बिलीफ' बदलवू शकतात.

**प्रश्नकर्ता :** मोक्ष प्राप्त करायचा असेल तर 'ज्ञानी पुरुषां'कडे जावे लागेल?

**दादाश्री :** आणि ते 'ज्ञानी पुरुष' मोक्षदाते पुरुष असले पाहिजेत. मोक्षाचे दान कोण देऊ शकतात? जे स्वत: सतत मोक्षात राहतात, तेच मोक्षाचे दान देऊ शकतात. तुम्ही जर 'रॉंग बिलीफ' मध्येच असाल तर मग कितीही काही कराल, शास्त्रे वाचाल, तरी पण 'रॉंग बिलीफ'च मजबूत होत राहील, 'रॉंग बिलीफ'लाच पोषण मिळत राहील.

आणि या संसारात जन्मापासूनच लोक 'त्याला' अज्ञान प्रदान करत असतात. म्हणतात 'हा मुलगा आहे. मुला हे तुझे बाबा आहेत,

ही तुझी आई आहे.' असे करत अज्ञानच प्रदान केले जाते, मग त्याच्यात पूर्ण 'रॉंग बिलीफ' फिट होते. ती 'बिलीफ' कोणी फॅक्चर करू शकत नाही. नाहीतर नुसतेच जर असे म्हटले की 'तुम्ही शुद्ध आहात' तर कसे चालेल? 'तुमच्या' समजमध्ये एकदम *गेड* बसली पाहिजे, तरच ही 'रॉंग बिलीफ' फ्रॅक्चर होईल. नाहीतर ही 'रॉंग बिलीफ' कधीच फ्रॅक्चर होणार नाही आणि तोपर्यंत 'मी शुद्धात्मा आहे' हे कोणी स्वीकारणारच नाही. आतापर्यंत आयुष्यभर 'मी चंदुभाई आहे, मी चंदुभाई आहे' असे म्हणत म्हणत प्रत्येक परमाणूंमध्ये हे घुसले आहे. आता त्याला काढून टाकणे, ही 'रॉंग बिलीफ' 'फ्रॅक्चर' करणे, हे फक्त 'ज्ञानी पुरुष'च करू शकतात.

## शेवटी आत्मरूप झाल्यानंतरच मुक्ती

**प्रश्नकर्ता :** असेही म्हटले जाते की एकच मिनिट जरी आत्म्याचा विचार आला तरी ती व्यक्ती संसारापासून मुक्त होते?

**दादाश्री :** तो आत्मरूप झाला तर संसारापासून मुक्त होईल. नाहीतर जिथे आत्म्यासंबंधी विचार करतो, तिथे आत्मा नसतोच. असे जे विचार करतो, ते सर्व तर आत्म्यात जाण्याचे मार्ग आहेत.

**प्रश्नकर्ता :** पण आत्मरूप होण्याची दशा उत्पन्न झाली तर मग संसाराचा भ्रम तुटतो का?

**दादाश्री :** भ्रम हळूहळू सुटत जातो. पण त्याचा जो जुना हिशोब आहे, त्यामुळे भ्रम झाल्याशिवाय राहणार नाही! यात तर जर नवीन संवरपूर्वकचे होईल तरच काम होईल. म्हणजेच एक मिनिट पण जरी तो आत्मा झाला तर मग तो कायमसाठी राहील.

**प्रश्नकर्ता :** एक मिनिटच काय, अठ्ठेचाळीस सेकंद पण राहत नाही.

**दादाश्री :** राहत नाही, तर मग असे चालणार नाही.

**प्रश्नकर्ता :** अठ्ठेचाळीस सेकंदाच्या आतच तो पळून जातो.

**दादाश्री :** पण जो पळून जातो, तो आत्माच नाही. जो पळून जात नाही, त्यालाच आत्मा म्हणतात. 'आत्मा' त्याच रूपात असतो. कधीही पाहा तरी पण त्याच रूपात असतो, म्हणून आत्मा वेगळा वाटायला हवा आणि हे जे बाकी सर्व आहे ते वेगळे वाटायला हवे.

**प्रश्नकर्ता :** हे समजते, तसा अनुभव पण होत असतो. तरी पण इतके मजबूत मायावी जाळे त्यावेळी उत्पन्न होते की ते त्या बाजूला खेचून नेतेच.

**दादाश्री :** वस्तुस्थिती अशी आहे की 'आपल्याला' कोणी खेचून नेऊ शकेल असे नसतेच 'आत्मा' प्राप्त झाला आहे हे असे अजूनपर्यंत 'एक्झॅक्टनेस'मध्ये आलेले नाही. जर 'एक्झॅक्टनेस'मध्ये आले असेल तर कसलाच परिणाम होणार नाही. कारण नंतर फक्त डिस्चार्ज कर्मेच शिल्लक राहतात, म्हणून मग फक्त भोगणेच (सुख-दु:खाचे परिणाम) शिल्लक राहते. नवीन कर्मबंधने बांधलीच जात नाहीत. जर आत्मा प्राप्त झाला असेल तर मग *'संवर'* (कर्माचे नवीन चार्जिंग बंद होणे) कायम राहते आणि जिथे *संवर* आहे, तिथे बंध पडत नाहीत, *'आश्रव'* (उदयकर्मात तन्मयाकार होणे) आणि *'निर्जरा'* (आत्मप्रदेशातून कर्मांचे वेगळे होणे) तर अज्ञानी आणि ज्ञानी दोघांनाही होतच राहते, पण यात अज्ञानीला कर्मबंधने पडतात आणि ज्ञानीला ज्ञानामुळे *संवर* राहते. एवढाच फरक आहे.

**प्रश्नकर्ता :** *आश्रव, निर्जरा* आणि *संवर* या तिन्ही गोष्टीत लगेचच हलायला होते याला कर्माचा प्रभाव म्हणायचे का?

**दादाश्री :** कर्मांचा प्रभाव तर पुष्कळच भारी (जोरदार) असतो. तरी पण कर्मे न्यूट्रल असतात, म्हणजेच नपुंसक असतात, म्हणून ती काही करूच शकत नाहीत. जोपर्यंत त्यांना 'आपला' आधार नसेल तोपर्यंत ती काही करूच शकत नाहीत. 'आपण' आधार दिला तरच ती काही करू शकतात. अन्यथा ती संपतात. 'निराधार' झाल्यावर ती आपल्याला काहीच करू शकत नाहीत. परंतु आपण त्यांना आधार देतो की 'मी हे केले.' असे म्हणतो तेव्हा ती आपल्याला हलवतात.

**प्रश्नकर्ता :** हा जो आधार दिला जातो, ते पूर्वकर्म आहे का?

**दादाश्री :** त्याला अज्ञानीपणा म्हणतात. कर्माची *निर्जरा* तर होत राहते, पण 'आपण' आधार देतो की 'मी करतो'. जी कर्मे उदयाला येतील ती तर आपली भूमिका बजावणारच पण त्यात 'आपण' म्हणतो की 'हे मी केले आहे.'

**प्रश्नकर्ता :** म्हणजे जी कर्मे आम्ही निष्कामभावाने भोगली पाहिजेत तशी आम्ही भोगत नाही, आणि वृत्ती त्यात घुसतातच, असेच ना?

**दादाश्री :** तसे तर ज्ञानाशिवाय कर्ताभाव सुटणे अवघड आहे. ज्ञान असेल तर कर्ताभाव होणार नाही. कर्ताभाव होत नाही, त्यामुळे *संवर* राहते आणि जिथे *संवर* आहे, तिथे समाधी राहते.

**प्रश्नकर्ता :** *संवर*च्या भूमिकेपर्यंत तर पोहोचता येते पण स्थिर राहता येत नाही.

**दादाश्री :** नाही, *संवर* जर असेल तर समाधी राहणारच. समाधी राहिली तर समजावे की त्याला *संवर* आहे.

**प्रश्नकर्ता :** पण काही कारणांने जर कर्मबंधने झाली तर त्यावेळी काय करावे?

**दादाश्री :** करायचे तर काहीच नसते. आत्मा होण्याची गरज आहे.

**प्रश्नकर्ता :** यासाठी मानसिक रूपाने तर विचार करावा लागेल ना की यावर काय उपाय करावा लागेल?

**दादाश्री :** एकदा जर आत्मा झालात की मग नंतर काहीच विचार करायचा नाही. विचारांची भूमिका कधीपर्यंत असते? तर 'हा आत्मा आहे की तो आत्मा आहे' अशी शंका जोपर्यंत आहे तोपर्यंत विचारांची गरज आहे. जोपर्यंत आत्म्यासंबंधी संशय आहे तोपर्यंतच विचार करायचे असतात.

**प्रश्नकर्ता :** आत्म्याबद्दल तर जोपर्यंत हा संसार आहे तोपर्यंत तर्क-वितर्काची भूमिका तर असणारच ना?

**दादाश्री :** आत्मा 'ज्ञानी पुरुषां'कडून प्राप्त व्हायला हवा आणि तो 'आत्मा' ज्ञानपूर्वक, त्यांच्या आज्ञेपूर्वक राहायला हवा.

**प्रश्नकर्ता :** प्रयत्न तर तशाच प्रकारे करतो, तरी पण तर्क-वितर्क उत्पन्न होतातच.

**दादाश्री :** एकदा इथे 'ज्ञान' घ्यावे लागेल, मग आज्ञेत राहावे लागेल. आणि नंतर तुम्हाला सत्संगात येऊन सर्व विचारून घ्यायचे. आणि हे तर निर्विकल्प ज्ञान आहे. या निर्विकल्प ज्ञानात विकल्प कसे बरे असतील? संकल्प-विकल्प होत असतील, तर मग अजूनपर्यंत आत्म्याची प्राप्ती झालेलीच नाही, असेच म्हटले जाईल. संकल्प-विकल्प करणारा झाला तर मग तो निर्विकल्प होणारच नाही.

## शरीर सुटते पण बिलीफ सुटत नाही

**प्रश्नकर्ता :** या शरीराचा त्याग झाल्यानंतर या 'रॉंग बिलीफ्स्' आपोआप निघून जातात ना?

**दादाश्री :** म्हणजे मेल्यानंतर?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** नाही, त्या 'रॉंग बिलीफ्स्' तर पुन्हा उत्पन्न होतात. कारण मेल्यावर काही मोक्षात जात नाहीत. 'मरण पावला' याचा अर्थ की इथे त्याच्याजवळ 'स्टॉक' मध्ये जे सामान होते, ते सर्व तो सोबत घेऊन जातो. क्रोध-मान-माया-लोभ सर्व 'स्टॉक'मध्ये आहे, ते सर्वच तो सोबत घेऊन जातो, काहीच शिल्लक ठेवत नाही. पूर्ण कषायरूपी परिवार त्याच्यासोबत जातो आणि नंतर परत जिथे नवीन जन्म होतो, तिथून परत सुरुवात होते.

**प्रश्नकर्ता :** पण आपण तर असे म्हणतो ना की मेल्यानंतर सर्व काही सोडून जायचे आहे, तर मग 'स्टॉक'मध्ये कसे राहते?

**दादाश्री :** ते तर स्थूल सर्व सोडून द्यावे लागते. सूक्ष्मात तर कषायरूपी परिवारसहित सर्व सोबतच जाणार. स्थूल म्हणजे जे डोळ्यांनी दिसते, ते सर्व. डोळ्यांनी दिसत नाही आणि दुर्बिणीनेही दिसत नाही असेही स्थूल असते. ते सर्व इथे सोडून जायचे असते आणि सूक्ष्म भाग मात्र पूर्ण सोबतच जातो, स्वत:ची सर्व कर्मे बांधून तिथे सोबत घेऊन जायचे असते.

## बिलीफ बदलल्यामुळे कर्मे सुटतात

**प्रश्नकर्ता :** तर मग ह्या 'रॉंग बिलीफ' फ्रॅक्चर कशा प्रकारे होतील?

**दादाश्री :** त्या तुम्ही करायच्या नाहीत, ते आम्ही करून देऊ. ते तुमच्याने होणार नाही. ते जर तुम्हाला जमले असते तर अनंत जन्मांपासून तुम्ही आहातच ना! म्हणजेच हे डॉक्टरचे काम आहे. तुम्हाला तर तासाभरासाठी तुमचा देह डॉक्टरांकडे सोपवायचा आणि म्हणायचे की, 'साहेब, तुम्हाला माझे जे ऑपरेशन करायचे असेल ते करा आणि माझी सुटका करा.' तरच काम होईल.

**प्रश्नकर्ता :** कर्मे आहेत आणि मान्यता आहेत, तर या दोघांचा काय संबंध आहे? कारण एखादी चुकीची मान्यता दूर झाली, तर त्या वेळी लगेच हलकेपणा वाटतो. तर त्या वेळी कर्मातून निवृत्त झाले असे म्हणता येईल का?

**दादाश्री :** तेव्हा तर 'रॉंग बिलीफ' पासून निवृत्ती होते.

**प्रश्नकर्ता :** तर मग तेवढी कर्मे जळून गेली की नाही?

**दादाश्री :** नाही, ती कर्मेच बदलतात ना! बिलीफ निवृत्त झाली तर कर्मे शांत होतात, तिला *'शाता वेदनीय'* म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** ही जी कर्मे चिकटलेली आहेत, ती?

**दादाश्री :** मान्यता बदलली तर जी चिकटलेली कर्मे आहेत ती

सर्व सुटत जातात. मान्यता बदलली म्हणून मग कर्मे सर्व वेगळी होत जातात. जर मान्यता बदलली नसेल तर कर्मे वेगळी होणारच नाहीत. ह्या सगळ्या 'राँग बिलीफ्स्'च आहेत. स्वतः परमात्मा आहे, पण बघा ही काय दशा झाली आहे!

## बिलीफने बिलीफचे छेदन

**प्रश्नकर्ता :** आता या 'राँग बिलीफ्स्' आहेत आणि परत ही राईट बिलीफ फीट केली, तर या 'राइट बिलीफ'चा पण लाभ मिळेल ना? पण ती सुद्धा 'बिलीफ'च आहे ना? आणि जोपर्यंत 'बिलीफ' आहे तोपर्यंत त्याच्या फलस्वरूप कर्मे तर राहणारच ना?

**दादाश्री :** पण 'राइट'मध्ये तर 'बिलीफ'च नसते ना? हे तर फक्त 'राँग बिलीफ'चे छेदन करण्यासाठीच 'राइट बिलीफ' आहे. नाहीतर 'राँग बिलीफ' छेदल्या जाणारच नाहीत ना! आणि 'राइट बिलीफ' ने 'राँग बिलीफ'चे छेदन केल्याने राईट बिलीफमुळे आपोआपच (राँग बिलीफचे) छेदन होते, बिलीफनेच बिलीफचे छेदन होते. म्हणून मग त्याचे छेदन करण्याचा प्रश्नच शिल्लक राहत नाही. अशा क्रमाने हे सर्व होत असते. नाहीतर मग वाढत वाढत याचा कधी शेवटच होणार नाही. हे जे सम्यक् दर्शन आहे, 'राइट बिलीफ' आहे, ती मग स्वतःच विरघळून जाते. 'राइट बिलीफ' ही स्व-सत्ताधारी आहे आणि 'राँग बिलीफ' परसत्ता आहे.

## निरालंबच्या दृष्टीने वस्तुत्वाचा सिद्धांत

'ज्ञानी पुरुष' तर 'तू संसाराशी चिकटलेला आहेस' असे भान करून देतील. नाहीतर कोणतीच वस्तू 'तुला' स्पर्श करू शकत नाही. मग तो विचारेल 'मला कसली गरज नाही का?' तेव्हा आम्ही म्हणू 'नाही, तुला कसली गरजच नाही. तुला जगात कोणत्याच अवलंबनाची गरज नाही.' त्यानंतर 'तो' भानावर येतो, आणि म्हणतो 'मी शुद्धात्मा आहे, मी शुद्धात्मा आहे.' त्यानंतर मग आतमध्ये चिंता-भीती काहीच शिल्लक राहत नाही. चिंता-भीती हे सगळे 'परवस्तूत' होत असते आणि

'स्वत:' मात्र ते डोक्यावर घेतो आणि म्हणतो 'मला असे होत आहे.' अरे बाबा, हे 'तुझे' नाही, हे सगळे त्या दुसऱ्याच्या घरी होत आहे. 'तुला' कुठे काय होत आहे? शेजाऱ्याच्या घरी होत आहे, त्याचे आपल्याला काय? आणि 'आत्म्याला' तर काही होतच नाही ना? पण ही तर अनादि काळापासून चालत अलेली भ्रांतीच 'त्याला' ह्या सर्व गोष्टी विसरायला लावते.

## ज्ञानींच्या प्रयोगामुळे आत्मा-अनात्मा भिन्न

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हणता 'आत्मा माझ्यापासून पूर्ण वेगळा आहे', तर ते मला अजून एकदम स्पष्टपणे समजत नाही.

**दादाश्री :** वेगळा केल्यानंतरच वेगळा होतो, नाहीतर तन्मयाकार असतो. 'आम्ही' वेगळा करून देतो, 'आम्ही' प्रयोग करतो तेव्हा तो वेगळा होतो. नाहीतर तोपर्यंत तो वेगळा होऊ शकत नाही. म्हणून तुम्ही असे म्हणा की प्रत्यक्षात तो वेगळा तर आहेच, परंतु जोपर्यंत भ्रांती आहे तोपर्यंत तो बांधलेलाच आहे. आम्ही इथे ज्ञान देतो, त्या दिवशी आत्मा आणि अनात्मा वेगळे करून देतो. त्या नंतर मग 'तुम्हाला' 'भगवंतां'चा साक्षात्कार जातच नाही आणि मग तुम्हाला तुमचे दोष दिसू लागतात. नाहीतर तोपर्यंत दोष दिसतच नाहीत. आणि दोष दिसल्यानंतर दोष निघून जातात. जसजसे दोष दिसू लागतात, तसतसे ते सर्व निघून जातात.

## ज्ञानप्राप्ती, भावनांच्या परिणाम स्वरूप

**प्रश्नकर्ता :** माझ्या नशीबात काय आहे? तुम्ही जे सांगितले ते ज्ञान मला कधी होईल? त्याला किती वेळ लागेल ते सांगा.

**दादाश्री :** ते तर येईल, भावना केली आहे तर येईलच ना! प्रथम भावना केली असेल ना तरच येईल, भावनाच जर केली नसेल तर कशा प्रकारे येईल?

**प्रश्नकर्ता :** मला तर वाटले की दिल्ली अजून खूप दूर आहे.

**दादाश्री :** अरे, या दुनियेत काहीच दूर नसते. आत्माच जवळ आहे तर मग दिल्ली कशी दूर असेल? आत्मा अगदी तुमच्याजवळ आहे. आत्मा, की जी अप्राप्त वस्तू आहे, ती तर तुमच्याजवळच आहे, तर मग इतर कोणत्या वस्तूला दूर आहे असे म्हणाल?

## ...तर मग ज्ञानांतराय तुटतील

**प्रश्नकर्ता :** येथे तुमच्याकडे खूप लोक येतात. त्यांच्यापैकी काहींना ज्ञान घ्यावेसे वाटत नाही, हे असे का? याचे कारण काय?

**दादाश्री :** ती त्यांची अंतराय कर्मे आहेत. जेव्हा अंतराय संपतील तेव्हा त्यांना ज्ञान घ्यायची इच्छा होईल. ही अंतराय कर्मे संपविण्यासाठी काय करायला हवे? एक तर 'स्वत:'च असा ठाम निर्णय घ्यायला हवा की आज अंतराय तोडूनच टाकायचे आहेत, मग काय होईल ते होवो, पण अंतराय तोडायचेच आहेत. किंवा मग 'ज्ञानी'ना सांगावे 'साहेब, माझे अंतराय तोडा.' मग 'ज्ञानी पुरुष' तुमचे अंतराय तोडून देतील. नाहीतर अंतराय कर्मे तर अशी असतात की जेवण समोर असले तरी पण ती जेवू देत नाहीत. जेवण तयार असते, जेवायला बसण्याच्या तयारीतच असतो, तेवढ्यातच कोणी तरी बोलवायला येतो आणि म्हणतो 'चला, लवकर चला.' म्हणून वाढलेले ताट सोडूनही जावे लागते. यालाच म्हणतात अंतराय कर्म.

## तेव्हा आत्मवर्तना सुरू होते

**प्रश्नकर्ता :** तुमच्याकडून आत्म्याची अनुभूती कशा प्रकारे करविली जाते?

**दादाश्री :** आता काही अनुभूती होत आहे की नाही? ही थंडी वाजते तर तिचा अनुभव होतो की नाही? उकाडा वाढला की त्याचा अनुभव येतो की नाही? कोणी शिव्या दिल्या तर कडू रस निर्माण होतो, असा अनुभव येतो की नाही? तुम्हाला कसला अनुभव हवा आहे?

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा अनुभव.

**दादाश्री :** आत्म्याचा अनुभव म्हणजे काय? परमानंद स्थिती, आनंद जातच नाही, त्यालाच म्हणतात आत्म्याचा अनुभव.

**प्रश्नकर्ता :** तो कशा प्रकारे मिळतो?

**दादाश्री :** त्याच्याशी तुम्हाला काय करायचे आहे? तुम्हाला कायमच्या आनंदाची गरजच काय? तुम्हाला बायकोची, पैशांची गरज आहे की नाही?

**प्रश्नकर्ता :** गरज नाही.

**दादाश्री :** मग या शरीराची गरज आहे की नाही?

**प्रश्नकर्ता :** भगवंतांशिवाय मला आणखी कोणत्याच गोष्टींची गरज नाही.

**दादाश्री :** हे चांगले आहे, तुमचे काम तर शूरवीरासारखे आहे. पण त्यासाठी तुम्ही 'भगवंत म्हणजे काय?' ते जाणायला हवे. 'जग काय आहे? कोणी बनवले आहे? भगवंत म्हणजे काय? मी कोण आहे? हे सर्व जग कसे उत्पन्न झाले? आता भगवंतांचा साक्षात्कार मला कसा होईल?' हे सर्व जाणून घ्यायला हवे.

**प्रश्नकर्ता :** यासाठी मार्ग कोणता?

**दादाश्री :** तो मार्ग तर या इथेच आहे, जगात बाकी कुठेच यासाठी मार्ग नाही. इथेच तो मार्ग आहे.

**प्रश्नकर्ता :** पण अनुभवाशिवाय तर सर्व निरुपयोगी आहे ना?

**दादाश्री :** हो, अनुभव तर व्हायलाच हवा.

**प्रश्नकर्ता :** तो केव्हा होईल?

**दादाश्री :** जेव्हा भगवंताशिवाय, आत्म्याशिवाय इतर काहीच नको असेल तेव्हा अनुभव होईल. मग त्यात स्त्री, पैसा अशा कोणत्याच गोष्टी नको असतात. आणि इथे तुम्हाला तसा अनुभव येईल. कधी? तर या

जन्मातच, आणि तोही दोन-तीन महिन्यात नाही तर फक्त एका तासातच होईल.

**प्रश्नकर्ता :** मग नंतर निरंतर आत्म्यात तन्मयाकार कसे राहता येईल?

**दादाश्री :** इथे ज्ञान घेतले आणि मग 'आमच्या' 'आज्ञे'त राहिला की मग निरंतर तो 'आत्म्या'त राहू शकतो. पण हे सर्व 'जंजाळ' आहे ना, ते त्याला निरंतर 'आत्म्या'त राहू देत नाही. 'तुम्हाला' पण जंजाळ आहेच ना? मुले म्हणणार, 'बाबा, फी द्या.' अरे बाबा, पैसे आहेत पण शंभर रुपयांचे सुटे करून आणण्यासाठी बाहेर तर जावेच लागेल ना? लग्न केले नसेल तरी नोकरी असेल, धंदा असेल. म्हणजेच हे सर्व जंजाळ आहे आणि जोपर्यंत हे आहे तोपर्यंत निरंतर 'आत्म्यात' राहता येत नाही. पण 'आपले' भाव जसजसे या जंजाळातून कमी कमी होत जातील आणि खरे सुख 'आत्म्यात'च आहे असे समजू लागेल, तेव्हा हे जंजाळ कमी होत जाईल आणि मग 'आत्म्यात' राहता येईल.

## 'शुद्धात्मा' शब्दाची समज

**प्रश्नकर्ता :** असे म्हणतात की, आत्मा सच्चिदानंद घन आहे. तर ही कल्पना आहे की खरे आहे?

**दादाश्री :** का बरे? खरेच आहे. आत्मा सच्चिदानंद घन आहे, ही खरी गोष्ट आहे. यात काल्पनिक काही नाही.

**प्रश्नकर्ता :** काही लोक याला कल्पना पण म्हणतात ना?

**दादाश्री :** कल्पना करणाऱ्याला 'सच्चिदानंद' काय आहे, याचे भान नाही. जर तसे भान आले तर स्वत:ला कायमस्वरूपी शाश्वत आनंद लाभतो. सनातन सुख प्राप्त झाले की सच्चिदानंद स्वरूप होता येते.

**प्रश्नकर्ता :** आत्मा सच्चिदानंद घन आहे, तर 'शुद्धात्मा' असे का म्हटले गेले आहे?

**दादाश्री :** आत्मा सच्चिदानंद स्वरूपच आहे. पण मग ह्या लोकांना

सच्चिदानंद शब्द का दिला नाही? कारण 'सच्चिदानंद' शब्द हा गुणवाचक शब्द असल्यामुळे या लोकांना तो समजणार नाही. यांना शुद्धात्म्याची गरज आहे, म्हणून या लोकांना शुद्धात्मा शब्द दिला आहे. शुद्धात्म्याची गरज का आहे? तर हे लोक म्हणतात की 'मी पापी आहे.' तेव्हा आम्ही सांगतो की जर 'तू' 'विज्ञाना'ला जाणलेस तर तुला पापाचा स्पर्श होणार नाही. तू 'शुद्धात्मा'च आहेस, पण 'तुझी' 'बिलीफ रॉंग आहे'. समजा, एखाद्या माणसाने दिवसा भुताची गोष्ट ऐकली, आणि रात्री तो खोलीत एकटा झोपला. आणि जर रात्री आतमध्ये भांडे खडखडले की लगेच 'त्याच्या' डोक्यात आत कोणीतरी भूत आहे ही 'रॉंग बिलीफ' घुसते. आणि जोपर्यंत ही 'रॉंग बिलीफ' निघत नाही तोपर्यंत 'त्याची' दशा जशीच्या तशीच राहते, भीती वाटतच राहते.

## सोहम् द्वारा शुद्धात्मा प्राप्त होऊ शकत नाही

**प्रश्नकर्ता :** 'मी शुद्धात्मा आहे' असे बोलणे आणि 'सोहम्' बोलणे यात काय फरक आहे?

**दादाश्री :** 'सोहम्' बोलण्याला काही अर्थच नाही. 'शुद्धात्मा' तर 'तुम्ही' आहातच. सोहम्चा अर्थ काय झाला? की 'तो मी आहे', तर यात तुमचे काय कल्याण झाले? म्हणून 'मी शुद्धात्मा आहे' यातच स्वत:चे कल्याण आहे. यात 'हा शुद्धात्मा, तो मी आहे' (असे आहे). आणि सोहम् म्हणजे तर 'तो मी आहे.' त्याला काही अर्थ नाही! सोहम् तर शुद्धात्मा प्राप्त करण्याचे साधन आहे. ज्याला साध्य मिळाले, त्याची साधने सुटतात. (त्यांची गरज उरत नाही).

## शुद्ध झाल्यावर शुद्धात्मा बोलू शकता

**प्रश्नकर्ता :** 'मी शुद्धात्मा आहे' असे बोलून शुद्धात्मा होता येते का?

**दादाश्री :** असे होता येत नाही. असे तर खूप लोक बोलतात की 'मी शुद्धात्मा आहे' पण त्याने काही होत नाही.

**प्रश्नकर्ता :** तुमच्याकडून ज्ञान उपलब्ध झाले नसेल, अशा व्यक्तीने पुस्तकात वाचून किंवा कोणाच्या सांगण्यावरून 'मी शुद्धात्मा आहे' असे म्हटले तर फायदा होईल का?

**दादाश्री :** त्याने काही होणार नाही. लाखो जन्म 'मी शुद्धात्मा आहे' असे म्हटले तरी काहीही निष्पन्न होणार नाही.

उदाहरणार्थ समजा तुमचा एक मित्र आहे, तो गप्पा मारता मारता झोपला पण तुम्हाला असे वाटते की तो अजून जागा आहे, अशात तुम्ही त्याला विचारता की 'तू मला पाच हजार रुपये देशील का?' तुम्ही पुन्हा विचाराल त्या अगोदरच तो म्हणतो की 'मी तुला पाच हजार रुपये देईन.' तर काय आपण ते खरे मानायचे? आपल्याला हे समजायला नको का की तो हे झोपेत बोलला की जागेपणी बोलला? जर तो झोपेत बोलला असेल तर मग सारी रात्र आपण बसून राहिलो तरी पण तो काही देणार नाही आणि जागेपणी बोलला असेल तर तो तुम्हाला पैसे देईल. त्याचप्रमाणे हे लोक झोपेत 'मी शुद्धात्मा आहे' असे बोलत आहेत, म्हणून त्यामुळे काही होणार नाही. 'मी शुद्धात्मा आहे' याचे भान 'ज्ञानी पुरुषा'ने दिलेले असावे. म्हणजे जागा असेल आणि बोलत असेल तर ते उपयोगी. याच प्रमाणे मी तुम्हाला जागे करतो आणि तुमच्याकडून 'मी शुद्धात्मा आहे' असे बोलवून घेतो. असेच बोलवून घेत नाही! आणि एका तासातच संपूर्ण मोक्ष देतो. मोक्ष म्हणजे कधीही चिंता वाटणार नाही, असा मोक्ष देतो.

## प्रकट द्वारा प्रकट होईल, की पुस्तकातील दिव्याने?

**प्रश्नकर्ता :** ज्ञान न घेताच पुस्तक वाचून 'मी शुद्धात्मा आहे' असे बोलला तरी पण त्याचे फळ मिळेलच ना?

**दादाश्री :** काहीही फळ मिळणार नाही, 'ज्ञान' न घेताच जर कोणी 'मी शुद्धात्मा आहे' असे म्हणाला तर उपयोग होणार नाही. त्याला 'शुद्धात्मा' आठवणारच नाही ना!

आणि पुस्तकात तर असे लिहिलेले आहे की 'आत्मा शुद्ध आहे

आणि तू शुद्धात्मा आहेस. हे सर्व तू नाहीस. आणि संसारात शुद्धात्म्याच्या रूपात तू काही करू शकशील असे पण नाही. ते द्रव्य त्याचे काम करते, हे द्रव्य आपले काम करते.' असे ते सांगू पाहत आहेत. पण लोक शुद्धात्मा राहतीलच कसे? इथे तर अहंकार आणि क्रोध-मान-माया-लोभ सर्व सोबतच आहे, तर मग त्याला शुद्धात्मा कसा राहू शकेल? दिवसभर 'मी शुद्धात्मा आहे' हे पाठ करून तसे बोलत राहतात पण त्यामुळे शुद्धात्म्याचे लक्ष तर बसत नाही ना! 'ज्ञानी पुरुष' जेव्हा पापे जाळून टाकतात तेव्हा शुद्धात्म्याचे लक्ष बसते (फिट होते) आणि ते लक्ष मग नेहमी राहते, अन्यथा लक्षात राहणारच नाही ना? म्हणजेच प्रथम पापे धुतली गेली पाहिजेत.

**प्रश्नकर्ता :** जर आपल्या पाच आज्ञा लिहिलेल्या असतील तर आजपासून शंभर-दोनशे वर्षांनंतर जर कोणी या पाच आज्ञा वाचून बोलला, त्यावर विचार केला, तर मग त्याला शुद्धात्मा पद मिळेल की नाही?

**दादाश्री :** नाही, नाही. तसे तर, दोनशे-पाचशे वर्षांपर्यंत कोणी तरी ज्ञानी असतीलच, आणि (त्यांच्याद्वारे) काही ना काही स्फुरित होत राहील. प्रत्येकात कधी ना कधी तरी 'प्रकाश' होत राहील, तसे जर कोणी असतील तर ते सर्वांना उपयोगी पडतील. नाहीतर, असाच्या असा शुद्धात्मा बनता येत नाही.

## स्मरण केल्याने शुद्धात्मा साध्य होत नाही

एक व्यक्ती मला म्हणाली, 'मी शुद्धात्मा आहे, असे सतत आठवत राहतो.' तेव्हा मी त्याला विचारले, 'अरे, सतत आठवत राहतोस, तरी पण तुला शुद्धात्मा प्राप्त झाला नाही?' तेव्हा म्हणाला, 'नाही. आणि दुसऱ्या दिवशी तर मला मनात असे आले की तो कोणता शब्द होता? कोणता शब्द, कोणता शब्द असे करत करत चार तास तो शब्द आठवलाच नाही.' म्हणजे शब्दच विसरला जातो. अशा स्मरणाने (नामस्मरणाने) काहीच लक्षात बसत नाही. असे स्मरण करण्याऐवजी

'बायको'चे स्मरण केले तर जास्त चांगले, ती भजी, जिलबी तरी बनवून देईल. असे चुकीचे स्मरण करवून करवून तर कोणी देवगतीतही गेले नाही आणि येथे चांगले सुख-वैभवही त्यांना लाभले नाही. म्हणजे असेही भटकायला लावले आणि तसेही भटकायला लावले. इथे जरी सुख-वैभव लाभले असते तरी आम्ही समजू की ठीक आहे.

ते तर म्हणतील, 'स्मरण देत आहोत, तुम्ही स्मरण करत राहा.' अरे बाबा, जर मी स्मरण विसरलो तर मग मी काय करू? आणि स्मरण केव्हा राहते? तर ज्याच्यावर राग (मोह, आसक्ती) असते ना, त्याचे स्मरण तर आपोआपच होत राहते. किंवा ज्याच्यावर खूपच द्वेष असतो, ज्याच्यावर खूपच चीड असते तो आठवत राहतो. म्हणजेच जर खूप राग असेल तर सतत त्याची आठवण येत राहते, त्याचे स्मरण राहते.

आणि स्मरणाचे फळ संसार, सतत भटकतच राहणे. ही गोष्ट तुमच्या लक्षात येत आहे का? स्मरणाचा अर्थ समजला ना? म्हणजे आत्मा सतत हजर राहून आपणहूनच तसे बोलू लागायला हवा. आपण बोलावू आणि मग तो बोलेल असे नाही. ते आपोआपच व्हायला हवे.

**प्रश्नकर्ता :** पण हे 'मी शुद्धात्मा आहे' असे आतून बोलणे सुरू होते की नाही?

**दादाश्री :** सुरू होते ना!

**प्रश्नकर्ता :** तर मग तो बोलत असेल की बोलावत असेल?

**दादाश्री :** यात बोलणे-बोलावून घेणे असा प्रश्नच नाही. कोणीच बोलावून घेत नाही आणि बोलावून घेतले तर तो बोलविणारा गुन्हेगार होईल.

म्हणजेच तुम्ही जे शोधत आहात तिथे काळोख आहे. तुम्ही पुढे जे मागत आहात, तिथे पूर्ण काळोखच आहे. त्याच्याकडून बोलावून घेणारा कोणी नसतोच. हे सर्व 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एविडन्सेस्'

बोलत आहेत आणि तुम्ही जे म्हणत आहात ना, तो सर्व तर मिट्ट काळोख आहे. त्या वाटेने खूप लोक गेले आणि ते सर्व भरकटले गेले.

## वाडाबंदी तर विभाविकतेमुळे

**प्रश्नकर्ता :** तुमच्याकडून शुद्धात्म्याचे ज्ञान घेतले तर त्याला एक मंडळ किंवा वाडा (संप्रदाय) म्हटला जाणार नाही का?

**दादाश्री :** नाही, यात वाडा नसतोच ना! जिथे विभाविकता असते तिथे वाडा असतो. जिथे स्वाभाविकपणा असतो तिथे सहजपणा उत्पन्न होतो, तिथे वाडा नसतोच! कारण तो झाडे-झुडपे, गायी-म्हशी सर्वच जीवमात्रात शुद्धात्म्याचे दर्शन करू लागतो, मग यात वेगळेपणा, वाडा-संप्रदाय असणारच कसा? त्याला 'एव्हरीव्हेयर' सर्वत्र भगवंतच दिसतात.

## 'राँग बिलीफ' मिटल्यावर भगवंतांशी अभेद

**प्रश्नकर्ता :** जर शुद्धात्मा हाच भगवंत आहे, स्वतःच्या आतच आहे, तर मग तो दूर कोठे नसेलच ना?

**दादाश्री :** हो. बस, आत आहे तोच भगवंत आहे, आणखी कोणी भगवंत या जगात नाहीच.

**प्रश्नकर्ता :** तर मग त्या भगवंतामध्ये आणि स्वतःमध्ये भेद राहतच नाही ना?

**दादाश्री :** पण आता तरी 'तुम्हाला' भेद आहे. तुम्ही जेव्हा अभेद व्हाल, तेव्हाच 'भगवंत' तुम्हाला मिळतील, असे आहे. पण 'तुम्हाला' तर 'चंदुभाई'च राहायचे आहे आणि 'कोणा स्त्रीचा पती बनायचे आहे, मुलाचे वडील बनायचे आहे, कोणाचे तरी मामा व्हायचे आहे, कोणाचे तरी काका व्हायचे आहे.' तर मग 'भगवंत' तर 'तुम्हाला' मिळणारच नाहीत ना! 'तुम्ही' जर 'भगवंतां'चे झालात तर मग 'ते' तुमच्याशी अभेद होतील. 'तुम्ही' 'शुद्धात्मा' झालात, 'भगवंतां'चे झालात तर 'तुम्ही' अभेद व्हाल. हा भेद तर 'तुम्ही' निर्माण केला आहे,

'भगवंतां'नी केलेला नाही. 'या स्त्रीचा पती आहे' असे म्हटले म्हणून भगवंत म्हणतात, 'जा, आता पतीच हो.' तर अशा प्रकारे भगवंतांशी भेद निर्माण केला. आणि आता भगवंतांशी एकाकार झालात तर सर्व अभेद होईल. आणि अभेद होण्यासाठीच हे 'विज्ञान' आहे. संपूर्ण जग भगवंतांना शोधत आहे, आणि अभेद होण्यासाठीच शोधत आहे.

हा भेद का निर्माण झाला? हा तुमचा प्रश्न बरोबर आहे. गोष्ट तर खरीच आहे ना? भेद तर असा आहे, की भगवंत स्वत: आतमध्ये आहेत तरी पण एकता का वाटत नाही? भगवंतांची कधी पर्वाच केली नाही ना! त्याला तर 'ही माझी बायको, हा माझा मुलगा, हा माझा भाऊ, हा माझा मामा' या सगळ्यांचीच पर्वा आहे. अरे, भगवंतांची पर्वा तर कोणालाच नाही. भक्तालासुद्धा भगवंतांची पर्वा नाही. भक्त तर मंजीरा आणि अशाच सगळ्या धुंदीत आणि मस्तीत असतात. भगवंताची पर्वा तर कोणालाच नाही. ते भगवंत तर मला रोज म्हणतात की 'माझी कोणालाच पर्वा नाही.' कोणी चहाच्या धुंदीत, कोणी गांजाच्या धुंदीत, कोणी कसल्या धुंदीत, कोणी व्हिस्कीच्या धुंदीत, कोणी बायकोच्या धुंदीत, कोणी पैशांच्या धुंदीत, बस, सर्व जग कसल्या तरी धुंदीतच मग्न असते.

## शुद्धता वाटावी म्हणून 'शुद्धात्मा' म्हणा

**प्रश्नकर्ता :** तुम्ही शुद्धात्मा कशासाठी म्हटले आहे? फक्त आत्मा असेच का नाही म्हटले? आत्मा पण चेतनच आहे ना?

**दादाश्री :** शुद्धात्मा म्हणजे शुद्ध चेतनच. शुद्ध यासाठी म्हणायचे की पूर्वी मनात असे येत असे की 'मी पापी आहे, नालायक आहे, मी असा आहे, मी तसा आहे.' अशा प्रकारे 'स्वत:'वर जे तऱ्हेतऱ्हेचे आरोप होते ते सर्व निघून गेले. शुद्धात्म्याऐवजी नुसते आत्मा म्हटले तर स्वत:च्या शुद्धतेचे भान विसरून जाईल, निर्लेपतेचे भान निघून जाईल. म्हणून 'शुद्धात्मा' म्हटले आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग शुद्धात्म्याचे मर्म काय आहे?

**दादाश्री :** 'शुद्धात्म्या'चे मर्म हे आहे की तो असंग आहे, निर्लेप आहे, या उलट 'आत्मा' तसा नाही. आत्मा लेपित आहे आणि शुद्धात्मा, तो तर परमात्मा आहे सर्व धर्मवाले म्हणतात ना की, 'माझा आत्मा' पापी आहे, तरी पण शुद्धात्म्याला काही त्रास नाही.

शुद्धात्मा (शब्द) हेच सुचवितो की आपण आता निर्लेप झालो, पापे सगळी निघून गेली. म्हणजेच शुद्ध उपयोग, म्हणून शुद्धात्मा म्हटलेले आहे. नाहीतर 'आत्मा'वाल्यांना तर शुद्ध उपयोग नसतोच कधी. तसे तर सर्व आत्मेच आहेत ना! पण जे शुद्ध उपयोगी आहेत, त्यांना शुद्धात्मा म्हटले आहे. आत्मे तर चार प्रकारचे आहेत. अशुद्ध उपयोगी, अशुभ उपयोगी, शुभ उपयोगी आणि शुद्ध उपयोगी, असे सर्व आत्मे आहेत. म्हणून नुसते 'आत्मा' म्हटलेत तर त्यातला कोणता आत्मा? तर 'शुद्धात्मा.' म्हणजेच शुद्ध उपयोगी असतो, तोच शुद्धात्मा असतो. आणि मग उपयोग शुद्धच ठेवायचा आहे. उपयोग शुद्ध ठेवायचा आहे म्हणून शुद्धात्मा म्हटले आहे, नाहीतर शुद्ध उपयोग राहणारच नाही ना?

एका व्यक्तीने मला विचारले, 'दादा, इतर सर्व ठिकाणी फक्त आत्मा म्हणवून घेतात, फक्त तुम्हीच शुद्धात्मा असे म्हणवून घेता, असे का?' मी त्यांना सांगितले, 'ते ज्याला आत्मा म्हणतात, तो आत्माच नाही आणि आम्ही शुद्धात्मा म्हणतो त्याचे कारण वेगळे आहे.' आम्ही काय म्हणतो? तुला एकदा आम्ही हे 'रिअलाइज' करून दिले आहे की तू शुद्धात्मा आहेस आणि हे चंदुभाई वेगळे आहेत, आणि असे तुला बुद्धीने पण समजले आहे. आता चंदुभाईंकडून खूप वाईट काम घडले, लोकांनी निंदा करावी असे काम घडले, तरी त्या वेळी तू 'मी शुद्धात्मा आहे' हे लक्ष विसरता कामा नये. 'मी अशुद्ध आहे' असे कधी पण मानू नकोस. असे म्हणण्यासाठी 'शुद्धात्मा' असे म्हणावे लागते. 'तू अशुद्ध झालेलाच नाहीस' म्हणून असे सांगावे लागते. आम्ही जे शुद्धात्मा पद दिले आहे, ते शुद्धात्मापद - शुद्धपद कधी बदलतच नाही. म्हणून शुद्ध शब्द ठेवला आहे. अशुद्ध तर, हा देह आहे म्हणून अशुद्धी तर होतच राहील. कोणाची कमी अशुद्धी होईल, कोणाची जास्त

अशुद्धी होईल, असे तर होतच राहील. आणि मग त्याच्या स्वत:च्या मनात परत असे घुसते की 'दादांनी मला शुद्ध बनवले, तरी पण ही अशुद्धी तर अजून शिल्लक आहे.' असे जर मनात घुसले तर मग सर्व बिघडेल.

## कर्ताभावात राहिल्यामुळे कर्मबंधन

**प्रश्नकर्ता :** जर कोणी शुद्धात्म्याचे ज्ञान घेतले असेल आणि त्याला जर कोणी थप्पड मारली आणि त्यानेही जर परत थप्पड मारली तर मग त्याच्यावर ज्ञानाचा परिणाम झाला नाही असे समजावे? की त्याचे शुद्धात्मापण कच्चे आहे, असे समजावे?

**दादाश्री :** शुद्धात्म्याचे ज्ञान कच्चे आहे असे म्हणू शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग त्याने परत थप्पड का मारली?

**दादाश्री :** तो थप्पड मारतो, पण त्यावेळी 'तो' वेगळाच असतो. आणि 'त्याच्या' मनात पश्चात्ताप होतो की 'असे होता कामा नये. असे का बरे होत आहे?' हे 'ज्ञान' असे आहे की स्वत:ची एक जरी चूक झाली तरी ताबडतोब कळून येते आणि चूक झाली हे कळून आले की पश्चात्ताप होतोच.

आणि हे जे झाले त्यात त्याचे आणि ज्ञानाचे काही देणेघेणे नाही. हे सर्व त्याचे 'डिस्चार्ज' भाव आहेत.

**प्रश्नकर्ता :** शुद्धात्मा झाला असेल, हे ज्ञान घेतलेले असेल आणि परफेक्ट (परिपूर्ण) असेल, तर ते आम्हाला त्याच्या आचरणाने कसे समजून येईल?

**दादाश्री :** त्याच्यात अहंकार नसतो, कर्तापद संपलेले असते.

**प्रश्नकर्ता :** असे मानू या की 'मी करत नाही' ही जाणीव त्याला असते, तर मग मी याला थप्पड मारली आणि म्हटले की 'हे मी मारत नाही, शरीर मारत आहे. आत्मा मारत नाही' तर?

**दादाश्री :** असे म्हणूच शकत नाही ना! 'शरीराने मारले आहे' असे म्हणू शकत नाही. यात तर जोखीम आहे. 'शरीराने मारले, आत्म्याने नाही मारले' असे म्हणून जर बचाव केला तर मग आम्ही त्याला म्हणू, 'थांब, मला तुझ्या शरीरात सुई टोचू दे.' तर मग 'शरीराने मारले आहे' असे तो बोलणार नाही.

त्याचे काय आहे की मारणे तर एक प्रकारचा 'डिस्चार्ज' भाव आहे. या 'ज्ञाना'नंतर 'स्वत:' चार्ज करणे बंद करतो, मग फक्त 'डिस्चार्ज' शिल्लक राहतो. त्यासाठी तो जोखीमदार नाही. 'कर्ता मिटला की कर्मे सुटली.' त्याचे कर्तापण सुटले आहे.

**प्रश्नकर्ता :** 'मी करत आहे' हा भाव निघून जायला हवा.

**दादाश्री :** बस, एवढा भाव निघून गेला की काम पूर्ण झाले.

## शुद्ध-अशुद्ध, कोणत्या अपेक्षेने

आत्मज्ञान झाल्याशिवाय कोणी माणूस म्हणाला की 'माझी सुटका होईल, तर ही गोष्ट खरी नाही. खरे तर हे लोक आत्मज्ञान झाले आहे असे मानून बसले आहेत. त्यात दोन चार वाक्ये बोलतात की 'मी अनंत ज्ञानवाला आहे, मी अनंत दर्शनवाला आहे' अशा दोन-पाच गुणांना घेऊन आरडाओरडा करतात. परंतु त्यात आत्मज्ञान नाही. पुस्तकात जे आहे की 'मी शुद्धात्मा आहे', यात त्यांना असे म्हणायचे आहे की 'तू हे सर्व नाहीस आणि तू हे आहेस' असा दृष्टीपालट ते करू इच्छितात. अशा भावात तू ये, असे म्हणतात. पण त्यामुळे आत्मा प्राप्त झाला असे म्हणता येत नाही.

आत्मा प्राप्त झाला आहे असे केव्हा म्हणू शकतो? तर आत्मज्ञान झाल्यानंतर, आणि आत्मज्ञान त्याला कारण-केवळज्ञान म्हणतात. आत्मज्ञान असेच कोणाला होत नाही! सध्या कोणालाच आत्मज्ञान नाही. जर आत्मज्ञान असेल तर अशी वाणी पण नसणार, असे वर्तन पण नसणार, कसलाही आग्रह नसतोच ना!

आत्मज्ञानींना आग्रह नसतो, ते निराग्रही असतात. आणि जिथे आत्मज्ञान आहे, तिथे अहंकार नसतो, आग्रह नसतो. म्हणजेच जिथे आग्रह आहे, अहंकार आहे, तिथे ते काहीच जाणत नाहीत. एवढे मात्र खरे आहे की त्यांना शास्त्रांचे ज्ञान आहे, पण त्यात अहंकार आहे. ज्या शास्त्रांमुळे अहंकार गेला नाही, त्या शास्त्रांचे कोणतेच ज्ञान आपल्या कामी आलेले नाही.

**प्रश्नकर्ता :** काही दार्शनिकांनी म्हटले आहे की आत्मा शुद्ध-बुद्धच आहे.

**दादाश्री :** हो, आत्मा शुद्ध-बुद्ध आहे असे म्हणतात. आत्मा जर शुद्ध-बुद्धच आहे तर देवळात कशाला जाता? आणि ही शास्त्रे का वाचता? हे समजण्यासारखे आहे ना? म्हणजे तिथे फक्त सापेक्ष गोष्ट आहे. कोणत्या तरी खास अपेक्षेने शुद्ध आहे. हो, जोपर्यंत स्वतः चंदुभाई आहे आणि अज्ञानीही आहे, तोपर्यंत आत्मा शुद्ध आहे असे म्हणता येत नाही. पण हो, 'तुझे' अज्ञान गेले, तर 'आत्मा' शुद्धच आहे, आत तर तो शुद्धच आहे, कधीच अशुद्ध झालेला नाही. परंतु जर तू असाच 'शुद्ध आहे, बुद्ध आहे' असे बोलत राहिलास तर त्यातून काहीच होणार नाही. त्या शुद्धपणाचा तुला अनुभव यायला हवा. म्हणूनच जर म्हणायचेच असेल तर असे म्हणायला हवे की, 'देहाच्या अपेक्षेने मी अशुद्ध आहे आणि स्वतःच्या अपेक्षेने मी शुद्ध आहे.' कारण 'स्वतः' तर निरपेक्ष आहे, पण बोलणे असे सापेक्ष असायला हवे. फक्त निरपेक्ष गोष्ट की 'आत्मा शुद्धच आहे' असे बोलू शकत नाही! या प्रकारे 'आत्मा शुद्धच आहे' म्हणत राहिले तर मग आत्मा शोधण्याची गरजच काय!

## 'काय आहे' जाणले, पण...

गुरू काय सांगतात? 'तू हा आहेस' आणि शिष्य तसे बोलत राहतो. पण 'तू काय नाहीस' असे त्यांनी सांगितले नाही, दोन्ही (बाजू) सांगाव्या लागतात. इथे तर फक्त 'काय आहेस' एवढेच सांगितले. 'काय नाहीस' ते सांगितलेच नाही. म्हणून मग शिष्य 'काय नाहीस' मध्ये वावरतो आणि तोंडाने शब्द मात्र 'काय आहेस' ते बोलले जातात.

इथे काही लोक मला भेटले होते. मला म्हणत होते की 'माझ्या गुरूंनी मला दिले आहे.' मी म्हणालो, 'बरोबर आहे, यात चूक काहीच नाही. हे तुम्हाला तुमच्या गुरूंनी दिले आहे. पण त्यामुळे तुम्हाला आजपर्यंत काय मिळाले ते मला सांगा. जर तुम्हाला कोणी डिवचले तर तुम्हाला राग येत नाही का?' तेव्हा ते म्हणाले 'येतो, राग तर जात नाही. पण तसे व्हायला तर खूप वेळ लागेल ना?' मी म्हटले 'नाही, स्वरूप जर हातात आले तर वेळ लागणारच नाही.' मग त्यांनी विचारले 'कशामुळे थांबलेले आहे?' तेव्हा मी सांगितले ''तुम्ही 'काय नाहीत' ते तुम्हाला सांगितलेले नाही, आणि 'काय आहात' एवढेच सांगितले आहे. परंतु जर 'तुम्ही काय नाहीत' हे पण सांगितले असते तर काम झाले असते.'' कोणत्या गुरूला हे माहीत आहे की (तुम्ही) काय नाहीत? मला सांगा बरे!

आता, खाण्या-पिण्यात तू नाहीस का? त्याने तर 'ॲडजस्ट' केले की मी शुद्ध-बुद्धच आहे. पण आता तू काय नाहीस? ते शोधून काढ ना! की मग तू मानतोस तसेच आहे? मी पण शुद्ध-बुद्ध आहे आणि वेलची पण शुद्ध-बुद्ध आहे? मग आता 'काय नाहीस?' याचे विश्लेषण केल्याशिवाय काही होऊ शकत नाही, आणि सर्व भटकत राहतात. ही भटकंती अनंत जन्म चालूच आहे.

नरसिंह मेहतानी खूप विश्लेषण केले, कारण ते खूप विचारवंत होते. 'नागर' काय असे तसे होते का? ते अजिबात असे तसे नव्हते आणि त्यांनी खूप विश्लेषण केले होते आणि नंतर ते म्हणाले *'जहां लगी आत्मा तत्त्व चिन्ह्यों नहीं, त्यहां लगी साधना सर्व जूठी.'* पाहा, ते स्वत:च्या साधनेला खोटी म्हणत आहेत! तर मग 'आत्मतत्त्व जाणणे म्हणजे काय?' तर 'काय आहे' जाणणे, यालाच आत्मतत्त्व म्हणतात आणि 'काय आहे' हे जरी जाणले नाहीत तरी एकवेळ चालेल, पण 'काय नाही' एवढे मात्र जाणलेत तरी माझ्यासाठी खूप झाले. कारण 'काय नाही' ते जाणले तर मग 'काय आहे' ते अध्याहार (बाकी उरलेले) राहिले. आणि अध्याहार तर खरी गोष्टच आहे. ती नाही

जाणली तरी चालेल. पण 'काय नाही' ते जाणलेच पाहिजे. या उलट लोकांनी 'काय आहे' ते जाणून घेतले आणि मग तेच बोलत राहतात. मग लाडू खाताना परत... असे होते ना? हे असेच चालू आहे, म्हणूनच अनंत जन्म होतच राहतात.

## 'काय नाही', हे कसे जाणायचे?

**प्रश्नकर्ता :** आता त्या 'नेगेटिव्ह साइड' (नकारात्मक बाजू) बद्दल मला सांगा ना, मी ती 'नेगेटिव्ह साइड' कशी ओळखू?

**दादाश्री :** त्याचा खुलासा मी तुम्हाला त्या दिवशी करीन. त्या वेळी सर्व नेगेटिव्ह गोष्टींचे स्पष्टीकरण होईल. मग या गोष्टी तुम्हाला मजेशीर वाटतील. त्यानंतर मी जे सांगू इच्छित आहे ते तुम्हाला नीट समजेल.

म्हणून मी या सर्वांना म्हणतो की प्रथम 'मी काय नाही' हे जाणून घ्या. त्यावर ते म्हणतात की 'मी काय नाही' हे मला समजून घ्यायचे आहे. तेव्हा मी म्हणतो 'माय' (माझे) एवढे काढून टाक. 'माझे हात' म्हणजे तू नाहीस. 'माझे डोके' म्हणजे तू नाहीस 'माझे डोळे' म्हणजे तू नाहीस, हे सगळे मायनस (वजा) करत जा. मग मनाला वजा कर. माय माइंड, माय इगोइझम, माय स्पीच (माझे मन, माझा अहंकार, माझे बोलणे) हे सगळे वजा कर. तेव्हा तो म्हणतो, 'तर मग माझे कल्याणच होईल.' होईलच, ताबडतोब होईल. तर कर ना, पण बिचारा हे सर्व वजा करील तरी कसा? यासाठी तर पापे भस्मीभूत व्हायला हवीत ना!

हे पूर्ण जग कसे आहे? असे केले की असे अडकतो, तसे केले की तसे अडकतो. म्हणजेच सगळे सापेक्ष आहे, एक अपेक्षा (पूर्ण झाली) की लगेच दुसरी अपेक्षा तयार असते. म्हणून आम्ही जेव्हा पापे भस्मीभूत करून टाकतो, त्यानंतर (मी) 'हा आहे', आणि 'हा नाही' हे सर्व समजते. बाकी, 'काय नाही' हे आम्ही एका परदेशी व्यक्तीला सांगितले होते.

मी लोणावळ्याला गेलो होतो, तिथे ते परदेशी लोक आले होते. ते म्हणाले, 'आम्हाला काहीतरी द्या.' तेव्हा मी त्यांना म्हटले, 'सेपरेट आय ॲन्ड माय विथ ज्ञानीस् सेपरेटर.' (मी आणि माझे हे ज्ञानींच्या सेपरेटरने वेगळे करा.) मी माझा सेपरेटर तुला देणार नाही, पण मी तुला सेपरेशनचा - (वेगळे करण्याचा) आतील रस्ता सांगतो. त्या प्रकारे तू 'माझे' वजा करत जा, हे वजा कर, ते वजा कर. पण तो प्राप्त करील तरी कसा? त्याची पापे नष्ट झाल्याशिवाय त्याला प्राप्ती कशी होणार? कारण ही जी पापे आहेत ना, ती या ज्ञानावर आवरणे आणतात. म्हणून प्रथम पापे नष्ट व्हायला हवीत. ती पापे आहेत म्हणून तर आठवण राहत नाही ना! आणि यांच्या लक्षात शुद्धात्मा का राहतो? कारण यांची पापे नष्ट झाली आहेत, म्हणून निरंतर लक्षात राहते.

**प्रश्नकर्ता :** तो जो सूक्ष्म पडदा आहे, तो 'रिमूव' (दूर) व्हायला हवा ना?

**दादाश्री :** आम्ही तो 'रिमूव' करतो.

## 'अक्रम मार्गात' लिफ्टमधून मजेत मोक्ष

**प्रश्नकर्ता :** तुम्ही यासाठी, आत्मज्ञानासाठी अक्रम मार्ग सांगितला आहे, हा क्रमिक मार्गापेक्षा वेगळा आहे आणि सोपा आहे, असे तुम्ही म्हटले आहे.

**दादाश्री :** हो, अक्रम मार्ग म्हणजेच हा 'लिफ्ट मार्ग' आहे आणि क्रमिक मार्ग म्हणजे पायऱ्या, पायरी पायरी ने चढत जायचे. आणि अक्रम म्हणजे सरळ लिफ्टमध्येच बसायचे. त्यात तुम्हाला काहीच करावे लागत नाही, सरळ मोक्ष! जर तुम्हाला काही करावे लागत असेल तर मग तुम्हाला मी भेटलोच नाही, असेच म्हणावे लागेल. म्हणजेच तुम्ही काहीच करायचे नाही. आम्ही फक्त पाच आज्ञा देतो, ज्यामुळे तुम्ही लिफ्टमधून हात-पाय बाहेर काढणार नाही.

**प्रश्नकर्ता :** पण असा मार्ग कुठेच सहज मिळत नाही ना?

**दादाश्री :** आहे ना! हा मार्ग मोकळाच आहे ना, आणि हजारो

लोकांनी तो मिळवला आहे. कमीत कमी पंचवीस हजार लोकांनी तो मिळवला आहे आणि तुम्ही म्हणता मिळत नाही. असे कसे बोलू शकता? मार्ग तर आहे, पण तो मार्ग तुम्हाला सापडेल तेव्हा! पण टाइमिंग (ती वेळ) जुळायला पाहिजे ना? टाइमिंग जुळले की मग मार्ग मिळतो.

सर्व प्रकारचे मनाचे स्पष्टीकरण झाले, तर वेळ जुळते. हा मार्ग बरोबर आहे असे मनाचे समाधान झाले की मग गाडी रूळावर येते, नाहीतर ती रूळावर येतच नाही ना? गाडी सारखी भ्रांतीच्या लाईनीवरच फिरत राहील, 'मेन लाइन' वर तर येणारच नाही. कोणत्याच ठिकाणी 'मेन लाइन' वर कोणी नसतेच. भ्रांत लाईनीवरच असतात सगळे आणि अक्रम मार्ग म्हणजे मेन लाइन. म्हणजे हा फुल स्टॉप (पूर्ण विराम) मार्ग आहे. हा कॉमा (स्वल्पविराम) मार्ग नाही.

क्रमिक मार्ग म्हणजे काय? तर स्टेप-बाय-स्टेप. म्हणजे जर कोणी संत पुरुष भेटले तर पाच हजार पायऱ्या चढून जातो. आणि मग जर कोणी ओळखीचा भेटला आणि तो कॅंटिनमध्ये घेऊन गेला तर परत तीन हजार पायऱ्या खालीही उतरतो. असे चढणे-उतरणे, चढणे-उतरणे तो करत राहतो. अर्थात तो सुरक्षित मार्ग नाही ना!

**प्रश्नकर्ता :** अक्रम मार्गावर वळण्यासाठी काय करायला हवे?

**दादाश्री :** तुम्ही इथे आला आहात आणि तुम्ही जर मला म्हणालात की 'साहेब माझे निराकरण करा' (मला मोक्ष द्या), तर निराकरण होईल. परंतु असे तर माणूस जेव्हा सर्व अंतराय संपलेले असतात, तेव्हाच बोलू शकतो. नाहीतर 'होईल', पुढे गेल्यावर बघू, असे करत दोन वर्षे घालवतात. नंतर परत येतात. पण आले आहेत म्हणजे प्राप्ती होणार हे निश्चित. हजारात एक-दोन जणच नापास होतात, इतर नाही. इतर सर्व जणांना प्राप्ती होते. कारण असे रोख कोण सोडील? आणि त्याला आणखी काहीच करायचे नसते. फक्त लिफ्टमध्ये बसायचेच असते.

## ज्ञानींपाशी पोहोचला, हीच पात्रता

**प्रश्नकर्ता :** हे ज्ञान कोणालाही प्राप्त होऊ शकते की त्यासाठी काही पूर्व भूमिका (पात्रता) असायला हवी?

**दादाश्री :** नाही. तो इथे आला हीच त्याची पात्रता आणखी कोणत्याच पात्रतेची गरज नाही. इथे तो आला ना, तीच त्याची पात्रता. नाहीतर तशी पात्रता पाहायला गेलो तर ते कधी पास होतील आणि इथे आमच्याकडे तर नापास झालेले लोकसुद्धा चालतील. नापास झालेल्या लोकांनासुद्धा मोक्षाच्या मार्गावर घेऊन जाऊ.

## जिज्ञासू वृत्ती तर 'वस्तू' प्राप्त करवून देते

**प्रश्नकर्ता :** आम्ही ज्ञान घेतले, तर आमची ती स्टेज पण उच्च होईल का?

**दादाश्री :** मग तुमच्यात आणि माझ्यात काही फरकच राहणार नाही. फरक फक्त एवढाच राहील की मी माझ्या दुकानातील सर्व माल विकून टाकला आहे आणि दुकान रिकामे केले आहे. आणि तुमचे दुकान रिकामे करण्याचे काम अजून बाकी आहे, एवढाच फरक. तुम्हाला अजून सर्व माल विकायचा आहे. गूळ-साखर जे काही शिल्लक आहे, त्याचा निकाल लावायचा आहे. आणि मी पूर्ण निकाल लावून मोकळा झालो आहे. एवढाच फरक आहे.

म्हणजेच मी आता तुम्हाला माझ्याबरोबरच बसवतो. जिथे मी स्वत: आहे तिथेच. जर असे उच्च पद मिळाले तरच चिंता बंद होतील ना? नाहीतर चिंता बंद होणे काय सोपे आहे का?

या जगात कोणीही माणूस चिंतामुक्त झालेला नाही, आणि मी तुम्हाला चिंतामुक्त करून देतो! पण ते तर मी जेव्हा तुम्हाला माझ्या दशेत बसवेन तेव्हाच चिंतारहित व्हाल ना! असेच तर होणार नाही ना!

चिंता बंद झाल्या तर समजा की आता या जन्मात तुम्ही मोक्षाला जाणार आहात. संसारात राहून, बायका-मुलांसोबत राहून, या संसारातील

सर्व व्यवहार करून देखील जर तुम्हाला चिंता वाटत नसेल तर निश्चित समजा की एका जन्मात मोक्ष मिळणार आहे, याची खात्री बाळगा.

**प्रश्नकर्ता :** ती स्थिती मिळवणे फार कठीण आहे.

**दादाश्री :** कठीण तर निश्चित आहे. पण हे अक्रम विज्ञान निघाले आहे ना, त्यामुळे मोक्ष तर खिचडी बनविण्यापेक्षाही सोपा झाला आहे! हे अक्रम विज्ञान प्राप्त होणे मुश्कील आहे, असे पुण्य जागृत होणे मुश्कील आहे आणि ते प्राप्त झाले तर तुमचे कल्याणच होऊन जाईल! कारण पुण्य जागृत झाल्यावर तुम्हाला काहीच करायचे नसते. तुम्हाला फक्त लिफ्टमध्ये बसायचे आहे, फक्त एवढेच की हात-पाय बाहेर काढू नका, आणि त्यासाठी मी ज्या आज्ञा दिल्या आहेत, त्या पाळा.

**प्रश्नकर्ता :** सध्या तर आम्ही जिज्ञासू आहोत, ज्ञान आणि अज्ञान यातील फरक जाणण्याची इच्छा आहे, म्हणून आलो आहोत.

**दादाश्री :** हो, आता तर तुमची जिज्ञासू दशा आहे, पण संपूर्ण दिवस तुम्ही जिज्ञासू असता का?

**प्रश्नकर्ता :** जवळजवळ पूर्ण दिवस.

**दादाश्री :** नाही, पूर्ण दिवस तुम्ही जिज्ञासू नसता. त्याचे काय आहे की या क्षणी तुमची जिज्ञासू दशा आहे. जेव्हा दवाखान्यात बसलेले असता तेव्हा पेशंटसारखी दशा असते. जिथे जिथे जशी अवस्था असते ना, ती अवस्था तुम्ही मान्य करता आणि म्हणून तुमची ती दशा असते. पण 'प्रत्यक्षात तुम्ही कोण आहात' याचा शोध एव्हापर्यंत घ्यायला हवा होता ना?

**प्रश्नकर्ता :** हो, हवा होता.

**दादाश्री :** तर मग का नाही शोधून काढले?

**प्रश्नकर्ता :** ते शोधण्याचे प्रयत्न चालूच आहेत, साहेब.

**दादाश्री :** कुठे शोधत आहात?

**प्रश्नकर्ता :** वाचून, सत्संगातून, ज्ञानी पुरुषांना भेटून, याप्रकारे शोध चाललाच आहे.

**दादाश्री :** ती शोधाशोध बरोबर आहे. असे शोधत शोधत आज आपण 'ज्ञानी पुरुषां'जवळ येऊ शकलात. तर आता तुम्ही 'ज्ञानी पुरुषांना' सांगा, जे काही हवे असेल ते सर्व मागून घ्या. जे जे काही हवे असेल ते सर्वच मागण्याची तुम्हाला सूट आहे, हवे तेवढे 'टेन्डर' भरायची सूट आहे.

असे आहे की, बाहेर मुळा घ्यायला गेलो तर मुळ्याला पण काहीतरी किंमत आहे, त्या मुळ्याचे दहा पैसे मागतात. आणि ही तर अमूल्य गोष्ट आहे. म्हणजेच तुम्हाला काय घ्यायचे आहे? याची तर 'किंमत' करूच शकत नाही ना? म्हणजेच आपल्याला 'हे घ्यायचे आहे', असे स्वत:चे लक्ष्य ठेवायला हवे. त्यासाठी तुम्ही तयारी करायला हवी. शाळेत बक्षीस घ्यायला जायचे असेल तरी पण मुले किती तयारी करतात? किती अदबीने, किती विनयाने, किती विवेकाने बक्षीस घ्यायला जातात. तर मग यासाठी काही पूर्व तयारी असायला हवी ना? भावना आणि अशी सर्व जागृती व्हायला हवी. तुला एक बक्षीस मिळाले आहे असे म्हटले तर मुले किती खुश होतात. याउलट ही तर एक अमूल्य वस्तू देण्याची बाब आहे.

## अक्रम मार्गाच्या अद्वितीय सिद्धी

जेव्हा या जगात कोणत्याही द्वंद्वाचा स्वत:वर परिणाम होत नसेल, कोणत्याही गोष्टीचा परिणाम होत नसेल, 'मी परमात्मा आहे' असे भान झाले असेल, तर मग झालेच कल्याण! किंवा मग 'मी शुद्धात्मा आहे' अशी श्रद्धा 'फिट' झाली, अशी प्रतीती बसली, तरीही तो पुढे जाईल. म्हणजेच प्रथम समज यायला हवी आणि समज येईपर्यंत वर्तन बदलेल किंवा बदलणार नाही. परंतु ज्ञानात आले असे कधी म्हटले जाईल? तर वर्तनात बदल झाला तरच ज्ञानात आले असे म्हटले जाईल. वर्तनात असेल तरच त्याला ज्ञान म्हणतात.

आम्ही जे ज्ञान देतो, ते केवळदर्शनाचे ज्ञान देतो, क्षायक समकितचे ज्ञान देत असतो. नंतर जर तो आमच्या आज्ञांमध्ये राहिला तर दोन्ही फळे मिळतील. आणि त्याचे क्षायक ज्ञान कधी होऊ शकेल? तर जेव्हा ती समज वर्तनात येईल, तेव्हा क्षायक ज्ञान होईल.

मी तुम्हाला केवळज्ञानच देतो, पण या काळामुळे ते पचनी पडत नाही. तरी पण मी मात्र पूर्ण केवळज्ञान द्यायला हवे. कारण मी जर पूर्ण ज्ञान दिले नाही तर ते तुमच्यात प्रकट होणार नाही, पण या काळामुळे ते तुम्हाला पचत नाही. ते पचले नाही तरी आपल्याला हरकत नाही. कारण मोक्ष तर आपल्याजवळ आला, मग बाकी उरलेच काय?

असा मोक्ष मिळाल्यावर खुशाल मुला-मुलींची लग्ने करा, त्याला काय हरकत आहे? नाहीतर एखाद्या जीवाला थोडे जरी दु:ख देऊन मोक्षाला जाण्याची इच्छा ठेवली, तर कोणी मोक्षात घुसू देईल का? कारण बायको म्हणेल, 'आता आपण जाऊ नका. या धाकट्या मुलीचे लग्न झाल्यावर मग जा.' आणि तसे न करताच जर तुम्ही पळून गेलात तर काय तुम्हाला मोक्ष मिळेल? भगवंतांनी काय म्हटले आहे की संसार बाधक नाही, अज्ञान बाधक आहे. अज्ञान गेले की मग काहीच अडचण नाही ना!

## अहो! आत्मा जाणणे म्हणजे तर...

नाहीतर हे सर्व लोक ज्याला आत्मा समजतात ना, ते मॅकेनिकल आत्म्यालाच आत्मा समजतात. तीच भ्रांती आहे ना? आणि आम्ही जर त्यांना विचारले, 'तुम्हाला समकित झाले आहे का?' तर म्हणतील, 'नाही, समकित तर झालेले नाही.' आत्मा जाणल्यानंतर बाकी उरलेच काय? तो क्षायक समकितच्याही पुढे, अगदी केवळज्ञानाजवळ पोहोचला, असेच म्हटले जाईल. म्हणजेच 'आत्मा जाणता येईल' असा नाही. म्हणून तर कृपाळूदेव यांनी मोठ्या पुस्तकावर लिहिले आहे ना, *'जेणे आत्मा जाण्यो, तेणे सर्व जाण्युं.'* (ज्याने आत्मा जाणला, त्याने सर्व काही जाणले) म्हणजे जे मुख्य सांगायचे होते ते त्यांनी वरतीच लिहिले

आहे. आणि जर जाणलेले नसेल तर आतमध्ये डोकेफोड कर. अनंत जन्मांपासून डोकेफोड केली आहे आणि परत पुन्हा तेच कर, असे सांगतात. तरी पण असे करत राहा, तर कधी ना कधी तरी खरी वस्तू मिळेल.

## ...'ज्ञानीं'च्या भेदज्ञानाने जाणता येऊ शकते

**प्रश्नकर्ता :** अनात्म्याला जाणल्याशिवाय आत्म्याला जाणता येते का?

**दादाश्री :** जो आत्म्याला जाणील तो अनात्म्याला जाणू शकेल, पण ते केवळ शब्दाने जाणणे होईल. पण त्याने अनात्म्याला जाणता येत नाही. म्हणून आम्ही असे म्हटले आहे की 'मन-वचन-काया यांच्या तमाम संगी क्रियांपासून 'मी' पूर्णपणे असंग आहे.' त्या सर्व संगी क्रिया अनात्मा आहेत. 'मन-वचन-काया यांच्या तमाम लेपायमान भावांपासून मी सर्वथा निर्लेप आहे.' हे जे लेपायमान भाव मनात येतात तो सर्व अनात्म विभाग आहे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजेच अनात्मा आणि आत्मा, या दोघांना एकाच वेळी जाणता येते का?

**दादाश्री :** एकाच वेळी तर जाणता येत नाही. ते तर आम्ही येथे ज्ञान देतो तेव्हा सर्व वेगळे-वेगळे होते. पण सर्व काही 'जसेच्या तसे' जाणावे तर लागेलच ना?

अजूनपर्यंत तर तत्त्व काय आहे तेच जाणत नाहीत, आणि 'आत्मा आहे, शुद्धात्मा आहे' असे बोलतात. 'ज्ञान-दर्शन-चारित्र्य' असे सर्व बोलतात, पण यात आत्मा काय आहे? त्याची तर जाणीवच नाही ना!

**प्रश्नकर्ता :** तर मग मी काहीच जाणत नाही असा भाव ठेवायला हवा का?

**दादाश्री :** हो, 'मी काहीच जाणत नाही' हेच शहाणपणाचे वाक्य आहे.

# वीतराग दृष्टीमुळे संसार विलय होतो

ज्ञान ही तर दृष्टी आहे. ही चामड्याच्या डोळ्यांची दृष्टी आहे आणि दुसरी ज्ञानदृष्टी आहे, त्या दृष्टीने जर पाहता आले तर काम होऊनच जाईल ना! हे चामड्याचे डोळे नाहीत का? यामुळे तर असे दिसते की 'हे माझे सासरे आहेत, हे माझे मामा आहेत, हे काका आहेत.' या सर्व गोष्टी खऱ्या आहेत का? या सर्व गोष्टी 'करेक्ट' (बरोबर) आहेत का? कोणी कायमचा सासरा असू शकतो का? जोपर्यंत घटस्फोट घेतलेला नाही तोपर्यंत सासरा, घटस्फोट घेतल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून तो संबंध संपून जातो ना! म्हणजेच या सर्व 'टेम्परररी अॅडजस्टमेंट्स' आहेत. मात्र दृष्टी तर 'ज्ञानी पुरुष'च बदलून देतात.

**प्रश्नकर्ता :** बहिर्मुखी दृष्टीला अंतर्मुखी करून देतात.

**दादाश्री :** नाही. तशी अंतर्मुखी दृष्टी नाही. आता सुद्धा तुमची दृष्टी आत पाहणारी तर आहेच. पण (ज्ञानी) तुमची दृष्टी बदलून देतात, त्यामुळे मग बाहेर पण आत्मा दिसतो. आत जसा आत्मा आहे, तसा बाहेर पण नाही का? पण तुमची ती दृष्टी आम्ही बदलून देतो. आम्हाला तर एक मिनिटदेखील संसाराची आठवण येत नाही.

**प्रश्नकर्ता :** आम्हाला एक मिनिट पण संसार विसरता येत नाही.

**दादाश्री :** म्हणजेच पूर्ण 'डिझाइन'मध्येच फरक आहे, पूर्ण दृष्टीतच फरक आहे, बाकी काही नाही. तुम्ही हे पाहत आहात आणि मी दुसरीकडे असे पाहत आहे, पूर्ण दृष्टीच वेगळी आहे. यात आणखी काहीच प्रयत्न करायचा नाही. जर कोणी तुमची दृष्टी बदलून दिली तर तुम्हाला पण तसे दिसू लागेल.

दृष्टी एकदा बदलल्यानंतर ती दृष्टी उमलत जाते आणि तसतसा 'स्वत:' 'भगवंत' होत जातो. पण जोपर्यंत दृष्टी उमलत नाही तोपर्यंत तर खिसा कापला गेला तर खिसेकापूला गुन्हेगार मानतो. दृष्टी दोषामुळे पुद्‌गल अन्य स्वरूपात दिसते.

**प्रश्नकर्ता :** याला चर्मचक्षुवाली दृष्टीचा दोष म्हणतात ना? अज्ञानतेत असतील तर मग 'आम्ही अज्ञानतेत आहोत' हे कळणारच कसे?

**दादाश्री :** असे कळत नाहीच ना! मग जशी ज्याची दृष्टी असते ना, तसा तो बनत जातो. ही चामड्यांच्या डोळ्यांची दृष्टी, ती दृष्टीच नाही. त्याची दृष्टी ज्ञानानुसार असते, जेवढे ज्ञान आहे, त्या प्रमाणात दृष्टी असते. जे ज्ञान 'त्याला' प्राप्त झाले आहे, त्याच्या आधारावरच 'त्याची' दृष्टी असते आणि जशी दृष्टी असते तसेच सगळे बाहेर दिसते. मग तो 'हा माझा मित्र आणि हा माझा शत्रु' असे म्हणतो. खरे तर या जगात शत्रु आणि मित्र असे कोणी नसतेच, पण त्याची दृष्टीच तशी झाली आहे, म्हणून असे दिसते.

**प्रश्नकर्ता :** जी गोष्ट चुकीची आहे ती सोडून दिली पाहिजे. हळूहळू एवढा प्रयत्न केला तर फरक पडत जातो.

**दादाश्री :** जर मोक्ष हवा असेल तर चूक-बरोबर हे द्वंद्व काढून टाकावे लागेल. आणि जर शुभात यायचे असेल तर वाईट गोष्टींचा द्वेष करा, तिरस्कार करा आणि चांगल्या गोष्टींवर राग (आसक्ती) करा. पण याउलट शुद्धमध्ये चांगले-वाईट असा कुणावरच राग-द्वेष बाळगायचा नाही. कारण कोणतीच वस्तू चांगली-वाईट नसते, ही तर केवळ दृष्टीची मलीनता आहे. हे चांगले दिसते आणि हे वाईट दिसते हीच दृष्टीची मलीनता आहे आणि तेच मिथ्यात्व आहे. म्हणजेच दृष्टीविष संपायला हवे. ते दृष्टीविष आम्ही काढून टाकतो. दृष्टीविष निघून गेले की मग आत्म्याचे लक्ष प्राप्त होऊ शकते. नाहीतर आत्म्याचे लक्ष प्राप्त करणे ही काही अशी-तशी गोष्ट नाही! वीतरागता यायला हवी, राग-द्वेष होताच कामा नये. राग-द्वेष बंद करायची प्रॅक्टिस करून ते बंद होत नाही. ते बंद करायची प्रॅक्टिस केली आणि ते बंद झाले असे कधीच होत नाही. वीतराग ही तर दृष्टी आहे! सध्या तुमची दृष्टी राग-द्वेष युक्त आहे आणि आमची वीतराग दृष्टी आहे. म्हणजे फक्त दृष्टीचाच फरक आहे. संपूर्ण फरक केवळ दृष्टीचा आहे. आणि 'ज्ञानी पुरुष'

अगदी सहजपणे, लगेचच ह्या दृष्टीला बदलून देतात! त्यानंतर मुक्तीचा अनुभव होतो.

## दृष्टी बदलल्याशिवाय सर्व काही निरर्थक

**प्रश्नकर्ता :** मी हे विचारत होतो की दृष्टी बदलली तरी पण वृत्ती तर राहतातच ना, त्याचे काय?

**दादाश्री :** दृष्टी कशी बदलेल? नाही, असा कोणताच मार्ग नाही की दृष्टी बदलेल. वृत्ती मिटू शकते, पण दृष्टी बदलू शकत नाही. दृष्टीमुळेच हे सर्व जग उलटे-पालटे झाले आहे! कुठली दृष्टी? तर 'उलटी दृष्टी.' 'जसे आहे तसे' दिसत नाही. म्हणून मग 'त्याला' जसे दिसते, त्यात 'तो' तन्मयाकार होऊन जातो. वृत्ती तर सर्व संपतात आणि मग नव्या वृत्ती येतात. पण जोपर्यंत दृष्टी बदलत नाही, तोपर्यंत वृत्ती बदलत राहतात. म्हणून काही फायदा झालेला नाही. अरे, साधू झालेत, तिखट-गोड सगळे काही विसरलेत, त्या सर्व वृत्ती मिटल्या, तरी पण दृष्टी बदलल्याशिवाय काहीही निष्पन्न होत नाही.

आपल्याकडे खूप संत असे असतात की ज्यांच्याजवळ आपण बसलो ना, तर अरे वा... आपले मन एकदम आनंदी होऊन जाते! तेव्हा आपल्याला वाटते की अहाहा! हे संत कसे असतील? कारण बर्फाचा स्वभावच आहे की त्याच्यामुळे सर्वांना शीतलतेचा अनुभव येतो. आता जर संतांमुळे शांती वाटली, तर तुम्हाला असे वाटेलच ना की इथे काहीतरी खास आहे? पण मी म्हणेन, तिथेही काहीच नसते. कारण ते वृत्तींना मारत राहतात. वृत्ती मारल्या म्हणून स्थैर्य आले आणि स्थैर्य आले म्हणून ते लोकांना हेल्पफुल वाटतात. पण त्यांना ते परत अस्थिर करावे लागेल, तरच काम होईल. पण जगाला हे सर्व कसे कळणार?

**प्रश्नकर्ता :** पण त्यामुळे दृष्टी बदलते का?

**दादाश्री :** दृष्टी बदलत नाही, वृत्ती बदलतात. एका मर्यादेपर्यंतचा अहंकार आणि त्या प्रकारच्या वृत्ती सोडून इतर सर्व वृत्ती संपवून

टाकतात, असे सर्व प्रयोग करणारे येथे आहेत. आणि ते जेव्हा असे बसलेले असतात तेव्हा आसपासचे वातावरण किती सुंदर वाटते! ते मी पण पाहिले आहे. तरी पण मी हे शोधून काढले की इथे काहीच तथ्य नाही. ज्ञानाबद्दल विचारले की लगेच समजून येते.

**प्रश्नकर्ता :** नसणारच ना?

**दादाश्री :** म्हणजेच जिथे ज्ञान नाही, तिथे अध्यात्म पण नाही. हे सर्व आधिभौतिक मार्ग आहेत. पूर्वीच्या काळी आध्यात्मिक मार्ग होते. आताचे लोक जे 'अध्यात्म नाही', त्यालाच अध्यात्म म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** दादा, त्यांनी जर असा स्वीकार केला की मी तर अगदी कोरा कागद आहे, कोरी पाटी आहे.

**दादाश्री :** तसा स्वीकार केला तर खूप चांगले आहे. शहाणपणाची गोष्ट आहे.

**प्रश्नकर्ता :** मग तर त्यांची दृष्टी पण बदलेल ना?

**दादाश्री :** निश्चितच बदलेल, पण दृष्टी बदलून देणारे पाहिजेत. आपणहून दृष्टी बदलता येत नाही. अनादिकाळापासून हा व्यवहार चालत आला आहे की दृष्टी बदलून देणारा हवा. दृष्टी बदलते तेव्हापासून तुम्हाला सृष्टी बदलली आहे, असे वाटते. यालाच दृष्टी बदलली असे म्हणतात. जर सृष्टी बदलली नाही तर दृष्टी बदलली असे कसे म्हणता येईल? नाहीतर जशी दृष्टी तशीच सृष्टी दिसत राहते.

## ज्ञानींच्या कृपेने दृष्टी बदलते

**प्रश्नकर्ता :** म्हणजेच मुख्यतः अंतर्मुख दृष्टी असली पाहिजे?

**दादाश्री :** त्याचे काय आहे की कित्येक लोक तर सतत आत पाहत राहतात. अरे, आत तर काहीच नाही, आत तर 'ज्ञानी पुरुषां'नी दाखविल्यानंतरच दिसते. नाहीतर असे डोळे मिटून तर स्त्रिया वगैरेच दिसतात.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे अंतर्मुख होण्यासाठी कोणाच्यातरी आधाराची गरज असते का?

**दादाश्री :** ती तर कृपा असेल तरच अंतर्मुख होता येते. कृपेशिवाय अंतर्मुख कसे काय होता येईल? नाहीतर लोकांना आतमध्ये कारखाने दिसतात आणखी काय काय कल्पनाचित्रे दिसतात.

**प्रश्नकर्ता :** ती कृपा केव्हा होते?

**दादाश्री :** कृपा तर 'ज्ञानी पुरुषां'चे दर्शन केले, त्यांच्याप्रती विनय बाळगला, त्यांच्या आज्ञेत राहिले तर कृपा मिळते. कृपा काय अशी उगाचच मिळेल? तर काय विरोधी बनल्याने कृपा मिळते? असा कोणी विरोध केला तरी पण 'ज्ञानी पुरुषां'ची त्याबद्दल काही हरकत नसते, पण विरोध करणाऱ्याला किती नुकसान होईल! आम्हाला शिव्या दिल्यात तरीही काहीच हरकत नाही. पण त्यामुळे तुमचे किती नुकसान होईल? म्हणून आम्ही तुम्हाला समजावतो की सरळ राहा. साप बिळात घुसताना सरळ चालतो ना? वाकडा चालतो का? त्यावेळी तो सरळच होऊन जातो ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** तसेच इथे 'ज्ञानी पुरुषां' समोर सरळ व्हायला हवे. इथे वाकडेपणा चालणार नाही. इथे तर आज्ञेत राहायला हवे. कारण अशा 'ज्ञानी पुरुषां'चे तर दर्शन करायला देखील मिळत नाही.

## इंद्रियांना अंतर्मुख करावे की आत्मारूप व्हावे?

**प्रश्नकर्ता :** पण हे पाच इंद्रियांच्याबद्दल सांगितले आहे की हा सगळा ब्राह्य व्यापार आहे, तर मग काय इंद्रियांना अंतर्मुख करावे?

**दादाश्री :** नाही, त्यांना तर खूप दिवसांपासून अंतर्मुख केलेले आहे. कारण अंतर्मुख करतो ना करतो, तेवढ्यात त्या पुन्हा बाहेर निघून जातात. बाह्यमुखी माल मिळाला की त्या बाहेर निघून जातात, त्याला अजिबात वेळ लागत नाही. आणि कोणाचीच इंद्रिये कधीच चैनीने बसत

नाहीत. आणि हा इंद्रियांच्या तलावाला तर कोणालाच बांध घालता आलेला नाही. पण तरीही ते जेवण जेवले आणि तरी सदा उपवासी आहेत, ते कोण?

**प्रश्नकर्ता :** दुर्वास ऋषि.

**दादाश्री :** हो, आणि कृष्ण भगवंतांसाठी काय म्हटले आहे की 'सदा ब्रह्मचारी.' कारण मूळ स्थितीत आल्यानंतर कोणतीच गोष्ट त्यांना स्पर्श करू शकत नाही. अर्थात इंद्रियांना अभिमुख करा, सन्मुख करा किंवा आणखी काही करा, त्या साऱ्या गोष्टी म्हणजे एका प्रकारच्या कसरती आहेत. त्याने शरीर चांगले राहते, मन जरा चांगले राहते, पण 'आपले' काम होऊ शकत नाही.

त्याचे काय आहे की जर आपल्याला येथून पुढल्या स्टेशनचा रस्ता माहीत नसेल आणि तोपर्यंत जर आपण फिरतच राहिलो, तर काय स्टेशन सापडेल? त्यासाठी कोणाला तरी विचारावे लागेल ना? या अज्ञानामुळेच कोणतेच काम होऊ शकत नाही. म्हणूनच 'स्वत: कोण आहे आणि कशामुळे बंधनात आहे' हे सर्व 'ज्ञानी पुरुषां'कडून जाणून घेतले पाहिजे.

## ...त्या सर्व मेकॅनिकल ॲडजस्टमेंटस्

**प्रश्नकर्ता :** आता अंतर्मुखी दशेत जर आम्हाला आतून कोणी सांगत असेल की 'तू हे चुकीचे करत आहेस आणि असेच इतर काही', तर हे सर्व आत्मा सांगत असतो का?

**दादाश्री :** नाही, तो आत्मा नाही, तो 'टेपरेकॉर्डर' आहे. बाहेर जसा 'टेपरेकॉर्डर' आहे तसाच आतमध्ये 'ओरिजिनल टेपरेकॉर्डर' आहे. तुम्ही त्याला आत्मा म्हणता? मोठे-मोठे 'ऑफिसर' पण म्हणतात की, 'माझा आत्मा बोलत आहे.' अरे, तो काय आत्मा आहे का? तो तर 'टेपरेकॉर्डर' आहे.

**प्रश्नकर्ता :** जर आत्मा बोलत नाही, तर मग 'तू हे चुकीचे वागत आहेस' असे कोण सांगते?

**दादाश्री :** तो तर 'टेपरेकॉर्डर' आहे. जे व्यावहारिक ज्ञान तुम्ही जाणता, ते व्यावहारिक ज्ञान म्हणजे आत्मा नाही. 'निश्चय ज्ञान' ते आत्मा आहे. तुम्ही जे व्यावहारिक ज्ञान मिळवले आहे ते सर्व 'टेपरेकॉर्ड' झालेले आहे, त्याचा आवाज तुम्हाला ऐकू येतो. म्हणून तुम्हाला खटकट राहते की 'व्यवहारात असे असायला हवे आणि आपण तर उलट करत आहोत.' म्हणजेच तो आत्मा नाही.

नाहीतर, आत्मा तर बोलू शकत नाही, खाऊ शकत नाही, पीऊ शकत नाही, श्वास घेऊ शकत नाही. हे सर्व आत्म्याचे कामच नाही, आत्म्याचा असा धंदाच नाही. आत्म्याचे गुणधर्म वेगळेच आहेत.

उदाहरणार्थ या अंगठीत सोने आणि तांबे दोन्ही मिसळलेले आहेत आणि त्यांना वेगळे करायचे असेल तर कोणाला द्यावे लागेल?

**प्रश्नकर्ता :** सोनाराला.

**दादाश्री :** हो, कारण सोनार त्यातला जाणकार आहे. याच प्रकारे या शरीरात आत्मा आणि अनात्मा असे दोन विभाग आहेत. जे आत्म्याचे आणि अनात्म्याचे गुणधर्म जाणतात ते त्यांना वेगळे करून देतात. पूर्ण 'लॅबोरेटरी' ठेवून त्यांना वेगळे करून देतात.

ही सर्व 'मेकॅनिकल ॲडजस्टमेंट' आहे. हे जे बोलतात, ते सर्व 'रेकॉर्ड' आहे. ऐकणाऱ्याला काय म्हणतात? 'रिसीव्हर' म्हणतात ना? म्हणजेच या सर्व 'मेकॅनिकल ॲडजस्टेमेंटस्'च आहेत. हे डोळे पण 'मेकॅनिकल ॲडजस्टमेंटस्' आहेत. मेंदू तर पूर्ण 'मेकॅनिकल' आहे, डोक्यावर गार पाणी टाकले तर सरळ राहतो. नाहीतर जेव्हा मेंदू गरम होतो आणि खूपच तापतो तेव्हा थंड पाण्याच्या पट्टया ठेवाव्या लागतात, लागतात की नाही? आतमध्ये तर केवढा मोठा आत्मा भगवंताच्या रूपात बसला आहे, तरी पण थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवायची वेळ आली. पट्ट्या ठेवाव्याच लागतात, तरच आतमध्ये सर्व थंड होते. नाहीतर आतमध्ये उकळत राहते.

जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत आत्मा वेदक आहे आणि जी वेदना

होते ती तो स्वीकारतो की 'मला वेदना होत आहेत.' ही सर्व 'मेकॅनिकल ॲडजस्टमेंट' आहे. यात काही मर्यादेपर्यंत वेदना असेल तोपर्यंत आत्मा आत राहतो आणि खूप वेदना झाली, जबरदस्त वेदना झाली तर तो बेशुद्ध होतो आणि त्याहूनही जास्त वेदना झाली तर आत्मा बाहेर निघून जातो..

'शेठजींना काय झाले होते?' असे विचारले तर सांगतील ते फेल झाले. अरे, शाळेत तर पास होत होते ना! पण इथे 'फेल' झाले. ही सर्व 'मेकॅनिकल ॲडजस्टमेंट' आहे. आणि आतमध्ये जोरदार घुसमट होत असेल तरी आत्मा निघून जातो. त्याला 'हार्ट ॲटॅक' म्हणतात ना? तो 'फौजी ॲटॅक' वेगळा आणि हा 'ॲटॅक' वेगळा. या ॲटॅकमध्ये तर आत्मा पूर्ण बाहेर निघून जातो. हिंदुस्तानातील लोकांची काय अशी दशा होत असेल? पण नियमाविरुद्ध वागले, म्हणून ही दशा उत्पन्न झाली आहे.

## सर्व परिणामांचे कारण अहंकार हेच

**प्रश्नकर्ता :** जेव्हा शरीराला दु:ख होते, तेव्हा जीवाला दु:ख होते का?

**दादाश्री :** हो, जेव्हा शरीराला दु:ख होते, तेव्हा जीवाला दु:ख होते. कारण तो जीव या शरीराला 'माझे आहे' असे मानतो आणि 'हा मीच आहे' असेच म्हणतो. त्यामुळे त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.

आता ज्याला 'हे' ज्ञान आहे त्याच्यावर मनाचा आणि वाणीचा परिणाम होत नाही. परंतु शरीराचा परिणाम तर त्याच्यावरही होतो. आता दाढ दुखत असेल तर 'ज्ञानीं' वर सुद्धा परिणाम होतो. म्हणजे या शरीरात इफेक्टिव चेतन आहे. पण ज्ञान आहे त्यामुळे ते कॉजेस् (कारणे) उत्पन्न करत नाहीत. त्याचा हिशोब ते समभावाने शांतपणे चुकता करतात.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मा निघून गेल्यावर शरीराला दु:ख का होत नाही?

**दादाश्री :** मग शरीराला दु:ख कसे काय होईल? आत्ता तर त्यात अहंकार आहे. हे शरीर म्हणजेच 'मी आहे आणि माझे आहे' असे तो म्हणतो. आणि तोच हे सर्व दु:ख भोगत आहे. म्हणजेच हे सर्व अहंकाराचेच आहे.

**प्रश्नकर्ता :** पण अहंकार तर जड आहे.

**दादाश्री :** अहंकार जड नाही. तो मिश्रचेतन आहे.

**प्रश्नकर्ता :** मिश्रचेतन म्हणजे काय? ते समजले नाही.

**दादाश्री :** मिश्रचेतन म्हणजे त्यात चेतनाचे भाव पडलेले आहेत. तर चेतनाचे भाव आणि हे जड, दोन्ही मिळून 'मिश्रण' तयार झाले आहे, म्हणून त्याला मिश्रचेतन म्हणतात. आणि मन मात्र जड आहे. मनात विचार येतात ते सर्व जड आहेत. पण अहंकार मिश्रचेतन आहे. हे शरीर तर जड आहे. पण त्याला मिश्रचेतनाचा थोडाशा स्पर्श होतो, म्हणून त्याच्यावर परिणाम होतो.

मूळ आत्म्याशिवाय आणखी एक भाग आहे. मूळ आत्म्याला तर जग जाणतच नाही. हे जे दिसते, त्यालाच जग चेतन मानते. जग ज्याला चेतन मानते त्यात थोडेसुद्धा चेतन नसते, एक अंश पण चेतन नसते, 'गिलेट' (मुलामा) करण्याएवढेही चेतन नसते, यालाच माया म्हणतात ना! जे चेतन नाही तरी पण ते चेतन आहे असे मानायला लावते, तीच भगवंताची माया! आणि 'ज्ञानी पुरुषां'नी ही माया सोडवलेली असते.

**प्रश्नकर्ता :** 'माझी माया बदलता येणे शक्य नाही, खूप अवघड आहे', असे भगवंतांनी म्हटले आहे ना!

**दादाश्री :** इतकी जास्त अवघड आहे की ती माया हलतच नाही. तर मग ती सुटणार कशी? फक्त 'ज्ञानी पुरुष'च त्या मायेपासून मुक्त करू शकतात. कारण ते स्वत: त्या मायेपासून मुक्त झालेले असतात. म्हणून ते इतरांनाही मायेपासून मुक्त करू शकतात. नाहीतर ही माया जाणारच नाही ना!

## शुद्धतेच्या शंकेचे निरसन कशा प्रकारे?

**प्रश्नकर्ता :** पुद्गल आणि आत्मा जेव्हा वेगळे होतात तेव्हा ते मुक्त होतात ना?

**दादाश्री :** पुद्गलाला काहीच देणेघेणे नाही. जेव्हा आत्मा स्वत:चे स्वरूप समजेल, त्याला त्याचे भान येईल, तेव्हा तो प्रकट होईल आणि त्याचा स्वाद चाखला तर कामच झाले. म्हणजेच आत्मा आणि पुद्गल यांचे काहीही देणेघेणे नाही. हे 'चंदुभाई' तर आत्म्याच्या बाहेर आहेत. आत्म्यापासून तर किती तरी दूर गेले, म्हणून तर 'मी चंदुभाई आहे' असे बोलतात.

पूर्ण संसारकाळात आत्मा आत्माच राहतो आणि किंचितही चालत नाही. अगदी शेवटी जेव्हा मोक्षात जायची वेळ येते तेव्हा पण गतिसहायक तत्त्व त्याला घेऊन जाते. त्यात आत्मा, आत्माच राहतो. माझे म्हणणे हे आहे की आत्म्याला काही अडचण पडू शकत नाही, असा हा संसारकाळ आहे. पण आतमध्ये अहंकार उत्पन्न होतो, तोच सर्व वेदत असतो, *शाता* (सुख परिणाम)चे पण वेदन करतो आणि *अशाता* (दु:ख परिणाम)चे पण वेदन करतो. या 'वेदन'मुळेच हे सगळे उत्पन्न झाले आहे. 'रॉंग बिलीफ' उत्पन्न झाली आहे. 'आत्मा बदललेला नाही, आत्मा बिघडलेला पण नाही. इथे आम्ही त्याची भ्रांती नष्ट करून टाकतो आणि संपूर्ण आत्माच देतो.'

जर कोणी विचारले 'अज्ञानीचा आत्मा पण महावीर भगवंतांसारखाच आहे का?' तर होय, द्रव्य, गुण आणि पर्यायाने सर्वथा तसाच आहे. परंतु जोपर्यंत त्याचा (अज्ञानीचा) अहंकार समाप्त होत नाही, तोपर्यंत नि:शंकपणा उत्पन्नच होत नाही ना! कारण अहंकारच शंका उत्पन्न करत असतो. म्हणून जोपर्यंत अहंकार आहे, तोपर्यंत कोणताही जीव नि:शंक होऊ शकत नाही. त्याची शंका दूर होतच नाही. 'ज्ञानी पुरुषां'शिवाय कोणाचीच शंका जात नाही. जेव्हा 'ज्ञानी पुरुष' शंकेचे पूर्ण निर्मूलन करतात, तेव्हाच तो नि:शंक होतो.

## 'दर्शन' बदलले, 'आत्मा' नाही

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्म्यावर दुसरी तत्त्वे परिणाम करू शकतात का?

**दादाश्री :** करतातच ना! हा सर्व दुसऱ्या तत्त्वांनीच केलेला परिणाम आहे ना? आत्मा जेव्हा येथून सिद्धक्षेत्रात जातो, तेव्हा तिथे दुसरी कोणतीच तत्त्वे नसतात, म्हणून तिथे त्याच्यावर कसलाच परिणाम होत नाही. जोपर्यंत दुसरी सर्व तत्त्वे असतात तोपर्यंत परिणाम होत राहतो. पण 'ज्ञानी पुरुषां'नी त्याला परिणाममुक्त केले की त्यानंतर 'त्याला' मोक्ष मिळतो. तरीही पूर्ण व्यवहार काळात 'आत्मा' किंचितही बिघडलेला नाही. फक्त जी भ्रांती निर्माण झाली आहे, जे दर्शन उलटे झाले आहे ते दर्शन 'ज्ञानी पुरुष' सरळ करतात, म्हणून मग 'तो' परिणाममुक्त होतो आणि मग मोक्ष प्राप्त करतो.

आता, हे दर्शन उलटे कशा प्रकारे झाले आहे? उत्तर प्रदेशात गेलो तर तिथे माकडे खूप असतात. त्यांना पकडण्यासाठी लोक काय करतात? एका अरुंद तोंडाच्या मडक्यात थोडे चणे ठेवून ते मडके झाडाखाली ठेवतात. मग ते चणे घेण्यासाठी ती माकडे खाली येतात आणि चणे घेण्यासाठी मडक्यात हात आत घालतात. चणे घेताना हात जरा दाबून आत घालतात. पण चणे घेतल्यानंतर मूठ बंद करतात, म्हणून मग हात बाहेर निघत नाही. मग जोराजोराने किंचाळून आरडाओरडा करू लागतात. पण मुठीतील चणे मात्र सोडत नाहीत. माकडाला काय वाटते? त्याला वाटते की कोणीतरी त्याला आतून पकडले आहे. हात आत घालताना मीच हात घातला होता, मग आता तो बाहेर का येत नाही? तेव्हा त्याला भ्रांती निर्माण होते, समजेनासे होते की 'मला आतून कोणीतरी पकडले.' म्हणून किंचाळून किंचाळून ओरडतो पण मूठ सोडत नाही. त्याचप्रमाणे हे लोक, सर्व जगच आरडाओरडा करत राहते पण मूठ मात्र सोडत नाहीत.

## निराकरण करण्याची विलक्षण पद्धत

ही दृष्टी कशी आहे? आपण बसले असू तर आपल्याला एका

लाइटच्या ऐवजी दोन लाइट्स दिसतात. डोळे जरा असे झाले (दाबले गेले) तर असे दोन लाइट्स दिसतात की नाही दिसत? प्रत्यक्षात तर एकच आहे. तरी पण दोन दिसतात. आपण बशीतून चहा पीत असू तर कित्येक वेळी त्या बशीच्या आतमध्ये जे एक वर्तुळ असते, ती दोन-दोन दिसतात. त्याचे काय कारण? कारण डोळे दोन आहेत, म्हणून सर्व डबल दिसतात. हे डोळे पण पाहतात आणि आतील डोळे पण पाहतात. पण ही मिथ्यादृष्टी आहे. म्हणून ती असे सर्व उलटे दाखवते. जर सरळ दाखवील तर मग सर्व उपाधीपासून आपण मुक्त होऊ, उपाधीरहित होऊ. वीतराग विज्ञान असे आहे की सर्व दु:खांचा क्षय करते आणि 'विज्ञान' हे असेच असते, विज्ञान नेहमीच क्रियाकारी असते. म्हणून हे विज्ञान जाणून घेतल्यावर विज्ञानच काम करत राहते, तुम्हाला काहीच करायचे नाही. जोपर्यंत तुम्हाला करावे लागते तोपर्यंत बुद्धी आहे. आणि जोपर्यंत बुद्धी आहे तोपर्यंत अहंकार आहे, आणि जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत याचा *निवेडा* (निपटारा) करायचा असेल तरी पण करता येत नाही.

**प्रश्नकर्ता :** ही दृष्टी बदलण्याची सुरुवात कशा प्रकारे होऊ शकते?

**दादाश्री :** दृष्टी बदलण्याची सुरुवात तर जेव्हा तुम्हाला ज्ञानी पुरुष भेटतील आणि तुम्ही त्यांच्याकडे सत्संग ऐकायला जाल तेव्हा तुमची दृष्टी हळूहळू बदलेल. आता तुम्ही ऐकत आहात म्हणून तुमची दृष्टी थोडी थोडी बदलत आहे. असे करत करत थोडा परिचय झाला, महिना-दोन महिने परिचय झाला तर दृष्टी बदलेल. किंवा मग 'ज्ञानी पुरुषां'ना सांगावे की 'साहेब, माझी दृष्टी बदला, तर मग ते एका दिवसात, एका तासातच दृष्टी बदलून देतील.

## 'ज्ञान' सर्व हकीगत 'उघड' करते

ही तर फक्त भ्रांतीची मान्यता झाली आहे. बाकी, आत्म्याला काहीच झालेले नाही. आत्मा जसा आहे तसाच आहे. फक्त आत्म्यावर

आवरणे आल्यामुळे गुंता निर्माण झाला आहे. आणि त्यामुळे अहंकार उत्पन्न झाला आहे. म्हणून मग तो अहंकार कर्ता-भोक्ता होतो. तो दु:ख पण भोगतो आणि तोच सुख पण भोगतो.

बुद्धीमान लोकांना बुद्धीमुळे असा भास होतो की आत्मा काहीतरी करतो, आणि त्यामुळे आत्मा भोगतो. खरे तर संपूर्ण जगच बुद्धीच्या आधीन आहे. कारण जोपर्यंत 'मी' आहे, अहंकार आहे, तोपर्यंत तो बुद्धीच्या आधीन असतो, तो सगळ्या गोष्टी बुद्धीच्या द्वारा पाहतो. म्हणून 'सत्य वस्तूचे' निरीक्षण होऊच शकत नाही. खरे म्हणजे ज्ञानी 'एक्झॅक्ट' ज्ञान जगासमोर मोकळे उघड करत नाहीत. तरी पण आम्ही मात्र उघडपणे सांगतो की या जगाला 'एक्झॅक्ट' ज्ञानाने जाणायचे असेल तर 'आत्म्याने असे काही केलेलेच नाही' हे जे दिसते, तसे काहीच झालेले नाही. ही तर फक्त 'राँग बिलीफ' आहे. ही 'राँग बिलीफ' जर कोणी बदलून दिली तर परत जसा होता तसा होईल. आत्म्याचा कोणताही भाग बिघडलेलाच नाही. त्याला कसलाही त्रास झालेलाच नाही. जी 'राँग बिलीफ' झाली आहे, ती बिलीफ जर कोणी पूर्णपणे बदलून दिली की मग जसा होता तसा होईल, स्वत:च्या स्वरूपात येईल आणि स्वत:च्या शक्ती विकसित होतील.

केवळ बिलीफ बदलली आहे. नाहीतर आत्मा असे तसे काहीच करत नाही. आत्मा तर परमात्माच आहे. आत्म्यात जर असा करण्याचा गुण असता ना, तर तो या संसार दशेतून कधीच मुक्त होऊ शकला नसता. आत्मा स्वत: निर्लेपच आहे, असंगच आहे, परंतु जर हे समजले तर. नाहीतर भगवंतांची गोष्ट तुम्हाला कधीच समजणार नाही. त्याचे काय आहे, ऐकणारा बुद्धीमान आणि बोलणारा ज्ञानी, असे असेल तर दोघांचा मेळ कसा बसेल? ऐकणारा बुद्धीमान आहे, तो बुद्धीच्या मापाने मोजतो आणि याउलट ज्ञानी ज्ञानाच्या मापाने बोलतात. ते यांना समजेलच कसे? त्यामुळे मग सगळे आपापल्या भाषेत समजतात.

ही तर फक्त 'राँग बिलीफ'च बसली आहे. 'एक्झॅक्टली फिगर' (वास्तविकतेत) पाहू जाल तर आत्म्याला पूर्ण संसारदशेत 'राँग बिलीफ'च

होती, बाकी काहीच नव्हते. ती 'राँग बिलीफ' जर निघून गेली तर बाकी काहीच झालेले नाही. कर्मे आत्म्याला चिकटत नाहीत. 'राँग बिलीफ' मुळे प्रकृती उत्पन्न झाली आहे.

आता तुम्ही जर आरशासमोर उभे राहिलात तर आरशाला सांगावे लागते का की माझा चेहरा दाखव? असे काही सांगावे लागत नाही ना? का असे? आणि तरी पण तो 'एक्झॅक्ट' चेहरा दाखवतोच ना? आता आरशाचा हा प्रयोग रोज होत असतो म्हणून त्याची किंमत कळत नाही. नाहीतर त्याची किंमत तर खूप मोठी आहे, हे समजण्यासारखे आहे.

आता घरात तुमची सावली दिसते का? नाही. आणि बाहेर रस्त्यावर गेलात तर सावली पडेल. त्यानंतर तुम्ही असे फिरलात तरी सावली पडेल, तसे फिरलात तरी सावली पडेल. तर ती सावली पडायला किती वेळ लागतो? म्हणजेच हे सर्व जग म्हणजे 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्'च आहे. काहीही झालेले नाही, काहीही घडलेले नाही. जग तर 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्'च आहे. यात भगवंतांना काहीही करावे लागलेले नाही. ही प्रकृती उत्पन्न होते, ती पण 'सायंटिफिक सरकमस्टॅन्शियल एव्हिडेन्सेस्'मुळेच आहे आणि ती 'इफेक्टिव' आहे (परिणामी आहे). हे मन-वचन-काया 'इफेक्टिव' आहेत, आणि या 'इफेक्टिव'चा 'आत्म्या'वर परिणाम होतो. कारण 'स्वत:'ची 'राँग बिलीफ' बसलेली आहे. 'ज्ञानी पुरुष' ती 'राँग बिलीफ' बदलतात. त्यानंतर मग 'त्याच्यावर' या सर्वांचा परिणाम होत नाही.

## संसारकाळात अज्ञानतेचाच अंमल असतो

**प्रश्नकर्ता :** तर जर चैतन्य शुद्ध झाले, तर मग त्याला परत यावे लागेल?

**दादाश्री :** यावेच लागणार नाही ना. एकदा शुद्धतेत आला की अहंकार गेला, मग परत यावेच लागणार नाही. जोपर्यंत अहंकार आहे, तोपर्यंत तो बीज टाकतो की 'मी केले' आणि मग त्यातून पुन्हा अहंकार

निर्माण होतो. जोपर्यंत 'मी केले' असे मानतो, तोपर्यंत अहंकार पुन्हा होत राहतो.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्मा पूर्वीपासून अशुद्धच असेल ना?

**दादाश्री :** नाही, आत्मा शुद्धच आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग आत्मा अशुद्ध झालाच कसा?

**दादाश्री :** ते तर लोकांनी 'शांती, शांती' म्हटले ना! हे लोक अज्ञान प्रदान करतात, त्यामुळे दर्शन बदलते, पूर्ण दर्शन बदलते. त्याचा अंमल (प्रभाव) असतो.

समजा आता एक शेठ आहेत ते पूर्ण दिवस चांगल्या प्रकारे बोलतात, न्याय, नीति अशा सर्व विषयांवर बोलतात. म्हणजे तसे विनयशील परंतु जर अर्धा शेर दारू प्याले की मग काय होईल?

**प्रश्नकर्ता :** मग ते वेडेपणा करतील.

**दादाश्री :** तर काय शेठजी बिघडले? हा तर फक्त दारूचा अंमल आहे. त्याचप्रमाणे इथे अज्ञानाचा अंमल झाला आहे.

**प्रश्नकर्ता :** जर आम्ही कधीतरी शुद्धच होतो, तर मग मलीन कसे काय झाले?

**दादाश्री :** ते शेठजी आता नीट बसले होते, त्यानंतर मग त्यांनी अर्धा शेर दारू प्यायली, तर मग मलीन कसे झाले? तेच शेठजी मग काहीही बडबडू लागले. 'मी सयाजीराव गायकवाड आहे' असे म्हणू लागले. तर मग आपल्या लक्षात येतेच ना की शेठजींना आता चढली आहे?

**प्रश्नकर्ता :** पण प्रथम तर शुद्ध होता ना? तर काय त्याच्यात एवढी पण शक्ती नव्हती? परत तो अशुद्ध कसा झाला?

**दादाश्री :** शुद्धच आहे, आत्ता, या क्षणी सुद्धा शुद्धच आहे.

काहीही झालेले नाही. हा तर फक्त अंमल आहे. अंमल संपला तर काही झालेलेच नाही. काल चंदुभाई होते आणि दुसऱ्या दिवशी अंमल उतरला म्हणजे शुद्धच झाले. दुसऱ्या दिवशी एका तासातच शुद्ध झाले. आत्मा जर अशुद्ध झाला असता, तर एका तासात कसा काय शुद्ध होतो? ज्या प्रकारे शेठजींना दारू पिऊन मग ते वाटेल तसे बडबडतात, तसाच हा पण अंमल आहे. म्हणून त्याला 'मी चंदुभाई आहे', 'मी चंदुभाई आहे' अशी नशा चढली आहे, 'रॉंग बिलीफ' सेट झाली आहे.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हणालात 'आत्मा शुद्धच होता.' तर आत्म्यापेक्षाही काही अशुद्ध शक्तींचा जोर जास्त आहे, म्हणूनच आत्मा अशुद्ध होऊ शकतो ना?

**दादाश्री :** आत्मा अनंत शक्तीवाला आहे, त्याचप्रमाणे पुद्‌गल पण अनंत शक्तीवाले आहे! ही जी पुद्‌गल शक्ती आहे, त्या शक्तीनेच पूर्ण आत्म्याला बांधून टाकले आहे, ती आता त्याला सुटूच देत नाही. म्हणजेच जडाची पण अनंत शक्ती आहे. अणुबॉम्ब टाकले होते, ते पाहिले नव्हते का? म्हणजेच जडाकडे पण अनंत शक्ती आहे.

**प्रश्नकर्ता :** जडाची शक्ती, आत्म्याच्या शक्तीपेक्षा अधिक आहे असे जर मानले तर ती शक्ती आत्म्याला परत घेऊन जाईल का?

**दादाश्री :** परत म्हणजे?

**प्रश्नकर्ता :** का? शुद्ध झाल्यानंतर परत तिने आत्म्याला अशुद्ध केले तर?

**दादाश्री :** नाही. शुद्ध झाल्यानंतर मग त्याला काहीच स्पर्श करू शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** पण प्रथम तो शुद्धच होता ना? तोच नंतर अशुद्ध झाला होता ना?

**दादाश्री :** मूळ स्वरूपाने शुद्धच आहे. पण हे जे दर्शन बिघडले आहे, ते दर्शन परत शुद्ध होते. म्हणून मग अहंकार संपतो.

**प्रश्नकर्ता :** माझे हेच म्हणणे आहे की आत्मा शुद्ध होता, निर्विकारी होता...

**दादाश्री :** आणि आत्ताही निर्विकारीच आहे.

**प्रश्नकर्ता :** ते बरोबर आहे, पण तुम्ही म्हणालात ना की जड शक्तीने बांधले आहे?

**दादाश्री :** त्याचा अर्थ असा आहे की आत्म्याच्या शक्तीवर आवरणे आली आहेत, आणि आवरणे आली आहेत म्हणून मग त्या शक्तीचे या जड शक्तीबरोबर मिश्रण झाले आहे. ती जड शक्तीच आता जास्त वरचढ झाली आहे. तिच्यापासून सुटायचे म्हटले तरी सुटता येत नाही. ज्ञानींच्याजवळ गेले तरच तिच्यापासून सुटता येते, नाहीतर लाख-लाख जन्म झाले तरी सुटता येत नाही. याच्याऐवजी लोखंडाची साखळी असती तर ती कापून टाकली असती आणि सुटलो असतो, पण ही साखळी तर तुटतच नाही ना! आणि दारू प्यायलानंतर तिचा अंमल असतो, त्याचप्रकारे इथे अहंकाराचा अंमल असतो. त्यामुळे गाडी चालू राहते.

**प्रश्नकर्ता :** जरी अंमल असला तरी पण आत्मा तर शुद्धच आहे ना?

**दादाश्री :** त्याचे काय आहे, आत्मा एकदम उदासीन आहे. जोपर्यंत 'तुम्ही' 'अहंकारात' आहात, तोपर्यंत 'आत्मा' उदासीन आहे. आत्म्याला याबद्दल राग पण नाही, आणि द्वेष पण नाही. तो काय म्हणतो, 'जेव्हा तुला अनुकूल वाटेल, तेव्हा माझ्याकडे ये. जेव्हा तुझा सर्व हिशोब चोख होईल, तुला जे चांगले वाटते ते सर्व पूर्ण झाले की मग माझ्याकडे ये.' तुम्हाला कळते ना?

**प्रश्नकर्ता :** माझे म्हणणे असे आहे की जर आत्मा शुद्धच होता, तर मग शुद्धाला तर कोणी अशुद्ध करूच शकत नाही, तर मग तो अशुद्ध कसा काय झाला?

**दादाश्री :** तो अशुद्ध झालेलाच नाही. फक्त त्याची एक शक्ती,

दर्शनशक्ती आवृत्त झाली (झाकली गेली) आहे. उदाहरणार्थ हे शेठजी आता शुद्धच आहेत, पण दारू प्यायल्यामुळे त्यांच्यातील एका शक्तीवर आवरण आले आहे, त्यामुळे ते उलट-सुलट बोलत आहेत. त्याचप्रकारे हे 'मी चंदुभाई आहे' असे म्हणतात. लोकांनी तुम्हाला 'चंदुभाई' म्हटले आणि 'तुम्ही' ते मान्य केले त्यामुळे तुमच्या एका शक्तीवर आवरण आले आहे. आवरण आले म्हणून हे सर्व उलटे झाले आहे. त्याची नशा जर कोणी उतरविली तर सर्व ठीक होऊन जाईल. यात आणखी विशेष काय बरे घडले आहे? आणखी काही झालेलेच नाही ना! जसे शेठजींचे झाले आहे तसेच हे झाले आहे. शेठजींवर आवरण येते ना? येते की नाही? सगळी समज आवृत्त होते ना? तसेच हे पण झाले आहे.

**प्रश्नकर्ता :** हे बोलणे आम्हाला मान्य आहे. परंतु जो मूळ शुद्धात्मा आहे, त्याची शक्ती जर अधिक असेल, तर मग अंमल चढेलच कसा?

**दादाश्री :** पण सध्या त्याची शक्ती नाहीच ना! सध्या तर मूळ आत्मा पूर्णपणे उदासीन आहे.

**प्रश्नकर्ता :** पूर्वीपासूनच उदासीन आहे?

**दादाश्री :** तो कायमच उदासीन आहे, वीतरागच आहे. तो काय म्हणतो की जोपर्यंत 'तुम्हाला' हे सर्व चांगले वाटते तोपर्यंत हे करा आणि जेव्हा तुम्हाला हे चांगले वाटेनासे होईल, तेव्हा माझे नाव आठवा आणि 'ज्ञानी पुरुषां'चा किंवा इतर कोणताही आधार घेऊन परत माझ्याजवळ या. जोपर्यंत बाहेर चांगले वाटते तोपर्यंत भटका, अनुकूल वाटते तोपर्यंत भटका. नाहीतर मग 'स्वत:कडे या.'

एवढेच जर फक्त समजून घेतले ना की 'शेठ दारू पितात आणि त्यांच्यात बदल होतो' तर मग सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू लागतील. यात पण एवढीच दारू पाजली आहे, कोणती? तर 'तू चंदू आहेस, तू चंदू आहेस.' आणि बस, एवढीच दारू प्यायल्यामुळे 'तुमच्यात' अहंकार उत्पन्न झाला आहे. आणि मग 'मी चंदू आहे', असा अहंकार उत्पन्न

होतच राहतो. म्हणजेच हा सर्व अंमल झाला आहे आणि त्यामुळे त्याचे सगळे बोलणे पण अंमलवालेच आहे. नशेतच सर्व गोष्टी चालू आहेत आणि याचा शेवट येतच नाही.

नाहीतर, आत्मा तर संपूर्ण संसारकाळात उदासीनच आहे. पण ही गोष्ट लोकांना कशी बरे समजेल? एक अर्धा शेर दारू प्यायली की शेठजींमध्ये बदल होतो, तर ही तर रोजचीच दारू आहे! सकाळी उठल्यापासून लोक दारू पाजतच राहतात. लोक म्हणतात ना की 'या चंदुभाई, या चंदुभाई, तुम्ही तर आमचे व्याही आहात, तुम्ही यांचे पती आहात, तुम्ही यांचे मामा आहात, यांचे काका आहात?' आणि 'तुम्ही' पण हे सर्व मान्य करता. म्हणजे हीच दारू प्यायली आहे आणि यामुळे केवळ नशा वाढतच जाते. ही दारू पिऊनच तुम्ही बोलत असता आणि मग म्हणता 'मी दारू कुठे प्यायलो?' सारे जग हीच दारू पिऊन फिरत असते. शिवाय लोक ती दारू (मदिरा) पण पितात ना, तेव्हा लोक त्या दारूला नावे ठेवतात. अरे, त्या दारूला का नावे ठेवता?

## कर्माचा कर्ता कोण?

एकदा वास्तविकता जाणल्यानंतर काहीच जाणायचे शिल्लक राहत नाही. नंतर 'स्वत:' ज्ञाता-द्रष्टा, परमानंदी आणि सनातन सुखाचा स्वामी बनतो. मग कसलाच मालकीपणा राहत नाही. आणि या संसारात जी सुखे दिसतात, ती सर्व आरोपित सुखे आहेत. 'आत्म्या'च्या बाजूने तर फक्त सुखच सुख आहे पण 'तुम्ही' बाहेर सर्व जागी याच्यात सुख आहे, या गोष्टीत सुख आहे, असे आरोपण केले आहे. म्हणून तुम्हाला त्यातून सुख मिळते, पण सुख त्यात नसतेच. सुख स्वत:च्या स्वभावात आहे.

**प्रश्नकर्ता :** तर मग या भ्रांतीला कोण थांबवणार?

**दादाश्री :** या भ्रांतीला 'ज्ञानी पुरुष' थांबवू शकतात.

**प्रश्नकर्ता :** मी जर आता तुमच्याकडून ज्ञान घेऊन गेलो, नंतर

उद्या परत माझ्यातील भ्रांती माझ्याकडून परत तेच करवील की, 'नाही, तुला हे केलेच पाहिजे. त्याशिवाय चालणारच नाही.'

**दादाश्री :** नाही, असे नाही. मग तर प्रकाश होईल ना! त्याचे काय आहे, ते शेठजी एवढीशी पिऊन बसतात तेव्हा काय म्हणतात की 'मी तर अमका राजा आहे.' असे का बोलतात? ते शेठजी वेडे झाले आहेत का? नाही. दारूच्या नशेमुळे त्यांना भ्रांती उत्पन्न झाली आहे.

**प्रश्नकर्ता :** तो आता ज्या परिस्थितीत आहे, त्या परिस्थितीत त्याला कोणी ठेवले? आत्म्याने की भ्रांतीने? आणि आत्मा त्याला ताब्यात ठेवू शकत नाही का?

**दादाश्री :** आत्म्याला याच्याशी काहीही देणेघेणे नाही. हे सर्व फक्त अहंकाराचे आहे. जो भोगतो तो अहंकारच आहे. दु:ख भोगतो तो पण अहंकारच आहे आणि सुख भोगतो तो पण अहंकारच आहे. आणि जर 'अहंकार' संपला तर 'तुम्ही' 'आत्मा' झालात आणि मुक्तीसाठी लायक झालात. हा सर्व संसार अहंकारामुळेच टिकून राहिला आहे आणि अहंकारामुळेच राग-द्वेष आहेत आणि अहंकारामुळेच 'तुम्ही' कर्माचे कर्ता आहात. जेव्हा 'अहंकार' नसेल तेव्हा 'तुम्हाला' कर्माचे कर्तापण राहणार नाही. सध्या 'तुम्ही' कर्माचे कर्ता आहात, म्हणून भोक्ता पण आहात. 'तुम्हाला' हे कर्तापण भ्रांतिमुळे उत्पन्न होते.

जोपर्यंत शेठजींनी दारू प्यायली नव्हती, तोपर्यंत ते काहीच उलट-सुलट बोलत नव्हते, पण त्यांनी जेव्हा दारू प्याली, तेव्हापासून ते उलटे-सुलटे बोलू लागले. आता अशा स्थितीत जर त्यांनी कोणाला शिवी दिली, तर ते कर्म दारूच्या धुंदीत केले असे म्हटले जाईल, भ्रांतीत केले आहे असे म्हटले जाईल. तरी पण भोगावे तर लागेलच ना? तो काही सोडणार तर नाही ना? तुम्ही दारू पिऊन मला शिव्या देत होतात असे भांडण करील की नाही? म्हणजे या प्रकारे ही कर्मे भोगावी लागतात. आणि जोपर्यंत 'स्वत:' कर्माचा कर्ता बनतो तोपर्यंत तो 'मी करत आहे' असे म्हणून कर्माला आधार देतो. अहोहोहो! संडासाला जाण्याची पण शक्ती नाही आणि म्हणतो काय तर 'हे सर्व मी करीत

आहे' यामुळेच ही सर्व कर्मे बांधली जातात आणि मग चारी गतीत भटकत राहतो. जेव्हा 'ज्ञानीं'पासून ही गोष्ट समजून घेईल तेव्हा भटकणे बंद होईल.

## अशुद्धतेची उत्पत्ती कशामध्ये?

**प्रश्नकर्ता :** कितीही दक्षता बाळगली तरीही आत्म्यातून अशुद्ध पर्याय का उत्पन्न होतात?

**दादाश्री :** पण यात 'तुम्हाला' काय फायदा?

**प्रश्नकर्ता :** आम्हाला कर्मबंधने पडतात ना?

**दादाश्री :** 'तुमच्या'मधून अशुद्ध पर्याय उत्पन्न होतील तर 'तुम्हालाच' बंधने होतील ना! 'आत्म्या'मधून उत्पन्न होतच नाहीत. आत्म्यात अशुद्ध पर्याय नसतातच. तुम्हाला जर वास्तविकता समजून घ्यायची असेल तर हे अशुद्ध पर्याय आणि शुद्ध पर्याय वगैरे 'तुमच्यात'च उत्पन्न होत असतात.

तुम्हाला मूळ हकीगत सांगतो. दोन प्रकारचे आत्मे आहेत, एक मूळ आत्मा आहे आणि या मूळ आत्म्याच्या निमित्ताने उत्पन्न होणारा दुसरा हा व्यवहार आत्मा आहे. मूळ आत्मा हा निश्चय आत्मा आहे, त्यात काही बदल झालेलाच नाही. तो जसाच्या तसा आहे आणि त्याच्यामुळे हा व्यवहार आत्मा उत्पन्न झालेला आहे. ज्याप्रमाणे आपण आरशासमोर उभे राहिलो तर दोन चंदुभाई दिसतात की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, दोन दिसतात.

**दादाश्री :** त्याच प्रकारे हा व्यवहार आत्मा उत्पन्न झालेला आहे. त्याला मी 'प्रतिष्ठित आत्मा' असे म्हटले आहे. त्यात स्वत:ची प्रतिष्ठा (स्थापना) केली गेली आहे. म्हणून अजूनही जर 'तुम्ही' 'मी चंदुभाई आहे, मी चंदुभाई आहे' अशी प्रतिष्ठा केली तर परत पुढल्या जन्मासाठी (नवीन) प्रतिष्ठित आत्मा उत्पन्न होईल. या व्यवहाराला जर सत्य मानलात तर मग पुन्हा व्यवहार आत्मा उत्पन्न होईल. निश्चय आत्मा तर

आहे तसाच आहे. जर त्याचा स्पर्श झाला ना, तर कल्याण होईल. सध्या तर फक्त व्यवहार आत्म्याचाच स्पर्श आहे.

हा तर अहंकार उत्पन्न झाला आहे. लोक म्हणतात 'आत्म्याला दु:ख होत आहे. माझा आत्मा बिघडला आहे.' अरे बाबा, जर आत्मा बिघडला असेल तर तो कधीच सुधारणार नाही. ज्याच्यात बिघडायची शक्ती आहे अशी कोणतीही वस्तू कधी सुधारणार नाही. आणि इथे जर बिघडत असेल तर तिथे सिद्धक्षेत्रात पण बिघडेल. पण आत्मा तसा नाही. आत्मा जसा सिद्धक्षेत्रात असतो तसाच इथेही आहे. पण तो निश्चय आत्मा आहे आणि व्यवहार आत्मा बिघडलेला आहे. अर्थात व्यवहार बिघडलेला आहे, आणि व्यवहारालाच शुद्ध करायचा आहे. जर 'ज्ञानी' भेटले नाहीत तर व्यवहार शुभ करायचा आहे. आणि ज्ञानी भेटले तर व्यवहार शुद्ध करायचा आहे. बस, एवढेच करायचे आहे.

म्हणजेच आत्म्यामधून अशुद्ध पर्याय उत्पन्न होत नाहीत. सगळे अशुद्ध पर्याय व्यवहार आत्म्यामधून उत्पन्न होत आहेत. पर्याय म्हणजे काय? तर खूपच सूक्ष्म, अतिसूक्ष्म सूक्ष्मतर अवस्थेला पर्याय असे म्हणतात. या तर सर्व स्थूल अवस्था आहेत, अशुद्ध अवस्था आहेत, स्थूल अवस्था आहेत. 'मी चंदुभाऊ आहे' ही अवस्था काय साधी-सुधी अवस्था आहे का?

## व्यवहार आत्म्यालाच निश्चय आत्मा मानले गेले

**प्रश्नकर्ता :** व्यावहारिक आत्मा आणि निश्चय आत्मा, या दोघांचे गुण वेगवेगळे आहेत का?

**दादाश्री :** ते वेगळेच असणार ना? निश्चय आत्मा म्हणजे मूळ आत्मा.

**प्रश्नकर्ता :** तर यात आत्मा एकच आणि गुण वेगवेगळे असे आहे का?

**दादाश्री :** असे नाही. एक माणूस खारकांचा मोठा एजंट आहे,

सर्व लोक त्याला 'हे खारीकवाले सेठ' असे म्हणतात. पण कोर्टात त्यांना वकील म्हटले जाते. ते वकिली करतील तर लोक त्यांना वकीलच म्हणतील ना? त्याचप्रमाणे जर 'तुम्ही' व्यावहारिक कामातच मग्न असाल तर तुम्ही 'व्यावहारिक आत्मा' आहात आणि जर निश्चयात मग्न असाल तर 'तुम्ही' 'निश्चय आत्मा' आहात. मुळात तुम्ही जे आहात तेच आहात, पण कोणत्या कार्यात आहात, त्यावर हे आधारित आहे.

या प्रकारे व्यावहारिक आत्म्याला लोकांनी निश्चय आत्मा मानले आहे. ते 'व्यावहारिक आत्मा' असे तर म्हणतात, पण त्यांच्या ज्ञानात तर ते त्याला निश्चय आत्मा असेच समजतात. ते समजतात की 'जो आत्मा आहे तो हाच आहे आणि जर आत्मा नसेल तर मग बोलणार कसे? चालणार कसे?' हे हिंडणे-फिरणे, वार्तालाप करणे, स्वाध्याय करणे, मी वाचतो आणि माझ्या लक्षात राहते, या सर्वांसाठी म्हणणार की 'हाच आत्मा आहे, दुसरा कुठला आत्मा नाहीच. असे तो समजतो. पण खरे तर हे सर्व म्हणजे आत्म्याची केवळ सावलीच आहे. जर या सावलीलाच धरून बसलास तर कोट्यावधी जन्मात पण तुला मूळ आत्मा सापडणार नाही. अक्रम विज्ञानाने तर हे उघडपणे सांगितले की सावलीला कशाला पकडता? तरी पण क्रमिक मार्गाचा तो रस्ता पण चुकीचा नाही. पण ते सावलीलाच आत्मा मानतात. आत्म्याला आत्मा माना आणि सावलीला सावली माना, हेच मला सांगायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** मान्यतेतच मोठी चूक झाली आहे.

**दादाश्री :** मान्यतेत चूक झाली तर सर्वच चूक होते. मग शिल्लक उरलेच काय?

## 'रूपका'ची निर्जरा, पण 'मान्यते'मुळे बंधन

**प्रश्नकर्ता :** म्हणजे एक प्रतिष्ठित आत्मा आणि दुसरा शुद्धात्मा?

**दादाश्री :** निश्चय आत्मा तो शुद्धात्मा आहे आणि जो व्यवहारात चालतो तो व्यवहार आत्मा आहे, तो प्रतिष्ठित आत्मा आहे. कारण

'आपण'च त्याची प्रतिष्ठा करत आहोत. समजा आता जर कोणी असा माणूस आहे की ज्याने 'ज्ञान' प्राप्त केलेले नाही आणि त्याचे नाव चंदुलाल आहे, तर तो माणूस 'मी चंदुलाल आहे, मी याचा मामा आहे, याचा काका आहे' वगैरे जे बोलतो ते पूर्वीचे कर्म आहे आणि ते कर्म आता रूपकात बोलत आहे. पूर्वी जे योजना रूपात होते ते आता रूपकात आले. रूपकात आले त्याला हरकत नाही, पण पुन्हा तसेच्या तसेच त्याच्या श्रद्धेत बसलेले आहे आणि त्यामुळे परत तसेच बीज पेरले जाते. म्हणजेच या प्रकारे तो प्रतिष्ठा करत असतो. देहातच प्रतिष्ठा करतो की 'हा मी आहे.' त्यामुळे पुन्हा देह उत्पन्न होतो, मूर्ती उत्पन्न होते. तर अशा प्रकारे प्रतिष्ठा करून करून पुन्हा नवी मूर्ती उत्पन्न करतो आणि जुनी मूर्ती संपत जाते. आणि प्रतिष्ठा केली आहे म्हणून ती फळ देतच राहते.

प्रतिष्ठित आत्म्याची फक्त मान्यताच आहे, 'रॉंग बिलीफ' उत्पन्न झाली आहे म्हणून तो प्रतिष्ठा करतच राहतो, 'हा मी आहे, हा मी आहे.' यामुळे मागील प्रतिष्ठा संपते आणि नवी प्रतिष्ठा उत्पन्न होते. एक तर म्हणतो की 'मी चंदुलाल आहे', मग 'याचा मामा आहे, मला हा विचार आला.' आता मागील प्रतिष्ठेचा *आश्रव* आहे. त्या *आश्रवाची* मग *निर्जरा* होते. *निर्जरा* होत असताना परत तशीच्या तशी नवीन रचना तयार झाल्यानंतर *निर्जरा* होते. आता ज्याला हे ज्ञान दिले आहे तो काय म्हणतो, 'मी चंदुभाई आहे, आणि मी याचा मामा आहे', असे तो बोलतो ते सगळे मागील प्रतिष्ठेचेच आहे. पण आज त्याला ज्ञान आहे, म्हणून खरोखर 'मी चंदुभाई आहे' ही त्याची श्रद्धा संपली आहे, म्हणून तो नवीन प्रतिष्ठा करत नाही. म्हणून याला *संवर* म्हणतात, नवीन बंध (कर्मबंधन) पडत नाहीत आणि *निर्जरा* होत राहते. बंध कशाला म्हणतात? जिथे ज्ञान नसते, तिथे बंध पडतात. म्हणजेच आपण जशी प्रतिष्ठा करतो, तशीच प्रतिष्ठा परत उत्पन्न होते.

आता जर एखादी व्यक्ती म्हणत असेल की 'चोरी केलीच पाहिजे' आणि जर तो चोरी करीत असेल, लाच घेत असेल, लोकांशी बोलताना

चांगले चांगले बोलत असेल आणि सांगत असेल की 'मी असे करीन, मी तसे करीन, तुझे सगळे काम पूर्ण करीन.' आणि मग तो त्याच्याकडून एक हजार रुपये लाच म्हणून घेत असेल, तर हे सर्व कार्य जो करतो तो प्रतिष्ठित आत्मा आहे. जी योजना होती ती आता रूपकात आली आहे. हे सर्व जे तो आज बोलतो ते पण रूपक आहे आणि त्याला लाच देणारा मिळाला ते पण रूपक आहे. आणि हा हजार रुपये घेतो ते पण रूपक आहे. लाच घेतो, लाच घेण्याचा त्याचा भाव हा 'डिसायडेड' (ठरलेला) आहे आणि तो पण राजी-खुशीने घेतो. पण नंतर मग मनात भाव येतात, त्याने 'ज्ञान' घेतलेले नाही पण त्याच्या मनात असे भाव येतात की 'अशी सर्व लाच खाऊन शेवटी मलाच भोगावे लागेल ना? मग अशी लाच घेता कामा नये', त्यामुळे मग पुढील जन्माच्या प्रतिष्ठित आत्म्यात 'लाच घेता कामा नये.' अशी योजना बनली. म्हणून मग तो पुढील जन्मी लाच घेणार नाही. तुम्हाला ही सर्व रूपरेखा समजली का?

आता, काही लोक असे असतात की जे लाच घेत नाहीत. पण त्याच्या घरी त्याची बायको त्याला म्हणते की 'तुमच्याबरोबर जे सर्व शिकत होते त्या सगळ्यांचे बंगले झाले, फक्त तुम्हीच अजून भाड्याच्या घरात राहता.' मग त्याला असे वाटू लागते की 'ही माझी चूक आहे की काय?' त्याला स्वत:चा सिद्धांत बरोबर वाटतो. त्याची स्वत:ची श्रद्धा असते की माझा सिद्धांत चुकीचा नाही, हा सिद्धांत सुखकारक आहे, हे सर्व तो जाणतो. पण जेव्हा त्याची पत्नी त्याला म्हणते तेव्हा त्याला मनात असे वाटू लागते की 'मी लाच घेत नाही ही माझी चूकच आहे.' मग कुबुद्धी त्याला घेरते की 'आपल्याला त्याचे काम तर करायचेच आहे, मग लाच घ्यायला काय हरकत आहे?' त्यानंतर मग तो असा भाव करू लागतो की लाच घेतलीच पाहिजे. मग तो त्या व्यक्तीला म्हणतो 'मी तुमचे काम करतो.' तेव्हा तो माणूस म्हणतो 'साहेब मी तुम्हाला पाचशे रुपये देईन.' परंतु जेव्हा तो पैसे द्यायला येतो तेव्हा त्याच्याकडून ते घेतले जात नाहीत, तो आतून घाबरतो, त्याला त्रास होतो. कारण त्याने मागील जन्मात प्रतिष्ठा केलेली आहे की 'लाच घेणे चूक आहे, लाच घेता कामाच नये.' म्हणून ती प्रतिष्ठा त्याला लाच घेऊ देत

नाही. तो त्याला पैसे घेऊन या म्हणतो खरा पण जेव्हा तो पैसे घेऊन येतो, तेव्हा त्याचा हात कापतो, तो त्या पैशांना स्पर्श करू शकत नाही. म्हणजेच (या जन्मात) त्याच्याकडून एकही पैसा घेतला जात नाही, पण पुढच्या जन्मी 'लाच घ्यायची आहे' एवढे नवीन बी मात्र पडतेच पडते. अर्थात या जन्मी काही घेतले नाही आणि पुढील जन्मासाठी बी टाकले. एवढ्या मोठ्या जगात माणूस कसल्या कसल्या बिया टाकत असेल? आणि कशा-कशा प्रकारे अडकत असेल, ते कसे कळेल? समजले ना तुम्हाला? सिद्धांत आहे ना? पूर्णपणे सैद्धांतिक आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आपल्याकडे पंचवर्षीय योजना बनवितात, त्यात पहिल्या वर्षी या प्रकारे कोण-कोणत्या जागी धरणे बांधायची आहेत, या जागी असे करायचे आहे, त्या जागी असे करायचे आहे, असे सर्व ठरवितात. मग ते सर्व कागदावर लिहितात आणि मग त्याप्रमाणे ड्रॉइंग्स् वगैरे सर्वच कागदावर तयार होतात. जेव्हा त्याला सँक्शन (मंजुरी) मिळते तेव्हा ती योजना रूपकात आणण्यास सुरुवात करतात, तेव्हा त्याचा जन्म झाला असे म्हणतात, मग त्या योजनेला आकार मिळू लागतो. त्याच प्रकारे प्रथम ही योजना बनते. एका जन्मात ही योजना बनते, दुसऱ्या जन्मात आकार घेते आणि ती आकार घेत असतानाच पुन्हा आतमध्ये नवी योजना बनत जाते की या प्रकारे असे टाकले पाहिजे, असे व्हायला पाहिजे, असे चक्र चालू राहते. अर्थात ही पूर्णपणे सैद्धांतिक गोष्ट आहे.

## 'प्रत्यक्ष' ज्ञानीच, हकीगत प्रकाशित करतात

आता अशा गोष्टी तर पुस्तकात लिहिलेल्या नसतात, तर मग कशा प्रकार माणूस परत येईल? पुस्तकात तर लिहिलेले असते की कढीत मिरची, मीठ, हळद, गूळ वगैरे सर्व घाला. पण कोणती कोणती गोष्ट किती प्रमाणात घ्यावी असते, ते तर लिहिलेले नसते ना? म्हणून मग ही गोष्ट त्याला आतून समजत नाही ना? या प्रतिष्ठित आत्म्यालाच

सर्व जग आत्मा मानून चालले आहे आणि त्यालाच स्थिर करण्याचा प्रयत्न करत आहे. आणि ते पण चुकीचे नाही, स्थिर तर केलाच पाहिजे, आणि स्थिर करण्यामुळे त्याला आनंद मिळतो. जितका वेळ हा प्रतिष्ठित आत्मा स्थिर राहतो तितका वेळ, रात्री झोपेत तर तो स्थिर होतो, पण दिवसाही तो जितका वेळ स्थिर राहतो, तितका वेळ त्याला आनंद मिळतो. पण तो आनंद कसा असतो? की बस, स्थिरता मोडली की तो जसा पूर्वी होता तसा होतो. आणि त्याचबरोबर जर त्याला हेही कळले की मूळ आत्मा तर स्थिरच आहे, तर 'स्वत:' 'ॲडजस्टमेंट' करू शकेल. पण मूळ आत्म्याबद्दल लोकांना काही माहितीच नसते. या प्रतिष्ठित आत्म्यालाच लोकांनी आत्म्याच्या स्वरूपात स्वीकारले आहे पण प्रत्यक्षात तो आत्मा नाहीच. प्रतिष्ठित आत्मा म्हणजे पुद्‌गलच आहे, त्यात चेतन नसतेच.

जग ज्याला चेतन मानते त्यात चेतन नाहीच. हा माझा शोध आहे. मी स्वत: पाहून हे म्हणत आहे. शास्त्रात असे कुठेही लिहिलेले नाही. शास्त्रात या 'प्रतिष्ठित आत्म्याला' सुधारायला सांगितले आहे. 'सुधारत राहा' असे सांगितले आहे. पण त्याची काही पद्धत तर असायला हवी ना? सुधारण्याची पद्धत असते ना? जी पद्धत शास्त्रात सांगितली जाते, ती लोकांच्या लक्षात येत नाही. ती खूप सूक्ष्मपणे सांगितली आहे. पण ती शब्दरूपात सांगितली आहे ना? म्हणजे काय? तर शास्त्रात शब्दाद्वारे सांगितले आहे की मुंबईला जाल तर मुंबईत असे आहे, तसे आहे, तिथे असा जुहूचा किनारा आहे वगैरे, पण हे शब्दात आहे. त्यातून तुम्हाला काय फायदा झाला? म्हणजेच शास्त्रे काय करतात? तर शब्दांद्वारे सांगतात. ते अनुभवपूर्वक तर नसतेच ना? शास्त्रात अनुभव सामावता येत नाही ना? तात्पर्य हेच की 'ज्ञानी पुरुषां'च्या उपस्थितीशिवाय हे स्पष्ट समजू शकत नाही.

## मौलिक तत्त्वाचे अनुभव अवक्तव्य असतात

**प्रश्नकर्ता :** तुम्हाला सूरत स्टेशनच्या बाकावर 1958 मध्ये ज्ञान झाले होते, त्या वेळेचा अनुभव सांगा ना?

**दादाश्री :** अनुभव तर, त्या अनुभवाबद्दल मी तुम्हाला किती सांगू शकणार? मला आनंद झाला होता, सगळ्या जगाचा विसर पडला होता, आणि मी सगळे काही पाहिले, जग काय आहे, कर्ता कोण आहे, कशा तऱ्हेने चालते, तुम्ही कोण आहात, मी कोण आहे? या सगळ्याचे विवरण मला कळले. पण हे सगळे मी तुम्हाला शब्दाद्वारे समजावून सांगत आहे. पण मूळ वस्तू तर तुम्हाला समजणारच नाही. कारण तिथे शब्दच नाहीत. ते शब्दात विस्तारपूर्वक येऊ शकत नाही. हे तर जेवढे शब्द बोलले जाऊ शकतात, तेवढ्या शब्दाने फक्त बाह्य भागाबद्दल मी तुम्हाला सांगत आहे, पण ती मूळ वस्तू तर नाहीच ना! त्या जागेवर जेव्हा तुम्ही पोहोचाल, त्याचा स्वाद जेव्हा तुम्ही स्वत: घ्याल, तेव्हाच तुम्हाला तो अनुभव काय होता ते कळेल.

आत्मा सूक्ष्मतम वस्तू आहे, आत्म्याचे जे बाहेरचे प्रदेश आहेत ते सूक्ष्मतर आहेत, त्या सूक्ष्मतरांपर्यंत आम्ही सर्व काही पाहिले आहे. आणि वाणी तर सूक्ष्मतर नाही. त्यामुळे तिथे वाणी बंद होते. सर्व वाणी थांबते. म्हणून असे सांगावे लागते की तुम्ही हे अनुभव घेऊनच चाखा. म्हणूनच मी म्हटले ना की सांगितल्यावर समजेल अशी ही गोष्ट नाही, तर ते अनुभवानेच कळेल असे आहे. पूर्ण निराकरण पण अनुभवानेच होईल!

## 'आत्म्याने आत्म्याचे' दर्शन

**प्रश्नकर्ता :** पण दादा 'आत्म्याला, आत्मनिष्ठ आत्म्याने आत्म्याला पाहा, आत्म्याने आत्म्याचे दर्शन करा' असे सांगितले गेले आहे. याचा अर्थ काय?

**दादाश्री :** 'आत्म्याने' म्हणजे ज्याला 'व्यवहारिक आत्मा' मानला आहे, त्याद्वारेच तू 'आत्म्याला' पहा, असे सांगितले आहे. पण मध्ये निमित्ताला ठेव. ज्याने (आत्म्याला) पाहिला आहे अशा निमित्ताला ठेव, ते तुझी 'ॲडजस्टमेंट' तशी करून देतील आणि त्यामुळे तुला फळ मिळेल. नाहीतर स्वत:च स्वत:ला पाहायला जाशील तर काहीच होऊ

शकणार नाही. कारण तुझ्याजवळ फक्त इंद्रियगम्य दृष्टीच आहे ना! आणि तिथे तर अतीन्द्रियची आवश्यकता आहे. जोपर्यंत 'ज्ञानी पुरुष' इंद्रियगम्य दृष्टीतून सोडवत नाहीत आणि अतीन्द्रिय भाग देत नाहीत, दृष्टी बदलून देत नाहीत, तोपर्यंत दिसणार नाही. म्हणून आम्ही दृष्टी बदलून देतो.

## सोनाराची दृष्टी तर फक्त शुद्ध सोन्यावरच

ही जी सोन्याची अंगठी असते, ती खूप वेळा सोनाराकडे गेली तर त्या सोन्यात भेसळ होऊ लागते. लोक म्हणतात, 'काय पाहून ही अंगठी घालत आहात? हे सोने तर भेसळयुक्त झाले आहे.' तेव्हा आपण मनात विचार करतो की हे सोने तर आता भेसळयुक्त झाले आहे, आता याचे काय करावे? हे सोने जर आपण सोनाराकडे घेऊन गेलो तर सोनार आपल्यावर रागावेल, तो म्हणेल हे सोने असे भेसळयुक्त का केले आहे? सोनार असे रागावतो का? खराब केलेत असे म्हणतो का? नाही, सोनार रागावण्यासाठी बसलेला नाही. तो तर भेसळयुक्त सोने शुद्ध करण्यासाठीच बसला आहे. सर्व जग त्याच्याकडे भेसळयुक्त करूनच आणत असते.

म्हणून मग तो सोने शुद्ध करण्यासाठी बसतो. त्यात दोन-चार रुपये त्यालाही मिळतात. तो मग ते असे घासतो. भेसळ किती आहे ते पाहत नाही, इतर धातू किती आहेत हे तो पाहत नाही, फक्त सोने किती आहे एवढेच पाहतो. मग 'यात तीन रत्ती सोने आहे' असे तो सांगतो. आणि अंगठीचे वजन आहे नऊ रत्ती. म्हणजेच अंगठीत सहा रत्ती अशुद्ध माल मिसळलेला आहे. म्हणून तो अशी कसोटी करतो. मग तो सोनाराला म्हणतो, मला फक्त कसोटी करवून घ्यायची नाही, यातून जितके सोने निघेल त्यातून माझ्या लहान मुलासाठी अंगठी बनवून द्या. मग सोनार ते ॲसिडमध्ये टाकतो. सोन्याचे जाणकार असे सगळे करून देतात की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो जाणकार करून देतात.

**दादाश्री :** आणि जाणकार नसेल तर? ती अंगठी लोहाराला दिली तर? लोहार म्हणेल 'जा, परत घेऊन जा. माझ्याकडे फक्त लोखंड घेऊन ये. हे सोने कशासाठी माझ्याकडे आणले?' जर सुताराकडे गेलो, तर तो पण नाही म्हणेल. जर शेठजींना दिले आणि म्हटले 'भाऊ, एवढे करून द्या ना!' तेव्हा ते म्हणतील अरे, सोनाराकडे जा, एखाद्या पारखीकडे जा ना, इथे का आलास? त्याचप्रमाणे हा आत्मा जो अशुद्ध झाला आहे, तो शुद्ध करायचा असेल तर 'ज्ञानीं' जवळ जायला हवे. तिथे पूर्ण कारखाना आहे, आणि ते जाणतात की आत्म्याचे इतके गुण आहेत आणि अनात्म्याचे इतके गुण आहेत. यांचे इतके गुणधर्म आहेत, अशा प्रकारे जे गुणधर्मसहित जाणतात तेच वेगळे करू शकतात. इतर कोणी असे वेगळे करू शकत नाही.

## रिअल-रिलेटिव्ह, विज्ञानाचे स्पष्टीकरण

**प्रश्नकर्ता :** जे काही प्रश्न आणि समस्या असतात त्या फक्त प्रतिष्ठित आत्म्याच्याच असतात ना?

**दादाश्री :** हो, त्या सर्व प्रतिष्ठित आत्म्याच्याच असतात. प्रतिष्ठित आत्मा आपण प्रकृतीलाच म्हणतो. परंतु जर फक्त प्रकृती असे म्हटले तर लोकांना नीट समजणार नाही, म्हणून आम्ही त्याला प्रतिष्ठित आत्मा असे म्हटले आहे.

प्रतिष्ठित आत्मा, तो 'रिलेटिव्ह आत्मा' आहे आणि दुसरा शुद्धात्मा आहे. शुद्धात्मा हा 'रिअल आत्मा' आहे, आणि 'रिलेटिव्ह आत्मा' तो 'मेकॅनिकल आत्मा' आहे, तो *पूरण-गलन* (चार्ज होणे-डिस्चार्ज होणे) या स्वरूपाचा आहे. तुम्ही जेवलात की सकाळी संडासाला जावे लागते. पाणी प्यालात तर बाथरूमला जावे लागते, श्वास घेतलात तर उच्छ्वास होत राहतो. या प्रमाणे *पूरण-गलन* आणि शुद्धात्मा, अशा दोनच गोष्टी आहेत.

**प्रश्नकर्ता :** 'रिलेटिव्ह आत्मा' आणि 'रिअल आत्मा', यात काय फरक आहे?

**दादाश्री :** 'रिलेटिव्ह आत्मा' हा स्वत:च्या 'राँग बिलीफ'मधून उत्पन्न झाला आहे. ती राँग बिलीफ' जर फ्रॅक्चर झाली तर मग स्वत: 'रिअल आत्मा' होऊन जाईल. 'ज्ञानी पुरुष' सर्व राँग बिलीफ्स् फ्रॅक्चर करून देतात. आणि 'राइट बिलीफ' स्थापित करतात. याला सम्यक्‌दर्शन असे म्हणतात. यामुळे मग स्वत:च्या शुद्धात्म्याची प्रतीती बसते.

**प्रश्नकर्ता :** अहम् आणि प्रतिष्ठित आत्मा यात काही फरक आहे का?

**दादाश्री :** नाही. प्रतिष्ठित आत्मा तोच अहंकार आहे. 'आपण' प्रतिष्ठा केली आहे म्हणून तो उत्पन्न झाला आहे. आणि नंतर पुन्हा तो प्रतिष्ठा करतच राहतो, 'शरीर मी आहे, चंदुभाई मी आहे, या स्त्रीचा मी पती आहे, या मुलांचा बाप पण मीच आहे, याचा भाऊ पण मीच आहे' असे कितीतरी प्रकारचे मी, मी, मी, मी...

## 'ज्ञानी' तर सहजपणेच सिद्धांत प्रकाशमान करतात

**प्रश्नकर्ता :** हे सर्व लोक प्रतिष्ठित आत्म्यालाच आत्मा म्हणतात ना?

**दादाश्री :** हो, प्रतिष्ठित आत्म्यालाच आत्मा मानतात. पण ती 'राँग बिलीफ' आहे. पण त्याला याची माहितीच नसते ना! आणि तो तर प्रतिष्ठित आत्म्यालाच 'हाच माझा आत्मा आहे' असे मानून पुढे जातो. मोहाचे एक-एक परमाणू कमी करत करत पुढे जात राहणे, हा संपूर्ण क्रमिक मार्ग आहे. क्रमिक मार्गात 'प्रतिष्ठित आत्म्याला' आत्मा म्हणतात, आणि इथे अक्रम मार्गात मूळ आत्म्याला आत्मा म्हणतात. म्हणजेच क्रमिक मार्गात आणि अक्रम मार्गात दोघांत सांगण्याच्या दृष्टीत फरक आहे. क्रमिक मार्गातील ते लोक पण खरेच सांगतात, त्या आत्म्याला वेदकता असतेच. 'हे वेदकता वगैरे आत्म्याचे एवढे गुण आहेत' असे क्रमिक मार्गात म्हणतात. या उलट आपल्या अक्रम मार्गात वेदकता वगैरे सर्व गोष्टी ह्या प्रतिष्ठित आत्म्यात आहेत, असे सांगितलेले आहे. या अक्रम मार्गात ज्याला आपण प्रतिष्ठित आत्मा म्हणतो, त्याला

ते लोक व्यवहार आत्मा मानतात आणि व्यवहार आत्म्यालाच मूळ आत्मा मानतात. आणि त्यालाच स्थिर करायचा आहे, त्यालाच कर्मरहित करायचा आहे, असे मानतात. म्हणजेच हा आत्मा कर्मांने बांधला गेला आहे आणि त्यालाच कर्मरहित करायचे आहे, असे ते मानतात. खरे तर, मूळ आत्मा तसा नाही. मूळ आत्मा तर कर्मांपासून मुक्तच आहे. फक्त तुला त्याचे भान नाही, तुला हे भान येण्याची गरज आहे.

आम्ही काय सांगू इच्छितो की 'तुला' याचे भान झालेले नाही. तुला ही भ्रांती आहे. जो 'आत्मा' नाही त्यालाच 'तू' हा 'आत्मा' आहे असा आरोप करतोस. आणि जो खरोखरच 'आत्मा' आहे त्याचे 'तुला' भानच नाही. म्हणून 'तू' 'आत्म्याला' जाण, तर मग 'तू' या सर्वांपासून मुक्तच आहेस. हेच 'अज्ञान' काढायचे आहे, नाहीतर कोट्यावधी जन्मात पण 'तुझे' अज्ञान जाणार नाही.

पंचवीस प्रकारचे मोह आहेत, ते पंचवीस प्रकारचे मोह 'चार्ज' होतात आणि ते पंचवीस प्रकारचे मोह 'डिस्चार्ज' होतात. 'डिस्चार्ज' तर नियमाने होणारच आणि 'रॉंग बिलीफ' आहे म्हणून परत 'चार्ज' होत राहते. येथे आपल्याकडे, आम्ही ज्ञान देतो त्यानंतर 'चार्ज' होणे बंद होते आणि फक्त 'डिस्चार्ज'च शिल्लक राहतो.

म्हणून 'आम्ही' 'प्रतिष्ठित आत्मा' हा नवीन शब्द दिला आहे. भगवंतांनी लोकांना सांगितले होते, पण लोकांना ते समजले नाही. म्हणून तर आम्हाला प्रतिष्ठित आत्मा हा शब्द द्यावा लागला. लोकांना त्यांच्या भाषेत समजावे म्हणून. आणि भगवंतानी जे सांगितले आहे त्यात काही नुकसान होऊ नये या प्रकारे प्रतिष्ठित आत्मा हा शब्द दिला आहे. कारण तुम्हाला तुमच्या भाषेत समजायला हवे ना? तुम्हाला समजलेच नाहीतर मग तुम्ही करणार काय?

## जग-अधिष्ठान, ज्ञानींच्या ज्ञानात...

जग ज्याच्यातून उत्पन्न झाले आहे आणि ज्यात त्याचा लय होतो त्याला अधिष्ठान म्हणतात. तर मग काही जण विचारतात की 'शास्त्रात

अशा अधिष्ठानाबद्दल काहीच का सांगितले नाही?' नाही, तीर्थंकरांनी सांगितलेली नाही अशी कोणतीच गोष्ट नाही. परंतु जर तुम्हाला ती मिळू शकत नसेल तर ती वेगळी गोष्ट आहे.

म्हणून आम्ही काय म्हणतो? हे जग कशातून उत्पन्न झाले आहे? तर प्रतिष्ठित आत्म्यातून हे सर्व उत्पन्न झाले आहे आणि त्यातच त्याचा लय होतो. यात मूळ आत्म्याला काहीच देणेघेणे नाही. म्हणजेच ही तर फक्त विभाविक दृष्टीच उत्पन्न झाली आहे.

## 'दर्शन' शुद्ध झाले की मग शुद्धात समावेश

एक प्रतिष्ठित आत्मा आणि एक दरअसल (मूळ, अस्सल) आत्मा. प्रतिष्ठित आत्मा हा 'मेकॅनिकल' आहे. तो खात-पीत असेल तरच जिवंत राहू शकतो, नाहीतर जर श्वास असा बंद केला तर तो संपून जाईल. हा प्रतिष्ठित आत्मा जे काही करतो त्यात 'तुम्ही' 'मी करतो' असा अहंकार करता, त्यामुळे मग परत दुसरा नवीन जन्माचा प्रतिष्ठित आत्मा तयार होतो.

त्याचे काय आहे, की मूळ अस्सल आत्म्याला काहीच झालेले नाही. लोकांनी 'अज्ञान' प्रदान केल्यामुळे हे सर्व संस्कार उत्पन्न झाले आहेत. जन्म झाल्यावर लगेच लोक 'त्याला' 'चंदू, चंदू' असे म्हणू लागतात. आता त्या बाळाला तर हे लोक काय करीत आहेत हे कळतच नसते. पण हे लोक त्याच्यावर संस्कार करतच राहतात. नंतर मग 'तो' 'मी चंदू आहे' असे मानू लागतो. मग मोठा झाल्यावर तो म्हणू लागतो, 'हे माझे मामा आहेत, आणि हे माझे काका आहेत.' या प्रकारे सर्व अज्ञान प्रदान केले जाते. त्यामुळे भ्रांती उत्पन्न होते. त्यामुळे होते काय? तर आत्म्याची एक शक्ती आवृत होते (झाकली जाते), दर्शन नावाची शक्ती आवृत होते. ही दर्शन नावाची शक्ती आवृत झाल्यामुळे हे सर्व उत्पन्न होते. ते दर्शन जेव्हा परत ठीक होते, सम्यक् होते, तेव्हा मग परत 'स्वतः' स्वतःच्या 'मूळ स्वरूपात' स्थित होतो. सध्या हे दर्शन मिथ्या झाले आहे आणि म्हणून तो भौतिक गोष्टीतच सुख आहे असे

मानू लागला आहे, ते दर्शन जर ठीक झाले तर भौतिक सुखाची मान्यता पण संपून जाईल. बाकी, फार काही बिघडलेले नाही. फक्त दर्शनच बिघडले आहे. दृष्टीच बिघडली आहे. ती दृष्टी आम्ही पालटून टाकतो.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्म्याला फक्त भ्रांतीच झाली आहे?

**दादाश्री :** आत्माला भ्रांती नाही तर त्याचे फक्त दर्शन आवृत्त झाले आहे. मूळ आत्म्याचे जे दर्शन आहे, ते दर्शनच पूर्णपणे आवृत्त झाले आहे. बाहेरच्या अज्ञान प्रदानामुळेच असे होत असते. जन्म झाल्यापासूनच हे बाहेरचे लोक त्याला अज्ञान देतात. ते स्वतःच अज्ञानी असतात आणि मुलाला पण अज्ञानाच्या रस्त्याने घेऊन जातात. म्हणून तो देखील असे मानू लागतो, आणि असे मानल्यामुळे दर्शन आवृत्त होते आणि दर्शन आवृत्त झाल्यामुळे तो म्हणतो की 'हे माझे सासरे आहेत, हे माझे मामा आहेत.' आणि मी म्हणतो की या सर्व रॉंग बिलीफ्स् आहेत.

## 'मूळ स्वरूपा'च्या भानामुळे स्वतःचा उद्धार

**प्रश्नकर्ता :** म्हणजे आत्म्याचा उद्धार आत्म्याला स्वतःलाच करायचा असतो, असेच झाले ना?

**दादाश्री :** आत्म्याचा उद्धार आत्म्याला स्वतःच करायचा आहे याचा अर्थ असा आहे की मूळ आत्म्याचा उद्धार तर झालेलाच आहे, पण त्यात आपण मानलेला जो आत्मा आहे, प्रतिष्ठित आत्मा आहे, त्याच्या मान्यतेत ही सर्व वास्तविकता येत नाही. मूळ आत्म्याचा तर उद्धार झालेलाच आहे, पण प्रतिष्ठित आत्मा, म्हणजेच तो स्वतः ज्याला आत्मा मानतो, त्याला स्वतःलाच जेव्हा अशी जाणीव होईल की 'माझे स्वरूपच असे आहे, आणि मी तर ज्ञान-दर्शन-चारित्र्यमय आहे.' तेव्हा 'त्याचा' पण उद्धार होईल. म्हणजेच स्वतः स्वतःचाच उद्धार 'तो' या प्रकारे, असा पुरुषार्थ करील तेव्हाच होईल ना! पण जेव्हा त्याला ज्ञानी पुरुष भेटतील, आणि त्याला स्वतःच्या स्वरूपाचे भान करून देतील त्यानंतर तो पुरुषार्थ करू शकेल आणि तेव्हा त्याचा उद्धार होईल.

– **जय सच्चिदानंद**

# मूळ गुजराती शब्दांचे समानार्थी शब्द

***शाता*** : सुख परिणाम

***अशाता*** : दुःख परिणाम

***आरा*** : कालचक्राचा एक भाग

***आश्रव*** : उदयकर्मात तन्मयाकार होणे

***उपरी*** : वरिष्ठ, मालक

***पूरण*** : चार्ज होणे, भरणे

***गलन*** : डिस्चार्ज होणे, रिकामे होणे

***गेड बसणे*** : नीट, व्यवस्थित समजणे

***निर्जरा*** : आत्मप्रदेशातून कर्मांचे वेगळे होणे

***पुद्गल*** : अहंकार

***लागणी*** : सुख-दुःखाची अनुभूती, संवेदना

***संवरपूर्वक निर्जरा*** : पुन्हा कर्म बीजे पडत नाहीत आणि कर्मफळ पूर्ण होते.

# प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष 'दादा भगवानांच्या' साक्षीने देहधारी...... ( ज्याच्या प्रती दोष झाला असेल त्या व्यक्तीचे नाव ) च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्माहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने, आजच्या दिवसापर्यंत माझ्याकडून जे जे ★★ दोष झाले आहेत, त्यांची क्षमा मागत आहे, हृदयपूर्वक खूप पश्चात्ताप करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा. आणि पुन्हा असे दोष कधीही करणार नाही, असा दृढ निश्चय करीत आहे, त्यासाठी मला परम शक्ती द्या.

★★ ( आयुष्यभरात क्रोध-मान-माया-लोभ, विषय-विकार, कषाय इत्यादीपासून त्या व्यक्तीला जे जे दुःख दिले गेले असेल, त्या सर्व दोषांना मनात आठवावे. )

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तके

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
10. भावना सुधारे जन्मोजन्म
11. कर्माचे विज्ञान
12. पाप-पुण्य
13. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
14. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
15. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
16. मानव धर्म
17. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
18. सेवा-परोपकार
19. दान
20. त्रिमंत्र
21. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
22. चमत्कार
23. सत्य-असत्याचे रहस्य
24. वाणी, व्यवहारात (सं)
25. पैशांचा व्यवहार (सं)
26. क्लेश रहित जीवन
27. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
28. प्रेम
29. गुरू-शिष्य
30. अहिंसा
31. आप्तवाणी-1 ते 8
39. आत्मसाक्षात्कार
40. जगत् कर्ता कोण ?
41. कर्माचा सिद्धांत

## हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 12 (पू, उ)
54. आप्तवाणी - 13 (पू, उ)
56. आप्तवाणी - 14 (भाग-1 से 4)
60. ज्ञानी पुरुष (भाग-1)
61. व्यसन मुक्ति का मार्ग

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

**★ दादा भगवान फाउन्डेशनद्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेतसुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वेबसाइट www.dadabhagwan.org वरसुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता.**

**★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित होत आहे.**

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार

**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
(मुख्य केन्द्र) पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन :** +91 79 3500 2100, +91 9328661166/77
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
**फोन** : 9323528901

**पुणे** : **त्रिमंदिर,** पुणे-बेंगलुरू हाईवे, खेड शिवापुरच्या जवळ, वर्वे बुद्रुक, जिला-पुणे, महाराष्ट्र **फोन** : 7203098409

**थाणे** : **त्रिमंदिर**, ग्लोबल हॉस्पिटलच्या बाजूला, साकेत-बालकुम रोड, माजीवाडा, **फोन** : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलुरू** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830093230 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पुणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ़** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 795-92-DADA (3232)

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 402179706

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 91457800

**www.dadabhagwan.org**

## यात आहे विज्ञान!

ज्ञानी पुरुषांकडून आत्मा-अनात्म्याची लक्ष्मणरेषा समजून घेतली पाहिजे. त्यांनी दिलेली स्पष्टीकरणे त्रिकाल सत्य असतात. लाखो वर्षांनंतरही प्रकाश जसाच्या तसाच राहतो.

म्हणजेच हे सर्व सायन्स आहे, संपूर्ण विज्ञान आहे. गेली अठ्ठावीस वर्षे मी विज्ञान सांगत आहे, तरी पण हे विज्ञान पूर्ण झाले नाही. हे सर्व या टेपरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले आहे. या सर्वांची पुस्तके छापली जातील. म्हणजेच हे तर खूप मोठे विज्ञान आहे. दररोज दोन-तीन टेप्स तयार होतातच. कित्येक वर्षे मी बोलत आहे. साऱ्या जगाच्या कल्याणासाठी आहे हे सर्व.

- दादाश्री

आत्मविज्ञानी 'ए.एम.पटेल' यांच्या आत प्रकट झालेल्या

# दादा भगवानना असीम जय जयकार हो

dadabhagwan.org

9 788199 202283
Printed in India
Price ₹ 200